# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–५ अभ्यासपत्रिका क्रमांक ९ (DSE-E3)

# मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

**(प्रारंभ ते इ.स. १५००)**

सत्र–६ अभ्यासपत्रिका क्रमांक १४ (DSE-E128)

# मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

**(इ.स. १५०० ते इ.स. १८००)**

**बी. ए. भाग–३ : मराठी**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास) भाग- ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ३००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्र. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-92887-06-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अतकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद

## प्रास्ताविक

'मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' ही अभ्यासपत्रिका बी. ए. भाग-३ च्या सत्र ५ व सत्र ६ साठी लावण्यात आलेली आहे. यातील सत्र ५ मध्ये चार विभाग करण्यात आलेले आहेत. त्यात प्रारंभापासून ते इ.स. १५०० पर्यंतचा मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास लावण्यात आलेला आहे. त्याअंतर्गत चार विभाग करण्यात आलेले आहेत. त्यात विभाग १ मध्ये मराठी वाङ्मयाचा प्रारंभकाळ ते इ.स. १२०० पर्यंतचा इतिहास, मुकुंदराज व आद्यकवयित्री महदंबा, विभाग २ मध्ये इ.स. १२०० ते १३०० (स्थूल कालखंड), महानुभावीय गद्य-पद्य, विभाग ३ मध्ये इ.स. १३०० ते १४०० (स्थूल कालखंड), ज्ञानेश्वर, नामदेव व अन्य संतप्रभावळ, विभाग ४ मध्ये इ.स. १४०० ते १५०० (स्थूल कालखंड), त्यात नाथ संप्रदाय, लिंगायत संप्रदाय, जैन मराठी कवी, दत्त संप्रदाय, नागेश संप्रदाय, मुस्लिम मराठी कवी, ख्रिस्ती मराठी कवी इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे. या चार घटकात प्रत्येक विषयाचे स्वतंत्र तपशीलवार, ससंदर्भ विवेचन करण्यात आलेले आहे. सत्र ६ मध्येही चार विभाग करण्यात आलेले आहेत. त्यात विभाग १ मध्ये इ.स. १५०० ते इ.स. १६००, एकनाथांची साहित्यसंपदा, विभाग २ मध्ये इ.स. १६०० ते इ.स. १७००, त्यात संत तुकाराम आणि समर्थ रामदासांची साहित्यसंपदा, विभाग ३ मध्ये इ.स. १६०० ते इ.स. १८००, निवडक पंडित कवींच्या काव्याचा अभ्यास आणि विभाग ४ मध्ये इ.स. १५०० ते इ.स. १८००, बखर व शाहिरी वाङ्मय इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे. या अभ्यासपत्रिकांत मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा प्रारंभापासून ते इ.स. १८०० पर्यंतचा धावता आणि कालिक आढावा घेण्यात आला आहे.

वरील घटकलेखनातून विद्यार्थ्यांना मराठी वाङ्मय इतिहासाचा स्थूल आराखडा समजून येईल. प्रत्येक घटकात अधिक वाचनासाठी आवश्यक असणाऱ्या पुस्तकांची नावे आणि करावयाचे अधिकचे उपक्रम सांगण्यात आलेले आहेत. सदर विवेचनातून मध्ययुगीन मराठी गद्यसाहित्य आणि पद्यसाहित्य इत्यादींचा परिचय होईल. त्याशिवाय मराठी भाषेचा प्रारंभकाळ आणि मौखिक वाङ्मयाचा परिचयही होईल. त्यामुळे दूरशिक्षणच्या विद्यार्थ्यांना या पुस्तकाचा स्वयंअध्ययनासाठी आवश्यक तो उपयोग होईल, असे नमूद करावेसे वाटते.

हे सर्व घटक अभ्यासतांना वाङ्मयाचा व्यापक पट विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर उभा राहील. मध्ययुगीन मराठी साहित्याने जनमाणसाचे कसे भरणपोषण केले आहे, हेही लक्षात येईल. तत्कालीन समाजव्यवस्थेतील नैतिक मूल्ये, धार्मिक मूल्ये, भाषिक बंडखोरी, श्रमाचे तत्त्वज्ञान या सर्वांचे प्रतिबिंब म्हणजे मध्ययुगीन मराठी साहित्य होय. यातून वाचकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास अपेक्षित आहे. त्यासाठी हे साहित्य निश्चितच पूरक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**■ संपादक ■**

**डॉ. दिनेश वाघुंबरे**
बळवंत कॉलेज, विटा
ता. खानापूर, जि. सांगली

**डॉ. सर्जेराव जाधव**
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास**
बी. ए. भाग-३ मराठी अभ्यासपत्रिका क्र. ९ व १४

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र-५ घटक क्रमांक | सत्र-६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. शर्मिला घाटगे**<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज | १ | – |
| **डॉ. सुभाष जाधव**<br>श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. सर्जेराव जाधव**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. प्रवीण लोंढे**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ | – |
| **डॉ. दिनेश वाघुंबरे**<br>बळवंत कॉलेज, विटा, ता. खानापूर, जि. सांगली | – | १ |
| **प्रा. विपीन वैराट**<br>शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा | – | २ |
| **डॉ. बाळासाहेब सुतार**<br>प्रा. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर | – | ३ |
| **प्रा. विजय शिंदे**<br>श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. दिनेश वाघुंबरे**
बळवंत कॉलेज, विटा
ता. खानापूर, जि. सांगली

**डॉ. सर्जेराव जाधव**
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका

## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक ९

## सत्र पाचवे


| | | |
|---|---|---|
| घटक १ | मराठी वाङ्मयाचा प्रारंभकाळ ते इ.स. १२०० पर्यंत<br>अ) विवेकसिंधू पूर्वकालीन रचना, ब) मराठीतील आद्य ग्रंथकार मुकुंदराज<br>क) मराठीतील आद्य कवछित्री महदंबा | १ |
| घटक २ | इ.स. १२०० ते १३०० (स्थूल कालखंड)<br>अ) महानुभावीय गद्य वाङ्मय, ब) महानुभावीय पद्यवाङ्मय | २४ |
| घटक ३ | इ.स. १३०० ते इ.स. १४०० (स्थूल कालखंड)<br>अ) ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन कार्य, ब) नामदेवांची अभंगरचना, क) संतमेळा | ५७ |
| घटक ४ | इ.स. १४०० ते इ.स. १५०० (स्थूल कालखंड)<br>अन्य संप्रदायातील प्रमुख ग्रंथकार आणि त्यांची ग्रंथरचना | १२० |


## मराठी अभ्यासपत्रिका क्रमांक १४

## सत्र सहावे


| | | |
|---|---|---|
| घटक १ | इ.स. १५०० ते इ.स. १६०० (स्थूल कालखंड)<br>एकनाथांची साहित्य संपदा | १४५ |
| घटक २ | इ.स. १६०० ते इ.स. १७०० (स्थूल कालखंड)<br>अ) तुकारामांची अभंगरचना, ब) रामदासांची ग्रंथरचना | १६५ |
| घटक ३ | इ.स. १६०० ते इ.स. १८०० (स्थूल कालखंड)<br>निवडक पंडित कवींच्या काव्याचा अभ्यास | १८३ |
| घटक ४ | इ.स. १५०० ते इ.स. १८००<br>अ) बखर वाङ्मय, ब) शाहीरी वाङ्मय | २०४ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

# मराठी वाङ्मयाचा प्रारंभकाळ ते इ. स. १२०० पर्यंत

**अ)** विवेकसिंधूपूर्वकालीन रचना :

कुवलयमाला, मानसोल्लास, राजमतिप्रबोध, अमरनाथसंवाद, गोरक्षगीता इ.

**ब)** मराठीतील आद्य ग्रंथकार मुकुंदराज यांची रचना :

विवेकसिंधू, पवनविजय, परमामृत

**क)** मराठीतील आद्य कवयित्री महदंबा यांची रचना :

धवळे (पूर्वार्ध व उत्तरार्ध), मातृकी रूक्मिणी स्वयंवर

---

## १.१ उद्दिष्टये

- मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा कालखंड याचा परिचय होईल.
- भाषा आणि संस्कृतीच्या संदर्भात मध्ययुगीन वाङ्मयाचा अभ्यास करणे.
- मध्ययुगीन गद्य, पद्य वाङ्मय निर्मितीच्या प्रेरणा जाणून घेणे.
- सामाजिक सांस्कृतिक आणि राजकीय घटकांचा वाङ्मयनिर्मितीच्या संदर्भातील प्रेरणांचा अभ्यस करणे.
- मध्ययुगीन मराठी साहित्याचा अभ्यास करणे.

## १.२ प्रास्ताविक :

महाराष्ट्र ही संताची आणि वीरांची भूमी आहे. संतत्व आणि वीरत्व हे मराठी मनाचे दोन महत्त्वाचे गुणधर्म असून यांचे प्रतिबिंब मराठी वाङ्मयात उमटलेले आपणास दिसून येते. मराठी मन आणि मराठी संस्कृती यांची साक्ष देणाऱ्या मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप आपणास पाहावयाचे आहे. याआधी आपणास महाराष्ट्राची आणि मराठी भाषेची परंपरा प्रथम पाहावी लागेल.

मराठी वाङ्मयाचा इतिहास हा महाराष्ट्राच्या सर्वांगीण इतिहासाचे एक प्रमुख अंग असून हा इतिहास महाराष्ट्राच्या मध्ययुगीन विचार विकासावर प्रकाश टाकणारा आहे. 'महाराष्ट्र' हा प्रथम उल्लेख एरणगावी सापडलेल्या इ. स. ७८२ च्या स्तंभालेखात सापडतो. (शके ३६५ चिनी प्रवासी हु एन त्संग, इ. स. ६२९ ते ६४५) याने महाराष्ट्राचा उल्लेखह्व'मोहोलाश' असा केला आहे. महाराष्ट्र हे नाव कसे पडले याविषयी वेगवेगळी मतमतांतरे आहे. महाराष्ट्राचा उल्लेख वररूचीच्या प्राकृत व्याकरणात आला असून या देशाच्या

भाषेला ‘महाराष्ट्री’ असे नाव आहे. ‘महारांचे राज्य म्हणून महाराष्ट्र’ अशीही एक व्युत्पत्ती कथन केली जाते. म. म. काणे यानी ‘महान राष्ट्र ते महाराष्ट्र’ अशी एक गुणवाचक व्युत्पत्ती मांडली तर नाणेघाट, भाजे, कार्ले, कान्हेरी येथील शिलालेखात ‘महाराठी’ (महाराथी) ‘महारठिनी’ अशी विशेषणे आढळतात. तर महारथ किंवा ‘महारठ’ या लोकांचे राष्ट्र ते महाराष्ट्र अशीही एक व्युत्पत्ती आहे. महाराष्ट्र म्हणजे मोठे राष्ट्र, महारथी म्हणजे मोठा योद्धा. यावरुन महारट्ट - महरट्ट - महाराष्ट्र असे वेगवेगळे अर्थ संशोधकांनी लावलेले दिसून येतात. मोल्सवर्थकोशाच्या प्रस्तावेत डॉ. जॉन विल्सन यांनी महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र असा उल्लेख केला आहे. डॉ. ओपर्ट यांनीही या मतास पुष्टी दिली आहे. त्यांच्या मते महाराष्ट्राचे जुने नाव मल्लराष्ट्र, महाराष्ट्र म्हणजेच मार. मार - महार - म्हार राष्ट्र - महाराष्ट्र. डॉ. श्री. व्यं. केतकर यांनीही या मताचा पाठपुरावा केला आहे. तर ‘मऱ्हाटी संस्कृती; काही समस्या’ या ग्रंथात शं. बा. जोशी म्हणतात, ‘या देशाचे नाव महाराष्ट्र नसून मरहट्ट असे असावे. मरहट्ट हा शब्द कानडी असून त्याचा अर्थ मर = झाड, हट = प्रदेश झाडी मंडळ म्हणजे जंगलयुक्त प्रदेश असा आहे. हाटी धनगर लोकांचा झाडीयुक्त देश म्हणजे मरहट्ट. एकूणच महाराष्ट्री - महारट्टी - मरहट्टी - मऱ्हाटी - मराठी हे भाषानाम देशनामाशी व लोकनामाशी सुसंगत असल्याने आपण ते मान्य करु शकतो.

या महाराष्ट्र देशात मराठी भाषा कशी अवगत झाली, याविषयी पुढीलप्रमाणे अंदाज करता येतो. नाग लोक दक्षिण प्रांतात आले. त्यावेळी ते वैदिक अपभ्रंश बोलत असत. याचा काळ शके पूर्व ३२०० ते शके पूर्व १००० हा होता. पूर्व ६०० ते ७०० च्या सुमारास राष्ट्रीक, वैराष्ट्रीक, महाराष्ट्रीक असे तीन संघ किंवा लोक इकडे आले. यांच्या एकत्रिकरणाने मरहट्ट किंवा मराठे झाले. महाराष्ट्री लोक महाराष्ट्री भाषा बोलत. वैदिक यांच्या मिश्रणाने मराठी भाषा संस्कृत - प्राकृत - अपभ्रंश + महाराष्ट्री या क्रमाने प्रवर्तित होत गेलेल्या भाषाप्रवाहाशीच आपली मराठी भाषा निगडित आहे हे सिद्ध झाली.

मराठी भाषेच्या उपपत्तीच्या संदर्भात विचार करत असताना ताम्रपट, शिलालेख आणि ग्रंथ यांचा आधार घ्यावा लागतो. शके ६०२ मधील चिकुर्डे येथील ताम्रपटात मराठीविषयी काही शद्ब मिळतात. इ. स. ६९९ (श. ६२१) च्या चिकुर्डे येथील ताम्रपटात ‘करवून’, ‘करीत’ यांसारखे मराठी शद्ब सापडतात. इ. स. १०१२ (९३४) च्या अक्षीच्या शिलालेखात मराठी वाक्य मिश्र स्वरुपात आढळते. तर इ. स. ९८३ (इ.स. ९०५) मधील म्हैसूर येथील श्रवणबेळगोळच्या शिलालेखातील मराठीचे पहिले लिखित वाक्य आढळते. याचा अर्थ असा की, दहाव्या शतकात मराठी ही बोलीच्या आणि लोकभाषेच्या स्वरूपात याचा होत होती. पळसदेव येथील शिलालेख हा शके १०७९ मधील आहे. हा राष्ट्रकुटांच्या राजवटीतील असून या काळी मराठी भाषा प्रचलित होती, असे दिसते. परळचा शिलालेख हा शके ११०९ मधील आहे. यात दोन ओळी मराठीत आहे. तर पाटणचा शिलालेख शके ११३२ मधील असून पंढरपूर येथील चौऱ्याऐंशीचा शिलालेख शके ११९५ असून त्यात मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी दिलेल्या देणग्यांचा उल्लेख आहे.

शके ९४० च्या कुंडल (जि. सोलापूर) येथील शिलालेखावर तीन ओळी असून शेवटची ओळ मराठीत आहे. या शेवटच्या ओळीवरून मराठीचा पहिला ज्ञात असा वाक्यरूप आविष्कार इ.स. १०१८ ठरतो. तर शके ७०० मध्ये उदयोनसुरी याने रचलेल्या 'कुवलयमाला' या ग्रंथात मरहट्ट भाषेचा उल्लेख आहे. तसेच राजशेखरचा 'कर्पुरमंजिरी' या नाटकात महाराष्ट्री भाषा आहे. राजशेखरचा 'काव्यमीमांसा' हा ग्रंथ महाराष्ट्रात आहे. यानंतर साधारणतः २०० वर्षांनी या भाषेचे अपभ्रंशी प्रकार सिद्ध झाले. महाराष्ट्री अपभ्रंश हा शके १००० मध्ये सोमेश्वराने लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थ चिंतामणी' या ग्रंथात मराठी भाषेची शब्दरूपे व मराठी पद्येही दिसून येतात.

यानंतरचे व ज्ञानेश्वरीच्या काळापर्यंतचे असे शिलालेख व ताम्रपटांचे पुरावे तीस पेक्षा अधिक उपलब्ध झाले आहेत. (म.वा. इ. खंड १, पृष्ठे ११९-१२०) यावरून मराठी शब्दांची योजना होत गेल्याचे दिसून येते. एकूणच असे म्हणता येईल की, मराठी ही दहाव्या, अकराव्या शतकात लोकभाषा म्हणून महाराष्ट्रात रूढ होताना दिसते. यादवपूर्व उत्तर चालुक्यांच्या कारकिर्दीतील शिलालेख मराठीत सापडत नाहीत. उलट संस्कृत भाषेबरोबर देशभाषा म्हणून कानडीचा अवलंब त्यांच्या शिलालेखातून केल्याचे आढळून येते. यावरून निष्कर्ष असा निघतो की, मराठीचा जन्मकाळ नवव्या -दहाव्या शतकाच्या पलीकडे घेऊन जाता येत नाही. मराठी भाषेसंदर्भात पुरावे ग्रांथिक पुरावे तर सरळ-सरळ बाराव्या शतकामध्येच आढळतात.

मराठी भाषेसंदर्भातील पूर्वपरंपरा ग्रीयर्सन स्टेनकोनौ व चि.वि. वैद्य यांनी 'संस्कृत-महाराष्ट्री-मऱ्हाटी' अशी पुरस्कृत केली होती. अपभ्रंश भाषेतील उपलब्ध असलेल्या ग्रंथांमुळे त्यामध्ये आता जैन अपभ्रंशाचा दुवा मान्य करावा लागतो. महाराष्ट्री अपभ्रंश व मध्ययुगीन मऱ्हाटी यांच्या तौलनिक अभ्यासावरून उच्चार, प्रत्यय व शब्दसिद्धी ही भाषेची तीन प्राणभूत अंगे मराठीने साक्षात अपभ्रंशापासून उचलले आहेत. हे अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे. (यादवकालीन मराठी-डॉ. शं. गो. तुळपुळे) मात्र 'मराठी भाषा म्हणजे अपभ्रंशाचा अपभ्रंश नसून 'संस्कृत' चा संस्कार झालेला उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश आहे' हे मराठीतील तत्सम शब्द आणि उच्चारातून सरळपणा यावरून स्पष्ट केले.

### १.३ विवेसिंधूपूर्वकालीन रचना :

'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला ग्रंथ शके १११० मध्ये रचला गेला. पण मध्यंतरीच्या काळात 'विवेकसिंधू' सारखा ग्रंथ दिसत नाही. मात्र या मधल्या काळात असे वाङ्मय मराठीत झालेच नाही असे म्हणता येत नाही. कारण बाराव्या शतकात जर आपणास काव्यगुण आणि तत्त्वज्ञान यांनी परिपूर्ण असे ग्रंथ सापडतात. तर यापूर्वी ग्रंथरचना मराठीत झालेली असणे शक्य आहे. पण ती आज उपलब्ध नाही. ओवी, गाणी, स्तोत्रे, लोकगीते, कथा,कहाण्या या स्वरूपातही वाङ्मय उपलब्ध असणार आहे व त्यातून हळूहळू विवेकसिंधू सारखा किंवा ज्ञानेश्वरी सारखा ग्रंथ निर्माण होण्यास आवश्यक अशी भाषिक आणि तत्त्वज्ञानात्मक पार्श्वभूमी तयार झाली. यातच शंका नाही.

मराठी भाषेतील साहित्यावर संस्कृत वाङ्मयाचा प्रभाव असल्याचे दिसते. कारण मराठी ही भाषा बोली स्वरूपात असली तरी संस्कृत भाषा ही ग्रंथभाषा आणि ज्ञानभाषा होती. तिच्यातील विचार जनसामान्यांना उपलब्ध करून देण्याच्या प्रेरणेतूनच मराठीतून रचना झाल्याचे दिसते. उदा. श्रीपतीने लिहिलेला 'ज्योतिषरत्न माला' हा ग्रंथ प्रथम संस्कृतमध्ये लिहिला गेला. त्यानंतर या ग्रंथावर टीका लिहिली गेली. ज्योतिषरत्नमाला हा संस्कृत ग्रंथ श्रीपतीभट्ट यांनी लिहिलेला आहे. हा ग्रंथ शके ९६१ च्या सुमारास लिहिला गेला असल्यामुळे त्यामध्ये ज्योतिष या विषयावर अनेक रचना संस्कृत भाषेतून केलेल्या आहेत. त्या संदर्भात डॉ.श्री.र. कुलकर्णी यांनी 'प्राचीन मराठी गद्यः प्रेरणा आणि स्वरूप' या ग्रंथात पुढील मत मांडले आहे. 'ज्योतिषरत्नमाला' या ग्रंथावरील मराठी टीकेने मराठी वाङ्मयास लिखित स्वरूपाचा प्रारंभ झाला असून मराठी भाषेतला पहिला ग्रंथ हाच ठरतो.

ह्नशके ५०० ते ९६१ या कालखंडातील एकही साधन उपलब्ध नाही. सन ७८० च्या सुमारास उद्योतनसुरीने 'कुवलयमाला' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात अठरा देशी भाषांच्या उल्लेखाबरोबर 'मरहट्ट' भाषेचा उल्लेख आलेला आहे. दिण्णले, गहिल्ले, उल्लविरे तत्थ मरहट्टे माणसाचे व त्याच्या भाषेचे वर्णन कवी पुढील ओळीमध्ये करतो,

''दढमह सामलंगे सहिरे अहिमाणं कल्लहसीले दिण्णले गहिल्ले उल्लविरे तत्थ मरहट्टे ।।''

७ व्या शतकाच्या सुमारास असलेली दिण्णले, गहिल्ले ही शब्दरूपे मराठीचे वैशिष्ट्यच व्यक्त करतात.

यानंतर नवव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या राजशेखरच्या 'कर्पूरमंजिरी' नावाच्या नाटकात महाराष्ट्री भाषा आहे. ५ व्या शतकातील 'नारदस्मृती' या संस्कृत ग्रंथात संस्कृत, प्राकृत याबरोबरच देशी भाषा असा एक उल्लेख आहे. तसेच चालुक्यवंशीय दुसऱ्या विक्रमादित्याचा मुलगा सोमेश्वर याने इ.स. ११२९ मध्ये लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थचिंतामणी' नावाच्या संस्कृत ग्रंथात महाराष्ट्रीय स्त्रियांच्या ओव्यांचा उल्लेख सापडतो. यानंतर अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात य़शचंद्र नावाच्या एका जैन ग्रंथकाराने रचलेल्या राजमतिप्रबोध या संस्कृत नाटकात मराठी भाषेचा उपयोग केला आहे. या नाटकात राजमती या नायिकेचे वर्णन मराठीत केले आहे. त्याने तिला 'महाराष्ट्रीक' असे म्हटले आहे.

### १.४ आद्यकवी मुकुंदराज :

देवगिरीच्या यादवराजां (इ.स. ११७८-इ.स. १२१८) च्या कारकीर्दीत मराठी वाङ्मयाचा गौरवशाली प्रारंभ ग्रंथरूपात झाला. भिल्लम राजाने महाराष्ट्रात यादवांच्या राज्यांची प्रस्थापना केली. देवगिरी येथे राजधानी स्थापन केली. तो मराठी भाषेतील अद्यकवी मुकुंदराज यांच्याच कारकीर्दीत होऊन गेला. याचा पुत्र जैत्रपाळ व जैत्रपाळाचा पुत्र सिंघणराजा होय. याच्याच कुळात पुढे कृष्णदेवराय यादव, महादेवराय यादव व रामदेवराय होऊन गेले. पंथीय वाङ्मय, ज्ञानदेवांचे वाङ्मय, यादवांच्या राज्यात निर्माण झाले.

हेमांडपंताचा 'चतुर्वर्गचिंतामणी' हा ग्रंथ याच काळातील आहे. देवगिरीच्या यादवांच्या इतिहासापासून मराठी भाषा व साहित्य यांचा इतिहास सुरू होतो.

विवेकसिंधू हा मराठीतील पहिला ग्रंथ शके १११० मध्ये रचला गेला. 'विवेकसिंधू' सारखा ग्रंथ मध्यंतरीच्या काळात दिसत नाही. या काळात मराठी भाषेत वाङ्मयनिर्मिती झाली नाही असे म्हणता येत नाही. या ग्रंथरचनेपूर्वीही मराठीत ग्रंथरचना होत असली पाहिजे. पण ती आज उपलब्ध नाही. ओवी, गाणी, स्तोत्रे या स्वरूपात हे वाङ्मय उपलब्ध असावे व त्यातून हळूहळू विवेकसिंधू सारखा किंवा ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ निर्माण होण्याला आवश्यक अशी भाषिक आणि तत्त्वज्ञानात्मक पार्श्वभूमी तयार झाली.

विवेकसिंधू व लीळाचरित्रासारखे महानुभावांचे वाङ्मय निर्माण तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती ही कारणीभूत आहे. या काळात तत्त्वज्ञानपर आणि धार्मिक लेखनाच्या क्षेत्रात संस्कृत भाषेचे वर्चस्व होते. या लोकांसाठी त्यांच्याच भाषेत असे साहित्य निर्माण होणे आवश्यक होते. ती काळाची गरज होती. तसेच यज्ञयाग, क्षुद्र, देवतांची उपासना, व्रतवैकल्ये, जातीयता, वर्णवर्चस्व यांनी सर्व समाज बोकाळला होता अशा समाजापर्यंत अद्वैत तत्त्वज्ञान पोहोचवणे अगत्याचे होते. म्हणून मुकुंदराजांनी उपनिषदांतील तत्त्वज्ञान मराठीत आणले. भक्ती, ज्ञान वैराग्य यांचे महत्त्व प्रतिपादन करून मराठी भाषेचा पुरस्कार केला. तर चक्रधर स्वामींनीही मराठीचा सार्थ अभिमान बाळगून आपल्या द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. अनेक देवतावाद, वर्णवर्चस्व, यज्ञयाग, हिंसा, कर्मकांड यांचा निषेध करून संपूर्ण अहिंसा व कडकडीत वैराग्य यांचा पुरस्कार केला. ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधला. या सर्वांसाठी, जाणीवपूर्वक लोकभाषेचा (मराठीचा) पुरस्कार या कालखंडातील वाङ्मयनिर्मितीच्या या प्रमुख प्रेरणा आहेत म्हणून मुकुंदराजांची वाङ्मयनिर्मिती आणि यांची ओळख आपण करून घेणार आहोत.

मुकुंदराज हे मराठी भाषेतील कवी असून त्यांच्या स्थळकाळाबद्दल संशोधकांमध्ये मतभेद आहेत. या कवीचे चरित्रही अज्ञात आहे. 'विवेकसिंधू' मध्ये या ग्रंथाचा कालनिर्देश करणारी ओवी पुढील प्रमाणे आहे. ''शके अकराशे दोहोत्तर। साधारण संवत्सर। तै राजा शारंगधर। ग्रंथ उभार ते जाला।।'' या ओवीनुसार शके १११० म्हणजे इ.स. ११८८ हा या ग्रंथाचा निर्मितीकाळ मानला जातो. परंतु सदरची ओवी विवेकसिंधूच्या सर्व उपलब्ध प्रतीमध्ये सापडत नाही. तसेच या ओवीत सांगितल्याप्रमाणे शके १११० ला साधारण संवत्सर येत नाही. विवेकसिंधूची भाषाही थोडी ज्ञानेश्वरांनंतरची वाटते. त्यामुळे या ग्रंथाला आद्यत्वाचा मान देण्याबद्दल संशोधकात मतभेद आहेत. साधारण संवत्सर शके १११२ ला येतो असे रा. पांगारकर म्हणतात. (पांगारकर ल. रा., मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, पृ. ३९१) वि.ल.भावे, शं.गो. तुळपुळे, डॉ. रा. द. रानडे यांनीही अशी शंका उपस्थित केली आहे. मात्र प्रा. सुरेश म. डोळके यांनी अनेक कालगणना पद्धतीचा अभ्यास करून सिद्ध केले आहे की, शके १११० मध्ये साधारण संवत्सर अचूक येतो. (प्रा. डोळके सुरेश, म. नवभारत, मे १९६०, पृ. ४८) कृ.पा.

कुलकर्णीही शके व संवत्सराचा मेळ तंतोतंत बसतो असे म्हणतात.(कुलकर्णी कृ. पा., विवेकसिंधू : प्रस्तावना, पृ. ७६) भाषिक दृष्ट्याही या ग्रंथाचे प्राचीनत्व प्रा. सुरेश म. डोळके व कृ. पा. कुलकर्णी यांनी सिद्ध केले आहे. 'विवेकसिंधू' ग्रंथ तत्कालीन परंपरात लोकप्रिय असल्याने मौखिक स्वरूपात त्यांचे अर्वाचिनीकरण झाले आहे. त्यामुळे त्याचा आद्यत्वाचा मान काढून घेता येत नाही. पण या ग्रंथाचे पूजन, पठन, मनन सर्व पंथीयांकडून होते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या अर्थी ते भिन्न पंथ सुरू होण्यापूर्वीच हा ग्रंथ निर्माण झाला असला पाहिजे. असे स्पष्ट करून डॉ. नसिराबादकरही या ग्रंथाला आद्यत्वाचा मान देतात. (नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, पृ.५) त्यामुळे शके ११९० हा 'विवेकसिंधू' चा रचनाकाळ आहे व तो मराठीतील आद्यग्रंथ आहे, असे मानावयास हरकत नाही.

मुकुंदराजांच्या स्थळाबद्दलही संशोधकात मतभेद आहेत. ''वैन्यगंगेचिये तीरी। मनोहर अंबानगरी। तेथ प्रकटले श्रीहरी। जगदीश्वरू।।'' यातील वैनगंगा नदी कोणती? अंबानगरी म्हणजे भंडारा जिल्ह्यातील वैन्यगंगा नदीच्या काठी असलेले 'आंभोरे' हे होय, असे मत आजगावकर, कृ. पा. कुलकर्णी, रा. चिं. ढेरे, डोळके यांनी मांडले आहे. तर शं.गो. तुळपुळे, मोडक, कानोले यांनीही अंबानगरी म्हणजे बीड जिल्ह्यातील बाणगंगेच्या काठी असलेले 'अंबेजोगाई' हे होय असे मत मांडले आहे. मुकुंदराज झाडीमंडळीतील असावेत असेही एक मत आहे. (झाडीमंडळी-बुलढाणा जिल्ह्यातील राजूर घाटाजवळील प्रदेश) हरिनाथ-रघुनाथ-मुकुंदराज ही मुकुंदराजांची गुरुपरंपरा असून त्यांच्या आयुष्यातील बऱ्याच घटना आंभोरे या ठिकाणी घडल्या आहेत. मुकुंदराजांचे परात्पर गुरू हरिनाथांचा अवतार त्यांनी केलेल्या होमातून प्रकट झालेला शंभू, हरिनाथांना लागलेली समाधी, रामचंद्रांनी मुकुंदराजांना केलेला उपदेश या घटना अंभोऱ्यास घडल्या असून, मुकुंदराजांनी आपला विवेकसिंधू हा ग्रंथही आपल्या गुरूंच्या समाधीजवळ आंभोऱ्यास लिहिला. हरिनाथ आणि रामचंद्र यांच्या समाधीही आंभोऱ्यास आहेत. आंभोरे येथील हरिनाथ संप्रादायाच्या मठात यांच्या शिष्यपरंपराही सापडतात. यावरून मुकुंदराज हे आंभोऱ्याचे असावेत हे स्पष्ट होते. मुकुंदराजांची समाधी भोपाळजवळील खेडले या गावी आहे. मुकुंदराजांनी आपला ग्रंथ ज्या जैत्रपाळ राजाला उद्देशून लिहिला; तो यादव घराण्यातील राजा होय.

### १.४.१ मुकुंदराजांची गुरूपरंपरा :

'विवेकसिंधू' च्या उत्तरार्धातील १८व्या प्रकरणात मुकुंदराजांनी आपल्या गुरुपरंपरेविषयी माहिती दिली आहे. मुकुंदराज म्हणतात, ''आदिगुरू श्री आदिनाथु। तैथौनि श्रीहरिनाथु। तेयाचा शिष्य श्रीरघुनाथ जो गुणसिंधु।।'' या प्रमाणे श्री आदिनाथ-श्रीहरिनाथ-श्रीरघुनाथ (श्रीरामचंद्र) मुकुंदराज अशी ही गुरुपरंपरा दिसते. श्री हरिनाथाने बारा वर्षे अनुष्ठान करून पार्वतीसह शंभूला प्रसन्न केले. अंबानगरीमध्ये मोठा यज्ञ केला. त्या होमातून श्री आदिनाथ प्रकट झाले व त्यांनी हरिनाथाला दर्शन दिले. आदिनाथाच्या दर्शनाने मोठी तन्मयावस्था श्रीहरिनाथाला प्राप्त झाली. या प्रसंगाचे सविस्तर वर्णन मुकुंदराजांनी केले आहे.

आपले गुरू रघुनाथ यांचे वर्णन करताना मुकुंदराज म्हणतात, ''राम गुणाचा सागरू। महिमेचा मेरू। ब्रह्मविद्या देता उदारू। तोचि ऐकू ।।'' मुकुंदराजांनी ज्या वाङ्मयीन कामगिरीद्वारा मराठी साहित्याची मुहूर्तमेढ रोवली, तिचा परिचय करून घेणे महत्त्वाचे आहे.

### १.४.२ विवेकसिंधू :

'विवेकसिंधू' हा मुकुंदराजांचा महत्त्वाचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. ब्रह्मतत्त्वनिरूपण हा या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय आहे. हा ग्रंथ ओवीवृत्तात असून ही ग्रांथिक ओवी आहे व साडेतीन चरणी आहे. यात तत्त्वज्ञानाचे निरुपण गुरुशिष्यसंवाद रूपाने केले आहे. मुकुंदराजांच्या मते चांगले शिष्य म्हणजे ते ''ब्रह्मरसाची मूस। ज्ञानरत्नांची मांदुस। गुरूसी स्फुरे भडस।'' उपदेशाविषयी नवे थोर शिष्यामुळे गुरूस उपदेश करण्यास उल्हास वाटतो. तापपत्राने गांजलेला शिष्य गुरूंना शरण जातो तेव्हा शरण आलेल्या शिष्याला गुरू उपदेश करतात. गुरुशिष्याच्या नात्याचा आविष्कार, शिष्याच्या उद्धारासाठी गुरूंना वाटणारी तळमळ इ. गोष्टी गुरुशिष्य संवादातून स्पष्ट होतात. येथे ब्रह्मसुखाचा स्वानंद गुरुशिष्यांच्या संवादातून प्रकट झाला आहे. त्याशिवाय मोक्ष नाही. यासंदर्भात मुकुंदराजांची पुढील ओवी चिंतनीय आहे.

''वेदशास्त्र पुराण। तेया बोलावे अधःपतन
जेया नाही ज्ञान। गुरुपरंपरेचे ।।
म्हणौनि शिवादी गुरुपरियत। जाणावे अवधूत ।।
अमूर्त मूर्तिमंत। परब्रह्म जे ।।''

मुकुंदराजांनी फक्त गुरुमंत्राचा उपदेश करणाऱ्या गुरूंचा निषेध केलेला आहे. चौदाव्या प्रकरणात त्यांनी हे गुरुस्तोत्र गायले असून त्याबरोबर त्यांनी गुरुपरंपरा विशद केली आहे. प्रत्येक प्रकरणाची सुरुवात त्यांनी 'श्री रामचंद्राय नमः' या शद्बात करुन गुरुस नमन केलेले आहे. मुकुंदराजांनी ज्ञानमुलके भक्तीला फार मोठे स्थान दिले आहे.

''भक्ति ज्ञान वैराग्य। हे श्रवणाचे सौभाग्य
भवरोगिया आरोग्य । तेणेचि औषध''

अशा शद्बांमध्ये त्यांनी भक्तीचा पुरस्कार केलेला आहे. देहजन्माची कथा ही त्यांनी बीभत्स स्वरुपात अत्यंत परिणामकारक रित्या मांडली आहे. पाचव्या प्रकरणामध्ये परमेश्वर वर्णन अत्यंत कलात्मकरित्या मांडलेले आहे. अविद्या व माया यांचे विवरण त्यांनी आपल्या विवेकसिंधूमध्ये केले आहे. तर सतराव्या प्रकरणामध्ये सत्-चित आनंद या तीन गुणांचे स्पष्टीकरण केले आहे तर शेवटच्या अठराव्या प्रकरणात मुकुंदराजांनी पुन्हा एकदा गुरुमहिमा मुक्तवाणीने वर्णन केलेला आहे. आदिनाथ - श्रीहरी - श्रीरामचंद्र ही आपली गुरुपरंपरा सविस्तरपणे मांडली आहे.

मुकुंदराजांचा 'विवेकसिंधू' हा ग्रंथ परमार्थ विषय आणि बह्मनिरुपणाच्या असल्यामुळे त्यामध्ये काव्य अथवा कलात्मकता फारशी आढळत नाही. ग्रंथाची ओवी महानुभावीय व ज्ञानेश्वरीय ओवीप्रमाणेच साडेतीन चरणांची आहे. कवीने वर्णन केलेले दृष्टांत लक्षणीय स्वरुपाचे आहेत. दृष्टातांच्या रुपाने काव्यात सुलभता व रसमयता प्राप्त झाली आहे. आपले मऱ्हाटे ओबडधोबड असले तरी रसमय आहेत. त्यात विवेकाचा झळाळा आहे हे सांगताना मुकुंदराज म्हणतात, ''म्हणोनि विवेकसिंधु येणे नावे । ग्रंथ की जैल स्वानुभवे। तऱ्ही श्रोती अवधीन द्यावे। म्हणे मुकुंदराजु ।। गुरुशिष्याचेनि संवादे। जै बोलिजैल विनोदे ते आइकतु आनंदे । महानुभवे ।।'' या ग्रंथाच्या श्रवणाने सायुज्यमुक्ती सहजासहजी मिळेल. याच देहामध्ये मुक्तीचा सोहळा उपभोगता येईल. ''येचि देही येचि डोळां । भोगिते मुक्तीचा सोहळा।'' एवढेच नव्हे तर, मुकुंदराज पुढे म्हणतात, ''विवेकसिंधु भीतरी । जो मुमुक्षु अवगाहन करी। ते यासि सेवि श्रीहरी । भेटे साक्षात्कारे।। विवेकसिंधुची शद्वरत्ने। जरि कंठी धरिजेती प्रेत्ने। तरी जनकाचिये महिमाने। श्लाघ्यता होये।।'' संपूर्ण ग्रंथात आत्मविचारच असल्यामुळे येथे केवळ शांतरस अथवा ब्रह्मरसच आहे केवळ परब्रह्मच रसपूर्ण आहे. असा मुकुंदराजांचा स्वानुभव आहे. ''शृंगारादिक नवरस । ते हि जेथे आर्तविरस । ते परब्रह्म येक रस । जाणावे योगिराजे।।'' हा ग्रंथ आपण वेदशास्त्रे, उपनिषदे यांच्या मंथनातून रचला आहे. असे मुकुंदराज सांगतात. ''तैसे उपनिषदाचे निर्मंयन। करौनि केला ग्रंथ निर्माण।'' किंवा ''वेदशास्त्राचा मथीतार्तु। मिया बोलीला हा परमार्थु।''

सर्वसामान्यांना ब्रह्मप्राप्ती व्हावी म्हणून हा ग्रंथ मऱ्हाटी भाषेत लिहिला गेला. अल्पबुद्धीमुळे जे सर्वसामान्य लोक शास्त्र जाणू शकत नाहीत. उपनिषदे, भगवद्‌गीता, अनुगीता इ. ग्रंथ संस्कृत भाषा ज्यांना येत होती तेच लोक या ग्रंथाचे वाचन करत असत. मात्र त्यांच्याजवळ योगधारणेची शक्ती नाही व प्रबळ तर्कही नाही. अशा लोकांबद्दल कणव येऊन मुकुंदराजांनी हा ग्रंथ त्यांच्याच मराठी भाषेत लिहिला.वेदशास्त्रांतील पारमार्थिक ज्ञान मराठीतून ग्रहण करण्यास काय हरकत आहे? ''वेदशास्त्राचा मथितार्थु। मऱ्हाटिया जोडे फलितार्थु तरि चतुरी परमार्थु। का नेघावा?'' पारमार्थिक ज्ञान मातृभाषेतून (बोली भाषेतून) घेतल्यास ते अधिक परिणामकारक होते. हे येथे सूचित केले आहे. मराठी भाषा असली तरी येथे 'उपनिषदांचीच राहाटी' आहे असे मुकुंदराज म्हणतात.

कृ.पा. कुलकर्णी यांनी विवेकसिंधूचा लेखनकाल शके ११०९ निश्चित केला आहे. या ग्रंथाच्या पूर्वार्धाच्या शेवटी केलेल्या ''मज श्वासोन्मेषाचाही श्रमु। तेथ कासेया ग्रंथाचा उदेमु। परि फळला मनोधैर्य। सदैवाचा।।'' या वर्णनावरून मुकुंदराजांनी वृद्धावस्थेत हा ग्रंथ लिहिला आहे हे स्पष्ट होते. 'विवेकसिंधू' चे पूवार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. या ग्रंथातील एकूण ओवीसंख्या १६९८ आहे. 'विवेकसिंधू' हा शास्त्रीय आणि वाङ्मयीन ग्रंथ आहे. या ग्रंथाचा वेदांत आणि अध्यात्मशास्त्र हा मुख्य विषय आहे. 'योगवसिष्ठ भागवत', 'भगवद्‌गीता', 'ब्रह्मपुराण', 'विष्णुपुराण', 'गुरुगीता', 'उपनिषदे', 'वेदान्तशास्त्र' इ. ग्रंथातील विषय विवेकसिंधूत आले आहेत. या ग्रंथात अनेक पारिभाषिक व संस्कृत शब्द येथे पाहावयास मिळतात. पंचवीस संस्कृत ग्रंथातील आठशे अवतरणे 'विवेकसिंधू'त आली आहेत. त्यातील संस्कृत

मात्र अशुद्ध आहे. या ग्रंथाच्या पूर्वार्धात स्वरूपसमावेश, स्वानुभावदृढीकरण तत्त्वसृष्टीकथन, ईश्वरतनुत्रयकथन, त्वंवदकारण, लिंगदेह विवरण, स्थूलदेहकथन व सर्व ब्रह्मति विवरण ही प्रकरणे आली आहेत. उत्तरार्धात स्थूलदेहनिरसन, लिंगदेहनिरसन कारणदेहनिरसन, महाकारण देहनिरसन, ईश्वर तनुत्रय, प्रपंचप्रलयविवरण, तत्त्वदार्थशोधन, जीवपरमात्मातादात्म्यपूर्वक मुक्तिस्वरूप विवरण, भेदखंडनपूर्वक अद्वयस्वरूपप्रतिपादन, अद्वैतप्रतिपादन, सच्चिदानंद पदत्रयविवरण, गुरूमाहात्म्यकथन ही प्रकरणे आहेत.

पूर्वार्धाच्या पहिल्या प्रकरणात सद्‌गुरूची व सद्‌शिष्याची लक्षणे सांगितले आहेत. दुसऱ्या प्रकरात गुरूमाहात्म्य कथन करून ब्रह्मानुभूतीचे वर्णन केले आहे. पुढे ईश्वराच्या लिंगदेहाचे वर्णन असून नंतर स्थूल देहाच्या उत्पत्तीविषयी निवेदन आहे. पाचव्या प्रकरणात जीवसृष्टी कशी निर्माण झाली. याबद्दलचे वर्णन येते. सातव्या प्रकरणात वेदान्तातील 'सर्व ब्रह्मोति' या पदाचे विवरण आले आहे. अशी एकूण सात प्रकरणे पूर्वार्धात आहेत.

'तत्त्वमसि' या महाकाव्याच्या विवरणाने विवेकसिंधूचा उत्तरार्ध सुरू होतो. या महाकाव्याचा आशय विवरण करताना नैयायिक, वैशेषिक, चार्वाक इत्यादींचा उल्लेख येतो. मुकुंदराजांनी चार्वाकमताचे खंडन केले आहे. तेराव्या अध्यायात अविद्या व माया यांचे विवरण आहे. चौदाव्या प्रकरणात सायुज्यमुक्तीचे वर्णन आहे. तर सतराव्या प्रकरणात सच्चिदानंदपदाचे विवरण आहे. आठराव्या प्रकरणात गुरुमाहात्म्य वर्णन केले असून आपली परंपरा सांगितली आहे.

मुकुंदराजांना वेदान्ताबद्दल प्रेम आणि अभिमान आहे. वेदान्तशास्त्र हे सिंहाप्रमाणे असून इतर पाच शास्त्रे ही कोल्ह्याप्रमाणे आहेत. वेदान्तशास्त्रासमोर इतर शास्त्रे तुच्छ आहेत. त्यामुळे वेदान्तच प्रमाण मानावा असे मुकुंदराज म्हणतात.

''पाचही दरुषणे जंबुके। वेदान्त सिंहाचे ये हाके।

आईकौनि म्हणती राख राखे। भजलो मी तुज।।

म्हणौनि वेदान्त बोलावे। तेचि साच मानावे।

येर वावो सांडावे। पाखांड मत।।''

मुकुंदराज स्वतः नाथपंथी असल्यामुळे 'विवेकसिंधू' त योगानुभवाचेही वर्णन आहे. हा ग्रंथ सर्वसामान्य जनतेसाठी असल्यामुळे मुकुंदराजांनी सगुण भक्तीचे निरुपण या ग्रंथात केले आहे. सगुण भक्ती ही सामान्यजन आणि सांसारिकांना जमणारी आहे. म्हणून अठराव्या प्रकरणाच्या समारोपप्रसंगी राजयोगाचे समर्थन केले आहे. एकूणच, मुकुंदराज भक्तिमार्गालाच राजयोग म्हणतात. गुरुकृपेने हा राजयोग प्राप्त झाल्यावर वेदशास्त्र, अष्टांगयोग यांचा अभ्यास करावा लागत नाही. भक्ती, ज्ञान आणि वैराग्य हे भवरोगावरील औषध आहे. असे मुकुंदराजांनी स्पष्ट केले आहे. याविषयीच्या मुकुंदराजांच्या पुढील दोन ओव्या पाहता येतील.

''न पडे वेदशास्त्राचा पांगु। अभ्यासावा न लगे अष्टांग योगु।

जरी पाविजे राजयोगु। श्री गुरुप्रसादे।।

भक्ति ज्ञान वैराग्य। हे श्रवणाचे सौभाग्य।

भवरोगिया आरोग्य। तेणेचि औषधे।।''

भारतीय परंपरेत गुरुभक्ती आणि गुरुश्रद्धा यांना विशेष महत्त्व आहे. 'गुरु हा सूर्यापेक्षा श्रेष्ठ आहे. कारण सूर्य बाहेरील अंधःकार नाहीसा करतो तर गुरु अंतःकरणातील अज्ञानरूपी अंधःकार नाहीसा करते. गुरु हा कल्पतरुपेक्षा श्रेष्ठ आहे.' गुरुकृपा होणे हे मुक्तीपेक्षाही श्रेष्ठ वाटते. विवेकसिंधूमधील मऱ्हाटे बोल ओबडधोबड असले तरी ते रसमय आहेत. त्यामध्ये विवेकाचा झळाळा आहे. हे वर्णन करताना कवी म्हणतो,

''उस किरु दिसे काळा। परि घेणे रसाचा गळाला

तैसे आरूष बोल परि झळाळा। दिसे विवेकाचा।।''

शृंगार रसांपेक्षा ब्रह्मरसाचे महत्त्व मुकुंदराजांना अधिक महत्त्वाचे वाटते, म्हणून अ.ना.देशपांडे 'विवेकसिंधू हा कवितारतीचे विलासवन नव्हे तर तो योगेश्वराचा आश्रम आहे.' असे म्हणतात. (देशपांडे अ. ना, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, पृ. २५४) परतत्त्वाचा स्पर्श झाल्यामुळे मुकुंदराजांची वाणी अंतःकरणाला जाऊन भिडते. यातील रूपके, दृष्टांत पाहण्यासारखे आहेत. आरंभी ब्रह्म, मध्ये प्रपंचस्वरूप व अंती ब्रह्म हा विषय स्पष्ट करण्यासाठी मुकुंदराज दृष्टांत देतात. ''आदी अंती साळी देखिली। मध्ये तृष्णाकारे विरुढली। परि सर्व साळी येणे शब्द बोलिली। विबुधजनी।।'' चुंबक जवळ येताच ज्याप्रमाणे लोखंड विचित्र रितीने फिरू लागते. त्याप्रमाणे अकर्ता व स्वतंत्र असा जो तू (परमात्मा) त्या तुझ्यामुळे जडदेह फिरू लागतो. हा दृष्टांत उल्लेखनीय आहे. तसेच मुकुंदराजांनी अनेक पारंपरिक दृष्टांत दिलेले आहेत. लाटांच्या रूपाने पाणी आकार कशा रीतीने धारण करते. अलंकारांच्या रूपांनी सोने कशा पद्धतीने नटते. त्याप्रमाणे अव्यक्त ब्रह्मच विश्वाच्या रूपाने व्यक्त होते. एकूणच, 'विवेकसिंधू'त नवरस नसले तरी परतत्त्वस्पर्श आहे आणि हेच या ग्रंथाचे सामर्थ्य आहे. येथील ब्रह्मरस अथवा शांतरस विद्वतजनांना मोहवील असा आहे, यात शंका नाही.

डॉ. प्र. न जोशी म्हणतात, 'विवेकसिंधू' ची भाषा त्याच्या आद्यत्वाच्या तुलनेने प्राचीन वाटत नसल्याचे अनेकदा सांगितले जाते. 'मात्र विवेकसिंधूची लोकप्रियता, पाठांतर, मनन, चिंतन, वाचन, प्रसार इ. कारणांमुळे व अनेक प्रतीच्या हस्तांतरांमुळे भाषेस अर्वाचीनत्व आले असण्याची शक्यता आहे. तसेच वेदान्तशास्त्र, ब्रह्मनिरूपण अध्यात्मविचार यांची परिभाषा मुकुंदराजांनी सिद्ध केली.' (जोशी प्र. न. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पृ. ९५) तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने 'विवेकसिंधू' आणि 'अमृतानुभव' या दोन ग्रंथात बरेच साम्य आहे. 'विवेकसिंधू' आणि 'गुरुचरित्र' या दोन ग्रंथातही शब्द, अलंकार आणि प्रयोग या दृष्टीने बरेच साम्य आहे. विवेकसिंधूतील अनेक विषय दासबोधात आले आहेत. मृत्युंजय,

रेणुकादास, दासोपंत, संत तुकाराम, वामन पंडीत, केसरीनाथ, कृष्णदर्याणव मोरोपंत, महिपती इ. कवींनी मुकुंदराजांचा गौरव केला आहे. त्यावरून या ग्रंथाची थोरवी व प्रभाव दिसून येतो.

**१.४.३ परमामृत :**

मुकुंदराजांचा परमामृत हा ग्रंथ क्रमाने दुसरा असून त्यात 'विवेकसिंधू'तील विषय संक्षेपाने आले आहेत. यामध्ये चौदा प्रकरणे व तीनशे तेवीस ओव्या आहेत. योगवासिष्ठातील 'अमृत परम' 'अहं ब्रह्मास्मि' या शब्दावरून 'परमामृत' हे नाव मुकुंदराजांना सुचले असावे, असे अ. ना. देशपांडे यांचे म्हणणे आहे. प्रामुख्याने हा ग्रंथ जिज्ञासू व मुमुक्षूंसाठी लिहिला आहे.

ना. कृ. खाजगीवाले यांच्या 'परमामृत रहस्य' या ग्रंथात पुढील ओवीचा निर्देश होतो.

**''शके अक्राशे दाहोत्तरी। श्रीअंबा नाम नगरी।**

**परमामृत ग्रंथ निर्धारी'। प्रगट झाला''** असा निर्देश आहे.'

वरील ओवीवरून हा ग्रंथही अंभोरे येथेच लिहिला असावा असे वाटते. मंगलाचरणातील गुरू माहात्म्य, अन्य मताचे खंडण करणारे दुसरे प्रकरण, महाकाव्य विवरण, स्थूलदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह, महाकारणदेह यांचे निरसन, शून्यखंडण, अज्ञान खंडण मुक्तिरहस्य साक्षात्कार इ. विवेकसिंधूतील विषय या ग्रंथात संक्षेपाने आले आहेत.

'परमामृत' हा ग्रंथ भक्तिमार्गाचा उच्छेद करणारा आहे. परमार्थामध्ये सद्गुरूचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. गुरूकडून आत्मानुभूती प्राप्त होते. पूजा अर्चा, तीर्थदाने, मंत्रतंत्र, इ. साधनांनी आत्मसाक्षात्कार होत नाही. अशा पद्धतीने गुरुबीजकथनाचे महत्त्व सांगताना मुकुंदराज म्हणतात,

**''यालागी हृदयी गुप्त राख। स्वयं परमामृत चाख।।**

**सर्व योगियांचा तिलक। होशील तुं।।**

**परमामृत ग्रंथ प्रमाण। केले परमार्थाचे कथन।।**

**जयासि पाहिले गुरुखूण। तेणे हाचि पाहावा।।**

**पूजा स्नाने तीर्थे दाने। मंत्र तंत्र याग हवने।।**

**कीजे तितुके फल भोगणे। स्वर्गादिक सर्वथा।।**

**जपतप अनुष्ठाने। आणि नानापरिंची साधने।।**

**मोक्ष न पाविजे आत्मज्ञाने। वांचेनिया सर्वथा।।''**

आत्मस्वरूप प्राप्त झालेल्यास जो स्वानुभव येतो त्यांचे उत्तम पद्धतीने मोठे रेखीव वर्णन बाराव्या

प्रकरणात केले आहे. पुढे मुकुंदराज म्हणतात, ''स्वेदकंपादि उठती। भ्रष्ट सात्विक भाव प्रकटती। पावे साम्राज्य संपत्ति। रंक जैसा।।'' ब्रह्मप्राप्तीच्या सुखापुढे स्वर्गसुख तुच्छ मानले गेले. यज्ञयागादी कर्मे, स्वर्गसुखादी वस्तू ब्रह्मसुखातून ओवाळून टाकाव्यात असे मुकुंदराज सांगतात. परमार्थातील अनेक तात्त्विक विचार तत्त्वज्ञान हे विविध उपमा आणि दृष्टांत वापरून साध्या सोप्या पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न मुकुंदराजांनी केला आहे.

**१.४.४ पवनविजय :**

विद्यार्थी मित्रहो, मुकुंदराजांच्या नावावर नोंदविलेला हा आणखी एक ग्रंथ असे प्रतिपादन महाराष्ट्रावर सारस्वतकार वि. ल. भावे यांनी केले आहे. ''हा ग्रंथ पवनविजय। सर्व कामनेचा करी जय विवेकसिंधूचा अन्वय। सारांश येथ कथियेला।।'' हा पवनविजयातील उल्लेख लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवपार्वती संवादरूपाने सांगितलेल्या या ग्रंथात 'विवेकसिंधू' तीलच विषय आलेले आहेत. कृ.पा. कुलकर्णी यांच्या मते कोणी हरिहरदास या ग्रंथाचा कर्ता असावा.

**१.४.५ मूळस्तंभ :**

मुकुंदराजांच्या नावावर मोडणारा हा ग्रंथ वस्तुतः दत्तात्रय अवधूत यांनी लिहिलेला आहे. असे प्रो. कुलकर्णी यांचे मत आहे.

**१.४.६ गुह्यसप्तक :**

डॉ. रा. ग. हर्षे यांना सापडलेल्या एका बाडात हे मुकुंदमुनींचे 'गुह्यसप्तक' आहे. या अभंगामध्ये मुकुंदराजांनी स्वतःचा अनुभव कथन केलेला आहे. केवळ सात अभंगाचे छोटेसे आध्यात्मिक प्रकरणे यामध्ये आलेले आहे. उदा.

**''सत्व रज तम हरपोनि गेले। द्रिशाचि लावणि कैसे जालि।।१।।**

**गेलीया माझारी पाहाता न दिसे। स्वतंत्र प्रकाश सदोदीत।।२।।''**

*** पदे**

अनेक कवीकृत पदसंग्रह भाग १ यामध्ये मुकुंदराजांची काही पदे आलेली आहे. ''हे खुण अनुभवाची पिंडी परतोनि पाहे। आपोआप प्रकाशले तेणे आनंद राहे।।'' हे त्यातले एक पद.

*** संस्कृत विवेकसिंधू :**

विवेकसिंधू, महाभाष्य, तत्त्वबोध, तत्त्वप्रबोध, विवेकार्णव अशा सात नावांनी संस्कृत ग्रंथ संबोधला गेला आहे, असे प्रो. कुलकर्णी म्हणतात.

विद्यार्थी मित्रहो, आद्यकवी मुकुंदराजांच्या काव्यग्रंथाचा एवढा परिचय करून घेतल्यानंतर आता

आपण त्यांच्या एकंदर तत्त्वज्ञानाविषयी विचार करूया.

आपल्या तत्त्वज्ञानाविषयी मुकुंदराजांनी ''शंकरोक्तीवरी मियां बोलली हे वैखरी'' असे स्वतःच म्हटले आहे. मात्र ही शंकरोक्ती कोणाची? शिवस्वरूपी आदिनाथांच्या परंपरेतील की आद्यशंकराचार्यांच्या अद्वैतमास अनुसरणारी! असे विद्वानांमध्ये मतभेद आहेत. कृ. पा. कुलकर्णी, मा. श्री. अणे, ल. रा. पांगारकर यांनी मुकुंदराजांनी शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांतच आपल्या ग्रंथात प्रतिपादन केला आहे. असे म्हटले आहे. याविषयी ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचे व्यासंगी म्हणतात, 'मुकुंदराज 'विवेकसिंधू'त शांकरतत्त्वज्ञानाचा स्वीकार आणि विवेचन केल्याचे स्वतःच सांगतात तेव्हा अद्वैत आणि माया किंवा विवर्तवाद यांचा त्यांनी पुरस्कार केला, हे वेगळे सांगावयास नकोच. (पेंडसे शं. दा., श्री ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, पृ. ४१८) या संदर्भात लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, 'मुकुंदराज संपूर्णपणे शांकरमतास अनुसरत नाहीत. शंकरचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्ये व उपनिषदभाष्ये यांचे मंथन करून मुकुंदराजांनी ब्रह्मविचार व साध्यसाधन विचार हे 'विवेकसिंधूत मांडले आहेत. मात्र शांकरगीता भाष्याची परंपरा मुकुंदराजांनी स्वीकारलेली दिसत नाही.' (जोशी लक्ष्मणशास्त्री, नवभारत, ऑगस्ट १९५९) परमेश्वराचे स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण असे चार व्यष्टिदेह सांगितले आहे. या मुद्यावर शांकर अद्वैत संप्रदायापेक्षा निराळा विचार मुकुंदराजांनी मांडलेला आहे. अशा काही महत्त्वाच्या मुद्यांबाबत मुकुंदराजांचे वेगळेपण त्यांनी दाखवून दिले आहे.

एकूणच, मुकुंदराजांनी मराठी साहित्याची मुहूर्तमेढ रोवली आणि आपल्या वाङ्मयाद्वारे धार्मिक आणि सामाजिक प्रबोधनाचे कार्यही केले. विद्यार्थी मित्रहो, आपण यानंतर महंदबा व तिने रचलेली धवळे यांचा परिचय करून घेणार आहोत.

**१.५ महदंबा :**

मराठी भाषेत पहिली काव्य करणारी महानुभाव पंथातील अनुयायी कवयित्री महदाईसा उर्फ महदंबा ही एक अग्रगण्य व्यक्ती होती. महदंबा उर्फ रुपाइसाचा जन्मकाल (इ.स. १२२८ ते १३०३) किंवा शके ११५० ते १२२५ असा मानला जातो. तिचा जन्म यजुर्वेदी ब्राह्मण घराण्यात झाला. जालना जिल्ह्यातील पाडळी या गावच्या वायनायकांची ती द्वितीय कन्या होती. घरची परिस्थिती चांगली होती. घरी नोकर चाकर होते. तिचे वडील वायनायक व माता कामाइसा धार्मिक व परमेश्वरावर विश्वास ठेवणारे होते. त्यांची शेती होती पण त्याबरोबरच ते व्यापारही करत असत. शिवाय वतनाची गावे त्यांना मिळाल्यामुळे सरदार जहागिरदाराप्रमाणे ते थाटाने वैभवाने राहत होते. महदंबेचा बालपणीच विवाह झाला होता. पुढे तिला वैधव्य प्राप्त झाले आणि ती पाइकाप्रमाणे राहू लागली. त्यावेळी तिला श्रीचक्रधरांचे प्रथम दर्शन नागदेवासमवेत पाटवध येथे झाले. नंतर ती चक्रधरांच्या सहवासात आली. नंतर त्यांची शिष्या बनली. मूलतः ती अत्यंत विरक्त आणि बुद्धिमान होती. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी आणि गोविंदप्रभू (श्रीचक्रधरांचे गुरू) यांचा सहवास तिला लाभतो. ती महानुभवांचे प्रवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र ऋद्धिपूर याठिकाणी जाऊन राहते. या ठिकाणी तिने श्रीचक्रधरस्वामी आणि यांचे गुरू श्रीगोविंदप्रभू

यांची अगदी निष्ठेने सेवा केली. महदंबेचे मूळ नाव रूपाई तिच्या पणजी वरून चक्रधरांनी महदाइसा हे नाव ठेवले. ही महदाइसा महादेवरायाची पुरोहित होती. पण ही महदंबा बालपणीच वैधव्य आल्यामुळे त्या काळाच्या प्रथेनुसार माहेरी आली. तिथे तिला प्रतिष्ठा होती. तिचे चुलत बंधू नागदेवाचार्य हे तिचे पुढे गुरू झाले. तसेच श्रीचक्रधर स्वामींचे शिष्य रामदेव उर्फ दादोस यांची आबाइसा उमाइसाप्रमाणे चक्रधरांना ती अनुसरली. महदाइसा ही विरक्त तशीच जिज्ञासू होती. नागदेवांचा निकटचा सहवास तिला होताच धवळ्यांचा पूर्वार्ध ज्ञानेश्वरांपूर्वी निर्माण झाला असावा व उत्तरार्ध शके १२३४ पूर्वी केव्हातरी तयार झाला असावा असा विचार संशोधक करतात. (वा. ना. देशपांडे, आद्य मराठी कवयित्री, पृ. १२)

### १.५.१ धवळे - पूर्वार्ध :

धवळे म्हणजे लग्नात गावयाचे वरविषयक गीत. महदाइसेच्या नावावर धवळ्यांचा पूर्वार्ध व उत्तरार्ध आहे. धवळ्यांचा पूर्वार्ध ज्ञानेश्वरांपूर्वी निर्माण झाला असावा व उत्तरार्ध शके १२३४ पूर्वी केव्हा तरी तयार झाला असावा. असा तर्क संशोधक करतात. (वा. ना. देशपांडे, आद्य मराठी कवियित्री, पृ. १२)

या धवळ्यांतून महदंबेने श्रीकृष्ण रुक्मिणीच्या लग्नाची म्हणजे रुक्मिणीस्वयंवराची कथा सांगितली आहे. यावेळी रचलेल्या धवळ्यांच्या पूर्वार्धातील धवळ्यांची संख्या ८३ इतकी आहे. धवळ्यांच्या पूर्वार्धात रुक्मिणीहरणाचा कथाभाग आला आहे. धवळ्यांचा पूर्वार्ध हे एक पारंपारिक स्वरूपाचे कथाकाव्य असल्याने एक स्वतंत्र काव्यकृती म्हणून त्याचे मोल खूप महत्त्वाचे आहे. ही कलाकृती निर्माण करीत असताना एखादी अभिजात कलाकृती निर्माण करताना जातिवंत कलावंतांची जी भूमिका असते, तीच भूमिका महदंबेची होती.

''श्रीप्रभू म्हणती : वीवाहो करावा, मग म्हाइंभटे आवघी वऱ्हाडाची अइती केली। बाहीरि मांडवाचा द्वारी मंगळतुरे वाद्यंतरे वाजति. मग ऐसा अवसरी लोकु धवळ गाति.....''

धवळ्यांचे कथासूत्र सुरुवातीला 'वीव्हावे स्वीकारू' या प्रसंगाशी निगडित असले तरी या प्रसंगाचे प्रसंगत्वच ते नष्ट करून टाकते हे धवळ्यांच्या सुरुवातीच्या कडव्यावरून लक्षात येते. श्रीगोविंदप्रभूंच्या सूचनेवरून त्यांच्याच काल्पनिक विवाहप्रसंगी महादाइसाने धवळ्यांचा पूर्वार्ध रचिला आहे. या कथाकाव्यात तिने कृष्ण-रुक्मिणीचीच कथा गाइली आहे. धवळ्यांच्या सुरुवातीचे कडवे पाहता येईल. पण त्याचबरोबर चक्रधर, गोविंदप्रभू व नागदेवाचार्य यांच्यावर तिची विलक्षण निष्ठा होती. महदंबा ही जशी विदुषी होती तसे तिचे व्यक्तिमत्त्वही कलासंपन्न असे होते. चांगल्या रांगोळ्या काढण्यात ती पटाईत होती. तसेच ती चांगली सुगरणही होती. चक्रधर काशीयात्रेला जाणार होते. त्याआधी तिने त्यांना 'श्वेतउपहार' (सर्व पदार्थ पांढऱ्या रंगाचे) दिले होते. महानुभाव पंथाबद्दल तिला फार मोठा अभिमान होता. महदंबा ही संवेदनशील, सौंदर्यदृष्टी असलेली, नीटनिटकेपणा, चौकसपणा, जिज्ञासूपणा असलेली सुगरण, गाणे गाणारी, रांगोळी सुंदर काढणारी दक्ष कार्यकर्ती होती. पण तिचा स्वभाव मात्र परखड आणि स्पष्ट होता. पंथातील लोक तिला घाबरत. इतका तिचा वचक होता. कठोर शिस्तीचे पालन ती स्वतः करी आणि इतरांनाही

करायला लावी. शिष्यांनी दुपारी झोपलेले तिला आवडत नसे. इतरांशी आध्यात्मिक चर्चा करायला तिला आवत असे. नानाविध अनेक प्रकारचे आध्यात्मिक प्रश्न ती चक्रधरांना विचारायची. प्रश्नोत्तरे करून आपले ज्ञान वाढविण्यासाठी तिची असलेली धडपड, हा तिचा गूण चक्रधरांना आवडला. या तिच्या गुणांवरून तिची स्तुती करताना चक्रधर म्हणतात, ''म्हातारी जिज्ञासक : म्हातारी चर्चक म्हातारी एथ काही पुसतचि असे'' तर तिच्या देहावसानानंतर नागदेवाचार्य तिच्याविषयी म्हणतो, 'म्हातारी धर्मरक्षक प्रीतिरक्षक, सहदयत्वे दुःख-निर्वेदुः' गोविंदप्रभूच्या सहवासात असतानाच तिला काव्यलेखनाची स्फूर्ती मिळाली होती. गोविंदप्रभूंच्या विवाह प्रसंगाच्या निमित्ताने तिले धवळ्यांचा पूर्वार्ध रचला होता. तिचा जन्म आणि मृत्यू याविषयी निश्‍चित अशी काहीच माहिती उपलब्ध नााही. मात्र नवगाव (हैद्राबाद) येथे तिचा अंत झाल्याचे मानले जाते. महदंबेने आपले एकूणच आयुष्य सत्पुरुषांच्या सेवेत आणि तीर्थयात्रा करण्यात घालविले.

### १.५.२ धवळ्यांची निर्मिती :

चक्रधरांचा विश्‍वास महदंबेवर चक्रधर स्वामी महाराष्ट्रभर फिरत असत. त्यामुळे ती चक्रधरांच्या अनुज्ञेनेच रिधपूर येथे वास्तव्य करणाऱ्या शिष्यमंडळीत गोविंदप्रभूच्या आश्रयाला होती. श्री गोविंदप्रभूचरित्र या चरित्रग्रंथातील लीळा क्र.-२२४ ही श्रीगोविंदप्रभूंच्या वीव्हावो स्वीकारू संबधीची आहे. आणि तिच्या संदर्भातच महदंबेने धवळे गाइले असल्याची माहिती आपणास मिळते. अशा या रीतीने मराठी भाषेतून काव्य लिहायला सुरुवात करणारी केवळ काव्य लिहिणारीच नाहीतर 'धवळे' या कथाकाव्यासारखा ग्रंथ लिहिणारी ही उज्ज्वल 'पहाटप्रभा'च म्हणावी लागेल.

थोडक्यात, श्रीगोवंदप्रभूंनीच ''वीव्हावो स्वीकारू'' ची लीळा आरंभिली आहे. आणि त्या निमित्ताने महदंबेला विवाहासंबंधीची गीते गाण्यासाठी सांगितले तो प्रसंग असा-

धवळा हा शब्द धव+ल (स्वार्थ) असा बनला असून याचा अर्थ लग्नात गावयाचे वराविषयी गीत असा होतो. धवल हा प्राचीन लोकगीतांचा एक वृत्तप्रकार असून त्यांच्या निर्मितीची कथा 'ऋद्धिपूरचरित्रात' आलेली आहे.

वधूवरांसाठी बाशिंग घेऊन चाललेल्या एका तेलिणीला श्रीगोविंदप्रभूंसाठी एक बाशिंग देण्याची विनंती महदंबेने केली. मग ते बाशिंग तिने गोविंदप्रभूंच्या मुकुटी बांधले. कांकण बांधले, हळद लावली, श्रीप्रभूंच्या सांगण्यावरून 'तुरे वाजो लागली : वडे मांडे केले : फक्त नवरीमुलगी ठरवावयाची राहिले आणि गोसावियांसि वीव्हायाची प्रवृत्ती जरि होईल तरि मी आपुली कन्या देईन' असे ईश्‍वर नायकांनी जाहीर करून टाकले. गोसाव्यांना म्हणजे श्रीप्रभूंना मुलगी स्वीकारण्याची जेव्हा विनंती केली तेव्हा 'कोपु नटेले : लग्न झाले नाही' पण 'आवघेयां लोका जेवणावळी केली मग महदांइसेने धवळे गायिले, गोसावी म्हणीतले : आवो मेली जाए गाए म्हणे : महदाइसी म्हणीतले : काई गाओ जाः गोसावी म्हणीतले :

भावो कृष्ण रुक्मिणी गाय म्हणे तुरया थाट, गाय म्हणे :' अशा रितीने महदाइसेने श्रीप्रभूंच्या उत्तेजनाने धवळे रचले आणि गायिले.

**''श्री सर्वेश्वराचे शिरी धरुनिया चरण**

**मग धवळी गाईन गोविंदराणा**

**जेणे रुक्मिणी हरीयली तेणे पवाडे केले अद्‌भुत**

**पाविजे परमगती भक्ती,, आइकता श्रीकृष्ण चरित्र''**

वरील काव्यातील 'श्री सर्वेश्वर, गोविंदराणा' हे शब्द महानुभाव पंथातील काही व्यक्तींचा निर्देश करण्यासाठी योजिले गेले आहेत, पण हे शब्द देखील श्रीकृष्णाचाही निर्देश करतात. मग ''धवळी गाइन गोविंदराणा'' हा धवळ्यांचा जन्महेतू आहे. तो प्रकट होतो न होतो तोच ''जेणे रुक्मिणी हरियलि तेणे पवाडे केले अद्‌भुत'' असे विशेषणात्मक चरण योजून महदंबा श्रीगोविंदप्रभूंच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या कथेचा ओघ सुरुवातीलाच मोठ्या कुशलतेने श्रीकृष्णचरित्राच्या दिशेने वळवून घेते.

धवळे एक एक कथाकाव्य आहे. एकाच वेळी ती जशी एक कथा आहे तसेच ते काव्यही आहे. रुक्मिणीहरणाच्या घटनेस लाभलेले हे कथात्मक काव्यरूपही पुन्हा एक परंपरा निर्माण करताना दिसते. धवळ्यानंतरच्या काळात या कथेने वेगवेगळी रूपे धारण केलेली दिसून येतात.

धवळ्यांच्या पूर्वार्धात रुक्मिणीहरणाचा कथाभाग आला आहे. ही रुक्मिणीहरणाची कथा म्हणजे तेराव्या शतकातील एका कविमनाला एका पुराणप्रसिद्धकथेचे एका मर्यादित अर्थाने भावलेले रूप आहे. या पूर्वार्धात रुक्मिणीने कृष्णास लिहिलेल्या पत्रिकेचा मात्र कुठेच उल्लेख आलेला नाही. विप्राचा निरोप, कृष्णागमन, आंबिकापुरात त्याचे वास्तव्य आणि अंबिकेच्या दर्शनास आलेल्या रुक्मिणीचे हरण इ. प्रसंग भागवतातील आलेले आहेत. कृष्णाला पाहिल्यानंतर रुक्मिणीची झालेली अवस्था महदंबेने परिणामकारकरित्या वर्णन केले आहे. कृष्णाला न्हाऊ घालत असता त्याचे रुपयौवन पाहून रमणींची झालेली 'चित्रिस्त अवस्था' महदंबा कौशल्याने वर्णन करते. कृष्णाच्या रूपाचे वर्णन करताना आपल्या मनातील अभिलाषेचा रुक्मिणीस संशय येऊ नये म्हणून 'तुझा पती आम्हा पिता दुजा न आठवे विचारू' अशी गोपींनी केलेली सारवासारव यातून स्त्रीमनाचे सुंदर दर्शन घडते. प्रसंगनिर्मितीसोबत रुक्मिणी, कृष्ण, बळिभद्र विप्र यांची व्यक्तिचित्रेही जिवंत वाटावीत अशा पद्धतीने महदंबा हीने रेखाटली आहेत. धवळ्यांच्या पूर्वार्धात शेवटी 'महदाइसा गोविंदरावो धवळे आइकवले' असा उल्लेख करते.

एकूणच या धवळ्यांतून लोकसाहित्याचे चैतन्य लोकजीवनाचे रंग व लोकभाषेची सहज सुंदर चैतन्य लयबबद्ध वळणे प्रकट होतात. त्यामुळे पुढे समृद्ध पावलेल्या मराठी आख्यान काव्यपरंपरेहून धवळ्यांचे स्वरूप पृथगात्म अकृत्रिम आणि प्रत्ययकारी वाटते.

### १.५.३ उत्तरार्ध :

मराठीतील आद्य कथा - कविता कृष्ण - रुक्मिणी यांच्या विवाहाची असून ती महदाइसा नावाच्या एका स्त्रीने रंगवावी हा केवळ एक योगायोग म्हणावा लागतो. कारण या रुक्मिणीच्या स्वयंवराची कथा पुढे अनेक कवींनी मराठीत अतिशय सुंदररित्या रंगविली आहे.

धवळ्यांच्या उत्तरार्धाचे सारे श्रेय पूर्णपणे महदंबेकडे जात नाही. तर ते म्हाइंभट आणि लक्ष्मींद्रभट यांच्याकडेही जाते. एके दिवशी या दोघांनी 'रुक्मिणीसैंवर का न करा?' अशी महदंबेला विचारणा केली. तेव्हा पूर्वी गोविंदप्रभूंच्या निमित्ताने जमले, पण आता मला हे कसे जमणार? असे तिने उत्तर दिले. तेव्हा त्या दोघांनी महदंबेला सांगितले, ''आम्हा शब्द घडवूनि : तुम्ही गा!'' असे म्हटल्यावर महदंबेने हे धवळे गायिले व म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या दोघांनी ते लिहून घेतले म्हणून धवळ्यांच्या उत्तरार्धाचे सारे कर्तृत्व महदंबा, म्हाइंभट व लक्ष्मींद्रभट या तिघांकडे जाते. उत्तरार्धातील धवळ्यांची संख्या ६३ असून त्यांचा लेखनकाल इ.स. १३०८ (श.१२३०) साधारणपणे मानला जातो.

धवळ्यांच्या उत्तरार्धात रुक्मिणीस्वयंवराचा कथाभाग आला आहे. प्रारंभी ''सर्वेश्वराचे शिरी धरुनिया चरण : मग धवळी गाइन गोविंदराणा'' असे ईश्वराला वंदन केले आहे. आणि मग रुक्मिणीहरणाची कथा सांगितली आहे. ज्याने रुक्मिणीहरणाचे अद्‌भुत पवाडे केले त्या श्रीकृष्णाची कथा भक्तिभावाने ऐकल्यास परमगती प्राप्त होईल, असा महदंबेचा विश्वास आहे. उत्तरार्धात कृष्ण-रुक्मी युद्ध, रुक्मीला रथाला बांधून ''अर्धमीसी भादरूनी अर्धभागी जे केले क्षौर'' अशी कृष्णाने दिलेली शिक्षा आणि शेवटी ''मेव्हणा म्हणून रुक्मीची थट्टा केली.'' असे दिलेले उत्तर यांसारख्या प्रसंगातून सहजसुंदर विनोदनिर्मिती झालेली दिसते. कृष्णाचे रुक्मिणीसह द्वारकेस आगमन, नगरप्रवेश इ. प्रसंग स्वाभाविक आहेत असे वाटतात.

महदाइसा धवळ्यांतून स्त्रीसुलभ भाषाविष्कार करताना दिसते. स्त्रीस्वभावाचे ठराविक निरीक्षण करते आणि त्याचे वर्णन करते. उदा. कृष्णाला पाहिल्यानंतर रुक्मिणीची अवस्था -

**''सौंदर श्रीकृष्ण देखियला झळकता**

**तव तिथेचे आकर्षले चीत**

**कैसी संभ्रमीत जाली मांडावरूनिया घालू पाहे झेप**

**तवं वीप्रे सांवरीली बाळी म्हणे देवी नव्हे**

**तुमचे उचीत।''**

अशी झाली. कृष्णाचे रूप पाहिल्यानंतर इतर स्त्रियांच्या मनात त्याच्याविषयी अभिलाषा निर्माण झाली.या गोष्टीचा संशय रुक्मिणीला येऊ नये. म्हणून ''तुझा पती आम्हा पिता, दुजा न आठवे विचारू'' अशी सारवासारव त्या करतात. याशिवाय रुक्मिणी, श्रीकृष्ण, बलिभद्र, विप्र यांची व्यक्तिचित्रेही महदंबा

जिवंतपणे रेखाटते. यातील काही प्रसंगातून ‘महदाइसेच्या विनोदी शैलीचाही प्रत्यय येतो. अशा या वैशिष्ट्यपूर्ण काव्याचे वर्णन करताना वा. ना. देशपांडे म्हणतात, ‘‘महदाइसा ही जशी आद्य कवयित्री, तसे तिचे ‘धवळे’ हे या विषयावरील स्वतंत्र काव्यामधील आद्य काव्य होय. नरेंद्रच्या रुक्मिणीस्वयंवरात सर्वत्र उपमा उत्प्रेक्षाच्या चंद्रज्योती व भुईनळे सरसरत आहेत. तसा लखलखाट, धवलपणा नसला तरी त्यात निरंजनाची शुचिता खचित आहे. साधेपणा हा तर या काव्याचा प्राणच होय. साधे वर्णन, साधी भाषा व साधे विचारविकार असूनही एखादे काव्य हृदयंगम कसे होते याचा धवले हा उत्कृष्ट आदर्शच म्हटला पाहिजे.’’ (वा. ना. देशपांडे (सं) महदंबाः आद्य मराठी कवियित्री, पृ. २१)

सर्वांना आद्यस्थानी वाटणारी महदंबा हिच्या धवळ्यातून स्त्रीसुलभ भावाविष्कार करताना दिसून येते. औक्षण करणे, तैलादी मर्दणे, लोणवाण, केळवाण, मूळ न्हाण करणे, रुखवत देणे, वरास बाशिंग बांधणे, त्याला मंडपात येताना वधूमाय व वरमाय यांनी ओवाळणे, नर्तकीचा नाच होणे इ. सोहळे धवळ्यांच्या पूर्वार्धात व उत्तरार्धात आले आहेत. अंगास चंदनाची उटी व कपाळावर कस्तुरीचा टिळा, अन्नाला कापराचा सुवास, नवऱ्याचे उष्टे पत्नीने खाणे, मेव्हण्याची थट्टा करणे इत्यादी विषय या पहिल्या काव्यात आले आहेत.

स्वाभाविकता, गतिमानता, सहजसुंदरता, आणि स्त्रीसुलभता हे धवळ्यांचे उठून दिसणारे असे विशेष आहेत. या कथाकाव्यातून प्रसंगचित्रण, आणि व्यक्तिचित्रण अशी दोन मुख्य अंगे प्रकट होतात. ही स्वयंवरकथा असली तरी रुक्मिणीच्या श्रीकृष्णावरील शृंगारिक प्रेमाची कथा नाही, तर भक्तिभावाची कथा आहे. आणि मराठीत ही कथा स्वतंत्रपणे प्रथमच आणण्याचे श्रेय महदाइसेचे आहे.

### १.५.४ मातृकी रुक्मिणीस्वयंवर :

मातृकी रुक्मिणी स्वयंवर या नावाचे (११० अभंग) आणखी एक आख्यानकाव्य महदाइसेच्या नावावर आहे. एकूण ओवीसंख्या १०९ असून १ ते ८२ ओव्यात ‘क’ ते ‘क्ष’ पर्यंत मातृका आहेत. ३ ते १०१ ओव्यांत ‘न’ पासून ‘उ’ पर्यंत व नंतर भ-ट-द-व-म-न-व असा अक्षरक्रम आहे. काव्यदृष्टीने अभंगवृत्तीतील हे काव्य सरस ठरणारे आहे. रचनेचा सफाईदारपणा, लयबद्धता व निवेदनाची गतिमानता ही या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. कथानक आटोपशीर असून कुठेही पाल्हाळ नाही. कृष्णवर्णन, विप्राची पाठवणी, कृष्णदर्शनामुळे रुक्मिणीने सज्जावरून उडी घेणे इ. प्रसंग धवळ्यांमधून जसेच्या तसे याठिकाणी आलेले दिसतात. शब्दांचीही पुनरावृत्ती याठिकाणी आढळते. यावरून ‘धवळे’ या ‘ध्वनी’ चा मातृकी रुक्मिणी स्वयंवर हा शब्द प्रतिध्वनी होय. हे वा. ना. देशापांडे यांचे मत यथार्थ वाटते.

थोडक्यात अधिक आटोपशीरपणे सांगितलेली एकंदर रचना सरस बांधणीची, कडव्यांच्या आरंभी क्रमाने मातृका आणलेल्या आहेत. ही त्याच्या रचनेतली एक खुमारी म्हणावी लागेल. एकशेदहा कडव्यांच्या या काव्यात महदाइसाने श्रीकृष्ण रुक्मिणीच्या विवाहाचा थाट पुन्हा वर्णन केलेला आहे. तो आपल्याला पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**''कांसे पितांबर कंठी कुंदमाळा:।**

**कांतु शोभे सावळा रुक्मिणीचा:।।१।।**

**खांद्यावरि कावडि पडिभरे चालतु:।**

**तो खेळे वनांतु दत्तुसाए।।२।।**

**गावो द्वारावती गोमतीए प्रांती:।**

**गोदारीये क्रीडाती: चक्रपाणी।।३।।''**

अशा प्रकारे कडव्याच्या आद्याक्षरात मातृका (मुळाक्षरे) आणल्या आहेत. पण त्यात असावी तितकी शिस्त नाही. शिवाय त्यामुळेच रचना काहीशी कृत्रिम झाली आहे.

**१.५.५ गर्भकांड ओव्या :**

गर्भकांड ओव्या हे महदाइसेचे तिसरे काव्य उपदेशपर व नीरस आहे. याशिवाय प्रत्येक ओळीतील अद्याक्षरांचा क्रम साधण्याच्या उद्योगाचा विकास पंडिती काव्याच्या परंपरेत आलेला दिसतो. या गर्भकांड ओव्यातील पहिली व शेवटची ओवी पुढीलप्रमाणे पाहता येईल.

पहिली ओवी - **ॐ नमो आदिबीजा। परमार्था सहजा।**

**श्रीगुरू आदिराजा। नमन माझे।।**

अशी असून शेवटची - **विखयांचे गडदरे। त्येजवीले दातारे।**

**स्वामी चक्रधरे। महदंबेसी।।**

अशी आहे.

महादाइसेने रचलेली एक लहानशी आरती श्री. वा. ना. देशपांडे यांनी 'आद्य मराठी कवयित्री'च्या प्रस्तावनेत दिली आहे ती पुढीलप्रमाणे -

**''अमरगण गगनी पाहाति आनंदे**

**काळिया-दमन केले राये गोविंदे।।धृ।।**

**भुजंग जीणौनि आले मुरारी**

**ब्रीदावली पुढा पढती नागारी।।**

**महादाइसांचे स्वामी श्री सर्वेस्वरू**

**तो पाहे वो सुंदरी परमेश्वरू।।१।।''**

आरती साधी पण गोड अूसन श्रीकृष्णभक्तीतून स्फुरलेली आहे.

याशिवाय महादाइसेने काही शीघ्र काव्यरचना केलेली आढळते. ती पुढीलप्रमाणे -

**''गोमतीए तीरी। निळेया गुढरा : राजेया गुजरा कृष्णराया।। नीळा गुढरू : राजा गुजरू : माणीकी मंडणी : श्रीचक्रधरू।।''** (स्मृ. स्थ. ११३) यासारखी तिने केलेली चक्रधरांची भावपूर्ण व काव्यात्मक स्मरणे पाहिली की विठ्ठलप्रेमाने वेड्या झालेल्या जनाबाईंच्या अभंगाची आठवण होते.

**१.५.६ महदंबेच्या काव्याची वैशिष्ट्ये :**

विद्यार्थी मित्रहो, आपण महदंबेच्या काव्यरचना पाहिली, तिच्या एकूण काव्याची आपल्याला ठळकपणे काही वैशिष्ट्ये जाणवतात. कथाकाव्याची दोन मुख्य अंगे म्हणजे प्रसंगचित्रण आणि व्यक्तिचित्रण. या दोन्हीच्या बाबतीत या काव्यात एक अकृत्रिम साधेपणा आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत काव्यात गतिमानता आहे. कथानकात अनेक प्रसंगाची गुंफण कौशल्याने साधली आहे. रुक्मिणी, श्रीकृष्ण, बळीराम, सुदेव, रुक्मी, भोमक राजा, रुक्मिणीच्या सख्या इ. व्यक्तींच्या मनाचे विविध तरल मनाच्या विविध तरल भावना व्यक्तिचित्रणाच्या रूपात कवयित्रीने अतिशय सुरेख पद्धतीने रंगविलेले आहे.

काव्याच्या सुरुवातीला

**''श्री सर्वेश्वराचे 'सीरी धरुनिया चरण।**

**मग धवळी गाईऩ गोविंदराणा।।''**

असे सर्वेश्वराला वंदन ती करते आणि मग.....

**''जेणे रुक्मिणी हरीयली तेणे पवाडे केले अद्‌भुत।**

**पाविजे परमगती भक्ती आइकता कृष्णचरित्र।''**

अशी कथानकाची सुरुवात करते. धवळे व मातृकी स्वयंवर ही केवळ मराठीतील नव्हे तर भारतीय भाषांतीलही श्रीकृष्ण चरित्रावरील सर्वप्रथम रचना होय. सरळ, साध्या, आकर्षक कोठेही फाफट पसारा न करता संपूर्ण कथेचे निवेदन केलेले आहे. रुक्मिणी स्वयंवर ही कथा मुळातच शृंगारिक कथा आहे पण महदाइसेचे यातले वेगळेपण असे की तिने श्रीकृष्णकथेकडे शृंगारिक प्रेमकथा म्हणून न पाहता भक्तिभावाने पाहते. महानुभवांच्या इतर बहुतेक ग्रंथांमधून जसा श्रीकृष्णभक्तीचे संवर्धन करण्याचा प्रयत्न दिसतो व भक्तांच्या मनात हा भक्तिभाव रुजविण्याचा व श्रीकृष्णाविषयीचा भक्तिभाव अभिव्यक्त करण्याचा महदाइसेचा स्वयंवर कथा लिहिण्याचा मुख्य हेतू आहे.

धवळ्यांतून लोकसाहित्याचे चैतन्य, लोकजीवनाचे रंग आणि स्त्रीमनाचा उत्स्फूर्त वाङ्‌मयीन आविष्कार व्यक्त झाला आहे. 'आइकता कृष्णचरित्र' शृंगाराला थोडीही अवसर न देता रंजकता आणि लालित्य

यांच्या साहाय्याने सत्वशील शब्दसृष्टी कशी निर्माण करता येते हे महदाइसेच्या या काव्याने दाखवून दिले आहे. रुक्मिणीस्वयंवराची ही कथा नंतर अनेक कवींनी रेखाटण्याचे काम केले. पण मराठीत ही कथा स्वतंत्रपणे रेखाटण्याचे काम महदाइसेने केले.

विद्यार्थी मित्रहो, आपण मागे उल्लेख केल्याप्रमाणे या कथाकाव्याचा पूर्वार्ध हा श्रीप्रभूंच्या निधनापूर्वी म्हणजे शके १२०९ पूर्वी केव्हातरी रचला असावा असा अभ्यासकांचा अंदाज आहे. धवळ्यांच्या उत्तरार्धाच्या बाबतीत तो १२३४ च्या पूर्वी केव्हातरी रचला गेला असावा असे मानण्यात येते. तत्कालीन महाराष्ट्रातील विवाहपद्धतीचा तपशील समजण्याच्या दृष्टीने हे 'धवळ्या' तील सामाजिक उल्लेख खूप उपयुक्त ठरण्यासारखे आहेत.

मात्र नवगाव (हैद्राबाद) येथे तिचा अंत झाल्याचे मानले जाते. महदंबेने आपले एकूणच आयुष्य सत्पुरुषांच्या सेवेत आणि तीर्थयात्रा करण्यात घालविले.

### १.६ समारोप :

विद्यार्थी मित्रहो, वरील सर्व ग्रंथाचा विचार करता आपल्या असे लक्षात येते की, इसवी सनाच्या तेराव्या शतकापासून मराठीमध्ये वाङ्मयनिर्मिती होऊ लागली. मराठीतील पहिलाच ग्रंथ तत्त्वज्ञान प्रधान आत्मनात्मविवेक सांगणारा असावा आणि त्याचे शीर्षकही विवेकसिंधू असावे हे विशेष होय. पण विवेकसिंधू पूर्वकालीन काही ग्रंथाचा आपण अभ्यास केला. यावरून आपल्या असे लक्षात येईल की, आठव्या शतकाचा प्रारंभ हा मराठीचा उत्त्पत्तीकाल म्हणून मानावयास हरकत नाही. या ग्रंथामध्ये मराठी भाषेचा आणि महाराष्ट्रात उल्लेख आपणास पहावयास मिळतो. म्हणजेच मराठीचे अस्तित्व सातव्या शतकात शब्दरूपाने आढळते.अकराव्या शतकात (शिलालेखाद्वारा) वाक्यरूपाने आढळते आणि बाराव्या शतकात ती ग्रंथरूपाच्या दालनात पर्दापण करताना आढळते. मात्र, मराठीतील ग्रंथकर्तृत्त्वाची सुरूवात मुकुंदराजांच्या विवेकसिंधू पासून झाली असे आपणास म्हणावे लागते.

### १.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे :

**योग्य पर्याय निवडा.**

१) मराठी वाङ्मयाचा वैभवशाली प्रारंभ कोणाच्या कारकिर्दीत झाला?

अ) देवगिरीचे यावदराजे ब) राष्ट्रकुट राजे क) शालिवाहन राजे

२) मराठीतील आद्यग्रंथ कोणता?

अ) विवेकसिंधू ब) लीळाचरित्र क) स्मृतिस्थळ)

३) श्रवणबेळगोळच्या शिलालेखाचा शके कोणता?

अ) शके ९०५ ब) शके ११५० क) शके १०५०

४) विवेकसिंधू हा ग्रंथ कधी लिहिला गेला?

अ) शके १९९०   ब) शके १२१० क) शके १०५०

५) 'कुवलयमाला' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) राजशेखर   ब) सोमेश्वर   क) उद्योतनसुरी

६) हेमांडपंतांनी कोणता ग्रंथ लिहिला?

अ) चतुवर्ग चिंतामणी ब) विवेकसिंधू क) मानसोल्लास

७) मराठीतील पहिले वाक्य कोणते?

अ) श्रीचामुण्डराजे करवियले ब) महंत राष्ट्र म्हणोनि महाराष्ट्र क) यांपैकी नाही

८) 'कर्पूर मंजरी' हे नाटक कोणाचे?

अ) राजशेखर   ब) सोमेश्वर   क) मुकुंदराज

९) 'मानसोल्लास' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) राजशेखर   ब) उद्योतनसुरि  क) सोमेश्वर

१०) धवळे म्हणजे काय ?

अ) लग्नात गावयाचे वराविषयक गीत ब) लग्नात गावयाचे वधूविषयक गीत

क) लग्नात गावयाचे सासूविषयक गीत  ड) लग्नात गावयाचे सासऱ्याविषयक गीत

**उत्तरे :**

१) देवगिरीचे यादवराजे २) विवेकसिंधू ३) शके ९०५ ४) शके १११० ५) उद्योतनसुरी ६) चतुवर्ग चिंतामणी ७) श्री चामुण्डराजे करवियले ८) राजशेखर ९) सोमेश्वर १०) लग्नात गावयाचे वराविषयक गीत

**१.८ दीघोत्तरी प्रश्न :**

१) विवेकसिंधू पूर्वकालीन रचनांचा आढावा घ्या.

२) मुकुंदराजांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या.

**३)** मराठीतील कथाकाव्य लेखन करणारी पहिली स्त्री म्हणून महदाइसेच्या काव्यग्रंथाआधारे तिची ओळख पटवा किंवा

४) गतिमानता, सहजसुंदरता आणि स्त्रीसुलभता हे महंदबेच्या कवित्वाचे विशेष आहेत. या विधानाची

सत्यता तिच्या काव्याआधारे पटवा.

५) महदंबेच्या धवळयांचा थोडक्यात परिचय करुन द्या.

**१.९ लघुत्तरी प्रश्न :**

१) विवेकसिंधू या ग्रंथाचा थोडक्यात परिचय करून द्या.

**३) टीपा लिहा :**

१) विवेकसिंधू

२) परमामृत

३) पवनविजय

४) मातृकी रूक्मिणीस्वयंवर

५) धवळे – उत्तरार्ध

६) धवळे ० पूर्वार्ध

**१.१० अधिक वाचन :**

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा विवेक इतिहास : भाग पहिला, डॉ. अ. ना. देशपांडे.

२. महानुभव पंथ आणि त्याचे वाङ्मय : शं. गो. तुळपुळे.

३. प्राचीन मराठी साहिलसंशोधन : डॉ. वि. भि. कोलते.

४. विवेकसिधू : संपादक : कृ. पा. कुलकर्णी.

५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, शं. गो. तुळपळे.

६. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : प्रा. ह. श्री. शेणोलीकर.

७. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. ल. रा. नसिराबादकर.

८. मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड तिसरा, संपादकः प्रा. रा. श्री. जोग.

**१.११ उपक्रम :**

१. मुकुंदराजांच्या 'अंभोरे' या स्थळाला भेट देऊन माहिती मिळवा.

२. महदंबेचे 'धवळे' हे काव्य मिळवून वाचा.

***

# घटक – २

# इ.स. १२०० ते १३००

# (स्थूल कालखंड)

अ) महानुभावीय गद्य वाङ्मय –

१) म्हाइंभट – लीळाचरित्र, श्री. गोविंदप्रभुचरित्र व इतर रचना

२) केसोबास – सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, स्मृतिस्थळ

ब) महानुभावीय पद्य वाङ्मय

१) सातीग्रंथ (ग्रंथ व ग्रंथकार स्थूल परिचय) २) नरेंद्र – रूक्मिणी स्वयंवर

३) भास्करभट्ट बोरकर – शिशुपालवध, उद्धवगीत किंवा एकादशस्कंध

४) दामोदर पंडित – वछाहरण ५) पंडित विश्वनाथ – ज्ञानप्रबोध

६) खळोव्यास सह्याद्रीवर्णन ७) नारायण पंडित –श्री ऋद्धिपूरवर्णन

---

## २.१ उद्दिष्ट्ये :

१) इ.स. १२०० ते १३०० या कालखंडातील महानुभाव पंथातील गद्य चरित्रात्मक वाङ्मय समजून येईल.

२) इ.स. १२०० ते १३०० या कालखंडातील महानुभावपंथातील पद्य वाङ्मय समजून येईल.

३) महानुभाव संप्रदायाची विविध ग्रंथातून त्या काळातील संस्कृती समजून येईल.

४) गद्य–पद्य ग्रंथातील मांडणी कशी होती हे समजून येईल.

५) इ.स. १२०० ते १३०० या कालखंडातील सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीचे आकलन होईल.

## २.२ प्रस्तावना :

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास अभ्यासताना आपणास प्राचीनकाळापासून विविध प्रकारची ग्रंथ निर्मिती झालेली दिसते. ती गद्य–पद्य मिश्रीत अशी आहे. इ.स. १२०० ते १३०० या स्थूल कालखंडात प्रामुख्याने महानुभाव संप्रदाय कार्यरत असलेला दिसतो. या संप्रदायातील शिष्यांनी (ग्रंथकारांनी) विविध विषयावर गद्य व पद्य ग्रंथ लिहिले आहेत. मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मिती केली आहे. या महानुभाव संप्रदायास 'परमार्ग' असे म्हंटले जात. पण शं. गो. तुळपुळे यांनी प्रथम या संप्रदायास 'महानुभाव पंथ' असे नाव वापरले. या पंथाचे मूळ पुरुष श्री गोविंदप्रभू ऊर्फ गुंडम राऊळ होते. या संप्रदायाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या ग्रंथाच्या साहाय्याने आपणास त्या काळातील संस्कृती, रूढी–परंपरा, चालीरिती, समाजकारण, धर्मकारण, राजकारण, राहणीमान हे समजून

घेता येते. या संप्रदायातील लोकांना स्वत:च्या जगण्यावर बंधने घालून घेतली होती. ती सर्व साहित्यातून अभिव्यक्त झाली आहेत. या ग्रंथनिर्मितीमध्ये गद्य-पद्य अशा स्वरूपाचे लेखन झालेले दिसते. हे ग्रंथ काव्य, प्रबंधकाव्य, पदे, स्तोत्र, स्थलवर्णन, चरित्र स्थलमहात्म्य इत्यादी अशा विविध वैशिष्ट्यांनी नटलेले दिसते. गद्य मांडणीत परिपक्वता, प्रौढता दिसते.

गद्य वाङ्मयाचा विचार करता आपणास म्हाइंभटाचे- लीळाचरित्र, श्री गोविंदप्रभुचरित्र व इतर रचना, केसोबासांचे - सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, स्मृतिस्थळ या ग्रंथांचा अभ्यास आपण करणार आहोत, तर पद्य वाङ्मयामध्ये साती ग्रंथ म्हणजे नरेंद्राचे रूक्मिणी स्वयंवर, भास्करभट्ट बोरीकर यांचे शिशुपाल वध, उद्धवगीता किंवा एकादशस्कंध, दामोदर पंडिताचे वछाहरण, पंडित विश्वनाथाचे ज्ञानप्रबोध, खळोव्यास यांचे सह्याद्रिवर्णन आणि नारायण पंडित यांचे श्री ऋद्धिपूरवर्णन या ग्रंथांचा आपण परिचय करून घेणार आहोत.

## २.३ विषय विवेचन :

या घटकात महानुभाव संप्रदायातील गद्य व पद्य ग्रंथांची माहिती दिली आहे. मुकुंदराजाच्या नंतर इ.स. १२०० ते इ.स. १३०० या स्थूल कालखंडात महानुभाव संप्रदाय उदयास आला. या संप्रदायाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी होते. चक्रधरांचे मूळ नाव हरपाळदेव होय. यांचा जन्म गुजरातमध्ये इ.स. ११९४ मध्ये झाला. यादवराव सिंघणाने भडोचवरील केलेल्या स्वारीत हरपाळदेव शके ११४३ मध्ये मृत्यू पावला. त्याप्रसंगी चांगदेव राऊळ यांनी त्यांच्या मृत शरीरात प्रवेश केला. चांगदेव राऊळ यांना द्यूत खेळण्याचा नाद होता. द्युतात सर्व काही हरल्यामुळे ते रामटेकला यात्रेच्या निमित्ताने निघून गेले. तेथे त्यांची भेट श्री गोविंदप्रभू यांच्याशी झाली. गोविंदप्रभूंनी त्यांचे नाव चक्रधर असे ठेवले. चक्रधर गुजराथमध्ये जन्मले असले तरी महानुभाव पंथाचा प्रसार महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात केला. त्यामुळे पंथाचे प्रणेते म्हणून श्री. चक्रधर स्वामी यांच्याकडे पाहिले जाते. श्री चक्रधर स्वामी हे तरुण, अभ्यासक, व्यासंगी, शिस्तप्रिय गुरू, कुशल संघटक आणि मार्गदर्शक व अहिंसेचे प्रवर्तक अशा विविध गुणांनी संपन्न होते. त्यांच्या काळात 'चार्तुवर्गचिंतामणी' या ग्रंथाच्या अनुषंगाने खूपच प्रस्थ माजले होते. सर्वत्र अंधश्रद्धा बोकाळली होती. अशा काळात चक्रधरांनी लोकभाषेचा पुरस्कार करून समाजात जनजागृती करण्याचे कार्य केले.

महानुभाव संप्रदाय स्थापन झाला. मात्र यांचे आचारधर्म व तत्त्वज्ञान कडक व वेगळ्या पद्धतीचे होते. श्री. चक्रधरांनी आत्मज्ञान, भक्ती आणि गुरूकृपा यांना महत्त्व दिले. महानुभावांचे तत्त्वज्ञान हे 'सूत्रपाठ' या ग्रंथात सविस्तरपणे सांगितले आहेत. जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर या प्रमुख मानून नियमीत मानल्या आहेत. या संप्रदायाचे कृत युगात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात कृष्णावतार आणि कलियुगात श्री. चक्रधरावतार असे चार अवतार प्रमुख मानले आहेत. या संप्रदायात अस्पृश्यता मानली जात नाही. स्त्रिया व शूद्र यांना येथे दीक्षा घेता येत होती. या संप्रदायात पाच मूर्तीची पूजा केल्याने पंचकृष्णांच्या वचनांना प्रमाण मानतात. या पंचकृष्णांत (१) श्रीकृष्ण (२) श्री दत्तात्रेय प्रभू (३) श्री चांगदेव राऊळ (४) श्री गोविंदप्रभू (५) श्री चक्रधर यांचा समावेश दिसतो. या पंचकाविषयी डॉ. प्र. न. जोशी म्हणतात, ''महानुभावीयांच्या मते श्रीकृष्ण हा विष्णूचा मर्यादित अवतार नसून परब्रह्माचा साक्षात असा व्यापक अवतार आहे. भारतीय परंपरेतील श्रीकृष्ण व महानुभावांचा

श्रीकृष्ण यांत याखेरीज अन्य भेद नाही.'' (पृ.१०७, मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास) एकूणच पंचकृष्णांना फार महत्त्व असलेले दिसते. श्री चक्रधरांच्या वचनांना 'श्रृती' असे म्हणतात तर नागदेवाचार्य यांच्या रचनांना 'स्मृती' असे म्हणतात.

महानुभाव संप्रदायात जे आचारधर्म सांगितले गेले त्यात प्रामुख्याने संन्यस्त आणि गृहस्थ असे दोन वर्ग केले. संन्याशाने नेहमी भ्रमंती करावी, भिक्षेतून मिळालेले अन्न चव व गोडी न घेता घ्यावे, एकांतवासात परमेश्वराचे नाम:स्मरण करावे, एकाच गावात जास्त काळ भिक्षा मागत राहू नये, तोरण बांधलेल्या घरी भिक्षेस जाऊ नये, ओळखीच्या ठिकाणी भिक्षा मागू नये, देह जिवंत ठेवण्यासाठी अन्नाचे सेवन करावे, स्त्रीचे चित्र पाहू नये, परनिंदा-परवार्ता करू नये, कोणाचाही द्वेष, मत्सर, क्रोध करू नये. इत्यादी असे अनेक आचारधर्म सांगितले आहेत. महानुभाव संप्रदायाचे आचारधर्म जीवेश्वर भेद, भक्तियोग, संन्यास आणि अहिंसा या प्रमुख तत्त्वावर आधारित आहेत. अशा या आचारधर्म आणि तत्त्वज्ञानाच्या अनुसरणाने कार्य करीत असताना अनेक विद्वानांनी गद्य-पद्य अशी वाङ्मय निर्मिती केली आहे. या वाङ्मय निर्मितीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येतो.

### २.४ अ) महानुभाव पंथाचे गद्य वाङ्मय :

महानुभाव संप्रदायाचा विषय विवेचनामध्ये थोडक्यात परिचय करून घेतल्यानंतर आता आपण या संप्रदायात कोणकोणते गद्य वाङ्मय तयार झाले याचा विचार करणार आहोत. यात प्रामुख्याने 'लीळाचरित्र', 'श्री गोविंदप्रभुचरित्र', 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ', आणि 'स्मृतिस्थळ' या महत्त्वाच्या ग्रंथांचा समावेश होतो. हे सर्व ग्रंथ जाणीवपूर्वक मराठीतून लिहिले आहेत. कारण चक्रधर स्वामी व नागदेवाचार्य यांनी मराठीतून संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करण्यास सर्व शिष्यांना सांगितले होते. त्यामुळे अशी विविध प्रकारची वाङ्मयनिर्मिती झालेली दिसते.

### २.४.१ लीळाचरित्र :

लीळाचरित्र या ग्रंथाला महानुभाव संप्रदायात खूप महत्त्व आहे. मराठीतील हा पहिलाच चरित्रग्रंथ आहे. श्री चक्रधर स्वामी हे महानुभाव संप्रदायाचे संस्थापक होते. त्यांच्या आठवणी एकत्र करून म्हाइंभटाने लीळाचरित्र ग्रंथाचे संपादन केले. म्हाइंभट हा गर्भश्रीमंत व विद्वान होता. आपल्या विद्वत्तेचा त्याला मोठा गर्व होता. त्यामुळे तो इतरांना गवताच्या काडीसमान लेखत असे. याचे प्रतीक म्हणून तो पायाच्या अंगठ्यात गवताची बाकी बांधत असे. आकाशात एक सूर्य तर भूतलावर आपण अपरसूर्य आहोत. असे तो स्वत:स म्हणत असे. एक दिवस वामनभटाबरोबर ते स्वामींच्या दर्शनास आले आणि स्वामींच्या दर्शनाने मागील सर्व विसरून गेले. स्वामींनी म्हाइंभटास प्रश्न केला - ''एथौनि आत्यंतिक संस्कृती छेदू ऐए कार प्रतिनी आणि'' या प्रश्नाचे उत्तर म्हाइंभटाला देता आले नाही. या प्रसंगानंतर त्यांचे गर्वहरण झाले व त्यांनी श्री गोविंदप्रभूंच्याकडून पंथाची दिक्षा घेतली आणि चक्रधर स्वामींचे शिष्यत्व पत्करून महानुभाव संप्रदायात कार्य करू लागले. श्री चक्रधर स्वामींनी शके ११९६ च्या सुमारास उत्तरापंथे गमन केल्यानंतर सर्व शिष्य ऋद्धिपूर येथे एकत्र येऊन श्री चक्रधरांच्या आठवणी सांगू लागले. याप्रसंगी म्हाइंभटांना सर्व आठवणी एकत्रित करण्याचे सुचले आणि सर्व शिष्यांकडून सांगितल्या गेलेल्या सर्व लीळा एकत्रित गोळा केल्या. त्या सर्व लीळा नागदेवाचार्य यांच्याकडून खऱ्या असल्याची खात्री करून घेऊन

लीळाचरित्र ग्रंथ संपादन केला. आपल्या गुरूविषयीच्या लीळांचे संपादन करत असताना म्हाइंभटाने खूप कष्ट घेतले. याप्रसंगी त्यांची चिकाटी दिसते. एकदा ते खेइंभटकडे लीळा विचारण्यासाठी जातात. त्यावेळीचा प्रसंग पहाता येतो. ''तैसेचि म्हाइंभट अटनविशेषे खेइंभटांचे या गावां गेले: तेंथ तयांसि भेट झाली: म्हाइंभटां हेतु: जे गोसावियांचीया लीळा शोधावीया: तवं खेइंभट कृषीकर्म करावया जाति: त्यासरीसे म्हाइंभटही जाति: खेइंभट कृषिकर्म करीति: आणि म्हाइंभट तयां मागां मागां गोसावियांचीया लीळा पुसति: खेइंभट सांघति: त्या म्हाइंभट नमस्कारूनि घेति: मग भिक्षा करूनि जेविती:'' याठिकाणी गुरूविषयी मनात असणारा आदर प्रेम, जिव्हाळा दिसून येतो. तसेच त्यांच्या आठवणी गोळा करण्याविषयीची चिकाटी दिसते.

म्हाइंभटांना सर्व लीळा या अनेक शिष्यभक्तांकडून मिळाल्या आहेत. त्याचे त्यांनी वर्गीकरण केले. एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध या पद्धतीने मांडणी केली आहे. या ग्रंथातील लीळांविषयी वेगवेगळ्या अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडलेली आहे. प्र. न. जोशी यांनी या ग्रंथात एकांकात ७४ पूर्वार्धात ३५८ व उत्तरार्धात ४८८ व इतर अशा एकूण ९२० लीळा येत असल्याचे सांगितले आहे. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी लीळाचरित्र एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध अशा ३ भागात असून एकूण लीळांची संख्या १५०९ इतकी असल्याचे सांगितले आहे.

डॉ. वि. भि. कोलते यांनी एकांक भाग वेगळा न करता पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग मानून पूर्वार्धात ५९२ व उत्तरार्धात ६५५ अशा एकूण १२४७ लीळा असल्याचे सांगितले आहे. याशिवाय त्यांनी इतर काही द्वापार लीळा (लीळा ४८) व अज्ञात लीळा (लीळा १५१) यांचा समावेश लीळाचरित्रात केला आहे. एकूणच वेगवेगळ्या अभ्यासकांनी लीळांची संख्या वेगवेगळी सांगितलेली दिसते. असे जरी असले तरी हा ग्रंथ विश्वासनीय असल्याचे मत सर्वच अभ्यासकांनी मांडले आहे.

या ग्रंथाची निर्मिती ही इ.स. १२८३ (शके १२०५) च्या दरम्यान झाली आहे. चक्रधरांच्या सहवासात राहिलेल्या शिष्यांनी सांगितलेल्या लीळा संकलन करून पूर्वार्ध व उत्तरार्ध लिहिला गेला. मात्र चक्रधरांच्या एकाकी जीवनाविषयी कोणालाच फारशी माहिती नव्हती. फक्त महदायिसेशिवाय कोणीही त्यांच्या एकांतवासात त्यांच्यासोबत नसत. त्यामुळे महदायिसेने जी माहिती सांगितली त्या माहितीच्या आधारावर एकांकी जीवनातील लीळा लिहिल्या. काहीवेळा श्री चक्रधर स्वामींच्या मुखातून त्यांच्या पूर्ण जीवनाचे संदर्भ ओघाने येत असत. त्याचाही आधार एकांक लिहिताना घेतला गेला. लीळाचरित्रातून श्री चक्रधर स्वामींच्या संपूर्ण जीवन व व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. त्यांनी ज्या-ज्या ठिकाणी भ्रमंती केली याची माहिती मिळते. त्या काळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक संदर्भ समजतात. त्यामुळे 'लीळाचरित्र' हा ग्रंथ एक दस्तऐवज म्हणून अभ्यासता येतो. हा ग्रंथ फक्त चरित्र नसून श्री चक्रधर स्वामींचे स्मरण आहे. या लीळांतून चक्रधरांच्या सौंदर्यापासून ते तत्त्वनिरूपणापर्यंत, लहानातील लहान हालचालीपासून ते वेगवेगळ्या कृतीपर्यंत विस्तार वर्णन म्हाइंभटाने केले आहे.

चक्रधर स्वामी हे दिसायला सुंदर होते. त्यांना पाहिल्यावर पुरुषदेखील त्यांच्यावर मोहित होत असत. त्यांची देहयष्टी पीळदार होती. हे पुढील ओवीवरून दिसते. ''अया: कैसे सोंदर्य पुरूषु: साक्षात गोरक्षनाथु'' हे

उद्‌गार अनेकांच्या मुखातून चक्रधर स्वामींना पाहिल्यावर बाहेर पडते. लीळाचरित्रात चक्रधरांच्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत. जसे की, सशाला पारध्यापासून अभय देणारे चक्रधर, चोरांना 'महात्मे' म्हणणारे चक्रधर लहान धानाईला साळू-कावळ्याची गोष्ट सांगणारे चक्रधर, गुरे राखणारे चक्रधर, अपराध करणाऱ्या शिष्यास कठोर शासन करणारे चक्रधर, श्रमाने थकवा येणाऱ्या महदायिसेची सेवा करणारे चक्रधर, इत्यादी. अशी चक्रधरांच्या व्यक्तिमत्वाची विविध रूपे म्हाइंभटाने लीळाचरित्रातून मांडले आहेत. या विविध प्रसंगांची मांडणी करताना चक्रधरांबरोबर नागदेवाचार्य, बाईसा, दादोस, सारंग पंडित या शिष्यांचेही चित्रण येते.

महानुभाव तत्त्वज्ञानाचा मुलाधार म्हणून लीळाचरित्राकडे पाहिले जाते. या ग्रंथातील तत्त्वज्ञानावरच सूत्रपाठ, दृष्टांतपाठ यासारखे ग्रंथ निर्माण झाले. म्हइंभटाने श्रद्धेने हा ग्रंथ संकलन केल्याने आणि सत्याच्या कसोटीवर तपासल्याने याला विश्वसनीयता प्राप्त झाली आहे. एक आदर्श चरित्रग्रंथ म्हणून याचे वाङ्मयात उच्च स्थान आहे. म्हाइंभटाची लीळाचरित्रातील वर्णनशैली चित्तवेधक आहे. छोटी छोटी वाक्ये असल्याने तो प्रसंग साक्षात डोळ्यासमोर उभा राहतो. या बरोबरच महाराष्ट्राच्या १२ व्या व १३ व्या शतकातील सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. कारण या काळातील बरीच माहिती येथे मिळते. जसे की - बारसे, उपनयन व मौंजीबंधन, गोंधोळीच्या मुहूर्तावरील विवाहोत्सव याची माहिती मिळते. विविध उत्सव, शिमगा, दिवाळी, या सणांची माहिती मिळते. ग्रामस्थांचा न्यायनिवाडा, गावो-गावीचे महाजन, जातिधर्म, कर्ज काढून शेती करणारे शेतकरी, वाटमारी, दरोडे दिसतात. याबरोबरच तेली परीट, शिंपी, चांभार, कासार, लोहार, मोळीविके, गुराखी असे विविध व्यवसाय करणारे लोक दिसतात. व्यवहारातील आसू, दाम, रूका, फवडा पादुका इत्यादी चलनातील नाणी समजतात. तसेच कृषिजीवन, बाजारहाट, व्यापार जातिव्यवस्था, भाषा इत्यादी याचे संदर्भ लीळाचरित्रातून समजतात. या ग्रंथात कोठेही जड भाषा आलेली नाही. अल्पाक्षर रमणीयत्व हे म्हाइंभटाच्या लेखनीचे वैशिष्ट्य असल्याने घरगुती पद्धतीची भाषा येते. निवेदन शैलीचे सामर्थ्य वाढविण्यासाठी काही ठिकाणी दृष्टांत व संवादात्मकता येते. एकूणच या ग्रंथातून म्हाइंभटाची श्री चक्रधर स्वामींच्यावरील निष्ठा, त्यांचे परिश्रम, डोळसपणा इत्यादी अशा व्यक्तिमत्वातील गोष्टींची छाप ग्रंथात पडली आहे. याचा साक्षात्कार आपणास उदाहरणादाखल काही लीळांचा अभ्यास करून घेता येतो. तसेच भाषेचे स्वरूप आणि वाङ्मयीन सौंदर्य याची कल्पना येते.

**१) अवस्था स्वीकारू :**

''गोसावी अवस्था स्वीकारली: मार्गी चालावयाची प्रवृत्ति नाही: काटे या केसकळाप गुंपति: ते वारेनि उगवति: कां कव्हणी मनुष्य उगवी तेव्हळि: मूर्ति वोरखडे: काटे रूपति: असुधाचे बींदू नीगति: ते साहाजे पन्हरेयावरी मानुकूली तैसी मीरवति:।।''

आशय -

श्री गोविंदप्रभूंच्याकडून शक्ती स्वीकार केल्यानंतर श्री चक्रधरांची अवस्था उन्मनस्क झाली. तिचे वर्णन इथे आले आहे. या अवस्थेत ते सातपुडा पर्वतातील सालबर्डीच्या डोंगरात बारा वर्षे होते. त्यांचे लांब केस काटेरी

झुडुपात गुंतत. ते तेथेच थांबत. वाऱ्याने ते मोकळे झाले किंवा एखाद्या वाटसरूने ते मोकळे केले की ते पुढे जात. कधी कधी अंगाला काटे लागून त्यातून रक्तबिंदू निघत. ते स्वामींच्या सुवर्णकांतीवर लाल रत्नाप्रमाणे चमकत.

**२) आघ्रपीळी खेळवणे :**

''एके वेळ रानी जाळी एकी बीजे केले होते: तेथ लाहासिची पाली होती. ते पारधी गेली होती: तीथे पीली गोसावी खेळविली: तवं ते आली: गोसावी अवलोकिली: रोखु नीवर्तला: मग ते मोळी हे कौनि बैसली: सुनेयाचिया परी: मग नविक गोसावी पीली खेळविली: वडुवे धरूनि एरी कडीचा एरी कडी घातली: मग तीएची तीएकडे घालुनि गोसावी बीजे केले:।।''

आशय -

स्वामी एकदा अरण्यातील मोठ्या झुडुपाजवळ गेले होते. तेथे वाघिणीची पिले होती. वाघीण शिकारीसाठी बाहेर गेली होती. स्वामींनी ती वाघपिले खेळवली. इतक्यात वाघीण आली. स्वामींनी तिच्याकडे कटाक्ष टाकला. तिच्या मनातील राग निवळला. ती आपले अंग दुमडून बसली. स्वामींनी पुन्हा त्या पिलांना खेळवले आणि ते निघून गेले.

या लीळांतून श्री चक्रधर स्वामींचे प्रेम आणि अहिंसा कशी असावी हे दिसून येते.

**२.४.२ श्री गोविंदप्रभुचरित्र :**

म्हाइंभटाने लिहिलेला हा दुसरा ग्रंथ आहे. या चरित्रग्रंथात गोविंदप्रभूंचे जीवन स्मृतिरूपाने येते. या ग्रंथाला महानुभाव पंथात 'ऋद्धिपूरलीला', 'ऋद्धिपूरचरित्र' असा उल्लेख दिसतो. वि. भि. कोलतेनी या ग्रंथास 'श्री गोविंदप्रभुचरित्र' असे नाव दिले. हा ग्रंथ इ.स. १२८८ मध्ये लिहिला गेला. या ग्रंथात एकूण ३२५ लीळांचे संकलन आहे. श्री गोविंदप्रभू म्हणजे परमेश्वरी अवतार असे मानल्याने ईश्वरी पुरुषाचे चरित्र म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. श्री गोविंदप्रभूंच्या जीवनातील अनेक प्रसंग या चरित्रात आल्याने त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते. श्री गोविंदप्रभू म्हणजे वऱ्हाडकडील असल्याने वऱ्हाडी बोलीचा सुंदर आविष्कार या ग्रंथात दिसून येतो.

श्री गोविंदप्रभूंचे व्यक्तिमत्व हे वेडेपिसे होते. कारण त्यांनी अवतार घेत असताना गर्भ, पतित व दवडणे या ३ प्रकारांपैकी दवडण्याचा अवतार घेतला होता. त्यामुळे त्यांनी ज्या जीवाला मातेच्या गर्भातून दवडविले होते. त्याचे देहगुण व स्वभाव त्यांना स्वीकारावे लागले. दवडलेला जीव हा वेडापिसा होता. जसे की ते खाड (दाढी) माखेपर्यंत गूळ खात, वेगवेगळे हातवारे करत, वेडावून दाखवत, इ. गोविंदप्रभूंच्या व्यक्तिमत्वातील विविध रूपे या ग्रंथातून दिसतात. जसे की - ते कुणब्याच्या व महाराच्या घरी जेवत असत, मांगाच्या घरी पाणी पित असत, मुलाला अंघोळ घालणाऱ्या बाईस गरम पाण्यात विरजन घालून देत, मुक्याला वाचा देत, सर्पाचे विष उतरवित, इत्यादी. रूपे दिसतात. त्यांच्या मुखात अनेकवेळा ''आवो मेली जाये'' ही शिवी असल्याने त्यांच्या अंतरंगातील वात्सल्य प्रकट होताना दिसते. या अनुषंगाने या चरित्रातील एक लीळा पहाता येते.

''मातांग-गृहीं खेळु:।। गोसावी माहारवाडेयासि बीजें करीति: उतरंडी उतरीती: मग म्हणेति ''आवो!

मेला जाय: येथ काइ असे'' ते म्हणे ''येथ काइ असेल राऊळो! का उतराल?'' तेसेंचि मातांगाचा घरी करीति: काही पदार्थ देखेति: तो चाखेति: आणि म्हणेति: ''आवो मेली जाये: गोड आहे म्हणे:'' ऐसा अनुकारू करीती: मग गोसांवी बीजें करिति:।।४६।।''

या चरित्रग्रंथातून श्री चक्रधर व गोविंदप्रभू यांच्यातील आख्यायिका येत नाहीत. यातील आख्यायिकातून तत्कालीन सामाजिक परिस्थिती समजते. घाटा, कानवला, धिरडे, राळ्याचा भात, वडेयाचे आंबट इत्यादी, खाद्य पदार्थांची माहिती मिळते. शिमगा, श्रावणी, पोळा यासारख्या सणांची माहिती मिळते. स्पृश्यास्पृश्यभाव, सामान्य स्त्रिया रोगराईवरील घरगुती उपाय, ताम्रपटांकित खरेदी खते, यासारख्या रूढी परंपरा दिसतात. यातून त्यावेळची सामाजिक परिस्थिती कशी होती हे लक्षात येते.

या चरित्रग्रंथात मोजक्या शब्दातून अत्यंत साधी भाषा वापरून गोविंदप्रभूंचे व्यक्तिदर्शन घडविणे हे म्हाइंभटाच्या लेखनीचे वैशिष्ट्य आहे. अनेक ठिकाणी वऱ्हाडी प्रादेशिक शब्द व वाक्यप्रचार वापरले आहे. म्हाइंभटाना श्री चक्रधर स्वामी यांचेकडून प्रेरणा मिळाली तर श्री. गोविंदप्रभू यांचेकडून दीक्षा घेतली. बराच काळ यांचे सान्निध्य म्हाइंभटाना मिळाले. ग्रंथाविषयी ल. रा. नसिराबादकर म्हणतात, ''चरित्रलेखकाला आवश्यक असणारा निकटचा सहवास, जिव्हाळा आणि त्याचसोबत सत्यान्वेषी दृष्टी ही तिन्ही वैशिष्ट्ये म्हाइंभटाजवळ असल्यामुळे त्यांचा हाही ग्रंथ वाङ्मय गुणसंपन्न झाला आहे.'' (पृ.२२, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास) यावरून असे लक्षात येते की श्री गोविंदप्रभू चरित्रग्रंथ वाङ्मयीनदृष्ट्या संपन्न असून महानुभाव संप्रदायातील महत्त्वाचा ग्रंथ आहे.

**२.४.३ सूत्रपाठ :**

इ.स. १२८० (शके १२०२) मध्ये केसाबासांनी चक्रधरांच्या तोंडी आलेल्या सूत्रांचे संपादन केले. केसोबासांनी नागदेवाचार्य यांचेकडून पंथीय दीक्षा घेतली. यांची बहीण कामाइसे ही नेहमी सोबत असे. यांना पाहून नागदेवाचार्य म्हणत, ''भावंडे ऐसे गुरुकुल जाणे: परि लोकु नको की'' केशिराज हे संस्कृतचे अभ्यासक असल्याने संस्कृतमध्ये लिहीत असत. त्यामुळे एकदा नागदेवाचार्य त्यांना म्हणाले, ''पंडित: केशवया: तुमचा अस्मात स्कमात मी नेणे गा: मज श्रीचक्रधरे निरूपिली मऱ्हाही: तियांचि पुस:'' असे म्हणताच केसोबासांनी महानुभावीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्माला अनुसरून सूत्रपाठ ग्रंथाची निर्मिती केली. महानुभाव संप्रदायाचे तत्वज्ञान या सूत्रपाठावरच आधारित आहे. या पंथाचा हा आधारभूत ग्रंथ आहे. सूत्रपाठाच्या आधारावरच पुढील काळात अनेकांनी ग्रंथ रचना तयार केली. यातील सूत्रे महत्त्वाचे विचार सांगतात. त्यामुळे ते वाचकांना भावतात. स्वदेश सोडून विरक्त होऊन जीव-जीवित परमेश्वरास हा चक्रधरांनी दिलेला उपदेश या सूत्रातून दिसतो. केसोबासांनी एकूण सूत्रांपैकी स्वत: निवडलेली ७८२, परशुरामाचे २४०, रामेश्वराचे २१८ आणि पंचकृष्ण व पंचनाम यांची १५ अशी एकूण १२५५ सूत्रे मांडली आहेत. या सूत्रातून अलंकारिकता नाही. साध्या सोप्या भाषेत त्याची मांडणी केली आहे. या सूत्रांचा परिणाम वाचकांच्या मनावर खोलपर्यंत होतो. एकूण सूत्रांपैकी ५४४ सूत्रे पंथात फार महत्त्वाची मानली गेली आहेत. यातील काही सूत्रे पुढीलप्रमाणे पाहता येतील.

१) ''घर न निवडीत भिक्षा कीजे।। वोळखते यायेया घरा न वचावे: तोरणमंडाचेया घरा न वचावे।।''

२) ''जेविता आवडी गोडी न होआवी प्राणासी आहारू दे यावा: इंद्रियांसि नेदावा।।''

३) ''एक दोनि वेळा याते आठवीजे: परि बंध्यु दिवस जावो नेदिजे।।''

४) ''खरूज खाजवीना: तो विरक्तू।।''

५) ''जोचि अवसरू विषया: तोचि ब्रह्म विद्ये:''

६) ''जे जैसे असे ते तैसे जाणिजे: ते ज्ञान:''

७) ''संसार भाणिजे हा दीर्घ स्वप्नू गा:''

८) ''तुमचे नि मुंगी रांड न होआवी:''

९) ''परम प्रीती कीजे: परि विशिष्ट बुद्धी नकीजो:''

१०) ''अन्य वार्तेपसि निद्रा चांग: वरि निद्रा की जे: परी अन्य वार्ता न कीजे:''

११) ''ज्ञानेविण वैराग्य ते काइ करावे बापेया:''

१२) ''धड तुटले यांनी जीवे परमेश्वराते न सोडावे:''

१३) ''भोगस्थानी न बैसावे: लेपाचा देऊळी न बैसावे: फलतेया फुल तेया वृक्षाखाली न बैसावे।।''

१४) ''एकु देवो: एकु धर्म: तया परस्परे परमप्रीति होआवी की।।''

अशा अनेक सूत्रातून चक्रधर स्वामीचे तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते. एक एक सूत्र म्हणजे मंदिर असून ईश्वरी स्मरणाची मूर्ती आहे. प्रत्येक सूत्र दीप, शितल जलधार आहे. सूत्र हे धारदार शस्त्र असून मनातील विकारांचे बंड मोडून काढण्याचा मोक्षमार्ग आहे. पारमार्थिक निष्ठा, तात्त्विक भाषामुळे ही प्रभावी ठरतात. अल्पक्षरत्व हे त्याचे वैशिष्ट्य आहे. लहान लहान वाक्यातून ज्ञान भरले आहे. यातील एक एक सूत्र म्हणजे प्रभावी औषधी मात्रा आहे. असे मत अ. ना. देशपांडे यांनी काढले आहे.

### २.४.४ दृष्टांतपाठ:

केसोबासांचा दुसरा ग्रंथ म्हणजे दृष्टांतपाठ हा होय. हा ग्रंथ इ.स. १२८८ मध्ये निर्माण झालेला आहे. यात एकूण ११४ दृष्टांत आहेत. या दृष्टांतपाठात चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी शास्त्रोक्त पद्धतीने केली आहे. त्यामुळे शं. गो. तुळपुळे याला 'उद्धरणसिद्धांता' वरील जणू एक उपनिषदच असल्याचे म्हटले आहे. श्री चक्रधर हे लोकांना तत्त्वज्ञान सांगताना दृष्टांत देऊन सोपे करून सांगत असत. प्रत्येक दृष्टांत म्हणजे एक उपदेश कथाच आहे. चक्रधर स्वामींचे एक सूत्र निवडून केसोबांनी दृष्टांत निवडले आणि त्या दृष्टांतातून सांगितलेले तत्त्व द्राष्टांतिक याने जोडले. प्रत्येक दृष्टांत ३ भागात विभागला आहे. पहिल्यांदा चक्रधरांचे सूत्र, नंतर सूत्रानुरूप दृष्टांत व शेवटी दृष्टांतातून पारमार्थिक असे काढलेले निष्कर्ष म्हणजेच द्राष्टांतिक होय. यातील सूत्रे व दृष्टांत हे चक्रधरांचे (इ.स. १२७६ पर्यंतची शके ११९८) आहेत. तर दार्ष्टांतिक हे (इ.स. १२८० शके १२०२ म्हणजे

चक्रधरांच्या नंतर) केसोबासांनी स्वत: लिहिले आहेत. एक दृष्टांत म्हणजे एक छोटीशी बोधकथाच आहे. श्रीचक्रधरांनी पूर्वार्धात व उत्तरार्धात हे दृष्टांत शके ११९० ते निर्याणापर्यंत सांगितले आहेत. काही दृष्टांत उदाहरणादाखल पहाता येईल.

१) दृष्टांत हत्तीचा (मूळ दृष्टांत क्रमांक ४३)

सूत्र : जो जे हो औनि असे: तो तेचि बोले।। (आ.२००)

अनंतशक्ति परमेश्वर सकळांसिही विषयव्यवस्था करीति।। (वि.२२३)

**दृष्टांत :** ''गावां हस्ति आला: तेथ जात्यंध हस्ति पाहों गेले: एके पावो देखीला: एक सोंड देखीली: एके कानु देखीला: एके पाठी देखीली: एके पोट देखीले: एके पूंस देखीले: मग एकमेका संवादति: आरे तुवां हस्ति देखीला: पावो देखीला तो म्हणे हस्ति खांबासारीखा सोंड देखीली तो म्हणे हस्ती मुसळासारीखा: कानु देखिला तो म्हणे हस्ति सुपासारीखा: पाठि देखीली तो म्हणे हस्ती कोथळेयासारीया । पूंस देखीले तो म्हणे हस्ती खराटे यासारीखा: ऐसे एकमेकां उरोधीति । तयांमध्ये डोळसु असे तो म्हणे हा हस्तीचा एकु एकु अवएयु होए: परि हस्ति नव्हे । ऐसा अवएवीं युक्त तो हस्ति।।''

**द्राष्टांतिक :** ''तैंसे जयासि जे शक्ति प्रकाशळी असे तो तीए शक्तीतें परमेश्वरू म्हणे ज्ञानिया असे तो म्हणे हे ईश्वराची एकि एकि शक्ति होय: परी परमेश्वरू नव्हे: ऐसा शक्तीयुक्त तो परमेश्वरू ।।''

**२) दृष्टांत शरणागताचा (मूळ दृष्टांत क्र. ११२) :**

**सूत्र :** परमेश्वरू ज्ञानियासी अनिष्टनिवृत्ती करीति: (वि.मा.२०१)

**दृष्टांत :** ''कव्हणी शरणागत मरणाभेण रायासि शरण रीगे:

रावो तयाति पाठीसी घाली: मरणेसि राखे परिराज्य नेदी: राज्य ते पुत्रासीचि दे।।''

**द्राष्टांतिक :** तैसे परमेश्वरू सकळ देवता मळ कर्मापासौनि वेगळा करीति: परिराज्य ते भक्तासीचि देति।।

असे अनेक दृष्टांत आहेत की जे मनाला भावतात. मार्मिक शब्दरचेनमुळे ते सहजपणे समजतात. या दृष्टांतपाठाविषयी अ. ना. देशपांडे म्हणतात, ''प्रत्येक दृष्टान्तामध्ये श्री चक्रधरांची जिवंत वाणी आणि केसोबासांची सुसंस्कारित भाषासरणी यांचा संयोग झालेला आहे. या रचनेकडे पाहून असे वाटते की, प्रत्येक दृष्टांतातले सूत्र हे जणू श्री चक्रधरांच्या वाणीचे उगमस्थान आहे. तेथून निघून दृष्टांतात ही वाणीरूपी सरिता वाहात वाहात विस्तार पावलेली आहे. आणि शेवटी केसोबासांनी बांधून काढलेल्या तात्पर्यरूपी सुरेख घाटात ती शांत व स्थिर झालेली आहे.'' (पृष्ठ ४२०, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला)

वरील विधानाचा विचार करता केसोबासांच्या द्राष्टांतिकांवरून तेराव्या शतकातील मराठी गद्याचा आपणास परिचय होतो. छोटी छोटी वाक्ये वाचत असताना ते चित्र डोळ्यासमोर उभे राहते. वाक्यातील प्रत्येक शब्द परिणामकारक आहे. वाक्यरचना वेधक व ठसठशीत आहे. यात केलेले वर्णन रेखीव दिसते. प्राचीन मराठी

गद्याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे दृष्टांतपाठ होय. या ग्रंथातून बाराव्या व तेराव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक जीवनावर प्रकाश पडतो यात शंका नाही.

**२.४.५ स्मृतिस्थळ :** नागदेवाचार्य हे पुरी (हल्लीचे पांढरी, जि. बीड, मराठवाडा) येथील महादेवभट व आबाइसा यांचा मुलगा होय. यांची पत्नी गंगाइसा ही आहे. श्री. चक्रधर स्वामींकडून श्रीनगर (सिन्नर) येथे नागदेवाचार्य यांनी पंथाची दीक्षा घेतली. काही काळ श्री गोविंदप्रभूंची सेवा केली. श्री चक्रधर स्वामी यांनी उत्तरापंथे गमन केले आणि नंतरच्या काळात महानुभाव संप्रदायाचे सर्व नेतृत्व नागदेवाचार्य यांचेकडे आले. लीळाचरित्रात ज्याप्रमाणे श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळा (आठवणी) येतात. त्याच पद्धतीने 'स्मृतिस्थळ' या चरित्रग्रंथात नागदेवाचार्यांच्या 'स्मृती' एकत्रित केल्या आहेत. या ग्रंथाचा उल्लेख 'नागदेवाचार्यचरित्र' असाही करतात. श्री चक्रधरांच्या वचनांना श्रुती तर नागदेवाचार्यांच्या वचनांना 'स्मृती' म्हणतात. स्मृतिस्थळ हा ग्रंथ इ.स. १३१३ – (शके १२३५) च्या काळात म्हणजेच नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर निर्माण झाला आहे. या ग्रंथाचा लेखक कोणी एक नसून अनेकांच्या संकलनातून हा ग्रंथ तयार झाला आहे. असे असले तरी नरेंद्र व परसराम हे मूळ लेखक आणि मालोबास व गुर्जर हे त्या ग्रंथाचे संस्कारात करणारे आहेत असे सांगितले जाते. या स्मृतिस्थळात एकूण २६१ स्मृतींचे संकलन केले आहे. नागदेवाचार्य यांनी प्रत्यक्षात ग्रंथलेखन केलेले नाही पण श्री चक्रधर स्वामींच्या नंतर पंथाचा प्रसार व लेखकांना लेखन करण्यासाठी प्रेरणा देण्याचे कार्य नागदेवाचार्य यांनी केले. त्यामुळे त्यांना 'ग्रंथकारांचा ग्रंथकार' असे मानले जाते. या ग्रंथातून लक्ष्मीधर भट केसोबास, म्हाइंभट या ग्रंथ लेखकांची माहिती मिळते.

श्री चक्रधर स्वामी यांच्या निर्याणानंतर नागदेवाचार्य व सर्व शिष्यांची दयनीय अवस्था होते. चक्रधरांच्या आठवणीने ते व्याकूळ होतात. याचे चित्रण काही आठवणीतून होताना दिसते. श्री चक्रधर स्वामींनी भिंतीवर टाकलेली पिचकारीची आठवण होताच नागदेवाचार्य ती पिचकारी जीभ खरडेपर्यंत चाटतात. काहीवेळ ते वेड्यासारखे हातवारे करून बोलू लागतात. त्यावेळी महदाईसेने त्यांची समजून काढली ती म्हणते, '' मग माहादाइसी म्हणितले: नागदेवा: गोसावियांपासि चाला जावो। भटोबासी म्हणितले: 'के असति गोसावी: माहादाइसी म्हणितले' हे नव्हेति रूधि पुरी: श्रीप्रभु गोसावी बोलाऊ पाठवीले असे:'' भटोबासी म्हणितले: 'नेणो मा तुझा श्रीप्रभु: माझा देवो नो श्रीचक्रधरू ओ: तंव माहादाइसी म्हणितले:' नागदेवा: तू ते गोसावी श्री प्रभूसि नीरोविलें असे की: आणि मज तुज नीरोविलें असे की: आणि मज तुज नीरोविलें असे की : चाल: म्हणौनि पाटकुळीए वाऊनि नीगाली।। (स्मृति ३) अशी आठवण सांगितली आहे. प्रत्यक्षात ज्यावेळी शिष्यांना भिक्षा कमी मिळू लागते त्याप्रसंगी नागदेवाचार्य अस्वस्थ होतात आणि म्हणतात, ''मज म्हातारदाम आला असे तो विनयोगास: आजिलागौनि माझी एकि भिक्षा घेयावी'' अशी शिष्यांना विनंती करतात. चक्रधर स्वामींच्या नंतर नागदेवाचार्य ही एकच व्यक्ती मोठी होऊन गेली. अत्यंत साध्या व मोजक्या शब्दांच्या मांडणीतून त्या काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, भौगोलिक आणि साहित्यविषयक परिस्थितीचे चित्रण स्मृतिस्थळातून झाले आहे. या स्मृतिस्थळातून एक निष्ठावान व्यक्तीचे चरित्र आले आहे. सामाजिक आणि वाङ्मयीन दृष्टीने या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अशा या नागदेवाचार्यांनी श्री गोविंदप्रभूंच्या निधनानंतर मराठवाड्यातील प्राचीन क्षेत्र मुदगलजवळ निंब (लिंबे, जि. परभणी) येथे आपला देह ठेवला.

### २.४.६ मूर्तिप्रकाश :

'मूर्तिप्रकाश' या ग्रंथाची निर्मिती केसोबासांनी इ.स. १२८९ (शके १२११) मध्ये केली. चक्रधरांचा सहवास केसोबासांना खूप काळ मिळाला होता. या ग्रंथांनी ओवीची संख्या तीन हजारावर असून श्री चक्रधर स्वामीच्या मूर्तीचे वर्णन ओवींच्या माध्यमातून केले आहे. केसांबासांच्या या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखनात 'अतिशयोक्ती' आलेली दिसते. या ग्रंथातून मूर्तिवर्णनाबरोबरच परमार्थ निरूपण हा हेतूही लेखकाचा दिसून येतो. अलंकार आणि विविध रसांनी नटलेली कलाकृती असल्यामुळे ही महानुभाव संप्रदायात वेगळी ठरते. या लेखनाविषयी कवी स्वत:च आत्मविश्वासपूर्वक म्हणता, ''तैसे चातुर्य सामर्थ्यास्तव: सकळ ग्रंथ भोगिती गर्व! जव मूर्तिप्रकाशाचे भाव: डोळा न देखती।। तवचि सरिताचे गडगर्जन: जव समुद्रेसि नव्हे दरिसन। तैसे सकळ सीधांताचे वीचारण माझीया कवीतेपुढे'' स्वत:च्या लेखनाबद्दलचा आत्मविश्वास ठामपणे येथे मांडलेला दिसतो. पुढे केशिराजानी प्राकृत भाषा वापरून सर्वसामान्यासाठी लेखनप्रपंच केला. या प्राकृत भाषेविषयी कवीच्या मनात असलेला भाव महत्त्वाचा वाटतो. कवी म्हणतो, ''तऱ्ही प्राकृती सबदी रसाळी: दावीन परशास्त्राची नव्हाळी। सुमता करीत। दीवाळी: परमानंदाची।। दावीन देसीएचे बीक प्रबंधी तादात्म होती रसिक। जैसे परीमळे घोळीले पीयूख: जगा दर्लक्ष:''

या ग्रंथातील अर्थघनता, दिलेले दृष्टांत शब्दातील कोवळीकता इत्यादीमुळे हा ग्रंथ वाचत असताना ज्ञानेश्वरीची आठवण होते. ज्ञानेश्वरीतील काही भागातील मांडणीशी 'मूर्तीप्रकाश' या ग्रंथातील भाग मिळता जुळता आहे हेही दिसून येते.

**ब)**

### २.५ महानुभावीय पद्य वाङ्मय :

आतापर्यंत आपण महानुभाव संप्रदायातील गद्यग्रंथांचा परिचय करून घेतला. या संप्रदायात गद्य ग्रंथ जसे लिहिले गेले तसेच पद्य ग्रंथही लिहिले गेले. या ग्रंथांची निर्मिती ही इ.स. १२९२ (शके १२१४) ते इ.स. १३६३ (शके १२८५) या कालावधीमध्ये झालेली दिसते. या पद्य वाङ्मय निर्मितीलाच साती ग्रंथ असे म्हणतात. या ग्रंथांची निर्मिती 'ओवीबद्ध काव्यग्रंथ' अशा स्वरूपाची आहे. या ग्रंथांचे लेखक हे व्यासंगी पंडित असून काहींना राजदरबारी मान्यता होती. श्रीकृष्णाला पूर्ण परब्रम्ह परमेश्वराचा अवतार मानला होता. त्यामुळे श्रीकृष्णभक्ती ही या ग्रंथलेखनामागची भूमिका आहे. या सात ग्रंथातील एक ग्रंथ सोडला तर सहा ग्रंथकाव्ये हे कृष्णजीवनावर आधारित आहेत. यातील कृष्ण हे त्यांचे दैवत होते. पंचकृष्णापैकी श्री चक्रधर यांना एक मानले जायचे. या चक्रधरांचा सहवास साती ग्रंथांच्या लेखकांना लाभाला होता. ते साती ग्रंथ पुढील प्रमाणे दिसून येतात.

| अ.क्र. | ग्रंथनाम | ग्रंथकार | इ.स. काळ | शके काळ |
|---|---|---|---|---|
| १ | रूक्मिणी स्वयंवर | नरेंद्र | इ.स. १२९२ | शके. १२१४ |
| २ | शिशुपालवध | भास्करभट्ट बोरीकर | इ.स. १३१३ | शके. १२३५ |
| ३ | उद्धवगीता/एकादशस्कंध | भास्करभट्ट बोरीकर | इ.स. १३१४ | शके. १२३६ |
| ४ | वछाहरण | दामोदर पंडित | इ.स. १३१६ | शके. १२३८ |
| ५ | ज्ञानप्रबोध | पंडित विश्वनाथ | इ.स. १३३१ | शके. १२५३ |
| ६ | सह्याद्रिवर्णन | खळोव्यास | इ.स. १३३३ | शके. १२५५ |
| ७ | श्री ऋद्धिपुरवर्णन | नारायण पंडित | इ.स. १३६३ | शके. १२८५ |

**२.५.१ रूक्मिणी स्वयंवर (इ.स. १२९२/शके १२१४):**

रूक्मिणी स्वयंवर हा ग्रंथ प्रथमस्थानी येतो. या ग्रंथांचा लेखक नरेंद्र हा आहे. कवी नरेंद्र हा रामदेवराव यादव यांच्या दरबारी कवी होता. नरेंद्रच्या साल कवीने रामायण व नृसिंह कवीने नलोपाख्यान लिहिले. याबद्दल नरेंद्राने त्या दोघांची निर्भत्सना केले. याप्रसंगी दोघांनी नरेंद्रास श्रीकृष्ण कथेवर काव्यलेखन करण्यास सांगितले. यातून १८०० ओव्यांचे 'रूक्मिणी स्वयंवर' हे काव्य इ.स. १२९२ शेक १२१४ मध्ये लिहिले. हे काव्य रामदेवराव यादवाला इतके आवडले की तो त्या ग्रंथावर हक्क सांगू लागला. तो ग्रंथ त्याने स्वत:जवळच ठेवून घेतला. यासाठी यादव राजाने नरेंद्रास प्रत्येक ओवीस सोनटक्का देण्याचे कबूल केले. यावेळी रामदेवराव म्हणतो, ''यावरि राये म्हणतिले: या ग्रंथाचा अभंगु मज द्यावा: मी जेतुकीया ओवीया ते तेतुके सोनटक्के आणि चौथरीया आसु ओनाळणे घालीन:'' या अमिषाला नरेंद्र कवी बळी पडले नाहीत. आपण जर असे केले तर आपल्या कवीकुळास कलंक लागेल असे स्पष्ट सांगतात आणि परत येऊन एका रात्रीत जवळजवळ ९०० ओव्यांचा ग्रंथ (अपूर्ण) पुन्हा लिहून तो भटोबासांना देतात. आणि पंथाची दीक्षा घेतात. डॉ. कोलते यांनी मात्र या ग्रंथाची ओवीसंख्या ८७९ इतकी सांगितली आहे. या अपूर्ण राहिलेल्या ग्रंथाविषयी अ. ना. देशपांडे म्हणतात, ''अपूर्ण अवस्थेत सुद्धा ते वाचले असता असे नि:शंकपणे म्हणावेसे वाटते की हे काव्य म्हणजे महाराष्ट्र वाङ्मयकलारूपी वेलीला लागलेले, कधीही न कोमेजणारे, रसिक रूपी मधुपांचे वाळभ जडलेले असे एक डौलदार पुष्प आहे. किंबहुना असे म्हणू या की हे काव्य म्हणजे मराठी शारदेच्या अंगावर चढविलेले एक दिव्य लेणे आहे.'' (पृ. ४३, प्रा म.वा.इ., खंड १) यावरील मतावरून आपणास ग्रथांचे महत्त्व लक्षात येते.

'रूक्मिणी स्वयंवर' ग्रंथाच्या सुरूवातीस नरेंद्राने श्रीगणेशा व शारदा यांना वंदन केले आहे. आनंदप्राप्ती हे या काव्य निर्मितीमागील हेतू असावा, असे सांगितले जाते. नरेंद्राने, 'श्रीकृष्णाचा वर्णिता कीर्तिचंद्रु: चढविन सुखाचा समुद्र' अशी प्रतिज्ञा केली. या कृष्णकथन वाचनाने फलश्रुती होईल असेही कवीने खालील ओवीतून सांगितले आहे. ''तेयासी परमेश्वर भक्तीची चाडा ते ऐक तू हे कथा अमर गोड ते या काहीची नाही अवघड:

जन्म मरणाचे:'' नरेंद्र हा संस्कृत ज्ञानी होता. त्यामुळे संस्कृत महाकाव्याच्या आदर्शातूनच काव्यनिर्मिती झाली असावी. या काव्यातील वर्णनाविषयी अ. ना. देशपांडे लिहितात, ''वर्णनकलेच्या 'धनुकली' ने पिंजून पिंजून कवीने मात्र तो खूपच फुलविलेला आहे. काव्यात सर्वत्र वर्णनेच वर्णने आहेत. निरनिराळ्या देशीच्या राजांचे वर्णन, श्रीकृष्ण सौंदर्याचे वर्णन, रूक्मिणीच्या विरहावस्थेचे वर्णन, राधा-दामोदराचे वर्णन, अस्ताचलावरील सूर्याचे वर्णन, दिव्यांचे वर्णन, चंद्रोदयाचे वर्णन, विरहोपचारांचे वर्णन, वनोपवनाचे व त्यातील वसंतविलासाचे वर्णन, द्वारका नगरीचे वर्णन, तिच्या भोवतालच्या पोळीचे वर्णन! त्यामुळे रसिकाला कथारमणीचे दर्शन व्हावयाचे ते पल्लेदार वर्णनाचे हे सगळे झगझगीत पडदे बाजूला सारल्यानंतरच. या वर्णनाच्या फुलोऱ्याकडे पाहून कधी कधी असे वाटते की या काव्यातील कथावस्तूची अवस्था असंख्य चाहत्यांच्या गर्दीच्या मेळाव्यात गुदमरून गेलेली लोकप्रिय पुढाऱ्यासारखी झालेली आहे. सुदैवाने कवीचे कथासूत्रावर व त्याच्या प्रामाणबद्ध मांडणीवर लक्ष आहे. वर्णनातिरेकापायी रसभंग होईल याची त्याला जाणीव आहे. ''बहु बोलता अतिप्रसंगु: कथे होईल रसभंगु।।'' या शब्दात त्याचीही जाणीव एके ठिकाणी व्यक्तही झालेली आहे.''(पृष्ठ ४३७, प्रा. म.वा.इ., खंड १) या कथेत सुदेव रूक्मिणीचे पत्र घेऊन द्वारकेजवळ येतो. इथपर्यंतचा भाग येतो. वरील विधानातून नरेंद्राने ग्रंथातून चित्रित केलेली माहिती समजते.

नरेंद्राने लेखन करताना रूक्मिणी ही मूर्तिमंत सौंदर्यदेवता भूतलावर आली आहे असे वाटते. त्यामुळे रसिकता आणि उदात्तता यांचे मिश्रण दिसते. सौंदर्यवर्णनात दाखविलेला संयम कौतुकास्पद आहे. त्यामुळे रा. श्री. जोग यांनी या काव्यास 'सदभिरूचीचा एक उत्तम आदर्श' अशी पदवी बहाल केली आहे. अतिशयोक्ती ही या लेखनातील शैलीचा विशेष आहे. त्यामुळे येथे काही प्रसंगी औचित्यहानी होते. ''उत्प्रेक्षा हा तिचा अलंकार आहे. या कल्पना विलासाची एक लहानशी छटा म्हणून आकाशातील नक्षत्रांचे पुढील उत्प्रेक्षात्मक वर्णन पाहू.''

''तंव गगनी नक्षत्रें उमटत: जैसी आकाशी घाटौलि फुलत
ना तरि मेघ वीणि साधित: मोतियांची
की पाख-धुनी करीती चकोवे: ते सैग मंदाकिनीचे थेंब गोरे
की दिसति बाणलिंगे ऐतारे: गगन-नर्मदेची!''

रूक्मिणीचे विरहोपचार सुरू आहेत. त्यांच्या तयारीतला हा एक भाग पहा: अर्धचंद्राच्या खलात चांदण्याचा पारा आणि नक्षत्राची मोत्ये खलून काढावयाची आहेत! ''खली अर्धचंद्राचा: पारजु शोधुनि चांदिणेयांचा मारू केला मोतियांचा: नक्षेत्राचेया.''

कधी या कवीच्या अत्युक्तीने साधेच पण ह्रदयंगम आणि भावपूर्ण रूप धारण केलेले आहे. विरहव्यथित रूक्मिणी झोपली आहे. डावा हात उशाखाली आहे आणि उजवा हात ह्रदयावर आहे. का? ह्रदयात ठेवलेला देव निसटून जाईल ना?

''डावा हातु उसिया घातला: उजवा हृदयावरि ठेवला

जैसा जिवेंसी देवो धरिला: निसटैल म्हणौनि''

एकदा आणि फक्त एकदाच अत्युक्ति विलासात रमता रमता या कवीच्या प्रतिभा रमणीचा औचित्याचा पदर प्रमाणाबाहेर जास्त ढळलेला आहे.

वरील काव्य ओवीतून कवीनी वेगवेगळ्या विषयावर मार्मिकपणे मांडणी केलेली आहे.

रूक्मिणीच्या विरह वर्णनात कल्पनरम्यता, भावोत्कटता प्रीती आणि भक्ती अशा अनेक छटा दिसतात. नरेंद्र स्वयंपूर्ण प्रतिमेचा कवी असल्याने प्रथम दर्जाचे आख्यान काव्य लिहिले. इतकेच नव्हे तर मूळ कथेत नसलेली किन्नराची उपकथा ही स्वयंनिर्मितीने नरेंद्राने तयार करून त्यात घातली आहे. नरेंद्रला संगिताचे ज्ञानही होते. म्हणून ''महाकवित्त्वाचे सामर्थ्य असलेला तेराव्या शतकातला मराठीतला एक प्रतिभाशाली कवी'' असा गौरव अ. ना. देशपांडे यांनी केला आहे. 'रूक्मिणी स्वयंवर' काव्यातील विशेष सांगताना आणि मराठी भाषेचा अभिमान सांगताना पुढील ओवी लिहिल्या आहेत.

''नरेंद्र हा केसोबासांप्रमाणे प्रबंध कवी आहे आणि प्रबंध काव्यातले ते तीन विशेष नरेंद्राच्याही काव्यात अवतरलेले आहेत. १) नरेंद्राला महाकवित्वाची ओढ आहे. ज्यांनी देवाला जाणले व जे देवाला प्रिय झाले अशा महाकवींबद्दल त्याला आदर आहे.''ते महाकवी मानिले: जे जाणौनि देवा वालभैले'' सर्गबद्धतेची बाह्य लक्षण नसले तरी त्याच्या काव्यरचनेचा एकंदर घाट महाकाव्य रचनेच्या वळणावर गेलेला आहे.'' २) त्याची प्रतिक्षा अत्युक्तिप्रिय आहे. ३) ''तैसे देवाचा गुणी विसंवता मि बियाळ बोले उसणता.'' असे म्हणून कवीने आपली कवित्वविषयक रंकवृत्ती बोलून दाखविलेली आहे पण त्याचबरोबर, ''श्री चक्रधराचा वाणिता कीर्ति - चंदु: चढवीन सुखाचा समुद्रु जळसेन करीन म्हणे नरींद्रु: सभेचे लोक.''अशी आत्मविकासाची ऊर्मीही त्याच्या लेखणीने प्रकट केलेली आहे.

मराठीच्या अभिमानाचे स्फुरणाने भारावलेल्या या ओव्या पाहा.

''तैसे आइकतां श्रीकृष्णचरित्र: होय सकल सुखाचे छेत्र वरि जोडे ब्रम्ह-सुख पवित्र: ते मऱ्हाटी बौलोन।।
जिथे भाषेचिये रसवृत्ती: सा भाषांचे कुपेकीजेति निगुती ते मऱ्हाटी कवण जाणे निरूती: जे रसांचे जीवन।। ते
मऱ्हाटे बोल रसिक: वरि दावीन देशियेचे बिक म्हणैन सव्याख्यान श्लोक: मिसें वोवियेचेनि।।''

येथे रस हा शब्दनिष्ठ असल्याचा जो विचार कवीने सूचित केलेला आहे तो मराठीच्या साहित्यशास्त्राच्या अभ्यासकांनी लक्षात घेण्यासारखा आहे.

रूक्मिणी स्वयंवर या ग्रंथात श्रीकृष्णाशी निगडित कथा असल्याने पंथाचे तत्त्वज्ञान कोठेही येत नाही. या ग्रंथातील विशेष गोष्टींविषयी ल. रा. नासिराबादकर लिहितात. ''पंथप्रवेशापूर्वी नरेंद्राने हे काव्य लिहिल्याची एक साक्ष म्हणजे त्यातील विदग्धता. अलंकारिकतेने नटलेले कल्पना सौंदर्य, भावमाधुर्य, ज्ञानेश्वरकुलीन शैली, सौंदर्यासक्त वृत्ती, आत्मविश्वास, विनय आणि श्रीकृष्णकथेवरील प्रेम अशा अनेकविध वैशिष्ट्यांचा आविष्कार

या कवितेत झाला असल्यामुळे हे काव्य 'मराठी शारदेच्या अंगावर चढविलेले एक दिव्य लेणे' ठरले आहे. नरेंद्राची भूमिका भक्तापेक्षाही रसिक कवीचीच अधिक आहे. हे त्यांच्या सौंदर्यप्रधान वृत्तीतून व वर्णनातून स्पष्टच होते.'' (पृ. ३१, प्रा. म.वा.इ.)

वरील मताचा विचार करता रूक्मिणी स्वयंवर या ग्रंथाचे महत्त्व अधोरेखित होते. याच ग्रंथाविषयी श. दा. पेंडसे यांनी ''नरेंद्र हा महाराष्ट्राचा पहिल्या दर्जाचा प्रतिभासंपन्न पहिला प्रेमकवी'' असल्याचे मत व्यक्त केले आहे. कारण यात श्रीकृष्ण व रूक्मिणी यांचे प्रेमवर्णन येते. प्रसिद्ध अभ्यासक रा. चिं. ढेरे यांनी कवी नरेंद्र यास महानुभावीय सारस्वतातील 'कवींद्र' अशी पदवी बहाल करून ते पुढे म्हणतात, ''जीवनाचा व्यापक अनुभव डोळसपणे घेऊन त्याचा गाभा शोधून पाहणारी, जीवनाचे वेध घेऊ शकणारी दृष्टी जर नरेंद्रास लाभली असती, तर त्याने एकीकडे कालिदासाशी पैजा मारल्या असत्या आणि दुसरीकडे भक्तिप्रवणतेमुळे ज्ञानेश्वरांशी जवळीक साधली असती.'' (पृ. ४६, रा. चिं. ढेरे, संपा. नरेंद्र विरचित रूक्मिणी स्वयंवर, प्रस्तावना)

या मतातून कवी नरेंद्राच्या लेखणीतील सामर्थ्यता उत्कृष्टपणे होती. हेच सिद्ध होते. नरेंद्र हा तेराव्या शतकातील प्रतिभासंपन्न कथाकवी आहे, हे यावरून लक्षात येते.

**२.५.२ शिशुपालवध :**

भास्करभट्ट बोरीकर हे महानुभाव पंथातील तिसरे आचार्य होते. यांच्याकडे पंथनिष्ठा प्रज्ञा आणि प्रतिभा होती. ते विद्वान होते. यांच्या नावावर शिशुपालवध, उद्धवगीता व पूजावसर ही तीन काव्ये आहेत. ही तीनही काव्ये त्यांनी ज्ञानेश्वरीनंतर इ.स. १३०८ नंतर लिहिली आहेत. त्यांच्या वाणीत रसाळपणा होता. ते बोलू लागले की आसमंतातले लोक सुद्धा एकाग्रतेने ऐकत असत. भास्करभट्ट हे रसाळ वाणीचे, दिसायला रूपाने सुंदर, चांगले वादपटू, पंथ तत्त्वज्ञानाचा व्यासंगी विद्वान आणि शीघ्रकवी होते. असे अनेक गुणवैशिष्ट्ये त्यांच्या व्यक्तिमत्वात दिसून येतात. काव्यदृष्ट्या सरस असणारा ग्रंथ म्हणजे शिशुपालवध हा त्यांनी इ.स. १३१३ (शके १२३५) मध्ये लिहिला. हा ग्रंथ लिहिताना माघ कवीचे संस्कृतमधील 'शिशुपालवध' हे त्यांच्या वाचनात आले होते. असे अभ्यासकांचे मत आहे. शिशुपालवध या काव्यामुळे यांना प्रतिभासंपन्न कवी म्हणून प्रसिद्धी मिळाली. त्यांच्या लेखनावर नरेंद्रच्या रूक्मिणी स्वयंवराची छाप पडलेली दिसते. कारण यातील नारदागमण, द्वारकावर्णन, ऋतुवर्णन, जलक्रीडाकथन युद्धवर्णन याप्रसंगांची मांडणी दोन्हीही सारखीच दिसते.

या काव्याविषयी वि. भि. कोलते म्हणतात,''भास्करभट्टाने आपले काव्य लिहिण्यापूर्वी माघाच्या शिशुपालवधाचा कसून अभ्यास केला होता. इतकेच नव्हे तर ते काव्य समोर ठेवून, त्यातील प्रसंगाप्रमाणेच आपल्या कथेसह मांडणी देऊन त्याने प्रस्तुत काव्य रचले.'' (भास्करभट बोरीकर, १९३५, पृष्ठ ९७)

असे असले तरी त्यांनी अनेक वर्णनात कल्पनाविलास आणि अलंकार वैभव स्वत:च्या प्रतिभा शक्तीवर स्वतंत्रपणे लिहिले आहे.

''मज नाही मतीचा विकास: केवी वानू राणा परेशू

पर जीवा होतसे उलासू: स्तुती लागी.''

या ओवीतून बोरीकर यांची कृष्णभक्तीची भावना आणि विनयशीलता स्पष्ट होते. या ग्रंथात शृंगार सक्तीचे अधिक वर्णन येत असून यातील ओवीसंख्या १०८७ इतकी आहे. यातील फक्त १०० ओव्यातून शिशुपालवध वर्णन चित्रित झाले आहे. राहिलेल्या ओव्यातून श्रीकृष्ण-रूक्मिणी यांचा विरह यावर लिहिल्या आहेत. या विरहवर्णनावर जवळजवळ ८५० ओव्या लिहिल्या आहेत. या चित्रणामुळे प्रत्यक्षात मात्र शृंगाराचा अत्यंत वापर केल्याने जीवनातील आसक्ती वाढल्याचे दिसते. 'मुक्तिवतिलेची दूतिका' याला छेद बसतो.

शिशुपालवध ग्रंथात श्रीकृष्ण रूक्मिणी यांचा एकांतवास, प्रणयाचे वर्णन, विरहावस्था, प्रेमकलह व जलक्रीडेचे प्रसंग वर्णन केले आहेत. यातील काही वर्णनात कामोद्दीपक वर्णनेही दिसतात. म्हणून पंथातील बाईदेवव्यासांनी हा ग्रंथ पाहून ''ग्रंथु निका जाला असे! परि निवृत्ता जोगा नव्हेचि: हा शृंगारिया प्रवृत्ताजोग जाला असे'' असे परखड मत मांडले आहे. तर अ. ना. देशपांडे यांनी, ''बाणा विरक्त जोगिणीचा, पण ओठावर तरंगत असलेला आलापित शब्दसमूह मात्र शृंगारगीताचा अशी तिची अवस्था झाली.'' (पृ. ४५०, प्रा. म.वा.इ.खंड.१) असे म्हणून शिशुपाल वधास 'प्रबंधकाव्य' असे म्हंटले आहे. या ग्रंथात शृंगार रसाचा अधिक वापर झाला आहे.

शिशुपालवधमधून श्रीकृष्णवर्णन, रूक्मिणी विरहोपचार वर्णन यांच्या मांडणीत सुंदर कल्पना विलास आढळतो. यात भक्तीचा धागा आहे. उद्यान वर्णनात आणि वसंत ग्रीष्मादी ऋतूंच्या वर्णनात कल्पनाविलासाचे, रम्यतेचे, स्वरूप पहावयास मिळते. कल्पनारम्यता आणि अलंकारांचा वापर यात कवी रमताना दिसतो. याविषयी प्र.न. जोशी म्हणतात, ''रातोत्पालाच्या पाकळ्यांसारखे त्याचे सुंदर चरणकमळ, इंद्रनील पाचासारखी त्याची दिव्य कांती, केळीच्या गाभ्यासारख्या त्याच्या मांड्या, कैवल्यसरोवरासारखे त्याचे वक्षस्थळ, रविमंडळाभवतीच्या तारांगणासारखे कौस्तुभाजवळचे ते एकावळीचे तेज:पुंज मोती, मुदियाचे हिरे व त्याचा चंद्रबिंबतुल्य प्रसन्न मुखचंद्रमा, पोवळ्यांच्या प्रभेने शोभलेल्या चंद्रबिंबासारखे त्याचे मधुर स्मित....'' (पृष्ठ १४९, म.वा.वि.इ.)

कवीने रूक्मिणी विरहोपचाराच्या निमित्ताने धारागृहाचे वर्णन उत्कृष्टपणे चित्रित केले आहे ते पुढील ओवीतून दिसून येते.

''ते धारागृह नवल: वणितां विरहोपचार ठाकैल
तऱ्हीं आईकतु रसाळ: उभती ते
कस्तुरीएचा पल्हो चीवडूनि: कमळांचे तीथरें रचुनि
कुमोदांचे पराग कालवूनि: गोटि पीटिली
अशोकांचीया भीती: कर्णिकरांची चित्रे उमटती
गवाक्षें बाहाकाति: मदन मोगरेयाची
चंद्र बिंबाचेनि पाडे: दिसत असे चोखडे
अरूवार घडले दळवाडे: कापूरकेळिचे.''

या ग्रंथाचा समारोप करताना कवीने स्वत:ची काव्य लिहिण्यामागील भूमिका पुढील ओवीतून स्पष्ट केली आहे.

''हा शिशुपाल वधु: आइकतां तुटे भवबंधु
जीव होए प्रबोधु: परमतत्त्वाचा.''

अशी भूमिका स्पष्ट करून कवीने या ग्रंथाला 'त्रिपथा' असे सुरुवातीलाच म्हटले आहे. कारण हे काव्य वाहिनी भक्ती-विरक्ती, शृंगारसक्ती आणि वीरवृत्ती या तीन भिन्न वाटांनी जाणारे आहे. मुख्य प्रवाह हा शृंगार वाटेचाच आहे. एकूणच शिशुपाल या ग्रंथातून महानुभावीय तत्त्वज्ञानापेक्षा पांडित्य, रसिकता आणि अत्यंतिक शृंगारासक्ती याचे दर्शन अधिक घडते. मराठीत भक्तीला रसपदवी देणारा असा हा भास्कर भट्ट बोरीकर हा पहिला कवी आहे.

### २.५.३ उद्धवगीता/एकादशस्कंध :

भास्करभट्ट बोरीकरांनी बाईदेवव्यासांच्या 'शिशुपालवध' या ग्रंथातील अभिप्रायानंतर पूर्णपणे निवृत्तीपर असा ग्रंथ लिहिला तो म्हणजे 'उद्धवगीता' किंवा 'एकादशस्कंध' हा होय. हा ग्रंथ इ.स. १३१४ (शके १२३६) रोजी लिहिला. मूळ एकादश स्कंधात १३६७ श्लोक आहेत तर उद्धवगीतेत फक्त ८२७ ओव्या आहेत. व्यासांच्या भागवताच्या एकादशस्कंधावर मराठीत टीकापर असा 'उद्धवगीता' हा पहिला ग्रंथ लिहिला आहे. मराठीतील हे पहिले टीकात्मक भाष्य असल्याने याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शांतरसात्मक भाष्य असल्याने याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शांतरसात्मक असा हा ओवीप्रबंध आहे. श्रीकृष्णाने उद्धवास केलेला उपदेश भास्कर भट्टाने ८२७ ओव्यात सांगितला. भास्कर भट्टाला आपल्या लेखनाविषयी पूर्णपणे आत्मविश्वास आहे. ते म्हणतात, '' माझ्या वेधवंती बोलांनी मी श्रीकृष्ण वर्णन करू लागलो की ते ऐकण्यासाठी श्रोते आपण होऊन येतील.'' हा त्यांचा आत्मविश्वास पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त होतो.

''पिलिलेया चंद्रबिंब: सुटति अमृतधारांचे कदंब
तैसे फुटति तुंब: नवरसांचे
एसिया कवितालते: ब्रम्हविद्येची फुले दिसति फांकते
तरि पसरोनि हाते: कवण न तोडी.''

या काव्यास स्वत: लेखकाने प्रबंधकाव्य असे म्हटले आहे. उद्धवगीतेत सांगितलेले तत्त्वज्ञान हे सिद्धांतसूत्रपाठाला अनुसरून सांगितले आहे. आपल्या या लेखनाच्या आकर्षण शक्तीबद्दल कवीला आत्मविश्वास आहे. तो म्हणतो,

''काइ भवरासि कमळी: काही मानिले हातातली
कि कोकिळा रसाळी: नेसो दिधले

ना तरि मेघमंडळे: काई चातक लांचाविले

कि चंद्र मुळ पाठविले: चकोरांसि?''

या कवितालतेवर ब्रम्हविद्येची फुले फुललेली आहेत. ही फुले तोडायला कोण बरे हात पुढे करणार नाही? या साहित्याच्या देव्हाऱ्यात प्रत्यक्ष शांतरस अवतरविणारी माझी वाणी कोण बरे ऐकणार नाही? माझी कविता कोकिळा, किन्नर आणि कलहंस यांना कमीपणा आणणारी आहे. मधुकराला ती रंगमाधुर्य शिकविणारी आहे. माझ्या कवितेतील पदप्रमेयांची गुंफण ही सुंदर स्त्रीच्या भुजबंधापेक्षा जास्त आकर्षक आहे असे तो म्हणतो.

शिशुपालवधा प्रमाणेच उद्धवगीतेतही कवीच्या व्यक्तित्वाचा दुहेरी स्वरूपाचा पडसाद उमटला आहे. ब्रम्हविद्येबरोबर कामतत्त्व ही कवीला पाहिजे आहे. त्यामुळे शांतरसाचा अनुभव देणाऱ्या कथेत संधी मिळेल तेथे शृंगाररस निर्माण केला आहे. ऋष्यशृंगाच्या कथेच्या निमित्ताने ''म्हणौनिक प्रमदाचे गाणे वाणे: नाइकावें ध्यान परायणे'' असा उपदेश केला आहे. या कवीला शृंगाराची इतकी आवड आहे की श्रीकृष्ण व उद्धव यांच्या संवादात भक्तीला, विरक्तीला प्राधान्य आहे हे माहीत असूनसुद्धा हा संवाद 'ब्रम्हविद्येचा यौवनमद' आहे. असे त्याने म्हंटले आहे.

या ग्रंथात श्रीकृष्णाने भक्त चक्रवर्ती उद्धव वैराग्य, ज्ञान, भक्ती यांचे जे रहस्य सांगितले, मोक्षधर्माचा उपदेश केला त्याचे निरूपण उद्धवगीतेतून केले आहे. अवधूताने केलेल्या चोवीस गुरूंच्या वैशिष्ट्यांचे, वैराग्यपोषणाच्या दृष्टीचे वर्णन यात आले आहे. त्यागाचे अंजन घालून डोळ्यांवरील प्रवृत्तीचे पटल दूर करावयाची व ब्रम्हजिज्ञासा उत्पन्न होण्याची आवश्यकता पटविली आहे.

पुरूरव्याची कथा सांगत असताना कवीने स्त्रीची भरपूर निर्भत्सना केली आहे.

''हे पापाची उतरवेंठ: नरकाची राजवट

मुक्तिचे वज्रकपाट: कामिनि हे

दुर्गंधीचिये टांकशाले: अमेध्याचें पहिले मोप पडिले

तेया नांव जगी ठेवीलें: स्त्रि ऐसें.''

शांतरसाच्या दृष्टीने विचार करता उद्धवगीत फिकी आहे. काहीशी निष्प्रभच आहे. या गोष्टीला कवीची मनोभूमिका कारणीभूत आहे. शांतरसापेक्षा शृंगार रसाची मांडणी चांगली झाली आहे. उद्धवास श्रीकृष्णाच्या वियोगाने होणारे दु:ख कवीने प्रभावीपणे मांडले आहे. त्या मांडणीतील तीव्रता उत्कट प्रतीती येईल अशा पद्धतीने वर्णन केली आहे. उद्धवाची श्रीकृष्णावरील अपरंपार भक्ती तिचे अधिष्ठान या दु:खवर्णनाला मिळालेले असल्याने या वर्णनात भावस्निग्धता आली आहे. या उद्धवगीतेचा समारोप करताना भास्करभट्ट लिहितात,

''पाहुनी तेते प्रकरण: बोलिलें भक्ति ज्ञानलक्षण

तें पांतु विचक्षण: ग्रंथवेतो

एकादशेंसी सरिसी: भांजुनि साहित्ये देसी

मिया आवारू केले जगासि: ज्ञानामृताचे.''

उद्धवगीतेत लिहिलेले भक्तिज्ञानलक्षण हे आपण भागवतातील एकादशस्कंधातील प्रकरण पाहून लिहिली आहेत हे कवी सांगतो. या दोन्हीतील कल्पनास दृश्य दाखविता येते. उद्धवगीतेतील पुढील उदाहरण पाहता येते. ''जिव्हा क्वचित संदशति स्वदद्भिस्तद्वेदनायां कतमाय फ्युप्येता'' या ओळीतील विचारच प्रतिध्वनीत झाला आहे. असे थोडेफार सादृश्य जाणवत असले तरी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहता 'उद्धवगीतेची बैठक भागवताहून खूपच वेगळी दिसून येते. कवीने श्रीकृष्णोद्धवसंवादाचा उपयोग श्रीचक्रधराचे द्वैती तत्त्वज्ञान समजावून सांगण्याकरिता व अद्वैतमताचे खंडन करण्याकरिता केला आहे. पंथाच्या अभिमानाने मोठ्या उत्साहाने कवी द्वैताचे गीत म्हणत असताना मधूनच अद्वैताचा सूर त्यांच्या मुखातून येतो.'

श्रीकृष्णाच्या विरहाने उद्धवास झालेले दुःख उत्कटपणे भास्करभट्ट रेखाटतो. या ग्रंथाचा श्रोत्यांवरील परिणाम सांगताना भास्कर म्हणतो, ''या आईकता उद्धवगीता: प्रबोधु उपजे श्रोतियांचिया चित्ता परब्रम्हेसी होय सायोज्यता: म्हणे कवि भास्करू'' (८२७) अशा या उद्धवगीतेविषयी ल. रा. नासिराबादकर म्हणतात, ''मूळ भागवताच्या एकादशस्कंधाशी ताडून पाहता 'उद्धवगीता' बरीचशी फिकी वाटते. भास्कराचा पिंड हा रसिक कवीचा पिंड आहे. त्याला येथे वाव नसल्यामुळे आणि निवेदनाच्या ओघात मूळवृत्ती उफाळून आल्यामुळे अनेक ठिकाणी औचित्यहानी झालेली आढळते. शिशुपालवधातील शृंगारिक वर्णनाविषयी प्रायश्चित भास्करभट्टाला येथे नीटपणे घेता आले नाही. असेच म्हणावे लागते. उत्कृष्ट भावनाशीलता आणि चमत्कृतिजनक कल्पकता ही भास्कराच्या कवितेची खास वैशिष्ट्ये. भास्कर म्हणजे संस्कृत काव्यादर्श समोर ठेवून लेखन करणारा महानुभावीय पंडित कवी तो हाडाचा कवी आहे. तत्त्वज्ञ नव्हे.'' (पृष्ठ. ३९, प्रा. म.वा.इ)

एकूणच या ग्रंथाचा विचार करता सर्व सामग्री चांगली असूनही शांतरसाच्या आविष्काराच्या दृष्टीने हा ग्रंथ निष्प्रभ ठरला आहे. उद्धवाची कृष्णावरील भक्ती अधिष्ठान हे दुःख वर्णनात आल्याने भावस्निग्ध अशी आर्तता आली आहे. याचे कारण म्हणजे कवीची शृंगाराची आवड होय.

वरील रचनेशिवाय भास्करभटानी निर्वचनस्त्रोत्र, पूजावसर (२७ श्लोक), नरविलापस्तोत्र, अवताराष्टक गद्यचाली, श्रियाष्टक, जयाष्टक अशा विविध रचनांची निर्मिती केली आहे.

### २.५.४ वछाहरण :

वछाहरण हा ग्रंथ दामोदर पंडितांनी इ.स. १३१६ (शके १२३८) मध्ये लिहिला. या ग्रंथाला वत्साहरण असेही म्हणतात. भागवताच्या दशमस्कंधातील १२, १३, व १४ व्या अध्यायातील अघासुरवध व वत्साहरणाची कथा या कथेवर आधारित दामोदर पंडितांनी हे काव्य लिहिले. या काव्यात ५०३ ओव्या आहेत. दामोदर पंडित आणि केसोबास हे संस्कृतज्ज्ञ असून ते चांगले मित्र होते. एकमेकांच्या प्रेमापोटी त्यांनी एकमेकांच्या ग्रंथात मित्रांची नावे लिहिली आहेत. दामोदर पंडितांनी केशवराजु असा आपल्या मित्राचा वछाहरणाने अनेकवेळा उल्लेख केला आहे. तर केसोबासांनी दामोदर पंडितांच्या नावाचा उल्लेख 'रत्नमालास्तोत्र' या ग्रंथात केला आहे. दामोदर

पंडितांची पत्नी हिराईसा ही पहिल्यांदा महानुभाव झाली. काही वर्षांनी दामोदर पंडित पंथात आले. पंथात आल्यानंतर ते एक विद्वान, निष्ठावान, आणि मातब्बर शिष्य म्हणून सुपरिचित झाले. ते चांगले गात असत. पंथात गाण्यास बंदी असतानाही एक दिवस एकांतात ते गात बसले. हे नागदेवाचार्यांनी ऐकले आणि त्या भक्तिगीताचा त्यांच्यावर परिणाम झाला आणि त्यांनी गाण्यास अनुमती दिली ते म्हणतात,''पंडित आजिलागौनि तुज गीत गावया अनुज्ञा गा:'' यानंतर ते गाण्यास सुरुवात करतात.

पंथात श्रीकृष्ण ही परमप्रितीची देवता मानली जाते. लहानपणी श्रीकृष्णाने अधासुराचा केलेला वध आणि कृष्णाच्या अवताराची सत्वता पारखण्यासाठी ब्रम्हदेवाने गोपाळांचे आणि त्यांच्या वत्सांचे केलेले हरण हा कथाभाग यात येतो. मूळ भागवताप्रमाणे कथेचा क्रम दामोदर पंडिताने ठेवला आहे. वछाहरणात श्रीकृष्णवर्णन, यमुनातीर वर्णन, वृन्दावन वर्णनातून दामोदराचे काव्यात्म वृत्तीचे दर्शन घडते. मात्र एकाच ऋतुमध्ये सर्व झाडांना फळ लागल्याचे केलेले वर्णन न पटणारे आहे. कल्पानंदापेक्षा ब्रह्मानंदात रमलेला कवी श्रीकृष्णाच्या बाललीला वर्णन करताना तृप्त झाला आहे. कृष्णाला पाहून यमुनेची झालेली अवस्था भावपूर्ण पद्धतीने कवी वर्णन करतो.

पंडितांची श्रीकृष्णभक्ती निस्सीम आणि अपरंपार आहे. त्यांच्या वस्त्राहरणाच्या समग्र कथाप्रवाहात सर्वत्र या भक्तिभावाचा मंद, मधुर, मंजुळ ध्वनी उमटलेला आहे. ते श्रीकृष्णकथा ही 'नित्यनुतन' असल्याचे सांगतात. सगळ्यातून निवृत्ती आणि श्रीकृष्णाच्या ठायी परमप्रीती या गोष्टी ज्याच्याजवळ आहेत त्याला 'वस्त्राहरणा' तील श्रीकृष्णकथाश्रवणाने प्रसन्नतेचा, शांतीचा लाभ मिळाला आहे.

''जया सकळापासौनि निवृत्ती। श्रीकृष्णिं परम प्रिती
तेचि जन निवति। एणें चरित्रामृतेंसी।।''

ईश्वराचे अनंत अवतार आहेत, मात्र सहज सुलभतेने मुक्ती देणारा एकटा श्रीकृष्ण आहे.

''जैसे तरंग सागरा। तैसे अनंत अवतार ईश्वरा
परि लिला मुचिजे संसारा। ऐसा एकु श्रीकृष्णुचि होए।।''

ज्यांना भक्तिरसात गोडी नाही आणि शृंगाराची अभिरूची आहे. यांचीही अपेक्षा 'सौंदराचा सौंदरू' असलेल्या श्रीकृष्णाच्या चरित्रश्रवणाने पूर्ण होण्यासाठी आहे.

''भक्तिरसिं नाही आदरू। तेया कवि पढिये श्रीधारू
तेही तन्हिं सौदरांचा सौंदरू। राओ मुरारीचि वानावा।।''

असे असूनही दामोदर पंडिताने स्वत: आपल्या पारमार्थिक भूमिकेशी एकनिष्ठ राहून, श्रीकृष्णचरित्र गाताना शृंगार न आळविण्याचा संयम राखलेला आहे. श्रीकृष्णाची काही वर्णने कवीच्या प्रतिभा अतिशयोक्तीत रंगलेली आहेत.

या ग्रंथातून द्वैत-अद्वैतापेक्षा प्रवृत्ति-निवृत्तीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा, अधिक जिव्हाळ्याचा आहे. मुक्ती मिळवायची असेल तर ती निवृत्तीतूनच शक्य आहे. कर्मयोगाचा किंवा प्रवृत्तीचा त्यासाठी काहीही उपयोग

नाही. असा या प्रश्नासंबंधी अत्यंत योग्य निर्णय दामोदर पंडिताने घेतला आहे. मुक्ती आणि प्रवृत्ती या परस्परविरोधी अशा अवस्था आहेत. प्रवृत्तीतून मुक्ती अशक्य आहे. लोकांना प्रकृतीचे-मायेचे-देवताराधनेचे स्वाभाविक प्रेम आहे. त्यात पुन्हा तेथे फलप्राप्तीचे आकर्षण आहे. त्यामुळे लोकांची या मार्गावरील आसक्ती दुप्पट वाढली आहे. आताती कशाची सुटणार?

''साहाजेंचि आवडे प्रकृति। वरि आईकिली फलांची श्रृति

तेणे दुणावळि प्रिति। ते आतां जिवे न सांडवे।।''

कर्ममार्गी जीव नवस करून स्वत:ला बांधून घेतात आणि प्रवृत्तिमार्ग सोडणाऱ्या विरक्तांना ते नावे ठेवितात,

''जे प्रवृत्तले कर्ममार्गी। नवसीए सुति बंधनालागि।

जे म्हणति नासिले वीतरागी। सांडिले प्रवृत्तितें।।''

प्रवृत्तमार्गी लोक निवृत्तीमार्गाचा धर्मनिष्ट म्हणून उपहास करतात वेश्यांना कुलवती स्त्रियांचा उपहास करण्यातलाच हा प्रकार आहे. विरहिणी स्त्रीला चंद्र चंदनाचा स्वर्ग जसा तापदायक वाटतो तशीच कर्मजडाची निवृत्तांबद्दल प्रतिक्रिया होते असे म्हणून कवी पुढे म्हणतो काही लोक प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करतात. या मार्गाने आम्ही तरलो असा प्रचार करतात आणि आपसात आपले आपण एकमेकावर दिवे ओवाळून घेतात. व ब्रह्मविदांची निंदा करतात. हे पटवून देताना कवी म्हणतो, ''अहो चिखलाने भरलेली वस्तू चिखलाचाच उपयोग करून स्वच्छ करता येईल काय? त्याप्रमाणे कर्ममार्गाचा अवलंब करून कर्माच्या बंधनातून कोणाला आपली सुटका करून घेता येईल काय? असा कर्ममार्गाचा, प्रवृत्तीचा निषेध पंडित करतात. आणि निवृत्तीचा पुरस्कार करतात.

दामोदर पंडित हे महाराष्ट्राच्या संतकवींच्या परंपरेतील कवी आहेत. वत्साहरण हे काव्य काही अभ्यासकांच्या मते दामोदर पंडिताचे नसून ते केशिराजबासाचे आहे असे मत मांडले आहे. कारण ग्रंथात 'म्हणे मुनि केशिराजु' असा सहादा उल्लेख आहे. फक्त शेवटच्या ओवीत दामोदर पंडिताचे नाव आहे असे सांगण्यात येते. मात्र या दोघांचे इतके मित्रप्रेम होते की ते एकमेकांची नावे ग्रंथात लिहीत असत. याविषयीची एक ओवी या ग्रंथात दिली आहे. या ओवीचा अर्थ दिला आहे, तो खालील प्रमाणे पहावयास मिळतो.

केसोबासांच्या मृत्यूनंतर दामोदर पंडितांना त्यांचा वियोग फार जाणवला. या वियोगावस्थेतच त्यांचे 'वत्साहरण' हे काव्य जन्मास आले. आपल्या मित्रप्रेमाचे एक स्मृतिचिन्ह म्हणून त्यांनी या काव्यात केशिराजाचे कर्ता म्हणून नाव घातले. फक्त शेवटच्या ओवीत दामोदर पंडिताचे एवढेसुद्धा अहंकार प्रदर्शन अयोग्य वाटले! तरीही तिने शेवटी संमती दिली म्हणून शेवटच्या ओळीत दामोदर पंडिताचे नाव राहिले! एकूणच काय तर 'वत्साहरणात' केशिराजाचे नाव आले असले तरी हा ग्रंथ दामोदर पंडितानेच लिहिलेला आहे.

**२.५.५ ज्ञानप्रबोध :**

पंडित विश्वनाथ हे लाड कामराज नावाच्या व्यापाऱ्याकडे कोषाध्यक्ष होते. यांच्यात काही मतभेद झाले आणि कामराजने विश्वनाथला बंदीत टाकले. शिवव्यास यांनी पुढाकर घेऊन त्यांना सोडविले यानंतर शिवव्यासांच्या बरोबर त्यांनी गृहस्थाश्रम व संसार याला तिलांजली देऊन त्यांच्याकडून संन्यासदीक्षा घेतली. म्हणूनच ज्ञानप्रबोधात,

''तैसे मुनी कमळाकरू। लाउनी गेला बोधांकुरू।

तो पाळिला शिवराजे उपचारू। करोनिया।।''

अशा प्रकारे दोघांचेही नमन केले आहे. ज्ञानप्रबोध हे प्रबंध काव्य पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांनी इ.स. १३३१ (शके १२५३) मध्ये लिहिले आहे. हे काव्य वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. गीतेमधील तेराव्या अध्यायातील श्लोकावर ज्ञानलक्षणांच स्पष्टीकरण करणाऱ्या अशा १२५ ओव्या लिहिल्या असून १०७९ ओव्यांची रचना स्वतंत्र आहे. असा हा एकूण १२०४ ओव्या असलेला प्रबंधग्रंथ आहे. गीतेतील पाच श्लोकांच्या टीकेवर लिहिलेला एक भाग व उरलेला दुसरा स्वतंत्र भाग अशा २ भागात हे काव्य लिहिले आहे. असे असले तरी तो एकच ग्रंथ आहे. या ग्रंथाच्या लेखनाची समाप्ती कधी झाली हे कवी- ''शके बाराशे त्रेपन्न भीतरी। प्रजापती नाम संवत्सरी। माघे पंचमी प्रथमप्रहरी।'' असे स्वत:च सांगतो.

या काव्यग्रंथात विविध ज्ञानलक्षणे सांगितली आहेत. जसे की, अमानित्वं, अदंभित्व, अहिंसा, शांति: आर्जवम् इत्यादी. या लक्षणांशिवाय काही रचना स्वतंत्र लिहिल्या आहेत. या लेखनातील सुरूवातीच्या १२५ ओव्या या ''ज्ञानेश्वरीचा उतारा वाटावा'' इतके साम्य व ज्ञानेश्वरी व ज्ञानप्रबोधात आले आहे असे शं.गो. तुळपुळे यांनी सांगितले आहे. प्रबंध संपविताना कवीने स्वत:ला ईश्वर वियोगाचे दु:ख झाल्याचे सांगून करुणेची याचना केली आहे. यातील आत्माविष्काराचा जिव्हाळा वाचकांच्या मनाला चटका लावणारा असून शांतरस, भक्तिरस आणि करुण रस यांचा त्रिवेणी संगम साधून ''तो आंगे तर एकला। पर महाळाळा नांगवे वेठला।'' अशा काही ओव्यांतून वीररस येताना दिसतो.

विरक्ती आणि ईश्वरभक्ती यांचे रहस्य सांगणारा, मोक्ष दृष्टीने महती पटवून देणारा असा हा 'ज्ञानप्रबोध' एक तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ आहे. कवी पुढे म्हणतो, हा ग्रंथ नव्हे ''परमार्गी ज्ञानाची पव्हे भक्तीची जन्मपत्रिका'' ''ज्ञानप्रबोधाचा आरसा'' आहे. यात पाहिले असता ''प्रत्यक्ष विरळत संसारू। देखति डोळा।'' असे सामर्थ्य आहे. हा ग्रंथ अमृतासारखे अंगचेच अमरत्व असून तो पवित्र आणि सुरस झाला आहे. असा आत्मविश्वास कवी व्यक्त करतो. हा ग्रंथ रसाळ आहे हे सांगणारी एक ओवी दिसते,

''सिद्धांत कर्पूरवासे। घोळून साहित्य रसे।

भावविडा प्रबंध मिषे। स्वामी देईना।।

लटकें वाग्जाळ। न बोले पाल्हाळ।

बोल भावगर्भ रसाळ। तैसे बोलेन।।''

विरक्तीची ज्यांना प्रेरणा झालेली आहे. ईश्वराच्या वियोगाने ज्यांना दु:ख झाले आहे. अंशाच्या मनाची

पकड घेणारा असा हा प्रबंध आहे. हे पुढील ओवीतून कवी सांगतो,

''निर्वाहापुरता योगक्षेम। करी निहिंसक उदयम ।

आगत्य गृहस्थाश्रम। चाळी ऐसा।।

मीन जाळां सापडला। वागरू मृग पडिला ।

गृह-बंदीशाळे घातला। अडनी असे।।

म्हणे येथोनि कैं सुटेन। मग योग-सौख्य पावेन।

गृहमिषें बंदिस्थान। मांडले हे।।''

अशी ज्यांच्या मनाची संसार विन्मुख व ईश्वरोत्सुक अवस्था झाली आहे. त्यांचे जीवनमार्ग या ग्रंथातील ज्ञानप्रकाशाने उजळणार आहे.

भक्तीप्रमाणे विश्वनाथ यांना द्वैतनिष्ठा महत्त्वाची वाटते. काही ठिकाणी अद्वैताचा सूर अगदी अस्पष्टपणे उमटलेला आहे. अद्वैताचे खंडन करताना त्यांनी मर्मभेदक प्रहार केला. द्वैतमताचे समर्थन केले असले तरी काही ओव्यातून अद्वैताचा सूर स्पष्टपणे उमटलेला दिसतो त्या ओवी पहा,

''तरी आत्मवंते भूते। ऐसें घेतले जयाचेति चित्तें।

हेचि वर्म निरूतें। अहिंसेचे।।

असो हे भूतजात खेदे। जयाचा आत्मा भेदे।।

ज्ञानसपरिवारी नांदे। तयाचा ठायी।

कां जे प्रपंच भूतें सरिसी। त्रिगुणबंध समान जीव-राशी

व्यापकत्व भावे सर्वांशी। सरिसे ब्रम्ह एक।।''

या ग्रंथाच्या शेवटी कवीने फलश्रृती सांगितली आहे. पंडित विश्वनाथ म्हणतो,

''आणि सावधाने चिर्ते: जे अभ्यासिती या ग्रंथाने ।

दैव दशाचे सुख श्री तयांते: अधिष्ठी।।''

ज्ञानलक्षणे सांगत असताना विश्वनाथ यांनी श्रीचक्रधर यांना आदरपूर्वक वंदन करून त्यांचे वर्णन केले आहे. ईश्वर भक्तीचे माहात्म्य आणि विरक्ती माहात्म्य सांगणारा तत्त्वज्ञानपर असा हा ग्रंथ आहे. गीतेवर अनेकांनी विविध प्रकारे लेखन केले. मात्र या एकाच ग्रंथाला साती ग्रंथात स्थान प्राप्त झाले आहे. या ग्रंथाशिवाय विश्वनाथ यांनी 'ज्ञानचंद्रिका' नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

**२.५.६ सह्याद्रिवर्णन :**

खळोव्यास तथा राघोपाध्याय पाथरीकर यांनी सह्याद्रिवर्णन हा ग्रंथ इ.स. १३३३ (शके१२५५) मध्ये लिहिला. या ग्रंथास 'सह्याद्रीमाहात्म्य' असेही म्हणतात. या ग्रंथातून दत्तात्रेयाची स्तोत्रे आहेत. महानुभाव पंथात श्रीकृष्णाप्रमाणे एकमुखी दत्तात्रेयाला प्रथमपूर्णावतार मानले जाते. त्यामुळे दत्ताच्या वर्णन करणाऱ्या ओव्या यात येतात. सह्याद्री या स्थानी मातापूर अथवा माहूर या क्षेत्री श्री दत्तात्रेयाचा अवतार झाला म्हणून या ठिकाणच्या आठवणींना (लीळांना) त्या ठिकाणाचे सह्याद्रीवर्णन असे नाव दिले आहे. ग्रंथाच्या सुरूवातीलाच,

''तया श्रीचक्रपाणिचेन: वरप्रसादे मी करीन।

मूर्ति-लीला-वर्णन: श्री दत्तात्रेयाचे''

अशी श्री चक्रधर स्वामींच्या कृपेने श्री दत्तात्रेयाची लीळावर्णन केली आहे. श्री चक्रधरांना नमनही केले आहे. हिराइसा तथा हिरांबिका ही त्यांची दीक्षागुरू असल्याने तिचा उल्लेख ग्रंथात दिसतो. तो असा -

''तिये हिरांबिकेचा सुतु। रामु येणें नाते विख्यातु।

तेणे हा निर्मिला ग्रंथु। वितरागासी।।

ऐसया ग्रंथाते जे पाठ करिती। तथा भावपूर्वक आइकती।

ते वाचेही मंगलरूप होता। म्हणताय रामु।।''

शेवटच्या दोन ओव्यातून हा ग्रंथ रामरचित असल्याची नोंद दिसते.

खळोव्यासांनी दत्तमूर्तीचे भावपूर्ण व रमणीय असे वर्णन केले आहे. चक्रधराचे चरित्रही काही प्रमाणात सांगितले आहे. या ग्रंथात एकूण ५१७ ओव्या असून १६० ओव्यात श्री दत्तात्रयाचे चरित्र येते. तर १०५ ओव्यात श्री दत्तात्रयाच्या मूर्तीचे वर्णन येते. शेवटच्या ५५ ओव्यात दत्तचरित्र आहे. एकूणच श्री दत्तात्रयाच्या लीळांच्या अनुषंगाने सह्याद्रीवरील स्थानांचे वर्णन यातील ओव्यातून येते.

या ग्रंथात सर्वतीर्थ एकवीरा, रेणुका, दत्तात्रेयाचा अलर्क, सहस्त्रार्जुन परशुराम यांच्यावरील अनुग्रह, श्री चक्रधराचे अवतार कार्य, आत्मनिवेदन, स्वोद्धाराची तळमळ इत्यादी असे विषय आले आहेत. तसेच श्री चक्रधर स्वामींच्या मूर्तीचे वर्णन, त्यांची वेधशक्ती, बोधशक्ती, त्यांच्या जीवोद्धरपणाचा परमार्ग याचेही सविस्तर वर्णन येथे येते. चक्रधराच्या बोधशक्तीचे वर्णन करताना खळोव्यास म्हणतात,

''तो वेधवंती दीक्षागुरू: राणा श्री चक्रधरू:

वेध संचारित प्रकारू: नवल कैसे।।

जयाचेनि दर्शने अलौकिक: वेध संचरती अनेक:

तेथ सा जात्यभाविका: नवल नाही।।

पाहा पां पशुवें तृणचरें: तेयांसिही वेधु संचरे:

बगहे उचलुनि सामोरे: मूर्त पातु ठाकती।।

तयांचा नवलावो नव्हे: जया माणुसांची सवे:

वनकडुवाळे वेधिली देवे: श्री चक्रपाणी।।

काई सांधो ते वेधवंती: पाखिरूवें पाठी धांवती:

जळचरेंही येउनि वरौती: पत श्री मूर्तीतें।।''

खळोव्यासांची भूमिका कवीची नसून भक्तीची, परमार्गाच्या उपासकाची होती. त्यामुळे त्यांनी श्री चक्रधरांपासून  हिरांबिकेपर्यंत गुरुपरंपरेला नमन केले आहे. हा ग्रंथ कल्पनाविलासाने आणि प्रसंग विशेषी भावनेने सजिवला आहे. हे करताना अलंकार व उपमांचा साज चढविला आहे. शेवटी श्री चक्रधरांच्या निर्वाणानंतरचे विरह दु:खाचे वर्णन केले आहे.

सह्याद्रीवर्णन या ग्रंथात दत्तात्रेयाच्या निमित्ताने सह्याद्री पर्वताचे वर्णन येते. असे असले तरी डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी या ग्रंथास श्री 'दत्तात्रेयचरित्र' हे नाव योग्य असल्याचे म्हटले आहे. सौंदर्यदर्शन अथवा चरित्रलेखन हा या काव्यलेखनाचा मुख्य हेतू नसून वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या मनावर ईश्वरभक्तीचे आणि इंद्रियनिग्रहाचे संस्कार करण्यासाठी रचले असल्याचे सांगते. याची प्रचीती पुढील काही ओव्यातून येते,

''दृष्टीरूपी चित्रही न पाहावे: ऐसी तिथे लावविली सवे

निर्विकार स्वभावे: नियमाविली चांगी।।

रसना संयमाचिये बांदौडी: घालौ नि रसादि आहार तोडी

निग्रहें लवणीही पाडी: तोंडी धुलि तियेचा।।

वोखटे तीरस्कार विरोध: आन करमळ नाना दुर्गंध

पावता नाक न मुरडी हा निर्बंध: घ्राणासि केला।।

वाचा मारांक कैसी: जे शब्दवेधीपणे उसासी

जियेचिया घायासी: वना पाटाचि नाही।।''

प्रसंगचित्रण, व्यक्तिदर्शन यादृष्टीने काव्य एकसंघ नसले तरी परमार्गावरील श्रद्धेच्या सूत्रात गुंफले असल्यामुळे त्याला एक निराळाच, व्यापक अधिष्ठान असलेला, एकजिनसीपणा प्राप्त झालेला आहे. ज्ञानेश्वरी नंतर मराठी भाषेचे स्वरूप समजून घेण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. या ग्रंथाच्या शेवटी खळोव्यासांनी

''ऐसया ग्रंथात जे पाठ करिती: तया भावपुर्वक आइकती:

ते वाचे ही मंगलरूप होती: म्हणताए रामू:''

अशी ग्रंथवाचनाविषयी फलनिष्पत्ती सांगितली आहे.

### २.५.७ श्री ऋद्धिपूरवर्णन :

महानुभाव संप्रदायाचे पवित्र धर्मक्षेत्र व तीर्थक्षेत्र म्हणजे ऋद्धिपूर हे गाव होय. या ठिकाणी श्री गोविंदप्रभू यांचे वास्तव्य होते. महानुभाव पंथाची स्थापना याच ठिकाणी झाली. श्री चक्रधर स्वामींच्या चरणस्पर्शाने पवित्र झालेली ही भूमी आहे. त्यांच्या सहवासाने मोठा परिसर पवित्र झाला असून त्या ठिकाणांचे वर्णन ज्या ग्रंथात येते तो ग्रंथ म्हणजे श्री ऋद्धिपुरवर्णन हा होय. हा ग्रंथ नारोव्यास ऊर्फ नारायणव्यास बहालिये ऊर्फ नारायण पंडित यांनी इ.स. १३६३ (शके १२८५) मध्ये लिहिला. या लेखनकाळाचा उल्लेख 'बाण अष्ट्यमचंद्र शोभनेसि: आया दे निशीकर चंद्रेसि ग्रंथु पावला सिद्धिसि: ऋद्धिपूरवर्णनु' या ओवीतून सांगितला आहे. या ओवीची फोड केल्यास शके स्पष्ट होते. बाण म्हणजे पाच, अष्ट म्हणजे आठ, यम म्हणजे दोन चंद्र म्हणजे एक हे याकडे उलटे लिहिले की १२८५ हा शके स्पष्ट होतो. या ग्रंथाची ओवी संख्या ६४१ आहे. सुरुवातीला श्री नागदेवाचार्य श्रीनागांबिका यांना कवीने वंदन करून त्यांचे महत्त्व सांगितले आहे. काही ठिकाणी महानुभाव पंथाची तत्त्वप्रणाली आणि ग्रंथाविषयीचा गौरव केलेला दिसतो.

नारायण पंडित हे बहाळिये या गावाचे आहेत. जारण मारण व ज्योतिष या विषयात ते तज्ज्ञ होते. त्यांचे वडील हे रजपूत राजाच्या जवळचे होते. यातूनच त्यांची हत्या होते आणि सूडापोटी नारायण पंडितानी ज्यांनी त्यांना मारले त्यांचा वध करतो. आपल्या हातून घडलेल्या घटनेचे प्रायश्चित म्हणून तो महानुभाव संप्रदायात येतो. याप्रसंगी विश्वनाथांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नापासून स्फूर्ती घेऊन नारायण पंडितांनी ऋद्धिपूरवर्णन हा ग्रंथ रचला. हा ग्रंथ वस्तुनिष्ठ आणि आत्मनिष्ठ यांचा सुंदर संगम आहे. तसेच अथपासून इतीपर्यंत आत्मनिवेदनाच्या रूपाने ओथंबून गेला आहे. ऋद्धिपूरचे दर्शन होताच कवीच्या मनाची झालेली भावोत्कट, प्रसन्न, आनंदी अवस्था खालील ओवीतून स्पष्टपणे दिसते,

''जें आर्तासि कारणे: संसारश्रमाचे तिसवणे:
तें श्रीऋद्धिपुर देखिले तेणें: दुरौनिया।।
मोळिकारा धांडोळिता राने: जेवि मोळिए जोडले बावने:
नातरि दुर्भक्षी पकवाने: रांकु लाहे।।
दारिद्री आडुखुळे रिद्धी: अनाचार्यातें वरीति सिद्धी:
नि:कंचना उपाधि: टाकौनि ए।।
रोगिया अमृतपानु: लाहे तान्हैला जीवनु:
स्वामी जलिया प्रसनु: जैसे सेवका होए।।
सासुरवासें शिणली: तिथे भेटे जेवि माउली:
असो हे तैसी परि जाळी: श्रीऋद्धिपुर देखिले आं।।''

अशी ही मनाची उत्साहपूर्ण अवस्था संपूर्ण ग्रंथात बाह्यप्रदेशाचे व नगरप्रदेशाचे वर्णन करताना संतमहिमा गाताना, ईश्वराचे विरुद्धाचरण व जीनेश्वर भिन्नत्व समजावून सांगताना, राजमठ, परिशाळेचे खांब, राजमठद्वार, नृसिंह इत्यादीचे वर्णन करताना व श्री प्रभुमूर्तीचे वर्ण करून शेवट करताना पदोपदी जाणवते. ती तशीच टिकून राहते ही सर्वस्थळे पवित्र आहेत.

आपल्या पूर्वायुष्याचा, हातून झालेल्या हिंसेचा आणि अविवेकी कृत्याचा, आपल्या पुण्यक्षयाचा, पारमार्थिक दृष्टीने आपल्या अंगी असलेल्या अक्षमतेचा त्यांनी ग्रंथाच्या सुरूवातीलाच उल्लेख केला आहे. नारायण पंडित हे विनयशील होते. आध्यात्मिक सामर्थ्याच्या बाबतीत त्यांची भूमिका नम्रतेची होती. या ग्रंथात सुंदर, समर्पक निसर्ग उपमा वापरल्या आहेत. आपला ग्रंथ ज्ञानजगतात सुधाकरासारखा म्हणजे अमृतत्व देणारा आहे. याविषयी आत्मविश्वास आहे. नारायण पंडितांनी ज्या परमार्गाची व महात्मा पंथाची दीक्षा घेतली. त्याचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्ये संसाराची यातायात दूर करणे हेच आहे. या परमार्गाचा महिमा अचूक व यर्थात असा ओवीतून गायला आहे,

''आता अंहिसे नि:संगु: निवृत्ति भक्तियोगु

तो नमस्करू परमार्गु: दातारांचा।।

तो हा कैवल्यपदाची निसाणी: सकल सीधांतांतरणी

वेधबोधा मुकुट-मणि: सृष्टिचेआ।।''

ऋद्धिपूरवर्णनात नारायण पंडितांनी वर्णन विकासात आत्मप्रत्ययाची बैठक दिली आहे. पण ज्या ठिकाणी वर्णननिरपेक्ष असे आत्मनिवेदन येते तेथे आत्मनिवेदनात हृदयस्पर्शी जिव्हाळा निर्माण झाला आहे. या ग्रंथात संत महिमाही मन:पूर्वक आणि समर्पक रीतीने, संतत्वाची व्यवच्छेदक लक्षणे सूचित करून वर्णन केला आहे. सोपी भाषा वापरून मांडणी केली असल्याने समजते आणि मनाला भावते. यामुळे ते अधिक वेधक बनले आहे. भाषा मांडणीतील रसाळपणा आणि प्रासादिकता ही याची खास वैशिष्ट्ये आहेत. या ग्रंथात मराठी भाषेविषयी गौरवोद्‌गार काढले आहेत. साती ग्रंथात या ग्रंथाचे स्थान काव्यगुणदृष्ट्या वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. या ग्रंथाच्या शेवटी -

''हे श्री ऋद्धिपुरवर्णन: जे अभ्यासिती करूनि मनन।

तेआंसि कैवल्याचे साधन: दुरि नोहे।।''

अशी फलश्रुती सांगितली आहे.

'ऋद्धिपूरवर्णन' या ग्रंथाविषयी नारायण पंडितांनी डंक नावाचे एक खंडकाव्य आणि काही स्फुट पदे लिहिली आहेत. डंक या खंडकाव्यात जवळपास १६ पदे आहेत. संसारास भुजंगाची उपमा देऊन त्या संसारातील स्थितीस डंकाची (दंशाची) उपमा दिली आहे.

या दंशाचा रूपकात्मक आविष्काराचा नमुना पहा -

''भव भुजंगे दिली: पाडीलेया कवृणीही नुठी:

मंत्रे तंत्रे वीणे सृष्टी: निजदृष्टी वांचौनीया:

सकळ मंगळ पावना: सकळ जीवचेया जीवना:

परसुखाचे साधन: क्रिया अवलोकन तुझे देवा:

जयजय परमेश्वरा: परात्परा परब्रह्मा:

जयजय कैवल्यदानी: प्राकृता वाचा:

काई जीउनि बाहाळेया: नारायणास्वामी:

पुनर्भवा पासौनि: राखै देवा।।''

याशिवाय गीत, अनवेल पद, वनजारा, आरत्या, रूक्मिणी-पत्रिका, साइलो पद, अवांका, रूक्मिणी-स्वयंवर, अशी रचना नारायण पंडिताने लिहिली असल्याचे वि. ल. भावे यांनी सांगितली आहे.

**२.६ साती ग्रंथांची वैशिष्ट्ये :**

महानुभाव संप्रदायात विविध ग्रंथकारांनी साती ग्रंथाची निर्मिती केली. या साती ग्रंथाचा अभ्यास केल्यानंतर या साती ग्रंथांची वैशिष्ट्ये काय आहेत हे पहाणे आवश्यक आहे. या साती ग्रंथातून दिसून येणारी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

प्रामुख्याने परमार्गाच्या परंपरेने साती ग्रंथ म्हणून रूक्मिणी-स्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वस्त्राहरण, ज्ञानप्रबोध, सह्याद्रिवर्णन व ऋद्धिपूरवर्णन या पद्य ग्रंथांचा समावेश होतो; मात्र याबरोबरच दुसऱ्या बाजूला लीळाचरित्र, श्री गोविंदप्रभुचरित्र, श्री चक्रपाणीचरित्र, श्री दत्तात्रेयचरित्र, श्रीकृष्णचरित्र, सूत्रपाठ व दृष्टांतपाठ हे सर्व गद्य ग्रंथ सातीग्रंथात येतात. मात्र पद्य ग्रंथापेक्षा गद्य ग्रंथ अधिक महत्त्वपूर्ण आहेत.

या साती ग्रंथाचे लेखक संस्कृतप्रेमी असूनही त्यांना मराठी बद्दलचा अभिमान ओसंडून, उफाळून आल्याने साती ग्रंथाची निर्मिती झाली आहे. ग्रंथकारांनी परमार्गात प्रवेश केल्यानंतर साती ग्रंथ लिहिले पण त्यांच्या मनावर पूर्वाश्रमीच्या ब्राह्मण धर्माची मोहिनी ही थोडीफार कायम राहिलेली त्यांच्या लेखनातून दिसते.

साती ग्रंथामागील निर्मितीची प्रमुख प्रेरणा म्हणजे पंचकृष्णांविषयीची असलेली निस्सीम भक्ती ही होय.

नरेंद्र व भास्कर यांचे व्यक्तिमत्व कवित्वप्रधान आहे. तर दामोदरपासून सर्व कवींच्या व्यक्तिमत्वाला संतत्वाची स्निग्धशितल सुषमा अधिक आहे.

साती ग्रंथांच्या कर्त्यांच्या कवित्वलेखनातला एक अटळ संकेत म्हणजे रंकवृत्तीचे प्रदर्शन होय. पण केवळ संकेत उपचार असे या रंकवृत्तीचे प्रदर्शन असे नाही. तर त्यातून विनयशीलता फक्त झालेली आहे. ती जिव्हाळ्याची आहे.

साती ग्रंथाच्या वर्णनात अलंकाराबद्दल, अन्युक्तिप्रिय, उपमानसृष्टी यांचा वापर दिसतो. ती एक शैली फक्त होते. त्यांच्या एक साधा स्वरूपनिश्चितीस, रचना लक्षणे ठरविण्यास मदत करतात. केवळ श्रीमूर्तिवर्णनापुरताच हा अभ्यास मर्यादित ठेवला तरीसुद्धा तो फलदायी आहे.

या ग्रंथापैकी भागवतावर आधारित लिहिलेले ग्रंथ म्हणजे रूक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता व वच्छाहरण हे होत. गीतेच्या तेराव्या अध्यायातील कोटीश्लोकावर आधारित ज्ञानप्रबोध हा ग्रंथ लिहिला आहे. तर सह्याद्रीवर्णन व ऋद्धिपूरवर्णन ही स्वतंत्र काव्ये आहेत.

साती ग्रंथाची दीपमाळ परमार्गावर असून भक्ती विरक्तीच्या सौंदर्यामुळे ते उजळून निघाले आहेत. नरेंद्रच्या रूक्मिणीस्वयंवरात भावना व कल्पना यांचा सुंदर संगम दिसतो. भास्करभट्टाच्या भावनेत जी उत्कटता आहे आणि त्यांच्या कल्पनेत जी रमणीयता आहे ती उत्तान प्रकृतीची आहे. शृंगारवेडी आहे. दामोदराच्या प्रतिभेची दीप्ती सौम्य आहे. ती शांतीचे आणि भक्तीचे मनोरम दर्शन घडवते. विश्वनाथ भक्ती-विरक्तीच्या प्रतिपादनात व पुरस्कारात रंगलेले दिसतात. खळोव्यासांची सह्याद्रिवर्णन ही स्वतंत्र रचना स्तुत्य अशी विशेष आहे. ऋद्धिपूरवर्णनातून नारायण पंडितांनी भावना आणि कल्पना, रस आणि अलंकार ही कवित्वाची दोन मुख्य अंगे उत्तम रीतीने पण सौम्य सात्विक स्वरूपात येतात. एकूणच या साती ग्रंथातून तेराव्या शतकातील महानुभाव पंथाची वेगळी अशी वाङ्मय निर्मिती तयार झालेली दिसते.

## २.७ **समारोप :**

महाराष्ट्रात महानुभाव पंथ हा बाराव्या शतकात निर्माण होऊन तो तेराव्या शतकात ओसरून गेला आहे. मराठी भाषेच्या दृष्टीने या काळात जी ग्रंथ संपदा निर्माण झाली ती संपन्न होती. मराठी भाषेस बहारास आणणारी होती. लोकांना ज्ञान देण्यासाठी या संप्रदायातून जाणीवपूर्वक मराठी भाषेचा वापर केला. यातूनच गद्य व पद्य अशा विविध ग्रंथांची निर्मिती झालेली दिसते. या ग्रंथ लेखनासाठी विविध धार्मिक संदर्भ घेतले आहेत. त्याबरोबरच श्रीकृष्ण भक्ती ही या पंथाची प्रमुख शक्ती आहे. बीज आहे.

या संप्रदायात जीवन आणि तत्त्वज्ञान, कृती आणि उक्ती यात अखंड, अतूट संगती हा परमार्गप्रवर्तक श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्वातला विलोभनीय आणि वंदनीय विशेष आहे. तेरावे शतक हा मराठी भाषेचा प्रारंभकाळ असला तरी तो परिपक्वता, प्रौढता, पारमार्थिकता या गुणांनी देदीप्यपूर्ण अशा प्रकाशाने उजळला आहे. सातशे ते साडेसातशे वर्षानंतर तेराव्या शतकातील या वाङ्मयात तेजस्वितां, जी परिणामकारकरता, परतत्त्व स्पर्शसंबंधित भावघनता एवढ्या भव्य व उत्कट स्वरूपात प्रकट झाली ती आजतागायत अजोड आहे. मराठी भाषेच्या वाङ्मय वैभवात नरेंद्र, भास्करभट्ट, केसोबास, दामोदर पंडित, नारायण पंडित, म्हाइंभट यांचे स्थान वरचे आणि मानाचे आहे. कारण यांनी वेगवेगळी ग्रंथसंपदा निर्माण करून मौल्यवान लेणीच अर्पण केली आहेत. या संप्रदायातून केलेली आवाहने शाश्वत व तात्कालिक असून 'संसारासक्ती सोडा, ईश्वराभिमुख व्हा, ईश्वराला शरण जा' असा हा परमार्गाचा आदेश दिला आहे. याकाळात सामान्य माणसांना पारमार्थिक गरज भागविण्याचे, तिला संसारात ईश्वरीकृपाजन्य आनंदाचा अलौकिक लाभ घडविण्याचे शाश्वत कल्याणाचे कार्य चक्रधर व त्यांच्या अनुयायांनी अपूर्व तन्मयतेने व कळवळीने पार पाडले आहे. आणि महाराष्ट्रात एक चांगल्या वातावरणाची

निर्मिती केली हे खूप महत्त्वाचे आहे.

## २.८ शब्दार्थ :

| | | |
|---|---|---|
| शक्ती | – | जड/चेतन |
| हस्ति | – | हत्ती |
| जात्यंध | – | जन्मजात आंधळे (अज्ञानी) |
| पावो | – | पाय |
| मुसळ | – | धान्य कांडण्यासाठी वापरले जाणारे जाड बांबू |
| कोथळा | – | धान्य ठेवण्याची कणगी |
| उरोधीनि | – | एकमेकाला विरोध करून बोलणे |
| डोळसु | – | जाणकार (ज्ञानी) |
| ज्ञानियासी | – | शब्दज्ञानी |
| अनिष्ठ | – | अयोग्य |
| नेढी | – | न देणे |
| रावो | – | राजा |

## २.९ सरावासाठी प्रश्न :

**प्रश्न–१ योग्य पर्याय निवडा.**

१) खळोव्यासांची दीक्षागुरू कोण?

अ) महदाइसा ब) कामाइसा क) बहिणाई ड) हिरांबिका

२) नरेंद्रच्या मूळ रूक्मिणी स्वयंवराची ओवीसंख्या किती?

अ) १००० ब) १८०० क) १५०० ड) १९००

३) महानुभावीयांचे पवित्र धर्मक्षेत्र आणि तीर्थक्षेत्र कोणते आहे?

अ) रामटेक ब) सातारा क) ऋद्धिपूर ड) देवगिरी

४) महानुभावांचे आचारधर्म व तत्त्वज्ञान प्रामुख्याने कोणत्या ग्रंथातून विषद झाले आहे?

अ) सूत्रपाठ ब) लीळाचरित्र क) स्मृतिस्थळ ड) श्रीगोविंदप्रभुचरित्र

५) नरेंद्राच्या उपलब्ध रूक्मिणी स्वयंवराची ओवी संख्या किती आहे?

अ) ७८९ ब) ८७९ क) ९८९ ड) १०८९

६) महानुभावीयांनी श्रीकृष्णाप्रमाणे कोणाला पूर्वावतार मानले आहे?

अ) विठ्ठलाला ब) रामाला क) श्रीदत्तात्रेयाला ड) हनुमानाला

७) एकादशस्कंधावरील मराठीतील पहिले भाष्य असणारा ग्रंथ कोणता?

अ) विवेकसिंधू ब) ज्ञानेश्वरी क) उद्धवगीता ड) वच्छाहरण

८) ज्ञानप्रबोधाचे साम्य कोणत्या गंथाशी आहे?

अ) सह्याद्रिवर्णन ब) वच्छाहरण क) ज्ञानेश्वरी ड) रूक्मिणी स्वयंवर

९) दृष्टांतपाठ या ग्रंथाचे लेखक कोण?

अ) म्हाइंभट्ट ब) केसोबास क) नरेंद्र ड) भास्करभट्ट

१०) श्री चक्रधराचे मूळ नाव काय?

अ) चांगदेव ब) हरपाळदेव क) सहदेव ड) म्हाइंभट

११) 'वच्छाहरण' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

अ) दामोदरपंडित ब) पंडित विश्वनाथ क) खळोव्यास ड) नारायणपंडित

१२) महानुभाव पंथातील तिसरे आचार्य कोण आहेत?

अ) नरेंद्र ब) भास्करभट्ट बोरीकर क) दामोदर पंडित ड) नारायण पंडित

१३) कवी नरेंद्र हा कोणता राजाच्या दरबारी राजकवी होता?

अ) रामदेवराव कुलकर्णी ब) रामदेवराव देशमुख क) रामदेवराव भोसले ड) रामदेवराव यादव

१४) 'सूत्रपाठ' या ग्रंथात एकूण किती सूत्रे सांगितली आहेत?

अ) १२५० ब) १३५० क) १२५५ ड) १३५५

१५) लीळाचरित्रातून कोणाच्या आठवणी संकलित केल्या आहेत?

अ) श्री चक्रधर स्वामी ब) श्री गोविंदप्रभू क) नागदेवाचार्य ड) खेइंभट्ट

उत्तरे–

| | |
|---|---|
| १) हिरांबिका | २) १८०० |
| ३) ऋद्धिपूर | ४) सूत्रपाठ |
| ५) ८७९ | ६) श्रीदत्तात्रेयाला |
| ७) उद्धवगीता | ८) ज्ञानेश्वरी |
| ९) केसोबास | १०) हरपालदेव |
| ११) दामोदर पंडित | १२) भास्करभट्ट बोरीकर |
| १३) रामदेवराव यादव | १४) १२५५ |
| १५) श्री चक्रधर स्वामी | |

**प्रश्न–२ अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तर प्रश्न.**

१) महानुभावीय गद्य वाङ्मयाच्या आधारे १३ व्या शतकातील सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचा आढावा घ्या.

२) महानुभाव संप्रदायांत निर्माण झालेल्या गद्य ग्रंथांचा परिचय करून द्या.

३) साती ग्रंथाची माहिती सविस्तर लिहा.

४) महानुभावीयांच्या चरित्रग्रंथांची माहिती लिहा.

५) महानुभावीयांच्या पद्य वाङ्मयाचे स्वरूप व विशेष लिहा.

**प्रश्न–३ अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न.**

१) 'लीळाचरित्र' व 'श्री गोविंदप्रभुचरित्र' या ग्रंथांचा परिचय करून द्या?

२) 'सूत्रपाठ' व 'मूर्तिप्रकाश' या ग्रंथांची माहिती लिहा?

३) 'सह्याद्रिवर्णन' व 'श्री ऋद्धिपूरवर्णन' ग्रंथातील विषयविवेचन करा

४) भास्करभट्ट बोरीकर यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आढावा घ्या.

**प्रश्न–४ टिपा लिहा (चार पैकी दोन).**

१) लीळाचरित्र

२) सूत्रपाठ

३) रूक्मिणी स्वयंवर

४) श्री गोविंदप्रभुचरित्र

## २.१० अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


१) देशपांडे अ. ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग पहिला. प्रकाशक - सदाशिव कृष्णा पाध्ये, व्हीनस प्रकाशन, तपश्चर्या ३८१, फ, शुक्रवार पेठ, पुणे-४११०३०, आवृत्ती दुसरी - जानेवारी १९९५.

२) जोशी प्रल्हाद नरहर : मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास प्रकाशक - मनोहर यशवंत जोशी, प्रसाद प्रकाशन, १८९२, सदाशिव पेठ, पुणे -३०. दुसरी आवृत्ती, दत्तजयंती शके १९००, १४ डिसेंबर, १९७८.

३) नसिराबादकर ल. रा. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, प्रकाशक : सौ. भाग्यश्री मोरेश्वर फडके, फडके प्रकाशन, रि.सनं. १२४३ प्लॉट नं. ९७/४, ए, दुधाळी, कोल्हापूर-४१६०१२, सातवी आवृत्ती, पुनर्मुद्रण मे २००२.

४) शेणोलीकर ह. श्री. : प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप , प्रकाशक : डायमंड पब्लिकेशन्स, १२५५, सदाशिव पेठ, लेले संकुल, पहिला मजला, निंबाळकर तालीमसमोर, पुणे ४११०३०, सहावी आवृत्ती, १९८७ मोघे प्रकाशन.

५) पांगारकर ल. रा. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, प्रकाशन पुणे.

६) प्रा. डॉ. उपासे शिवशंकर, प्रा. डॉ. कळके जयसिंग, प्रा. भैरव कुंभार (संपा.), लीळाचरित्र, एकाक, हिरण्यकेशी प्रकाशन, प्लॉट नं. १, श्री. दत्तात्रय सह. गृहनिर्माण संस्था, रेसराऊंड संभाजीनगर, कोल्हापूर ४१६०१२.

७) डॉ. दत्ता पाटील, डॉ. शहाजी पाटील, डॉ. उदय जाधव (संपाद.) दृष्टांतपाठ, निवडक दृष्टांत, प्रकाशक - डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. प्रथमावृत्ती जून २०२०.


***

## घटक – ३

## इ.स. १३०० ते इ.स. १४०० (स्थूल कालखंड)

## अ) ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन कार्य : ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठाचे अभंग व इतर रचना.

## ब) नामदेवांची अभंगरचना

## क) सावता माळी, गोरोबा कुंभार, मुक्ताबाई, सेना महाराज, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, कान्होपात्रा यांच्या रचना

### ३.१ : उद्दिष्ट्ये :

१. इ.स. १३०० ते इ.स. १४०० या शतकातील मराठी ग्रंथ आणि ग्रंथकार यांचा परिचय होईल.

२. वारकरी संप्रदायाचा पाया रचणारे संत ज्ञानेश्वर आणि विस्तार करणारे संत नामदेव या प्रमुख कवींच्या कवितेचा व कार्याचा परिचय होईल.

३. वारकरी संप्रदायातून निर्माण झालेल्या सावता माळी, गोरोबा कुंभार, सेना महाराज, नरहरी सोनार आणि चोखामेळा या संतकवींच्या कवितेचा परिचय होईल.

४. वारकरी संप्रदायातून निर्माण झालेल्या मुक्ताबाई, जनाबाई आणि कान्होपात्रा या संतकवयित्रींच्या कवितेचा परिचय होईल.

५. 'हाती काम मुखी नाम' हे संतमेळ्यातील कवींचे ब्रीद आहे हे लक्षात येईल.

### ३.२ : प्रस्तावना :

विद्यार्थी मित्रांनो! या अभ्यासपत्रिकेत आपल्याला शतका-शतकाचा कालिक अभ्यास करावयाचा आहे. त्यानुसार तेराव्या शतकाचा अभ्यास करताना आपल्याला या शतकाची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक परिस्थिती विचारात घ्यावी लागेल. तेराव्या शतकात महाराष्ट्रात यादवांची सत्ता प्रस्थापित होती. ही सत्ता एकीकडे वैभवसंपन्न आणि समृध्द तर दुसरीकडे सनातनी धर्मभिमानी, धर्मश्रध्द अशी होती.आर्थिक सुबत्तेमुळे जनजीवन सुखाने जगत आहे असे असले तरी व्रतवैकल्य, वर्णभेद यांचे स्तोम माजल्याचे चित्र होते. चातुर्वर्ण्यांवर, कर्मकांडावर व जातिभेदावर विभागलेला समाज व्रतवैकल्य, तीर्थयात्रा, नवससायास, श्राध्दविधी दानधर्म यामध्ये गुरफटून गेला असल्यामुळे विविध उपासनाग्रंथ, उपस्यदैवते पूजत होता. एकूणच समाजावर मंत्र-तंत्र, जादूटोणा, भुते-खेते इ. कल्पनांचा पगडा असल्यामुळे सर्वसामान्यांची धार्मिक कुचंबना होत होती. सांस्कृतिक केंद्रे असलेली गावोगावची देवळे कीर्तन, पुराण, प्रवचन, पारायण, धर्मसभा व शास्त्रास्त्रचर्चांमधून समाजाला आधार देत होती. पण हे सर्व सर्वसामान्यांच्या बाबतीत उदासीन होते. धर्माचे खरे स्वरुप ग्रंथात अडकून

पडल्यामुळे फार मोठा समाज खऱ्या परमार्थापासून वंचित होता. या पार्श्वभूमीवर मूळच्या गुजरातच्या चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रात प्रवेश करुन येथल्या समाजाला भक्तीची वाट दाखविण्याचा प्रयत्न करीत सनातनी मूल्यांना नाकारले व मानवतवादाची पेरणी केली. याच काळात आपेगावच्या ज्ञानेश्वरांनीही गिरीकंदरात, ऋषिमुनींच्या गोतावळ्यात अडकून पडलेला शुध्द परमार्थ आणि ईश्वराविषयक भक्तिभाव सर्वसामान्यांच्या दरात आणून उभा केला. धर्म हा केवळ मूठभर लोकांसाठी नसून तो सर्वांसाठी आहे; भक्तीची आणि मुक्तीची वाट कोणीही चालू शकतो असे सांगत शिव, हरि,कृष्ण आणि विष्णू यांचे ऐक्य असलेल्या पंढरीच्या विठ्ठलासारखे दैवत, पुढे आणून सर्वधर्मीयांना भागवत धर्माच्या पताकाखाली एकत्रित आणले. त्यांच्यातील मनुष्यत्व व तदनंतर देवत्व जागे करण्याचे काम केले. ज्या कालखंडात धर्म ही प्रेरणा अत्यंत प्रभावी होती, चातुर्वर्ण्य व्यवस्थेची चौकट अतिशय बळकट होती त्या काळात भागवत धर्माचे उत्कृष्ट संघटक आणि उद्गाते संत ज्ञानदेवांनी व्यवस्थेला नकार देण्याची मानसिकता सर्वसामान्यांमध्ये निर्माण केली. ज्ञानदेवाच्या या प्रयत्नामुळे सर्वसामाान्यांच्या जगण्याच्या आशा पल्लवित झाल्या. हरवलेले आत्मभान थोड्याशा प्रमाणात का होईना जागे झाले. व्यवस्थेविरुध्द प्रतिकार केला पाहिजे ही भावना असंख्य स्त्री-शूद्रांच्या मनात निर्माण झाली आणि अध्यात्मिक लोकशाहीचं तांबडं फुटलं. त्यायोगे युगे अठ्ठावीस विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलालाही पुढे ज्ञानदेव-नामदेवाच्या रुपाने लडिवाळ भक्त मिळाले. महानुभावीयांनी पंचकृष्ण मानलेला चक्रधर जसा त्यांच्या वाङ्मयाचा मध्यबिंदू आहे तसा पंढरीचा पांडुरंग ज्ञानदेवांनी पाया रचलेल्या भागवतधर्मीय मराठी वाङ्मयाचा मानबिंदू आहे.

विद्यार्थी मित्रांनो! वरील विवेचनावरुन एक गोष्ट लक्षात येते, की १३ व्या शतकात वर्णाश्रमाची घट्ट पकड असलेल्या समाजात उच्चवर्णीयांकडून शूद्रांना अन्यायाची, गुलामगिरीची वागणूक मिळत होती. समाज हलाखीचे जीवन जगत होता. या परिस्थितीतून समाजाला बाहेर काढण्याची तळमळ ज्ञानदेवांना होती. या तळमळीतूनच सामान्य जनतेला धर्माचे खरे रुप दाखवावे आणि भक्ती हे शुध्द चारित्र्याचे साधन बनवावे या उद्देशाने ज्ञानेश्वरांनी भागवत सांप्रदायाचा पाया घातला.'अबालसुबोध' मराठी भाषेत ज्ञानेश्वरीसारखी भगवद्‌गीतेवरील मराठी टीका लिहून (कठीण तत्त्वज्ञान सोपे करुन सांगणे म्हणजे टीका किंवा भाष्य) ग्रांथिक साहित्य हे सर्वांसाठी आहे, साहित्याचा आस्वाद घेणे आणि साहित्यरचना करणे हे फक्त विद्‌वानांचे, पंडितांचे क्षेत्र आहे असे नाही हे दाखवून दिले. त्याचाच परिणाम म्हणून भागवत संप्रदायात विठ्ठलमहिमा व पंढरीवर्णन करणारे अठरापगड जातीचे अनेक संत सहभागी झाले व निर्माणही झाले. त्यांना या संप्रदायात भक्तीच्या पातळीवर समानतेचा अनुभव आला. या संतांनी आपल्या दैवताशी भक्त म्हणून संवाद साधला. आपली सुखदु:खे त्याला सांगितली. ज्ञानदेवांच्या संतमेळ्यात जो आनंद लाभला तो त्यांना सांगावासा वाटला, भक्तिमार्गावरचा आपला प्रवास कसाकसा होत गेला हे सांगावेसे वाटले. त्यातूनच पुढे बहुतेक संतांची अभंगरचना झालेली पाहावयास मिळते.

१३ वे शतक हे भक्तीच्या क्षेत्रातील परिवर्तनाचे क्रांतीकारी शतक आहे. या शतकात ज्ञानदेवांनी सांगितलेले भक्तीचे भागवतधर्मी तत्वज्ञान संत नामदेवांनी समाजातील सर्वसामान्यापर्यंत पोहोचविले. त्याबरोबर भागवत संप्रदायात सहभागी झालेल्या अठरापगड जातीतील संतमेळ्याचे नेतृत्व करत भागवतधर्माची पताका थेट पंजाबपर्यंत फडकविली. या संप्रदायातील ज्ञानदेव-नामदेवांसारख्या प्रमुख संतांनी व संतमेळ्यातील कवींनी निर्माण

केलेल्या साहित्याने आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्याचे महत्वाचे कार्य पार पाडले. संप्रदायातील सर्वच संतांच्या कवितेत भक्ती आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ पाहावयास मिळतो. १३ व्या शतकात मराठी वाङ्मयाच्या प्रारंभिक अवस्थेत निर्माण झालेल्या या कसदार संतकाव्याची जनमाणसावरील पकड २१ व्या शतकातही अद्याप टिकून आहे. त्याचे कारण या काव्याच्या प्रेरणा संतांच्या वैयक्तिक जीवनात नव्हे तर व्यापक अशा समाजजीवनात असलेल्या पहावयास मिळतात. या काळात महानुभावीय व संतकवितेने केलेला लोकभाषेचा स्वीकार हा या कवितेचा महत्वाचा विशेष सांगता येईल. या पार्श्वभूमीवर आपण आता १३ व्या शतकातील संत ज्ञानेश्वर व संत नामदेव या दोन प्रमुख संतांच्या वाङ्मयीन कामगिरीबरोबरच संतमेळ्यातील सावता माळी, गोरोबा कुंभार, मुक्ताबाई, सेना महाराज, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई आणि कान्होपात्रा या संतांच्या वाङ्मयीन कामगिरीचा परिचय करुन घेऊया.

## ३.३ ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन कार्य :

**ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठाचे अभंग व इतर रचना**

### ३.३.१ ज्ञानेश्वरांचा जीवनपरिचय :

ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स. १२७५ मध्ये पैठणच्या पूर्वेस चार कोसावर गोदावरीच्या काठी असणाऱ्या 'आपेगाव' येथे झाला. अभ्यासकांच्या मते आणि उपलब्ध साधनांच्या आधारे गोविंदपंत कुलकर्णी हे ज्ञानदेवांच्या घराण्याचे मुळपुरुष. गोविंदपंतांच्या पत्नीचे नाव नीरा. हे दांपत्य विठ्ठलाची उपासना करीत असल्याने आपल्या पोटी जन्मलेल्या मुलाचे नाव त्यांनी विठ्ठलच ठेवले. हेच विठ्ठलपंत ज्ञानेश्वरांचे वडील.

विठ्ठलपंतांची मूंज झाल्यावर त्यांनी काव्यकरण, वेदपठण व अलंकार यांचा अभ्यास केला. त्याच्या जोरावर ते पुढे निपुणशास्त्रवक्ते झाले. उपजतच वैराग्यवृत्ती असलेले विठ्ठलपंत भारतातील तीर्थयात्रा करीत आळंदीस आले. तेथील सिध्देश्वराचे पुजारी सिधोपंत कुलकर्णी यांच्याशी त्यांचा परिचय झाला. विठ्ठलपंतांची सदाचारसंपन्नता व हुषारी पाहून सिधोपंतांनी आपली कन्या रुक्मिणीचा विवाह त्यांच्याशी करून दिला. नंतर विठ्ठलपंतानी राहिलेल्या तीर्थयात्रा पूर्ण केल्या. मग आपली पत्नी रुक्मिणीसह विठ्ठलपंत आपेगावी आले. तेथे काही दिवस राहिले. संसारी जीवन स्वीकारले पण संसारात त्यांचे मन रमेना; संसारात असून पण उदास राहू लागले. विरक्ती कायम होती. थोड्याच दिवसांनी वैराग्य प्रबळ झाल्याने ते काही निमित्त काढून घरातून बाहेर पडले व काशीस निघून गेले. काशीस त्यांनी श्रीपादस्वामींचा उपदेश घेऊन त्यांच्याकडून संन्यासदीक्षा घेतली. स्वामींनी त्यांचे नाव 'चैतन्याश्रम' असे ठेवले. विठ्ठलपंत तेथेच राहू लागले.

पुढे काही दिवसांनी श्रीपादस्वामी रामेश्वरास जाण्याच्या उद्देशाने काशीहून निघाले. ते वाटेत आळंदीस आले. त्यांचे वास्तव्य सिध्देश्वर मंदिरात होते. विठ्ठलपंत गेल्यापासून रुक्मिणी व्रते, वैकल्ये, जप-तप, देवदर्शन करीत असे. नित्यनेमाप्रमाणे पिंपळाला प्रदक्षिणा घालण्याकरिता रुक्मिणी सिध्देश्वर मंदिरात आली. प्रदक्षिणा घालून झाल्यावर तिने स्वामींना नमस्कार केला. तेव्हा स्वामींनी तिला 'पुत्रवतीभव' असा आशीर्वाद दिला. आशीर्वाद ऐकून रुक्मिणीबाई गोंधळली. तिची अस्वस्थता पाहून स्वामींनी तिची चौकशी केली असता त्यांना

कळले की ज्याला आपण दीक्षा देऊन 'चैतन्याश्रम' नाव ठेवले तोच या बाईचा पती. ते काशीला परत आले. पितृऋणातून मुक्त होण्यापूर्वी संन्यासदीक्षा घेतलेल्या विठ्ठलपंतांना त्यांनी गृहस्थाश्रमात जाण्याची आज्ञा केली. संन्यास घेतलेल्या माणसाने पुन्हा संसारी होणे आळंदीच्या धर्मपंडितांना मान्य नव्हते. त्यांनी विठ्ठलपंतांचा उपहास केला व वाळीत टाकले. गावाबाहेरच्या झोपडीत विठ्ठलपंत रुक्मिणीसह राहू लागले. तेथे त्यांना दोन-दोन वर्षांच्या अंतराने निवृत्तीनाथ (इ.स. १२७३), ज्ञानेश्वर (इ.स. १२७५), सोपानदेव (इ.स. १२७७), आणि मुक्ताई (इ.स. १२७९) अशी चार मुले झाली. ती आळंदीच्या समाजापासून दूर झोपडीत वाढू लागली. आपल्या मुलांना सामाजिक जीवनात प्रवेश मिळावा व त्यांचे व्रतबंध (मूंज) व्हावे यासाठी विठ्ठलपंतांनी आळंदीच्या ब्रम्हवृंदाला खूप आर्जव केली. धर्मशाळा पाहून आम्हाला निर्णय द्या व क्षमा करा असे त्यांनी सांगितले. यावर ब्रम्हवृंदाने 'देहांत प्रायश्चित' चा निर्णय दिल्यावर पितापुत्रांना खूप दु:ख झाले. विठ्ठलपंतांच्या मनाची स्थिती फार चमत्कारिक झाली. गृहस्थाश्रम-संन्यासश्रम-गृहस्थाश्रम ही गोष्ट त्यांना बोचत राहिली. अशा अवस्थेत जगण्यापेक्षा मृत्यू बरा असे वाटल्याने विठ्ठलपंत व रुक्मिणी यांनी नाशिकच्या प्रयागमध्ये देहांत प्रायश्चित घेतले.

आई-वडील निघून गेल्यावर या चार भावंडांना हे जग अरण्याप्रमाणे वाटू लागले. सर्वसामान्य मुलांच्यासारखे लौकिक जीवन त्यांच्या वाट्याला आले नाही. काही दिवसांनी ही भावंडे आळंदीस आली. तेथे त्यांच्या सामाजिक प्रवेशाचा निर्णय आळंदीच्या शास्त्रीपंडितांना घेता येईना. तेव्हा त्यांनी निवृत्तीनाथांना सांगितले की, 'पैठणच्या ब्रम्हवृदांकडून शुध्दिपत्र आणा; ते आम्ही मान्य करू' त्याप्रमाणे ही भावंडे प्रायश्चित घेऊन शुध्दिपत्र आणण्याकरिता पैठणास आली. या भावंडाच्या प्रश्नाचा निवाडा करण्यासाठी पैठणला मोठी धर्मसभा भरली. पैठण हे त्यावेळी धर्माचे सर्वात मोठे धर्मपीठ होते. सभेत झालेल्या निर्णयाचा स्वीकार करुन ही भावंडे परतणार, तो काही ब्राम्हणांनी ज्ञानदेवांच्या नावाची कुचाळी केली. तेव्हा अतिशय प्रतिभावान, तेजस्वी आणि जीवनाची मोठी समज असणाऱ्या ज्ञानदेवांनी आपल्या ब्रम्हज्ञानाचे दर्शन घडविले. रेड्याकरवी वेद वदविले तेव्हा शास्त्रीमंडळीनी 'तुम्ही संन्याशाची मुले खरी, पण अवतारी आहात, आम्ही कुटुंबाचे दास आहोत. भक्ती, ज्ञान, वैराग्याचा लवलेशही आमच्या अंगी नाही' असे प्रांजळपणे कबूल केले. ज्ञानदेवांना वंदन करून त्यांचा जयजयकार केला व माघ शु. ५ शके १२०९ (इ.स.१२८७) रोजी या भावंडांना शुध्दिपत्र दिले.

पुढे ही भावंडे 'नेवासे' येथे आली. तेथे निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरुन ज्ञानदेवांनी मोहिनीराजाच्या मंदिर आवारात भगवद्‌गीतेवर नऊ हजार ओव्यांचे मराठी भाष्य लिहिले. श्रोत्यांसमोर वाचन करीत या ग्रंथांची रचना झाली. हीच 'भावार्थदीपिका' अथवा 'ज्ञानेश्वरी' होय. त्यानंतर या भावंडांनी आळंदी, आपेगाव, पंढरपूर असे मुक्काम केले. पंढरपूरला ज्ञानदेव-नामदेव भेट झाली. पुढे प्रसिध्द योगी चांगदेवही ज्ञानेशवरांचा शिष्य बनला. समाजाच्या धार्मिक स्थितीची मोठी जाण आलेल्या ज्ञानदेवांनी आपल्या शुध्द व पवित्र विचारांच्या जोरावर विठ्ठलभक्तांना एकत्र करुन वारकरी संप्रदायाचा पाया घातला. या संप्रदायाला पुढे भक्तश्रेष्ठ नामदेवांच्या रुपाने नेतृत्वसंपन्न प्रसारकर्ता मिळाला. एकनाथांच्या 'एकनाथी भागवत' सारख्या ग्रंथाचा मजबूत खांब मिळाला आणि तुकरामाच्या अभंगरूपाने स्वयंप्रकाशमान तेजस्वी असा कळस लाभला. ज्ञानदेवांच्या विचारसरणीवर उभारलेल्या वारकरी संप्रदायातील संतांचे जगण्याचे असे स्वत:चे तत्वज्ञान आहे. त्यांनी स्वत:च्या जगण्यावर काही बंधणे घातलेली आहेत. वारी करणे, सत्य बोलणे, परस्त्री रूक्मिणीप्रमाणे समजणे, मद्य-मांस वर्ज्य करणे, ग्रंथांना पूज्य

मानने, संप्रदायाची खूण म्हणून कपाळाला बुक्का, टिळा, गळ्यात तुळशीची माळ घालणे, अहिंसा, ग्रंथवाचन, कीर्तन, भजन, समता, बंधुता, सदाचार इ. गुणांचे नियमन हा पंथ करतो.

पुढे ज्ञानदेव तीर्थक्षेत्रास निघाले, त्यांच्याबरोबर निवृत्तीनाथ आणि अनेक संतमंडळी होती. थाटाने कीर्तन करत या संतमंडळाने अनेक तीर्थयात्रा केल्या. महाराष्ट्रातल्या गावोगावी व दारोदारी आपल्या नवीन भक्तिपंथाच्या वेलाचे रोप लावले. 'इवलेसे रोप लावियले व्दारी। त्याचा वेलू गेला गगनावरी' या उक्तीप्रमाणे भक्तिपंथांच्या या लहानशा रोपाचा वेल आकाशात गेला. आजच्या आधुनिक आणि विज्ञानयुगात पंढरपूरसारख्या तीर्थक्षेत्री सुमारे दहा लाख लोक एकत्र येऊन ज्ञानदेव माऊलींच्या नावाचा अखंड जयघोष करतात. हे या संप्रदायाचे मोठे फलित आहे. 'अवघाचि संसार सुखाचा करीन' अशी प्रतिज्ञा करत ज्ञानेश्वरांनी तीर्थयात्रा पुरी केली.

तीर्थयात्रा पुरी करुन ज्ञानेश्वर संतमंडळीसह शके १२१८ (इ.स. १२९६) च्या कार्तिकमासी पंढरपुरास आले. 'जगी मान्यता वाढून उपाधी होते व ईश्वराधनेत व्यत्यय येतो' या करता एकांतसुखाचा लाभ घेण्यासाठी ज्ञानेश्वरांनी समाधी घेण्याचा निश्चय केला. मग सर्व संतमंडळी पंढरपूराहून आळंदीस आली. ज्ञानेश्वरांनी आपले अवतारकार्य संपल्याचे सांगून आळंदी येथे वयाच्या एकविसाव्या वर्षी म्हणजे इ.स. १२९६ कार्तिक व. १३ गुरुवारी दुपारी समाधी घेतली. त्यांच्या पाठोपाठ इतर भावंडानीही समाधी घेतली.

ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा आणि त्यांनी घेतलेल्या संजीवन समाधीचा भागवतधर्मी संतमेळ्यावर दीर्घकाळ परिणाम होत राहिला. कारण ज्ञानदेवांची गुरुपरंपरा आदिनाथ- मच्छिन्द्रनाथ-गोरक्षनाथ-गहिनीनाथ-निवृत्तीनाथ-ज्ञाननाथ उर्फ ज्ञानदेव अशी नाथसंप्रदायी आहे. नाथ संप्रदायामध्ये योगसाधनेला महत्व आहे. पण तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन ज्ञानदेवांनी कर्मयुक्त भक्तीचा पुरस्कार केला. हे त्यांचे महत्वाचे कार्य.

विद्यार्थी मित्रांनो! ज्ञानेश्वरांचा दीर्घ जीवनपट आणि गुरुपरंपरा सांगण्याचा उद्देश हाच आहे की ज्ञानदेवांच्या साहित्याच्या प्रेरणा या जीवनपटात पाहावयास मिळतात. त्या प्रेरणेतून निर्माण झालेले वाङ्मय व त्याची कलामूल्ये आपण पुढीलप्रमाणे पाहूया.

### ३.३.२ ज्ञानेश्वरांची वाङ्मयनिर्मिती :

संत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायातील प्रमुख आणि सर्वश्रेष्ठ संतकवी आहेत. ज्ञानदेवांचे जीवन, वाङ्मय आणि व्यक्तिमत्व हे सारेच केवळ लोकोत्तर आहे. ज्ञानदेवांच्या चरित्राबद्दल अभ्यासकांत जे वाद आहेत त्याकडे दुर्लक्ष करुन प्रामुख्याने आपण त्यांच्या वाङ्मय निर्मितीचा विचार करुया. 'भावार्थदिपिका' उर्फ 'ज्ञानेश्वर', 'अमृतानुभव', 'चांगदेवपासष्टी', 'हरिपाठाचे अभंग' व इतर स्फुट रचना इ. काव्य ज्ञानदेवांच्या नावावर आहे. गेली सातशेहून अधिक वर्ष ज्ञानदेवांची कविता अजरामर होऊन राहिली आहे तिचे स्वरुप पुढीप्रमाणे आहे.

### ३.३.२.१ 'ज्ञानेश्वरी' उर्फ 'भावार्थदीपिका':

ज्ञानेश्वरांनी इ.स. १२९० (शके १२१२) मध्ये नेवासा येथे हा ग्रंथ लिहिला. असा उल्लेख खुद्द ज्ञानेश्वरीतच सापडतो तो असा,

''शके बाराशे बारोत्तरे। तैं टीका केली ज्ञानेश्वरे ।

सच्चिदानंदबाबा आदरे । लेखकु जाहला ।।''

या ग्रंथाला 'भावार्थदीपिका' असेही म्हणतात. श्रीकृष्णाने सांगितलेली गीता संस्कृतात होती. बहुजन समाजाला ती भाषा कळत नव्हती म्हणून ज्ञानदेवांनी गीतेच्या ७०० श्लोकांवर ९००० (नऊ हजार) ओव्या असलेले आणि क्रम न बदलता १८ अध्यायांचे टीकाभाष्य रसाळ मराठीत आणले. ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग यांचे गीतेमधील तत्वज्ञान सामान्य माणसांपर्यंत त्यांच्याच भाषेत पोहोचवावे अशा शुद्ध हेतूने ज्ञानदेवांनी गीतेवरील 'ज्ञानेश्वरी' हे मराठी भाष्य रचले. मानवी जीवनात 'ब्रम्हरसाचे' महत्त्व अत्यंतिक आहे. ब्रम्हविद्येचे ज्ञान प्रत्येकाला होत नसले तरी त्याची जाणीव होणे हे जीवन अर्थपूर्ण करण्यास पुरेसे आहे. म्हणून ज्ञानदेवांनी इथे 'मराठीचिये नगरी, ब्रम्हविद्येचा सुकाळुकरि' अशी प्रतिज्ञा केली आणि तीमधूनच या ब्रम्हविद्येचा अर्थ वाचकांच्या मनात ठसविण्यासाठी अनेक उपमा व दृष्टान्त दिले. ज्ञानदेवांच्या या ज्ञानेश्वरीचे शब्द इतके रसाळ आहेत की ते ऐकून श्रोत्यांचे कान तृप्त होतात व वाचकांच्या मनाला आनंदाची भरती येते. या ग्रंथाची सुरुवात अशी होते.

''ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।

जय जय स्वयंवेद्या । आत्मरूपा ।

देवा तुंचि गणेशु । सकलार्थमतिप्रकाशु ।

म्हणे निवृत्तीदासू । अवधारिजोजी ।। (१-१)

हे शब्दब्रम्ह अशेष । तेचि मूर्ति सुवेश ।

तेथ वर्णवसु निर्दोश । मिरवत असे ।।''

ज्ञानदेव म्हणतात - मी हे सारस्वताचे झाड लावले आहे. तरी तुम्ही याची फळे प्रेमाने खुडून घ्या. या मराठीच्या नगरात मी ब्रम्हविद्येचा सुकाळ करीन. येथे मी संस्कृत आणि मराठी या भाषांना एकाच सिंहासनावर बसवीन.

ज्ञानेश्वरांनी हा ग्रंथ एकांतात बसून लिहिलेला नाही तर प्रवरा नदीतीरावरील शिवमंदिराच्या सभामंडपात समोर बसलेल्या सर्व जातीतील सर्वसामान्य लोकांना ऐकविला आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानचर्चा येथे अवघड न होता रसाळपणे वक्त्याच्या श्रोत्यांशी संवाद साधताना दिसते. ग्रंथरचनेवेळी ज्ञानदेवांनी भाष्यकारांना वाटही पुसली आहे. पण ही टीका तर्ककर्कश होऊ दिलेली नाही. ज्ञानेश्वरीतील मंगलाचरणात तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा सुरेख मेळ झालेला पाहावयास मिळतो. 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ अनुभवाचा विषय आहे. जन्ममृत्यूच्या कक्षेत मनुष्याने शुद्ध आचरण ठेवावे असा आदर्श या ग्रंथाने घालून दिला आहे. एक ओवी वाचली की दुसरी वाचावी असे वाटणे हेच या ग्रंथाचे रहस्य आणि सामर्थ्य आहे.

खरे पाहता 'ज्ञानेश्वरी' हा सर्वसामान्य साधकांच्या जीवनाची शिदोरी आहे. जी साधकास आयुष्यभर पुरते. ज्ञानेश्वरांनी या ग्रंथात ज्ञान, कर्म, भक्ती, योग यांची सुरेख गुंफण करताना श्रीगणेशस्तवन, शारदावंदन

संतमहिमा, गुरूवंदन, गीताथोरवी, श्रोतृवंदन, आत्मविश्वास, नम्रता अशा अनेक विषयांचे सुसंगत व सविस्तर वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतील रससौंदर्यही वाचकाचे लक्ष वेधून घेते. 'शृंगाराच्या माथा पावो' ठेवणारा शांतरस ज्ञानेश्वरीचा प्राणविशेष आहे. प्राणचैतन्य राहण्यासाठी अवयवांचे अस्तित्त्व जाणवते तसे इतर रसही येथे डोकावतात. शांतरसाबरोबरच अद्‌भुतरस, वत्सलरस, भक्तिरस असे इतर रसही येथे आलेले आहेत. ज्ञानेश्वरांनी आपल्या निरूपणात लोकभाषेतील शब्द, निसर्गातील, लोकव्यवहारातील व पंचमहाभूतासंबंधीचे समर्पक दृष्टांत वारंवार योजल्यामुळे ज्ञानेश्वरीचा सुबोधपण वाढला आहे. हे सर्व समजून घेण्यासाठी आपण ज्ञानेश्वरीच्या अंतरंगाकडे वळूयात.

**'अर्जुनविषादयोग' :-** ज्ञानेश्वरीच्या या पहिल्याच अध्यायात ज्ञानदेवांनी कुरुक्षेत्रावर युद्ध करावे की न करावे अशा द्विधा मन:स्थितीत सापडून आपल्या कर्तव्यापासून ढळणाऱ्या अर्जुनाचे आणि त्याच्या प्रज्ञावादाचे सुंदर चित्र उभे केले आहे. या अध्यायात ज्ञानदेवांनी रचलेले 'गणेशरूपक' विघ्नहर्त्या ओंकारस्वरूपी गणेशदेवाच्या मूर्तीचे सर्वांगीण वर्णन करणारे आहे.

**'सांख्ययोग' :-** या दुसऱ्या अध्यायात ज्ञानदेवांनी शरीर नाशवंत आहे तर आत्मा अमर आहे हे सांगून विवेकाचे महत्त्व विशद केले आहे.

**'कर्मयोग' :-** या तिसऱ्या अध्यायात ज्ञानदेवांनी प्रत्येक मनुष्याने निष्कामभावपूर्वक आपल्या वर्णधर्मानुसार प्राप्त झालेल्या कर्तव्याचे तत्परतेने पालन केले पाहिजे असे सांगितले आहे.

**'ज्ञानकर्मसंन्यासयोग' :-** या चौथ्या अध्यायात कर्माला तत्त्वज्ञानाची जोड दिलेली आहे.

**'कर्मसंन्यासयोग' :-** या पाचव्या अध्यायात कर्तव्यकर्माचे पालन करीत षड्‌विकारांना दूर लोटणारा खरा संन्याशी असे प्रतिपादन केले आहे.

**'ध्यानयोग' :-** या सहाव्या अध्यायात ज्ञानदेवांनी इंद्रिये संयमित करून परमात्म्याचे ध्यान करण्यावर भर दिला आहे.

**'ज्ञानविज्ञानयोग' :-** ज्ञानदेवांनी या सातव्या अध्यायात सर्व प्राणीमात्रांमध्ये परमेश्वर ओतपोत भरलेला आहे असे सांगून भक्तीला ज्ञानाचे अधिष्ठान दिले आहे.

**'अक्षरब्रम्हयोग' :-** या आठव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी परब्रह्म, ब्रह्म, कर्म आध्यात्म या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

**'राजविद्या राजगुह्ययोग' :-** या नवव्या अध्यायात ज्ञानदेवांनी कूळ, वर्ण, जाती यांचे महत्त्व नाकारून भक्तीचा केलेला प्रभावी पुरस्कार अठरापगड जातीतील असंख्य लहानथोर स्त्री पुरुषांना या संप्रदायात समाविष्ट करून घेण्यास कारणीभूत झाला.

**'विभूतियोग' :-** या दहाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी परमेश्वराचा विशेष आविर्भाव असणाऱ्या वस्तूपेक्षा भगवंताचेच चिंतन केले पाहिजे असे सांगितले.

**'विश्वरूपदर्शनयोग' :-** या अकराव्या अध्यायात श्रीकृष्णाने अर्जुनाला दिव्य दृष्टी देऊन विश्वरूप दर्शन दाखविले. या विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय भगवंत स्वरूपातच आहे हे ज्ञानदेवांनी अधिक स्पष्ट केले.

**'भक्तियोग' :-** या बाराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी परमात्म्याची श्रद्धापूर्वक भक्ती करणाऱ्या मनुष्याचा भगवंत संसारसागरातून त्वरीत उद्धार करतात असा सर्वसामान्य भक्तांना दिलासा दिला आहे.

**'क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग' :-** या तेराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी ज्ञानांचा प्रकाशक असलेल्या परमात्म्याला जाणल्याने त्याच्याशी एकरूपत्व होऊन अमरत्वाची प्राप्ती होते हे स्पष्ट केले आहे.

**'गुणत्रयविभागयोग' :-** या चौदाव्या अध्यायात ज्ञानदेवांनी संपूर्ण जग सत्व, रज, तम असे त्रिगुणात्मक आहे. सत्वगुण सुख आणि ज्ञानाच्या आसक्तीने, रजोगुण कर्मासक्तीने व तमोगुण प्रमादालस्य व निद्रा यांनी मनुष्याला बंधनात टाकतात. या गुणांच्या अतीत झालेला मनुष्य भगवद्‌भावास प्राप्त होऊ शकतो हे स्पष्ट केले आहे.

**'पुरुषोत्तमयोग' :-** या पंधराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी पुरुषोत्तम परमात्मा हा या विश्वाचा मूळ आधार आहे. त्याला श्रध्दापूर्वक भजल्याने मनुष्य सर्वज्ञ आणि कृतकृत्य होतो हे विशद केले आहे.

**'दैवासुरसंपद विभागयोग' :-** या सोळाव्या अध्यायात ज्ञानदेवांनी मनुष्याने सद्‌गुण व सदाचरण करुन संसाराच्या व जन्ममरणाच्या बंधणातून मुक्त झाले पाहिजे असे ठणकावले आहे.

**'श्रध्दात्रयविभागयोग' :-** या सतराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी सर्वसामान्यांना श्रध्देचे तीन प्रकार सांगून श्रध्दापूर्वक देवाचे स्मरण किंवा नामोच्चारण करुन शुभकर्म करण्याविषयी उपदेश केला आहे.

**'मोक्षसंन्यासयोग' :-** या अठराव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी मनुष्याने कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग यांपैकी कोणत्याही एका साधनाचा अवलंब केला तर त्याचा उध्दार होऊन त्याला मोक्षप्राप्ती होते हे स्पष्ट केले आहे.

वरीलप्रमाणे ज्ञानेश्वरीचे अंतरंग पाहिल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की पारमार्थिकदृष्टीने ज्ञानेश्वरीचे महत्व जेवढे अक्षुण्य आहे त्याहीपेक्षा अधिक पटीने भाषिक व साहित्यिक दृष्टीने आहे. संत ज्ञानदेवांचा वाग्वविलास विस्तार येथे खरेच परतत्त्वास स्पर्श करतो. केवळ काव्यभाषेच्या दृष्टीने जरी ज्ञानेश्वरीचा विचार केला तरी रस, अलंकार, प्रतिमा अथवा प्रतीकांचा प्रसन्न सुकाळ म्हणजे ज्ञानेश्वरी होय. मराठी भाषेचा अभिमान हा तर ज्ञानदेवांच्या आवडीचा विषय. हा अभिमान सार्थ करण्यासाठी ज्ञानदेवांनी गीतेच्या सहाव्या अध्यायाचा आधार घेतला आहे. सहावा अध्याय हा गीतेच्या अर्थाचे सार आहे, अष्टांगयोगाच्या ऐश्वर्याचे खुले कोठार आहे ज्याचे वर्णन करण्यास वेदही असमर्थ ठरले. या अध्यायाचे निरुपण करताना आपली मातृभाषा कशी समर्थ ठरली हे सांगताना ज्ञानदेव म्हणतात,

''माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृततेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिकें। मेळवीन।।
जिथे कोवळिकेचेनि पाडें। दिसती नादीचे रंग थोडे ।
वेधे परिमळाले बीक मोडे। ज्याचेनि'' (६-१४)

माझी मराठी किती कौतुकाची, मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो, ती इतकी गोड आहे की अमृतालाही सहजपणे जिंकेल. अशा माझ्या मायबोलीत मी रसपूर्ण रचना करेन. माझ्या भाषेचे मार्दव अनुभवाल तर मधुरस्वरांचे विविध प्रकारही फिके वाटतील. भाषेतील अक्षरांची चित्ताकर्षकताही सुगंधालाही बलहीन करेल आणि श्रोते हो भाषारस प्राशन करण्याच्या मोहाने कानासही जिभा फूटतील.

ज्ञानेश्वरी ग्रथांच्या शेवटी हा आपला वाग्यज्ञ संपल्यावर त्या विश्वात्मक देवाजवळ ज्ञानेश्वरांनी 'पसायदान' मागितले ते असे-ज्ञानेश्वर म्हणतात.

''आता विश्वात्मके देवें। येणे वाग्यज्ञे तोषावे।
तोषोनि मज द्यावे। पसायदान हे ।।१।।
जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रति वाढो।
भूतां परस्परे पडो। मैत्र जीवांचे।
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्य पाहो।
जो जे वांछील तो ते लाहो। प्राणीजात।।''

या पसायदानात ज्ञानेश्वरांनी विश्वकल्याणाच्या भावनेने विश्वात्मक देवाजवळ जे मागणे मागितले आहे ते वैयक्तिक लाभाचे नाही; तर प्राणिमात्रांच्या सुखाचे, कल्याणाचे मागणे त्यांनी मागितले. या विचारात त्यांचे विश्वात्मक मोठेपण सामावलेले दिसते. 'उपमा, भाषा सौंदर्य, तत्वज्ञान, साक्षात्कार, भक्ती आणि अव्दैत यांची सांगड, अलौकिक निरीक्षण शक्ती, अप्रतिहत कवित्वशैली, अलोट वाङ्मयचातुर्य या सर्व गुणांच्या संमिश्र भावाने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ 'न भूतो न भविष्यती' असा झाला आहे.' हे रा. द. रानडे यांचे उद्‌गार ज्ञानेश्वरीची यथार्थ ओळख पटवितात (संतवचनामृत : रा.द. रानडे पृष्ठ १४)

अशाप्रकारे मराठी साहित्याचे एक अनमोल लेणे असलेला 'ज्ञानेश्वरी' हा सुमारे नऊ हजार ओव्यांचा ग्रंथ वाचकाने वाचण्यास प्रारंभ केला की तो मोहून जातो. समुद्राचे तरंग जसे चित्तवेधक असतात तसे ओवीमागून ओवीचे सौंदर्य त्याच्या मनात विचारांची वलये निर्माण करतात. अध्यात्माशिवाय अनेक विषयांचे पदर येथे उलगडत जाताना त्याचे मन उत्कंठीत होते. अध्यात्म आणि साहित्य यांचा कलात्मक संगम झालेला येथे पाहायला मिळतो. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीविषयी ज्ञानदेवांचा संतसखा भक्तश्रेष्ठ नामदेवांनी म्हटलेच आहे,

''नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी''

**३.२.२.२ अमृतानुभव :** ज्ञानेश्वरांनी इ.स. १२९२ मध्ये हा ग्रंथ रचला. या ग्रंथासाठी स्वत: ज्ञानदेवांनी 'अनुभवामृत' असा शब्दप्रयोग केला आहे.

''ज्ञानदेव म्हणे श्रीमंत। हे अनुभवमृत
सेवोनि जीवनमुक्त । हेंचि होतु ।।'' (१०-१९)

मंगलाचरणाच्या पाच संस्कृत श्लोकांत पुढे येणाऱ्या आत्मानुभूतीच्या विवेचनाचे सूत्र ज्ञानेश्वरांनी ८०४ ओव्यांमध्ये अत्यंत मार्मिकपणे स्थापित केले आहे. त्यामुळे ज्ञानदेवांच्या या तत्वज्ञानात्मक ग्रंथाला मराठी साहित्यात अनन्यसाधारण महत्व आहे. ज्ञानेश्वरी लिहून झाल्यावर निवृत्तीनाथ ज्ञानदेवांना म्हणाले 'हा ग्रंथ उत्तमच उतरला आहे; पण बोलून चालून तो टीकापर'. आता काही स्वतंत्र ग्रंथरचना व्हावी या बोलावर ज्ञानदेवांनी जी ग्रंथरचना केली ती 'अमृतानुभव' होय. लेखनस्वातंत्र्याची गुरुज्ञा झाल्यावर ज्ञानदेवांनी आपल्या अनुभवाचे अमृत या ग्रंथात ओतप्रोत भरले आहे. काव्य आणि तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टींनी अत्यंत सरस असा हा ग्रंथ झालेला आहे.

ज्ञानदेवांचे आणि निवृत्तीनाथांचे संवादचिंतन सुरुच होते. त्यातूनच अनुभवामृत निर्माण झाले. तोच 'अमृतानुभव' ज्ञानदेवांनी लिहिलेला अमृतानुभव ह ग्रंथ म्हणजे मराठी भाषेतला बहुमोल तत्त्वज्ञानमय अलंकार आहे. अव्दैतसिध्दान्ताच्या पायावर उभा असलेला अमृतानुभव हा ग्रंथ एकूण ८०४ ओव्या व दहा प्रकरणात विभागला आहे. अमृतानुभवचे अंतरंग पाहिल्यास त्यात शिवशक्तीचे ऐक्य, शब्दमंडन व शब्दखंडन, अज्ञानाचा आणि शेवटी ज्ञानाचाही निरास, स्फूर्तिवादी किंवा विश्वचिद्विलासवाद हा सिध्दान्त आणि आपण ज्ञानज्ञानातीत आहे हा स्वानुभव, इतके विषय स्थूलमानाने आले आहेत. सद्गुरु निवृत्तीनाथांच्या शिष्योत्तम ज्ञानेश्वरांनी या ग्रंथात जीव-शिव ऐक्यतेचा विषय मांडला आहे. त्यामुळे हा शांकरमताचाच अनुभव वाटतो असे एक मत आहे.

ज्ञानेश्वरांनी 'अमृतानुभव' हाही ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीछंदात लिहिलेला ग्रंथ आहे. सामान्य वाचकांना किंवा विद्वानांनाही हा ग्रंथ कठीण आणि निरसही वाटण्याचा संभव आहे. मात्र अध्यात्मरहस्य जाणणाऱ्यांना तो स्वसुखाने डोलविणारा आहे. भाषेच्या दृष्टीने ज्ञानेश्वरीप्रमाणेच हा ग्रंथ सुबोध असून काव्याच्या मनोहर भाषेने व उपमादृष्टान्तानी भरलेला आहे. शिवशक्तीचे ऐक्य, प्रथम अज्ञानाचा विनाश आणि नंतर ज्ञानाच्याही पलीकडील अवस्था, तसेच विश्व म्हणजे चिद्शक्तीचा विलास असल्याची धारणा याविषयी विवेचन आहे. अमृतानुभवाच्या सातव्या प्रकरणात ज्ञानदेव म्हणतात- 'दृश्य, दृष्टा आणि दर्शन यांच्या पलिकडे असणारा परमात्मा विश्वरुपाने नटतो व तो अमर आहे' शिव आणि शक्ती हे एकमेकांशी एकरुप असतात हे सांगण्यासाठी ज्ञानदेव समर्पक दृष्टान्ताची योजना करतात ती अशी-

''स्त्री पुरुष नामभेदे । शिवपण येकले नांदे
जग सगळे आघाधे । पणे जिही ।
दो दांडी येकि श्रुति । दोहों फुली येकि दृति ।
दोहों दिवीं दीप्ति । येकेचि जेविं ।
दो ओटी येकी गोठी । दो डोळा येकि दृष्टि ।

तेवी दोघी जिही सृष्टी । येकिचि जेवीं ।।''

अशा दृष्टान्तातून ज्ञानदेव स्त्री-पुरुष अशी नावे भिन्न असली तरी त्यांच्यामध्ये एकच शिवपण आहे असे सांगतात. दोन्ही फुले पण वास एक, दोन कान पण आवाज एक, दोन दिवे पण प्रकाश एक, दोन ओठ पण शब्द एक, दोन डोळे पण दृष्टी एक त्याप्रमाणे ही शिवशक्ती एकच असून तीच या सृष्टीत व्यापून राहिली आहे. पाणी आणि लाट ही जशी एकमेकांशी सुखेनैव एकरुप असतात. तसेच शिवशक्तीचे एकत्व असल्याचे ते सांगतात.

अमृतानुभव म्हणजे मानवी जीवनाचे विश्लेषण आहे. संसारव्यथा व मानसिक चिंता दूर करण्याचे साधन म्हणजे 'अमृतानुभव'. श्री ज्ञानेश्वरांनी स्वत: अनुभव घेतलेले अमृततूल्य औषध म्हणजे 'अमृतानुभव'. जीवन आनंदमय करण्याचा एकमेव उपाय म्हणजे 'अमृतानुभव'. अशा आत्मानुभूतीच्या आनंद सोहळ्याचे वर्णन ज्ञानदेवांनी पुढील शब्दांत केलेले आहे.

''म्हणोनि ज्ञानदेवे म्हणे । अनुभवामृते येणे ।

सणु भोगि जे सणे । विश्वचेनि ।।'' (१०.३१)

अमृतानुभवाची सांगता करताना ज्ञानदेव म्हणतात - 'माझे सद्‌गुरु श्री निवृत्तीनाथ यांनी मला परमानंदपदी स्थित केले'. हा परमानंद मी एकट्याने अनुभवावा काय? दीपाचा प्रकाश त्याच्या एकट्यापुरता नसून तो साऱ्या घरासाठी असतो म्हणूनच गुरुकृपेने मला लाभलेल्या परमानंदात जगताला वाटेकरी करुन घ्यावे या उद्देशाने मी 'अमृतानुभव' या ग्रंथाची रचना केली आहे.

### ३.२.२.३ चांगदेवपासष्टी :

ज्ञानेश्वरांनी इ.स. १२९४ मध्ये आळंदीस चांगदेव पासष्टीची रचना केली. ज्ञानदेवांचा हा ग्रंथ म्हणजे एक प्रासंगिक प्रकरणच आहे. तापी नदीच्या तीरावर सिध्दाश्रम स्थापन करुन राहणाऱ्या चांगा वटेश्वर या हठयोग्याला भक्तियोगी ज्ञानेश्वरांनी लिहिलेले पत्र म्हणजे 'चांगदेवपासष्टी' होय. ६५ ओव्यांचे हे लघुकाव्य आहे. पत्ररुपाने केलेल्या संवादासारखे या लहानशा ग्रंथाचे स्वरूप आहे. त्याला कारणही तसेच घडले.

चांगदेवांनी श्रीशंभूची परमभक्ती केली. त्यांना सर्व सिध्दीची प्राप्ती झाली. चौदा विद्या,चौसष्ट कला अवगत झाल्या. या सिध्दीच्या जोरावर अंधाला डोळे देणे, बहिऱ्याला ऐकू येणे. कुष्ठरोग घालविणे. वांझेला पुत्रलाभ करुन देणे इ. चमत्कार त्यांना सहज शक्य झाले. अशा चमत्कारांनी त्यांची शिष्यशाखा खूप वाढली. वाढत्या शिष्यशाखेने मनाला अहंकार मात्र जन्मास आला. ज्ञानदेवांनी रेड्याकरवी वेद वदविले ही वार्ता चांगदेवांच्या कानी आली. सिध्दीची शक्ती ते उत्तम जाणत होते पण रेड्यामुखी वेद? केवळ असंभव !

''काळवंचना करोनि निश्चित । वाचलो वर्षे चौदा शत।

सिध्दाई दाविली बहुत । परि हे सामर्थ्य असेना ।।''

चांगदेवांच्या मनात ज्ञानदेवांना भेटण्याची प्रचंड इच्छा उत्पन्न झाली. त्यांनी ज्ञानदेवांना भेटण्याचे निश्चित केले. भेटीपूर्वी शिष्याहाती पत्र पाठवावे असेही ठरले. पत्रलेखनात मायना काय लिहावा? तीर्थरुप लिहावे तर ज्ञानदेव

माझ्याहून किती लहान आणि चिरंजीव लिहावे तर कर्तृत्त्वाने ते किती महान. अहंकारापोटी मनात आलेले द्वैत (संभ्रम) संपले नाही. शेवटी 'शिष्यांना तोंडीच नमस्कार सांगा, त्याचे कुशल विचारा अणि भेटीची इच्छा कळवा.' असे चांगदेवांनी सांगितले आणि कोराच कागद पाठवून दिला. शिष्य ज्ञानेश्वरादी भावंडांना भेटले. चांगदेवांचा निरोप सांगितला. सोबत आणलेला कोरा कागद दिला, कोरा कागद पाहून मुक्ताई म्हणाली- 'चौदाशे वर्ष तपश्चर्या करुन हा कोराच राहिला!' निवृत्तीनाथांनी तिघानाही चांगदेवांचे चरित्र कथन केले. ते म्हणाले- 'सिध्दीच्या सामर्थ्याने अहंकाराचे मोठे प्राबल्य त्यांच्या मनावर आहे.' ब्रम्हज्ञानाच्या दृष्टीकोनातून त्यांची पाटी मात्र कोरी आहे. त्यासाठी त्यांना बोध होण्याची गरज आहे. असे उपदेशपर पत्र तू त्यांना लिहून पाठव. गुरुंच्या आज्ञेनुसार ज्ञानदेवांनी या प्रसंगाच्या निमित्ताने चांगदेवांना लिहिलेले ६५ ओव्याचे पत्र म्हणजेच 'चांगदेवपासष्टी' होय.

ज्ञानदेवांचे हे अव्दैतानुभूतीपर काव्य होय. ज्ञानेश्वरांनी चांगदेवांशी केलेला संवाद तत्त्वज्ञानाच्या स्वरुपाचा आहे. वैयक्तिक सुख-दुःखापेक्षा निराळी अशी ही विचारांच्या पातळीवरची देवघेव आहे. 'स्वस्ति श्री वटेशु' असा मायना लिहून-

''स्वस्ति श्री वटेशु । जो लोपोनि जगदाभासु ।
दावि मग ग्रासु । प्रगटला करी ।। चां-१।।
प्रगटे तवं तवं न दिसे । लपे तवं तवं आभासे
प्रगट ना लपला असे । ना खोमना जो ।।'' चां-२।।

अशा आत्मानात्म विचारापासून प्रारंभ करुन दृष्टान्ताच्या साहाय्याने अव्दैत आणि स्फूर्तिवादाचा पुरस्कार करीत, अवघ्या पासष्ट ओव्यांत ज्ञानदेव आणि चांगदेव किंवा 'मी' आणि 'तू' अशा संवादातून ऐक्य साधत ज्ञानदेव गेले आहेत. या ग्रंथाविषयी संत वाङ्मयाचे अभ्यासक ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, 'नामरुपात्म जगताचे अधिष्ठान ब्रम्हाहून वेगळं नाही. सोने हे सोनेपणाच्या वजनात किंवा कसात कमी न होता जसे अलंकार रूपात येते तद्वतच परब्रम्ह हे आपल्या पूर्णत्त्वात कमी न होता विश्वरुपाने विलसते. हा सिध्दान्त तीन ते सहा ओव्यांत सांगितला असून त्याचा विस्तार पुढे केला आहे.' ज्ञानेश्वरांच्या सर्व ग्रंथांत अव्दैतानुभवाचे आणि भक्तिप्रेमाचे एकत्र सूत्र अनुस्युत आहे. फक्त 'अमृतानुभव' व 'चांगदेवपासष्टी' यांत ज्ञानेश्वरीच्या मानाने काव्याचा भाग कमी आहे इतकेच. पण काव्यापेक्षा एका हठयोग्याला एका ज्ञानयोग्याने धाडलेले अध्यात्मबोधपर असे पत्र म्हणून या प्रकरणाचे महत्व विशेष आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- ह. श्री. शेणोलीकर, पृष्ठ ४६)

अमृतानुभवातील तत्वज्ञान 'पासष्टी' त अधिक सूत्रबध्दपणे मांडून चिद्‌विलासवादाच्या भूमिकेनेच पूर्णाद्‌विव्दैताचा बोध ज्ञानदेवांनी केला आहे. ज्ञानेश्वरांनी या ओव्यांमधून विश्वाचे स्वरुप उलगडले आहे. जगामध्ये आपल्याला विविधता आणि भिन्नता दिसत असली तरी शेवटी सर्व गोष्टी अभिन्नच आहेत. एकाच चैतन्याची ही विविध रुपे आहेत. ज्ञानेश्वरांनी समर्पक दृष्टान्त प्रासादिक व माधुर्यपूर्ण भाषेत देऊन ही कठीण संकल्पना समजावण्याचा प्रयत्न केला आहे. आत्म्याच्या दृष्टीने आपण दोघे एक आहोत यामुळे व्दैतदृष्टीने भेट

घेण्याचे कारण नाही असा आपला अभिप्राय ज्ञानदेवांनी या पत्रांतून चांगदेवांना कळविला आहे.

''चांगदेवा तुझेनि व्याजें । माऊलिया श्रीनिवृतीराजे ।

स्वानुभाव रसाळ खाजे । दिधले लोभें ।। ''

ज्ञानदेवांनी असे विनयपूर्ण उद्‌गार काढून या लेखनाचे सारे श्रेय निवृत्तीनाथ व चांगदेव यांना दिले आहे.

**३.३.२.४ हरिपाठाचे अभंग :** ज्ञानदेवांच्या वाङ्मयनिर्मितीमधील २७ अभंगांचा 'हरिपाठ' हा एक स्वतंत्र विभागच आहे. या विभागाचा विचार करता असं म्हणावंस वाटतं की, आकाशगंगेमधील २७ नक्षत्रांचे तेज या २७ अभंगांना लाभले आहे. ज्ञानदेव या अभंगांतून सांप्रदायिकांना उद्देशून विरक्तीचे बोल बोलताना दिसतात. भागवंताना जिव्हाळ्याची साद घालून त्यांना हरिभक्तीकडे वळविण्याचा प्रयत्न करतात. यापैकी प्रत्येक अभंग म्हणजे ज्ञानदेवांचा नीतिबोधच आहे. वारकरी संप्रदायात हरिपाठाच्या अभंगांना अनन्यसाधारण महत्व आहे. वारकऱ्यांच्या नित्य पठणातील हे अभंग आहेत. कारण ज्ञानदेवांनी या अभंगांतून संप्रदायाचे सार अत्यंत साध्या, सहज आणि उत्कट शब्दांत सांगून सांप्रदायिकांना आपल्या मुखातून हरिनामाचा सतत जप करण्याचे भावनिक आवाहनही केले आहे. हरिनामाचा महिमा आणि त्याचे भक्तावरील प्रेम महर्षी व्यासांनी तसेच पुराणग्रंथातून सांगितलेला आहे; तोच धागा पकडून सांप्रदायिकासाठी ज्ञानदेवांनी 'देवाचिया व्दारी उभा क्षणभरी' या हरिपाठ अभंगातून हरिनामाचे महत्व विशद केले आहे.

''देवाचिया व्दारी उभा क्षणभरी ।

तेणे मुक्ति चारी साधियेल्या ।

हरिमुखे म्हणा, हरि मुखे म्हणा।

पुण्याची गणना कोण करी ।

असोनी संसारी जिव्हे वेगुकरी ।

वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।

ज्ञानदेवे म्हणे व्यासाचिये खुणें ।

व्दारकेचे राणे पांडवा घरी ।''

ज्ञानदेवांच्या हरिपाठातील हा पहिलाच अभंग वारकऱ्याच्या नित्य पठणातला आहे. या अभंगांतून समस्त वारकऱ्यांना ज्ञानदेवांनी मोलाचा उपदेश केला आहे. सांप्रदायिकांना ज्ञानदेव सांगतात, 'देवाच्या दारात क्षणभर का होईना जो कोणी उभा राहीला त्याला सलोखता, समीपता, सरुपत, सायुजता या मुक्ती प्राप्त होतील त्याबरहुकुम परमेश्वराच्या नामसंकीर्तनामुळे तुम्हाला जे पुण्य लाभेल, त्याची मोजदाद कुणीच करु शकणार नाही. संसारात राहूनही नामसाधना करता येते. हरिनाम घेण्याची सवय आपल्या जिभेला सतत असावी. चार वेद आणि सहा शास्त्रे बाहू उभारुन हेच तर सांगताहेत, त्याचबरोबर व्दारकेचा राजा श्रीकृष्ण पांडवांच्या घरी राहात असे कारण पांडव हे त्याचे भक्त होते असे वर्णनही व्यासाचार्यांनी केलेच आहे. पांडवाप्रमाणेच सांप्रदायिकांनीही

अत्यंत भक्तिभावानं श्रीहरिला वश करावं हाच संदेश हरिपाठातून सांगून 'हरिमुखेम्हणा' हा भक्तिपंथाचा मुख्य विचारही विशद करतात.' हरिपाठाच्या शेवटी वारकरी भक्त हे पालुपद म्हणतात.

हरिपाठाच्या अभंगामधून ज्ञानदेव पुढे म्हणतात, चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे ही हरीचेच वर्णन करीत आहेत. ज्याप्रमाणे दही घुसळून त्यातील सारभूत लोणी काढून घेतात व असार ताकाचा त्याग करितात त्याप्रमाणे चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे यामध्ये सारभूत असणाऱ्या हरीचे तू विचाराने ग्रहण कर अणि त्यातील ताकाप्रमाणे असणाऱ्या वांझट कथाचा मार्ग टाकून दे! हरी हाच वैकूंठ आहे आणि वैकूंठ हे एक त्याचे नाव आहे. निर्गुण निराकार परब्रम्ह तेच शाश्वत व सार आहे आणि याचे रहस्य निरंतर हरिचिंतनात रत असणे हेच होय. जन्ममृत्युरुपी संसार दुःखापासून एक हरीच सोडविणारा आहे त्यासाठी निस्सीम हरिभक्ती हवी. हरीचे नाम सर्व पारमार्थिक साधनात सोपे असून ते सर्व मनुष्यांना दुर्मिळ झाले आहे. कारण हरीचे नाम कोणी घेत नाही त्याची सुलभता व योग्यता जाणून ते नाम सदोदित घेणार असा पुरुष विरळ आहे. (हरिपाठ अभंग-८) अशी खंतही व्यक्त करतात. हरीच्या नामाचे जो जतन करतो त्याच्या सर्व वंशाचा उध्दार होतो. माझा हरी सामर्थ्यवान आहे. त्याच्या स्वरुपाचा यथार्थ निर्णय उषनिषदांकडूनही झाला नाही. हरिनाम चिंतनाने चिंतकाच्या ह्रदयात रामकृष्ण रुपाचा ठसाच उमटतो. आपल्या ठिकाणी यज्ञ, याग, क्रिया, धर्म सर्व काही हरि आहे. त्यावाचून दुसरा काही नेमधर्म नाही. आपल्या ध्यानात-मनात नेहमी हरिनामाची वस्ती असणे आवशयक आहे. हरिपाठ हा समाधी संजीवन आहे, म्हणजे त्यास जिवंत करणारा आहे. हरिनामाच्या ठिकाणी स्थिर झाले की हरिनाम आणि परमात्मा या दोन्हीमध्ये भेद राहत नाही. (हरिपाठ अभंग -२७) अशाप्रकारचा वैशिष्टपूर्ण उपदेश ज्ञानदेव हरिपाठातल्या अभंगातून करतात.

''एक तत्व नाम दृढ धरी मना ।
हरिसी करुणा येईल तुझी ।।''

अशा शब्दांतून ज्ञानदेव कोणतेही नाव घेतले तरी ते एका परमेश्वराकडे जाणार आहे हा विचार सांगतात.

ज्ञानदेवांनी या सर्वच हरिपाठाच्या अभंगांमधून पंढरीमाहात्म, विठ्ठलमाहात्म्य अव्दैतबोध, संतसमागम, नामस्मरण, सदाचाराचा उपदेश असे विविध विषय हाताळलेले आहेत. आणि शेवटी,

''हरिपाठ किर्ती मुखे जरी गाय पवित्रचि होय देह त्याचा''

अशी हरिपाठाच्या अभंगांची फलश्रुतीही ज्ञानदेवांनी सांगितली आहे. नामस्मरणाच्या तपात बळ मोठं आहे. हे या अभंगातून ज्ञानदेवांनी स्पष्ट केलं आहे.

### ३.३.२.५ ज्ञानदेवांची इतर रचना

विद्यार्थी मित्रांनो! वरीलप्रमाणे आपण ज्ञानेश्वरांची ग्रंथरचना आणि हरिपाठ अभंगांचा स्वतंत्र विभाग पाहिला. आता आपण त्यांच्या वरील ग्रंथांव्यतिरिक्त इतर रचनांकडे वळणार आहोत. ज्ञानदेवांच्या इतर रचनांमध्ये ओवी, अभंग, गौळणी, विराणी आणि पदरचना इ. रचनांचा समावेश होतो. ज्ञानदेवांच्या या रचना गेली सातशेहून

अधिक वर्ष मराठी माणसाच्या ओठावर खेळत आहेत. आपल्यापर्यंत हे अभंग मौखिक परंपरेने चालत आले असल्यामुळे त्यांची भाषा थोडी बदलली असल्याने ग्रंथरचना करणारे ज्ञानेश्वर आणि अभंग रचना करणारे ज्ञानेश्वर वेगळे असावेत अशी काही अभ्यासकांनी मते व्यक्त केली असली तरी ज्ञानदेवांच्या मनाचा एक पदर त्यांच्या अभंगामधून वेगळेपणाने जाणवल्याशिवाय राहात नाही. ईश्वरभेटीची तळमळ, मनाची उदासी, बेचैनी, प्रपंचाविषयीचा अलिप्तपणा, परमेश्वराच्या विरहाने होणारे दु:ख, पंढरीपर्णन, विठ्ठलवर्णन आणि बालक्रीडा इ. विषयांचे सुमारे ७६५ अभंग ज्ञानदेवांनी लिहिले आहेत. या अभंगांकडे पाहिले असता भक्तीच्या वाटेवरचा एका संताचा प्रवास लक्षात आल्याशिवाय राहात नाही. ज्ञानेश्वरांनी हे अभंग पंढरीच्या संतमेळ्याशी संबंध आल्यावर व नामदेवांच्या बरोबर तीर्थयात्रा करीत असताना लिहिले असावेत, अभंगाच्या शेवटी ज्ञानेश्वर स्वत:बरोबर आपल्या माता-पित्यांचा 'बापरखुमादेवीवरु' असा उल्लेख करताना दिसतात. हा उल्लेख असा त्यांच्या माता-पित्यांचा, तसा पंढरीच्या विठ्ठल-रखुमाईचाही असावा असे जाणकरांचे मत आहे.

पंढरपूर ही वारकऱ्यांची दक्षिण काशी आणि श्रीविठ्ठल हे त्यांचे परमदैवत. प्रत्येक भागवताला, वारकऱ्याला या तीर्थक्षेत्राची आणि आपल्या श्रीहरीची आस लागलेली असते. यातूनच ज्ञानदेवांनी

''रुप पाहाता लोचनी । सुख जाले हो साजणी।

तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।

बहुता सुकृतांची जोडी । म्हणुनि विठ्ठली आवडी ।

सर्व सुखाचे आगरु । बाप रखुमादेवीवरु ।। ''

हा अभंग लिहिला आहे. त्यांच्या मंगलाचरण अभंगातील हा पहिलाच अभंग आहे. नमनाचा हा अभंग वारकरी कीर्तनात अतिशय लोकप्रिय आहे. मंगलाचरण अभंगाचे स्वरूप आपल्या इष्ट देवतेला वंदन करावं, तिचा आशीर्वाद मागावा आणि तिच्या रुपाचं गुणगान करावं असं असतं, त्याला अनुसरुन ज्ञानदेवांनी 'अगं साजणी, श्री हरिचं रुप मी डोळे भरुन पाहिलं, ते रूप बघून मला परममुख लाभलं. तो हा श्रीविठ्ठल फार चांगला आहे. तोच हा माधव फार चांगला आहे. फार मोठं पुण्य माझ्या गाठी होतं त्यामुळंच या विठ्ठलाची भक्ती आवडीनं करण्याची बुध्दी मला झाली. रखुमादेवीचा पती आणि आमचा पिता हा श्रीविठ्ठल सर्व सुखाचं निधान आहे' असं मंगलाचरण गाईलं आहे.

ज्ञानदेवांनी आपल्या अभंगातून केलेलं वारीचं वर्णनही उत्कट रचनेचा सुंदर आविष्कार आहे. वारी करतो तो वारकरी. आषाढी अणि कार्तिकीची वारी नित्यनेमानं करणं हे वारकरी भक्ताचं वैशिष्ट्य आहे. हाती पताका घेऊन भक्त भाविक पंढरीला जातात.

ज्ञानदेव म्हणतात,

''माझे जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।

पांडुरंगी रंगले । गोविंदाचे गुणी वेधले ।

जागृती स्वप्न सुषुप्ति नाठवे ।  पाहता रुप आनंदी आनंद साठवे ।

बाप रखुमादेवीवरु सगुण निर्गुण ।  रुप विटेवरी दाविली खूण ।।''

खांद्यावर पताका घेऊन श्रीक्षेत्र पंढरीला जाण्याची ओढ माझ्या मनाला लागून राहिली आहे. श्रीविठ्ठलाच्या ठिकाणी माझं मन जडलं आहे. मूळचा निर्गुण निराकार असलेला परमात्मा विठ्ठलाच्या रुपानं सगुण साकार होता. विटेवरील त्याचं हे स्थान आपल्या रुपाची खूण मला दाखवतं. अशा शब्दात ज्ञानदेवांनी सांप्रदायिकांना वारीचं महत्व पटवून दिलं आहे.

ज्ञानदेवांच्या अभंगरचनेमध्ये वासुदेव, पांगूळ, टिपरी, पाळणा, पाईक, घोंगडी, डोई असे काही पारमार्थिक, रुपात्मक अभंग येतात. 'घोंगडी' या एकाच विषयावर त्यांचे सोळा-सतरा अभंग आहेत. गोकुळातील बाळकृष्णाचे सवंगडी त्याला उद्देशून आपलं मनोगत मांडत आहेत अशी कल्पना या अभंगात केली आहे. अलौकिक जीवनाबरोबरच लोकजीवनाशी समरस झालेल्या जनसामान्यांनाही आपापल्या व्यवसायांच्या माध्यमातून परमार्थ सुगम करुन सांगितला आहे. त्यामुळं व्यावसायिक रुपकांतून गुंफलेले हे अभंग अतिशय लोकप्रिय झाले आहेत. ज्ञानदेवांनी योजलेली ही रुपके सामान्यांपुढे भक्तीचे तत्त्व विशद करतात. ज्ञानदेव हे स्वत: नाथपंथीय असल्यामुळे त्यांच्या अभंगरचनेमध्ये योगपर अभंगमालाही गुंफलेली आहे 'सहस्त्रदळ ब्रम्हरंध्र ज्यांचे घर' किंवा 'आकाशाची गुंफा अंत नाही' असे काही अभंग योगपर आशयसंपन्न आहेत. अशा वैविध्यपूर्ण अभंगाबरोबरच परमेश्वराच्या सगुणरुपाविषयीचे तसेच निर्गुणरुपाविषयीचेही काही अभंग ज्ञानदेवांनी लिहिले आहे.

ज्ञानदेवांची  'विराणी' रचना तर अतिशय लोकप्रिय आहे. विराणी म्हणजे विरहिणीचं गीत. आपल्या प्रियकराचा वियोग सहन न झाल्यामुळे त्या स्त्रीनं गाईलेलं गीत. विराणीतून मधुराभक्ती किंवा शृंगारभक्ती सुचविली जाते. भक्त ही प्रियेशी आणि परमेश्वर हा प्रियकर अशा भूमिकेतून विराणी लिहिली जाते. या पार्श्वभूमीवर विराणी या रचनाप्रकाराचा विचार केला तर ज्ञानदेवांनी लिहिलेल्या विराण्या मधुराभक्तीने ओथंबल्या आहेत. ईश्वरप्राप्तीची मनाला लागलेली ओढ, ईश्वराच्या विरहाने होणारे दु:ख अशा विविध भावना ज्ञानेश्वरांच्या अभंगांमधून काव्यमय रूप होताना दिसतात.

''चंदनाची चोळी ।  माझे अंग अंग जाळी ।

जागृती पुसे सजणी ।  कवन बोलिले अंगणी ।''

या त्यांच्या विराण्या प्रपंच आणि परमार्थाचा सुंदर समन्वय घडवितात. घरावर बसून कावळा ओरडला की पाहुणा येतो हा लोकसंकेत पकडून

''पैल तो गे काऊ कोकताहे । शकुन गे माये सांगताहे ।

उड रे उड रे काऊ तुझे सोन्याने मढीन पाऊ ।  पाहुणे पंढरीराऊ घरा कैं येती ।।

दहीभाताची उंडी लाविन तुझ्या तोंडी । जीवा पढिये त्याची गोडी सांगवेगी ।।
दुधे भरुनि वाटी लावीन तुझे ओंठी । सत्य सांगे गोठी विठो येईल कायी ।
आंब्या डाहाळी फळें चुंबी रसाळीं । आजिचे रे काळी शकुन सांगे ।
ज्ञानदेव म्हणे जाणिजे ये खूणें । भेटती पंढरीराणे शकुन सांगे ।।''

ज्ञानदेवांनी लिहिलेली ही लोकप्रिय विराणी. यातील विरहिणी परसात आलेल्या कावळ्याला साद घालीत आहे. ती म्हणते- अरे काऊ, माझा आवडता पाहुणा येणार असल्याचा शुभ शकुन मला समजला. तू जी साद घालीत आहेस, ती त्याचीच खूण आहे. तू उडून जारे! पण आजच्या दिवसातली शुभ-शकुनाची वार्ता मला सांगना! अरे, मी ज्ञानदेव तुला सारखा विनवितो आहे. पंढरीनाथ मला भेटतील असा एखादा शकुन सांग रे! काऊने शकुना सांगावा म्हणून ज्ञानदेव विरहिणीच्या भूमिकेतून काऊला पाय सोन्यानं मढवीनं, बाळाच्या घासातील दहिभाताचा घास तुला भरवीन, दुधानं भरलेली वाटी तुझ्या तोंडाला लावीन. दारातील मोहरलेल्या आंब्याच्या झाडावरील रसाळ फळ देईन! अशी प्रलोभने दाखवत आणि शुभशकुन सांगण्याची विनवणी करतात. त्याचबरोबर

''घनु वाजे घुणुघुणा । वारा वाहे रुण झुणा
भवतारकु हा कान्हा । वेगवी भेटवा कां ।।''

कृष्णसखीच्या अंत:करणातील आर्तता या विराणीतून व्यक्त झाली आहे. यासारख्या ज्ञानदेवांच्या विराण्या म्हणजे उत्कट आणि सोज्ज्वळ भावनांचा सात्विक आविष्कार आहे. ज्ञानदेव हे साक्षात्कारी संत होते. आपल्याला झालेला साक्षात्कार दृश्य स्वरुपात पण सुगम पध्दतीने त्यांनी व्यक्त केला आहे.

ज्ञानदेवांचा श्रीविठ्ठल हा कृष्णाचेच रूप आहे. त्यामुळे श्रीकृष्णाच्या खोड्यांनी वैतागलेल्या गौळणींची गाऱ्हाणी हा मराठी गौळणीत आवर्जुन येणारा विषय आहे. ज्ञानदेवही त्याला अपवाद नाहीत. ज्ञानदेवांच्या गौळणींची कृष्णाविषयक गाऱ्हाणी कौतुकमिश्रित वात्सल्याने भरलेली व अध्यात्माच्या स्तरावर वावरणारी आहेत. कृष्णाच्या रुपाने प्रभावित झालेल्या गौळणींना 'सावळेची होणे यासी ध्याना' असा अनुभव येतो. ज्ञानदेवांची गौळण निळ्या मेघश्याम रंगाशी एकरुप होते. साऱ्या चराचरात तिला कृष्णाचेच रूप भरून राहिल्याचा प्रत्यय येतो. शिवाच्या मिलनासाठी जिवाला लागलेली तळमळ ज्ञानदेव तितक्याच उच्च पातळीवरून अभिव्यक्त करतात. ज्ञानदेवोत्तर काळातील 'मराठी गौळणीं' चे स्वरूप अभ्यासताना ज्ञानदेवांच्या गौळणीचे लोकोत्तरत्व सतत जाणवत राहील हे निश्चित!

**३.३.२.६ उपसंहार :**

ज्ञानेश्वरांनी आपल्या हाती दिलेल्या प्रासादिक अक्षरवाङ्मयापैकी 'ज्ञानेश्वरी' हे गीतेवरील भावार्थभाष्य, निकराच्या आत्मानुभुतीचा मुक्त आविष्कार घडविणारा 'अमृतानुभव' हा ग्रंथ, सिध्दभेटीचे भावपत्र म्हणजे 'चांगदेवपासष्टी' आणि स्वानुभुतीच्या जलाशयातील भावलहरी म्हणजे 'हरिपाठाचे अभंग' या सर्व वाङ्मयनिर्मितीचा

विचार केल्यानंतर ज्ञानदेवांच्या कृतीची आणि विचाराची कल्पना येऊ शकेल. ज्ञानदेवांनी आपल्या कृतीतून आणि वाङ्मयातून सामान्य माणसासाठी मोक्षप्राप्तीचे दरवाजे खुले केले. धर्म मूठभर लोकांचा नसतो, तो सर्वांचा आणि सर्वांसाठी असतो हे त्यांनी दाखवून दिले. भक्तीची आणि मोक्षाची (मुक्तीची) वाट कोणीही चालू शकतो असे त्यांना वाटत होते. मात्र त्यांनी कधी संन्यासाचा आणि विरक्तीचा उपदेश केला नाही. संसारात राहून ईश्वरभक्ती शक्य आहे, असा दिलासा त्यांनी समाजाला दिला. आणि कर्मे करीत राहण्याचा उपदेश केला.

विद्यार्थी मित्रहो! ज्ञानदेवांची अभंगवाणी त्यांच्या भावंडांच्या साहाय्याने फुलून आली. निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताबाई ही त्यांची भावंडे आणि योगी चांगदेव यांच्या अभंगरचनेचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांच्या अभंगानंतर वारकरी संप्रदायातील पहिले आवर्तन पूर्ण होते व या आवर्तनातच संत नामदेवांच्या अभंगवाणीने दुसरे आवर्तन गुंफले ते पाहुया....

## ब) नामदेवांची अभंगरचना :

### ३.४ नामदेवांची अभंगरचना :

#### ३.४.१ प्रस्तावना :

संतश्रेष्ठ नामदेव हे संत ज्ञानेश्वरांचे समकालीन संत. नामदेव ज्ञानदेवांपेक्षा वयाने मोठे असले तरी ते त्यांचे उत्तराधिकारी म्हणावयास हरकत नाही. कारण ज्ञानेश्वरांनी ज्या भागवतधर्माची पायाभरणी केली. त्या भागवतधर्माचा प्रचार आणि प्रसार नामदेवांनी महाराष्ट्र- बीदर-कर्नाटक मार्गे उत्तरप्रदेश, पंजाब (घुमान) पर्यंत केला. संत बहिणाबाईंच्या

''ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणे केलास विस्तार ।।''

या उक्तीप्रमाणे ज्ञानेश्वरांनी उभारलेल्या वारकरी संप्रदायाच्या पायावर खरीखुरी विकसीत धर्मरुपी इमारत बांधण्याची बहुमोल कामगिरी नामदेवांच्या अभंगवाणीने आणि कृतीने पार पाडली. इतकेच नव्हे तर त्यांनी गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, पंजाबात जाऊन लोकांना भक्तिमार्ग शिकविला. एक कुशल संघटक, भागवत धर्माचे प्रसारक व संवर्धक, आपल्या भावमय अभंगवाणीच्या रुपाने वाचकांशी सख्यत्व जोडणारे, सगुण भक्तीत रमून समाजाला मानवतेची उपासना शिकविणारे, उदात्त, प्रसन्न, सोज्वळ, निष्पाप आणि भाववेडे व्यक्तित्व लाभलेल्या नामदेवांचे परमपवित्र चरित्र व वाङ्मयीन कार्य आपण पाहणार आहोत. त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्त्वाचा विचार करायचा झाला तर आज त्यांच्या नावावर विविधतेने नटलेले सुमारे अडीच हजार अभंग उपलब्ध आहेत. विठ्ठलाशी बालपणापासूनच गट्टी असलेल्या एका निराळ्या व्यक्तिमत्वाचा आपण पुढीलप्रमाणे परिचय करून घेणार आहोत.

#### ३.४.२ नामदेवांचा जीवनपरिचय :

मराठवाड्यामधील परभणी जिल्ह्यात 'औंढ्या नागनाथ' नावाचे महादेवाचे पवित्र क्षेत्र आहे. औंढ्या नागनाथपासून पाच कोसांवर नरसी नावाचे गाव आहे. नरसीपासून पाच-सात कोसांवर ब्रांम्हणी नावाचे गाव आहे.

या दोन्ही गावांना मिळून नरसी-बामणी म्हणत असत. या नरसी गावात यदुशेट रेळेकर नावाची व्यक्ती राहात होती व तिचा व्यवसाय कपडे शिवण्याचा होतो. या यदुशेटचा मुलगा हरिशेट, त्याचा मुलगा गोपाळशेट, त्याचा मुलगा गोविंदशेट हे परंपरागत शिंप्यांचा व्यवसाय करत होते. या गोविंदशेटला शिवाजीसेट व नरहरीसेट अशी दोन मुले. घरात पंढरीची वारी अव्याहतपणे चालत आलेली. यापैकी नरहरीशेटचा मुलगा दामाशेटी. या दामाशेटी व गोणाईच्या पोटी शके ११९२ प्रमोदनाम संवत्सरे, कार्तिक शुक्ल ११ रविवार दि. २६ ऑक्टोबर १२७० सूर्योदयास नामदेवांचा जन्म झाला. याचा स्पष्ट उल्लेख नामदेवांच्या

''अधिक ब्यान्नव गणित अकरा शते । उगवता आदित्य तेजोराशी ।

शुक्ल एकादशी कार्तिक रविवार । प्रमोद सवंत्सर शालिवाहन शक ।।''

या अभंगात आला आहे. तर 'शिंपीयाच्या कुळात जन्म माझा झाला' या अभंगातून नामदेवांनी जन्म, कूळ, व्यवसाय इ. विषयी सांगितले आहे. याबरोबरच नामदेवांना जन्म देणारी गोणाई म्हणते,

''नवमासवरी म्या वाहिलासी उदरी ।

गोणाई म्हणे नाम्या राहिलास उदरी ।।

तैहूनि मी करी आस तुझी ।।''

तर जनाबाई म्हणते,

''गोणाईने नवस केला । देवा पुत्र देई मला ।

शुध्द देखोनिया भाव । पोटी आले नामदेव ।''

अशा काही अभंगावरुन नामदेवांचा जन्म पंढरपूर येथे झाला, असाही उल्लेख येतो.

नामदेवांनी आपल्या इ.स. १२७० ते १३५० अशा ८० वर्षांच्या दीर्घायुष्यात भक्तीचे भागवतधर्मी तत्त्वज्ञान समाजाच्या सर्व थरापर्यंत पोहोचविले. महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही भक्तिसंप्रदायाचा प्रसार व विस्तार करणाऱ्या नामदेवांचे घर वारकऱ्याचे होते म्हणून त्यांच्यावर बालपणापासूनच भक्तीचे संस्कार झाले होते.

विठ्ठलाचा लडिवाळ भक्त असलेल्या नामदेवांचे सांसारिक जीवन समृध्द होते. त्यांची पत्नी राजाई, बहीण आऊबाई, मुलगी लिंबाई, नारा, विठा, गोंदा आणि म्हादा ही चार मुले तर लाडाई, गोडावी, येसाई, म्हासाई या चार सुना या खेरीज आई-वडील आणि जनाबाई असे नामदेवांच्या व्यतिरिक्त १४ माणसांचे होते, त्याचा ध्यास सतत नाम:स्मरण, सत्संगती कीर्तन आणि भगवद्‌चिंतन यातच नामदेवांचे आरंभीचे आयुष्य वेचले. नामदेवांचा प्रपंच तर मोठा आणि नामदेवांचे चित्त तर प्रपंचात नाही.

''चवदा मनुष्य आहेत माझ्या घरी

हिंडती दारोदारी अन्नासाठी ।''

ही राजाईची तक्रार व्यर्थ कशी म्हणावी, पण आईच्या आणि पत्नीच्या तक्रारींना नामदेव कुठले भीक घालणार!

''आम्ही जेवलो जेवलो
नामामृते तृप्त झालो ।''

अशा संतुष्ट वृत्तीने नामदेव परमार्थाचा मार्ग चोखाळताना दिसतात.

**३.४.३ नामदेवांची अभंगरचना :**

नामदेवांच्या भागवतधर्म प्रसार आणि अभंगनिर्मिती या कार्याचे महत्व मोठे आहे. कुशल संघटकाचा नेतृत्त्वगुण लाभलेल्या नामदेवांनी भागवत संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार महाराष्ट्रापासून ते थेट बीदर कर्नाटक मार्गे उत्तरप्रदेश पंजाब (घुमान) पर्यंत केला. कृतीला विचाराची जोड देत भक्तीच्या वाटेवर आलेले अनुभव त्यांनी अभंगरुपाने शब्दबध्द केले. नामदेवांच्या नावावर आज जवळजवळ अडीच हजार अभंग उपलब्ध आहेत. त्याचबरोबर नामदेवांची ६३ हिंदी पदेही उपलब्ध आहेत; ज्यांचा समावेश शिखांच्या 'गुरुग्रंथसाहिब' या प्रमाण ग्रंथात 'नामदेव की मुखवाणी' या नावाने झाला आहे. उत्कट भाववृत्ती, अभिजात कवित्व, विशाल सामाजिकता, उत्कट सगुणभक्ती, डोळस निर्गुणोपासना, आत्मनिष्ठ भावदर्शन, ईश्वरी साक्षात्कार इ. गोष्टी नामदेवांच्या अभंगांच्या मुळाशी आहेत. ईश्वरी साक्षात्काराच्या प्रवासातील आणि पारमार्थिक वाटचालीतील भावनात्मक अनुभव त्यांनी आपल्या अभंगात मांडले त्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे-

**३.४.३.१ नामदेवांचे आत्मचरित्रपर अभंग :**

मराठीतील पहिले आत्मचरित्रकार म्हणून नामदेवांचा उल्लेख केला जातो. सकलसंतगाथेत नामदेवांच्या ४९१ आत्मचरित्रपर अभगांचा समावेश झाला आहे. नामदेवांनी या अभंगांमध्ये आपल्या जीवनातील सलगपणे नि संपूर्ण घटना प्रसंगांचे चित्रण केले नसले तरी, त्यांनी विविध मानसिकतेतून आत्मचरित्रपर असे काही लेखन केल्यामुळे ते मराठी साहित्यातील आद्य आत्मचरित्रकार ठरतात. या अभंगांमध्ये नामदेवांच्या लौकिक आणि पारमार्थिक जीवनातील संघर्षमय प्रसंगांचे हळूवार चित्रण पाहावयास मिळते. या अभंगामधून खद्द नामदेव स्वत:च जन्म, कूळ, गृहजीवन, व्यवसाय व भक्तिमार्ग ते ''नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी'' अशा आत्मसुखप्राप्तीच्या जीवनप्रवासाबद्दल बराच तपशील पुरवताना दिसतात. आपल्या जीवनातील प्रमुख अशा चार प्रसंगांचे निवेदन नामदेव या अभंगातून करताना दिसतात. ते प्रसंग असे-

१. विठ्ठलभक्तीला कुटुंबातून होणारा विरोध
२. ज्ञानेश्वरादिकांसमोर मुक्ताबाईंने केलेले अहंकारहरण
३. 'अंतरिचा कोरा' राहिल्यामुळे गुरुकडे झालेली रवानगी व गुरु विसोबा खेचर यांनी दिलेले दर्शन
४. 'शतकोटी' अभंग करण्याची केलेली प्रतिज्ञा.

या प्रसंगातून नामदेवांच्या आध्यात्मिक अंतरंगाचे दर्शन वाचकांना घडते. आपल्या आयुष्यातील प्रमुख

असे चार प्रसंग उत्कटपणे व तितक्याच निसंकोचपणे या अभंगांतून त्यांनी मांडले आहेत. नामदेवांना बालपणीच विठ्ठलाने झपाटले आहे. आणि हेच त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या संबंधित वाटणाऱ्या दु:खाचे मूळ कारण आहे. आपला नामा पंढरीरायाने भूलविला म्हणून

''अगा ये विठोबा पाहे मजकडे । कां गा केले वेडे बाळ माझे''

अशी नामदेवांची आई गोणाई विठ्ठलाबरोबर भांडते. माझे बाळ मला परत दे नाहीतर तुझ्यासहित पंढरी गिळून टाकीन, अस आपला निर्धार ती सांगून टाकते. विठ्ठलभक्तीत रमलेले नामदेव आपल्या आईला 'तू आमची ताटातूट करु पाहातेस, तू माझी आई नव्हे' असे सुनावतात. नामदेवांच्या विठ्ठलभक्तीच्या अनुषंगाने होणारा गोणाई, नामदेवाचा संघर्ष करुणरूप धारण करतो. नंतर नामदेवांची पत्नी राजाई संसारी स्त्रीसुलभ भावनेने पतीचे मन संसाराकडे वळविण्याचा प्रयत्न करते. पतीच्या संसार विन्मुखतेमुळे राजाईच्या मनात भावनांचे आवर्त उभे राहतात.

''लावोनि लंगोटी जालेती गोसावी । आमुची उठाठेवी कोण करी ।

सुखाचा संसार करोनि बारावाटे । नावं केले मोठे जगामाजी ।।

सर्वस्वे सांडोनि धरिला तुम्ही देव । येणें पुसिला ठाव संसारीचा ।

आमुचि करुणा न वाटेचि काही । विनवने राजाई नामदेवा ।।''

हे राजाईचे उद्‌गार तिच्या स्त्रीसुलभ भावनेचे मनोज्ञ दर्शन घडवितात. असा हा नामदेवांच्या विठ्ठलभक्तीने निर्माण झालेला गोणाई-नामदेव, राजाई-नामदेव यांच्यांतील सांसारिक कलह वेधक आहे, तसा त्यांच्यातील आध्यात्मिक पेचही वेधक आहे.

वारकरी संप्रदायातील ज्ञानदेव-नामदेव भेट ही ऐतिहासिक घटना. साक्षात विठ्ठलाने दर्शन दिल्याने नामदेवांची सगुणभक्ती वाढीस लागून अहंकाराचे रूप धारण करते. चंदनाच्या झाडाला सर्पांने वेढावे तसे नामदेवांच्या मनाला अहंकाराने वेढले. अशा स्थितीत नामदेवांची आणि ज्ञानदेवांदी संतांची भेट होते. ''पंढरीचा प्रेमा घरी आला'' म्हणून संतसज्जनांनी नामदेवांना वंदन केले; पण नामदेवांनी मात्र प्रतिवंदन केले नाही.

''नामा म्हणे काय वंदू यांचे चरण । अवघे परब्रम्ह मजपाशी''

नामदेवांनी प्रतिवंदन केले नाही यातील वर्म मुक्ताबाईने जाणले ती म्हणाली-

''अखंड जयाला देवाचा शेजार । का रे नाही गेला अहंकार ।''

म्हणून तिने गोरोबाकाकांकडून त्यांची ब्रह्मज्ञान परीक्षा घेतली. गोरोबांनी नामदेवाच्या भक्तीला अव्दैतबोधाचे अधिष्ठान नसल्याचे सूचविले. त्यामुळे नामदेवांची चित्तशुध्दी झाली.

ज्ञानदेवादी संतांनी केलेल्या अपमानाने नामदेवांना फार दु:खे झाले. त्या दु:खातूनच त्यांच्या मनाने देवाकडे ओढ घेतली. 'श्रीगुरुवाचून मुक्ती तुज नाही' असा नामदेवांना विठ्ठलाचा दृष्टान्त झाला. पुढे संतसंग व

नाममंत्र या श्रध्दास्थानांच्या बळावर नामदेवांची साधकावस्थेतील पूर्वतयारी सुरु झाली. देवळात देवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपलेल्या वृध्दाच्या माध्यमातून त्यांना गुरु विसोबा खेचरांचे दर्शन होते. साऱ्या सृष्टीत परमेश्वर भरुन राहिला आहे. निव्वळ पाषाणमूर्ती म्हणजे देव नव्हे हा विसोबांचा ज्ञानोपदेश नामदेवांनी लक्षपूर्वक ऐकला; आणि त्यांनी आध्यात्मिक जीवनातील 'गुरुकृपा' हा महत्वाचा टप्पा गाठला. सर्व सत्ता हाती आल्याच्या अविर्भावात ते पंढरपुरास आले.

नामदेवांच्या आयुष्यातील चौथा महत्वाचा प्रसंग म्हणजे महर्षी वाल्मिकींनी शतकोटी रामायण रचल्याची कथा नामदेवांनी चंद्रभागेच्या वाळवंटात ऐकिली व विठ्ठलापुढे जाऊन त्यांनी शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा केली. या प्रतिज्ञेला अनुसरुन शतकोटी नसली तरी लाखमोलाची अभंगरचना नामदेवांनी केलेली पाहायला मिळते.

नामदेवांनी आपल्या जीवनातील महत्वाच्या अशा चार प्रसंगांचे चित्रण या अभंगांत केले आहे. नामदेवांच्या आत्मचरित्रपर अभंगांविषयी नि.धों. मिरजकर म्हणतात, 'नामदेवांच्या परमार्थ जीवनातील विविध अवस्था आपल्या आत्मचरित्रात फार उत्कटतेने त्यांनी रंगविलेल्या आहेत. प्रारंभीची बालभक्तीतील गाठ निमग्नता, ज्ञानदेवादी भावंडांच्या भेटीने झालेली अपुरेपणाची जाणीव, विसोबा खेचरांनी केलेला गुरुपदेश आणि त्यामुळे दृष्टीला लाभलेले व्यापकपण या साऱ्या जीवनप्रवासाचा वृत्तांत नामदेव आपल्या आत्मचरित्रपर अभंगांतून वर्णन करतात. त्यांच्या वृत्तीचा विकास होत गेलेला यातून स्पष्टपणे जाणवतो.' (संत नामदेव : चरित्र, काव्य आणि कार्य- नि.धो. मिरजकर. पृष्ठ -५१)

**३.४.३.२ नामदेवांचे संतचरित्रपर अभंग :**

मराठीतील पहिले गद्यचरित्रकार म्हणून म्हाइंभट यांचा उल्लेख केला जात असला तरी काव्याच्या माध्यमातून पहिले चरित्र लिहिण्याचा मान नामदेवांकडे जातो. नामदेवांनी ज्या चरित्रकथा लिहिल्या त्यामागे संतांविषयीचा भक्तिभाव ही मुख्य प्रेरणा होती. भक्तिमार्गाचा प्रसार करण्यासाठी आपल्या भक्तीने ईश्वरास प्रिय झालेल्या अनेक संतांचे आदर्श नामदेवांनी आपल्या या अभंगांतून उभे केले. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई, गोरोबा कुंभार, जनाबाई, नरहरी सोनार, सावता माळी, परिसा भागवत, सेना महाराज या संतांची चरित्रे, तर दशावतार, शुक्र-म्हालसेन, हरिश्चन्द्र-श्रीयाळ, प्रल्हाद, ध्रुव, सुदाम, भीष्म अशी पौराणिक चरित्रेही त्यांनी लिहिली आहेत.

प्रारंभी ज्ञानदेवादी भावंडांच्या ज्ञानाचे, तेजस्वीतेचे, आणि वैराग्याच्या प्रखरतेचे कौतुक नामदेव-

''तिन्ही देव जसे परब्रम्हीचे ठसे । जगी सूर्य जैसे प्रकाशले''

अशा मार्मिक, भावपूर्ण आणि प्रभावी शब्दांत करतात. निवृत्तीनाथांविषयी नामदेवांना फार आदर होता. निवृत्तीनाथ हे ज्ञानदेवांचे गुरू आणि वडीलबंधू म्हणून सर्व संतांना वंदनीय होते. अशा निवृत्तीनाथांविषयी

''नामा म्हणे देवा निवृत्तीसारखा योगी । नाही आता जगी दाखवाया ।''

असे गौरवोद्‌गार नामदेव काढतात. वारकरी संप्रदायातील सर्व संत गोरोबांचा आध्यात्मिक अधिकार

मानायचे तसे नामदेवही गोरोबांना मानायचे. त्यातूनच नामदेव

''गोरा जुनाट पै जुने । हाती थापटणे अनुभवाचे ।

परब्रम्ह म्हातारा निवाला अंतरी । वैराग्याचे वरी पान्हाळला ।''

अशा शब्दांत गोरोबांचा गौरव करतात.

भागवत धर्माचा पाया रचणाऱ्या ज्ञानेश्वरासारख्या श्रेष्ठ संताचे आणि आपल्या मित्राचे चरित्र नामदेवांनी लिहिणे हे स्वाभाविकच होते. 'आदि-समाधी-तीर्थावळी' अशा तीन प्रकरणांतून त्यांनी लिहिलेले 'ज्ञानदेवांचे चरित्र ही महाराष्ट्रातील भक्तभाविकांना मोठी आणि अमूल्य अशी देणगीच होती.' या चरित्राची अभंगसंख्या सुमारे 'साडेतीनशे' इतकी आहे. ज्ञानदेव-नामदेव यांच्यामध्ये असणाऱ्या जिव्हाळ्याच्या नात्यातून नामदेव ज्ञानदेवांना 'ज्ञानराज माझी योग्यांची माऊली' असे म्हणून मातेचे स्थान देतात.

विद्यार्थी मित्रहो! नामदेवांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरचरित्र' चे स्वरूप आपण सविस्तरपणे पाहूया! नामदेवांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वर चरित्राच्या ३५० अभंगांपैकी ६१ अभंग 'आदि' या प्रकरणात आले आहेत. त्यातून नामदेवांनी ज्ञानेश्वरादी भावंडांची 'संन्याशाची मुले' म्हणून समाजाने केलेली हेटाळणी व त्यामुळे ज्ञानदेवांना झालेल्या मनस्तापाचे चित्रण केले आहे. ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्राची उपलब्ध माहिती देण्यावर नामदेवांनी यात भर दिला आहे. सन्यासानंतर पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्या विठ्ठलपंतांना एकापाठोपाठ एक अशी चार अपत्य होणे आणि त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जडणघडण करणे हे सगळे वास्तव नामदेवांनी या प्रकरणात नेमकेपणाने टिपले आहे. (अधिक माहितीसाठी ३:३:१ हा विभाग पहावा)

नामदेवांच्या 'ज्ञानेश्वरचरित्र' मधील 'तीर्थावळी' हे प्रकरण ६२ अभंगांचे आहे. तीर्थावळीचा प्रारंभ 'नामयाचे भेटी ज्ञानदेव आले' असा होतो. या भेटीत नामदेव ज्ञानदेवांना विनम्र भावाने लोटांगण घालतात, भक्तिभावाने पूजा करतात. नंतर तीर्थयात्रेत सहभागी होण्याविषयी ज्ञानेश्वरांनी नामदेवांना केलेली विनंती, नामदेवांनी श्रीविठ्ठलाची अनुमती घेण्यासंबंधी ज्ञानेश्वरांना केलेली विनंती, दोघांनी विठ्ठलाची घेतलेली भेट, विठ्ठलाने काहीशा अनिच्छेने दिलेली अनुमती, नामदेवांच्या वियोगाने विठ्ठलाला व विठ्ठलाच्या वियोगाने नामदेवांना झालेले दु:ख, ज्ञानदेव-नामदेवादी संतांनी तीर्थयात्रेला केलेला प्रारंभ इ. वर्णन येते. तीर्थयात्रेत ज्ञानदेवांचे निराकार, निर्गुण सर्वव्यापी परमेश्वराचे तत्त्वज्ञान नामदेवांना मानवत नव्हते. आपले सर्व सुख विठ्ठलाच्या पायाशी अहे. 'पंढरीनिवास जीवन माझे' असे नामदेव निर्धाराने सांगतात. ज्ञानदेवांच्या आग्रहावरुन नामदेवांनी भजन, नमन, ध्यान, श्रवण, मनन, निदिध्यासन या पायऱ्यांसह आपला निवेदन केलेला भक्तियोग, ज्ञान आणि भक्ती यांचा समन्वय साधणारा तीर्थयात्रेतील उभयंतांचा उत्कट संवाद, नामदेवांचा ज्ञानदेवांनी मुक्त मनाने, मुक्त कंठाने केलेला गौरव, ज्ञानेश्वर नामदेवादी संतांचे तीर्थयात्रेहून पंढरपूरला झालेले आगमन, प्रदीर्घ वियोगानंतर नामदेव-विठ्ठल यांची झालेली प्रेमभेट, विठ्ठलाने नामदेवास विधियुक्त उद्यापन करण्याची केलेली सूचना इ. घटनांचे कथासूत्र 'तीर्थावळी' या प्रकरणात पाहावयास मिळते.

ज्ञानेश्वरचरित्राच्या 'समाधी' या प्रकरणात नामदेवांनी 'ज्ञानदेवांची संजीवन समाधी' हा शोकाकुल करणारा प्रसंग रेखाटला आहे. समाधी घेण्याचा ज्ञानदेवांचा निर्णय समजल्यानंतर निवृत्तीनाथांची अवस्था केविलवानी झाली. भाऊ आणि गुरु अशा दोन्ही दृष्टींनी श्रेष्ठ असणाऱ्या निवृत्तीनाथाला ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वाची आठवण होऊन शोक अनावर होतो. हे पाहून सर्व संत कासाविस होऊन डोळ्यांना पदर लावतात. निवृत्तीची शोकाकुल अवस्था नामदेवांनी

''बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारा वाट मुरडताती ।

हरिणीविण खोपी पडियेली ओस । दशदिशा पाडसे भ्रमताती ।।''

अशा प्रत्ययकारी शब्दांत चित्रित केली आहे. 'नामा म्हणे देवा पेटला हुताशन । करी समाधान निवृत्तीचे' या ओवीतून निवृत्तीचा शोकावेग स्पष्ट होतोच, पण नामदेवांचीही व्याकुळता स्पष्ट होते. ज्ञानेश्वरांच्या प्रत्यक्ष समाधीच्या चित्रणात करुणरसाचा परमोत्कर्ष आणि त्यासोबतच धीरगंभीरता अशा दोन्ही भावनांचे संमिश्र चित्रण आले आहे. इंद्रायणीच्या दोन्ही तीरांवर विविधरंगी जरतारी पताकांचे भार, भोवताली सर्व संतमंडळी ज्ञानदेवांचा हात विठोबाने अणि दुसरा निवृत्तीनाथांनी धरुन त्यांना समाधीस्थानाकडे नेताना भोवतालचा संतांचा समुदाय अनावर दु:खाने कालवून निघतो. त्याचे वर्णन नामदेव,

''नदीचिया माशा घातले माजवन । तैसे जनवन कालवले ।

दाही दिशा धुंद उदयास्तवीण । तैसे ची गगन काळवले. ।।''

अशा समर्पक उपमांच्या मदतीने करतात. ''नामा म्हणे लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्त'' या चरणात नामदेवांनी सर्व संतांची कृतज्ञेची भावना, आदर यांचे चित्रण करुणरसात भिजवून केले आहे. एक मित्र, महान तत्त्वज्ञ संजीवन समाधी घेतो आहे, हा प्रसंग नामदेव प्रत्यक्ष अनुभवतात, पाहतात आणि त्या प्रसंगावर करुणरसमय अभंग लिहितात. नामदेवांचे हे अभंग चरित्रकार आणि चिरित्रविषय अत्यंत एकरुप झाल्याचे द्योतक ठरतात.

**३.४.३.३ नामदेवांचे आत्मनिवेदनपर अभंग :**

नामदेवांचे काव्य 'आपला संवाद आपणाशी' या प्रकारातील आहे. त्यामुळे त्यांच्या भावजीवनात्मक अभंगांतून व्यक्त झालेल्या भावभावना ते विठ्ठलाचे लडिवाळ भक्त असल्याची साक्ष देतात. नामदेव अखेरपर्यंत भक्तच राहिले आहेत. विठ्ठलापाशी मुक्ती नको, भक्ती हवी असा त्यांचा आग्रह आहे. प्रथमपासूनच भक्तिमय जीवन जगणाऱ्या बालभक्त नामदेवांची सारी जीवनयात्राच अशी देवसान्निध्याची आहे. त्यामुळे नामदेवांचे भावकाव्य त्यांच्या भावक्षुब्ध मनाचा उचंबळून आलेला उद्‌गार वाटतो. त्या कवितेविषयी ल. रा. नसिराबादकर म्हणतात, 'अंतर्मुखता, आत्मपरता आणि जिव्हाळा हा नामदेवांच्या कवितेचा गाभा आहे. यातून निर्माण झालेले त्यांचे अभंग अधिक परिणामकारक बनलेले आहेत. त्यांच्या भावजीवनातले विविध प्रसंग या अभंगांनी टिपून घेतलेले आहेत. संसाराशी दुरावा, ईश्वराचे प्रेम, ओढ, आर्तता, शरणागती, त्याच्या दर्शनाची तीव्र तळमळ व तो भेटल्यानंतरचा परमानंद असे अनेकविध भाव या अभंगांतून व्यक्त झालेले आहेत. नामदेवांची ही कविता

त्यांच्या भावजीवनापाशी पूर्णपणे प्रामाणिक राहिलेली आहे.' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल.रा. नसिराबादक, पृष्ठ ७९)

'गुरुवाचूनि मुक्ती नाही' असे मनोमन पटलेल्या नामदेवांचा येथे वृध्दावस्थेतून साधकदशेत प्रवेश झालेला पाहायला मिळतो. आत्मविकासाच्या प्रेरणेतून आपल्या आयुष्याचा जीवनपट त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो. संसाराची क्षणभंगुरत जाणवल्याने ते म्हणतात,

''अंतकाळी मी परदेशी । ऐसे जाणोनि मानसी ।

म्हणोनिया ऋषिकेशी । शरण मी तुज आलो ।''

संसारात आपले असे खरे कोणीच नसते. सगेसोयरे हे तेवढ्यापुरतेच. अंतकाळी ते पाठमोरे होतात. ''एकलेचि येणे एकलेचि जाणे'' हाच येथील न्याय आहे. त्यातूनच ''अंतकाळी मी परदेशी'' ही जाणीव त्यांना बोचते. संसाररुपी मायानदीच्या पुरात मी वाहवत चाललो आहे. तरी ''काढी वेगी हरी मायबापा'' अशी आर्त विनवणी ते विठ्ठलाला करतात. संसार सोडवत नसल्याची खंत वाटून ते आपल्या मनाला दोष लावताना म्हणतात,

''अमृताहूनि गोड नाम तुझे देवा । मन माझे केशवा बा नेघे ।

सांग पंढरीराया काय करु यासी । का रुप ध्यानामासि न ये तुझे ।।''

विषयवासनेने, विकाराने ग्रासलेले चंचल मन विठ्ठलाच्या भेटीला असूसलेले आहे. त्यामुळेच नामदेवांच्या तोंडून

''पाहूं द्या रे मज विठेबाचे मुख । लागलीसे भूक डोळा माझ्या''

असा उद्‌गार बाहेर पडतो.

विठ्ठलाविषयी मातृभावना हे नामदेवांच्या आत्मनिवेदन कवितेचे एक खास वैशिष्ट्य आहे. लेकराने मातेकडे आशाळभूत नजरेने पाहावे तसे ते विठ्ठलाकडे पाहतात. विठ्ठलाला ते कासवीची स्नेहाळदृष्टी, धेनूचा वत्सल भाव, पक्षिणीची चित्तवृत्ती असे निसर्ग सृष्टीतील समर्पक दृष्टांत देतात. विठ्ठलदर्शनाची अपेक्षा करणारे नामदेव अंत:करणात दाटून आलेल्या विठ्ठलवियोगाच्या दु:खाने शिणतात, थकतात. तू माझी जन्मदात्री आहेस, वडीलधारी सखी आहेस, पक्षिणी आहेस, हरिणी आहेस म्हणून आळवणी करतात. त्यांची विठ्ठलमाऊली कृपामय आहे. केवळ स्मरण करताच ती मायेचा प्रेमपान्हा घालते. असा त्यांचा दृढ विश्वास आहे अशा जीवनरुपी विठ्ठलाची नित्य वाट पाहताना नामदेव म्हणतात,

''मी तुझे वच्छ तू माझी माऊली । वीरसोनि घाली प्रेमपान्हा

नामा म्हणे माझी पुरवावी आस । पाजी तान्हुल्यास प्रेमपान्हा ।।''

इतके करुनही पारमार्थिक तळमळ संपत नाही, तेव्हा नामदेव म्हणतात, 'देवा आमच्यासारख्या भक्तांनी तुला थोरपण दिले आहे. ते आमचा पारमार्थिक विकास करण्यासाठी. तेव्हा तू आपले ब्रीद खरे कर. जगात रोगव्याधी नसल्या तर वैद्याला कोणी विचारले असते काय?' अशा विष्णुदासाचा श्रेष्ठपणा सांगण्यासाठी तळ्याकाठी बसूनही मेघाची वाट पाहाणारा चातक, मेघगर्जना ऐकून रानी नृत्य करणारा मोर अशा प्रतिमा नामदेव वापरतात. जलाशिवाय मासोळी राहू शकत नाही, तसा विष्णुदास तुझ्याविना राहू शकत नाही. असे असताना तू त्याला अंतर देतोस असा वारकऱ्यांचा कळवला ते विठ्ठलासमोर मांडतात. नामदेवांचा विठ्ठलाशी सतत असा संवाद चालतो.

नामदेवांची देवाशी असणारी सलगी मोठी भावपूर्ण आहे. ते बालभक्त आहेत, देवाकडून हट्ट पूरवून घेणारे आहेत. देवाशी त्यांच भांडण सहज होतं. देवाची पतितपावन अशी किर्ती ऐकून महाव्दाराशी आलेले नामदेव विठ्ठलाशी प्रेमकलह करुन 'जातो माघारा' म्हणून लटकी धमकीही देतात ती अशी

''पतितपावन नाम ऐकूनि आलो मी द्‌वारा । पतितपावन नव्हेसि म्हणुनि जातो माघारा ।

घ्यावे तेव्हा द्यावे ऐसा अससी उदार । काय धरुनि देवा तुझे कृपणाचे दार ।''

असे त्यांचे विठ्ठलाशी नाते निर्व्याज, निरागस असलेले त्यांच्या अभंगातून प्रत्ययाला येते. या प्रेमकलहाबद्दल विठ्ठलाने आपल्याला समजावून घ्यावे. कारण खुंट्याभोवती फिरुन स्वत:ला गुंतवून घेणाऱ्या वारसाप्रमाणे आपण त्याच्या भावात गुंतलो आहोत. तरी आपला स्वीकार व्हावा असे ते म्हणतात,

नामदेवांच्या मनावर असलेली अशी निराशेची दाट छाया एक दिवस निघून जाते आणि त्यांच्या जीवनात चैतन्याचा प्रकाश येतो. ईश्वरदर्शनाने, साक्षात्काराने फुललेली आपली भाववृत्ती नामदेव

''तू अवकाश मी भूमिका । तू लिंग मी साळुंका ।

तू समुद्र मी व्दारका । स्वयें दोन्ही ।।''

अशा प्रभावी शब्दांत व्यक्त करतात. अनंतत्त्वाशी झालेली एकरुपता व देव आणि आपण म्हणजे भक्त या दोन गोष्टी नसून एकच आहेत, असा लोकविलक्षण अनुभव ते व्यक्त करतात. परमेश्वराशी एकरुप झाल्यानंतर येणाऱ्या परमोच्च अनुभवाची प्रचीती किती उत्कट आणि काव्यपूर्ण होऊ शकते, याचा पुरावाच या अभंगातून मिळतो. 'नामदेवाचे अनुभव आणि काव्य' 'स्वयें दोन्ही' येथे एकरुप झालेले आहेत. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल.रा. नसिराबादकर पृष्ठ क्र. ८०)

ईश्वरतत्त्वाशी एकरुप झालेले नामदेव कोठेही गेलो तरी नाममहिमा सोडणार नसल्याचा निश्चय करतात. श्वान, पक्षी, झाड, पाषाण, उदक अशा कोणत्याही रूपात जन्म मिळाला तरी 'विठ्ठलाचे सान्निध्य तरी लाभावे' अशी इच्छा व्यक्त करतात. (ही इच्छा त्यांनी समधीसमयी महाव्दाराच्या पायरीशी आपला देह समर्पित करुन स्वत:च पूर्ण करुन घेतली आहे.)

आर्ततेच्या सर्व सीमा ओलांडल्या गेल्यावरही त्यांचा निश्चय कोठे ढळलेला नाही.

''देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।''

असे म्हणून स्वत:ला कायवाचामने पांडुरंगाच्या स्वाधीन करतात. असा पांडुरंगाचा धावा करता करता देवाच्या भेटीचा तो मंगलप्रसंग येतो. नामदेवांना देवदर्शन घडते. विठ्ठलाची आपल्यावर कृपा होऊन भेट झाली या भेटीचा आनंद नामदेव,

''त्वरे धावोनिया आलासे गोविंद । सावध सावध नामदेव ।

रुसलासी नामा देवासी न बोले । करे कुर्वाळीले वदन तेव्हा

समजावूनि देवे धरिला पोटासी । बोले मजपाशी नामदेवा''

अशा शब्दांत व्यक्त करतात.

नामदेवांच्या या आत्मनिवेदनपर अभंगांत संसारपराङ्मुखता, देवासाठी आर्त तळमळ, विठ्ठलाशी प्रेमकलह, विठ्ठल आणि नामदेव यांची उराउरी भेट यांचे भावसुंदर वर्णन आलेले आहे. या अभंगांतून देवासाठी जीव टाकणारे, त्यांच्या भेटीसाठी आसुसलेले आणि देवदर्शनाने हरकून गेलेले नामदेव आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात.

**३.४.३.४ नामदेवांचे बालक्रीडेचे अभंग :**

प्राचीन मराठी कवितेत सर्वच संतांनी श्रीकृष्णाच्या बाललीला वर्णिल्या आहेत. पंढरपूर येथील विठ्ठल म्हणजे श्रीकृष्णाचे रूप असल्यामुळे त्याच्या बालपणापासून ते यौवनावस्थेपर्यंतचे कृष्णजीवनातील विविध प्रसंग नामदेवांनी या अभंगातून टिपले आहेत. श्रीकृष्णाचे मनोहारी रूप, त्याच्या खोड्या, खोड्यांनी त्रासलेल्या गोपींनी यशोदेकडे त्याविषयी केलेल्या कागाळ्या, यशोदेने गोपींची काढलेली समजूत, श्रीकृष्णाने गोपाळांच्यासह यमुनाकाठावर केलेली क्रीडा, कालियामर्दन, श्रीकृष्णाच्या बालपणीच्या पराक्रमाची अद्‌भुत कृत्ये व श्रीकृष्ण मथुरेला जाताना व गेल्यावर गोपींची व साऱ्या गोकुळाची झालेली विराहावस्था इ. प्रसंग नामदेवांनी या अभंगांत वर्णिले आहेत.

''आक्रुरा आम्ही पसरितो पदर । नेऊ नका श्रीधर मथुरेसी ।''

आणि

''युगाबरोबरी जाताती घटिका । उदास दिसती वने दाही दिशा

रोडावल्या गायी करिताती खंती । वत्से न करिती स्तनपान

अन्नपाणी तेव्हा वर्जिती गौळणी । आता चक्रपाणी कैंचा आम्हां ।।''

अशा शब्दांत नामदेव हे प्रसंग वर्णन करतात.

''गोपिका वस्त्रहरणासारखी रोमांचकारी शृंगार कथा नामदेव एका अभंगात हकिगतवजा सांगून टाकतात. त्यात त्यांचे मन फारसे रमत नाही. पण

''तळवे तळहात टेकींत, डाव्या गुडघ्या रांगत।

रंगी रंगनाथ । तो म्यां देखिला सये ।।१।।

गवळणी जसवंती पै सांगे । आले या कृष्णाचेनि मात्रें ।

येणे येणे वो श्रीरंगे । नवनीत माझे भक्षिले ।।२।।''

असे असणाऱ्या कृष्णाचे वात्सल्यभाव जे कौतुक करणाऱ्या गवळणींच्या मनोवृत्तीशी मात्र नामदेव पूर्णपणे रंगून जातात. वारकऱ्यांच्या कीर्तनात अशा गवळणींच्या कथा रंगलेल्या दिसतात.'' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास: प्र.न. जोशी, पृष्ठ १०९)

**३.४.३.५ नामदेवांचे उपदेशपर अभंग :**

विठ्ठलावरती लोभावलेल्या नामदेवांनी त्याला आपल्या बालपणीच वश करुन घेतले असल्यामुळे त्यांना लौकिकाची चाड राहिली नाही. बरोबरीची मुले संसारात असताना हे मात्र त्यापासून अलिप्त राहून विठ्ठलाच्या सगुणरुपाकडे आकर्षिले गेले. शिवण्या-टिपण्यावर पाणी सोडलेल्या नामदेवांची ईश्वरभक्ती दामाशेटी, गोणाई, राजाई यांच्या चिंतेचे कारण बनली.

नामदेवकालीन समाजात धर्माचे अवडंबर माजले होते. खरा धर्म ग्रंथापुरताच मर्यादित राहिला होता. ढोंगीसाधू भोळ्या भाविकांना फसवित होते. जातीभेदांनी विभागलेल्या समाजात कर्मकांडाचे प्रभुत्व होते. वैदिक धर्माच्या उज्ज्वल परंपरेस कर्मठता व पढिक पांडित्य यांनी काळिमा फासला होता. कर्मकांड, यज्ञयाग, जारण-मारण, उग्र उपवास, तप, उद्यापने, व्रतवैकल्ये यातच सर्वांचा वेळ जात होता. हेमांड पंडितांच्या 'चतुर्वर्गचिंतामणी' त सांगितलेली दोन हजार व्रते याचा चांगला पुरावा आहे. सर्वसामान्यांची धार्मिक कुचंबना होत होती. विविध देवता, धर्म यांचे प्रस्थ माजले होते. हे सर्व नामदेव उघड्या डोळ्यांनी पाहात होते. त्यामुळे ते घरातील संसार अर्ध्यावर सोडून विश्वाचा संसार करण्यास घराबाहेर पडले.

'कीर्तन' आणि 'नामस्मरण' ही दोन प्रभावी माध्यमे वापरुन नामदेवांनी साधा-सोपा भक्तिमार्ग सर्वसामान्यापर्यंत पोहेचविला. प्रारंभी धार्मिक उपदेश करताना शैव आणि वैष्णव यांच्यामध्ये अव्दैत साधून 'हरिहरा भेद अमंगळ' मानला. देव हा एकच आहे आणि तो सर्वत्र भरलेला आहे. हा वैष्णवांचा आवडता सिध्दान्त आहे. हे सांगताना शिव आणि विष्णू यांच्या अव्दैताविषयी नामदेवांनी केलेला निवाडा खालील अभंगात पाहायला मिळतो. तो असा,

''विष्णुसी भजला शिव दुरावला । अध:पात जाला तया नरा ।

शिवपूजा करी विष्णुसी अव्हेरी । तयाचिये घरी यम नांदे ।

विष्णुकथा ऐके शिवासी जो निंदी । तयासी गोविंद ठाव नाही ।

नामा म्हणे शिवविष्णुमूर्ती एक । वेदाचा विवेक आत्माराम ।।''

असा हा देव एकत्वाने पंढरीत वसला आहे. त्यासाठी पंढरीची वारी करा, कारण पंढरीच्या वारीतच मोक्ष हाती येईल. वैष्णवजन व्हा, भक्त व्हा, देवाचे नाम घ्या. हा नामदेवांनी केलेला उपदेश माणसाला आदर्शप्रत नेणारा आहे.

नामदेव कीर्तनाच्या माध्यमातून भक्तीचा उपदेश करता करता परस्त्री मातेसमान मानावी, परद्रव्य पाषाणासारखे समजावे, दुसऱ्यांची निंदा करु नये. आपली निंदा केल्यास व्देष धरु नये, दुसऱ्याच्या दुःखाने कळवळावे, दुसऱ्यासाठी प्रसंगी प्राणाचे बलिदान द्यावे, इ. नैतिक उपदेशही करतात. नरदेह दुर्लभ आहे, तो मोठ्या सायासाने मिळालेला आहे. संधी मिळाली आहे तोवर उपयोग करुन घ्या; आणि देवभक्तीची त्वरा करा असे ते कळकळीने सांगतात.

**३.४.३.६ नामदेवांची इतर रचना :**

नामदेवांचे स्फुट अभंग म्हणजे प्राचीन मराठीमधील पहिली भावकविता आहे. या कवितेतील भाव अर्थातच भक्तीचा आहे. या भक्तीच्या विविध आणि मधूर छटा त्यांच्या आरती, भूपाळ्यांमध्ये साठविलेल्या आहेत.

''युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा'' ही त्यांची आरती तर सर्वतोमुखी आहे ''आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझिया सकळा हरिच्या दासा ।'' हे पसायदान म्हणजे ''हा विश्वचि माझा संसार'' अशा मानवतेच्या व व्यापक वृत्तीतून प्रगटलेला नामदेवाच्या मनाचा आरसाच म्हणता येईल. आपल्या विठ्ठलमय होऊन गेलेल्या मनाची स्थिती नामदेव पुढीलप्रमाणे प्रकट करतात,

''तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल । देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल ।।

माता विठ्ठल पिता विठ्ठल । बंधु विठ्ठल योग विठ्ठल ।।

गुरु विठ्ठल गुरुदेवता विठ्ठल । निधान विठ्ठल निरंतर ।।

नामा म्हणे मला विठ्ठल सापडला । म्हणून कळिकाळा पाड नाही ।।''

अशा प्रकारे नामदेवांच्या अभंगांमध्ये भक्तीची आर्तता व जिव्हाळा ओतपोत भरलेला आहे.

**३.४.३.७ नामदेवांची हिंदी अभंगरचना :**

महाराष्ट्रात जशी नामदेवांची अभंगवाणी प्रसिध्द आहे तशी हिंदी भाषिक प्रदेशात नामदेवांची हिंदी पदावली लोकप्रिय आहे. पंजाबमध्ये नामदेवांचे वास्तव्य पाच वर्षे म्हणजेच इ.स. १३४९ पर्यंत होते. तेथे त्यांनी आपल्या अनेक हिंदी पदांमधून भगवद्‌भक्तीचा मार्ग विशद केला आहे. पंजाबमधील शिखांच्या 'गुरुग्रंथसाहिब'

या ग्रंथात नामदेवाची ६३ पदे समाविष्ट आहेत. 'भक्त नामदेव की मुखवाणी' ही नामदेवांची काव्यकृती सर्वांच्या आदरास प्राप्त झाली आहे. त्यात त्यांनी आपल्या शिंपी जातीविषयी, गुरु विसोबा खेचरांविषयी व उपास्यदैवत विठ्ठलाविषयी निर्देश केला आहे. मराठी 'अभंगवाणी' आणि हिंदी 'मुखबाणी' मध्ये नाम:स्मरणाचा महिमा, कर्मकांडाचा निषेध, जाती-पाती न मानने इ. बाबतीत आशयाच्या दृष्टीने साम्य आढळते.

कोणताही स्वार्थ नसताना एकट्या नामदेवांनी उत्तर भारतात, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, पंजाबात जाऊन पदयात्रा करुन कीर्तनाद्वारे साध्या-भोळ्या व अबाल वृध्द स्त्री पुरुषांना ईश्वरी भक्तीच्या प्रेमानंदात रंगविले. पंजाबमध्ये असणारा नामदेवसमाज, नामदेव मठ, नामदेवांचे 'घुमान' येथील मंदिर, त्यांच्या नावाच्या काही संस्था, नामियाना तलाव आणि नामदेवांच्या हिंदी अमृतवाणीचा आदरपूर्वक केला जाणारा नित्यपाठ इ. गोष्टी त्याच्या साक्षी आहेत. उदाहरणादाखल 'विठ्ठलमयजगत' ही पदावली पाहू.

''आनिले कुम्भ भराइले उदक । ठाकूर कऊ इसनानू करवू ।

बइआलीस लख जी जल मई होते । बीढलू भैला काइ करऊ ।।१।।

जत जाऊ तत बीढलू भैला । महा अनंद कटे सद केला ।।२।।'' ।।रहाऊ।।

(श्रीनामदेव : चरित्र, काव्य आणि कार्य : ग.वि. कविटकर)

देवाला ज्या पाण्याने स्नान घालावे त्या पाण्यात अगोदरच बेचाळीस लक्ष जीवांनी स्नान केले होते, पूजेकरिता फुले आणून माळ गुंफली, पण त्यांचा गंध परमेश्वराचा अंश असलेल्या भ्रमरांनी अगोदरच घेतला होता. नैवेद्याला दुधाची खीर केली तर परमेश्वररुपी वासराने ते आधीच उष्टावले होते. असे अनेक दृष्टान्त देऊन नामदेवांनी या पदामधून भगवंतावाचून रिता ठाव नाही हे स्पष्ट केले आहे. पृथ्वीवरील, जळी, स्थळी, पाषाणी सर्व ठिकाणी तो व्यापून राहिला आहे. असा जीव-शिव ऐक्याचा वेगळा अनुभव नामदेवांनी घडविला आहे.

**३.४.३.८ उपसंहार :**

नामदेव हे वारकरी संप्रदायातील एक लोकप्रिय संतकवी आहेत. विठ्ठलाचे नामसंकीर्तन करणारी त्यांची अभंगवाणी भागवतधर्मीय संतसज्जनाना अधिक प्रिय होती. नामदेवांच्या कवित्वाचा मुख्य उद्देश विठ्ठलाला वश करण्याचा आहे. नामदेवांच्या अभंगाविषयी शं. गो. तुळपुळे म्हणतात, ''हरिनामाचा महिमा गावा, भक्ती वाढवावी आणि हरिदासांना सकल्प आयुष्य व संतमंडळीस सुख चिंतावे, यापरता अन्य हेतू मनात ठेवून नामदेवांनी ग्रंथरचना केली नाही.'' (पांच संतकवी : शं. गो. तुळपुळे, पृष्ठ १७२) महाराष्ट्रातील भक्तिपंथाचे जे तत्त्वज्ञान सिध्द झाले ते तत्त्वज्ञान ज्ञानदेवांनी आपल्या काव्यातून घडविले तर ज्ञानेश्वरांच्या परमार्थ प्रांतातले किंकरत्व पत्करणाऱ्या नामदेवांनी तत्त्वविस्तार केला. हे संत बहिणाबाईंच्या

''ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।

नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार ।।''

या उद्‌गारातून अधिक सूचित होते. नामदेवांनी आपल्या अभंगातून परमार्थ क्षेत्रातील आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी या चारही पायऱ्या पार करुन आत्महित केल्याचे जाणवते. नामदेवांची एकूणच कविता ईश्वरनिष्ठा जोपासणारी, ईश्वरतत्त्वाशी सतत संवाद साधणारी आणि ईश्वराशी एकरुप होण्याची इच्छा बाळगणारी आहे. प्रारंभी शरीराने प्रपंचात आणि मनाने परमार्थाकडे असणारी नामदेवांची वृत्ती शेवटी कायावाचामने परमार्थाकडे झुकलेली पाहायला मिळते.

विठ्ठल हा नामदेवांचा प्राणसखा आहे. विठ्ठलाविषयी त्यांच्या मनात मातृभाव आहे. म्हणूनच विठ्ठलाला ते जननी, धेनू, पक्षिणी, कासवी अशी मातृरुपे देतात. प्रासादिक भाषेत असलेले नामदेवांचे अभंग विविध प्रतिमा-अलंकारांनी नटलेले आहेत. नामदेवांचा एकेक अभंग म्हणजे उत्कृष्ट 'भावगीत' आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

विद्यार्थी मित्रहो !

''घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रुप तुझे ।
प्रेमे अलिंगन आनंदे पूजीन । भावे ओवाळीन म्हणे नामा ।।''

भागवत संप्रदायातील कोणताही उत्सव सोहळा नामदेवांच्या वरील भावोर्मीची आळवणी केल्याशिवाय संपत नाही. लोटांगण घालीतच देवाच्या भेटीला जायचे, देवाचे समचरण हाती लागल्यावरच ते लोटांगण थांबायचे, तो आनंद मनात मुरत असतानाच दोन्ही डोळ्यांत देवाचे सुकुमार सावळे रुप साठवायचे, त्या अवस्थेतच देवाला अलिंगन द्यायचे आणि भानावर येताच त्याची पूजा करायची, त्याला ओवाळायचे या ध्यासाचा सहजोद्‌गार म्हणजे हा अभंग. नामदेवांनी आपल्या अभंगातून भाविकांचा क्रमबध्द भावक्रियेचा आविष्कार घडविला आहे. नामदेवांचा प्रत्येक अभंग म्हणजे त्याच्या काव्यसौदर्याचे भिन्न-भिन्न पैलू आहेत. याविषयी हे.वि. इनामदार म्हणतात, ''नामदेव हे थोर भक्त होते, तसेच ते कुशल संघटकही होते. वारकरी सांप्रदायाच्या संघटनेचे कार्य त्यांनी ज्ञानेश्वरांच्या हयातीत तर केलेच; पण ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतरही ५० वर्षे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही नामदेवांनी विठ्ठलभक्तीचा ध्वज फडकविला.'' (संत नामदेव : हे.वि. इनामदार, पृष्ठ क्र. १६९)

नामदेवांच्या एकूणच कार्यावरुन त्यांना मराठीतील पहिले पद्यचरित्रकार, भावकवी, आत्मचरित्रकार, भागवत धर्माचे पहिले संघटक, प्रचारक, कीर्तनपरंपरेचे आद्य प्रवर्तक अशी जी बिरुदे लागलेली पाहायला मिळतात ती सार्थच आहेत.

## ३.५ संतमेळ्यातील इतर संत : सांवतामाळी, गोरोबा कुंभार, मुक्ताबाई, सेना महाराज, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, कान्होपात्रा यांच्या रचना.

### ३.५.१ प्रस्तावना :

विद्यार्थी मित्रांनो! मागे आपण वारकरी संप्रदायाचा पाया रचणारे ज्ञानेश्वर आणि त्याचा विस्तार करणारे नामदेव यांच्या काव्याचे स्वरुप पाहिले. संतांचे हे काव्य म्हणजे महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचे परमभूषण आहे.

या काव्याचा उगम ज्ञानदेवांचे गुरु श्री निवृत्तीनाथ यांच्या अभंगांपासून झाला तर त्याची परिणती भागवत धर्मरूपी मंदिरावर कळसरुपात विराजमान झालेल्या तुकाराम यांचे शिष्य निळोबाराय यांच्या काव्यात झालेली पाहायला मिळते. या काव्याच्या पायापासून ते कळसापर्यंतच्या अवकाशात अनेकांनी आपापले सूर मिळवत तिला आपापल्या प्रतिभेचे लेणे अर्पण करुन समृध्द केले आहे. त्यात ज्ञानदेव, तुकारामांसारखे चित्सूर्य आहेत, भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे व कीर्तन परंपरेचे आद्यप्रर्वतक भक्तश्रेष्ठ नामदेव आहेत. तिला मजबूत खांब देणारे समन्वयकार एकनाथ आहेत. संत चोखामेळ्यासारखे पाईक आहेत. आपला व्यवसायच विठ्ठलमय करून टाकणारे सावता माळी व नरहरी सोनार सारखे वारकरी आहेत, ब्रह्मज्ञानाची परीक्षा घेणारे गोरोबा कुंभार आहेत, आपल्या व्यवसायाला भक्तिस्थानावर पोहोचविणारे सेना महाराज आहेत. मुक्ताबाई-जनाबाई-कान्होपात्रा सारख्या साध्या भोळ्या स्त्रिया आहेत. या काव्याला वेगळ्या मार्गाने येऊन मिळालेला एखादा रामदासी खळाळही आहे. अशा अखंड वाहणाऱ्या विविध निर्झरांनी संतकाव्याची पवित्र गंगा दुथडी भरुन वाहताना दिसते.

१३ व्या शतकातील महाराष्ट्र ज्ञानेश्वरांच्या तेजस्वी व्यक्तिमत्वाने व नामदेवांच्या कुशल संघटकतेने भारलेला होता. ज्ञानदेव-नामदेव यांनी उभारलेल्या वारकरी संप्रदायात पुढे अठरापगड जातीचे लोक सहभागी झाले. ज्यांनी जातीयवाद आणि कर्मकांडाला मूठमाती देऊन 'रामकृष्णहरी' हा षडाक्षरी मंत्र आळवत आपल्या व्यवसायातच परमेश्वरप्राप्तीचा मार्ग शोधला. 'हाती काम मुखी नाम' हे या संतकवींचे ब्रीद होते. याला अनुसरून संसारात व व्यवसायात राहून परमार्थ साधता येतो, हे त्यांनी दाखवून दिले. ज्ञानेश्वर-नामदेवादी काव्यातून जे भावविचार मांडले गेले, त्याचे प्रतिध्वनी संतमेळ्याच्या काव्यातून उमटून मराठी भावकविता येथून दुथडी वाहू लागली. या संतमेळ्यातील कवी आधी संत होते व नंतर कवी होते. या संतमेळ्याविषयी विठ्ठल अनंत कुलकर्णी म्हणतात, ''वसंतऋतू प्राप्त झाला म्हणजे असंख्य तरूलता पल्लवित व पुष्पित होतात, त्याप्रमाणे एखादा महापुरूष उदयाला आला म्हणजे त्याच्या स्फूर्तीने अनेक लहान मोठे लोक निर्माण होतात. असाच प्रकार मराठी वाङ्मयात झालेला आढळून येतो. श्री ज्ञानेश्वर-नामदेवांनी जो ज्ञानभक्तीचा संप्रदाय स्थापन केला त्यात पुष्कळ लहान मोठ्या अधिकाराचे संत उत्पन्न झाले.'' (मराठी काव्यसमीक्षा: विठ्ठल अनंत कुलकर्णी, पृष्ठ क्र. ५०). चंद्रभागेतीरी हा संतमेळा हरिनामाच्या गजरात स्वत:ला विसरू लागला आणि सांस्कृतिक जीवनात एका नव्या आध्यात्मिक व धार्मिक लोकशाहीचा जन्म झाला. या संतमेळ्यातील काही प्रमुख संत पुढीलप्रमाणे-

### ३.५.२ सावता माळी : (इ.स. १२५०-१२९५)

सावता माळी यांचा जन्म पंढरपूरपासून दहा मैलावर असलेल्या मोडलिंबाजवळील 'अरणभेंडी' या गावी इ.स. १२५० मध्ये झाला. सावता माळी नामदेवांपेक्षा २० वर्षांनी आणि ज्ञानदेवांपेक्षा २५ वर्षांनी मोठे होते. सावता पांडुरंगाचे निस्सिम भक्त होते. ते पांडुरंगाच्या भजनपूजनात नेहमी मग्न असत. त्यांची पत्नी व ८ वर्षांची मुलगी हे सर्वच विठ्ठलाचे भक्त होते. सांवताची पत्नी सांवताना ईश्वरदर्शनासाठी पंढरीस जाण्यास विनवणी करीत असे. पंढरीला जाण्यावरून त्या दोघांमध्ये जो संवाद घडला तो असा -

पत्नी : यंदा आषाढी एकादशीला पंढरपूरास विठ्ठलाच्या दर्शनाला जायचं काय?

सांवता : आपण पंढरपूरास गेलो तर इथं मळ्याची राखण कोण करील?

पत्नी : आपण एवढे विठ्ठलभक्त! मळ्यात काम करताना तोंडात नेहमी विठ्ठलाचं नाव. असं असताना पंढरपूरी जाणं का होत नाही?

सांवता : अगं, विठोबा काय पंढरपूरातच आहे? तो सर्वत्र भरून राहिला आहे. सर्व वस्तू, सर्व प्राणी यात तो आहेच.

पत्नी : ते सर्व खरं, पण लौकिक व्यवहार म्हणून मी म्हणत होते

(इथे संवाद संपतो)

पंढरीला जाण्यासंबंधी सावताने आपल्या पत्नीला दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक आहे. आपल्या कर्तव्यकर्मावर विश्वास ठेवणारे आणि आपला सबंध व्यवसायच हरिरूप माननारे एक थोर संत म्हणजे सांवता माळी होय. सांवता माळी कधी पंढरपूरला गेलेच नाहीत. त्यांची भक्ती इतकी भावमय होती की खुद्द विठूरायाच सावताना भेटायला त्याच्या 'अरण' गावी आला. आजही इतर संतासारखी सावताची पालखी पंढरपूरात जात नाही, तर आषाढी संपल्यानंतर स्वत: पांडुरंगाची पालखी पंढरपूरातून निघून सांवताच्या 'अरण' या गावी येते. अशा संत सांवताचे भक्तीने भरलेले एकूण ३६ अभंग गाथेत उपलब्ध आहेत. सावता माळी आपल्या व्यवसायातच भक्तीचे फूलझाड फुलविताना म्हणतात,

''कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।

लसूण मिरची कोथंबिरी । अवघा झाला माझा हरि ।

मोट नाड विहिर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।

सावता म्हणे केला मळा । विठ्ठलापायि गोविला गळा ।। ''

असा आपला सारा माळी व्यवसायच ते विठ्ठलमय करून टाकतात. मळ्यातील प्रत्येक वस्तूमध्ये श्रीहरी भरून राहिला आहे, अशी त्यांची धारणा आहे.

सावता विठ्ठलाचे निस्सिम भक्त असल्याने त्यांचे सर्व कुटुंबच भक्तिमय वातावरणात वावरत होते. त्यांची आठ वर्षांची मुलगीही विठ्ठलभक्तीत रमली होती. तिने आपल्याला विठ्ठल भेटावा म्हणून हट्ट धरला. विठ्ठलासाठी ती कडक उपास-तपास करू लागली. ती काही खाईना की पिईना, मुखाने अखंड भजन चालूच होते. मातापित्यानी खूप समजावले पण ती ऐकेना, हळूहळू ती अशक्त होऊ लागली. तिला बसल्या जागेवरून उठवेना, सांवताने विठ्ठलाची प्रार्थना केली, शेवटी विठ्ठलाला आपल्या भक्ताची दया आली. तो सगुणरूपाने रात्रीच्यावेळी सांवताच्या झोपडीत प्रगट झाला. विठ्ठलाला पाहून सावता, त्याची पत्नी व मुलगी या सर्वांना धन्यता वाटली.

सावता म्हणतात,

''विकसला नयन स्फूरण आले बाही । दाटले-हृदयी करुणाभरिते ।
जातां मार्गी भक्त सांवता तो माळी । आला तयाजवळी पांडूरंग ।
माथा ठेवूनि हात केला सावधान । दिले अलिंगन चहुभुजी ।
चरणी ठेवूनि माथा विनवितो सावता । बैसा पंढरीनाथा करितो पूजा ।।''

तिघांनी मनोभावे पूजा केली. अशाप्रकारे विठ्ठल त्यांना भेटला.

एकनिष्ठेने श्रीहरीला भजल्यावर कोणताही दोष उरत नाही. हे सांवताच्या उदाहरणावरून पटते. आपल्या हीन यातीबद्दल विषाद वाटण्याऐवजी त्यांना आनंद वाटतो. आपल्या हीन यातीबद्दल परमेश्वराने क्षमा करून आपल्यावर कृपा करावी असे सांगताना सावता एका अभंगात म्हणतात,

''भक्ती केली हीन याती । नाही वाढली महती ।
जरी असता ब्राम्हण जन्म । तरी हे अंगी लागते कर्म ।
स्नान नाही संध्या नाही । यातिकूळ संबंध नाही ।
सावता म्हणे हीन याती । कृपा करावी श्रीपती ।।''

सोवळ्या-ओवळ्याचे पाश तोडणाऱ्या सावताच्या मनाच्या मोठेपणाचे लक्षण या अभंगातून जाणवते. हे उदाहरण म्हणजे तत्कालीन सामाजिक, धार्मिक स्थितीतील विषमतेचे बोलके उदाहरण आहे. असा आपल्या हीन यातीबद्दल अभिमान बाळगणारे सावता आणखी एका अभंगातून,

''नको तुझे ज्ञान नको तुझा मान । माझे आहे मन वेगळेची ।
नको तुझी भक्ती नको तुझी मुक्ती । मज आहे विश्रांती वेगळीच ।
चरणी ठेवूनि माथा विनवीतसे सावता । ऐका पंढरीनाथा विज्ञापना ।।''

सांवता देवाजवळ असे मागणे मागतात. सावताच्या या मागणीविषयी ल. रा. पांगारकर म्हणतात, ''मला ज्ञान नको, मानसन्मान नको, भुक्ती नको, मुक्ती नको, एक तुझी निर्मळ भक्ती पाहिजे. स्नान नाही, संध्या नाही, यातिकूळसंबंध नाही, असा मी हीन याती पामर तुलाच सतत हृदयी बाळगणारा आहे. असे त्यांनी अभंगातून म्हटले आहे. गौळियांच्या भक्तीला भुलून परतंत्र झालेला व विटेवर उभा राहिलेला हा परब्रह्मपुतळा! त्याजवरून 'तनुमनाची कुरवंडी' करून त्याच्या प्रेमात व नामचिंतनात अहोरात्र तन्मय होऊन राहणे, यापरते मला काही नको असे त्यांचे मागणे आहे.'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, ल. रा. पांगारकर, पृष्ठ ४६०)

सावताने शेतबागायात लावण्याचे काम अत्यंत अभिमानाने मिरवले. हे कमी होते म्हणून ते म्हणत होते-

''प्रपंची असूनि परमार्थ साधावा । वाचे आठवावा पांडुरंग ।

उंच नीच काही न पाहे सर्वथा । पुराणीच्या कथा पुराणीच ।।''

त्याही पुढे जात या शेतकरी संताने वेदांनाही खरा देव कळलाच नाही असे ठणकावून सांगितले.

''ऋग्वेद श्रृती शास्त्रे पुराणे श्रमती ।

परि तया विठ्ठल गम्य नाही ।।''

सांवतानी हा नव्या कर्मयोगाचा विचार स्वत: घडवला, जीवनात उतरवला, जगाला सांगितला. त्याचा आदर्श उभा केला, तोही अवघ्या ४५ वर्षाच्या आयुष्यात. नवज्वर नावाच्या तापामुळे सावतानी हे जग सोडल्याचा संदर्भ सापडतो. सामान्य माणसासारखे आयुष्य जगणाऱ्या सावताचे असामान्यत्व त्यांच्या विचार आणि कृतीत सामावलेलं आहे.

सांवता माळी काय किंवा गोरोबा कुंभार काय त्यांच्या आयुष्यातील चमत्कारांपेक्षा त्यांच्या अभंगातून प्रकट होणारी सामाजिक जाणीव आणि भक्तीची तीव्रता यांचेच मोल अधिक मानावे लागेल. अत्यंत साधी प्रेमळ वाणी आणि भावनावेग ही सांवताच्या अभंगाची वैशिष्ट्ये सांगता येतील. ''सावता सागर, प्रेमाचा आगर'' अशा वेचक शब्दांत नामदेवांनी सावताचा गौरव केला आहे.

**३.५.३ गोरोबा कुंभार :**

गोरोबा कुंभार यांचा जन्म इ.स. १२६७ मध्ये उस्मानाबादपासून सुमारे बावीस किलोमीटर अंतरावर 'तेरढोकी' या गावी झाला. संतमंडळात सर्वात ज्येष्ठ असल्याने त्यांना सर्वजण 'गोरोबा काका' म्हणत. वयाने सर्वात मोठे तसे वैराग्यातही सर्वात श्रेष्ठ होते. विठ्ठलभक्ती मार्गावरील वाटसरू होते. तसेच त्यांना अध्यात्माच्या क्षेत्रात अनुभवी संत म्हणून मानले जात होते. गोरोबांनी ज्ञानदेवादी भावंडांच्या भेटीस आलेल्या संत नामदेवांची 'हा घट कच्चा की पक्का ठरविण्याची' ब्रह्मज्ञान परीक्षा घेत अनुभवाचे थापटणे थापटून नामदेवांचा घट कच्चा असल्याचा निवाडा केला असल्यामुळे ते संतमंडळात संतपरीक्षक म्हणून मान्यता पावले होते. नामदेवांची परमार्थ परीक्षा घेतल्यापासून त्यांची सगुणभक्ती डोळस झाली. त्यामुळे 'गोरा जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे' असे खुद्द नामदेवांनी गोरोबाकाकाविषयी गौरवोद्गार काढलेले आहे. गोरोबांच्या बाबतीत आणखी सांगायचे झाले तर संती आणि रामी या दोन सख्या बहिणी गोरोबांच्या दोन बायका, त्यांचे प्रेम, मुलाचा मृत्यू, चमत्कार, मैत्री, प्राणीप्रेम, गाणीसंगीत, स्वत:च्या पायाने मुलाला तुडविणे, स्वत:चे हात तोडणे, ते पुन्हा फुटणे, थापटण्याने संतपरीक्षा करणे असे आकर्षक चमत्कार त्यांच्या बाबतीत सांगितले जातात. पण या चमत्कारांपेक्षा त्यांचे उपलब्ध वीस-एकवीस अभंग अद्भुत आहेत. ते वाचले की कळते गोरोबा किती संवेदनशील होते.

कर्तव्यकर्माने आलेल्या व्यवसायामध्ये माती मऊ करण्याकरिता, तीमध्ये नाचताना मुखाने ते विठ्ठलाचे नाम:स्मरण करावयाचे.

''विठ्ठलाचे नाम स्मरे सर्वकाळ । नेत्रीं वाहे जळ सद्‌गदित ।''

अशी गोरोबांची स्थिती होत होती. गोरोबा सदासर्वकाळ हरिभक्ती करीत असल्याने माती तुडविता तुडविता 'ब्रह्मानंदी टाळी लागली' व मातीबरोबर त्यांनी मूलही तुडविले. अशी आख्यायिका सांगितली जाते. पत्नी संतीने घातलेली आण ते आयुष्यभर पाळत राहिले.

सकलसंतगाथेमध्ये गोरोबांचे एकूण अवघे वीस-एकवीस अभंग आहेत. त्यापैकी विठ्ठलमहिमा सांगणारे ३ अभंग, नाममहिमा सांगणारे २ अभंग, आणि उपदेशपर असे १५ अभंग उपलब्ध आहेत. या अभंगापैकी निम्मे अभंग त्यांनी नामदेवांना उद्देशून लिहिलेले आहेत. या अभंगावरून नामदेव आणि त्यांच्यात एकप्रकारचा जिव्हाळा निर्माण झालेला दिसतो. या जिव्हाळ्यातूनच त्यांनी पारमार्थिक अनुभवांच्या गूजगोष्टी केलेल्या पाहायला मिळतात.

''अंतरीचे गूज बोलू ऐसे काही । वर्ण व्यक्त नाही, शब्द शून्य ।

जयजय झनकुट जयजय झनकुट । अनुहात झांगट नाद गर्जे ।

परतल्या श्रुति म्हणती नेति नेति । त्याही नादा अंती स्थिर राहे ।

म्हणे गोरा कुंभार सत्रावीचे नीर । सेवि निरंतर नामदेवा ।।''

यासारखी गूढवादी अनुभवाची नोंद करताना गोरोबांची कविता अनाहत नाद ऐकल्याचे सांगते. आत्मतत्त्वाचा साक्षात्कार हा श्रेष्ठ दर्जाचा गूढवादी अनुभव. या अनुभवातूनच ते नामदेवांना मार्गदर्शन करताना दिसतात. असे काही गूढवादी अनुभव सोडले तर गोरोबांची कविता ही कष्टकऱ्याची, कारागिराची कविता असलेली पाहायला मिळते.

''देवा तुझा मी कुंभार । नासी पापाचा डोंगर ।

ऐशा संतप्त हो जागती । घडे साधूंची संगती ।

म्हणे कृपा भगवंताची । गोरा कुंभार मागे हेचि ।।''

अशी आपल्या व्यवसायाची ओळख करून देणाऱ्या गोरोबांच्या कवितेला एक वेगळी उंची लाभते ती त्यामधील प्रासादिकतेमुळेच. गोरोबांची कार्यसंस्कृतीचा गौरव करणारी ही कविता तत्कालीन मराठी समाजाला कार्यप्रवृत्त करणारा वस्तुपाठच आहे.

संतांचे अभंग हे सर्वसामान्यांना, अज्ञजनांना वेळोवेळी उपदेश करतात. तसे ते भक्तांनाही उपदेश करतात. गोरोबाही त्याला अपवाद नाहीत.

''मुकीया साखर चाखाया दिधली । बोलता हे बोली बोलवेना ।
तो काय शब्द खुंटला अनुवाद । आपुला आनंद आधाराचा ।
आनंदी आनंद गिळूनि राहाणे । अखंडित होणं न होतिया ।
म्हणे गोरा कुंभार जीवनमुक्त होणे । जग हे करणे शहाणे बापा ।।''

साखर गोड असते खरी, पणा मुक्या माणसाला ती खायला दिली तर तिची गोडी तो काय वर्णन करणार? त्याचं बोलणं थांबतं. मग तो आत्मानंद काय वर्णन करणार? त्या आनंदात गुंतून राहाण्याव्यतिरिक्त दुसरा पर्याय त्याला सापडत नाही. पण भक्तानं ईश्वरप्राप्तीची सिद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर तिथंच स्वत:ला झालेला आनंद जगाला दिला पाहिजे. आपल्या अज्ञानी बांधवांना शहाणं करावं अशीच मनिषा गोरोबांची या अभंगातून दिसते. सात्त्विक ज्ञानानुभवाचा खजिना हा या अभंगांचा विशेष आहे. फक्त अनुभवले तेच लिहायचे हे व्रत घेतलेली जगाला कवेत घेणारी शब्दकळा त्यांच्या अभंगात आहे. त्यांच्या अभंगात अनेकदा ''लखलखाट झाला, जयजय झनकूट, जयजय झनकूट'' अशी शब्दरचना येते. यातून त्यांना सापडलेले काहीतरी सांगायचे आहे असा अनुभव वाचकाला येतो. त्याचबरोबर त्यांनी आध्यात्मातील अनुभव व्यक्त करताना उपमा, रूपके, उत्प्रेक्षासारख्या काव्यकल्पनांचा वापर अत्यंत खुबीने केला आहे.

देहातीत अवस्थेचे वर्णन करताना गोरोबांच्या कवितेची भाषा गूढ बनते.

''केशवाचे भेटी लागले पिसे । विसरले कैसे देहभान ।''

अशी साक्षात्कारी अनुभव घेतलेल्या योग्याची अवस्था गोरोबा वर्णन करतात.

तत्त्वचिंतन हा गोरोबांच्या अभंगाचा गाभा आहे. ईश्वरनिष्ठा आणि ईश्वरमय होण्याची तळमळ हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव असल्याने त्यांच्या कवितेला एक वेगळी उंची प्राप्त होते. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विशद करणारे गोरोबांचे लोकप्रिय अभंग प्रसिद्ध गायकांनी आपल्या सुमधूर आवाजात स्वरबद्ध केले आहेत. त्याचबरोबर त्यांच्यावर खूप सिनेमे आणि मराठी बरोबरच हिंदी, कन्नड, तमिळ, तेलगू, गुजरातीतही त्यांच्यावरची नाटकं खूप गाजली आहेत. कीर्तनकार तर त्यांच्या गोष्टी सांगतच असतात.

### ३.५.४ मुक्ताबाई :

विद्यार्थी मित्रहो! आपेगावच्या विठ्ठलपंत कुलकर्णी यांच्या पोटी जन्माला आलेली निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताबाई ही चार भावंडे. कर्ण जसा कवचकुंडलासहित जन्माला आला, त्याप्रमाणे ही भावंडे परिणत आध्यात्माचे उंची लेणे घेऊन जन्मास आली. हे त्यांच्या अभंगावरून सिद्ध झालेले आहे. सर्वसामान्यांसारखे लौकिक जीवन वाट्याला आले नसले तरी त्यांच्या परमार्थक्षेत्रातील तेजस्वी कार्याचा परिणाम भागवतधर्मी संतमंडळावर दीर्घकाळ होत आला आहे. अशा तेजस्वी आणि बुद्धिमान भावंडापैकी एक म्हणजे मुक्ताबाई.

संत मुक्ताबाईचा जन्म इ.स. १२७९ मध्ये झाला. ती आपल्या भावांप्रमाणे विद्वान असून त्यांच्याप्रमाणे विरक्त वृत्तीने राही. तिने आजन्म कौमार्यव्रत पाळले होते. समाधी समयी ही १८ वर्षाची होती. निवृत्तीनाथांसारखा विद्वान तत्त्वज्ञ त्यांना गुरू म्हणून लाभला. ज्ञानदेवादी भावंडामध्ये मुक्ताबाई लहान असल्या तरी मनानं त्या प्रौढ होत्या. त्यांच्या हरिपाठ, पंढरीमाहात्म्य, संतसमागम, ताटीचे अभंग, कूट अभंग व आध्यात्मिक अंगाईगीते इ, काव्यप्रकारांतून त्यांच्या प्रौढ व प्रगल्भ वृत्तीची साक्ष पटते.

सकलसंतगाथेत मुक्ताबाईंच्या नावावर ४२ अभंग उपलब्ध असले तरी त्यांनी चांगदेवांना उद्देशून लिहिलेले सहा, ताटीचे अभंग या प्रकारातील पाच आणि 'नामदेव भक्तिगर्वपरिहार' या शीर्षकाखाली लिहिलेले दहा-पंधरा अभंग अशी एकूण पाऊनेदोनशेच्या घरात असणारी त्यांची अभंगरचना संख्येने थोडी असली तरी काव्यगुणांनी ती समृध्द आहे. या सर्व अभंगांतून मुक्ताबाई ज्ञानदेवादी संताप्रमाणे सर्वसामान्यांशी संवाद साधताना दिसतात. आपल्या काही अभंगांतून त्या चांगदेवाशी आणि नामदेवांविषयी बोलत असल्या तरी त्यातून सर्वसामान्यांना उपदेश करताना दिसतात.

काव्याच्या दृष्टिकोनातून मुक्ताबाई आपणास प्रथम भेटतात त्या 'हरिपाठाच्या' अभंगातून. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव आणि सोपानदेवांनी रचलेल्या हरिपाठाच्या अभंगांचे संस्कार त्यांच्या अभंगांवर झाले असले तरी, त्या वारंवार आपला नामोल्लेख करुन या अभंगांचा वेगळेपणा सूचित करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. आपल्या अभंगांतून त्या सतत स्वत:च्या आध्यात्मज्ञानासंबंधी व त्याने मिळालेल्या मुक्तावस्थेसंबंधी बोलत राहतात हे खालील अभंगावरुन आपल्या लक्षात येईल.

''मुक्ताईचे चित्त निरंतर मुक्त । हरि हेचि संचित आम्हां घरी.
मुक्ताई मुक्तलग सांडिली हे वासना । मुक्तामुक्ती राना हरिपाठ
मुक्ताई अव्दैती व्दैती व्दैतातीत । अवघाचि अनंत दिसे देही ।
मुक्ताई चैतन्य अवघे चिध्दन । आदि अंती खूण निवृत्तीची ।
मुक्ताई संपन्न मुक्त पै सैजुळे । सर्वत्र उभविले मुक्ति जैसव ।
मुक्ताई चिंतने मुक्त पै जाली । चरणी समरसली हरिपाठे ।।''

वरील अभंगातून ''मुक्ताईचे चित्त निरंतर मुक्त'', ''मुक्तता पूर्ण मुक्ताई साधिली'' असे मुक्तीचे चौफेर उल्लेख येतात. मुक्ताई नावाप्रमाणे खरोखरच सर्वमुक्त होत्या. मुक्ताईची ही संसारमुक्ती होती; तशी जीवनमुक्ती होती आणि विशेष म्हणजे ही नारीची देहमुक्ती होती. असा त्यांच्या जीवनाचा आणि अभंगांचा अलौकिक प्रवास मुक्तीकडे झालेला पाहायला मिळतो. यातच त्यांच्या जीवनाचे आणि कवितेचे मोठेपण सामावलेले आहे.

मुक्ताईचे एक प्रसिध्द पाच अभंगांचे प्रकरण म्हणजे 'ताटीचे अभंग' होय. मुक्ताबाईच्या कार्यकर्तृवाची विशेष फडकलेली सर्वपरिचित अशी पताका म्हणजे तिने रचलेले 'ताटीचे अभंग' होय. हे एक प्रासंगिक प्रकरण

आहे. पण हे अभंग क्षेपक आहेत, असे वारकरी संप्रदाय मानतो. तो प्रसंग असा- एक दिवस एक गृहस्थाने ज्ञानेश्वरांस पाहून म्हटले की, 'या संन्याशाच्या मुलाचे दर्शन घडले, हा मोठा अपशकुन झाला.' हे बोल ऐकून ज्ञानेश्वर फार निराश झाले व झोपडीत जाऊन बसले. झोपडीचे दार उघडून घेईनात व प्रतिसादही देईनात विषय सखोल आहे हे ११ वर्षांच्या लहानग्या मुक्ताबाईच्या लक्षात येते. त्यामुळे त्या थेट तत्त्वज्ञानाच्या चर्चेला स्पर्श करतात. तुम्ही संत आहात आणि संतांने कसे असायला पाहिजे हे ज्ञानदेवंना सांगायला सुरुवात करतात. आणि त्यातूनच ताटीच्या अभंगाची निर्मिती होते. 'रागे भरावे कवनाशी । आपण ब्रम्ह सर्वदेशी' अशा शब्दांत त्यांनी ज्ञानदेवांची समजूत घातली असून,

''मजवरी दया करा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।
संत जेणे व्हावे । जगी बोलणे सोसावे ।
तरीच अंगे थोरपण । जया नाही अभिमान ।
थोरपण जेथे वसे । तेथे भूतदया असे ।।
योगी पावन मनाचा । साहे अपराध जनाचा
विश्व झालीया वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ।।१।।''

संत आहात तर बोलणे सहन करावे लागेल. अहंकार गेला तर थोरपण येते. थोरपण आले तर भूतदया येते आणि भूतदया असेल तर राग कसा? पावन मनाच्या योग्याने अपराध सहन करायलाच हवेत. अशा शब्दांत त्यांनी ज्ञानदेव आणि आपले कौटुंबिक नाते बाजूला ठेवून ज्ञानदेवांना उपदेश केला आहे. ज्ञानेश्वरांचा रुसवा धाकट्या बहिणीने काढावा हा प्रसंगच मोठा भावपूर्ण आणि नाट्यपूर्ण आहे. ज्ञानदेवांचा अधिकार मोठा; पण त्यांना उपदेश करुन कार्यप्रवृत्त करावे अशी तळमळ मुक्ताबाईंच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होताना दिसते. असे असले तरी,

''शुध्द ज्याचा भाव झाला । दुरी नाही देव त्याला ।
अवघी साधन दातवटी । मोलें मिळत नाही हारी ।
कोणी कोणा शिकवावे । सार शोधूनिया घ्यावे ।
लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायीचे ठायी।
तुम्ही तरुनी विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।''

मुक्ताबाईचे हे बोल ऐकून ज्ञानदेवांना उपरती झाली नसती तर नवल ! ते बाहेर आले ते माऊली बनूनच, जगाच्या उध्दाराचा संकल्प करुनच, कुरुक्षेत्रावर गलितगात्र झालेल्या अर्जुनाला कृष्णाने गीता सांगून उभे केले तसे 'ताटीचे अभंग' सांगून ज्ञानदेवांना मुक्ताईने माऊली बनविले. ज्ञानेश्वरांना उपदेश करण्याचा अधिकार तिला 'लडिवाळपणातूनच' आला आहे. केवळ नऊ वर्ष वय असताना केलेल्या या रचनेत 'तुम्ही तरुनी विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा'

अशी भावनेची केवळीक त्यांच्या ताटीच्या अभंगात पदोपदी जाणवते.

मुक्ताबाईच्या चरित्रात चांगदेवांच्या आख्यायिकेला एक वेगळेच परिमाण लाभलेले पाहायला मिळते. मुक्ताबाईंनी आध्यात्मिक साधना करुन जे गूढ अनुभव घेतले, ध्यानमग्न अवस्थेत जे साक्षात्कारी अनुभव घेतले त्या अनुभवाच्या जोरावर तिने सिध्दहस्त योगी, मंत्र-तंत्र, योगविद्यादी शास्त्रांत पारंगत असलेले, समाधिस्त होणे, गुप्तरुपाने वावरणे, मध्येच प्रकट होणे, मृत्युकाळ जवळ आला की योगबळाने समाधी लावून मृत्यूला परतवून लावणे व शेकडो वर्ष दीर्घायुष्य लाभलेल्या वेशा वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध चांगदेवाला आपल्या आध्यात्मिक अधिकाराने 'कोराच्या कोरा' ठरवून त्याच्याशी जो संवाद साधला तो मुक्ताबाईंनी आपल्या कूट अभंगांत नोंदविला आहे तो असा,

''मुंगी उडाली आकाशी । तिने गिळीले सूर्याशी ।

थोर नवलाव झाला । वांझे पुत्र प्रसवला ।

विंचू पाताळाशी जाय । शेष माथा वंदी पाय ।

माशी व्याली घार झाली । देखोनि मुक्ताई हसली ।।''

मुक्ताबाईंच्या या अभंगाविषयी डॉ. प्रकाश देशपांडे केजकर म्हणतात, 'मुक्ताबाईंचा हा कूट अभंग अतिवास्तववादी कवितेचा एक उत्तम नमुना आहे. तर्काला, बुध्दिप्रामाण्याला पार करणारा तसेच वास्तवाचे सार्वभौमत्व नाकारणारा हा अतिवास्तववादी अनुभव आहे. यात 'वांझे' ची प्रतिमा ही एकमेव मानवी प्रतिमा आहे, आणि ती ही नकारात्मक आहे. उरलेल्या विंचू, शेष य हिंस्त्र आणि विषारी प्राणीप्रतिमा आहेत. माशी ही किटक प्रतिमा आहे तर घार ही हिंस्त्र पक्षीप्रतिमा आहे. साप आणि घार यांचे वैर आपल्याला माहीत आहे. अमानवीकरणाची प्रक्रिया सुचविणाऱ्या या प्राणीप्रतिमा अतिवास्तववादी कवितेतील खास प्रतिमा आहेत. म्हणून मुक्ताबाईंची कविता आजही आपल्याला जवळची वाटते' (संतकविता एक दृष्टिकोन : डॉ प्रकाश देशपांडे केजकर, पृष्ठ १८६-८७) मुंगी म्हणजे जीवात्मा, सूर्य म्हणजे परमात्मा, जीवात्म्याला मीच ब्रम्ह आहे, अशी जाणीव झाली की तो जीवात्मा सर्व विश्वाला व्यापून टाकतो. असा या अभंगाचा आशय आहे. मुंगी, वांझ स्त्री, विंचू आणि माशी या जीवात्म्याच्या ठिकाणी आणि सूर्य, पुत्र, शेष, घार हे सर्व परमात्म्याच्या ठिकाणी मुक्ताबाईंनी कल्पिलेले आहे. मुक्ताबाईंच्या प्रतिभेची मोठी झेप आपल्याला येथे पाहायला मिळते. मुक्ताबाईंचे कूट अभंग तिच्या आध्यात्मिक सामर्थ्यावर प्रकाश टाकतात.

अशा संवादाने चांगदेव शरण येताच त्यांचे व्दैताव्दैत मुक्ताबाईंनी फेडले व गुरुपदेश देऊन आत्मपदी बसविले. पुढे त्यांनी चांगदेवांना आपल्या कृपाकटाक्षाने पुनर्जन्म दिला. आध्यात्माच्या मोठ्या अधिकाराने त्यांनी चांगदेवांचे स्वखुषीने मातृत्व स्वीकारले. चांगदेवासारख्या वृध्द हठयोग्यावर वात्सल्याचा अमाप वर्षाव केला. ज्ञानेश्वरांनी 'चांगदेवपासष्टी' ही मुक्ताबाईंनीच चांगदेवांना समजून दिली. तिच्या ठिकाणी दाटून आलेल्या या

वात्सल्यपूर्ण भावनेतून त्यांनी चांगदेवांशी संवाद साधताना अंगाईगीत (पाळण्यांचा) माध्यम म्हणून स्वीकार केला आहे. हे मुक्ताबाई बाळ चांगदेवांना अव्दैताच्या अधिष्ठानावर जोजवते हे खालील अंगाईगीतावरुन लक्षात येईल.

''गुण ना निर्गण शब्दातीत । तेथे तू निश्चिंत बाळा नीज ।

पाळणा लाविला-हृदयी कमळी । मुक्ताई जवळी सदाविते ।

शांति क्षमा विदेह पै वर्णिती । नावं पै ठेविती अव्दैतासी ।

वटेश्वर सूत चांगा अवधूत । मुक्ताई शांतवीत ज्ञानदृष्टी ।।''

(मुक्ताई-चांगदेव संवाद अभंग क्र. ७)

अशाप्रकारच्या संवादातील एकूण पाच पाळणागीते म्हणजे एक एक स्वतंत्र आध्यात्मिक अंगाईगीतच आहे. मुक्ताबईंची ही अंगाई गीते उपदेशच करीत असतात. फक्त उपदेशकाची भूमिका मातृत्वाची असते. जीवनातील एवढीच मातृत्वाची स्त्रीसुलभ कोमल भावना मुक्ताबाईंनी अनुभवली आहे.

नामदेव-ज्ञानेश्वरादी भावंडांच्या भेटीत मुक्ताबाईंची भूमिका तिच्या प्रौढपणाची साक्ष देते. नामदेव ज्ञानदेवादी भावंडांना भेटण्यास आळंदीस येतात. तेव्हा ही भावंडे 'पंढरीचा प्रेमा घरी आला' म्हणून त्यांचे स्वागत करतात. भेटीत सर्व भावडांनी नामदेवांना नमस्कार केला. पण नामदेवांनी त्यांना प्रतिनमस्कार केला नाही. यातील गूढ मुक्ताबाईंनी ओळखले आणि ''अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार गेला नाही'' अशा परखड सवालातून नामदेवांचा अहंकार घालवून मुक्ताबाईंनी त्यांना भक्तिसन्मार्गावर आणले.

अशाप्रकारे निवृत्तीसारख्या तत्ववेत्याला गुरु मानणारी, ज्ञानदेवांचा लाडिवाळपणे रुसवा काढणारी, योगी चांगदेवाला बाळ समजून पोटाशी घेत उपदेश करणारी, नामदेवांचा गर्वपरिहार करणारी मुक्ताबाई आपल्या कूट आणि प्रासादिक अभंगांनी मराठी साहित्यात प्रकाशमान झाली आहे. त्यांचे मराठी कवितेला मोठे योगदान लाभले आहे, हे निसंशय! अल्पवयात मुक्ताबाईंच्या प्रतिभेचे घेतलेले पारमार्थिकतेचे उड्डाण अचंबित करणारे आहे. एका परकरातल्या पोरीने सांगितलेला वेदांत, योग, गूढ अध्यात्माच्या गोष्टी वाचकांना तसेच संशोधकांना, विद्वानांना थक्क करणाऱ्या आहेत, अशी मुक्ताबाई वैशाख वद्य १२ शके १२१९ (इ.स. १२९७) मध्ये विजेच्या प्रचंड गडगडात 'मेहुण' या ठिकाणी परमार्त्याशी एकरुप झाली. आणि खऱ्या अर्थाने मुंगी आकाशात उडाली. एदलबादजवळच्या 'माणगाव' येथे तिची समाधी आहे.

### ३.५.५ सेना महाराज :

विद्यार्थी मित्रांनो! तेराव्या शतकात संतमेळ्यात अठरापगड जातीचे संत सहभागी झाले. त्यापैकी आणखी एक संत म्हणजे सेना महाराज. सेना महाराजांचा जन्म वैशाख वद्य व्दादशी रविवार इ.स. १३०१ रोजी मध्य प्रदेशातील जबलपूर जवळच्या 'बांदुगडे' या गावी झाला. सेना महाराज रेवा राज्यातील वीरसिंग राजाची नाभिक

सेवा करीत होते. त्यांचे वडील विठ्ठलभक्त देवीदास महाराज राजाच्या वडिलांचे काम करायचे. वडिलांप्रमाणे सेनांनाही संतसंगतीची गोडी लागली. महाराष्ट्रातून उत्तरेत जाणारी भक्तमंडळी पिढ्यानपिढ्या देवीदासांच्या घरी थांबायची. अशाच एके दिवशी सेनाजींच्या घरी संतांचा मेळा आला. ते त्यांच्यासोबत स्वत:ला विसरून गेले. इकडे राजाने सेनाची खूप वाट बघितली. तो संतापला, तोच सेना हजर. राजाची मालिश करताना सेनाला तेलाच्या वाटीत विठ्ठल दिसला. त्या तेलाने मालिश केल्यावर राजाचा कुष्ठरोग बरा झाला. देव आपल्यासाठी इथवर आला हे समजून सेना भावविवश झाले. सगळे सोडून सेनाजीने पंढरीकडे धाव घेतली व ते तेथेच स्थिरावले. अनेक तीर्थे हिंडूनही न मिळणारी शांती त्यांना पंढरपूरात संताच्या सहवासात मिळाली, पंढरीच्या रुपाने जणू त्यांना माहेरच मिळाले. अशा पंढरपूराचे वर्णन ते-

''जाता पंढरीसी सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटताचि ।।''

अशा प्रभावी शब्दांत करुन, आपल्याला पंढरी पाहून झालेला आनंदही पुढे ते व्यक्त करतात. संताचे आराध्य दैवत म्हणजे पंढरीचा विठ्ठल ज्याच्या स्पर्शाने पंढरी पावन झाली आहे. या विठ्ठलाच्या सगुणरुपाचे वर्णन हा प्रत्येक संताच्या आवडीचा विषय. त्याला सेना महाराज कसे अपवाद ठरतील?

''विटेवरी उभा । जैसा लावण्याचा गाभा ।।

पायी ठेवूनिया माथा । अवघी वारली चिंता ।।

समाधान चित्त । डोळां श्रीमुख पाहाता ।।

बहुजन्म केला लाग । सेना देखे पांडूरंग ।।''

असे सेनानी केलेले विठ्ठलवर्णन त्याच्या उत्कट विठ्ठलभक्तीचे द्योतक म्हणता येईल. पंढरीमाहात्म्य, विठ्ठलमाहात्म्याबरोबरच ते भक्त पुंडलिक, संत निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांचा आपल्या अभंगातून गौरव करुन ''उदार तुम्ही संत । मायबाप कृपावंत ।'' असे त्यांचे ऋण मान्य करत. 'मायबाप' म्हणून त्यांना संबोधतात. पंढरपूरात संतांच्या सहवासात परब्रह्म भेटल्याच्या आनंदात ते

''धन्य महाराज पुंडलिक मुनी । वैकुंठीचा सखा आणला भूतकालागोनि ।''

अशी पुंडलिकाविषयी आपला कृतज्ञताभाव व्यक्त करतात तर,

'शिव तो निवृत्ती । आदिमाया मुक्ताई ।

ब्रह्मा तो सोपान । विष्णू ज्ञानदेव पाही ।।'

अशा आत्यंतिक आदरापोटी सेना महाराज ज्ञानदेवादी भावंडांचे अवतारीकरण करतात.

संतसज्जन कथा-कीर्तन करु लागले की साक्षात विठ्ठलही डोलायला लागतो. कीर्तन-भक्तीतून लाभणारं हे सुख ब्रह्मालाही मिळत नसल्याचं सेना महाराज सांगतात.

''उभा राहे कीर्तनात । हर्षे डुले पंढरीनाथ

सेना म्हणे हेंचि सुख । नाही ब्रम्हयासि देख ।।''

अशा प्रभवी शब्दांत ते कीर्तनभक्तीही साधतात. सेना महाराज आपल्या अभंगातून सामाजिक नीतीवर, साधूसंताच्या ढोंगीपणावर खरमरीत शब्दांत टीका करतात.

सेना महाराजांचे अभंग इतर संतमेळ्याच्या अभंगापेक्षा वेगळेपणाने येतात, ते त्यांच्या व्यवसायावरील अभंगरुपाने, इतर संताप्रमाणे त्यांनीही आपल्या व्यवसायावर रूपक रचले आहे. आपल्या व्यवसायाचा उपमान (ज्याच्याशी तुलना करावयाची ते) म्हणून सुंदर उपयोग त्यांनी केलेला आहे. सेना महाराज जातीने वारीक म्हणजे नाभिक. आपला नाभिकाचा व्यवसाय हलका आहे आणि त्याला प्रतिष्ठा नाही याची जाणीव त्यांना होती. तशीच त्यांची जातही हीन समजली जात होती. त्यामुळे सामाजिक अवहेलना वाट्याला येऊनही आपल्या भक्तीच्या आणि वैराग्याच्या जोरावर ते संतपदी पोहोचले. पंढरीला आल्यावर सेनाजी स्वत:च संतांच्या संगतीत देव बनले. देव कुठे आहे हे त्यांना कळले होते. त्यांनी ते इतरांना सांगायला सुरुवात केली.

''स्वहित सांगावे भले ! जैसे आपणासी कळे''

त्याचबरोबर त्यांनी कामातला राम सांगून आपला व्यवसाय हे आपल्या भक्तीचे साधन बनविले. आपल्या व्यवसायाला त्यांनी जे अध्यात्मिक अधिष्ठान दिले ते पाहण्यासारखे आहे.

''आम्ही वारीक वारीक । करु हजामत बारीक ।

विवेक दर्पण आयना दाऊ । वैराग्य चिमटा हालऊ ।

उदक शांती डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू ।

भावार्थाच्या बगला झाडू । काम क्रोध नखे काढू ।

चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत ।''

अशी त्यांनी बहुजनांच्या भाषेत जगण्याची रीत सांगून वर्णधर्मानुसार वाट्याला आलेली कर्मे करीत करीत सेना महाराजांनी स्वत:चा उध्दार तर केलाच. पण त्याचबरोबर आपली कविताही समाजप्रबोधनाची साधन बनवली.

पुढील एका अभंगात ते आपल्या काळातील धनलोभाने पछाडलेल्या सर्व मानव जातीचा

''धन कोणा कामा आले । पाहा विचारुन भले ।

ऐसे सकळ जाणती । कळोनिया आंधळे होती ।''

अशा रोकड्यां शब्दांत निषेध करतात.

आध्यात्मिक साधनेमुळे सेना महाराजांना दिव्यदृष्टी लाभली होती. अभंगापासून विरहाच्या विराण्या, गवळणी पासून अंगाईपर्यंत कवितेचे वेगवेगळे त्यांनी रचनाप्रकार हाताळले. त्यांना लाभलेली दिव्यदृष्टी त्यांच्या कृष्णभक्तीपर गौळणीतून ओसंडून वाहताना दिसते. त्यांनी लिहिलेल्या नऊ गवळणी उपलब्ध आहेत. त्यामध्ये त्यांनी वर्णिलेल्या कृष्णगोपींच्या प्रणयात शृंगारकवितेच्या खूणा ठळक झाल्या आहेत. सेना महाराजांनी या गौळणीतून उत्तान शृंगाराच्या माध्यमातून राधेची कृष्णभक्ती रंगविली आहे. ह्या गौळणींना कृष्णभक्तीची अनावर धुंद चढलेली आहे. त्यांच्या एका गौळणीत कृष्ण अचानक आल्याने त्याला भेटण्यासाठी आतूर झालेल्या गोपींची कशी धांदल उडाली याचे वर्णन सेना महाराज करतात ते असे, 'एकीने काजळ डोळ्याला लावण्याऐवजी तोंडाला लावले, एक पतीजवळ बसली असता तशीच बाहेर धावत आली, एकीने गळ्यातील दागिने पायात घातले तर पायातील गळ्यात, वाळ्या कानात बांधल्या, एकीने चुकून बाळाला शिंक्यात ठेवले आणि शिंक्यातील माठ कडेवर घेऊन बाहेर पडली, इ. वर्णन केली आहेत. या गौळणीत विनोद आणि शृंगार यांचे बेमालूम मिश्रण आहे. पुढील शृंगारकवितेचा धागा या कवितेशी जोडलेला जाणवतो. अशाप्रकारच्या काव्यातून येणारी रंजकता हे लोकप्रिय कवितेचे खास अंग म्हटले पाहिजे. शृंगाराला आध्यात्माचे रूप देण्याचा हा प्रयत्न दिसतो.' (संत कविता, एक दृष्टीकोन : प्रकाश देशपांडे केजकर, पृष्ठ १६६)

सकलसंतगाथेमध्ये सेना महाराजांच्या नावावर दीडशे अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या एकूण काव्यात उत्तर भारतीय संतकविता आणि मराठी संतकविता यांचा संगम झालेला पाहायला मिळतो. असे असले तरी त्यांची मराठी कविता इतकी अस्सल आहे की अभ्यासक त्यांना महाराष्ट्राबाहेरचे मानायला तयार नाहीत. हिंदी आणि मराठी भाषेतील सेनांच्या वैविध्यपूर्ण कवितेला एक ऐतिहासिक मूल्य प्राप्त होते. कबीराप्रमाणे तेही रामानंदाचे शिष्य होते. हिंदी ही त्यांची मातृभाषा असून त्यांनी मराठीत अभंगरचना केली. त्याचे एक पद शिखांच्या पवित्र मानलेल्या 'गुरुग्रंथसाहिब' मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. मराठी संतकवीने हिंदी कवितेच्या परंपरेला केलेले हे योगदान अल्प असले तरी प्रतिकात्मक म्हणून ते ऐतिहसिकदृष्ट्या महत्वाचे आहे. सेना महाराजांची कविता कष्टकऱ्यांची, कामकऱ्यांची कविता असून, ती आपल्या नाभिकाचा व्यवसाय निष्ठेने आणि आनंदाने करणाऱ्या एका कर्मयोगी संतकवीची कविता असलेली पाहायला मिळते. त्यांच्या एकूण कार्याचा विचार करता लोककल्याणासाठी सेना जगाचे झाले. रेवा जिल्ह्यातल्या बांदुगड किल्यात सेना महाराजांचे देऊळ आहे तेच त्यांचे समाधिस्थान झाले आहे.

### ३.५.६ नरहरी सोनार :

नरहरी सोनार यांचा जन्म श्रावण शुक्ल १३ ला इ.स. ११९३ मध्ये पंढरपूर येथे झाला. सर्वात वयोवृध्द संत म्हणून नरहरी महाराजांकडे पाहिले जाते. नरहरी महाराजांचे पूर्वज मूळचे देवगिरीचे. त्यांच्य वंशाचा मूळपुरुष शालिवाहानाचा सरदार होता. पंढरपूरचे श्री मल्लिकार्जुन मंदिर त्यानेच बांधले आहे असे मानले जाते. नरहरीरायांचे कुटुंब शिवशंकराचे एकनिष्ठ भक्त होते म्हणून ते कट्टर शैवपंथी होते.

शैव म्हणजे महादेवाचे भक्त आणि वैष्णव म्हणजे विठ्ठलाचे भक्त. दक्षिण भारतात या संप्रदायांमध्ये टोकाचा संघर्ष झाला. हा संघर्ष उत्तरभारतातही थोड्याफार प्रमाणात सुरू होता. महाराष्ट्राला मात्र या शैव-वैष्णव संघर्षाची हवा लागली नाही. कारण महाराष्ट्र संस्कृतीच्या केंद्रस्थानी उभा असलेला विठ्ठल आणि त्याचा वारकरी संतविचार. नरहरी महाराजांचे वडील दीनानाथ सोनार हे धनिक असून सराफीचा व्यवसाय करीत. नरहरीही सुवर्णाचे अलंकार करण्यात प्रवीण होते. वडिलोपार्जित सुवर्णकाम पुढे चालवित होते. दीनानाथांनी आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणे पंढरपूर येथे सराफी दुकान सुरू केले व ते नरहरीला चालवायला सांगितले. त्यानिमित्ताने नरहरीराय पंढरपूरला स्थायिक झाले. शैव-वैष्णव हा भेदाभेद नसलेल्या महाराष्ट्रात नरहरी आले तरी त्यांनी वैष्णवाचा स्वीकार केला नाही ते शैवच राहिले. त्यांच्यावर नाथ परंपरेच्या कर्मकांडी प्रवाहाचा प्रभाव पडला होता. त्यांचा देव मल्लिकार्जुन आणि त्याचे मंदिर पंढरीच्या पांडूरंगाच्या देवळापासून हाकेच्या अंतरावर होते. पण या मंदिराकडे त्यांनी कधी ढुंकूनही पाहिले नाही. नरहरी सोन्याचे अलंकार करण्यात प्रवीण असल्याने देवगिरीचे एक पिढ्यान्‌पिढ्याचे गिऱ्हाईक त्यांच्याकडे विठ्ठलाच्या कमरेची सोन्याची साखळी करण्याचा आग्रह करू लागले. त्यांनी आणलेले माप चुकू लागले. तेव्हा नरहरीराय डोळ्यावर पट्टी बांधून विठ्ठलाच्या कमरेचे माप घेऊ लागले. देवाच्या कमरेला हात घालताच काय आश्चर्य! तिथे त्यांना त्या तो कैलासपती महादेव दिसू लागला आणि डोळे उघडून पाहातात तर विठ्ठल दिसू लागला. डोळे बंद केल्यावर महादेव आणि डोळे उघडल्यावर विठ्ठल असे होऊ लागले. या साक्षात्काराने नरहरींच्या मनातील शैव-वैष्णव भेदाभेदाची साखळी पार तुटून गेली. शेजारी राहात असूनही विठ्ठलाचे दर्शन निषिध्द मानण्याचा त्यांना पश्चाताप झाला. त्यांनी विठ्ठलापुढे साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, हे पांडुरंगा, मी अज्ञानाने मनात द्वैतभाव धरला. आपण कृतीने मला दाखवून दिले की शंकर आणि विठ्ठल एकच आहेत. माझ्या मनातील द्वैताचा आज निरास झाला. पांडुरंगा मी तुला शरण आहे. माझ्यावर कृपा कर. आता मी तुझी भक्ती करण्यात कमीपणा मानणार नाही.

नरहरी म्हणतात,

''विष्णु आणि शिव एकचि प्रतिमा । ऐसा ज्याचा प्रेमा सदोदित ।
धन्य ते संसारी नर आणि नारी । वाचे हर हरि उच्चारित ।
नाही पै भेद अवघा मनी अभेद । द्वेषाद्वेषसंबंध उरी उरे ।
सोनार नरहरी न देखे द्वेत । अवघा मुर्तिमंत एकरूप ।।''

असे म्हणत नरहरीरायांनी विष्णुदास बनून भागवतधर्माची दीक्षा घेतली. शिव आणि विष्णू हे विठ्ठलाच्या एकाच मूर्तीत सामावलेले आहेत. याचा त्यांनी मनोमनी आत्मिक अनुभव घेतला. नावे वेगळी असली तरी परमेश्वर एकच. सर्व संप्रदाय शेवटी त्याच्याच पायाशी जाऊन लीन होतात. हे कळून चुकल्याने त्यांच्या जीवनात शैव आणि वैष्णव समन्वय घडून आला. भक्तीच्या पातळीवर आलेला हा अनुभव त्यांनी पुढे गावोगाव वाटला.

अभंग लिहिले, गायिले, कीर्तने-प्रवचने केली. देशभर असलेल्या शैव-वैष्णवाच्या वादाच्या विरोधात ते पहाडासारखे उभे राहिले. ते स्वत:च हरिहर ऐक्याचे प्रतीक बनले.

नरहरीनी सोन्याचे दागिने घडविण्याच्या अंगात असलेल्या कलाकुसरीचा आणि विठ्ठलभक्तीचा पंढरपूरात चांगलाच जम बसविला. नरहरी आपला व्यवसाय आणि विठ्ठल एकरूप करून टाकतात. स्वत:च्या व्यवसायात रममान होऊन परमेश्वरभक्ती करता येते हे त्यांनी दाखवून दिले. ते म्हणतात -

''देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।

देह बागेसरी जावो । अंतराच्या जाण सोने ।

त्रिगुणाची करूनी मूस । आत ओविला ब्रम्हरस ।

जीव-शिव करूनी फुंकी । रात्रंदिवस ठोका ठोकी ।।''

या अभंगातील ''देवा तुझा मी सोनार'' या उक्तीतून जीवा-शिवाचे नाते किती अतूट झाले आहे याची कल्पना येते. त्यांचा हा अभंग म्हणजे आपला व्यवसाय विठ्ठलमय केल्याचा चांगला पुरावा आहे. नरहरींनी आपला व्यवसायच परमार्थरूप करून दिला आहे. सुवर्णकाराच्या आपल्या व्यवसायातील विविध उपकरणाचा रूपकात्मक उपयोग त्यांनी या अभंगात केला आहे. खरा देव रोजच्या कामातही भेटू शकतो हे सांगितलेले साधे-सोपे तत्त्वज्ञान आजही मागदर्शक ठरावे असेच आहे. नरहरी आपला व्यवसाय व प्रपंच हे दोन्ही परामार्थरूप बनवतात हा या अभंगाचा भावार्थ आहे. शैव-वैष्णव समन्वयाचा विचार नरहरी सोनारांनी प्रत्यक्ष आपल्या जगण्यात धारण केल्याचा हा पुरावा आहे. सातशे वर्षापूर्वी चंद्रभागेच्या तीरावर झालेल्या वारकरी क्रांतीचे ते एक अग्रणी झाले. असे नरहरी सोनार वयाच्या ९२ वर्षी समाधिस्त झाले.

सकलसंतगाथेमध्ये नरहरी सोनारांचे ३५ अभंग उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्याच अभंगातून नरहरींनी आपल्या सोनाराच्या व्यवसायाचा गौरव केला आहे. इथे जात, पंथ, धर्म व वर्ण याला महत्व नाही तर त्याची भक्ती श्रेष्ठ असते हे सांगितले आहे. तर दुसऱ्या अभंगातून त्यांनी गुरूकृपेचे महत्त्व सांगताना दैनंदिन जीवनातले निसर्गातील अनेक दाखले दिलेले आहेत. सर्वसामान्य भक्त व संतमंडळी दैनंदिन जीवन एकसारखेच जगत असले तरी त्यांच्या जगण्यात थोडीफार तफावत असते. सर्वसामान्य भक्त दैनंदिन जीवन जगताना भगवंताचे रूप पाहतात व सात्विकपणाचा महाआनंद हेच जीवनध्येय मानली जातात. हे अधिक स्पष्ट करताना नरहरी म्हणतात, -

''सूर्य असे गगनी । परी दिसतो जीवनी ।।

मेघ असतो अंबरी । पाणी पडी भूमीवरी ।

आकाशी चंद्र तारांगण । बिंब दिसे पाण्यातून ।

बिंब पाहाता दर्पणी । बिंब दिसे त्यातूनी ।

आत्मा अनुभवी पाहाता । देव दिसे हो तत्वतां ।

गुरूकृपा होय पूर्ण । नरहरी लपट निशिदिन ।।''

या अभंगामधून नरहरींचा आत्मानुभव प्रकट झाला आहे. ते सांगतात, एखादी गोष्ट आपल्यापासून दूरवर असली तरी तिचा परिणाम दुसऱ्या दिवशी होऊ शकतो. सूर्य आपल्यापासून कितीतरी मैल दूर अंतरावर आहे; पण त्याचा प्रकाश, उष्णता, पृथ्वीवरील सर्व चराचरांना जाणवत असतो. पाण्याने भरलेला ढग अकाशात असतो पण योग्य वेळी त्याचे पाणी जमिनीवर पडते. चंद्र व तारे आकाशात चमकत असतात पण त्यांचे प्रतिबिंब पृथ्वीवरील पाण्यातही आपल्याला दिसते. आणखी सांगायचे झाले तर आकाशात असणाऱ्या चंद्राचे बिंब घरात असणाऱ्या आरशात दिसते. नरहरी या अभंगांमध्ये सूर्य, चंद्र, आकाश, तारका, ढग याची जशी प्रकाश शितल चांदणे, पाणी यांच्यापासून भूमीवर कृपादृष्टी असते तशी गुरुची कृपादृष्टीही शिष्यावर अनेक दृष्टींनी, मार्गाने होत असून तिचा त्याला लाभ झालेला पाहायला मिळतो. अंतर्मनातच चक्षू उघडून परमेश्वराचा सहवास लाभण्यासाठी सद्‌गुरुची गरज असते. साक्षात भगवंतांचे भगवान श्रीकृष्णाचे गुरु सांदिपनी, श्रीरामाचे गुरु वशिष्ठ, ज्ञानदेवांचे निवृत्तीनाथ, नामदेवांचे गुरु विसोबा खेचर या सर्वज्ञानी गुरुंच्या उपाधीमुळे त्यांच्या हातून लोकोत्तर कार्य घडून आले. आत्मस्वरुपाची ओळख गुरुच करुन देतो असा गुरुमहिमा नरहरींनी या अभंगामधून जोरदारपणे मांडला आहे.

नामभक्ती हा तर सर्व संतांचा आवडता विषय. सर्वच संतकवींचा स्मरणभक्तीवर भर आहे. आजच्या नामभक्तीत त्यांना विठ्ठलनामाचं स्मरण अभिप्रेत आहे. 'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा,' असा नाममहिमा संत नामदेव वर्णन करतात. तर नरहरी सोनार,

''नाम फुकाचे फुकाचे । देवा पंढरीरायाचे ।

नाम अमृत हे सार । ह्रदयी जपा निरंतर

नाम संतांचे माहेर । प्रेम सुखाचे सागर

नाम सर्वांमध्ये सार । नरहरी जपे निरंतर ।।''

वरीलप्रमाणे नाममहात्म्याचे विशेष नरहरी सांगतात. ते म्हणतात देवाचं नाव घ्यायला काही पैशे मोजावे लागत नाही. नामस्मरण सहज सोपं. त्या नामस्मरणाचा जप अंत:करणात सातत्याने केला पाहिजे. विठ्ठलाचं नाव हे सर्व संतसज्जनांचे माहेरघर आहे. भक्तीच्या सर्व प्रकारामध्ये, साधनाकडे सर्वश्रेष्ठ हेच 'नामस्मरण' हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे. त्यातूनच नरहरी ''नाम संताचे माहेर । प्रेम सुखाचे सागर ।'' असे सहजच म्हणत जातात.

नरहरींनी अभंग अल्पच लिहिले असले तरी त्यांची काव्यशैली प्रासादिक आहे. सोपेपणा आणि गोडवा हे त्याच्या अभंगांचे विशेष आहेत. त्याचबरोबर रसाळ वाणी भावपूर्तता ही त्यांच्या अभंगांची महत्वाची वैशिष्टये आहेत. आत्मिक उन्नती झाल्यानंतर नरहरीही समाजाच्या उन्नतीसाठी भावभक्तीचा प्रसार असा साध्या सोप्या

भाषेत भाविकाला स्मरतील अशी रुपके योजून अभंग लिहिले आहेत. ज्ञानेश्वर-नामदेवादी संतांनी आपल्या अभंगात विठ्ठलाच्या निस्सिम भक्तीची तुतारी फुंकली; त्या तुतारीने सूर आळवीत नरहरी त्यांच्यात मिसळून गेले.

नरहरींच्या जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी २०१९ साली प्रकाशित झालेला 'कटिबंध' हा चित्रपट, नरहरी-नरहरी चित्रपट, संत नरहरी सोनार भक्तिपूर्ण फिल्म असे काही चित्रपट निघाले आहेत.

**३.५.७ चोखामेळा :**

चोखोबांची जन्मतिथी अज्ञात आहे. त्यांच्या जन्माबाबत अनेक दंतकथा प्रसिध्द आहेत. त्यांचा फारसा विचार न करता उपलब्ध साधनांच्या आधारे त्यांची मृत्युतिथी मात्र उपलब्ध आहे. तिचा विचार करुया. चोखामेळा यांचा मृत्यू वैशाख शुक्ल ५ शके १२६० म्हणजेच इ.स. १३३६ रोजी झाला. मंगळवेढ्याचे संत चोखामेळा हे नामदेव समकालीन मंडळीतील थोर संत. अस्पृश्य जातीत जन्मलेले चोखोबा विठ्ठलाचे परमभक्त होते. चोखोबांच्या घरात विठ्ठलभक्तीची परंपरा त्यांच्या आजी-आजोबांपासून चालत आली असल्यामुळे त्यांना विठ्ठलाचे वेड लागणे स्वाभाविक आहे. त्यामुळे ते अधुनमधून पंढरपूरास जात असत. पंढरीत त्यांना नामदेवांची कीर्तने ऐकायला मिळाल्यामुळे त्यांचे मन विठ्ठलाकडे धाव घेऊ लागले. नामदेवांना तर त्यांनी आपला गुरुच मानले होते. विठ्ठलाच्या या निस्सिम भक्ताचे विठ्ठलाशी मनोमन मीलन झाले होते. यासंबंधीचे अनेक उल्लेख त्यांच्या अभंगांत सापडतात. चोखोबांची पत्नी सोयराबाई, मुलगा कर्ममेळा, बहीण निर्मळा आणि मेव्हणा बंका हे चोखोबांच्या प्रभावाखाली अभंगरचना करीत असत. चोखोबांना ते गुरुस्थानी मानीत. चोखोबांच्या प्रभावाखाली लिहिणारी चोखामेळांची पत्नी सोयराबाई हिच्या अभंगातून अद्‌भुत काव्य, सुरेल गेयता, अस्सल तत्वज्ञान आणि सोपे अध्यात्म हे सगळे पाहायला मिळते. संत चोखोबांचे सारे कुटुंब वारकरी क्रांतीच्या अग्रभागी उभे होते, उत्तम काव्य करीत होते, भक्तीचा आदर्श उभारत होते, माणसाच्या माणुसकीला साद घालत होते. त्याकाळात सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या अध्यात्माच्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळवत होते. चोखामेळा यांच्या कुटुंबाच्या सर्वांगीण कार्यावरुन त्यांचे सगळे कुटुंबच एक चमत्कार आहे हे लक्षात येते.

चोखोबांची राहणी फार स्वच्छ होती. आपले काम संपल्यावर सायंकाळी स्नान करुन ते पांडूरंगाचे ध्यान करीत. हीन जातीत जन्मल्यामुळे होणारी उपेक्षा व संसारदु:खाने त्यांचे मन अगदी कंटाळून गेले होते. त्यातूनच ते म्हणतात,

''एकापुढे एक पडती आघात । सारिता न सरत काय करु ?''

मनाला शांती व आराम मिळावा म्हणून चोखोबांनी अनेक तीर्थयात्रा केल्या; पण कोठेही त्यांचे मन रमले नाही.

''बहुत हिंडलो देश देशांतर । परि मन नाही स्थिर झाले कोठे ।

बहुत तीर्थे फिरोनिया आलो । मनासवे झालो वेड्गलची ।

बहुत प्रतिमा ऐकिल्या पाहिल्या । मनाच्या राहिल्या येरझारा ।

चोखा म्हणे पाहता पंढरी भूवैकूंठ । मनाचे हे कष्ट दूर झाले ।''

पंढरपूरास संतसमागम, हरिनामाचा गजर, चंद्रभागेचे वाळवंट, विठ्ठलाची सुंदर मूर्ती पाहून चोखोबांचे मन तेथे रमले. यानंतर चोखोबांनी पंढरीची वारी कधीही चुकू दिली नाही. पंढरीचे वारकरी पाहिले म्हणजे त्यांचे मन संतुष्ट होई. चोखोबाच्या मनाने विठ्ठलभक्ती व विठ्ठलदर्शन याकडे ओढ घेतल्याने ते सर्व कुटुंब पंढरपूरास वास्तव्यास आले.

पंढरपूरातील मुक्कामात मनाची झालेली तृप्ती ते ''खटनट यावे शुध्द होऊन जावे'' अशा शब्दांत करतात. तेथील वास्वव्यातील रोजच्या अनुभवाचे वर्णन चोखामेळा,

''विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।। १।।

होतो हरिनामाचा गजर । दिंड्या पताकांचा भार ।। २।।

निवृत्ती ज्ञानदेव सोपान । अपार वैष्णव ते जाण ।। ३।।

हरिकीर्तनाची दाटी । तेथे चोखा घाली मिठी ।। ४।।''

अशा भावपूर्ण शब्दांत करतात. विठ्ठलनामाच्या गजराने भारावून गेलेले चोखामेळा आपल्या कर्तव्यकर्माची जाणीव झाल्याने विठोबाच्या देवळाच्या महाव्दारापर्यंतचा रस्ता स्वत: झाडीत. तेथूनच ते विठ्ठलाचे दर्शन घेत. पंढरपूरचे बडवे त्यांना मंदिरात जाऊ देत नसत. एकदा चोखोबाची उत्कट भक्ती पाहून विठ्ठलानेच त्याला दर्शन दिले व प्रसाद म्हणून त्याच्या गळ्यात रत्नहार व तुळशीची माळ घालून कपाळास बुक्का लाविला. दर्शनानंदी टाळी लागलेल्या चोखोबास पुजाऱ्याने पाहिले व त्याच्यावर देवाच्या रत्नहार चोरीचा आळ घेऊन त्याला पुष्कळ मार दिला. त्याच्यावर देव बाटविल्याचा आरोप केला. तेव्हा चोखामेळा विठ्ठलाचा धावा करताना म्हणतात,

''धाव घाली विठो आता चालू नको मंद । बडवे मज मारिती ऐसा काय तरी अपराध ।

विठोबाचा हार तुझ्या कंठी कसा आला । शिव्या देऊन म्हणती महादेव बाटविला ।

कट जोडूनि चोखा विनवितो देवा । बोलिलो उत्तरे परि राग नसावा ।।''

पुजाऱ्यांनी चोखोबाला पंचायतीपुढे उभे केले. पंचायतीने त्यांना पंढरपूरात व विठ्ठलमंदिराच्या आसपास कधीही न येण्याची शिक्षा दिली. या शिक्षेने चोखोबांना फार दु:ख झाले. शिक्षा म्हणून चोखोबा आता चंद्रभागेच्या पलीकडे झोपडी बांधून उदासपणे राहू लागले. आपल्यावर झालेला चोरीचा आळ विठ्ठलाने दूर करावा असे त्यांना वाटत होते. ते भावविवश होऊन विठ्ठलाची आळवणी करताना म्हणतात,

''काही तरी अभय न मिळे उत्तर । ऐसे का निष्ठूर जाला तुम्ही ।

मी तो कळवळोनि मारितसे हांक । तुम्हा पडे धाक कासयाचा ।

बोलोनि उत्तरे करी समाधान । एवढेचि दान मज द्यावे ।

चोखा म्हणे माझी पुरवावी आस । न करी उदास माझे मायें ।''

तरीही चोखोबांचे अखंड भजन चालूच होते. कारण देव पूजऱ्यांपाशी नव्हता तर तो चोखोबाजवळ होता. विठ्ठलनामाच्या निरंतर चिंतनाने ज्ञानेश्वर-नामदेवाची वैष्णवांच्या मेळ्यात चोखोबांचाही समावेश झाला आहे तो त्यामुळेच.

१३ व्या शतकात महाराष्ट्रात वर्णव्यवस्था कठोर होती. जातिभेद पाळला जाई. वर्ण-धर्मानुसार कामाची विभागणी केली जाई. त्यामुळे चोखोबांना अस्पृश्यत्वाची सर्व कामे करावी लागत. चोखोबा अस्पृश्य, त्यामुळे त्यांच्या हातचे पाणीही कोणाला चालत नसे. एवढेच काय त्यांच्या सावलीचाही विटाळ मानला जात होता. आपल्याला मिळणाऱ्या अशा वागणुकीबद्दलची खंत चोखोबांच्या अनेक अभंगांतून व्यक्त झाली आहे. दलितांवर होणाऱ्या सामाजिक अन्यायाची बोच व्यक्त करताना चोखामेळा,

''कोण तो सोवळा । कोण तो ओवळा ।

दोन्हीच्या वेगळा विठू माझा ।''

अशा आध्यात्मिक उंचीवर जातात. तर, ''उस डोंगा परि रस नोहे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ।'' अशा परखड शब्दांत समाजनिर्मिती खोट्या जातिव्यवस्थेचा दंभस्फोट करतात; आणि समाजाला डोळस बनविण्याचा प्रयत्न करतात. आपल्या कवितेतून सामाजिक वेदना व्यक्त करणारे चोखोबा हे मराठीतील पहिले कवी आहेत. चोखोबांच्या नवावर ३४९ अभंगांची नोंद आहे तर 'विवेकदर्पण' हे एक प्रकरण त्यांच्या नावावर उपलब्ध आहे. यापैकी नाममाहात्म्य, पंढरीवर्णन करणारे चोखोबांचे अभंग उठावदार झालेले आहेत. 'चोखोबांची कविता म्हणजे एक संस्कारसंपन्न, संवेदनक्षम आणि भक्तिप्रवण मनाचे मूक आक्रंदन आहे. चोखोबांच्या आत्मनिष्ठ कवितेतून ईश्वरदर्शनच्या तळमळीबरोबरच सामाजिक उपक्षेहून निर्माण झालेल्या वेदनेचा सूरही आहे असे मत हे. वि. इनामदार आपल्या 'महाव्दाराच्या पायरीशी' या पुस्तकात नोंदवितात.'

चोखोबांच्या काव्याने व संतत्वाने भारावलेल्या त्यांच्या कुटुंबानेही केलेली अभंगरचना मराठी कवितेत मोलाची ठरलेली आहे. सकलसंतगाथेत चोखोबांची पत्नी सोयराबाई त्यांच्या नावावर ६२, अस्पृश्यतेविषयी प्रथमच आपल्या कवितेतून विद्रोह प्रकट करणारा चोखामेळांचा मुलगा कर्ममेळा याच्या नावावर २७ तर चोखोबांचे मेव्हणे बंका महार यांच्या नावावर ३९ अभंग आहेत. आपल्या कुटुंबाला संतपदाकडे पोहोचविणाऱ्या चोखामेळ्याविषयी प्रकाश देशपांडे केजकर म्हणतात, ''एखाद्या संतकवीचे सगळे कुटुंब भक्तिरसात बुडून जावे इतकेच नव्हे तर या कवित्त्वाच्या, या सृजनाच्या सोहळ्यात सर्वस्वाने सामील व्हावे हे मराठी कवितेच्या आणि संस्कृतीच्या इतिहासाला अभिमानास्पद वाटावे असे दुर्मिळ उदाहरण आहे. ही चोखोबांच्या संतत्वाची आणि कवित्वाची जादू आहे. आपल्या हीन जातीवर, दैन्य-दारिद्र्यावर मात करुन आपले सगळे कुटुंबच्या कुटुंब एवढ्या आध्यात्मिक उंचीवर नेणे आणि त्या उंचीला सृजनाचा स्पर्श देणे हे चोखोबांनी मराठी संस्कृतीला आणि मराठी कवितेला दिलेले मोठे योगदान आहे.'' (संत कविता : एक दृष्टीकोन : डॉ प्रकाश देशपांडे केजकर, पृष्ठ १६७)

मंगळवेढ्यास गावची वेस बांधताना एक दिवस चोखामेळांच्या अंगावर ती भिंत कोसळली. त्याखाली सापडून चोखोबा मरण पावले. अशा रीतीने या संताचा अंत झाला तो दिवस होता वैशाख वद्य ५ शके १२६० म्हणजे इ.स. १३३८. चोखोबांच्या अस्थी पंढपुरास नेऊन नामदेवांनी महाव्दाराच्या पायरीशी त्यांची समाधी बांधली.

**३.५.८ जनाबाई :**

विद्यार्थी मित्रहो ! १३ व्या शतकातील संत मुक्ताबाई, सोयराबाई, जनाबाई आणि कान्होपात्रा या संतकवयित्रींनी मराठी कवितेला आपल्या काव्यनिर्मितीने मोठा हातभार लावला आहे. भक्ती, आध्यात्म निरुपणाबरोबरच स्त्रीसुलभ भावनांचे मनोज्ञ दर्शन त्यांच्या या काव्यातून घडते. या संतकवयित्रीपैकी संत जनाबाईंच्या कवितेचा आपण येथे विचार करणार आहोत.

गोदावरी नदीच्या काठी वसलेल्या 'गंगाखेड' या गावी राहणाऱ्या दमा नावाच्या एका शूद्र भगवद्‌भक्ताची जनाबाई ही मुलगी. दमा आणि करुंड ही पती-पत्नी नित्यनेमाने पंढरीची वारी करीत. विठ्ठलदर्शनाने त्यांना समाधान मिळत होते. आई वडिलांच्या भगवद्‌भक्तीचे संस्कार जनाबाईंवर कळत्या वयात झाल्याने त्यांचीही विठ्ठलभक्ती वाढीस लागण्यास मदत झाली. आपल्या आवडत्या देवाचे दर्शन घ्यावे या हेतूने जनाबाई आईवडिलांकडे पंढरपूरास जाण्याचा हट्ट धरतात. बालहट्ट पुरविण्यासाठी दमा आणि करूंड हे उभयंत तिला घेऊन पंढरपूरास येतात व विठ्ठलाचे दर्शन घेतात. जनाबाईंना बालपणापासूनच दररोज भगवद्‌भक्तीचे बाळकडू मिळाल्याने एका विठ्ठलदर्शनाने तिचे समाधान होत नाही. दररोज विठ्ठलाचे दर्शन व्हावे म्हणून जनाबाइ पंढरपूरातच राहण्याचा हट्ट धरतात. योगायोगाने नामदेवांचे वडील दामशेठी त्यांना भेटतात आणि जनाबाईंचा हट्ट पुरविला जातो. विठ्ठलाची नयनमनोहर मूर्ती पाहून जनाबाई तहानभूक विसरली. मूर्तीकडे पाहून ती तन्मय झाली. तिची ही भावविवश अवस्था पाहून तिच्या माता-पित्यांना फार आश्चर्य वाटले. विठ्ठलाने स्वप्नात येऊन दिलेल्या साक्षात्काराने आणि जनाबाईची मूर्तिप्रवण अवस्था पाहून दमा आणि करुंड जनाबाईला दामाशेठींच्या घरी ठेवून गंगाखेडला परततात. जनाबाईंवर दामाशेठीच्या घरीही मोठे वादंग माजते. कुटुंबामध्ये अगोदरच इतकी मनुष्ये आहेत. त्यात ही 'खायला काळ आणि भुईला भार कशाला' अशी आपली प्रतिक्रिया दामाशेठींची पत्नी आणि नामदेवांची आई गोणाईंनी व्यक्त केली आहे. दामाशेठीच्या घरी काम करुन जनाबाई तेथेच राहू लागली. त्या क्षणापासून त्यांना भक्तशिरोमणी, भक्तश्रेष्ठ नामदेवांचा भक्तिसहवास लाभला. झाडलोट, धुणेभांडी करता करता, दळण दळताना त्यांना नामदेवांच्या कृपेने विठ्ठलाचा वेध लागला. शूद्राघरच्या एका साध्या पोरीच्या आयुष्याला सोनेरी किनार लाभली. नामदेवांच्या संगतीत जनाईस विठ्ठलकृपेचा लाभ झाला. नामदेवांच्या सोबतीमुळेच जनाबाईंनी देव जिंकला. पुढे जनाबाई आणि विठ्ठल यांच्यात जे भावबंध तयार होतात ते नामदेवांमुळेच झाले व नामदेवांच्या घरी काम करुन राहिल्यामुळे जनाबाई आपला उल्लेख 'नामयाची दासी जनी' असा करतात. जनाबाईला दामाशेठींच्या घरी सोडून गावी परतलेले दमा आणि करुंड लवकरच निर्वातल्यामुळे नामदेवांखेरीज त्यांना कोणाचा आधार राहिला नाही. अशा आर्त अवस्थेत जनाबाई विठ्ठलाचा धावा करताना म्हणतात,

''माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।

मी तुझे गां लेकरु । नको मजेशी अव्हेरू ।।

अंत किती पाहाता देवा । थोर श्रम झाला जीवा ।

सकळ जीवाच्या जीवना । म्हणे दासी जनी नारायणा ।।''

(जनाबाई अभंग क्र. ५८)

असा जनाबाईंचा पुकार तिच्या अवीट अभंगवाणीत सर्वत्र दिसतो. ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या अभंगवाणीचे संस्कार झालेले जनाबाईंच्या विठ्ठलमहिमा, संतचरित्रपर, बालक्रीडा, आख्यानकविता, आरत्या, पदे अशा वैविध्यपूर्ण रचनेतील साडेतीनशे अभंग उपलब्ध आहेत.

विठ्ठलभक्ती हा तर सर्व संतांच्या आवडीचा विषय. नामदेवांना तर त्यांच्या विठ्ठलभक्तीने 'भक्तशिरोमणी' या पदाला पोहोचविले. अशा नामदेवांच्या घरी जनाबाईचं उभं आयुष्य व्यतीत झाल्याने नामदेवांच्या विठ्ठलभक्तीचा प्रभाव जनाबाईंवर होणे स्वाभाविक आहे. या प्रभावातूनच जनाबाई,

''ये गं ये गं विठाबाई । माझे पंढरीचे आई ।

भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ।''

अशा स्त्रीसुलभ कारुण्याने भरलेल्या सोप्या भाषेत साद घालतात. तेव्हा समस्त भाविकांची हृदये हेलावून जातात.

विठ्ठलाचा धावा करुन त्याला साद घालणाऱ्या जनाबाई पुढे विठ्ठलनामाचा गजर करुन

''नाम विठ्ठलाचे घ्यावे । मग पाऊल टाकावें ।

नाम तारक हे थोर । नामें तारिले अपार।

अजामेळ उध्दरिला । चोखामेळा मुक्तीस नेला ।

नाम दळणी कांडणी । म्हणे नामयाची जनी ।।''

असा त्यांच्या स्मरणातच मोक्ष असल्याचे सांगतात. नाम:स्मरणाने मोक्षप्राप्त गेलेल्या चोखोबांचे उदाहरणे देऊन अजामेळ या पाल्याचा नामस्मरणाने उध्दार झाल्याचे सांगतात.

संतांच्या जीवनातील साक्षात्कार हे ते विठ्ठलाशी किती एकरुप झाले होते याचे जिवंत दाखले आहेत. मातीची भिंत चालविणारे ज्ञानेश्वर विठ्ठलातच विलीन झाले. दगडाच्या विठ्ठलमूर्तीने नामदेवांचा नैवेद्य खाल्ला, तुकारामाच्या वह्या इंद्रायणीवर तरळू लागल्या. असाच साक्षात्कार जनाबाईंच्या अनुभवाला आला. नामदेवांच्या घरी जनाबाई दळण-कांडण, झाड-लोट, धुणे-भांडी, शेणी-काटक्या गोळा करण्यासारखी कामे करीत होत्या. अशा कष्टकरी कामकरी जनाबाई जेव्हा विठ्ठलाशी मनोभावे एकरुप होतात तेव्हा आपल्या मनाचा अनुभव त्या,

''झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी

साळी सडायास काढी । पुढे जाऊनी उखळ झाडी ।

सांडूनिया थोरपण । करी दळण कांडण ।

राना जाये शेणीसाठी । वेंचू लागे विठोबा पाठी

जना जाई पाणीयासी । मागे धावे ऋषिकेशी ।''

अशा प्रभावी शब्दांत सांगतात. जनाबाईंनी ईश्वरास इतके ऋणी केले होते की, देव त्याना हर एक कामात साह्य करीत होता. अशी त्यांची साक्ष आहे. परमेश्वराच्या अस्तित्वाची मनाला जाणीव होणे किंवा त्याचा तसा अनुभव येणे ही भक्तिसुखाची अत्युच्च पायरी होय. आणि ती पायरी जनाबाईंनी पार केली होती.

जनाबाईंचा विठ्ठलावर इतका अधिकार निर्माण झाला होता, की त्या अधिकारातून विठ्ठलाला

''रागा येऊनी काय करिसी । तुझे बळ आम्हा पाशी

अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।।''

अंगणात उभं राहून अशा शिव्या देतात. विठ्ठलला मूळ मायेचं कारटं असे संबोधून मायेच्या पलीकडचा तो परमात्मा निर्गुण, निराकार, निर्विकल्प व निरंजन आहे. पण मायेने माखलेल्या रुपात तो सगुण साकार असल्याचं आपल्याला जाणवतं, म्हणून तो मायेच्या पोटी जन्माला आलेला मुलगा आहे. असे जनाबाईंनी त्याचे केलेले वर्णन आध्यात्मिकदृष्ट्या महत्वाचे आहे.

नामदेवांच्या सहवासाने जनाबाईंनीही संतचरित्रे उत्तम साधलेली आहेत. आपल्या समकलीन संताविषयीच्या भावना फार आपुलकीने त्यांनी आपल्या अभंगात व्यक्त केल्या आहेत. त्यांचे सर्व संतसख्यांशी फार जिव्हाळ्याचे नाते आहे. उदाहरणादखल आपल्याला त्यांचा 'ज्ञानेश्वरचरित्र' पर अभंग पाहता येईल. जनाबाई ज्ञानेश्वरांविषयी म्हणतात–

''ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।

मरोनिया जावे । बा तुझ्याच पोटी यावे ।

ऐसे करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ।

जावे वोवाळुनि । जन्मोजन्मी दासी जनी ।।''

अशा वडीलकीच्या भूमिकेतून आदरभाव व्यक्त करताना दिसतात.

ज्ञानदेव, नामदेवांनी संतांच्या तीर्थयात्रेत जनाबाई मनोभावे सहभागी होत्या. या तीर्थयात्रेत अठरापगड जमातीतून निर्माण झालेले लोक विठ्ठलभक्तीच्या जोरावर भक्तिमार्गातील आपले अनुभव अभंगांतून व्यक्त करीत होते. एका विठ्ठलाच्या ठिकाणी वारकऱ्यांची झालेली अलोट गर्दी जनाबाईंनी भारावून टाकते. या भारावलेपणातूनच जनाबाई विठ्ठल आणि त्याला मिळालेली लडिवाळ भक्त यांच्यावर एक रुपक रचतात. ते असे,

''विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताबाई सुंदर ।
गोरा कुंभार मांडीवर । चोखा जीवा बरोबरी ।
बंका कडियावरी । नामा करांगुळी धरी ।
जनी म्हणे रे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।''

माझा विठोबा लेकुरवाळा आहे. मुलाबाळांचा धनी आहे. आपल्या मुलाबाळांना खेळवत तो निघाला आहे. असा एक चैतन्यदायी सोहळा जनाबाई ह्या अभंगाद्‌वारे रेखाटतात. संतमेळ्यातील संताच्या गाठीभेटीचे प्रसंग जनाबाईंनी पाहिले होते. ते वरील अभंगातून प्रकट झाले आहेत.

''धरिला पंढरीचा चोर । गळा बांधोनिया दोर।''

या दुसऱ्या एका रुपात्मक अभंगात संत जनाबाई संतमेळ्याचा सांभाळ करणाऱ्या विठ्ठलाला आपल्या ह्दयरुपी तुरुंगात कोंडून ठेवल्याचे सांगतात. श्रीविठ्ठल आणि आपल्यात आता व्दैत उरले नाही असा एकरुपत्वाचा अनुभव त्या सांगतात.

जात्यावरील लोकगीतांचा आविष्कार जनाबाईंच्या अभंगात झालेला पाहायला मिळतो. तो असा. (जाते हे रुपक त्यांनी गतिमान संसारासाठी कल्पिलेले आहे.)

''सुंदर माझे जाते गं फिरे बहुतेंके। ओव्या गाऊ विठ्ठला तूं येरे बां विठ्ठला ।
जीव-शिव दोन्ही खुंटे गे प्रपंचाचे नेटेंगे । लावूंनि पांची बोटे गे तू येरे बा विठ्ठला
सासू आणि सासरा दीर तो तिसरा । ओव्या गाऊ भ्रतारा तू येरे बां विठ्ठला ।
प्रपंच दळण दळियेले पीठ भरिले । सासूपुढे ठेविलं तूं येरे बा विठ्ठला ।''

अशा जात्यावरील ओवीगीतांतून जनाबाईंनी श्रममुक्ती साधलेली आहे. फिरत्या जात्याला जीव आणि शिव असे दोन खुंटे आहेत. जातं फिरवायला आणि ओव्या गायला मैत्रिणी आल्या आहेत. प्रपंच्याचं दळण दळून पीठ भरुन सासूपुढं ठेवलेलं आहे. सत्वाच्या आधणात पुण्य वैरलं आहे. त्यातील पाप ऊतू जाऊन संपलं आहे. असे जात्यावरील हे गीत गायिल्याने आपल्याला विठ्ठलप्रीतीचा लाभ घडेल असे म्हणून जनाबाईंनी समस्त सासुरवाशिणींचे श्रम या अभंगाद्‌वारे हलके केले आहेत.

ज्ञानदेवांनी पायाभरणी केलेल्या वारकरी संप्रदायातील संतांची विठ्ठलभक्ती ही वत्सलतेची पावनगंगा आहे. अशा संप्रदायाच्या जनाबाईंही पाईक आहेत. त्यामुळे विठ्ठलाला विठाई किंवा विठू माऊली म्हणण्याइतका अधिकार त्यांनाही प्राप्त झालेला होता. सर्वच संतांनी विठ्ठलाला मातृरुपे दिलेली आहेत. तशी मातृरुपे जनाबाईंनी

एक अभंगात देताना दिसतात. तो अभंग असा,

''पक्षी जाय दिगंतरा । बाळकांसी आणी चारा ।

घार हिंडते आकाशी । झडप घाली पिलापांशी ।

माता गुंतली कामाशी । चित्त तिचे बाळापाशी ।

वानर हिंडे झाडावरी । पिला बांधूनि उदरी ।

तैसी आम्हांसी विठ्ठल मायें । जनी वेळोवेळीं पाहे ।।''

अशाप्रकारे देव आणि भक्त यांच्यामधील नातेसंबंध कल्पून विश्वाचा संसार सांभाळणारी विठाई संतांच्या कल्याणाची अखंड चिंता वाहते. मातेप्रमाणे देवाचाही आधार आपल्याला आहे असा दिलासा त्यांनी समस्त भक्तांना दिलेला पाहायला मिळतो.

ज्ञानदेव-नामदेव संतांच्या कार्यकर्तृत्वाने भारलेल्या जनाबाईंनी नामदेवांनी पाया घातलेल्या कीर्तनपरंपरेचाही आपल्या अभंगातून गौरव केला आहे. कीर्तनाचा महिमा सांगून अज्ञानी व सामान्य भक्तांसाठी कीर्तनाची पायवाट मोकळी केली आहे. या भक्तिवाटेवरील कीर्तनप्रेमरस आपल्याला लाभावा असे जनाबाई विठ्ठलाकडे मागणे मागतात.

या अभंगाव्यतिरिक्त जनाबाईंनी हरिश्चंद्राख्यान, कृष्णजन्म, बालक्रीडा, काला, दशावतारीवर्णन, थालीपाक अशी काही आख्याने रचली आहेत. मराठी संतवाङ्मयात जनाबाईंची आख्यानकाव्ये उठावदार आणि सरस ठरली आहेत. जनाबाईंच्या आख्यान काव्याविषयी डॉ. ब. ना. तुरंबेकर म्हणतात, 'जनाबाईंची आख्यानपर रचना तिच्या भक्तिमय अंत:करणाशी पूर्ण तादात्म्य पावली आहे. स्त्रीमनाची कोमलता, परमेश्वरविषयीचा दृढभाव, कारुण्य आणि वात्सल्य यांचा प्रत्यय तिच्या आख्यानरचनेतूनही येतो.' (मागोवा, डॉ. ब. ना. तुरंबेकर, पृष्ठ, १४०) जनाबाईंच्या या आख्यान काव्यातून आलेल्या श्रीकृष्ण, विश्वामित्र, हरिश्चंद्र, दुर्योधन, दुर्वासऋषी, पांडव, द्रौपदी व रोहिदास इ. पौराणिक व्यक्तिचित्रणातून व त्यातील अनेक दृष्टांतावरून जनाबाईंना पुराणग्रंथांची आवड असलेली पाहायला मिळते. अशा वैविध्यपूर्ण रचनेतून संत जनाबाई संतमेळ्यात लोकप्रिय झाल्या आहेत.

अशाप्रकारे स्त्रीमनाचा हळूवारपणा आणि भक्तीची उत्कटता यांनी जनाबाईंचे काव्य ओथंबून भरलेले आहे. हे काव्य श्रेष्ठत्त्व आणि भक्ती याबरोबरच स्त्रीमुक्ती आणि श्रममुक्तीचेही आहेत. जनाबाईंच्या या अभंगात तत्वज्ञान आणि आध्यात्म यांचा सुरेख संगम होऊन, त्यातून योगाच्या खूणा आणि ज्ञानदेवांविषयी अत्यादर स्पष्ट झाला आहे. नामदेवांच्या घरी दळण-कांडण करणारी, आई-बापाविना पोरकी असलेली एक सामान्य दासी सत्संगतीने आणि शुद्ध आचरणाने केवढ्या महत्पदास जाऊन पोहोचते हे जनाबाईंनी आपल्या कार्यकर्तृत्वाने दाखवून दिले आहे. त्यामुळे वारकरी संतमेळ्यात जनाबाईंचा उल्लेख 'संतवाटिकेतील जाईची वेल' असा केला जातो. तर जनाबाई आपल्या अभंगात 'नामयाची दासी जनी' असा स्वत:चा उल्लेख करते. शुद्धभाव आणि आचरण असलेल्या जनाबाईंनी इ.स. १३५० मध्ये नामदेवराय आणि कुटुंबासोबत आपली इहलोकीची यात्रा संपविली. पण आज सुमारे सातशे वर्षानंतरही कोणत्याही जातीची ओळख नसताना मोलकरणीचे काम केलेल्या

जनाबाईंचा प्रभाव टिकून आहे, काव्य जिवंत आहे. 'स्त्री जन्म म्हणोनि न व्हावे उदास' हे त्यांचे आश्वासन महाराष्ट्राच्या लेकींना आजही पुरलं आहे. जगातल्या स्त्रीवादाच्या सुरुवातीच्या हुंकारापैकी एक ठरावा असा जनाबाईंचा जीवनप्रवास आहे.

**३.५.९ कान्होपात्रा :**

विद्यार्थी मित्रहो! आतापर्यंत आपण या घटकात १३ व्या शतकातील कवी आणि तत्त्वज्ञ ज्ञानेश्वरांपासून ते 'संत वाटिकेतील जाईची वेल' संबोधल्या जाणाऱ्या जनाबाईपर्यंतच्या नऊ संतकवी आणि संतकवयित्रींच्या काव्याचा परिचय करून घेतला. आता आपण संतमालिकेतील संतकवयित्रींमध्ये समाविष्ट होणाऱ्या पंधराव्या शतकातील असामान्य चरित्राने भारावलेल्या कवयित्री कान्होपात्रा यांच्या काव्याचा विचार करणार आहोत.

कान्होपात्रा यांचा जन्म इ.स. १४६८ मध्ये पंढरपूरहून जवळच असणाऱ्या मंगळवेढा या संतांच्याच गावी राहाणाऱ्या शामा गणिका (नर्तिका) हिच्या पोटी झाला. कान्होपात्रा दिसायला सुंदर आणि लावण्यवती अशी होती. लहानपणापासूनच असलेल्या धार्मिक वृत्तीमुळे तिला देवाची पूजा व भजनाचा नाद लागला. शामाने तिला गायनकलाही शिकविली होती. वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत त्या नाचगाण्यांत तरबेजही झाल्या. गायन-नृत्य कलेपेक्षा त्यांना विठ्ठलाचीच ओढ अधिक होती. तारुण्यात प्रवेश करताच कान्होपात्रा अधिकच सुंदर दिसायला लागल्या. बघणाऱ्याला त्यांची लालसा वाटायला लागली. आपल्या लेकीच्या नृत्य व गायन कलेने भारावलेल्या शामाने आपल्या कान्होला विचारले, 'कान्हे, आपण राजाच्या दरबारात जाऊ. तुझ्या सौंदर्याने आणि नृत्य-गायनाने राजा खूष होईल आणि तुला मोठी बिदागी देईल.' आपल्या आईच्या मनातील हेतू जाणून कान्होपात्रा आईला म्हणाली, 'माझ्या सौंदर्याचे आणि नृत्य-गायन कलेचे मला प्रदर्शन मांडावयाचे नाही. मी दराबारात येणार नाही. माझे हे सौंदर्य आणि नृत्य-गायनाची कला मी परमेश्वराच्या चरणी अर्पण करणार आहे. आणि तुला जर माझ्या आयुष्याची चिंता वाटत असेल तर माझ्याहून जो पुरूष सुंदर असेल. त्याच्याशी मी लग्न करीन.' पण असा योग्य पुरूष मला अख्या प्रांतात दिसत नाही. शामाचा भ्रमनिरास झाला आणि कान्होपात्रेच्या आयुष्याची चिंता लागून राहिली. ती अधिकच लेकीच्या काळजीत पडली.

कान्होपात्राच्या आयुष्याला आध्यात्मिक वृत्तीचा जसा एक पदर आहे, तसा सामाजिक आणि व्यावहारिक जीवनातील उपेक्षेचाही एक पदर आहे. कान्होपात्राची आई शामा ही गणिकेचे (कलावतीचे, वेश्येचे) काम करीत होती. आई जे काम करते आहे ते पतित आणि पापमय आहे याची जाणीव आणि खंतही कान्होपात्राच्या मनात होती. देह आणि नृत्य-गायन यांचा विक्रय करणारं आयुष्य त्यांना मान्य नव्हतं. पतित काम आणि वाट्याला आलेली सामाजिक उपेक्षा यामुळे सर्वच पातळीवर तिची सामाजिक, व्यावसायिक आणि आध्यात्मिक दृष्टीने मानसिक कोंडी झाली होती. अशा परिस्थितीत आपली मानसिक कोंडी फोडण्यासाठी कान्होपात्रा थेट विठ्ठलालाच आवाहन करते. ती म्हणते,

''पतित तू पावना । म्हणविसी नारायणा ।

जरी सांभाळी वचन । ब्रीद वागविसी जाण ।

याती शुद्ध नाही भाव । दुष्ट आचरण स्वभाव ।

मुखी नाम नाही । कान्होपात्रा शरण पायी ।।''

या अभंगातून कान्हो आपल्या हीन जातीविषयीचे व त्यामुळे होणाऱ्या सामाजिक उपेक्षेचे दुखणे व्यक्त करते. ती देवाला म्हणते, '' हे नारायणा, पतितांना पावन करून उद्धार करतोस असं तूच म्हणतोस, तुझ्या म्हणण्याप्रमाणे तू खरंच तसा असशील तर माझी जात जी अपवित्र मानली जाते ती पवित्र करून घेण्यासाठी मी तुझ्या पायाशी शरण आली आहे. तू मला अभय दिलास तर तुझे ब्रीद खरे आहे असे मी समजेन.''

बालपणापासूनच कान्होपात्राला विठ्ठलभेटीची मोठी आस लागली होती. विठ्ठलभेटीसाठी तिचे मन तळमळत होते. विठ्ठलभेटीची ही तळमळ कान्होपात्रांनी काही अभंगामधून व्यक्त केली आहे. इतकी पवित्र भक्ती करूनही देव आपल्याला भेटत नाही याचा सर्व दोष ती आपल्याकडे घेताना म्हणते,

''संचित माझे खोटे मज असे ग्वाही । तुला बोल नाही देवराया ।

मानिला भरंवसा परि जाहला निरास । आता पाहू वास कवणाचा ।

लागला तो पाठी काळाचा दरारा । सोडवी दुसरा ऐसा कोण ।

तुझें म्हणविल्या शरण जाऊ कोणा । कान्होपात्रा म्हणे मना आणि देवा ।।''

आपले पूर्वकर्मच पुण्यवान आणि खरे नाही त्यामुळेच तुझ दर्शन मला होत नाही. त्यामुळे दर्शनाचा बोल मी तुला लावणार नाही असे ती प्रांजळपणाने कबूल करते. आपल्या संचिताचा विचार करून ती थांबत नाही. कारण संतदर्शन, संतसंग आणि संतसहवास यांच्या बळावरचं आपलं जीवन सफल होतं, या संतवचनावर कान्होपात्रांचा दृढ विश्वास होता. पंढरीच्या वारीच्या निमित्ताने आपल्याला झालेलं संतदर्शन ही भक्तीच्या वाटेवरची एक सुखद घटना आहे. संतदर्शनाने आपल्याला झालेला आनंद कान्होपात्रा

''इरली ती भूक तहान निमाली । संतांची देखीली चरणांबुजे ।

कीर्तनाने रंगी आनंदे नाचता । कान्होपात्रा चित्ता समाधान ।।''

असा आनंदभाव प्रासादिक आणि प्रभावी शब्दांत व्यक्त करते.

कान्होपात्राला नृत्य-गायन कलेत रूची होती पण कलेच्या प्रदर्शनातून स्वार्थ साधणे तिच्या तत्त्वात बसत नव्हते. आपल्या जीवनाचे सुख विठ्ठलभक्तीत आहे हे तिने मनोमन जाणले होते. त्यामुळेच तिला विठ्ठलाची अति ओढ लागली होती; आणि तिची मनोभूमीही विठ्ठलभक्तीस अनुकुल होती. या मानसिक ओढीतून आणि

अनुकुलतेतून कान्होपात्रा मंगळवेढ्यातून चाललेल्या वारकऱ्यांबरोबर भक्तीसाठी भुकेलेल्या पांडूरंगाच्या सेवेसाठी त्या पंढरपूरास आल्या. तेथेच राहू लागल्या. नित्य विठ्ठलदर्शन, त्याचे भजन-पूजन, संतसहवास, कीर्तन-प्रवचने यात तिचा काळ आनंदाने जाऊ लागला; ईश्वराच्या अखंड सेवेचे व्रत धारण केल्याने व देवाच्या निकटच राहिल्याने तो अपल्याला वश झाला आहे असे तिला वाटू लागले. त्यामुळे आपल्या देवावरील अधिकाराने ती म्हणते,

''उदारा पांडूरंगा धावे लवकरी । बुडते दूराचारी डोहामध्ये ।

माझी लाज राखा येवोनि अनंता । निरवी चरणी आता मन माझे ।

नको या उपाधी तोडा कृपानिधी । येऊनिया छेदी काम क्रोधा ।

कान्हुपात्रा म्हणे विठोबा जिवलगा । आलिंगने देगा सुख माते ।।''

विठ्ठला, तुझी कीर्ती ऐकून मी तुला शरण आले आहे. मजवर कृपा करुन माझा उध्दार कर, मला या संसारमोहातून वेगळे कर. माझे मन तुझ्या पायापाशी स्थिर होत नाही ते काम-क्रोधादी विकारांकडे धाव घेते, त्यापासून अलिप्त राहण्याचे मला बळ दे. अशी कान्होपात्रा विठ्ठलाला विनंती करते.

पंढरपूरात राहून कोन्होपात्राची विठ्ठलभक्ती सदृढ व बाळसेदार झाली होती. तिला आता सर्वसामान्य विठ्ठलभक्तांना उपदेश करण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. नाममहिमा अथवा नामभक्ती हे तिच्या उपदेशपर अभंगाचे एक निराळे आणि विशेष अंग आहे. नामभक्तीबरोबर विषयत्याग, वासना आणि विकार दूर करण्याविषयीचाही उपदेश कान्हापात्राने आपल्या अनेक अभंगांतून केला आहे. ती म्हणते

''घ्या रे घ्या रे मुखी नाम । अंतरी धरोनिया प्रेम ।।१।।

माझा आहे भोळा बाप । घेतो ताप हरोनि ।।२।।

आपुलिया नामासाठी । धावे संकटी लवलाहे ।।३।।

घ्या रे घ्या रे अनुभव । कान्हापात्रेचा माधव ।।४।।''

नामभक्तीचे साध्य झालेले आपले भक्तिनुभव कान्होपात्रा वरील अभंगातून व्यक्त करते. अंतरात्म्यापासून देवाचे नाव घ्या. तुमचा समस्त संसारताप निघून जाईल. आपल्या नामस्मराणासाठी भुकेलेला विठ्ठल तुमच्या संकटाला धावून येईल, असा विश्वासही कान्होपात्रा सर्वसामान्य ईश्वरभक्तांना देताना दिसते.

स्त्रियांना सौंदर्य हा शाप असतो की काय कुणास ठाऊक! कारण कान्होपात्राच्या बाबतीत तसेच झाले. पंढरपूरात भजन-कीर्तनात, विठ्ठलपूजेत रमलेल्या कान्होपात्रेचा कामातुरांनी तिथेही पिच्छा सोडला नाही. इतकेच

नाही तर धर्माने आमच्या भोगासाठी ठेवलेल्या एका रुपसुंदरीला भजनात पाहाणे अनेकांना रुचले नाही आणि यातूनच एके दिवशी बीदरच्या बादशहाच्या सरदाराने त्यांच्याजवळ कान्होपात्रेच्या सौंदर्याचे वर्णन केले. हे रसभरित वर्णन ऐकून कान्होपात्रा बीदरला आणण्यासाठी लगेचच बादशहाने आपले सरदार पाठवले. पण कान्होपात्रांनी आपल्यावरचे राजसत्तेचे वर्चस्व कधीच नाकारले होते. बादशहाचे शिपाई पंढरपूरात आपला शोध घेताहेत, ही वार्ता कान्होपात्राच्या कानांवरती आली. कान्होपात्रा विठ्ठलमंदिराकडे निघाली. शिपायांनी तिला महाद्वारापाशी गाठले. शिपायांचा अधिकारी त्यांना म्हणाला,'बादशहाने तुला बीदरास बोलावले आहे, तू जर खुशीने आलीस तर ठीक नाहीतर तुला जबरदस्तीने पकडून आणण्याचा आम्हाला बादशहाचा हुकूम आहे.' कान्होपात्रा त्यांना म्हणाली,'मी पंढरीरायाचा निरोप घेऊन येते तोवर तुम्ही इथे महाद्वारापाशीच थोडा वेळ थांबा' यावर कान्होपात्रा विठ्ठलाच्या मूर्तीजवळ गेली व हात जोडून पांडूरंगाला शरण जात त्याचा धाय मोकलून धावा करु लागली. तिने केलेला हा विठ्ठलाचा धावा, तिची असहाय्यता, शरणागती व अंत:करणातील व्याकुळता अत्यंत परिणामकारकपणे प्रकट करतो तो असा,

''नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा फुटो पाहे ।

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलागी जाहले तैसे देवा ।

तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे वो जननी विठाबाई ।

मोकलोनी आंस जाहले मी उदास । घेई कान्होपात्रेस ह्रदयात ।।१।।''

एवढे बोलून कान्होपात्राने विठ्ठलाच्या पावलांवर आपले मस्तक ठेवले. स्वत:चा देह अर्पण करुन टाकला. कान्होपात्राची प्रार्थना देवाने तात्काळ मान्य केली. तिची प्राणज्योत भगवंताने आपल्या स्वरुपात मिसळून घेतली. कान्होपात्राला विठ्ठलाच्या पायावर असे मरण प्राप्त झाले. हे सगळं बघणाऱ्या संतमंडळाने विठ्ठल मंदिराच्या दक्षिण द्वारावर कान्होपात्राचा देह पुरला. पुढं तिथं तरटीचे झाड उगवले. आज तिथेच कान्होपात्राचे देऊळ आहे. विठ्ठलाच्या कृपेमुळे कान्होपात्रावरील संकट टळले व संसारसागरातून ती मुक्त झाली.

सकलसंतगाथामध्ये कान्होपात्राचे ३३ अभंग समाविष्ट आहेत. कान्होपात्राचे असामान्य चरित्र अभ्यासकांना, संशोधकांना नेहमीच आव्हानात्मक असे राहिले आहे. कान्होपात्रावर आजपर्यंत अनेक चरित्रे लिहिली गेली. त्याचबरोबर ना. वि. कुलकर्णी यांनी 'संत कान्होपात्रा' हे नाटक व भालजी पेंढारकर यांनी १९३७ मध्ये दिग्दर्शित केलेला 'कान्होपात्रा' हा चित्रपट श्रोत्यांच्या प्रेक्षकांची आणि नाट्यरसिकांच्या मनावर गारुड करुन राहिला आहे.

## ३.६ उपसंहार :

विद्यार्थी मित्रांनो ! या घटकात आपण १३व्या शतकातील मराठी वाङ्मयाचा परिचय करून घेताना वारकरी संप्रदायाचा पाया रचणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या आणि त्याचा विस्तार करणाऱ्या नामदेवांच्या वाङ्मयाचा परिचय करुन घेतला. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवनाची साक्षेप जडण-घडण या दोन संतांनी केली. 'इये मराठीचिये नगरी ब्रम्हविद्येचा सुकाळु' करण्याची प्रतिज्ञा ज्ञानेश्वरांची होती; तर 'नाचू कीर्तनाचे रंगी

। ज्ञानदीप लावू जगी ।' ही नामदेवांची आकांक्षा होती. महाराष्ट्र शारदेच्या मंदिरात ज्ञानेश्वरांनी जो ज्ञानदीप प्रज्ज्वलीत केला. त्याच्या ज्योतीवर असंख्य दीपिका उजळून समाजजीवनातला सारा अंध:कार नाहीसा करुन टाकण्याची नामदेवांची महत्त्वाकांक्षा होती. नामदेवांनी आपल्या ऐशी वर्षाच्या दीर्घ आयुष्यात मोठ्या निष्ठेने व तन्मयतेने वारकरी पंथाचा प्रसार करुन बहुजन समाजाच्या सुप्त आकांक्षा जागृत केल्या. त्यामुळे हा संप्रदाय खराखुरा जनतेचा संप्रदाय ठरला. ज्ञानेश्वरांनी शूद्रातिशूद्रांना एक नवी ध्येयदृष्टी दिली तर नामेदवांनी आपल्या संसाराचा सारा भार पांडुरंगावर सोपवून भारतभर फिरत आपल्या कीर्तनांनी ईश्वराच्या यथार्थ ज्ञानाचा दीप उजळून दया, क्षमा, शांतीचा सर्वत्र प्रसार केला. समाजातील अठरापगड जातींमधील लोकांना, भक्तिगंगेचा प्रवाहात सामील करुन घेतले. महाराष्ट्रात आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. या आध्यात्मिक लोकशाहीत संतमेळ्यातील सांवता माळी, गोरोबा कुंभार, मुक्ताबाई, सेना महाराज, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, कान्होपात्रा या प्रमुख संतांबरोबरच पारिसा भागवत, कर्ममेळा इ. संतांनी भक्तिमार्गातील आपले अनुभव शब्दबध्द केल्याने वारकरी संप्रदायाला एक विराट स्वरूप प्राप्त झाले. परमार्थाचे अनेकविध मार्ग या संतांनी समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविले. त्यामुळे गेली सातशेहून अधिक वर्षे वारकरी संप्रदाय महाराष्ट्रभर पर्यायाने मराठी मनावर व महाराष्ट्राबाहेरही अधिराज्य गाजवत असल्याचे दिसते. या वारकरी संप्रदायात भारतातील सर्वधर्मीयांचा समावेश झाल्यामुळे आषाढी, कार्तिकीला पंढरपूरला आज भाविकांचा पूर आलेला पाहायला मिळतो.

## ३.७ शब्दार्थ व टीपा :

क्षेम : कल्याण, सुख, हित

गौळण : कृष्णाने वेडावलेल्या गोपींच्या भूमिकेतून रचलेले काव्य

विराणी : भक्ताने गायिलेले देवाच्या विरहाचे दु:खाचे गाणे

किंकर : सेवक, दास

ठाकूर : नामदेवांच्या हिंदी पदावलीत आलेला शब्द देव या अर्थाने योजला गेला आहे.

हुताशन : आहुती, हवनीय द्रव्य

कृपण : कंजुष

झेंगट : एक वाद्य

साळुंका : शिवलिंगाखालचा दगड

नवनीत : लोणी

झनकूट : झपाटून टाकणे

डोंगा : वाईट, वाकडा, हीन

उदक : पाणी

ताटी : झोपडीचे दार

पतीतपावन : पापाचा नाश करणारा

क्षेपक : काव्यात नंतर घुसडलेला मजकूर

अजामेळ : पातकी पण नाम:स्मरणाने उध्दरिलेला

## ३.८ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न आणि उत्तरे :

**योग्य पर्याय निवडा :**

१) ''माझा मराठाचि बोलू कवतिके। परि अमृतातेही पैजा जिंके ।'' असा मराठीचा गौरव कोणी केला आहे.

अ) नामदेव ब) ज्ञानदेव क) गोरा कुंभार ड) चोखा मेळा

२) 'आदि, समाधी आणि तीर्थावळी' अशा तीन प्रकरणात ज्ञानदेवांचे चरित्र कोणी लिहिले आहे?

अ) सावंता माळी ब) चोखामेळा क) सेना महाराज ड) नामदेव

३) सावंता माळी यांचा जन्म कोठे झाला आहे?

अ) बांदुगडे ब) मंगळवेढा क) अरणभेंडी ड) नरसी-बामणी

४) ''गोरा जुनाट पै जुना । हाती थापटणे अनुभवाचे'' असे गोरोबा कुंभाराविषयी गौरवोद्‌गार कोणी काढले आहेत?

अ) नामदेव ब) ज्ञानदेव क) सेना महाराज ड) नरहरी सोनार

५) ताटीच्या अभंगांची रचना कोणी केली आहे?

अ) जनाबाई ब) नामदेव क) मुक्ताबाई ड) ज्ञानदेव

६) ''जाता पंढरीसी सुख वाटे जीवा । आनंदे केशवा भेटतचि ।'' ही अभंगरचना कोणाची आहे?

अ) ज्ञानदेव ब) नामदेव क) सेना महाराज ड) नरहरी सोनार

७) विठ्ठलाच्या साक्षात्काराने कोणाच्या मनातील शैव-वैष्णव हा भेदाभेद संपून गेला?

अ) नरहरी सोनार ब) सेना महाराज क) चोखा मेळा ड) नामदेव

८) ''उस डोंगा परि रस नोहे डोंगा । काय भूललासि वरलिया रंगा ।'' हा प्रसिध्द अभंग कोणाचा आहे?

अ) चोखामेळा ब) सावंता माळी क) गोरोबा कुंभार ड) नरहरी सोनार

९)	‘संत वाटिकेतील जाईची वेल’ असा कोणाचा उल्लेख केला जातो?

अ) मुक्ताबाई	ब) जनाबाई	क) कान्होपात्रा	ड) सोयराबाई

१०)	‘‘नको देवराया अंत आता पाहू । प्राण हा सर्वथा फुटो पाहे।’’ असा विठ्ठलाचा धावा कोणी केला आहे?

अ) मुक्ताबाई	ब) जनाबाई	क) सोयराबाई	ड) कान्होपात्रा

उत्तरे : १) ब – ज्ञानदेव	२) ड – नामदेव	३) क – अरणभेंडी	४) अ – नामदेव

५) क – मुक्ताबाई	६) क– सेना महाराज	७) अ – नरहरी सोनार ८) अ– चोखामेळा

९) ब – जनाबाई	१०) ड – कान्होपात्रा

**३:९ दीर्घोत्तरी प्रश्न :**

१.	कवित्त्व आणि तत्त्वज्ञानाने भारलेल्या ज्ञानदेवांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आढावा घ्या?

२.	वारकरी संप्रदायातील प्रमुख आणि सर्वश्रेष्ठ संतकवी म्हणून ज्ञानेश्वरांच्या काव्यकर्तृत्त्वाचा परिचय करून घ्या ?

३ .	‘ज्ञानेश्वरांच्या काव्यात भक्ती आणि तत्त्वज्ञान यांचा सुंदर मिलाफ झाला आहे!’ या विधानाचा परामर्श घ्या?

४.	‘नामदेवांचे काव्य ईश्वरनिष्ठा जोपासणारे, ईश्वरतत्त्वाशी संवाद साधणारे आणि ईश्वराशी एकरूप होण्याची इच्छा बाळगणारे आहे’ या विधानाची साधार चर्चा करा?

५ .	वारकरी संप्रदायाचे कुशल संघटक, प्रसारक व संवर्धक म्हणून नामदेवांच्या सर्वांगिण कामगिरीचा आढावा घ्या?

**३.१० लघुत्तरी प्रश्न :**

१.	सांवता माळी यांच्या अभंगरचनेचा थोडक्यात आढावा घ्या?

२.	संत मुक्ताईचे मराठी कवितेतील योगदान थोडक्यात स्पष्ट करा?

३.	नरहरी सोनार यांच्या अभंगरचनेचा थोडक्यात परिचय करून घ्या?

४.	चोखामेळांची वाङ्मयीन कामगिरी थोडक्यात विशद करा?

५.	जनाबाईंच्या काव्याचे विशेष थोडक्यात सांगा?

### ३.११ लघुत्तरी प्रश्न :

१. संत मुक्ताबाई

२. संत चोखामेळा

३. हरिपाठाचे अभंग

४. अमृतानुभव

### ३.१२ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल.रा. नसिराबादकर

२. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग पहिला उत्तरार्ध : डॉ. अ. ना. देशपांडे

३. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : प्र. न. जोशी

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड पहिला : संपादक शं. गो. तुळपुळे

५. संत कविता : एक दृष्टीकोन : डॉ प्रकाश देशपांडे केजकर

६. संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध : डॉ सुहासिनी इर्लेकर

७. मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड पहिला : ल. रा. पांगारकर

८. श्री नामदेव : (चरित्र, काव्य आणि कार्य ) : महाराष्ट्र शासन प्रथममुद्रण १९७०

९. संत नामदेव : डॉ. हे. वि. हनामदार

१०. नामदेव गाथा : संपादक : ह. श्री. शेणोलीकर.

### ३.१२ क्षेत्रीय कार्य :

१. पद्माकर गोवईकर यांची मूळ कथा असलेला 'मुंगी उडाली आकाशी' हा मराठी चित्रपट पाहावा.

२. पद्माकर गोवईकर यांची भूमिका असलेला निर्माता शशी गोडांबे यांचा 'संत नामदेव' हा मराठी चित्रपट पाहावा.

३. आषाढी कार्तिकी एकादशीला स्वत: पंढरपुरास जाऊन ज्ञानदेवांनी उभारलेल्या व नामदेवांनी विस्तारलेल्या वारकरी संप्रदायाचे आजचे विराट रुप पाहावे. संत समाधीस्थळे पाहावीत.

४. महाराष्ट्रातील संतांच्या मंदिरांना व तीर्थक्षेत्रांना भेटी द्याव्यात; अभ्यास सहल काढावी.

५. संताच्या जीवनावरील चित्रपटांबरोबरच 'नाटक' ही पाहावे.

६. कीर्तन-प्रवचने ऐकावीत किंवा पाहावीत.

७. एकादशीनिमित्त निघणाऱ्या पालखी सोहळ्यातील चैतन्य अनुभवावे.

***

# घटक – ०४

## इ.स. १४०० ते इ.स.१५०० (स्थूल कालखंड)

## अन्य संप्रदायातील प्रमुख ग्रंथकार आणि त्यांची ग्रंथरचना

| | |
|---|---|
| * सत्यमालनाथ, चोंभा | (नाथ संप्रदाय) |
| * शांतलिंग आणि मन्मथशिवलिंग | (लिंगायत संप्रदाय) |
| * गुणकीर्ती व जिनदासनामा | (जैन मराठी कवी) |
| * नृसिंह सरस्वती आणि दासोपंत | (दत्त संप्रदाय) |
| * अज्ञानसिद्ध व बहिराजातवेद | (नागेश संप्रदाय) |
| * शेख महंमद आणि हुसेन अंबरखान | (मुस्लीम मराठी कवी) |
| * फादर स्टिफन्स, फादर क्रुवा | (ख्रिस्ती मराठी कवी) |

### ४.१ उद्दिष्ट्ये :

१. इ.स. १४०० ते इ.स. १५०० या कालखंडातील अन्य संप्रदायातील प्रमुख ग्रंथकारांची ओळख करून देणे.

२. अन्य संप्रदायातील प्रमुख ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथरचनांच्या माध्यमातून मराठी साहित्यामध्ये दिलेले योगदान अभ्यासणे.

३. विविध संप्रदायातील विचारधारांचा परामर्श घेणे.

४. अन्य संप्रदायातील ग्रंथकारांच्या लेखनाचे व वाङ्मयीन योगदानाचे वेगळेपण अधोरेखित करणे.

### ४.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो,

मागील प्रकरणामध्ये आपण इ.स. १३०० ते इ.स. १४०० (स्थूल कालखंड) या कालखंडातील वारकरी संप्रदायातील प्रमुख संत ज्ञानेश्वर, नामदेव, सावता माळी, गोरोबा कुंभार, मुक्ताबाई, सेना महाराज, नरहरी सोनार, चोखामेळा, जनाबाई, कान्होपात्रा इत्यादी संतांच्या कार्याचा व त्यांच्या वाङ्मयीन योगदानाचा अभ्यास केला. 'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञापदीप लावू जगी' या सूत्रास अनुसरून भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन धार्मिक व सामाजिक क्रांतीची चळवळ निर्माण करण्याचे व विकसित करण्याचे काम या संतपरंपरेने केले. जी चळवळ आज २१व्या शतकातही प्रभावीपणे कार्यरत असलेली पहावयास मिळते. या वारकरी संप्रदायातून अनेक संत व त्यांचे वाङ्मय उदयास आले. ते वाङ्मय आज महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा बहुमोल असा ठेवा आहे. वारकरी पंथाचे साहित्य मराठी भाषेतील अपरिमित असे योगदान आहे. या अमूल्य योगदानाचा अभ्यास मागील

प्रकरणामध्ये आपण विस्ताराने केला आहे.

इ.स. १४०० नंतरच्या कालखंडामध्ये काही अन्य संप्रदायातील अनेक ग्रंथकारांनी मराठी साहित्याच्या प्रवाहामध्ये आपल्या ग्रंथरचनांच्या माध्यमातून विपुल भर टाकण्याचे कार्य पार पाडले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने नाथ संप्रदाय, लिंगायत संप्रदाय, जैन संप्रदाय, दत्त संप्रदाय, नागेश संप्रदाय, मुस्लिम संप्रदाय व ख्रिस्ती संप्रदाय इत्यादींचा समावेश आहे. वारकरी, महानुभाव व समर्थ संप्रदायांच्या तुलनेने अन्य संप्रदायातील साहित्य त्या काळामध्ये प्रसिध्दीपराङमुखच राहिलेले दिसून येते.

या अन्य संप्रदायांचे दुर्लक्षित राहिलेले सामाजिक व वाङ्मयीन योगदान समजून घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण या अन्य संप्रदायातील प्रमुख रचनाकारांचा व त्यांच्या प्रभावी रचनांचा परामर्श घेणार आहोत.

### ४.३ सत्यमलनाथ व चोंभा (नाथ संप्रदाय)

सत्यमलनाथ व चोंभा या नाथ संप्रदायातील रचनाकारांचा अभ्यास करताना ते ज्या नाथ सप्रंदाय परंपरेचे पुरस्कर्ते होते त्या नाथ संप्रदायाची पार्श्वभूमी व तत्त्वज्ञान समजून घेणे अभिप्रेत आहे. त्यामुळे आपण प्रथम नाथ संप्रदाय व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा तसेच साहित्य परंपरेचा थोडक्यात परामर्श घेऊया.

#### ४.३.१ नाथ संप्रदाय

नाथ संप्रदाय हा भारतातील लोकप्रिय असा संप्रदाय असून इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या सुमारास उदयास आलेला हा एक शैव संप्रदाय आहे. या संप्रदायास 'अवधूतसंप्रदाय' या नावाने देखील ओळखले जाते. तसेच 'गोरख संप्रदाय' किंवा 'गोरखनाथी संप्रदाय' (गोरखनाथ या आरंभीच्या प्रमुख गुरुंच्या नावावरून) म्हणून ओळखला जातो. 'दर्शनी संप्रदाय', 'कानफाटा संप्रदाय', 'गुरू संप्रदाय' इत्यादी नावे या संप्रदायास त्यांच्या तत्त्वज्ञानावरून, परंपरेवरून व आचरणावरून देण्यात आलेली आढळतात. आदिनाथ अर्थात शिव यांच्यापासून या संप्रदायाची सुरुवात असल्याचे मानले जाते. बाराव्या शतकापर्यंत या संप्रदायाचे कार्य मोठ्या प्रमाणावर आढळून येते. या संप्रदायातील सर्वच दीक्षाधारी अनुयायांनी स्वत:च्या नावापुढे 'नाथ' ही उपाधी लावल्याचे दिसून येते. 'रक्षण करणारा अथवा सांभाळ करणारा स्वामी म्हणजे नाथ' या अर्थाने 'रक्षण करणाऱ्या स्वामीचा संप्रदाय' म्हणून 'नाथ' ही उपाधी लावण्याची परंपरा अस्तित्त्वात होती. मच्छिंद्रनाथांना या संप्रदायातील प्रथम गुरूचे स्थान देण्यात येते. त्यांचे शिष्य गोरखनाथ. ज्यांनी या पंथाचा मोठया प्रमाणावर प्रचार-प्रसार केला.

मच्छिंद्रनाथ-गोरखनाथ-गहिनीनाथ-जालिंदरनाथ-कानिफनाथ-भर्तरीनाथ-रेवणनाथ-नागनाथ- चरपटीनाथ अशी नऊ म्हणजेच नवनाथांची गुरू-शिष्य परंपरा आहे. मच्छिंद्रनाथांनी योगिनी कौल मार्ग व नाथ संप्रदाय या मार्गांचे एकत्रीकरण करण्याचे काम केले. त्यांनी आपल्या लेखनामध्ये योगमुक्त कौल मार्गाचे तत्त्वज्ञान विषद केले आहे. तसेच गोरखनाथांनी लिहिलेल्या 'सिध्दसिध्दांतपध्दती' या ग्रंथामध्ये नाथ संप्रदायाचे तत्त्वज्ञान मांडण्यात आले आहे. शिव हा अनन्य, अखंड, अद्वय, अविनाशी, धर्महीन व निरंग असल्यामुळे 'अकुल' मानला जातो तर शिवाची इच्छा ही शक्ती असून तिला 'कुल' मानले जाते. या शिव आणि शक्तीचे म्हणजेच 'अकुल' आणि 'कुल'चे सामरस्य प्राप्त करणे हे नाथयोगींचे मुख्य ध्येय असल्याचे मानले जाते. शिव-शक्ती मिलन म्हणजेच

समाधी होय. या अवस्थेला 'सिध्दावस्था' वा 'अवधूतावस्था' म्हणतात. नाथ संप्रदायामध्ये याला मोक्ष मानून या सिध्दावस्थेस अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. हठयोगाने बिंदू, वायू, मन व वाणी यांच्यावर प्रभुत्व प्राप्त करता येते, अशी या पंथाची धारणा आहे. कुंडलिनी जागृत करण्याच्या साधनेवर नाथयोगींचा विशेष भर असल्यामुळे त्यासाठी समाधीधारणेचा अविरत अवलंब करणे व त्या समाधीतील आनंद प्राप्त करणे या बाबींचे सातत्य ते ठेवतात. 'गोरक्षसिंध्दांत' या सारख्या ग्रंथाची रचना या पंथातील विचार मांडण्यासाठी झाल्याचे दिसून येते. या ग्रंथामध्ये शक्ती सृष्टी करते, शिव पालन करतो, काल संहार करतो व नाथ मुक्ती देतात. नाथ हाच एकमेव शुध्द आत्मा आहे तर बाकीचे जीव असतात. नाथ हे सगुण-निर्गुणाच्या पलीकडे पोहोचलेले असतात तर त्यांच्यासाठी 'सदानंदावस्था' हेच प्रमुख ध्येय होय. अशा तत्त्वज्ञानाची मांडणी करण्यात आलेली आहे.

नाथपंथीयांनी विशिष्ट वेशभूषा धारण केलेली पहावयास मिळते. शंकराला प्रसन्न करून नाथांनी या विशिष्ट वेशभूषेचा स्वीकार केला अशी आख्यायिका सांगण्यात येते. कानामध्ये मंत्रपूर्वक कुंडले धारण करणे, अंगामध्ये भगवी कफनी, गळ्यामध्ये रुद्राक्षाच्या माळा, हातामध्ये त्रिशूल किंवा किंगरी हे सारंगीसारखे वाद्य, कपाळावरती भस्म, केसांचे शंकराप्रमाणे वरती वेटोळे करून बांधणे, भिक्षा मागण्यासाठी हातामध्ये फुटलेल्या खापराचा तुकडा अथवा नारळाची करवंटी, खांद्यावरती झोळी अशा प्रकारचा नाथपंथीय साधकांची वेशभूषा आढळून येते.

नाथ संप्रदायाने तत्त्वज्ञानाच्या प्रचारासाठी लोकभाषेमधून ग्रंथांची रचना केल्याचे महनीय कार्य पहावयास मिळते. संस्कृत व प्रादेशिक भाषांचा त्यांनी प्रामुख्याने वापर केला. तसेच लोकसाहित्य प्रकारांचा वापर करून पंथाचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवले. शांत व अद्‌भुत रसाचा अधिक प्रभाव असणाऱ्या नाथ संप्रदायाच्या प्रारंभीच्या साहित्यामध्ये आदिनाथांनी वसुगुप्त या काश्मिरी शिवभक्तास स्वप्नात आदेश दिल्याची एक आख्यायिका सांगण्यात येते. या आख्यायिकेनुसार हिमालयाच्या महादेवगिरीनामक शिखरावरील एका शिळेवर काही सुत्रे असल्याचे सांगण्यात आले होते. ही सुत्रे म्हणजे 'शिवसुत्रे' होत. या 'शिवसूत्रां'वर नाथ संप्रदायाचे सर्व तत्त्वज्ञान आधारलेले आहे. तसेच 'कौलज्ञाननिर्णय', 'अकुलवीरतंत्र', 'कुलानंद' इत्यादी साहित्यनिर्मिती मच्छिंद्रनाथांनी केलेली आहे. तर 'सिध्दसिध्दांतपध्दती' हा ग्रंथ गोरखनाथांनी निर्माण केलेला आहे. गोरखनाथांच्या नावावर 'अमनस्क', 'अमरौघ शासन', 'गोरक्षपध्दती', 'गोरक्षसंहिता' इत्यादी २८ ग्रंथ असल्याचे दिसून येतात. हिंदी भाषेमध्ये त्यांच्या ४० ग्रंथाचे लेखन असून ते 'संपूर्ण गोरखबाणी' या नावाने प्रसिध्द आहे. त्यांच्या काही पदांना म्हणींचे रूप लाभलेले आहे. तर काही कन्नड पदेही त्यांच्या नावावर आढळतात.

मच्छिंद्रनाथ व गोरखनाथांच्या लेखनकार्याच्या प्रभावातून नाथ संप्रदायामध्ये पुढील काळात 'हठयोगप्रदीपिका' व 'गोरक्षसिध्दांतसंग्रह' यासारख्या ग्रंथांची निर्मिती झाली. याच परंपरेमध्ये सत्यमलनाथ व चोंभा या नाथपंथीय साधकांच्या साहित्यनिर्मितीची भर पडली. त्यांच्या लेखनकार्याचा व मराठी साहित्यामधील योगदानाचा परामर्श आपण येथे घेऊया.

### ४.३.२ सत्यमलनाथ

नाथ संप्रदायाचा प्रभाव १२ व्या शतकानंतर उदयास आलेल्या महानुभाव, वारकरी, दत्त इत्यादी संप्रदायावर दिसून येतो. वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू निवृत्तीनाथ यांनी नाथ पंथाची दीक्षा घेतली होती.

हे निवृत्तीनाथ आध्यात्मिक जीवनातील संत ज्ञानेश्वरांचे गुरू होते. त्यामुळे साहजिकच नाथ संप्रदायाचा प्रवाह वारकरी संप्रदायामध्ये प्रवाहित झाल्याचे स्पष्ट होते. संत ज्ञानेश्वरांच्यापासून दोन परंपरा निर्माण झाल्या. एक परंपरा भागवत धर्माची परंपरा म्हणून ओळखली जाते. ज्यामध्ये ज्ञानदेव-सोपानदेव-विसोबा-नामदेव महाराज या क्रमाने ती विकसित झाली. तर दुसरी परंपरा नाथ पंथाची ज्या परंपरेस 'योगपरंपरा' म्हणून ओळखले जाते. जी ज्ञानदेव- सत्यमलनाथ- गैबीनाथ-उद्‌बोधकनाथ-केसरीनाथ-शिवदीननाथ या क्रमाने विकसित झाली. ज्ञानेश्वरांनंतर सत्यमलनाथ हे नाथ संप्रदायातील महत्त्वाचे पुरूष मानले जातात.

सत्यमलनाथांच्या जन्माविषयी अशी आख्यायिका सांगण्यात येते की, त्यांच्या आई वडिलांना संतती नव्हती. तेव्हा त्या जोडप्याने आळंदी येथे येऊन ज्ञानेश्वरांच्या समोर मनोमन पुत्रप्राप्तीसाठी नवस केला. पुत्र झाल्यास तो ज्ञानेश्वरांच्या चरणी ठेवण्याची इच्छा बाळगली. त्यांच्या या नवसाचे फळ म्हणून त्यांना झालेला पुत्र सत्यमलनाथ हे होय. सत्यमलनाथांना ज्ञानेश्वरांचा अनुग्रह होता. सत्यमलनाथ हे प्रतिभावंत होते. त्यांची जडणघडण आध्यात्मिक वातावरणात झाली होती. त्यामुळे प्रतिभा आणि आध्यात्मज्ञानाच्या जोरावर त्यांनी ज्ञानेश्वर माऊली या आपल्या गुरूंच्या चरित्रात्मक व अनुग्रहाच्या कथनाला सामावून 'सिध्दांतरहस्य' हा ग्रंथ लिहिला. सत्यमलनाथांनी हा वेदांतपर ग्रंथ शके १६०२ च्या दरम्यान लिहिला आहे. 'सिध्दांतरहस्य' या ग्रंथामध्ये एकूण सोळा हजार श्लोक असून दहा प्रकरणांमध्ये या ग्रंथाची विभागणी केलेली आहे. हा ग्रंथ 'ललित प्रबंध' या नावाने देखील उल्लेखिलेला आढळून येतो. 'ललित प्रबंध' या ग्रंथामध्ये एकूण बारा हजार ओव्यांचा समावेश आहे. या ग्रंथाचे विशेष म्हणजे या ग्रंथामध्ये संत ज्ञानेश्वरांच्या चरित्रास कथन करणाऱ्या दोनशे ओव्यांचा समावेश केला आहे.

'नवरत्नमाला' या शीर्षकाची आणखी एक रचना सत्यमलनाथांच्या नावावर आहे. नऊ रत्नांच्या नावावरून प्रकरणांची विभागणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पदमराग, गोमेद, वज्र, पाचू, प्रवाळ, मंगळ, वैडुर्य, पुष्पराज व इंद्रनील अशी त्यांची नावे आहेत. या रचनेमध्ये एकूण १२५७ ओव्या आहेत. प्रकृतिपुरूषविवेक, दैवासुरसंपदा विभाग, योगविवरण, परब्रम्हस्वरूप, आत्मसाक्षात्कार इत्यादी विषयांचे सविस्तर वर्णन प्रस्तुत ग्रंथात सत्यमलनाथांनी केले आहे. आज या 'नवरत्नमाला' रचनेतील पदमराग, गोमेद, वज्र, पाचू, प्रवाळ, मंगळ या रचना उपलब्ध आहेत तर वैडुर्य, पुष्पराग, इंद्रनील या रचना उपलब्ध नाहीत.

### ४.३.३ चोंभा

चोंभा हे नाथ परंपरेतील महत्त्वाचे कवी होते. त्यांचा 'उखाहरण' हा इ.स.१३७८ च्या आसपासचा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. राजवाडे यांच्या प्रतीमध्ये या ग्रंथाच्या ५७५ ओव्या आहेत. या संपूर्ण ग्रंथाची ओवीसंख्या २०११ आहे तर अध्यायांची संख्या १८ आहे.

चोंभालिखित 'उखाहरण' हा ग्रंथ व त्याचा कालखंड तसेच भाषा व कवीचे व्यक्तिमत्व इत्यादी बाबीसंदर्भाने अनेक संशोधकांमध्ये विविध मतभेद आढळून येतात. चोंभा यांना अभ्यासक राजवाडे यजुर्वेदी ब्राह्मण ठरवितात तर यु. म. पठाण चोंभा कवी हे कोळी जातीचे होते, असे मत नोंदवितात. अशा प्रकारे चोंभा यांच्या जातीविषयकही मतभेद आहेत.

'उखाहरण' या ग्रंथामधून कवीने हरिहरैक्यभाव वर्णन करण्याचे काम केले आहे. बाणासुराबरोबरच्या युध्द प्रसंगामध्ये मुस्लिम आक्रमणाचे दृश्य कवीने प्रतिबिंबित केले आहे. चोंभा यांच्या लेखनावर प्रामुख्याने ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेचा प्रभाव असल्याचे दिसून येते. या प्रभावाने येणारे 'पवाडे', 'दळवाडे', 'झळंबले तिन्ही लोक', 'निसाणा घावो दिला', 'कोमाइला', 'उसिणा घाई झुंजाचे' इत्यादी शब्दप्रयोग येतात.

चोंभा यांचे 'उखाहरण' हे पौराणिक थाटाच्या शैलीतील लेखन आहे. अस्त्रयुध्दाची वर्णने, प्रद्युम्न वीराची भाषणे, शंकर पुत्राची भाषणे इत्यादी वीररसप्रधान रचना त्यामध्ये समाविष्ट आहेत. प्रसंगचित्रणे प्रभावीपणे रेखाटण्याचे काम कवी चोंभा यांनी केले आहे. उदा. अनिरुध्दाचा संग्राम, उषेची भीतियुक्त तारांबळ इत्यादी. शृंगाररस व कल्पनाविलासी वर्णने याचा प्रत्ययदेखील प्रस्तुत लेखनात येतो. एकूणच चोंभा यांचा 'उखाहरण' हा एकमेव असणारा ग्रंथ त्यांच्या प्रतिभाशाली बुध्दिमत्तेची चुणूक दाखविणारा असा आहे. वैविध्यपूर्ण शैलीप्रयोगांनी युक्त असा हा ग्रंथ चोंभा यांच्या लेखणीचे सामर्थ्य प्रकट करणारा आहे.

## ४.४ शांतलिंग व मन्मथ शिवलिंग (लिंगायत संप्रदाय)

### ४.४.१ लिंगायत संप्रदाय

लिंगायत संप्रदाय हा शिवाच्या उपासनेचा मूलाधार असणारा शैव संप्रदाय आहे. या संप्रदायास 'वीरशैव संप्रदाय' या नावाने देखील ओळखले जाते. या संप्रदायाची स्थापना प्राचीन काळातील मानण्यात येते. महात्मा बसवण्णा यांना या संप्रदायात विशेष स्थान देण्यात आले आहे. बाराव्या शतकाच्या दरम्यान या पंथाचे महत्त्वपूर्ण संघटक बसवेश्वर यांनी या संप्रदायास संघटित स्वरूप देण्यात मोलाचे योगदान दिले. बसवेश्वरांच्या नंतर अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, चेन्नबसव, सिध्दरामेश्वर, नीलांबिका यांनी या पंथाच्या प्रचार-प्रसारामध्ये बहुमोल योगदान दिले. या संप्रदायाचा प्रचार प्रामुख्याने शाखामठ व गुरुस्थलमठ या रूपाने कर्नाटक परिसरात मोठया प्रमाणावर आढळून येतो. या संप्रदायामध्ये 'पंचाचार' यास विशेष महत्त्व देण्यात येते. 'पंचाचार' म्हणजेच लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार, भृत्याचार हे पाच आचार होत. तसेच हा कायकनिष्ठ धर्म आहे अर्थात अविरत कष्ट करणे हीच ईश्वराची पूजा आहे असे मानणारा हा धर्म आहे.

लिंगायत संप्रदायामध्ये शिवयोग शिवाचार्य यांनी संस्कृत भाषेमध्ये लिहिलेला 'सिध्दान्तशिखमणि' हा ग्रंथ प्रस्तुत संप्रदायाचा आद्य तात्त्विक ग्रंथ मानला जातो. मध्ययुगीन कालखंडात म्हणजेच १६व्या शतकाच्या सुमारास शांतलिंग स्वामी, मन्मथ शिवलिंग, बसवलिंग, बसवदास, लक्ष्मण महाराज, शंकरमृगद्र, विरूपाक्ष शेटे, शिवदास, शिवगुरूदास, पंचाक्षरी स्वामी इत्यादी संतांनी लिंगायत संतसाहित्याची निर्मिती करण्याचे कार्य केले. महात्मा बसवण्णा यांच्याप्रती प्रेम व भक्ती यांचे अंभगरूपी रचनांमधून वर्णन करण्यावर या साहित्यामध्ये विशेष भर देण्यात आला आहे. प्रस्तुत स्थळी आपण लिंगायत संतसाहित्यनिर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या शांतलिंग स्वामी व मन्मथशिवलिंग या दोहोंच्या साहित्य निर्मितीचा परिचय करून घेऊया.

### ४.४.२ शांतलिग स्वामी

संत शांतेश्वर उर्फ शांतलिंग स्वामी हे लिंगायत संप्रदायातील पहिले कवी मानण्यात येतात. त्यांनी

प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रामध्ये वीरशैव पंथाची प्रचारधुरा सांभाळली. ते शिखर शिंगणापूर या शंकराच्या प्रसिध्द तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी वास्तव्यास होते. त्यांच्या जन्मस्थळाविषयी तसेच जन्म व मृत्यू तारीख याचे उल्लेख आढळत नाहीत. मात्र त्यांच्या कार्यकालाची निश्चिती करण्यासाठी काही महत्त्वाचे संदर्भ आढळतात. त्यापैकी प्रथम हा की शिखर शिंगणापूर येथील भगवान शंकर हे छत्रपती शिवाजी राजे भोसले यांच्या घराण्याचे कुलदैवत होते. शिवाजी राजांचे आजोबा मालोजीराजे हे शिखर शिंगणापूर येथे दर्शनासाठी येत तेव्हा शांतलिंगस्वामी हे शिंगणापूर क्षेत्री वास्तव्यास होते. तसेच ते तेथील भांडारगृहाचे प्रमुख होते. या मालोजीराजांचा कालखंड हा इ.स.१५५२ ते १६२० असा आहे. तसेच दुसरा संदर्भ असा की, संत एकनाथांचे शिष्य जनार्दनस्वामी ज्यांचा कालखंड इ.स. १५०४ ते १५७५ असा आहे ते शांतलिंगांचे समकालीन होते. शांतलिंगांनी जे तीर्थाटन केले त्यामध्ये त्यांची भेट जनार्दनस्वामींशी झाली होती. तसेच जनार्दनस्वामींनी शिंगणापूर येथे येऊन काही काळ वास्तव्य केले होते. तसेच शांतलिंगाबरोबर अनेक आध्यात्मिक चर्चांद्वारे ज्ञानाची देवाण-घेवाण केली होती. या दोन्ही बाबींवरून सोळाव्या शतकातील त्यांचा कार्यकाळ निश्चित होण्यास मदत होते.

शांतलिंगस्वामींचे शिखर शिंगणापूर येथे येणे व त्यांचे बालपण याविषयी नरहर सदाशिव खरशीकरांनी इ.स. १९४६ मध्ये प्रकाशित केलेल्या 'कर्णहंस' या संपादित ग्रंथात दिलेली चरित्रात्मक माहिती डॉ. शिवशंकर उपासे यांनी 'महाराष्ट्रातील पहिले लिंगायत संतकवी शांतलिंगकृत कर्णहंस' (२०२०) या ग्रंथामध्ये समाविष्ट केली आहे. त्यानुसार शिंगणापूरचा एक लिंगायत मनुष्य श्रीमंत होता. मूलबाळ नसल्याने त्याने अनेक तीर्थे, व्रते, नवससायास व शंभू महादेवाची भक्ती असे उपाय केले. त्यामुळे शंभू महादेवाने त्याला दृष्टांत दिला. 'तुला यात्रेत मुलगा मिळेल.' असा वर दिला. त्याप्रमाणे काशी यात्रा करीत असताना त्याला चार सहा दिवसांपूर्वी जन्मलेले एक मूल गंगा नदीच्या किनाऱ्यावर दिसले. ते मूल सतेज होते. त्या सुंदर मुलास त्या यात्रेकरू श्रीमंत माणसाने उचलून घेतले व पत्नीकडे दिले. तिने त्याला स्तनपान दिले. दोघांनी त्या मुलास शिंगणापूरला आणले. त्याचे पालनपोषण केले. हे बालक फार रडत नसे आणि हट्टही करीत नसे. दूध प्याल्यावर ते स्वस्थ पडून राही. त्याच्या वर्तनातील ही शांत स्थिती पाहून त्या मातापित्याने त्याचे नाव शांता ठेवले. हे मातापिता जंगम होते म्हणून शांतप्पा लिंगायत होते. (उपासे, शिवशंकर, महाराष्ट्रातील पहिले लिंगायत संतकवी शांतलिंगकृत कर्णहंस, शरण संस्कृती अध्ययन केंद्र श्री. सिध्द संस्थान मठ, निडसोशी, जि. बेळगाव, २०२०, पृ.२०-२१) या तपशीलावरुन शांतलिंगस्वामींचे शिंगणापुरात येण्याचे कथानक व बालपणीचा काळ दिसून येतो. बालपणीच्या काळात शिंगणापूरच्या शिवालयाच्या परिसरात एकांतात शांतलिंगांनी ध्यानधारणा केली. त्या दरम्यान त्यांना निळकंठ आदिनाथ यांच्यापासून अनुग्रह मिळाला व गुरूप्राप्ती होऊन ते लिंगायत पंथातील पन्नासावे पाईक बनले.

दास पंचायनातील जयरामस्वामी वडगावकर यांचे गुरू कृष्णाप्पा हे शांतलिंगस्वामींचे शिष्य होते. त्यांनी शिंगणापुरामध्ये वास्तव्यास आल्यावर शांतलिंगांचा गुरू म्हणून स्वीकार केला होता. या कृष्णाप्पांना शांतलिंगांनी मुलाप्रमाणे सांभाळले. तसेच त्यांच्याबरोबर काशी, अयोध्या, मथुरा, गोकुळ अशा उत्तर भारतातील तीर्थक्षेत्रांची दीर्घ यात्रा केली होती. कृष्णाप्पांबरोबरच्या प्रदीर्घ वास्तव्यानंतर शांतलिंगांनी कृष्णाप्पा व इतर काही भक्तगणांच्या उपस्थितीत समाधी घेतली.

शांतलिंगांच्या एकूण आयुष्यामध्ये त्यांच्या नावावर काही आध्यात्मिक विषयांचा अंतर्भाव असणाऱ्या महत्त्वपूर्ण साहित्यकृतींची नोंद आढळते. हे सर्व साहित्य लिंगायत पंथातील आद्य साहित्यापैकी महत्वपूर्ण साहित्य मानण्यात येते. त्यामध्ये प्रामुख्याने शांतलिंगांच्या विवेकचिंतामणी, कर्णहंस आणि शांतबोध इत्यादी ग्रंथांचा समावेश आहे. यापैकी कर्णहंस हा ग्रंथ कर्नाटकातील चन्नबसवेश्वरांनी रचलेल्या 'करणहसुगे' या कन्नड भाषेतील ग्रंथाच्या आधारावर निर्माण केलेला ग्रंथ आहे. या कर्णहंस ग्रंथामध्ये एकूण ३७७ ओव्यांचा समावेश असून याचे निरूपण चन्नबसवेश्वरांच्या ३७ संस्कृत श्लोकांवर आधारित आहे. या ग्रंथाचा प्रमुख विषय पंचीकरण आहे. पंचीकरण अर्थात मानवी शरीरातील पंचज्ञानइंद्रीये व पंचकर्मेंद्रिये यांच्याद्वारे होणारे आत्मज्ञान होय. तसेच या ग्रंथाची रचना गुरूस्तवन, ओंकार विवेचन, पंचतत्वविचार, पंचतत्त्वाचें गुणधर्म, शिवतनु, शिवतनुचे अंशगुण, पंचतत्त्वाचे गुण, पंचीकृत विस्तार इत्यादी आध्यात्मिक मांडणीच्या क्रमाने केलेली आहे. काव्याच्या आरंभी गुरूवंदन करण्याची प्रथा शांतलिंगांनी पाळलेली आहे. तसेच निळकंठ या गुरूंचा जयजयकार त्यांनी केलेला आहे. ते लिहितात की,

''श्री गणाधिपतये नमः। श्री गुरू सच्चिदानंदात्मने नमः ।

जयजयाजी नीळकंठा । आचार्या अत्युत्कृष्टा ।

दयाबुध्दिनिधी, स्वधर्मिष्ठा, सद्गुरूराया ।।१।।''

अशा प्रकारे हे गणपती व गुरू नीळकंठ यांना वंदन करण्याचे काम शांतलिंगांनी केले आहे.

पंचीकरण तत्त्वज्ञान विशद करताना त्यांनी अतिशय विस्तारीतपणे त्याची मांडणी केली आहे. प्रत्येक घटकनिहाय विषयाची मुद्येसूद कथन करताना अल्पक्षरांमध्ये मोठया प्रमाणावर अर्थ सामावून घेण्याचे काम त्यांनी केले आहे. उदा.

''श्रोत्र-त्वचा-चक्षु-जिव्हा घ्राण । हे ज्ञानइंद्रिय कारण ।

यांसी कीजे विवरण । आदिदेवता भूतसहित ।।८३।।''

असे कोणत्या ज्ञानइंद्रियांच्या अनुषंगाने आपण विवरण करणार आहोत त्याचे स्वरूप कथन करण्याचे काम शांतलिंगांनी केले आहे. एकूणच कर्णहंस हा ग्रंथ 'अध्यात्म निरोपण अनुवाद' असल्याचे त्यांनी ग्रंथांच्या शेवटी स्वतः नमूद केले आहे. त्यांच्या या ग्रंथातील मांडणीविषयी अभ्यासक डॉ. शिवशंकर उपासे म्हणतात की, 'कर्णहंस हा भाष्यरूप काव्यग्रंथ कन्नड व मराठी भाषांमधील उत्तम विचार संगम आहे. इथे कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या भाषा आणि संस्कृतीचा मनोहर समन्वय झाल्याचे स्पष्ट दिसते. ओव्यांची रचना आखीव, रेखीव आणि गोळीबंद झाली आहे.' (उपासे, शिवशंकर, महाराष्ट्रातील पहिले लिंगायत संतकवी शांतलिंगकृत कर्णहंस, शरण संस्कृती अध्ययन केंद्र श्री. सिध्द संस्थान मठ, निडसोशी, जि. बेळगाव, २०२०, पृ.६९) अशा प्रकारे शांतलिंगांची रचना अतिशय समर्पक, ओघवत्या आणि रमणीय भाषेतील अशी सुसूत्र मांडणी आहे. तसेच मध्ययुगीन मराठी साहित्यातील भाषेचा आणि अध्यात्मज्ञानाचा उत्कृष्ट नमुना आहे.

### ४.४.३ मन्मथ शिवलिंग स्वामी (१५६१-१६३१)

मन्मथ शिवलिंग स्वामी यांचा जन्म नेकनूर, जि. बीड येथे झाला. लिंगायत संत परंपरेतील नागनाथ मरळसिध्द हे त्यांचे गुरू होते. मन्मथ स्वामी यांच्या वडिलांचे नाव शिवलिंग स्वामी आणि आईचे नाव पार्वतीबाई होते. आई वडिलांकडूनच त्यांना शिवभक्तीचा वारसा लाभला. तसेच माणूर मठाधिपती बसवराज यांच्या प्रभावातून ते आध्यात्माकडे आकर्षित झाले. मन्मथ स्वामी यांना बालपणापासून मराठी शाहिरी काव्याची आवड होती. या आवडीमुळेच बालपणी 'दंडुडफाचा धुंधकार । जिंकिले शाहीर नेणी किती ।।' असा त्यांच्या काव्यप्रेमाप्रती बसवलिंग या कवींनी उद्‌गार काढलेले आहेत. संत परंपरेमधील त्यांच्या महनीय कार्यामुळे त्यांना पंढरपुरातील संतांनी 'संत शिरोमणी' ही उपाधी देऊ केली होती. मराठी भाषेबरोबरच संस्कृत आणि कन्नड भाषांचे त्यांना ज्ञान होते.

मन्मथ स्वामी यांच्या काव्यलेखनामध्ये उल्लेखनीय अशा 'स्वयंप्रकाश', 'ज्ञानबोध', 'गुरुगीता', 'शिवगीता', 'श्रीपरमरहस्य' आदी रचना आहेत. तर 'अनुभवानंद' हे २४६ ओव्यांचे अपूर्ण काव्य देखील त्यांच्या नावावर आढळते.

'श्रीपरमरहस्य' यासारख्या ग्रंथामधून मन्मथ स्वामींनी लिंगायत धर्मातील शिवाचार, शिवसंस्कृती व शिवधर्माबद्दल विस्ताराने भाष्य केले आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथ लिंगायत धर्माच्या अनुषंगाने अतिशय महत्त्वाचा मानण्यात येतो. 'परमरहस्य ग्रंथ ग्रंथराज थोर ।' असे या ग्रंथाविषयी म्हणण्यात येते. लिंगायत धर्मानुयायी या ग्रंथाचे सातत्याने पारायण करून या ग्रंथास आपल्या अध्ययनात ठेवण्याचे काम करतात.

मन्मथ स्वामींनी आपल्या लेखनातून धार्मिक कर्मकांडांना विरोध करण्याचे काम केले. यज्ञयागाचा प्रचंड तिरस्कार नोंदविला. हा तिटकारा नोंदविताना ते आपल्या काव्यामध्ये म्हणतात,

''यज्ञाच्या वाटा टाकिल्या मोडोनी । तीर्थालागी जाणे खुंटविले ।।
मन्मथ शिवलिंग म्हणे एक वेळा । भक्ताचा सोहळा घरोघरी ।।''

या प्रकारे भक्तांच्या सोहळ्यास विशेष महत्त्व देताना यज्ञाच्या प्रथांना व तीर्थाटनांना जाणे मन्मथस्वामी नाकारतात. तसेच व्रत, उपासना, योग यांच्या अनुषंगाने भाष्य करताना म्हणतात की,

''तीर्थ व्रतदान अष्टांगादि योग । आचरता भोग न चुकेची ।।
नाना देवतांचे केलिया पूजन । अनन्यता तेणे नष्ट होय।।''

अशा प्रकारे धार्मिक अवडंबरास नकार नोंदवून मन्मथ स्वामी बहुविध देवांच्या उपासनांना देखील विरोध करतात. लिंगायत धर्माचे महत्त्व नोंदवून इष्टलिंगाच्या उपासनेमध्ये केवळ रमण्याचे सूचन करतात. इष्टलिंगाखेरीज अन्य देव-देवतांच्या पुजेस लागणे हे महापाप असल्याचे ते सांगतात. ते लिहितात की,

''इष्टलिंग हृदयावरी । अन्य देवा नमस्कारी ।।
महापाप तया जोडे । तेणे अध:पात घडे ।।

करीता दुजेठायी रती । तेणे घडे अधोगती ।।

अंग लिंगासी अर्पिले । तेव्हा तयाचेची झाले ।।

मन्मथ म्हणे नेणती वर्म । न पाहती धर्माधर्म ।।''

लिंगायत धर्माच्या तत्त्वांना आपल्या काव्याचा विषय करून मन्मथ स्वामी धर्मानुषंगाने लोकांना बोध करण्याचे काम करतात. एकमेव इष्टलिंगाप्रती समर्पित भावनेने वर्तण्याचा सल्ला देतात. अन्य देवांना महत्त्व देणे हे महापाप असल्याचे सांगून अन्य देवांच्या नादी लागणेच आपल्या अधोगतीचे कारण असल्याचे ते नमूद करतात. अशा प्रकारे धर्माचा प्रचार-प्रसाराचे आणि एकनिष्ठ धर्मसेवक बनविण्याचा हेतू यामधूनच मन्मथ स्वामींचे काव्य जन्मास आल्याचे दिसून येते.

अष्टावरण, पंचाचार व षट्स्थल या लिंगायत तत्त्वज्ञानाच्या निरूपणावर मन्मथ स्वामींनी अधिक भर देण्याचे काम केले आहे. तसेच 'जंगम' (जंगम म्हणजेच लिंगायत) या शब्दाचे अर्थ व व्याख्या स्पष्ट करण्याचे काम मन्मथ स्वामींनी आपल्या काव्यामधून केले आहे. जो ज्ञानी व जो धर्मप्रसारक आहे तो जंगम आहे. जंगम आणि लिंग यामध्ये कोणताही भेद नाही. असे सांगून त्यांनी 'जंगमाचे पूर्वज न विचारीजे । तो गुरूरूपचि मानिजे ।।' अशा शब्दात धर्म प्रचाराचे काम करणाऱ्या जंगमाचे महत्त्व विशद केले आहे.

मन्मथ स्वामींच्या साहित्यामध्ये बसवलिंगांच्या तत्त्वांना विशेष स्थान देण्यात आले आहे. त्यांच्या तत्त्वांना अग्रभागी ठेऊनच त्यांनी रचना केल्याचे दिसून येते. त्यांच्या शरणतत्त्वाचे स्वरूप मांडून बसवलिंगाचे स्मरण करण्याचे काम ते आपल्या लेखनातून करताना दिसतात. लिंगायत धर्माच्या प्रचार-प्रसाराचे सूत्र अंगिकारून आपल्या रचनांना मन्मथस्वामींनी निर्माण केल्याचे दिसून येते. लिंगायत धर्माच्या परंपरेचे जतन करण्याचे आणि तत्त्वज्ञानास समाजासमोर ठेवण्याचे बहुमोल कार्य मन्मथ स्वामींच्या एकूणच लेखनातून घडल्याचे स्पष्ट होते.

## ४.५ गुणकीर्ती व जिनदासनामा (जैन मराठी कवी)

### ४.५.१ जैन संप्रदाय

जैन धर्म हा जगातील प्राचीन धर्मांपैकी एक प्रमुख धर्म आहे. 'जगा आणि जगू द्या' या मानवतावादी तत्त्वावर जैन संप्रदायाचे तत्त्वज्ञान उभारलेले आहे. जैन संप्रदायातील तेविसावे तीर्थकर पार्श्वनाथ हे होते तर चोविसावे तीर्थकर भगवान महावीर हे होते. या धर्माचे प्रथम तीर्थकर वृषभदेव यांनी या धर्माचे पुनरूज्जीवन करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. तर या संप्रदायाचे चोविसावे तीर्थकर महावीर यांनी या संप्रदायाचे तत्त्वज्ञान, विचार आणि आचार यांना सोप्या पध्दतीने लोकांसमोर आणण्याचे काम केले. जैन संप्रदायातील समता, स्वातंत्र, न्याय, सम्यक दृष्टी या विचारांना प्रभावीपणे आविष्कृत करण्याचे श्रेय महावीरांना देण्यात येते.

'अहिंसा परमो धर्मा:' हे प्रमुख तत्त्व जैन संप्रदायामध्ये अतिशय महत्त्वाचे मानले जाते. जीव अविनाशी असून अजीवाचे धर्म, अधर्म, आकाश, पुदगल, काल असे पाच प्रकार मानण्यात येतात. जीव चैतन्यमय तर अजीव अचैतन्यमय आहेत. ज्ञानाचे परोक्ष व अपरोक्ष असे प्रकार गणण्यात येतात. तर पाप व पुण्य या

संकल्पनाचा स्वीकार करण्यात आला आहे. त्याचबरोबर पंचमहाव्रते, तीन गुणव्रते, चार शिक्षाव्रते व पंथ यांना जैन तत्त्वज्ञानामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. पंचमहाव्रतांमध्ये सत्य, अहिंसा, अस्तेयं, अपरिग्रह, ब्रम्हचर्य ही होय. तीन गुणव्रतांमध्ये दिग्व्रत, कालाव्रत, अनर्थदंडव्रत ही होय. चार शिक्षाव्रतांमध्ये सामायिक, प्रोषधोपवास, भोगोपभोग परिणाम, अतिथी संविभाग ही होत. तर जैन संप्रदायामध्ये दिगंबर व श्वेतांबर हे प्रमुख दोन पंथ अस्तित्त्वात आहेत. श्वेतांबर या पंथामध्ये स्थानकवासी हा उपपंथ देखील आढळून येतो.

पूर्वीच्या काळी जैन संप्रदायामध्ये धार्मिक वाङ्मयाची निर्मिती झाल्याची दिसून येते. हे साहित्य प्रामुख्याने प्राकृत भाषेमध्ये होते. महावीरांनी अर्धमागधी या प्राकृत जनभाषेमध्ये कार्य केले. श्वेतांबर पंथातील ४५ आगमग्रंथ हे अर्धमागधी भाषेत आढळतात. तर दिगंबर पंथाचे आगमग्रंथ जैन शौरसेनी प्राकृत भाषेमध्ये आहेत. मात्र आचार्य उमास्वाती यांचा 'तत्त्वार्थधिगमसूत्र' व जिनसेन आणि गुणभद्र या दिगंबर आचार्यांचा 'महापुराण' हे संस्कृतमध्ये आढळतात. अशा प्रकारे प्राचीन व मध्ययुगीन कालखंडामध्ये जैनांचे धार्मिक वाङ्मय संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश तसेच तामिळ आणि कन्नड भाषांमध्ये निर्माण झाले आहे.

जैन संप्रदायामध्ये गुणकिर्ती व जिनदासनामा यासारखे मराठी भाषेमध्ये लेखन केलेले प्रसिध्द कवी होऊन गेले. प्रस्तुत ठिकाणी आपण त्यांच्या साहित्यिक योगदानाचा अभ्यास करणार आहोत.

### ४.५.२ गुणकीर्ती

गुणकीर्ती हे जैन संप्रदायातील महान कवी होते. त्यांचा कार्यकाल १५ व्या शतकातील आहे. गुणकीर्ती जयस्वाल असे त्यांचे नाव असल्याचा उल्लेख त्यांच्या 'रूक्मिणीहरण' या ग्रंथाच्या सुरुवातीस 'जैयस्वाल कलपति । मुनि उपजले गुणकीर्ती ।। केली हे ओवी माये ।।' अशा प्रकारे आढळतो. मराठी जैन साहित्यामध्ये त्यांनी दिलेल्या विपुल योगदानामध्ये त्यांच्या 'धर्मामृत', 'पद्मपुराण' (रामायण), 'रूक्मिणीहरण', 'रामचंद्र फाग' (गुजराती भाषेतील रचना), 'गवळणी रास', 'नेमिनाथ विवाह', 'नेमिनाथ पाळणा', 'नेमिनाथ दीक्षा', 'धंदागीत', 'रत्नकरंड श्रावकाचार' (ही मूळ संस्कृत भाषेतील ग्रंथावरील टीका) इत्यादी रचनांचा समावेश आहे.

गुणकीर्ती यांचे मध्ययुगीन कालखंडातील हे साहित्यिक योगदान प्रामुख्याने जैन धार्मिक तत्त्वज्ञान व आचरण धर्मास विषद करणारे आहे. 'धर्मामृत' हा त्यांचा प्रथम ग्रंथ होय. या ग्रंथामधून त्यांनी धर्माचे स्वरूप, परमेश्वर कोण व कसा आहे, गुरुस्वरूप इत्यादी प्रश्नांच्या उत्तरांची मीमांसा विस्ताराने कथन केली आहे. जैन तत्त्वज्ञानाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या या ग्रंथाचे स्वरूप गुरुशिष्य संवादरूपाचे आहे. जैन धर्मातील आचरणाचे स्वरूप विवेचन त्रेपन्न क्रिया, बारा व्रते, अकरा प्रतिमा, चार तपे, सहा कर्मे इत्यादी अंगाने मांडण्याचे काम केले आहे.

'पद्मपुराण' हा गुणकीर्ती यांचा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ होय. 'रामायण' असेही या ग्रंथाचे शीर्षक आहे. ही दीर्घरचना असून याची अध्याय संख्या ४३ आहे तर ओवीसंख्या १६ हजार आहे. मात्र या ४३ अध्यायांपैकी २६ अध्यायांची रचना गुणकीर्ती यांनी केली आहे, तर उर्वरित अध्यायांची रचना रत्नकीर्ती व ब्रम्हपुण्यसागर यांनी केली आहे. राम-लक्ष्मण, सीता वनविहार या बाबींना गुणकीर्तींनी या ग्रंथात अतिशय विलोभनीय पध्दतीने कथन केले आहे. वनांची वर्णने, व्यक्तीवर्णने व स्थलवर्णने याची अतिशय रोचकतेने वर्णन करण्याचे काम गुणकीर्तींनी

या महाकाव्यामध्ये केले आहे.

'अनुप्रेक्षा' हा ग्रंथ गुणकीर्तींची रचना असून वैराग्य प्राप्तीसाठी ज्या बारा भावनांचे चिंतन साधकाने करावे अशा चिंतनांना 'अनुप्रेक्षा' संबोधण्यात येते व या अनुप्रेक्षांवर भाष्य करण्यासाठी या ग्रंथाची रचना केली आहे. प्राकृतमधील 'बारा अनुप्रेक्षा' या कुंदकुंद आचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथाच्या आधारावर गुणकीर्तींनी प्रस्तुत ग्रंथाची रचना केली आहे. ३४५ ओवीच्या या ग्रंथाचे अनित्य, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुची, अस्त्रव संवर, निर्जरा, लोक, बोधिदुर्लभ व धर्म अशा अनुप्रेक्षेस अनुसरून ही मांडणी केली आहे. रुक्मिणीहरण हा रुक्मिणी विवाहाच्या विषयावर आधारित गुणकीर्ती यांचा आणखी एक ग्रंथ होय. रुक्मिणीहरणाचा नाट्यमय विषय रंजकतेने रचण्याचे काम गुणकीर्तींनी या ग्रंथात केले आहे. 'रामचंद्र फाग' यासारखे लघुकाव्य गुणकीर्तींच्या नावावर आढळते. हे काव्य गुजराती भाषेमध्ये आहे. 'फाग' म्हणजे मधुऋतुत्सव होय. वसंत ऋतूमध्ये गुजरात भागात असे 'फाग' अर्थात 'उत्सव' साजरे होतात. या रचनेमधून गुणकीर्तींनी गुजराती व कानडी स्त्रियांची वर्णने देखील केली आहेत, हे या ग्रंथाचे विशेष होय. ही रचना एकूण ९१ कडव्यांची आहे.

'धंदागीत' यासारख्या केवळ सहा कडव्यांच्या रचना देखील गुणकीर्तींच्या नावावर आढळतात. त्यामध्ये ते म्हणतात की,

''धंदा कीजे परत्राचा । जिणे टाकी पैलु पारु ।।

गुणकीर्ती मुनिवरू । म्हणे वो तुम्ही तारा संसारू ।।

सुखाचे सोइरे अवघी वो जव्हा पुरवी आस ।।

एह वचन साच संसार धंदा ।।५।।''

अशा प्रकारच्या कवनांचा समावेश 'धंदागीत' सारख्या कवनांमध्ये करण्यात आला आहे. तर 'रत्नकरंडक श्रावकाचार' यासारखा ग्रंथ जैन धर्मीयांमध्ये अत्यंत लोकप्रियता प्राप्त केलेला ग्रंथ आहे.

एकूणच गुणकीर्ती या जैन संप्रदायातील कवीने १५ व्या शतकात महनीय ग्रंथ रचना करण्याचे काम केले. धार्मिक तत्त्वज्ञान व आचरण पध्दतीस कथन करणारे, उत्सवांमधील 'रामचंद्र फाग' सारख्या गुजराती भाषेतील रचना, पाळणा, कथा, गौळणी अशा विपुल रचनांमधून मराठी साहित्यामध्ये जैन संप्रदायिक रचनांचे भरीव योगदान दिले आहे.

## ४.६ नृसिंह सरस्वती व दासोपंत (दत्त संप्रदाय)

### ४.६.१ दत्त संप्रदाय

दत्तात्रेयास आराध्य दैवत मानून त्याची उपासना करणारा संप्रदाय म्हणून दत्त संप्रदाय ओळखला जातो. नृसिंह सरस्वती यांनी या संप्रदायास खऱ्या अर्थाने पंथाचे स्वरूप बहाल केले. श्रीपाद श्रीवल्लभ यांना दत्ताचे पहिले अवतार व नृसिंह सरस्वतींना दत्ताचे दुसरे अवतार मानण्यात येते. जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, माणिक प्रभू, अक्कलकोटकर स्वामी, वासुदेवानंद सरस्वती इत्यादी महापुरुषांची परंपरा ही दत्त

संप्रदायाची प्रमुख परंपरा आहे. ही साधारणत: पंधराव्या शतकापासून आढळून येते. या संप्रदायाचे पाईक आजही महाराष्ट्रात व कर्नाटक सीमापरिसरात मोठ्या प्रमाणावर आहेत. नृसिंह सरस्वतींचे दीर्घकाळ वास्तव्य कर्नाटक सीमेवरील गाणगापूर या ठिकाणी होते. त्यामुळे कर्नाटक परिसरात या संप्रदायाचा प्रभाव अधिक दिसून येतो. तसेच महाराष्ट्रामध्ये औदुंबर, नरसोबाची वाडी, माहूर, कारंजे, गिरनार, कुरूगडी इत्यादी ठिकाणे ही संप्रदायाची महत्त्वाची तीर्थक्षेत्रे म्हणून प्रसिध्द आहेत.

या संप्रदायाची विपुल ग्रंथसंपदा अस्तित्वात आहे. 'दत्त महात्म्य' व 'दत्तप्रबोध' यासारख्या ग्रंथामध्ये प्रस्तुत संप्रदायाचे तत्त्वज्ञान विषद करण्यात आले आहे. तर 'गुरुचरित्र' या ग्रंथामध्ये संप्रदायाच्या आचारधर्मावर विस्ताराने भाष्य करण्यात आलेले आहे. तसेच 'अवधूतगीता', 'गुरुगीता' आणि 'जीवन्मुक्तगीता' हे ग्रंथ संप्रदायातील महत्त्वाचे ग्रंथ मानण्यात येतात. दत्त संप्रदायाचे आद्य पुरुष नृसिंह सरस्वती यांनी व संप्रदायातील महत्त्वाचे अनुयायी दासोपंत यांनी जे लेखन कार्य केलेले आहे त्याचा परामर्श आपण या ठिकाणी घेऊया.

### ४.६.२ नृसिंह सरस्वती (इ.स.१३७८ – इ.स. १४५८)

नृसिंह सरस्वती या दत्त संप्रदायाच्या प्रमुख प्रवर्तकांचा जन्म अकोला जिल्ह्यातील कारंजा (लाड) या ठिकाणी इ.स. १३७८ मध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव आंबामाता तर वडिलांचे नाव माधव होते. त्यांच्या जन्माविषयी अशी आख्यायिका नमूद करण्यात आली आहे की, नृसिंह सरस्वतींचा जन्म झाल्यानंतर तात्काळ बालरूपातील नृसिहांनी 'ओंकार' शब्दाचा उच्चार करण्यास सुरूवात केली होती. त्याविषयी लिहिले आहे की,

''जन्म होताचि ते बालक । ओंकार शब्द म्हणतसे अलौकिक ।
पाहून झाले तटस्थ लोक । अभिनव म्हनोनि तये वेळी ।।''

अशा प्रकारची आख्यायिका नोंदविण्यात आलेली आढळते. तसेच त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षांपर्यंत त्यांना 'ओंकार' या शब्दाखेरीज इतर कोणताही शब्द उच्चारता येत नव्हता, असेही सांगण्यात येते. चमत्काराच्या अनेक आख्यायिका नृसिंह सरस्वती यांच्या बाबत ग्रंथामधून नोंदविल्याच्या आढळून येतात.

नृसिंह सरस्वतीं यांनी गुरू कृष्णसरस्वती यांच्याकडून दीक्षा घेतली. वयाच्या दहाव्या वर्षापासून त्यांनी (इ.स.१३८८) संन्यास स्वीकारला व तेव्हापासून तीर्थाटनास प्रारंभ केला. या तीर्थाटनामध्ये प्रामुख्याने औदुंबर (इ.स.१४२१), नरसोबावाडी (इ.स.१४२२ ते १४३४), गाणगापूर (इ.स.१४३५ ते १४५८) या ठिकाणी वास्तव्य केले. इ.स. १४५८ मध्ये त्यांचे देहावसान झाले. दत्त संप्रदायामध्ये नृसिंह सरस्वतींना दत्ताचा दुसरा अवतार मानण्यात येते. ''नाना अवतार होऊनिया गेले । दत्तत्व संचले जैसे तैसे।'' अशी त्यांच्या या अवताराची थोरवी सांगण्यात येते. त्यांचा हा अवतार भोगमोक्षसुखप्रद असल्याचे सांगण्यात येते. नृसिंह सरस्वतींनी दत्त संप्रदायामध्ये खऱ्या अर्थाने प्रवाहित्व निर्माण करण्याचे व संप्रदायास उर्जितावस्थेस नेण्याचे कार्य केले.

नृसिंह सरस्वती यांनी मराठीमध्ये अनेक रचनांची निर्मिती केलेली आहे. 'गुरुचरित्र' हा त्यांनी रचिलेला ग्रंथ दत्त संप्रदायातील अपूर्व आणि वेदतुल्य ग्रंथ मानण्यात येतो. या ग्रंथामध्ये नृसिंह सरस्वती यांचे तीर्थाटन व त्यांच्या चरित्रासह लीलांचे वर्णन करण्यात आलेले आहे. 'गुरुचरित्र' हा ग्रंथ दत्त संप्रदायातील आचारधर्माचे विवरण

करणारा आहे. तसेच सगुणोपासना आणि गुरूभक्तीप्राधान्य या बाबी या ग्रंथामध्ये प्रामुख्याने येतात. शुध्द आचरण, सर्वांभूती परमेश्वर, योग, नामस्मरण, ध्यान, सर्वांविषयी प्रेम, आत्मोन्नत्ती आणि मुक्तीची वाट या बाबींचा समावेश प्रस्तुत ग्रंथात आढळतो.

नृसिंह सरस्वती यांची प्रार्थना या संप्रदायामध्ये प्रसिध्द होती. ती प्रार्थना पुढीलप्रमाणे होती.

''अनसूयात्मज हे जगपालका । तुजविणा कुणि ना जगि बालका ।
तरि कथी स्मरूं मी कवनाप्रति । शरण मी नरसिंहसरस्वती ।।१।।
मग मला गमला पथ हा बरा । तव पदींच असो नित्य आसरा ।
पुरती हेतू कधीं मम हे कथीं । करि दया नरसिंहसरस्वती ।।२।।''

अशा प्रकारची बारा पदांची प्रार्थना व अवधूतचिंतन श्री गुरूदेवदत्त असे स्मरण असल्याचे दिसून येते. दत्त संप्रदायाचे अवतारी पुरूष मानण्यात आलेले नृसिंह सरस्वती यांनी त्यागवृत्तीने संप्रदायाचे कार्य साधकरूपाने जन्मभर केले. संप्रदायाच्या प्रसार-प्रचारासाठी व तत्त्वनिरूपणासाठी ग्रंथनिर्मिती केली व दत्त संप्रदायाची तात्त्विक पार्श्वभूमी तयार करण्याचे महान कार्य केले.

### ४.६.३ दासोपंत (१५५१ - १६१६)

दासो दिगंबरपंत देशपांडे उर्फ दासोपंत हे मराठी भाषेमध्ये सर्वाधिक लेखन करून मराठी संत साहित्याचा प्रवाह समृध्द करण्यामध्ये भरीव योगदान देणारे संतकवी होते. त्यांना 'सर्वज्ञ दासोपंत' असे टोपण नावाने ओळखण्यात येते. त्यांचा जन्म इ.स. १५५१ मध्ये दिगंबरपंत व पार्वतीबाई या दांपत्याच्या पोटी झाला. बालपणी दासोपंतांच्या बुध्दीचातुर्याची पातळी त्यांच्या बालपणीच्या चारही वेद मुखोद्गत करण्याच्या कौशल्यावरून दिसून येते. त्यांचा विवाह गदवाल येथील सावकारांची कन्या जानकी हिच्याशी झाला होता. दत्त संप्रदायामध्ये त्यांचे स्थान अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. त्यांच्या एकूण रचनांची संख्या पाच लाख ओव्यांपर्यंत असल्याचे सांगितले जाते. संत परंपरेतील 'नाथपंचक' म्हणजेच संत एकनाथ, जनी जनार्दन, रामा जनार्दन, विठा रेणुकानंदन यांच्यासोबत संत दासोपंत यांचा समावेश करण्यात येतो.

दासोपंतांनी विपुल अशी वैविध्यपूर्ण साहित्याची निर्मिती केली. त्यांची 'दासोपंतांची पंचीकरण पासोडी' प्रसिध्द आहे. दासोपंतांच्या साहित्यातील पासोडीचे वेगळेपण म्हणजे चाळीस फूट लांब आणि चार फूट रूंद अशा कापडावर पंचीकरण आणि आध्यात्मज्ञानाचा आविष्कार चित्रकृतींमधून साकारण्याचे काम त्यांनी केले आहे. पांघरण्यासाठी वापरण्यात येणारे जाडे भरडे कापड म्हणजे 'पासोडी' होय. या कापडावर खळीचे लेप देऊन सुकविण्याची प्रक्रिया केली जाते. ग्रॅफाईटची पावडर व कवड्यांच्या साहाय्याने हे कापड घासून गुळगुळीत करण्यात येते. ही पासोडी दासोपंतांच्या कल्पकतेची आणि वेगळेपणाची साक्ष देते. संपूर्ण संतसाहित्यामध्ये दासोपंतांच्या पासोडीमुळे त्यांच्या सर्जनशीलतेचा प्रत्यय येतो. दासोपंतांनी 'कापड' या माध्यमाचा वापर करून आपल्या विषयाला रेखाटण्याचे काम केले आहे. त्यामध्ये अश्वत्थवृक्ष, सर्प, भावचक्र, पंचकोशचक्र, स्थूलादिदेहचक्र, श्री दत्तमूर्ती, माला, त्रिशूल, शंख, डमरू, कमंडलू, चक्र, हंस इत्यादी बाबींना रेखाटले आहे. चित्रमय वाङ्मयाचा

विलक्षण नमुना म्हणून दासोपंतांच्या पासोडीचे उदाहरण विलोभनीय व एकमेवाद्वितीय असे आहे. या पासोडीमध्ये १३ विभाग करण्यात आले असून १४८७ इतक्या ओव्यांचा समावेश करण्यात आला आहे.

दासोपंतांनी एकूण केलेल्या साहित्यनिर्मितीमध्ये त्यांच्या नावावर ४८ कलाकृती आढळून येतात. काही ठिकाणी हा आकडा ५० पेक्षा अधिक असल्याचे नोंदविण्यात आले आहे. त्यांच्या प्रमुख ग्रंथांची नावे येणेप्रमाणे- अद्वैतश्रुतिसार (संस्कृत), अनुगीता, अवधूतगीता, अवधूतराज, उपनिषद्भाष्य, गीतार्णव (एकूण ओवीसंख्या सव्वा लाख), गीतार्थचद्रिका, गीतार्थबोध, ग्रंथराज, ग्रंथसंग्रह, जाबालोपनिषदर्थप्रकाश, दत्तमाहात्म्य, दत्तात्रेयमाहात्म्य, दत्तात्रेयसहस्त्रनामभाष्य, पदार्णव, पासोडी पंचीकरण, पुरुषसूक्तप्रकाश, पुरुषसूक्तव्याख्या, पूजाविधीसाठी आणि नित्यपाठासाठी दशनाम, सहस्त्रनाम, स्तवराज, माहात्म्ये, उत्सवपध्दती, सेवा, अर्चन, उत्त्चरार्चन, प्रत्येक दिवसाचा उपासनाविधी, सात वारांची वेगळी भजने, आरत्या, अष्टके, प्रणवव्याख्या, प्रबोधोदय(संस्कृत), बोधप्रक्रिया (संस्कृत), लळितांची पदे, वाक्यवृत्ति, वेदान्तव्यवहारसंग्रह, सिध्दराजसमागम, स्थूलगीता, दत्तात्रेयावरील व इतर अनेक पदे, स्तोत्रे, कवने, नामावळया, पूजाविधी इत्यादी अशा विपुल रचना दासोपंतांच्या नावे आहेत. त्यांचे हे विपुल साहित्यसंपदेच्या निर्मितेचे कार्य संत परंपरेतील पर्वतासमान उंची आहे. केवळ मराठीमध्येच नव्हे तर संस्कृत भाषेमध्ये देखील त्यांनी रचना करून आपल्या गुणवत्तेची छाप उठविलेली दिसून येते.

दासोपंतांनी आपल्या रचना विस्तृत रचलेल्या आढळतात. उदा. 'गीतार्थबोधचंद्रिका' हे भगवद्गीतेवरील भाष्य ८८८९ ओव्यांचे आहे. ते त्यासंबंधी लिहितात की,

''मागा गीतार्णव रचिले, ते समुद्रचि होऊ नि गेले
न वेचेचि कवना उल्लंघिले शब्दार्णव, गीतार्थबोधचंद्रिका आरंभिली''

'गीतार्णव' या सव्वा लक्ष ओव्यांच्या रचनांनंतर हे लघुकाव्य आरंभिल्याचे दासोपंत सांगतात. मात्र ही लघुटीका देखील ८८८९ ओव्यांची आहे.

'योगसंपत्ती' व 'अवधूतराज' यासारखे ग्रंथ दासोपंतांनी गुरू-शिष्य संवादरूपामध्ये निर्माण केलेले आहेत. तर 'ग्रंथराज' हा तत्त्वज्ञान विवेचनात्मक स्वरूपाचा ग्रंथ आहे. 'सिध्दराज आगम' सारख्या ग्रंथामधून गुरूपरीक्षा, शिष्यपरीक्षा, पूजा, कर्म, दत्तावतार इत्यादी विषयांवर भाष्य केले आहे. 'पदार्णव'सारख्या सव्वा लक्ष ओवी संख्या असणाऱ्या ग्रंथाच्या आज केवळ पाच ते सहा हजार ओव्याच उपलब्ध होतात. दासोपंतांचे काही लेखन नामशेष झाल्याचे देखील यावरून स्पष्ट होते. भक्तीपूर्ण व भावनोत्कटता ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये प्रामुख्याने दिसून येतात. उदा.

''आठविता तुझे गुण, दोन्ही सजळ जाले नयन
दत्ता कई येसील भेटी, प्राणपंचक धरिले कंठी''

अशा प्रकारचे भावव्याकुळ दासोपंत आपणांस दिसून येतात. दासोपंतांचा हा भावव्याकुळपणा दत्तावरील भक्तीने ओथंबलेला पहावयास मिळतो.

एकूणच दासोपंतांनी विपुल लेखन केलेले आहे. संत परंपरेमधील इतक्या मोठ्या क्षमतेने लेखन करणारे ते

एकमेवाद्वितीय संत होय. तसेच मराठी आणि संस्कृत भाषेमधून त्यांनी आपला लेखनाविष्कार सादर केलेला आहे. वैविध्यपूर्ण पध्दतींचा अवलंब करून त्यांनी आपली दत्तसंप्रदायाची मांडणी आणि तत्त्वविवेचन करण्याचे सर्वश्रेष्ठ कार्य पार पाडलेले आहे. दीर्घ रचना आणि स्फुट रचना यांचे मोठे भांडार निर्माण करण्याचे कार्य दासोपंतांच्या लेखनीद्वारे सिध्दीस गेले आहे.

### ४.७ अज्ञानसिध्द व बहिराजातवेद (नागेश संप्रदाय)

#### ४.७.१ नागेश संप्रदाय

चैतन्य संप्रदायाच्या परंपरेतून निर्माण झालेला आणि अद्वैत तत्त्वास महत्त्व देणारा हा संप्रदाय आहे. गुरुभक्ती व हठयोग या बाबींना समकालीन संप्रदायांप्रमाणे विशेष महत्त्व नागेश संप्रदायाने देखील दिलेले दिसते. वडवळसिध्द नागेश (इ.स.१३६४ ते इ.स.१४१८) यांच्यापासून या पंथाची स्थापना मानण्यात येते. त्यांच्या नावानेच हा पंथ 'नागनाथ' अथवा 'नागेश संप्रदाय' म्हणून परिचित आहे. महागाव, वरवंड, किल्लारी व नरंदे या चार ठिकाणी संप्रदायाची मुख्य ठिकाणे आहेत. मठ परंपरा या संप्रदायाने जिवंत ठेवलेली असून आजही या चार ठिकाणी मठाचे अस्तित्त्व आढळते.

या संप्रदायाचे  महत्त्व नमूद करताना ह. श्री. शेणोलीकर म्हणतात की, महाराष्ट्रातील वारकरी पंथाच्या वाङ्मयात वीरशैव संस्काराच्या ज्या काही खुणा सापडतात. त्याचा मागोवा नागेश संप्रदायाच्याद्वारा घेता येण्याजोगा आहे, हेच नागेश संप्रदायाचे ऐतिहासिक महत्त्व होय.''(शेणोलीकर, ह. श्री., प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, डायमंड पब्लिकेशन, आवृत्ती ७ वी, २०११, पृ.८१) वीरशैव संप्रदायाचा वारकरी संप्रदायासोबतचा असणारा धागा नागेश संप्रदायाच्याद्वारे अधिक स्पष्ट करण्याचे काम शेणोलीकरांनी केले आहे व त्यातून नागेश संप्रदायाचे इतिहासातील महत्त्व विषद केले आहे.

संप्रदायातील तत्त्वज्ञानास आपल्या लेखनाचा विषय बनवून नागेश संप्रदायाच्या लेखन परंपरेस उत्कर्षाप्रत नेण्याचे काम करणारे अज्ञानसिध्द व बहिरापिसा जातवेद हे दोन महत्त्वपूर्ण संप्रदायाचे पाईक व कवी होते. त्यांच्या कार्य व लेखनाचा परामर्श आपण येथे घेऊया.

#### ४.७.२ अज्ञानसिध्द

अज्ञानसिध्द हे नागेश संप्रदायातील तत्त्वज्ञानास ग्रंथामधून साररूपाने लोकांसमोर आणण्याचे कार्य पार पाडणारे थोर कवी होते. श्रीहेग्रसास अहिल्या नामक मुलीचा विवाह मसूर या गावी झाला होता. त्या स्त्रीच्या पोटी श्रीअज्ञानसिध्द, श्रीविदेहसिध्द व श्रीनरदसिध्द या तीन अपत्यांचा जन्म झाला. प्रथम पुत्र अज्ञानसिध्दांच्या जन्मापूर्वी अहिल्येने श्री नागनाथ या देवास नवस केला होता तद्नंतर अज्ञानसिध्द यांचा जन्म झाला. बालपणापासून आध्यात्मिक वातावरणात रमण्याची अज्ञानसिध्दांची वृत्ती होती. तसेच त्यांनी लहानपणापासून वडवाळ येथे श्री नागनाथांच्या सेवेमध्ये अनेक वर्षे व्यतीत केली होती. नागनाथांनी अज्ञानसिध्दांना आपल्या संप्रदायाच्या प्रचारासाठी तयारी व्हावी या हेतूने हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील आपले शिष्य अल्लमप्रभू यांच्याकडे पाठविले होते. तेथे त्यांनी दीर्घकाळ वास्तव्य करून कार्य केले व तेथेच समाधी घेतली.

'वरद नागेश' (रचनाकाळ सुमारे १४३०) हा वेदांतपर ग्रंथ अज्ञानसिध्द यांनी लिहिला आहे. त्याच्या अध्यायांची संख्या १२ तर ओवीसंख्या २१२५ इतकी आहे. कवी मुकुंदराज यांच्या 'विवेकसिंधू' या ग्रंथाप्रमाणे या ग्रंथाची रचना आहे. स्वरूप साक्षात्कार, स्वरूपदृढीकरण, पंचीकृत उत्पत्ती, पिंडब्रम्हांडऐक्यता, स्थूल देह उपाधी निरसन, लिंगदेह, कारणदेह, महाकारण देह निरसन, देहत्रय ऐक्य, तत्पदभेद निरसन, महावाक्य विवरण, जीवशिवभेद ऐक्यता, द्वादशविकल्प माया इत्यादी प्रकरणांचा या ग्रंथामध्ये समावेश आहे.

अज्ञानसिध्द यांनी 'वरद नागेश' ही रचना संप्रदायाच्या तात्त्विक प्रचाराच्या हेतूने रचण्याचे काम केले. या ग्रंथाचे स्वरूप गुरू - शिष्य संवादाचे आहे. शिष्याने तत्त्वज्ञानाच्या अंगाने गुरूला अनेक प्रश्न विचारले असता त्याच्या उत्तरांमधून गुरूंनी तत्त्वबोध केलेला आहे. उदा. परमात्मस्वरूप स्थितीविषयी शिष्याने प्रश्न विचारला असता त्याला गुरूंनी दिलेले उत्तर खालीलप्रमाणे होते.

''परमात्मस्वरूप स्थिती । तुवां विचारिले निगुती ।।
ते परिस सावध चित्ती । वेदांत-सिधांती निरोपिल ।।
परि ते परिस परमोत्तम परात्पर परब्रम्ह । पवित्र परत्र निष्काम।
पावन शुध्द धाम। परम मंगला ।।
धीर, गंभीर, उदार । स्थिर, चातुर्य चातुर्यापर ।
सुंदर, सुकुमार, निरंतर । चाळुनि विकार स्पर्शना ।।
जे द्वादशा दीप्ती न पोळे । न जळे प्रळियाग्नीचेनि अनळ ।।
जन्म - मरण नातळे । ते निराळे आणि जवळी ।।
रवी, चंद्र,ताराग्नि, वडवानळ । सकल तेजांचे तेजमूळ ।
तेजा तेजत्व देऊ नि निराळ । ते सोज्वळ सर्वत्र सम।।''

परमात्मा हे अंतिम सत्य आणि परममंगल असल्याचे अज्ञानसिध्द सांगतात व त्याला कोणत्याही विकाराचा स्पर्श होवू शकत नाही असे प्रतिपादन करतात. अशा प्रकारे परमात्म स्थितीविषयी गुरूंनी दिलेल्या उत्तरांमधून भाष्य केले आहे.

'वरद नागेश' या ग्रंथाशिवाय 'स्वरूपनिर्वाण', 'तत्त्वबोध', 'जीवब्रम्हभेदलक्षण', 'पृच्छापत्र', 'काळज्ञान', 'अकालज्ञान' इत्यादी तत्त्वज्ञानपर ग्रंथाच्या रचना अज्ञानसिध्द यांनी केल्या. तसेच 'संकटहरणी स्तोत्र', अविंध भाषेतील 'पंचीकरणप्रमेय', 'अष्टके', 'भारूडे', 'आरत्या', 'पोवाडे', 'डफगाणी' इत्यादी रचना त्यांच्या नावावर आहेत. एकूणच आपल्या विपुल रचनांच्याद्वारे अज्ञानसिध्द यांनी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची यथासांग मांडणी करण्याचे व त्याद्वारे मराठी साहित्यविश्वात मोलाची भर टाकण्याचे काम केले आहे.

### ४.७.३ बहिरा जातवेद

बहिरापिसा जातवेद हे कृष्णचरित्रकार कवी म्हणून प्रसिध्द होते. त्यांच्या कालखंडाविषयी व स्थानाविषयी अनेक संशोधकांमध्ये मतभिन्नता आढळून येते. तसेच त्यांनी मुस्लिम धर्माचा स्वीकार करून पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश केला व त्यांना वडवळसिध्द नागेशांनी आध्यात्मज्ञान दिले, असे मांडण्यात येते. मध्ययुगीन महाराष्ट्रातील कथावाङ्‌मयाच्या प्रथम पुरस्कर्त्यांमध्ये त्यांचा समावेश निश्‍चित होतो.

बहिराजातवेद यांची प्रमुख रचना म्हणजे त्यांनी रचलेली 'बहिरवी' उर्फ 'भैरवी' ही होय. ही एक भागवत ग्रंथातील दशमस्कंदावरील विस्तृत टीका आहे. ही टीका एकूण पाऊण लाख ओवी इतकी आहे. मात्र आज साठ अध्यायांमधील १६२८४ ओव्याच उपलब्ध होतात. या विस्तृत व मधुर रचनेमुळे बहिरापिसा हे कथा वाङ्‌मयाचे तत्कालीन प्रसिध्द कवी म्हणून नावारूपास आले. कृष्ण-रुक्मिणी विवाह सोहळ्याचे विस्तृत वर्णन बहिराजातवेद यांनी या ग्रंथात केले आहे. तसेच ''आहा रे कुक्कुटा चांडाळा । जागा केला रे सोवळा । हा पूर्व जन्मीचा वैरी । वियोगुकृष्णासी करी । ऐस्या कुक्कुटा शिव्या देती'' अशी कृष्ण विरहातील व्याकुळ स्त्रियांची लडिवाळपणे केलेली संभाषणे वर्णिली आहेत. कल्पकतेची जोड देऊन प्रसंग रचण्याचे कौशल्य बहिरा जातवेदांनी साधले आहे. शृंगारपरवर्णने बहारीने वर्णन केली आहेत. त्यामध्ये रासक्रिडा, कात्यायनीव्रत इत्यादींचा समावेश आहे.

कवी मुक्तेश्‍वरांच्या लेखनशैलीचा विशेष प्रभाव बहिराजातवेद यांच्या रचनांवर आढळतो. आख्यान काव्य रचनेच्या इतिहासामध्ये बहिराजातवेद यांच्या 'भैरवी' या काव्यातील मधुरता व ओघवती कथनशैली यामुळे या रचनेस अग्रक्रम द्यावा लागतो. बहिराजातवेद यांची भैरवी ही अनन्यसाधारण रचना मराठी साहित्याच्या इतिहासातील महत्त्वाचे योगदान आहे.

## ४.८ शेख महंमद व हुसेन अंबरखान (मुस्लिम मराठी कवी)

मराठी मध्ययुगीन साहित्यामध्ये महानुभाव, वारकरी, समर्थ, दत्त, नाथ, जैन, लिंगायत इत्यादी संप्रदायांबरोबर मुस्लिम धर्मीय संतांचे व कवींचे योगदान देखील बहुमोल असे आहे. मुस्लिम मराठी कवींनी आपल्या धर्माच्या सीमा उल्लंघून हिंदू परंपरांना मराठीच्या माध्यमातून आपल्या कवेत घेण्याचे श्रेष्ठ कार्य केले. मराठीतील प्रमुख साहित्य प्रवाहांबरोबर मुस्लिम कवींनी जन्मास घातलेला समांतर साहित्य प्रवाह मध्ययुगीन कालखंडामध्ये सक्रिय होता. ज्या प्रवाहाकडे तत्कालीन लोकांचे दुर्लक्ष झाले होते. मात्र आधुनिक मराठी साहित्य अभ्यासकांनी त्यांच्या साहित्यिक योगदानाचा सखोल परामर्श घेऊन त्यांचे लेखन व त्यांचा व्यापक दृष्टिकोन जगासमोर आणण्याचे काम केले आहे. शेख महंमद व हुसेन अंबरखान यासारख्या मुसलमान कवींनी मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये आपल्या लेखनाचे वेगळेपण नोंदविलेले आहे. त्यांच्या लेखनाचे विशेष म्हणजे त्यांनी भगवद्गीतेसारख्या हिंदुधर्मीय ग्रंथांवर भाष्य करण्याचे आगळेवेगळे काम केले. त्यांच्या या लेखन कार्याचा परामर्श आपण येथे घेऊया.

### ४.८.१ शेख महंमद

शेख महंमद यांचा जन्म वाहिरा, ता. आष्टी, जि. बीड या गावी वडील राजमहंमद व आई फुलाई यांच्या पोटी झाला. स्वत: शेख महंमद आपल्या 'योगसंग्राम' या ग्रंथात आपल्या माता-पित्याचा उल्लेख करतात की,

'याती गोरे राज महंमद पिता । सगुण पतिव्रता फुलाई माता । प्रसवली अविनाश भक्ता । शेख महंमदालागी ।।' वाहिरा हे त्यांचे मूळ गाव होते. मात्र शेख महंमद यांचे वडील राजमहंमद हे धारूरच्या किल्ल्यावर हवालदार म्हणून नोकरीस होते. त्यामुळे त्यांच्या बालपणीचा काळ बहुतांशी धारूरच्या किल्ला परिसरात गेला असावा. ज्यामुळे त्यांनी तत्कालीन राजकीय घडामोडी, सामाजिक स्थिती या बाबींची जवळून पाहणी केली होती. त्यांच्या जडणघडणीमध्ये तत्कालीन राजेशाहीतील समाजाच्या स्थितीगतीचा प्रभाव होता. समाजातील सर्व स्तरांचे अवलोकन करण्याची संधी त्यांना मिळाली होती. तसेच कुटुंबीयांकडून त्यांच्यावर उत्तम संस्कार घडले होते. उत्तम शिक्षण आणि चिकित्सक वृत्तीचा विकास होण्यास पोषक वातावरण त्यांना लाभले होते. या सर्व बाबींमुळे शेख महंमद एक सामाजिक जाणीव असणारे, उत्कृष्ट प्रतिभेचे, अभ्यासू व चिकित्सक दृष्टीचे व्यक्तिमत्व असे घडले होते.

कालांतराने शेख महंमद श्रीगोंदा या ठिकाणी स्थिर झाले. सूफी संप्रदायातील चार उपपंथांपैकी कादरी या संप्रदायाच्या शिष्य परंपरेमध्ये शेख महंमद यांचे नाव गणण्यात येते. पहिले कादरी सूफी महंमद गौस-राज महंमद-कादरी चांदसाहेब उर्फ चांद बोधले - कादरी महंमद साहेब अर्थात शेख महंमद अशी परंपरा नोंदविण्यात येते. सूफी पंथ हा अद्वैत मानणारा पंथ आहे. वारकरी पंथाला अधिक जवळचा मानणारा असा हा पंथ आहे. कारण संत एकनाथांचे गुरू हे चाँद बोधले होते जे सूफी परंपरेतील संत होते. तसेच भजन, पूजन या बाबींनादेखील सूफी पंथाने अनुसरण्याचे काम केले होते. वारकरी संप्रदायाच्या समतावादी भूमिकेमुळे शेख महंमद अतिशय प्रभावित झाले होते. परिणामी शेख महंमद आयुष्यभर वारकरी संप्रदायात कार्यरत राहिले. जाती धर्माच्या बंधनांचा अडसर त्यांच्यासाठी गौण होता तर भक्तीमार्गाचे क्रमण करणे हे त्यांचे ध्येय होते.

शेख महंमद यांनी संत परंपरेमध्ये वाटचाल करून आपल्या विद्वज्जड प्रतिभेच्या व भक्तीपूर्ण सहृदयतेच्या जोरावर मधुर आणि रसाळ अशा विपुल साहित्याचे योगदान मराठी साहित्याला दिलेले आहे. त्यांच्या नावावर एकूण दहा ग्रंथ आढळून येतात. त्यांची नावे याप्रमाणे - १. योगसंग्राम, २. पवन विजय, ३. निष्कलंक प्रबोध, ४. साठी सवंत्सर, ५. स्फुट रचना, ६. अभंग, ७. गायका, ८. मदालसा, ९. हिंदी कविता, १०. ज्ञान गंगा आदी कलाकृती त्यांच्या नावावर आढळतात.

'योगसंग्राम' हा त्यांचा मुख्य ग्रंथ असून त्यामध्ये एकूण अठरा अध्याय आहेत. वरीलपैकी काही ग्रंथ आजही अप्रकाशित स्वरूपात आहेत. उदा. संवत्सर व ज्ञानगंगा

### ४.८.२ हुसेन अंबरखान (इ.स. १६०३ - इ.स.१६५३)

मुसलमान संत परंपरेतील हुसेन अंबरखान हे एक प्रसिध्द मराठी कवी होते. 'गीतागंगेत पावन झालेला यवन' असे रा. चिं. ढेरे यांनी हुसेन अंबरखान यांचे वर्णन केले आहे. हुसेन अंबरखान हे 'अंबरहुसेन' या नावाने देखील परिचित होते. त्यांच्या जन्माविषयी 'सिध्दांतचिदंबरी' या ग्रंथामधील 'चिदंबरजयंतीस्तोत्र' या प्रकरणामध्ये उल्लेख आढळून येतो. तसेच स्वत: अंबरहुसेन आपल्या गीताटीकेच्या प्रारंभी लिहितात की,

''आधी अंबर अंबरखान । त्याचा पुत्र याकुत अंबरखान ।

त्याचा सुत हुसेन अंबरखान । असे जगदवंद्य ।''

यावरून त्यांच्या घराण्याची परंपरा उध्दृत होते. संशोधक रा. चिं. ढेरे त्यांच्या घराण्याविषयी संशोधनात्मक भाष्य करून दौलताबादच्या निजामाच्या पदरी हुसेन अंबरखान यांचे वडील याकुत अंबरखान असावेत, असा निष्कर्ष काढतात. चांद बोधले, जनार्दनस्वामी, अंबाजीपंत अशी आध्यात्मिक विचारांची माणसे दौलताबाद येथे याकुत अंबरखान यांच्या आश्रयाने कार्यरत होती त्याचा परिणाम म्हणजे हुसेन अंबरखान यांची जडणघडण आध्यात्मिक विचारांच्या प्रभावाने झाली असल्याचे सिध्द होते. तसेच त्यांच्या मनावर हिंदू साधू-संतांच्या आचार-विचारांचा विशेष संस्कार झाल्याच्या शक्यता वर्तविण्यात येतात.

हुसेन अंबरखान हे भगवद्गीतेवर टीका लेखन करणारे पहिले सूफी पंथीय मुसलमान कवी होते. त्यांनी 'अंबरहुसेनी' नावाचा भगवद्गीतेवरील भाष्य करणारा ग्रंथ इ.स. १६५३ मध्ये लिहिला. हा एकूण ८७१ ओव्यांचा ग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथाचा लेखनकाल नमूद करताना ते लिहितात,

''शके पंधरासे पंचहातरि । विजय नाम संवत्सरी।

अश्विन शुध्द दशमी सोमवारि । अंबरहुसेनी टीका संपूर्ण झाली ।।१८८६।।''

अशा प्रकारे शके १५७५ मध्ये त्यांचे हे लेखन पूर्णत्वास पोहोचल्याची नोंद ते करतात. या ग्रंथलेखनाचे कारण नमूद करताना ते केवळ गीतेचा भावार्थ समजून घेणे हा असल्याचे सांगतात. तसेच गीतेच्या पूर्व टीकांचा परामर्श देखील ते घेतात. ते म्हणतात की,

''अच्युताश्रम निवृत्तीनाथादिकी । गीतेचिया प्रतिश्लोकी ।

केली ओवी येकियेकि । परि श्लोकार्थ संपूर्ण नसे।''

अशा प्रकारे भगवद्गीतेवरील पूर्वटीकाकारांचे उल्लेख करून त्यांचे गीतेवरील भाष्य संपूर्ण नसल्याची नोंद अंबरहुसेन यांनी केली आहे. एका अर्थी संपूर्णभाष्य करण्याचा मानस ठेऊन सदर लेखन त्यांनी आरंभिले असल्याचा अप्रत्यक्ष उल्लेख ते करतात. तसेच पुढे ते म्हणतात की,

''भाष्य शंकराचार्यांचे । आणि व्याख्यान श्रीधरस्वामींचे ।

पाहोनिया भगवद्गीतेची । महाराष्ट्र भाषेने कीजे ।''

अशा प्रकारे शंकराचार्य आणि श्रीधरस्वामींच्या भाष्य व व्याख्यानांच्या प्रभावातून सदर टीका आकार घेत असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. अंबरहुसेन यांची बहुश्रुतता, व्यासंग आणि अभ्यास याचे दर्शन त्यांच्या मराठी भाषावापरावरून निदर्शनास येते. भगवद्गीतेसारखा मूळ संस्कृत भाषेतील ग्रंथ टीकेसाठी निवडणे यावरून त्यांचा संस्कृत व्यासंग देखील सखोल असल्याचे स्पष्ट होते. या सर्व बाबींमुळेच त्यांच्या टीकेमधून त्यांची विद्वता व प्रतिभा याचे दर्शन घडते. उदाहरण म्हणून त्यांच्या

''मेलासि तरी स्वर्ग पावसी । जिंकोनि तरि पृथ्वी भोगिसी ।

म्हणोनि कौंतेया उठि युध्दासी । कृतनिश्चये ।।''

या मांडणीकडे पाहिले असता त्यांचे लेखनसामर्थ्य दिसून येते.

मुस्लिम धर्मामध्ये जन्म होऊनसुध्दा अभ्यासाने आणि आपल्या विद्वत्तेने गीतेवर टीकात्मक भाष्य करण्याचे महत्तम कार्य हुसेन अंबरखान यांनी केले आहे. त्यांच्या कार्याविषयी रा. चिं. ढेरे म्हणतात की, ''संतवाङ्मयाच्या अभ्यासकांना संस्कृत गीतेचा मराठी अवतार घडविणारा आणि गणेशवंदन करणारा हा मुसलमान साधू धार्मिक क्षेत्रातील भेदाभेदांच्या आग्रहाचा नाश करून अद्वैताच्या अधिष्ठानावर उभा आहे.'' (ढेरे रा. चि. मुसलमान मराठी संतकवी, पुणे, २००८) हुसेन अंबरखान यांचे महाराष्ट्राच्या साहित्य व संस्कृती इतिहासातील स्थान व योगदान निश्चितार्थाने अनन्यसाधारण असे आहे.

## ४.९ फादर स्टिफन्स व फादर क्रुवा (ख्रिस्ती मराठी कवी)

जगभरामध्ये सर्वाधिक प्रचार व प्रसार झालेला ख्रिस्ती धर्म भारतामध्ये देखील ख्रिस्ती संत थोमा याच्याद्वारे हजारो वर्षांपूर्वी पोहोचलेला पहावयास मिळतो. आज ख्रिस्ती धर्माची तत्त्वे व आचरणासंबंधी भाष्य करणारी असंख्य पुस्तके जगभरातल्या विविध भाषांमध्ये उपलब्ध आहेत. 'बायबल' या ख्रिस्ती धर्मग्रंथाचा इतिहास तर हजारो वर्षापूर्वीचा आहे व 'बायबल' हा आज जगातील सर्वाधिक भाषांमध्ये भाषांतरित झालेला ग्रंथ आहे. ख्रिस्त विश्वासणाऱ्यांसाठी 'बायबल' हे पवित्र शास्त्र असून ती देवाची वाणी आहे. आंग्ल संपर्कानंतर भारताचा पाश्चात्य संस्कृतीशी संपर्क आला व इंग्रजांबरोबर भारतामध्ये अनेक पोर्तुगीज व ख्रिस्ती मिशनरी लोकांचा प्रवेश झाला. ख्रिस्ती धर्मप्रसार व सेवाकार्य या हेतूने आलेल्या ख्रिस्ती मिशनरी लोकांनी येशू ख्रिस्ताची सुवार्ता आणि प्रेमाचा संदेश भारतीयांमध्ये प्रसारित करण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी विविध मार्गांचा अवलंब केला. उदा. शैक्षणिक कार्य, वैद्यकीय क्षेत्रातील कार्य, खेडोपाडी प्रचार इत्यादी. त्यांना या सर्व कार्यामध्ये प्रमुख अडचण होती ती एतद्देशीय भाषेची. संवाद ही प्रमुख प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्थानिक भाषांचा अवलंब करणे क्रमप्राप्त होते. या अडचणीची जाणीव होऊन त्यांनी स्थानिक भाषांचा अभ्यास करण्यावर जोर दिला. गोव्यासारख्या किनारी प्रदेशात आलेल्या पोर्तुगीजांनी मराठी भाषा व कोकणी बोलीचा अभ्यास सुरू केला. त्या भाषा व बोली आत्मसात करून आपले इच्छित कार्य पार पाडण्याचे दिव्य त्यांनी केले. ओघानेच मराठी भाषेमध्ये लेखन करण्यासाठी प्रयत्न झाले. अशा प्रकारचा प्रथम प्रयत्न करून यश संपादन करणारे फादर थॉमस स्टीफन्स हे होत. तर त्यांच्यानंतर मराठी साहित्यामध्ये ख्रिस्ती पुस्तकांची भर घालणारे फादर क्रुवा हे महत्त्वपूर्ण व्यक्ती होते. या दोहोंनी मराठी भाषेमध्ये केलेले लेखन प्रस्तुत स्थळी आपण अभ्यासणार आहोत.

### ४.९.१ फादर थॉमस स्टीफन्स (इ.स. १५४९ – इ.स.१६१९)

फादर थॉमस स्टीफन्स यांचा जन्म इंग्लडच्या बुल्टशर परगण्यातील बोस्टन या ठिकाणी इ.स. १५४९ मध्ये झाला. त्यांनी इ.स. १५७५ मध्ये रोम येथे जेझुइट पंथाची दीक्षा घेतली. ख्रिस्ती धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास त्यांनी केला. ग्रीक व लॅटीन भाषांचा त्यांचा अभ्यास होता तसेच त्यांनी पोर्तुगीज भाषाही शिकली होती. पोर्तुगीज मिशनतर्फे ते दि. २४ ऑक्टोबर १५७९ रोजी भारतातील गोवा येथे दाखल झाले. भारतामध्ये त्यांनी एकूण ४०

वर्षे निस्वार्थी भावनेने सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये काम केले. परद्विपावरून भारतात सेवाकार्यासाठी आलेल्यांपैकी फादर स्टीफन्स हे धर्मप्रचाराच्या हेतूने आलेले मात्र पूर्व-पश्चिम संस्कृतीचा समन्वय साधणारे आणि आंतरधर्मीय संवाद घडवून आणणारे थोर कवी होते. त्यांनी इ.स. १६११ दरम्यान वसईच्या प्रचारकेंद्रात वर्षभर मराठीचे धडे घेतल्याचे उल्लेख आढळतात. त्याद्वारे त्यांनी मराठी भाषा अवगत करून घेतली होती. वसई येथील वर्षभराच्या उल्लेखाखेरीज त्यांचे कार्यकालातील सुमारे चाळीस वर्षांचा कालखंड गोव्याच्या सासष्टी परिसरात त्यांनी धर्मप्रचार कार्यासाठी व्यतीत केल्याचे दिसून येते.

फादर थॉमस स्टीफन्स यांच्या नावावर 'क्रिस्तपुराण' (१६१६), 'दौत्रीन ख्रिस्ता' (१६२२), व 'कोकणी भाषेचे व्याकरण'(१६४०) या एकूण तीन मराठी ग्रंथ रचना आहेत. फादर स्टीफन्स यांना देवनागरी लिपी अथवा इतर भारतीय लिपी अवगत नसल्याकारणाने त्यांनी त्यांच्या रचना ह्या मराठी भाषेत मात्र रोमन लिपीचा वापर करून निर्माण केलेल्या आहेत.

'क्रिस्तपुराण' या ग्रंथाची प्रथमावृत्ती इ.स. १६१६ मध्ये प्रकाशित करण्यात आली. इ.स. १६४९ व १६५४ मध्ये त्याची अनुक्रमे दुसरी व तिसरी आवृत्ती प्रकाशित झाली. या ग्रंथाची भाषा मराठी मात्र लिपी रोमन होती. या ग्रंथाचे मूळ नाव 'दिष्कुर्सु सोब्रि अ व्हिन्द द जेजू क्रिश्तु नॉस्सु साल्वादोर द मुन्दुअसे' असे आहे. 'पैले पुराण' अर्थात 'जुना करार' व 'दुसरे पुराण' अर्थात 'नवा करार' असे बायबलप्रमाणे त्याचे दोन भाग आहेत. सर्व ख्रिस्ती धर्मग्रंथ हे हिब्रू, लॅटिन व पोर्तुगीज भाषेत उपलब्ध होते. मात्र भारतीयांसाठी कोणत्याही भारतीय भाषेत ख्रिस्ती धर्मग्रंथाची उपलब्धी नव्हती. परिणामी भारतातील नवख्रिस्ती लोकांना ख्रिस्ती धर्माची माहिती लिखित स्वरूपात मिळत नव्हती. याचा विचार करून प्रस्तुत ग्रंथाची रचना करण्याचे काम फादर स्टिफन्स यांनी केले. मराठी भाषेचे ज्ञान अवगत करून एतद्देशीयांना समजेल अशा मराठीमध्ये प्रस्तुत ग्रंथाची रचना केली आहे. एकूण ११००० ओव्यांचे हे काव्य असून 'महाराष्ट्र भाषेचे सुंदर लेणे' असा याचा गौरव करण्यात आला आहे. परद्विपावरून आलेल्या आणि मत्प्रयासाने मराठी भाषेचे ज्ञान अवगत केलेल्या फादर स्टीफन्स यांनी अतिशय सूत्रबध्द, देशी शैलीचा अंगिकार करून हे सुंदर लेणे मराठी साहित्यविश्वाला बहाल केलेले आहे. हे करताना फादर स्टीफन्स यांनी मराठी भाषेला 'कस्तुरी' आणि 'कल्पतरू'ची उपमा देऊन केलेले वर्णन अतिशय उच्च प्रतीचे गुणगौरव आहे. ते लिहितात,

''जैसा हरळांमाजी रत्नकिळा । कि रत्नांमाजि हिरा निळा ।
तैसी भासांमाजि चोखळा । भासा मराठी ।।
जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी । किं परिमळांमाजी कस्तुरि ।
तैसी भासांमाजि साजिरी । मराठिया ।।
पखियांमध मयोरू । ब्रुखियांमधे कल्पतरू ।
भासांमध मानु थोरू । मराठियेसी ।।
तारांमधे बारा रासी । सत्पवारांमध्ये रवि-ससी ।

या दीपिचेआं भासांमध्ये तैसी । मराठिया ।।''

अशा प्रकारे मराठी भाषेचे कौतुक फादर स्टीफन्स यांनी केलेले आहे. अप्रतिम अशी ही रचना ज्ञानेश्वरांनी केलेल्या मराठीच्या 'अमृतातेही पैजा जिंके' या वर्णनाशी नाते सांगणारी आहे. फादर स्टीफन्स यांच्या एकूणच लेखनावर वारकरी लेखनपरंपरेचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. 'क्रिस्तपुराण' या ग्रंथावर संत वाङ्मयाचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. ओवीबध्द रचना हे संत साहित्याचे वैशिष्ट्य या ग्रंथात अवलंबिलेले आहे. तसेच पहिल्याच ओवीत फादर स्टीफन्स लिहितात,

''ओ नमो वीस्वभरीता । देवबापा सर्व समर्थपरमेश्वरा सत्यवंता ।

स्वर्ग पृथ्वीच्या रचणारा तु । रीधीसीधीचा दातारू ।

क्रुपानीशी करूणाकरूतुं सर्व सुखाचासागरू । आदी अंतु नातुडे ।।''

अशा प्रकारे प्रथमचरणी परमेश्वरास नमन करण्याची व आद्यस्थानी देवाची महती वर्णन करण्याची पध्दती वापरण्यात आली आहे. फक्त ती मांडणी हिंदू देव-देवतांच्या अनुषंगाने नाही तर ती ख्रिस्त येशूला मध्यवर्ती ठेऊन करण्याचे काम फादर स्टीफन्स यांनी केले आहे. त्यांच्या या वैविध्यपूर्ण मांडणीचे वर्णन करताना डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात, ''हिंदू मनाला पटेल असा पौर्वात्य वेश आणि ते काव्यरूपाने ख्रिस्तचरित्राला देण्याची कामगिरी पार पाडलेली आहे. भाषा, वृत्त, कल्पना, कवी संकेत इत्यादी सर्व काव्यांगे त्यांनी अस्सल मराठी ठेवली आहेत. आतील मूर्ती तेवढी येशू ख्रिस्ताची बाकी मंदिराचा सारा थाट हिंदू पध्दतीचा अशी या पुराणाची रचना आहे.''

फादर स्टीफन्स 'ख्रिस्तदास' असे स्वत:चे नाव रचनांसाठी वापरताना दिसतात. रचनेमध्ये कवीने स्वत:चे नाव गुंफण्याची पध्दतीदेखील फादर स्टीफन्स यांनी वापरलेली दिसून येते. ते नाव त्यांनी 'ख्रिस्तदास' असे गुंफलेले दिसते. उदा.

''ऐसी कथेची वित्पत्त्वि । ऐका जे सांगितले अल्पमति ।

ते ख्रिस्तदास करी विनंती । खेमा किजे अग्क्यानाथ ।।१२३।।''

फादर स्टीफन्स स्वत:चा उल्लेख 'ख्रिस्तदास' असा करीत असत. अतिशय सौहार्दपूर्ण भाषेत आत्मीयतेने रचलेले हे मराठी लेखन मराठीच्या इतिहासातील खऱ्या अर्थाने 'सुंदर लेणे' आहे, हे निश्चित होय.

'दौत्रीन क्रिश्तां' हे इ.स. १६२२ मध्ये प्रकाशित करण्यात आलेले पुस्तक एकूण ६४ पृष्ठांचे आहे. त्याचे स्वरूप प्रश्नोत्तर स्वरूपाचे असून पाद्री मार्क्स जॉर्जा यांच्या पोर्तुगीज भाषेतील पुस्तकाचे हे भाषांतर आहे. ख्रिस्ती जीवनाची ओळख बाळबोध भाषेत व्हावी अशा हेतूने आकारास आणलेले हे पुस्तक 'कानारी बोली'मध्ये म्हणजे 'किनाऱ्यावरील बोली'मध्ये अर्थात 'कोकणी बोली'त निर्माण करण्यात आले आहे. या पुस्तकाची रचना करताना रोमन लिपीचा वापर करण्यात आलेला आहे. जेझुटल महाविद्यालय, रायतूर येथे या पुस्तकाची प्रथम आवृत्ती छापण्यात आली होती. इ.स. १९६५ मध्ये मराठी संशोधक अ. का. प्रियोळकर यांनी प्रस्तुत पुस्तकाची नागरी आवृत्ती वाचकांच्यासाठी प्रसिध्द केली आहे.

'कोकणी भाषेचे व्याकरण' हे इ.स. १६४० मध्ये मुद्रीत करण्यात आलेले हे पुस्तक पोर्तुगीज भाषेत 'द लिंग्व कानारी' या नावाने लिहिण्यात आले होते. त्याचा निर्मितिहेतू केवळ ख्रिस्ती मिशनरी लोकांच्या भाषिक ज्ञानामध्ये भर टाकणे इतकाच होता. देशी भाषांच्या व्याकरण निर्मितीच्या इतिहासातील 'कोकणी भाषेचे व्याकरण' हे फादर स्टीफन निर्मित प्रथम व्याकरणाचे पुस्तक आहे. कालपरत्वे त्यांच्या आवृत्त्या निघाल्या त्याचबरोबर त्यामध्ये पुढील काही अभ्यासकांनी भर घालण्याचे काम देखील केले. परदेशी असणारे फादर स्टीफन यांनी देशी भाषेचे व्याकरण लिहिणे ही बाब त्यांचे स्थानिक भाषेवर अर्थात मराठी भाषेवर आणि ओघाने कोकणी बोलीवर असणारे नितांत प्रेम व्यक्त करते. त्याशिवाय भाषेच्या वापरासाठी येणारी अडचण दूर करण्याच्या हेतूने देखील त्यांनी हे प्रयत्न केले होते व संपूर्ण मराठी भाषेमध्ये मोलाचे योगदान दिले, हे सर्वार्थाने सत्य होय.

### ४.९.२ फादर क्रुवा

मध्ययुगीन कालखंडात ख्रिस्ती धर्मोपदेशकांमधून मराठीमध्ये रचना करणारे फादर स्टीफन्स हे प्रथम ख्रिस्ती कवी होते. त्यांच्या प्रेरणेतून आणि अनुकरणातून फ्रेंच पाद्री असणारे फादर क्रुवा यांनी मराठीमध्ये लेखन करण्याचे काम केले. त्यांची 'महापुराण' (१६२९) ही सेंट पीटरच्या जीवनावर आधारित असणारी काव्यरचना प्रसिध्द आहे. एकूण २१८७१ ओव्यांचे हे काव्य असून पोर्तुगीज भाषेत त्याचे नाव 'हिंदू धर्मातील चुकांचे खंडण केले आहे असे सेंट पीटरचे चरित्र' असे आहे. पोर्तुगीज भाषेतील या ग्रंथाच्या शीर्षकावरून त्याचे स्वरूप समजण्यास खऱ्या अर्थाने मदत होते. कारण या ग्रंथामध्ये प्रथम भागात सेंट पीटरचे चरित्र सामावलेले आहे तर पुढील दोन भागांमध्ये हिंदू देव-देवता व पुराणांवर टिका करण्याचे काम केले आहे. फादर स्टीफन्स यांच्या अनुकरणातून व प्रभावातून फादर क्रुवा यांच्या रचनांचा जन्म झाला असे असले तरी फादर स्टीफन्स व फादर क्रुवा यांच्या रचनांमध्ये व शैलीमध्ये मूलभूत फरक जाणवतो. फादर स्टीफन्स यांच्या रचनांमध्ये मराठी भाषेविषयी नितांत आदर व प्रेम व्यक्त होताना दिसते. या प्रेमामुळेच त्यांच्या मांडणीत माधुर्य व रसाळता आलेली आहे. ख्रिस्ती तत्त्वज्ञानास विषद करताना व येशू ख्रिस्ताचे जीवन मांडताना त्यांनी भारतीय देवी देवतांवर अथवा एतद्देशीय धार्मिक घटकांवर कसल्याही प्रकारची टिका केली नाही. याउलट फादर क्रुवा यांच्या लेखनामधून प्रामुख्याने हिंदू धर्म व धार्मिक बाबींवर तसेच येथील चालीरितींवर खंडणात्मक भाष्य करण्याचे काम झाले आहे.

'महापुराण' या त्यांच्या रचनेमधून त्यांनी विष्णू, राम, परशुराम, गणपती इत्यादी हिंदू देव-देवतांवर वारंवार कडाडून लेखन केले आहे ते लिहितात,

''देवासि कुंजरमुख । ऐसे बोलतील कवन मूर्ख ।।<br>
की कुंजराथे कवन पुरूख, । मानितील देव ।।<br>
म्हणे लहानु ब्राम्हण जाला । भिख्या मागावेआ आला ।।''<br>
बळी पाताळी घातला । कपट करौनि ।।'

अशाप्रकारे हिंदू पुराणांच्या उदाहरणांमधून पुराणकथांवर टिका करण्याचे काम केले आहे. कवनांच्या रचनांमध्ये फादर क्रुवा यांच्या प्रतिभेचे व विद्वत्तेचे दर्शन निश्चित घडते. मात्र माधुर्य व ओज या काव्यगुणांचा अभाव आढळतो. तसेच खंडणात्मक भाषेवर अधिक जोर दिला असल्यामुळे काव्यामध्ये आवश्यक असणारा गोडवा हरवला आहे.

एकूणच, फादर क्रुवा यांच्या नावावर 'महापुराण' ही एकमेव रचना आढळते. या व्यतिरिक्त अधिक लेखन आढळत नाही. हिंदू देव-देवतांवरील खंडणात्मक भाष्यामुळे त्यांचे हे लेखन अधिक प्रमाणात प्रक्षोभक स्वरूपाचे झाले आहे व त्यामुळे ते अधिक प्रभावी सिध्द झाले नाही. तसेच अपेक्षित प्रसिध्दी या रचनेच्या वाट्याला आली नाही.

### ४.१० समारोप :

एकूणच इ.स. १४०० नंतरच्या कालखंडामध्ये काही अन्य संप्रदायातील अनेक ग्रंथकारांनी मराठी साहित्याच्या प्रवाहामध्ये आपल्या ग्रंथरचनांच्या माध्यमातून विपुल भर टाकण्याचे कार्य पार पाडल्याचे दिसते. यामध्ये प्रामुख्याने नाथ संप्रदाय, लिंगायत संप्रदाय, जैन संप्रदाय, दत्त संप्रदाय, नागेश संप्रदाय, मुस्लिम संप्रदाय व ख्रिस्ती संप्रदाय इत्यादींचा समावेश दिसतो. वारकरी, महानुभाव व समर्थ संप्रदायांच्या तुलनेने अन्य संप्रदायातील साहित्य त्या काळामध्ये प्रसिध्दी पराङमुखच राहिलेले दिसून येतात. या अन्य संप्रदायांचे दुर्लक्षित राहिलेले सामाजिक व वाङ्मयीन योगदान समजून घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण या अन्य संप्रदायातील प्रमुख रचनाकारांचा व त्यांच्या प्रभावी रचनांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडा :**

१. नाथ संप्रदायास अन्य कोणत्या सांप्रदयाने ओळखले जाते?

अ. अवधूत सांप्रदाय ब. वारकरी सांप्रदाय क. महानुभाव सांप्रदाय ड. चोंभा सांप्रदाय

२. सत्यमलनाथांना कोणत्या संताचा अनुग्रह होता?

अ. नामदेवांचा ब. ज्ञानेश्वरांचा क. एकनाथांचा ड. तुकारामांचा

३. लिंगायत संप्रदायामध्ये शिवयोग शिवाचार्य यांनी कोणता संस्कृत ग्रंथ लिहिला आहे?

अ. विवेकसिंधू ब. दमयंतीस्वंयवर क. सिध्दान्तशिखमणि ड. यापैकी नाही

४. मन्मथस्वामी यांच्या नावावर २४६ ओव्यांचे कोणते अपूर्ण काव्य आढळते.

अ. नित्यानंद ब. केवलानांद क. काव्यानंद ड. अनुभवानंद

५. कोणत्या मानवतावादी तत्त्वावर जैन संप्रदायाचे तत्त्वज्ञान उभारलेले आहे?

अ. जगा आणि जगू द्या क. खरा तो एकची धर्म क. संताची शिकवण ड. वाचाल तर वाचाल

**उत्तरे :**

१. अ. अवधूत सांप्रदाय

२. ब. ज्ञानेश्वरांचा

३. क. सिध्दान्तशिखमणि

४. ड. अनुभवानंद

५. अ. जगा आणि जगू द्या

**लघुत्तरी प्रश्न :**

१. जैन सांप्रदायाचा थोडक्यात परिचय करून द्या.

२. दत्त सांप्रदाय व नागेश सांप्रदायाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.

३. ख्रिस्ती सांप्रदायाची थोडक्यात ओळख करून द्या.

४. नाथ सांप्रदायाचा थोडक्यात परिचय करून द्या.

५. लिंगायत सांप्रदायाचे वेगळेपण सांगा.

**दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. इ.स. १४०० ते इ.स. १५०० या कालखंडातील अन्य सांप्रदायातील प्रमुख ग्रंथसारांचा परिचय करून द्या.

२. नाथ सांप्रदायाची ओळख करून सत्यमलनाथ व चोंभा यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.

३. जैन सांप्रदायाचे मराठी वाङ्मयातील योगदान स्पष्ट करा.

४. 'दासोपंत हे मराठी भाषेमध्ये सर्वाधिक लेखन करून मराठी संत साहित्याचा प्रवाह समृद्ध करण्यामध्ये भरीव योगदान देणारे संतकवी होते' या विधानाचा परामर्श द्या.

५. मुस्लिम सांप्रदायाचा परिचय करून हुसेन अंबरखान यांचे वाङ्मयीन योगदान स्पष्ट करा.

**टिपा लिहा :**

१. शांतलिंग

२. फादर स्टिफन्स

३. जिनदासनामा

४. बहिराजातवेद

**अधिक वाचन :**


१. नसिराबादकर ल.रा. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. पांगारकर ल.रा. : मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ व २

३. प्रियोळकर अ.का. : मुसलमानांची जुनी मराठी कविता

४. घोणसे शामा : वीरशैवांचे मराठी-हिंदी वाङ्मय

५. देशमुख उषा : मांदियाळी, माया प्रकाशन, नागपूर

६. सरदार गं.बा : संतसाहित्याची सामाजिक फलश्रुती, म.सा.प.पुणे

७. अक्कोळे सुभाषचंद्र : प्राचीन मराठी जैन साहित्य, सुविचार प्रकाशन, नागपूर.


***

# घटक : १

## एकनाथांची साहित्य संपदा

### इ.स.१५०० ते इ.स. १६०० (स्थूल कालखंड)

### चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत,

### भावार्थ रामायण, गवळणी, भारुडे, इत्यादी रचना

**१.१ उद्दिष्टे :**

१. एकनाथांच्या वाङ्मयाचा स्थूल परिचय करून घेणे.

२. एकनाथांच्या वाङ्मयाचे विशेष अभ्यासणे.

३. लोकशिक्षक या नात्याने एकनाथांच्या कार्याचे मूल्यमापन करणे.

४. एकनाथांच्या वाङ्मयाचा कालिक अभ्यास करणे.

५. मध्ययुगीन वाङ्मयेतिहासामध्ये एकनाथांचे महत्त्व अधोरेखित करणे.

**१.१ प्रास्ताविक :**

कोणतीही थोर व्यक्ती ही काळाचे अपत्य मानली की; तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण तत्कालाचे विविध संस्कार आणि परिस्थितीचा परिणाम हा त्या व्यक्तीच्या जडण-घडणीवर झालेला असतो आणि त्यातून तिचे व्यक्तिमत्त्व फुलत जाऊन ती समाजोपयोगी कार्य करते. इतिहास असो की वाङ्मयेतिहास, काळाचा विचार हा करावाच लागतो. युगप्रवर्तक लेखकांनी नेहमीच आपल्या काळाशी सुसंगत असे लेखन केले आहे. त्या त्या काळातील समाजव्यवस्थेला शहाणे करून सोडण्याचे काम केल्यामुळे त्या काळावर संबंधित लेखकाची नाममुद्रा ही नेहमीच मुद्रित झालेली पाहावयास मिळते. एकनाथ आणि त्यांचे लेखनकर्तृत्वही याला अपवाद नाही, त्या अनुषंगाने या घटकात आपल्याला एकनाथांच्या सर्वांगीण कार्यकर्तृत्वाचा परिचय करून घ्यावयाचा आहे.

एकनाथांचा काळ हा सोळाव्या शतकातला. या काळातील राजसत्तेचा विचार करता, यादवांच्या पडझडीनंतर आणि मुस्लिमांच्या आक्रमणाने महाराष्ट्राची शकले पडलेली होती. महाराष्ट्रात बहामनी राजवट स्थापन झाली होती. किंबहुना त्या बहामनी राज्यातूनही पाच पातशाह्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे सर्वत्रच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. अधर्माचे राज्य पसरले होते. धर्मशास्त्राचा कोणताही धाक राहिलेला नव्हता. धर्मशास्त्राचा उपयोग हा केवळ पोट भरण्यासाठी चालू होता. दुष्ट प्रवृत्तींच्या लोकांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. अज्ञानात वाढ होत होती. भक्तिभाव लोप पावत चालला होता. धर्मशास्त्रातील संकुचित कल्पना खूप मोठ्याा प्रमाणात वाढीस लागल्या होत्या. चमत्कारांचे पीक आले होते. महंत, गोसाव्यांच्या वर्तनांमध्ये उघडपणे दोष दिसत होते. स्वार्थातून सामान्य लोकांची फसवणूक होत होती. विशेषत: बहामनीच्या विभाजनानंतर

सर्वत्र मुस्लिम राजवट निर्माण झाली होती. कोणालाही राज्य करायचे असेल तर एत्तदेशीय लोकांचे सहाय्य गरजेचे होते. त्यामुळे सूफींच्या मदतीने मानसिक पातळीवर लोकांना आपलेसे करून घेण्यात राज्यकर्ते यशस्वी ठरले होते. मंदिरांच्या जागी मशिदी उभ्या करणे, मंदिरे-मठांचा ताबा घेणे, मूर्तीचा विध्वंस करणे इत्यादी घटना राजरोजपणे घडत होत्या. असे असूनसुद्धा आपापसातील धार्मिक वैर कसे कमी होईल यासाठी जाणती मंडळी लक्ष देत होती.

तत्कालीन वाङ्मय परिस्थितीही कमालीची विसंगत होती. तत्कालीन धर्माधिष्ठित वाङ्मयाने शूद्रांना मोक्षप्राप्तीपासून दूर ठेवले होते. धर्मग्रंथांच्या पठणापासून अलिप्त ठेवले होते. धर्मग्रंथांवर एकाच समाजाची मक्तेदारी राहिली होती. तत्कालीन उच्चभ्रूवर्गाचे आचरण धर्मतत्त्वांशी विसंगत स्वरूपाचे होऊन तत्कालीन राजसत्तेचे ते पाईक झाले होते. बहुजनवर्गाला भौतिक प्रगतीपासूनही वंचित ठेवले गेले होते. त्यामुळे महाराष्ट्राचे खूप मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर उदारमतवादी विचारांची गरज होती. ती गरज एकनाथांच्या कार्यकर्तृत्वाने पूर्ण झाली.

या काळातील साहित्यविषयक दृष्टिकोनाचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. वारकरी संप्रदायातील विविध संतकवींनी आपापल्या साहित्यातून व्यावसायिक रूपकांना आध्यात्माचे आवरण चढवले होते. आपल्या भक्तीच्या कल्पना त्यात ओतल्या होत्या. संस्कृतऐवजी लोकभाषेचा वापर करत मराठी भाषेला समृद्धता आणली होती. परमेश्वरोपासनेचा एक भाग म्हणून ते आपल्या साहित्याकडे पाहत होते. यश अथवा कीर्तीची कोणतीही अपेक्षा न करता त्यांनी आपली काव्यरचना केली होती. त्यातून त्यांचा निरपेक्षभाव दिसून येतो. त्यामुळे त्यांच्या काव्यात परमार्थालाच अधिक महत्त्व असलेले दिसून येते. ते आपल्या लेखणीचे श्रेय परमेश्वराला देऊ पाहतात. या सर्वांचा विचार एकनाथांचे कार्यकर्तृत्व अभ्यासतांना करावा लागतो.

**१.२ एकनाथांचा परिचय :**

मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील प्रमुख संत-कवींमधील एक कवी म्हणजे एकनाथ स्वामी होत. संत बहेणाबाई जेव्हा आपल्या अभंगामध्ये एकनाथांच्याविषयी 'जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।' असा गौरवास्पद उल्लेख करतात; तो उल्लेखच एकनाथ स्वामींचे वाङ्मयातील स्थान अधोरेखित करणारा ठरतो. एकनाथांनी ज्या पद्धतीने आख्यान रचना आणि लोकशैलीतील भारुडे, गौळणींची रचना केली. त्याचा विचार करता ते सर्वार्थाने इतर वेगळे संतकवी होते हे सहज ध्यानात येण्यासारखे आहे.

एकनाथांनी आपल्या जीवनचरित्राविषयी मौन बाळगलेले दिसून येते. शके १६७२ मध्ये केशवस्वामींनी देवगडावर लिहिलेले ३१ अध्यायांचे चरित्र हे एकनाथांचे पहिले चरित्र मानले जाते. त्यानंतर महिपतिबुवा ताहराबादकर यांनी आपल्या 'भक्तविजय' या ग्रंथात दोन अध्यायांत आणि 'भक्तलीलामृत' या ग्रंथात बारा अध्यायांत त्यांचे चरित्र लिहिलेले दिसून येते. त्यांनतर श्रीकृष्णदास जगदानंदनंदन या कवीनेही 'प्रतिष्ठान चरित्र' लिहिलेले असून त्यात ११ अध्याय व ११३० ओव्यांमध्ये एकनाथांचे चरित्र रचलेले आहे. याचा लेखनकाळ हा शके १६२० सांगितला जातो. या सर्व ग्रंथांतून एकनाथांच्या जीवनकार्यावर स्थूलमानाने प्रकाश पडलेला दिसून येतो. एकनाथांचे लौकिक आणि पारमार्थिक जीवन हे कसे उजळून निघाले होते हे ध्यानात येते. खरे तर मध्ययुगीन

कालखंडामधील लिहिली गेलेली सर्वच चरित्रे ही ऐतिहासिकतेच्या जवळ जाण्यापेक्षा पौराणिकतेच्या जवळ अधिक जातात. कारण त्यांची लेखनशैली हीच मुळात पौराणिक वाङ्मयाशी जवळीक साधणारी होती. त्यांना एकनाथांची चरित्रेदेखील अपवाद असण्याचे कारण नाही. तरीदेखील एकनाथांच्या जीवनचरित्राचा ओझरता आलेख त्यातून प्रतिबिंबित झालेला पाहावयास मिळतो.

एकनाथांचा जन्म हा संत भानुदासांच्या कुळात शके १४५५ मध्ये म्हणजे इ. स. १५३३ मध्ये झाला. ते संत भानुदास यांचे पणतू होते. त्यांच्या आईचे नाव रुक्मिणी तर वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. आई-वडिलांच्या निधनानंतर त्यांचे संगोपन आजोबा चक्रपाणी यांनी केले. एकनाथांच्या घराण्यातील पितृपरंपरा ही भानुदास-चक्रपाणी-सूर्यनारायण-एकनाथ अशी सांगता येते. नाथांचा जन्म हा मूळ नक्षत्रावर झाला होता. त्यामुळे ते नक्षत्र आपल्या मातापित्याच्या मुळावर आले, अशी त्यांची धारणा झाली होती. मुंज झाल्यानंतर ते देवगिरी किल्ल्यावरील जनार्दनस्वामींच्या भेटीला गेले. तेथेच त्यांच्या सहवासात आणि मार्गदर्शनाखाली 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांचे अध्ययन केले. श्रीजनार्दनस्वामी यांनी त्यांना 'ज्ञानेश्वरी'तील शिकवण व विठ्ठलोपासना यांवर अधिक भर द्यावा, असे सांगितले. कालांतराने त्यांचा विवाह गिरिजा नामक स्त्रीशी झाला. ती देवगिरी येथील त्रिविक्रमशास्त्री यांची मुलगी होती. विवाहोत्तर जीवनात एकनाथांना हरिपंडित नावाचा मुलगा आणि गोदा व गंगा नावाच्या मुली झाल्या. त्यांच्या दैनंदिन जगण्यात भजन, पूजा, पुराणपठण, संध्यावंदन, हरिकीर्तन इत्यादी बाबींचा समावेश होता. एकनाथ लोकजागरासाठी मराठी भाषेचा वापर करीत असत. कीर्तनाच्या माध्यमातून ते हे सर्व करीत असत. लौकिक आणि पारलौकिक जीवन अत्यंत कृतार्थतेने जगल्यानंतर फाल्गुन वद्य षष्ठी शके १५२१ (सन १५९९) ला पैठण क्षेत्री त्यांचे देहावसान झाले.

### १.३ एकनाथांची गुरुपरंपरा :

एकनाथांच्या गुरुपरंपरेची नोंद घेतांना अनेकदा परंपरागत समजुतींचा विचार करावा लागतो. त्यात नारायण-अत्री-दत्तात्रेय-जनार्दन-एकनाथ अशी एक परंपरा सांगितली जाते. वा. सी. बेंद्रे यांनी अलीकडच्या काळात एकनाथांच्या गुरुपरंपरेच्या संदर्भात नवीन परंपरा सांगितली आहे. त्यांच्या मते सय्यद महंमद गौस कादिरी-राजे महंमद-सय्यद चांदसाहेब कादिरी या परंपरेत दोन प्रमुख शिष्य. एक शेख महंमद व दुसरे जनार्दन. नाथ व जनार्दनस्वामी यांना दत्ताचे मलंगवेषातील दर्शन, एकनाथशिष्य मुकुंदराज, नाथांचे पणतू शिवरामस्वामी कल्याणीवर, गोपाळनाथ व गंगानाथ व गंगानाथ मठातील परंपरा याच पद्धतीने माहिती देते. तेव्हा नाथांची गुरुपरंपरा साक्षात दत्तात्रेय-जनार्दन अशी नसून, ती सूफी सांप्रदायिक चांदबोधल्यांची आहे असे नवे संशोधन आहे. डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे यांनीदेखील ही परंपरा मान्य केलेली आहे. चांदबोधले हे मूळचे चंद्रभट ब्राह्मण असून कालांतराने ते सूफी सांप्रदायिक झाले असे ते म्हणतात. ब. श्री. देशपांडे आणि शं. दा. पेंडसे यांनी मात्र एकनाथमान्य परंपरेंचेच समर्थन केलेले आहे. एवढे असले तरी त्यांना वंशपरंपरा होती, हे कोणत्याही परिस्थितीत मान्य करावे लागते.

### १.४ एकनाथांचे लेखनकार्य :

एकनाथांच्या लेखनकार्याचे चार प्रकारात वर्गीकरण करता येते. सर्व प्रथम त्यांनी ज्ञानेश्वरीची शुद्ध

स्वरूपाची संशोधित प्रत तयार केली आणि ती जनमानसासमोर आणली. या लेखनासाठी साक्षात संत ज्ञानेश्वरांनीच प्रेरणा दिली असे ते मानतात. ''श्री ज्ञानदेवें येऊनी स्वप्नांत। सांगितली मात मजलागीं'' असे ते स्वत:च सांगतात. त्याचबरोबर सन १५८४ मध्ये आळंदीस जाऊन संत ज्ञानेश्वरांच्या समाधीचा जीर्णोद्धारही केला. सर्वसामान्य लोकांना चरित्रकथांची गोडी लागावी यासाठी त्यांनी विविध स्वरूपाची आख्यानकाव्ये व इतर काव्येही लिहिली. त्यात 'चतु:श्लोकी भागवत', 'एकादश स्कंधावरील टीका' (एकनाथी भागवत), 'भावार्थ रामायण', 'रुक्मिणी स्वयंवर', 'हस्तामलकटीका', 'शुकाष्टकटीका', 'आत्मबोध', 'चिरंजीवपद', 'आनंदलहरी', 'अनुभवानंद', 'मुद्राविलास', 'लघुगीता' अशी काही लहान-लहान प्रकरणे, त्याचबरोबर लहानमोठी आध्यात्मिक प्रकरणे, संतचरित्रे, गौळणी, आरत्या, अर्जदस्त प्रकरण इत्यादींचा समावेश करता येतो. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे त्यांनी चार हजारांपर्यंत अभंगरचना लिहिली. चौथी म्हणजे विनोदी स्वरूपाची भारुडे आणि गौळणींची रचनाही केली. असे विपूल स्वरूपाचे लेखन एकनाथांच्या नावावर आहे.

### १.५ आख्यान काव्य म्हणजे काय? :

आख्यानकाव्य म्हणजे कथाकाव्य होय. यामध्ये महाकाव्य, खंडकाव्य यांसारख्या काव्यांचा समावेश होतो. रामायण, महाभारत आणि भागवतग्रंथातील अनेक कथा या आख्यानकाव्याच्या रूपाने मराठीमध्ये लिहिल्या गेलेल्या पाहावयास मिळतात. किंबहुना वरील ग्रंथांनाही आख्यानकाव्याचा दर्जा देण्यात आलेला दिसतो. मध्ययुगीन मराठी साहित्यात खूप मोठ्या प्रमाणात आख्यानकाव्यांची रचना झालेली दिसून येते. विशेषत: रूक्मिणीविवाहाची कथा ही खूप कवींच्या आख्यानकाव्याचा विषय ठरलेली आहे. आख्यानकाव्याची रचना ही संमिश्र स्वरूपाची असते. अत्यंत भक्तिभावाने रसाळ कथानिवेदन करणे हा या काव्याचा मुख्य हेतू असतो. भोवतालच्या समाजाला भक्ती, ज्ञान इत्यादीची शिकवण देणे हे या काव्याचे लेखनप्रयोजन असावे. आख्यानकाव्यावर कीर्तनासारख्या कथनपरंपरेचाही प्रभाव असलेला पाहावयास मिळतो. आख्यानकाव्याच्या रचना विशेषाविषयी निशिकांत ठकार आपल्या 'मराठी कविता' या ग्रंथात लिहितात, ''याप्रमाणे कीर्तनपरंपरेशी निगडित असलेल्या मराठी आख्यान-काव्यात अध्यात्म, भक्ती, कथात्मकता व काव्यात्मकता यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी बनलेले कांही साचेबंद पोत तयार झाले.'' (कुलकर्णी, १९९२:२२) ठकारांच्या आख्यानकाव्यविषयक विचारांचा संदर्भ आपल्याला एकनाथांच्या चतु:श्लोकी भागवत, एकादशस्कंधटीका आणि भावार्थ रामायण या ग्रंथांच्या अनुषंगाने करावयाचा आहे. विशेष म्हणजे स्वत: एकनाथ हे कीर्तनकार आणि पुराण निरुपणकार असल्यामुळेच कदाचित त्यांच्या हातून या तीन ग्रंथांची महत्त्वपूर्ण रचना झाल्याचे आढळून येते.

### १.६ चतु:श्लोकी भागवत :

एकनाथांनी आपल्या लेखनाची सुरुवात ज्या ग्रंथाने केली तो ग्रंथ म्हणजे 'चतु:श्लोकी भागवत' ग्रंथ होय. त्यांच्या चरित्रातील माहितीवरून असे दिसून येते की, जनार्दनस्वामी यांच्याकडे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गुरुंसमवेत तीर्थयात्रेला सुरुवात केली. प्रवासात त्यांना चंद्रभट नावाच्या व्यक्तीकडे मुक्काम करण्याचा योग आला. त्या कालावधीत चंद्रभटाने ज्या पद्धतीने 'चतु:श्लोकी भागवता'वर निरुपण केले. ते निरुपण जनार्दनस्वामी यांना खूप भावले. त्यानंतर त्यांनी एकनाथांना या ग्रंथावर भाष्य करण्याची आज्ञा केली. गुरूंच्या आज्ञेचं पालन करीत

एकनाथांनी वयाच्या बाविसाव्या वर्षी त्र्यंबकेश्वर याठिकाणी 'चतु:श्लोकी भागवत' या ग्रंथाची रचना केली. आपल्या तीर्थयात्रेत त्यांनी विविध तीर्थांचे दर्शन घेतले. तेथील लोकजीवनांचे सूक्ष्म निरीक्षण केले. यात्रिकांच्या यात्रापद्धती पाहिल्या आणि त्यांच्या गुणदोषांवर प्रस्तुत ग्रंथातून टीकाही केली.

या ग्रंथामध्ये भागवतच्या दुसऱ्या स्कंधातील नवव्या अध्यायाच्या पंचेचाळीस श्लोकांवर टीका आहे. या ग्रंथाची एकूण ओवीसंख्या ही १०३६ इतकी आहे. ग्रंथातील ओवी ही साडेचार चरणी आहे. एकनाथांनी या टीकाग्रंथाच्या प्रारंभी आणि शेवटी 'चतु:श्लोकी' या शब्दाचा उल्लेख केलेला आहे. भगवंताने ब्रह्मदेवाला केवळ चार श्लोकांमध्ये आत्मज्ञानाचा उपदेश केलेला आहे, अशी समजूत आहे. त्यामुळेच या टीकाग्रंथाला 'चतु:श्लोकी भागवत' हे नाव मिळालेले असावे, असे मानले जाते.

गुरूंच्या आज्ञेनेच एकनाथांनी या ग्रंथाची रचना केलेली आहे. त्यात त्यांनी गुरुमहिमा वर्णन केलेला आहे. स्वत:ला मिळालेल्या सर्व ज्ञानाचे श्रेय ते आपले गुरू श्री जनार्दनस्वामी यांना देतात. ग्रंथाच्या सुरुवातीला त्यांनी परंपरेप्रमाणे गणेशाला आणि शारदेला वंदन केलेले आहे. त्यांनी आपल्या या ग्रंथामध्ये भगवंतापेक्षाही गुरूला खूप महत्त्व दिलेले दिसून येते. ब्रह्मदेवालाही गुरुकृपेनेच साक्षात्कार होतो. त्यामुळे परमेश्वरापेक्षा गुरूचे महत्त्व हे अधिक असते, असे आग्रही मत ते नोंदवतात. मोहमायेतून सुटावयाचे असेल तर नित्यनेमाने गुरुभजन करावे, असे ते म्हणतात. आपल्याला मिळालेल्या सर्व यशाचे श्रेय ते गुरूंना देतात. गुरू म्हणजे साधकाला परमेश्वरापर्यंत घेऊन जाणारे माध्यम आहे. गुरूकडे जी दृष्टी असते; ती अन्य कोणाकडेही नसते. त्यामुळे गुरूचे स्थान हे निर्विवाद असते, असे त्यांचे मत आहे. या ग्रंथामध्ये एकनाथांनी ब्रह्मदेव-नारद-शुक-परीक्षित अशी उपदेशाची परंपरा नोंदवली आहे. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी वेळोवळी गुरुमाहात्म्य सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

एकनाथांनी या ग्रंथामध्ये गुरुमाहात्म्याबरोबरच अन्य विषयही हाताळलेले दिसून येतात. त्यात ज्ञानविज्ञान, अन्वयव्यतिरेकाचा समावेश आहे. सृष्टी निर्माण करूनसुद्धा आपण अकर्ते कसे राहतो हे भगवंतांनी आत्मविद्येच्या आधारे ब्रह्मदेवास सांगितलेले आहे. अन्वयभक्ती हा भक्तीमार्गातील श्रेष्ठ आणि महत्त्वाचा असा प्रकार आहे. विश्व म्हणजेच भगवंत आहे, यालाच ते अन्वयभक्ती म्हणतात. त्याचबरोबर मिथत्वाच्या आधारे व्यतिरेकाचाही उल्लेख केलेला आहे. यासाठी ते अलंकार म्हणजेच सोने होय असा दाखला देतात. याबरोबरच त्यांनी विज्ञानाचा आणि ज्ञानाचाही संबंध जोडलेला आहे. यातील योगसंदर्भावर भगवद्गीतेचा प्रभाव आहे. परमेश्वराला समजून घेण्याचा प्रयत्न हा निरर्थक आहे, असे ते म्हणतात. यासाठी ते गुरुभक्तीला महत्त्व देतात. आत्मज्ञान हे सत्य असून माया ही मिथ्या आहे. याचे तात्त्विक वर्णनही केलेले आहे. यासाठी ते विविध दृष्टांतही देतात. त्यासाठी ते स्वतंत्र वर्णनशैलीचाही वापर करतात. शब्दज्ञान व्यर्थ आहे हे सांगताना ते लिहितात,

''सत्य कापुसाची वस्त्रें होती। परी कापूस नेसतां नागवे दिसती।
तेंवीं शब्दविज्ञानस्थिती। त्या शाब्दिकां अंतीं अपरोक्ष कैचें।
चाटु नाना मधुर रस वाढी। परी चाटु खातां न लभे गोडी।
तेंवी शब्दें स्वानंद जोडी। चवी चोखडी शब्दीं नाहीं।।'' (५७३-७४)

असे अनेक व्यवहारातील दृष्टांत त्यांनी दिलेले आहेत. नाथांच्या चतु:श्लोकी भागवतावर ज्ञानेश्वरी, अमृतानुभव आणि चांगदेवपासष्टी या तिन्ही ग्रंथांचा प्रभाव पडलेला पाहावयास मिळतो. कालांतराने एकनाथी भागवताला जे प्रचंड यश मिळालेले आहे; त्याची बीजे ही चतु:श्लोकी भागवताच्या रचनेत असलेली दिसून येतात.

**१.७ एकादशस्कंधटीका (एकनाथी भागवत) :**

एकनाथांच्या लेखनकार्यातील सर्वात महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'एकादशस्कंधटीका' हा होय. या ग्रंथातून एकनाथांचे तत्त्वज्ञान आणि विचार प्रकट झालेले पाहावयास मिळतात. हा टीकाग्रंथ असून 'एकनाथी भागवत' किंवा 'नाथभागवत' या नावानेही प्रसिद्ध झालेला आहे. श्रीजनार्दनस्वामी यांच्याकडून दत्तसंप्रदायाचा वारसा आला असला तरी कालांतराने त्यांचा संबंध एकादशस्कंधाशी जडला आणि त्यातून हा टीकाग्रंथ शब्दबद्ध झालेला दिसून येतो. त्यांच्या भोवतलाच्या संतमंडळींनी एकान्तात आणि लोकान्तातही त्यांच्याकडे ग्रंथ लिहिण्याचा आग्रह धरला. त्यातून कोणता ग्रंथ लिहू? असा प्रश्न जेव्हा एकनाथांनी केला. त्यावर संतजनांनी ''पुराणीं श्रेष्ठ भागवत। त्याहीमाजी उद्धवगीता। तुवां प्रवर्तावें तेथ। वक्ता भगवंत तुज साह्या।।'' (१.५९) असे उत्तर दिले. प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये खुद्द एकनाथांनी याचा उल्लेख केलेला दिसून येतो. एकादशस्कंधटीकेमध्ये श्रीकृष्ण आणि उद्धव यांच्यात झालेला संवाद अनुभवास येतो. अद्वैत आणि भक्ती यांचे माहात्म्यच श्रीकृष्णमुखाने एकनाथांनी यामध्ये वर्णन केलेले दिसून येते. एकादशस्कंधटीकेत एकूण ३१ अध्याय असून १३६७ श्लोक आहेत. या ग्रंथात साडेचार चरणी ओवी उपयोजिली असून वीस हजार ओव्यांमध्ये हा ग्रंथ बद्ध झालेला आहे. या ग्रंथाची पूर्णता वाराणसी येथे विक्रमशक १६३०, वृष संवत्सर, या वर्षी कार्तिक शुद्ध पौर्णिमेस सोमवारी झाली. त्यावेळी दक्षिणेकडे पैठणमध्ये शालिवाहन शक रूढ होता. त्यानुसार शके १४९५, श्रीमुख संवत्सरी, हा ग्रंथ पूर्ण झाला असाही उल्लेख त्यांनी केला आहे. भागवताच्या पाच अध्यायावरील टीका जेव्हा पूर्ण झाली तेव्हा एकनाथांचे गुरू श्रीजनार्दनस्वामीही संतुष्ट झाले. या ग्रंथाचे फलित म्हणून मुमुक्षू, साधक संतुष्ट होऊन हरिभक्त होतील असे सांगितले आहे.

या ग्रंथाला सहजासहजी समाजमान्यता मिळालेली दिसून येत नाही. संस्कृतमधील ब्रह्मविद्या ही प्राकृतमध्ये आणण्यास तत्कालीन विद्वानांचा विरोध होता. तेव्हा 'प्राकृत काय चोरांपासूनि झाली?' असा प्रश्न करुन एकनाथांनी आपला ग्रंथ प्राकृतमधून लिहिला. या ग्रंथाच्या लेखनाची सुरुवात पैठण येथे झाली असली तरी समाप्ती वाराणसी येथे झाली. वाराणसी येथे या ग्रंथाची हत्तीवरून मिरवणूक काढली गेली, अशी आख्यायिका सांगण्यात येते. आपण पुन: पुन्हा मराठीचा पुरस्कार करीत आहोत, असे ते अत्यंत विनयाने या ग्रंथात सांगू इच्छितात. मराठी भाषेविषयीचा सार्थ अभिमान एकनाथ याही ग्रंथात प्रकट करतात. यावेळी श्रोत्यांना त्यांनी ''ग्रंथु मराठी देखोन। उपेक्षा न करिता करावा रत्न। पारखोनि चिद्रत्न साधावया।'' अशी विनवनी केलेली आहे. हा ग्रंथ म्हणजे पूर्णत: गुरुकृपेचे फळ आहे, असे नाथ प्रामाणिकपणे नमूद करतात.

ग्रंथाच्या प्रारंभीच त्यांनी १७५ ओव्यांचे प्रास्ताविक लिहून गुरू श्रीजनार्दनस्वामी, गणेश आणि शारदा या देवता यांना वंदन केलेले आहे. श्रोत्यांची स्तुतीही केलेली आहे. नाथ या ग्रंथाच्या वाचनाने श्रीरामाशी प्रीती जडेल असे सांगू पाहतात. या ग्रंथाच्या प्रास्ताविकात त्यांनी समन्वयवादी भूमिका घेऊन व्यासांबरोबर वाल्मीकी, श्रीकृष्णाबरोबर श्रीरामाचाही उल्लेख केलेला आहे हे विशेष होय. आपल्या पूर्वजांविषयी ऋण व्यक्त करीत भागवताची निर्मिती कशी झाली हे सांगून प्रास्ताविक संपवतात.

ग्रंथातील प्रत्येक अध्यायाला स्वतंत्र प्रास्ताविक आणि स्वतंत्र उपसंहार एकनाथांनी लिहिलेला आहे. त्यांनी वेळोवेळी गुरू श्रीजनार्दनस्वामी यांना वंदन केलेले आहे. ग्रंथलेखनात त्यांनी गुरू आणि ईश्वर हे दोन्हीही एकरूप असल्याचे सांगून अद्वैतवादी भूमिका घेतलेली आहे.

एकनाथांनी आपली एकादशस्कंधटीका ही सरळपणे भागवतातील श्लोकांवर लिहिलेली आहे. त्यात सुबोधपणे श्लोकांचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. काही वेळा भागवताच्या इतर संदर्भांचाही विवेचनासाठी आधार घेतलेला आहे. ग्रंथाच्या अखेरीस आपण कोणकोणते विषय हाताळले आहेत, हे ते रूपकाच्या आधारे सांगतात. प्रत्येक अध्यायाच्या उपसंहारात पुढील अध्यायातील विषय सांगितलेला आहे. जेणे करून श्रोत्यांनी आपले अवधान टिकवून ठेवावे. हे एक प्रकारचे आवाहनच म्हणता येईल. आपल्या विवेचनातील प्रतिपाद्य विषय ते उपमा उत्प्रेक्षा इत्यादी अलकांरांच्या आधारे विस्तृतपणे चित्रित करतात.

ब्रह्म, माया, ईश्वर, त्रिगुण, शुद्धसत्त्व, अविद्या, प्रपंच, स्त्रीमोहाचे दुष्करत्व, सत्संगाचे महत्त्व, भक्तीचे प्रकार, भक्तांचे प्रकार, गुरुभक्तीचे महत्त्व, गुरूची लक्षणे, शिष्याची लक्षणे, कर्म, कामाचे प्रकार, प्रारब्धभोग, ज्ञान, ज्ञानाचे प्रकार, विज्ञान, यमनियम, सिद्धीचे वर्णन, चार वर्ण ब्राम्हण, क्षेत्रीय, वैश्य, शूद्र चार आश्रम–गृहस्थाश्रम, संन्यासाश्रम, बृम्हचर्याश्रम, वानप्रस्थाश्रम, वैराग्याचे महत्त्व, मोक्षाचे स्वरूप, वैकुंठाचे वर्णन असे नाना विषय येथे आलेले आहेत आणि ते सारे एकनाथांनी त्या त्या ठिकाणी स्पष्ट केलेले आहेत. अद्वैत, भक्ती, सद्गुरूचे महत्त्व, सत्संगाचा महिमा, वैराग्याची आवश्यकता, असे काही विषय येथे महत्त्वाचे आहेत असे म्हणता येईल. एकनाथांच्या टीकेतही या विषयांनाच महत्त्व आलेले आहे, त्यांचाच विस्तार झाला आहे असे आढळते; किंबहुना हे विषय महत्त्वाचे आहेत म्हणूनच त्यांनी या ग्रंथाची टीका लिहिण्यासाठी निवड केली असावी असे म्हणण्यास हरकत नाही.

वर्णधर्मपालनात लवचिकपणा आणावा लागतो. देशकालमान पाहून वर्णधर्मपालनाचे नियम ठरवावे लागतात, हे नाथांनी या ग्रंथात स्पष्ट केले आहे. परमार्थात निरपेक्षवृत्ती महत्त्वाची आहे, हेही नाथ अनेक ठिकाणी सांगतात. भक्ती ही भागवतधर्माचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. भक्ती हा मोक्षप्राप्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. ज्ञानी, कर्मयोगी, वैदिक, शास्त्रीपंडित, हठयोगी या सर्वांपेक्षा भगवंताला भक्त फार आवडतो. भक्ती हे सर्वश्रेष्ठ मूल्य कसे आहे हे नाथांनी आपल्या भागवतटीकेतून दाखवून दिले आहे. नाथांची भक्तीची कल्पना अतिशय व्यापक स्वरूपाची आहे. यातूनच त्यांच्या भागवतधर्माचे स्वरूप कळून येते. त्यांनी भक्तीबरोबरच वैराग्याला महत्त्व दिले होते. हरिकथा कोणत्याही भाषेत सांगितली तरी ती उत्तमच असते. तेथे भाषेचा अभिमान हा व्यर्थ असतो, असे ते म्हणतात.

या ग्रंथात विविध विषय हाताळल्यामुळे त्याचा एकरूप असा परिणाम होत नाही. मूळ भागवतापेक्षा हा ग्रंथ विस्ताराने मोठा झालेला आहे. त्यामुळे त्यात विस्कळीतपणा जाणवतो. मूळ भागवतात नसणारे अनेक विषय एकनाथांनी हाताळलेले आहे. अद्वैत, भक्ती आणि श्रीकृष्णलीला यांचे विस्ताराने वर्णन केले आहे. त्यामुळे पाल्हाळीकपणाचा दोष या ग्रंथाला लागतो. तरीदेखील एक महत्त्वूपर्ण ग्रंथ म्हणून या ग्रंथाचे नाव घ्यावे लागते.

### १.८ एकादशस्कंधटीकेचे विशेष :

एकनाथांच्या लेखनशैली, वर्णनशैली आणि विवेचनशैलीचा विचार केला तर असे दिसून येते की, हे विवेचन करण्यासाठी शब्दांमुळे एकनाथ कुठेही अडलेले नाहीत. मायेचा मिथ्यपणा, प्रपंचातील नश्वरता आणि भक्ताची समर्पणशीलता यांसाठी ते अतिशय सुलभपणे भाषेचा वापर करतात. एकादशस्कंधटीकेतील अनेक अध्यायांमध्ये कथा येतात. त्यामुळे त्यात कथनता येते, संवादात्मकताही येते. उदा. कपिलदेवहूती संवाद, अवधूतांच्या चोवी गुरूंचे वर्णन इत्यादी. आपला आध्यात्मिक विचार स्पष्ट करतांना ते अनेक दृष्टांताचा वापर करतात. श्रोत्यांना खिळवून ठेवण्यात ते आग्रही आहेत. त्यामुळे अनेकदा पुनरुक्तीचा दोष स्वीकारतात. परंतु या सर्व बाबी सहजतेतून घडताना दिसतात. विविध रूपकांचा वापर करणे हा एकनाथांच्या लेखनशैलीचा विशेष आहे. त्या रूपकांमध्ये अधिकची सूक्ष्मता असते. अशी रूपके ठिकठिकाणी पाहायला मिळतात. टीकाग्रंथांच्या सर्व अध्यायांच्या प्रास्ताविकामध्ये श्रीजनार्दनस्वामी यांना जे वंदन केले आहे; त्यात रूपकांची रेलचेल दिसून येते. कुठे शंकर तर कुठे विष्णू म्हणून गुरूंचे वर्णन केलेले आहे. या सर्वांमधून एक प्रकारचा अध्यात्मविचार सांगण्याचा त्यांचा प्रयत्न असलेला दिसतो. महामेरू, क्षीरसागर अशी रूपके निसर्गातून तर ज्योतिषी, धन्वंतरी ही व्यावसायातील त्यांनी गुरूंसाठी उपयोजिली आहेत. अत्यंत सरस आणि मनोहर अशी लोकप्रिय भाषाशैली त्यांनी उपयोगात आणलेली दिसते. हा ग्रंथ लोकप्रिय होण्यासाठी भक्तीचा पुरस्कार आणि वेदान्ताचे सुलभीकरण जितके कारणीभूत ठरले; तितकीच एकनाथांची एकूण वाङ्मयीन शैलीही सहायक ठरली, असे म्हणता येईल.

### १.९ भावार्थ रामायण :

एकनाथांच्या आयुष्यातील शेवटची रचना म्हणजे 'भावार्थ रामायण' हा ग्रंथ होय. या सप्तकांडात्मक ग्रंथात सुमारे ४०,००० ओव्या आहेत. पहिली पाच कांडे आणि सहाव्या कांडातील ४४ अध्याय लिहून झाल्यानंतर इ. स. १५९९ मध्ये नाथांचे निधन झाले. म्हणजेच त्यांच्या हयातीत सुमारे २५००० ओव्या लिहिल्या गेल्या. सहाव्या कांडाचे उरलेले ४८ अध्याय आणि शेवटचे सातवे कांड हा सारा उर्वरित कथाभाग नाथांचा एकनिष्ठ शिष्य गावबा याने लिहून पूर्ण केला. गुरूशी एकरूप होऊन त्यांची कथा बेमालूम सांधा जुळवून पूर्ण करणारा गावबासारखा शिष्य लाभल्यामुळे भावार्थरामायण हा ग्रंथ पूर्णत्वाला गेला.

या ग्रंथाविषयी वि. ल. भावे लिहितात, ''संत एकनाथांनी आपल्या उत्तरवयात 'भावार्थ रामायण' लिहिण्याचा उपक्रम केला. हे कोणत्याही एका संस्कृत ग्रंथाचे भाषांतर नसून अनेक ठिकाणच्या गोड गोष्टी घेऊन रचिलेले स्वतंत्र असे 'रामचरित्र' आहे. यात एकोपंतानें त्या काळच्या सर्व लोकांना कित्त्यादाखल व नित्य मनन करण्यास योग्य असा एक रामचंद्र आपल्या कल्पनेच्या डोळ्यांपुढे उभा करून त्याचे चित्र आपल्या लेखणींने काढिले आहे, हे या ग्रंथांतल्या अनेक ठिकाणांवरून कोणाच्याही लक्षात येईल.'' (भावे : १९८२,२०६) वि. ल. भावेंचे हे विवेचन अतिशय मार्मिक आहे. कारण वाल्मीकिरामायणामध्ये नसणाऱ्या अनेक गोष्टी भावार्थरामायणामध्ये येऊन जातात. याचा दुसरा अर्थ लोकमानसात रूढ असणाऱ्या राम-सीता यांच्या विषयीच्या प्रतिमांचा विचार त्यांनी भावार्थ रामायणाच्या घडणीमध्ये केलेला दिसून येतो. परंतु टीकाग्रंथ असूनदेखील लोकमानसातील विविध धारणांचा सांगोपांग विचार श्री भावार्थरामायणाच्या निर्मितिप्रक्रियेमध्ये त्यांनी केलेला जाणवतो.

या ग्रंथाचे स्वरूप एखाद्या पुराणासारखे असलेले जाणवते. एकनाथांच्या या ग्रंथावर आनंदरामायण, अध्यात्मरामायण, हनुमन्नाटक, योगवासिष्ठ इत्यादी ग्रंथाचा प्रभाव असलेला जाणवतो. अरण्यकांडामध्ये त्यांनी आपणाला माहीत असलेल्या रामायणांची यादीच दिलेली आहे. त्याशिवाय अनेक ठिकाणी मूळ संदर्भ देण्याचा प्रयत्नही केलेला आहे. प्रसंगपरत्वे त्यांनी अनेक ठिकाणी स्वतंत्र प्रसंगनिर्मितीही केलेली पाहावयास मिळते. एकनाथांचा राम हा रामायणातील दशरथपुत्र राम नसून अवतारी पुरुष राम आहे. त्यांनी हे काव्य एखाद्या भक्ताच्या भूमिकेतून लिहावे तसे लिहिले आहे. सदर काव्यलेखनामागील ईश्वरीप्रेरणाही त्यांनी स्पष्टपणे सांगितली आहे.

'भावार्थ रामायणा'त तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. अत्यंत रसाळ आणि सुबोध पातळीवर त्यांनी रामायणात रंग भरण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. दशरथ कौसल्येला तिचे डोहाळे विचारण्याकरिता येतो व बोलण्याच्या ओघात रावणाचे नाव निघते, तेव्हा कौसल्येने केलेले आवेशपूर्ण भाषण एकनाथांचा रामावतारविषयक दृष्टिकोण स्पष्ट करणारे आहे. ती म्हणते:

''नांव ऐकोनि रावण। म्हणे दे दे धनुष्यबाण
करूं लंकेचें निर्वाण। मारूं दारुण राक्षस।।
पाचारा वनींचे वनचर। मुकुट कुंडले द्या अलंकार
राज्य देवोनि धरा छत्र। वानर-भार चालवा।।
केउता गेला रे हनुमंत। अंगद सुग्रीव जांबवंत
अजुनी रावणाची मात। जगाआंत उरलीसे।।
अहो वज्रदेही निजगडा। पुच्छें घालूनियां वेढा।।
लंका जाळा रे भडभडा। पाडा तडतडा राक्षस।।''

आपल्या आध्यात्मिक परिभाषेत एकनाथांनी रामविवाहाच्या वेळेचे वर्णन केलेले आहे. हे वर्ण करीत असताना त्यांनी वेगवेगळ्याा देवतांचीही वर्णने केलेली आहेत. रामविवाहाच्या मंडपाचे आध्यात्मिक वर्णन करताना ते लिहितात,

''राम-विवाहा मंडप-स्तंभ। चारी वेद जाले स्वयंभ
आडवळे धैर्याचे सलंब। वास निर्कोभ विवेकाचे।।
वरी शाकार स्मृतिपुराणे। चारी पुरुषार्थ तोरणे
धर्मद्वारी शोभती तेणें। सलंबपणे मुक्तघोसीं।।
कन्यामंडपी स्तंभ भावाचे। आडवळे शुद्ध सत्त्वाचे
वरी शाकार विधीचे। सद्बुद्धीचे दारवंटे।।
कन्यागृही नवरस-प्रीती। वरगृही नवविध-भक्ती
कन्यागृही विधि-सर्वार्थी। विधिनामोक्ती वरगृही।।

सीता क्रिया राम कर्ता। सीता भोग्य राम भोक्ता

सीता ज्ञान राम ज्ञाता। एकात्मता अतिप्रीती।।''

समकालीन पार्श्वभूमीवर नाथांच्या रामायणाचे वेगळेपण उठून दिसते.

एकनाथांनी हा ग्रंथ का लिहिला? याबरोबरच ग्रंथेखनाचा हेतूही पाहणे अत्यंत गरजेचे आहे. परकीय आक्रमणामुळे प्राप्त झालेल्या पारतंत्र्याच्या काळात एकनाथकालीन महाराष्ट्राचे स्वरूपच पालटून गेले होते. या अवस्थेचे मार्मिक वर्णन करताना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात, ''ब्राह्मण, क्षत्रिय स्वधर्म भ्रष्ट झाले. यवनांची सेवा करू लागले. ब्राह्मण कारकून बनले. क्षत्रिय शूद्र बनले. तलवार टाकून त्यांनी नांगर हाती घेतला. वैश्य वर्ग लढाया, दुष्काळ, लूटमार यांनी पार नागवला गेलेला होता. शूद्रातिशूद्र आपण होऊन मुसलमान झाले..... देवळांच्या मशिदी झाल्या, पर्वत्यांचे पीर झाले. घाटांचे दर्गे बनले; आणि राउळांचे महाल झाले. काजी न्यायासनावर बसला. खाटिक बलुतेदार झाला. अग्निहोत्री पीरांचे मुजावर बनले. अशी सर्वत्र उलटापालट झाली. धर्म केवळ लोपून गेला. समाजजीवनाला सर्वांगाने व्यापू पाहणाऱ्या या पारतंत्र्याची बोच एकनाथांसारख्या द्रष्ट्या पुरुषाला लागून राहणे स्वाभाविक होते.''(इनामदार, जोशी, १९९०:२१,२२) याचा अर्थ धर्म लोप पावल्यामुळे समाजव्यवस्थेपुढे एक आदर्श निर्माण करण्यासाठीच त्यांनी भावार्थरामायणाची रचना केलेली दिसून येते. स्वकीयांनी गमावलेले सत्त्व आणि आदर्शाचा अभाव संपुष्टात आणण्यासाठी रामचरित्राशिवाय कोणताही पर्याय नाही, असे त्यांना वाटले असावे. त्यातूनच त्यांनी मर्यादापुरुषोत्तम रामाचे सगुण चरित्र रेखाटलेले दिसते. श्रीरामाच्या जीवनातील आदर्श, त्याची व्यापकता, समकाळातील त्याची आवाहकता या सर्व गोष्टीं एकनाथांनी ग्राह्य धरल्या असाव्यात. त्यातच एकनाथांनी कर्म, ज्ञान आणि उपासना यावरही भर दिला. वर्णाश्रमधर्म, कुलाचार इत्यादींनाही प्राधान्य दिले. त्यामुळे समाजात एकप्रकारचे चैतन्य निर्माण होईल झाले असे म्हणावयास कोणतीच हरकत नाही.

तत्कालीन कालखंडामध्ये भावार्थ रामायणाने सामाजिक आणि राष्ट्रीय जडणघडण केलेली दिसून येते. या संदर्भात प्रा. गं. बा. सरदार लिहितात, 'भावार्थ रामायणा'त व भागवतात एकनाथांनी आपल्या सांस्कृतिक मूल्यांचा व सामाजिक नीतीचा इतक्या व्यापक दृष्टीने परामर्श घेतला आहे की, त्याचे नुसते दिग्दर्शन करणे देखील अवघड आहे. शिवाजीसारख्या धर्मसंस्थापकाच्या कार्याला ज्या अलौकिक गुणांमुळे पुढे उठाव मिळाला, त्या गुणांची ओळख एकनाथांनी अगोदर महाराष्ट्राला करून दिली होती. हे दोघेही एकाच समाज रचनेतून निर्माण झाले होते. एकच धर्मजीवनाचा आदर्श मानीत होते. त्यामुळे त्यांचे कार्य बाह्यात: जरी भिन्न असले तरी त्यांच्या अंतरात्म्याची ठेवण अभिन्न होती. जीवित साफल्याची कल्पना एक होती.'' (इनामदार,जोशी,१९९०:२९ते३०)

एकूणच एकनाथांच्या 'भावार्थ रामायणा'ने समाजव्यवस्थेसमोर नवीन आदर्श निर्माण करून तत्कालीन युगाचे प्रातिनिधिक दर्शन घडविले आहे, असे म्हणता येईल.

**१.१० भारूड म्हणजे काय? :**

एकनाथांनी अत्यंत लोकप्रिय केलेला रचनाप्रकार म्हणजे भारूड होय. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता

जनसामान्यांचे प्रबोधन करीत करीत आध्यात्मिक विचार बिंबविण्यासाठी या रचनाप्रकाराचा स्वीकार त्यांनी केलेला दिसून येतो. मराठीमध्ये हा रचनाप्रकार तेराव्या शतकापासून उपलब्ध असला तरी हा रचनाप्रकार सर्वाधिक प्रमाणात उपयोगात आणण्याचे व प्रसिध्दिच्या शिखरावर पोहोचविण्याचे कार्य मात्र एकनाथांनी केलेले दिसून येते.

भारूड रचनाप्रकारासंदर्भात विविध अभ्यासकांनी आपापली मते नोंदवलेली आहेत. त्यात ल. रा. पांगारकरांनी लोकगीतांचे भारुडांशी एकरूपत्व मानून 'बहुरूढ ते भारूड' अशी व्युत्पत्ती सांगितली आहे. डॉ. ना. गो. नांदापूरकरांनी 'गारूड' व 'भारूड' यांत साम्य कल्पिले असून शिवाय भार+हाडू==भाराडू (समुदायासमोर म्हणावयाचे गीत), भा+आरूढ म्हणजे प्रतिभाधिष्ठित गीत, भारूड या द्विमुखी पक्षाप्रमाणे असणारे भारुडाचे व्यावहारिक व पारमार्थिक असे दोन अर्थ असतात म्हणून, भारूड, इत्यादी व्युत्पत्ती त्यांनी सुचविल्या आहेत. (जोशी,१९८२:३१) या विवेचनावरून 'भारूड' या शब्दाचा स्थूलमानाने होणारा अर्थ आणि विशेष आपणास कळून येतात.

भारुडांची रचना ही रूपकात्मक असते. त्यामुळे त्याचा अर्थ लावतांना अनेकदा काथ्याकूट करावा लागतो. परंतु असे असले तरी त्याची लोकप्रियता मात्र कमालीची असलेली दिसून येते. याचे गमक हे भारुडाच्या रचनेमध्ये दडलेले आहे. भारुडांमधून येणारे व्यंग, उपहास, अतिशयोक्ती, विनोद या सर्वांतून मनुष्य स्वभावावर बोट ठेवले जाते. यातच भारुडाची आवाहकताही दिसून येते. माणसाच्या व्यावहारिक जीवनातील लोभ, मत्सर, थट्टा, गर्व, मूर्खपणा इत्यादीं बाबींशी संबंधित असणारे विषय भारुडातून हाताळलेले दिसतात. त्यामुळे आजही समाजप्रबोधनासाठी भारुडे उपुयक्त ठरलेली दिसतात. विनोद आणि मिश्किलता हा भारुडाचा स्थायीभाव आहे. संतांनी भारुडांतून मानवी दोषांवर बोट ठेवत उद्‌बोधन वा प्रबोधन करण्याचे काम केलेले पाहावयास मिळते. त्यातून दुर्गुणांचा नायनाट व्हावा, हीच त्यांची माफक अपेक्षा होती.

### १.११ एकनाथांची भारुडे :

भारूड हा मनोरंजनप्रधान कलाप्रकार असला तरी एकनाथांची भारूडे मात्र केवळ मनोरंजनासाठी नव्हती. एकनाथांना बहुजन समाजाला भक्तीमार्गाकडे न्यायचे होते. अज्ञानी समाजाला शहाणे करून सोडण्यासाठी त्यांनी भारूडरचनेला प्राधान्य दिले. भारुडांच्या लेखनामागे एकनाथांची विविध प्रयोजने असलेली दिसून येतात. त्यात ब्रह्म हेच अंतिम सत्य, त्या ब्रह्माकडे जायचे असेल तर भक्तीमार्गाचा अवलंब करणे, भक्तीमार्गातील नाम:स्मरणाचा सहजसोपा मार्ग स्वीकारणे, त्यासाठी आपल्या शरीरमनातील षड्‌रिपूंवर विजय मिळविणे, इत्यादींचा समावेश होतो.

एकनाथांच्या भारुडाआरंभी 'निर्गुण निरामय ब्रह्म हे मुळारंभी होते' असा उल्लेख येतो. भारुडात पुढे सदेह परमेश्वराचा परिचय आला तरी मूळ ब्रह्म ही संकल्पना वा सिद्धांत त्यांना माहीत व्हावा, ही त्यांची मनोभूमिका दिसून येते.

एकनाथांनी भारुडांचे विषय निवडतांना जनमानसातील दैनंदिन विषय आणि लोकभाषेचा वापर केलेला दिसतो. त्यातूनच त्यांनी स्वत:ला हवा असणारा अध्यात्मविचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविला. त्यांनी शंभरपेक्षा अधिक विषयांवर साडेतीनशे भारुडे रचलेली दिसून येतात. त्यात विविध स्वरूपाची विषयवैचित्र्यता पाहावयास

मिळते. बहुजन समाजातील व्यक्ती, प्रापंचिक जीवनातील वस्तू, विविध स्वरूपात खेळले जाणारे खेळ, त्यांची विविध दैवते, धार्मिक जीवनातील विविध उपचार इत्यादी विविध विषयांवर त्यांनी भारुडे रचलेली दिसतात. त्यांच्या भारुडात सर्वत्र संवादात्मकता दिसून येते. त्यामुळे त्यास नाट्याचे रूप प्राप्त झालेले दिसते. त्यांची भारुडे प्रेक्षकांना आपल्यात सहजपणे सामावून घेतात. त्यामुळे त्या भारुडांना लोकरंगभूमीचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. त्यांच्या भारुडात बहुरूप स्वरूपाची सृष्टी आहे. प्रापंचिक लोकांविषयी त्यांच्या मनात आत्यंतिक जिव्हाळा असलेला दिसतो. त्यांच्या कळवळ्यापोटीच ते हे सर्व करू पाहतात.

एकनाथी भारुडांच्या संदर्भात डॉ. प्र. न. जोशी यांचे मत विचारात घेण्याजोगे आहे. त्यांच्या मते, ''भारुडांच्या साह्याने एकनाथांनी परमार्थ-विचार घरोघरी नेला. जे कीर्तन ऐकू शकत नव्हते, ज्यांना प्रवचनास-पुराणास येण्यास वेळ नव्हता, अशांच्या झोपडीपुढे, चंद्रमौळी घरापुढे भारुडे रंगू लागली. नृत्य, नाट्य, संगीत, अभिनय यांनी भारुडे सजीव झाली. रूक्ष आत्मविचाराच्या गालावर भारुडामुळे हास्याची सुरकती उमटली. गंभीर परमार्थविचार हसतमुख बनला, खेळकर बनला. भारुडांच्या रूपाने अध्यात्मविचार बहुरूढ झाला. जे नाट्यगीत, अभिनयगीत, परमार्थगीत बहुरूढ झाले ते भारूड म्हणून ओळखले.''(जोशी,२००८:३२९) यातून तत्कालीन समाजजीवनात एकनाथांच्या भारुडांचा किती प्रभाव होता हे जाणवते.

एकनाथांनी आपल्या भारुडांमध्ये लुळे, पांगळे, आंधळे, बहिरे यांना स्थान करून दिले. त्यांचा पांगूळ मार्ग दाखवतो, आंधळा डोळसांना दिशा सांगतो, तर मुका ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतो. एकनाथांच्या भारुडांमध्ये मनोरंजनाच्या कला सादर करणारे डोंबारी, कैकाडी आणि कोल्हाटीही डोकावतात. समाजाने नाकारलेल्या कुंटीण, शंखीण, सौरी यांनाही त्यांनी मानाचे स्थान बहाल केले. त्यांच्या भारूडांत प्राणीसृष्टीही अवतरते. त्यात टिटवी, वटवाघूळ, सर्प, विंचू, एडका, कुत्रे यांचा रूपकात्मक उपयोग केलेला आहे. मानवी स्वभावाच्या गुण-दोषांचे वर्णन करण्यासाठी त्यांनी ही रूपके उपयोजिलेली आहेत. एकनाथांच्या भारुडात गावकारभार करणारे लोकही अवतरतात. उदा. पाटील, कुलकर्णी, महार, मांग, वेसकर आदी. त्यांनी आपल्या भारुडांत लोकदेवतांनाही स्थान दिलेले आहे. त्याचबरोबर अनेक खेळांचे संदर्भही येतात. या सर्वांतून एकनाथ आध्यात्मिक संवाद करू पाहतात. त्यामुळे त्यांची भारुडे ही केवळ लौकिक नव्हे तर अलौकिक जीवनाचाही प्रपंच सांगू पाहतात. संपूर्ण सृष्टी ही परमात्म्याचा खेळ आहे, असे ते मानतात. त्यात आपण प्रकृती म्हणजे नश्वर प्राणी आहोत. परमेश्वराशी एकरूप व्हायचे असेल तर नामसंकीर्तनाशिवाय कोणताही पर्याय नाही, असेच ते सांगू पाहतात. एका अर्थाने जीवा-शिवाची फुगडीचं ते खेळतात. कोणतीही कृती करीत असलो तरी प्रभूचे नाम:स्मरण सतत करत राहावे, असे त्यांचे मनोमन सांगणे आहे.

एकनाथांच्या भारुडांतील रूपके डोळ्यात भरण्याजोगी आहेत. 'मला दादला नको गं बाई' मधील 'दादला', 'सगुण गुण माया' मधील 'कोल्हाटीण', एडका-मदन हे रूपक, 'भूत जबर, मोठे ग बाई' हे प्रसिद्ध 'भूत रूपक', पोवाड्याच्या कीर्तीचे किल्ला हे रूपक, 'विनंतीपत्र' व 'अर्जदस्त' मधील गद्य रूपके, 'जोहार मायबाप जोहार' मधील जीवाजीपंत ठाणेदाराचे रूपक, 'बया दार उघड' मधील महालक्ष्मी, 'अनादि निर्गुण' मधील आरंभीचा

जोगवा, या सर्व रूपकांमुळे जनमानसावर एकनाथांची भारुडे प्रभाव आणि परिणाम करताना दिसून येतात. त्यांच्या भारुडातून लोकसंस्कृतीच्या विविध उपासकांचा परिचय झाल्याचे दिसते. त्यात महार, सौरी, बाळसंतोष, जागल्या, वासुदेव इत्यादींचा समावेश करता येईल. एकनाथांनी आपल्या सर्वच भारुडांमधून जनसामान्यांना आध्यात्माचा बोध दिलेला दिसतो. त्यासाठी जनसामान्यांच्याच भाषेचा उपयोग त्यांनी केलेला दिसून येतो. ते हे सर्व आवाहकाच्या भूमिकेमधून करताना जाणवतात. त्यांचा 'जागल्या' प्रापंचिक झोपेत असलेल्यांना सावध करताना म्हणतो,

''मी जी जागतो गाव निजला सारा। कोणी हुषार नाहीत घरा
अवघे निजले भ्रमले संसारा। कांही तरी पुढीलाची सोय धरा
मी जागूनि जागवितो लोकां। निजेनें व्यापिलें काळ ग्रासील देखा
यांसी कोठवर मारूं तरी हांका। कैसे भुलले म्हणती माझें माझें देखा
रात्री झाली दोन प्रहर सारी। आतां येईल बा चोराची फेरी ।
जिवाजीपंत तुम्ही जतन करा निर्धारी।
नाही तरी हिरोनी नेतील गांठोडी सारी तुमचे हित वो तुम्ही करा । जागाल तरी चुकेल फेरा
सुखें निजतांना चोर नागवतील घरा। एका जनार्दनी सद्‌गुरू पाय धरा ।।''

विनोद आणि मिश्किलता हा एकनाथांच्या भारुडांचा स्थायीभाव आहे. त्यांच्या भारुडातील 'बाई मी भोळी गं, भोळी गं' म्हणणारी स्त्री आठ दिवसाला पुरणपोळी खाणारी आहे. त्यांच्या प्रत्येक भारुडाच्या शेवटी उपदेश करण्यात आलेला आहे. या भारुडात ते 'भाव भोळा परि कृष्णचरणी डोळा' असे सांगू पाहतात. 'दादला नको गं बाई' यासारख्या भारुडात शेवटी 'एका जनार्दनी समरस झाले' असे ते म्हणतात. त्याच्यातील प्रासंगिकता, औचित्यता समजून घेण्यासारखी आहे.

''मोडकेसें घर तुटकेसें छप्पर। देवाला देवघर नाही
मला दादला नको ग बाई
फाटकेंच लुगडें तुटकीसी चोळी। शिवाया दोरा नाहीं
जोंधळ्याची भाकर आंबाड्याची भाजी। वर तेलाची धार नाहीं
मोडका पलंग तुटकी नवार। नरम बिछाना नाहीं।
सुरतींचे मोतीं गुळधाव सोनें। राज्यांत लेणें नाही
एका जनार्दनी समरस झालें। तो रस येथें नाही।।''

एकनाथ भगवंतांशी व्यापार करण्यासाठी व्यापाऱ्याचे सोंग घेतात. तो व्यापार ते अतिशय चातुर्याने

करताना जाणवतात.

''त्रैलोक्याचा स्वामी जनार्दन। केला व्यापार त्यापासून
मोठा लागला व्यापार। रामराम निरंतर
सोहं कर्जगत दिधलें। तें म्यां मस्तकीं वंदिलें
महाप्रेमाचीं लुगडीं दिधलीं। निजमुक्तपणे प्राप्त झालीं
अनुभवाची तहसील समस्त। स्वामीस करुणा पाठविली रिस्त
धर्मरखडा जमा। खर्ची घातलें पूर्वकर्मा
संतासंगे वसूल बाकी। भक्ताहूनी अति नेटकी
कैवल्यपुरी बांधलें तोरण। चैतन्य चावडीं बैसलों जाण
ऐसा व्यापार सिद्ध झाला। एका जनार्दनीं केला।।''

एकनाथांची भारुडे ही वाच्यार्थाला फाटा देऊन लक्षार्थ जपतात. त्यामुळेच ती लोकप्रिय झालेली आहे. जनसामान्यांच्या भाषेचा वापर केल्यामुळे ती अधिक आशयघन बनलेली आहेत.

'पांखरू' सारख्या भारुडातून एकनाथांनी ब्रह्मतत्त्व सूचित केले आहे. ब्रह्मतत्त्वाला डोळ्याची, कानाची आवश्यकता नाही. मुळात या तत्त्वाला कोणतेही रूप नाही. म्हणूनच ते सर्वव्यापी, विश्वव्यापी आहे. ह्या निर्गुणतत्त्वाचा उल्लेख इतरही भारुडांतून होतांना दिसून येतो. 'जोशी' नावाच्या भारुडातही याचा प्रत्यय येतो. 'मी निर्गुणपुरीचा जोशी आहे' म्हणत एकनाथ निर्गुण ब्रह्मतत्त्व विशद करतात. एकनाथांचा महारही निर्गुणपुरीचा महार आहे. त्यांच्या 'डोंबारी'ही ''मी निराकारीचा डोंबारी। तिहीं लोकी माझी फेरी।'' असे म्हणतो.

एकनाथांनी आपल्या भारुडांतून भक्तीचा पुरस्कार केलेला पाहावयास मिळतो. विठ्ठलाची भक्ती करा असे म्हणणे हेच त्यांचा मुख्य हेतू आहे. 'सासुरवास' मधील नांदणारी स्त्री आपलं माहेर पंढरपूर असं सांगते. शेवटी माणसाने विठ्ठलचरणी नतमस्तक व्हावे, हेच त्यांचे आवाहन आहे. आपल्या विवेचनासाठी ते विठ्ठलसंप्रदायाचा आश्रय घेतात. पंढरपूर हे परमेश्वराचे निवासस्थान तर संतांचे आश्रयस्थान आहे. त्यामुळे प्रत्येकाने पंढरपूरला गेले पाहिजे, असे ते विनवतात. एकीकडे व्यावहारिक तर दुसरीकडे आध्यात्मिक अर्थ हा भारुडांचा खास विशेष आहे. एकूणच भारूड वाङ्मयातून एकनाथांनी प्रबोधनाची कास धरत आध्यात्माचे बाळकडू पाजण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे लोकनाथ ठरतात.

### १.१२ गवळणी :

एकनाथांनी जशी भारुडे लिहिली; तशाच गौळणीही लिहिलेल्या आहेत. नाथांच्या स्फूटरचनेमध्ये गौळणींचा समावेश करण्यात येतो. त्यांच्या गौळणी आजही जनसामान्यांच्या ओठांवर खिळलेल्या दिसतात. 'कशी जाऊ मी वृंदावना', 'वारियानें कुंडल हाले', 'नको वाजवू कान्हा मुरली' यांसारख्या गौळणींनी त्यांच्या लयबद्धरचनेमुळे जनमानसात आणि वाचकांमध्ये कमालीचे स्थान मिळविलेले आहे. त्याचबरोबर 'भिंगाचे भिंगुले' सारखी

बालगीतसदृश्य रचनाही प्रसिध्दीच्या शिखरावर आहे. तर 'नाथाच्या घरची उलटीच खूण' यांसारखी कूटरचनाही त्यांचीच! त्यांच्या गौळणी म्हणजे निखळ स्वरूपाची भावकाव्ये म्हणावी लागतात. उत्कटता आणि रसाळता हे त्यांच्या गौळणींचे विशेष! राम आणि कृष्ण हेही त्यांच्या गौळणींचे विषय झालेले आहेत. त्यांच्या जीवनचरित्रातील भावानात्मक प्रसंगांना गौळणींमध्ये चित्रित केलेले आहे. 'क्षुधित वनं गोविंद', 'रडत माझें बाळ तान्हें', 'कसा मला टाकून गेला राम' यांसारख्या गौळणींनी जनमाणसाची पकड घेतलेली आहे. त्यातील नाट्यात्मकतेमुळे, प्रसंगचित्रणामुळे तीमधील पात्रे ही अधिक लौकिक झालेली पाहावयास मिळतात. 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा' सारखी पदे कीर्तनकार अतिशय आत्मियतेने आळवतात. त्यांच्या गौळणींमधून मधुराभक्तीचा परिचय होतो. ते अनेक वेळा परमेश्वराचा धावा करताना दिसतात. उदा. 'कृष्णा धांव रे लौकरी', 'धांव रे धांव आता' इ. त्यांच्या एकूणच गौळणींमध्ये 'आल्या पांच गौळणी' ही रंगांची किमया साधणारी गौळण आध्यात्मिक कूट उकलणारी आहे. या सर्वच गौळणींमधून एकनाथांनी भक्तीची एकात्मता आणि एकसंधता निर्देशित केली आहे. आपल्या गौळणींमधून श्रीकृष्णाचे वर्णन करतांना एकनाथ कुठेही थकताना दिसत नाहीत. उलट त्यांना हे सर्व करताना हर्षोल्हास झालेला दिसतो. श्रीकृष्णाने गौळणींच्या केलेल्या खोड्या, गौळणींच्या तक्रारी, यशोदेने घातलेली समजूत याची वर्णनेच गौळणींमधून येतात.

कृष्णाच्या बाललीला, कृष्णाच्या लहानपणीचे विविध प्रसंग उदा. विश्वरूपदर्शन, श्रीकृष्णाने केलेल्या लोणीगोळ्याची चोरी, वनक्रीडा, रासक्रीडा इत्यादीचे चित्रण, तसेच पिंगा, टिपरी, विटीदांडू, चेंडूफळी, हमामा, उमान, हुतुतू, वावडी इत्यादी खेळ त्यांच्या गौळणींतून डोकावतात. या सर्वांतून त्यांनी अध्यात्माची आणि परमार्थाची शिकवण दिलेली आहे.

गौळणीलेखनात एकनाथ विशेष रंगलेले दिसून येतात. आपल्या गौळणींमधून संपूर्ण गोकुळाचे सौंदर्य ते शब्दबद्ध करू पाहतात. त्याची काही उदाहरणे आपल्याला पाहता येतील.

१. "भिंगाचे भिंगुले खांद्यावर आंगुले।
नाचत तान्हुलें यशोदेचें।।
येती गौळणी करती बुझावणी।
लागती चरणीं कान्होबांच्या।।
गोविंद बाळिया वाजविती टाळिया।
आमुचा कान्हया देवराव।।
कडदोरा बिंदली वाघनखें साजिरी।
नाचत श्रीहरी यशादेचा।।
पायीं घाघरीयां वाक्या साजरीया।
कानींच्या बाळ्या ढाळ देती।।
एका जनार्दनीं एकत्व शरण।

जीवें लिंबलोण उतरती।।''

२. ''खांद्यावरती कांबळी हातामधी काठी।
चारितसे धेनु सावळा जगजेठी।।
राधे राधे राधे राधे मुकुंद मुरारी।
वाजवितो वेणु कान्हा सावळा श्रीहरी।।
एक एक गौळणी एक एक गोपाळा।
हाती धरुनि नाचती रासमंडळा।।
एका जनार्दनी रासमंडळ रचिलें।
जिकडे पाहे तिकडे अवघे ब्रह्म कोंदले।।''

३. ''कशी जाऊ मी वृंदावना।
मुरली वाजवी कान्हा।।
पैलतीरीं हरी वाजवी मुरली।
नदी भरली युमना।।
कासे पीतांबर कस्तुरी टिळक।
कुंडल शोभें कान्हा।।
काय करूं बाई कुणाला सांगूं?
नामाची सांगड आणा।।
नंदाच्या हरीनें कौतुक केलें।
जाणे अंतरींच्या खुणा।।
एका जनार्दनीं मनीं म्हणा।
देव माहात्म्य कळेना कोणा।।''

**१.१३ एकनाथी युगाचे विशेष :**

एकनाथांचा लेखनप्रपंच पाहिल्यानंतर असे दिसून येते की, तत्कालीन कालखंडाचे विविध पडसाद हे त्यांच्या ग्रंथांमध्ये पडलेले दिसून येतात. त्यातून त्यांनी समन्वयवादी लेखनभूमिका घेतल्याची अनुभवायला मिळते. त्यांच्या लेखनातून प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय झालेला आढळतो. आपल्या वाङ्मय लेखनातून त्यांनी बहुजनवर्गापर्यंत अध्यात्माची बीजे पोहोचवली. लोकभाषेतून वेदान्ताचे विवेचन केले. विशेषत: निर्गूण निराकार ब्रह्म संकल्पना भारुडातून सांगितली. त्यांनी आपल्या लेखनातून मराठी भाषेबद्दल नितांत आदर व्यक्त

केला. नाथांचा काळ हा संपूर्णपणे राजकीय, धार्मिक आणि सामाजिक समस्यांनी वेढलेला असा काळ होता. अशा काळात लेखन करून त्यांनी मराठी सारस्वताला नवीन दिशा दिली. प्रपंच आणि परमार्थाच्या संदर्भात अचूक मार्गदर्शन केलेले दिसते. आपल्या लेखनातून त्यांनी नेहमीच उदारमतवादी विचारांना प्राधान्य दिले. भागवतधर्मातील आचार-विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविले. आपल्या लेखनातून त्यांनी राष्ट्रीय प्रेरणा निर्माण केल्या, असे म्हणता येईल.

**१.१४ समारोप :**

एकनाथांच्या लेखनाचा आढावा घेतला की, आपल्याला त्यांचे वाङ्मयेतिहासातील स्थान किती महत्त्वाचे आहे, हे सहजपणे लक्षात येते. त्यांनी हाताळलेले वाङ्मयप्रकार, हाताळलेले विषय हे तत्कालीन परिस्थितीत किती गरजेचे होते, हे अधोरेखित करता येते. त्यांनी घेतलेली मराठीविषयीची भाषिक भूमिका हीसुद्धा महत्त्वाची ठरते. त्यामुळेच त्यांना वाराणसीमध्ये सन्मान मिळाला; त्यांच्या ग्रंथांचा गौरव केला गेला. त्यांनी आपल्या ग्रंथांमधून वर्णन केलेल्या गुरुमाहात्म्याला विशेष असे स्थान आहे. त्यांच्या वाङ्मयलेखनाचा हेतू हा नेहमीच लोककल्याण असलेला दिसून येतो. त्यामुळेच त्यांना लोकशिक्षक वा लोकनाथही म्हटले गेले आहे. ते आपल्या जीवनात लौकिक आणि पारमार्थिक असे दोन्ही प्रपंच अत्यंत आनंदाने जगले. त्यांच्या जगण्यात कुठेही विरोधाभास आढळून आला नाही. ते अत्यंत अनासक्त पातळीवर जगलेले पाहावयास मिळतात. दत्तोपासनेबरोबरच विठ्ठलोपासनेलाही त्यांनी प्राधान्य दिले. त्यांनी आपल्या लेखनातून श्रीराम आणि श्रीकृष्ण यांची जीवनचरित्रे रेखाटली. चिरंतन-शाश्वत जीवन मूल्यांचा पुरस्कार, लोककल्याणाची घेतलेली भूमिका आणि समाजाला विधायक दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम एकनाथांनी आयुष्यभर केले याचा प्रातदर्शी पुरावा म्हणजे त्यांनी आपल्या विचारांना दिलेली कृतीची जोड होय.

**१. बहामनी राजवट :** ही इ.स.च्या १४ व्या व १५ व्या शतकांत अस्तित्वात असलेली दक्षिण भारतातील पहिली स्वतंत्र इस्लामी राजवट होती. आजच्या कर्नाटकातील गुलबर्गा आणि बीदर येथे या राजवटीची प्रमुख ठाणी होती. या राजवटीचा कालावधी हा इ.स. १३४७ ते इ.स. १५२७ एवढा होता.

**२. पाच पातशाह्या :** बहामनी राजवटीचे इ.स. १५१८ नंतर तुकडे पडून अहमदनगरची निजामशाही, वऱ्हाडातील इमादशाही, बीदरची बरीदशाही, विजापुरातील आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही अशा पाच राजवटी उदयाला आल्या.

**३. सूफी :** जाडे-भरडे वस्त्र धारण करून अल्लाहच्या नामस्मरणात व्यग्र असणाऱ्या, विरक्त साधुपुरुषांना सर्वसाधारणपणे सूफी असे म्हणतात. एका मतानुसार 'सुफिया' या फार्सी शब्दापासून 'सूफी' म्हणजे अध्यात्मवादातील ज्ञानी, हा शब्द आला आहे. दुसऱ्या एका मतानुसार, अरबी शब्द 'सौफ म्हणजे लोकरीचे जाडे-भरडे वस्त्र, ते वस्त्र पांघरणारा तो सूफी असा त्याचा अर्थ आहे. 'साफ' (शुद्ध) या शब्दापासून, ज्याचे अंत:करण शुद्ध आहे तो 'सूफी' असा शब्द तयार झाल्याचेही म्हटले गेले आहे.

**४. भारूड :** भारूड हा एक मराठी पद्यवाङ्मयाचा प्रकार आहे. याद्वारे साध्या रूपकांमधून धार्मिक आणि

नैतिक तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले जाते.

**५. आख्यानकाव्य :** आख्यानकाव्य हा प्राचीन मराठी संतकविता आणि पंडितीकाव्य या दोहोंच्या परंपरांतील कथाकाव्याचा एक प्रकार आहे. आख्यान म्हणजे कथा किंवा गोष्ट. तथापि देवदेवता, अवतारी महापुरुष आणि संत इत्यादींची गोष्टीरूप चरित्रे, पौराणिक व धार्मिक स्वरूपाच्या कथा किंवा उद्‌बोधक स्वरूपाच्या स्वतंत्र काल्पनिक कथा इत्यादींना उद्देशूनही आख्यान ही संज्ञा वापरली जाते.

### १.१५ सरावासाठी प्रश्नोत्तरे :

### १.१५.१ योग्य पर्याय निवडा.

१. एकनाथांचा काळ कोणत्या शतकातील आहे?

अ) सतराव्या ब) चौदाव्या क) तेराव्या ड) सोळाव्या

२. एकनाथांचा जन्म इसवीसनाच्या कोणत्या साली झाला?

अ) १५४४ ब) १५३३ क) १५६० ड) १५९०

३. एकनाथ हे कोणाचे पणतू होते?

अ) चक्रपाणी ब) मुक्तेश्वर क) भानुदास ड) विठ्ठलपंत

४. एकनाथांनी सर्वप्रथम कोणता ग्रंथ लिहिला?

अ) एकादशस्कंधटीका ब) रूक्मिणी स्वयंवर क) चतु:श्लोकी भागवत ड) भावार्थ रामायण

५. 'एकादशस्कंधटीका' या ग्रंथाची पूर्तता कोणत्या ठिकाणी झाली?

अ) वाराणसी ब) द्वारका क) मथुरा ड) दौलताबाद

६. 'भावार्थ रामायणा'च्या उर्वरित भागाचे लेखन कोणी केले?

अ) मुक्तेश्वर ब) सच्चिदानंदबाबा क) महिपतीबुवा तहाराबादकर ड) गावबा

७. 'बहुरूढ' या शब्दापासून 'भारूड' हा शब्द तयार झाला, अशी व्युत्पत्ती कोणत्या अभ्यासकाने सांगितलेली आहे?

अ) ल. रा. पांगारकर ब) अ. ना. देशपांडे क) ह. श्री. शेणोलीकर ड) प्र. न. जोशी

८. एकनाथांनी बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी कोणत्या काव्याची रचना केली?

अ) भारूड ब) धवलगीते क) विराणी ड) मनाचे श्लोक

९. एकनाथ भारुडांच्या शेवटी कोणती नाममुद्रा वापरतात?

अ) एका जनार्दनी ब) जनी जनार्दनी क) एका म्हणे ड) नाथ म्हणे

१०. एकनाथांच्या गौळणीचा नायक कोण आहे?

अ) श्रीकृष्ण ब) राम क) लक्ष्मण ड) दत्त

उत्तरे : १) सोळाव्या २) १५३३ ३) भानुदास ४) चतु:श्लोकी ५) वाराणसी

६) गावबा ७) ल. रा. पांगारकर ८) भारूड ९) एका जनार्दनी १०) श्रीकृष्ण

**१.१५.२ दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. बहामनी कालखंडाच्या पार्श्वभूमीवर एकनाथांच्या लेखनकार्याचे मूल्यमापन करा.

२. 'प्रपंच आणि परमार्थाची सांगड खऱ्या अर्थाने एकनाथांनी आपल्या लेखनातून घालून दिली.' हे विधान सोदाहरण विशद करा.

३. 'एकनाथ हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे लोकनाथ होते.' या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

४. एकनाथांच्या विविधांगी वाङ्मयीन कार्याचा परिचय करून द्या.

५. 'एकनाथांनी आपले लेखन हे लोककल्याणाच्या हेतूतून केले होते.' हे विधान सोदाहरण विशद करा.

६. 'समन्वयकार एकनाथ' या नात्याने एकनाथांच्या लेखनकार्याचे मूल्यमापन करा.

**१.१५.३ लघुत्तरी प्रश्न :**

१. एकादशस्कंधटीका या ग्रंथाचे वाङ्मयीन सौंदर्य विशद करा.

२. चतु:श्लोकी भागवतातील गुरुमहिमा सांगून आशय विशद करा.

३. एकनाथांच्या गुरुपरंपरेचा थोडक्यात परिचय करून द्या.

४. एकादशस्कंधटीका लेखनाचे स्वरूप-विशेष थोडक्यात विशद करा.

५. भावार्थ रामायणाचे स्वरूप-विशेष थोडक्यात विशद करा.

६. भारुडाची व्युत्पत्ती सांगून, भारुडाचे प्रयोजन थोडक्यात सांगा.

७. एकनाथाच्या भारूडवाङ्मयाच्या आधारे भारूडवाङ्मयाचे स्वरूप-विशेष नोंदवा.

८. एकनाथांच्या गौळणीचे स्वरूप थोडक्यात विशद करा.

९. एकनाथीयुगाचे विशेष थोडक्यात लिहा.

**१.१५.४ टीपा लिहा.**

१. चतु:श्लोकी भागवत

२. नाथांची भारूड रचना

३. नाथांच्या गवळणी

### १.१६ संदर्भग्रंथ सूची :


१. इनामदार हेमंत, जोशी वसंत, १९९० : एकनाथकालीन मराठी वाङ्मय, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती.

२. करंदीकर वि. रा., २०१० : 'टीका आणि इतर विवेचनपर वाङ्मय' हा लेख, मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड दुसरा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, दुसरी आवृत्ती.

३. कुलकर्णी अनुराधा, १९९२ : प्राचीन मराठीतील स्फुट आख्यान काव्यांचा अभ्यास, मेहता प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती.

४. जोशी ना.ग., २०१० : 'स्फुट रचनाप्रकार' हा लेख, मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड दुसरा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, दुसरी आवृत्ती.

५. जोशी प्र.न., २००८ : मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास (प्राचीन काळ : प्रारंभापासून पेशवाई अखेरपर्यंत), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे., सुधारित आवृत्ती.

६. जोशी व. स., १९८२ : 'एकनाथ' हा लेख, मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड दुसरा, भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथम आवृत्ती.

७. निरंतर गं.भा., १९६४ : मराठी वाङ्मयाचा परामर्श, व्हीनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती.

८. भावे वि.ल. (पुरवणी, शं. गो. तुळपुळे), १९८२ : महाराष्ट्र-सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई., सहावी आवृत्ती.

९. माटे श्री.म, २००६ : संत पंत व तंत, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती.


### १.१७ अधिक वाचन :


१. फाटक न. र.: श्री एकनाथ वाङ्मय दर्शन आणि कार्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२. देशपांडे अ. ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३ रा, व्हीनस प्रकाशन, पुणे.

३. पांगारकर ल. रा. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ व २, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.


### १.१८ उपक्रम :

१. आपल्या परिसरातील लोकसंस्कृतीच्या उपासकांच्या लोककलांचे संकलन करा.

२. आपल्या परिसरात संपन्न होणाऱ्या एकनाथी भागवत सप्ताहातील उपक्रमांचा अहवाल लिहा.

३. रामायण आणि महाभारतविषयक स्थानिक दंतकथांचे संकलन करा.

४. 'संत एकनाथ' हा मराठी चित्रपट पाहा.

***

# घटक : २

# इ.स. १६०० ते इ.स. १७०० (स्थूल कालखंड)

# अ) तुकारामांची अभंगरचना

# ब) रामदासांची ग्रंथरचना

# करुणाष्टके, रामायणे, मनाचे श्लोक, दासबोध, स्फुट प्रकरणे

## २.१ उद्दिष्टे :

१. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा कालिक अभ्यास करणे.

२. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा स्थूल परिचय करुन घेणे.

३. तुकारामांच्या अभंगवाणीचा परिचय करुन घेणे.

४. तुकारामांच्या अभंगवाणीचे स्वरूप व वैशिष्ट्ये समजावून घेणे.

५. रामदासांच्या ग्रंथरचनेचा परिचय करुन घेणे.

६. रामदासांच्या ग्रंथरचनेची वैशिष्ट्ये व स्वरूप समजावून घेणे.

## २.२ प्रास्ताविक :

संत परंपरा ही महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाला लाभलेली अमूल्य देणगी आहे. ह्या संत परंपरेने वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून सातशेहून अधिक वर्षे महाराष्ट्रावर अधिराज्य गाजविले. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात समता प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. सकल जीवांचा उध्दार हाच ध्यास लागलेल्या संतमहंतांनी संप्रदायाचा आचारधर्म व तत्वज्ञान शब्दबध्द करण्यासाठी वाङ्मयाची निर्मिती केली. त्यांची ग्रंथनिर्मिती त्यांच्या ठायी असलेल्या प्रतिभेच्या सामर्थ्याची साक्ष देते.

महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांनी आपल्या सामाजिक तळमळीतून जे वाङ्मयीन व सामाजिक कार्य केले त्याचा येथल्या समाजमनावर स्पष्ट ठसा उमटलेला दिसतो. ज्ञानदेवांनी उभारलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीवरील कळस होण्याचे भाग्य तुकोबांना लाभले. समाजप्रबोधन करणारे, समाजाला क्रांतीकारी विचार देणारे तुकाराम एक जगद्गुरू ठरले तर ह्याच संत मालिकेत समाविष्ट होणारे परंतु स्वत:चा स्वतंत्र संप्रदाय निर्माण करणारे रामदास सोळाव्या शतकातील परमार्थाची शिकवण देणारे समर्थ कवी ठरतात. महाराष्ट्राची तत्कालीन परिस्थिती आणि बदलता काळ ध्यानात घेऊन रामदासांनी समाजाला प्रपंचविज्ञान शिकविले. त्यांचे वाङ्मय आपल्या बोधामृतामुळे लोकमनावर आजही वेगळा ठसा उमटविते.

## २.३ विषय विवेचन :

मध्ययुगीन मराठी साहित्याच्या इतिहासात तुकारामाची अभंगवाणी उत्कटपणे अविष्कृत झालेली दिसते. नामदेवांच्या नंतर तितक्याच विपूल आणि रसाळ स्वरुपाची अभंगरचना करणारा संत म्हणजे तुकाराम होय. सांसारिक विठ्ठलभक्त, क्रांतीकारी तत्वज्ञान मांडणारा विचारवंत आणि लोकहिताची तळमळ असणारा समाजसुधारक अशा विविध भूमिका घेऊन तुकारामांनी आपली वाङ्मय निर्मिती केलेली दिसते. तुकारामांची शिष्या बहिणाबाई यांनी भागवत धर्मावर रचलेल्या रूपकात्मक अभंगातून तुकारामांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला आहे. रूपकात्मक अभंगातून वारकरी संप्रदायातील तुकारामांच्या कार्याची महती स्पष्ट होताना दिसते. त्या लिहितात,

''संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।

नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।

जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।।

तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।''

तुकोबांची अभंगणवाणी म्हणजे आजही लोकमानसाच्या अंत:करणात विराजमान असलेली दिसते त्याचे आणखी दुसरे कारण म्हणजे सहानुभूतीची व्यापकता आणि समाज तळमळ होय.

## २.४ कवीपरिचय :

तुकोबांचे संपूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले. त्यांचा जन्म देहूस इ.स. १५९८ (श. १५२०) मध्ये झाला. आई कनकाईच्या पोटी जन्म घेतलेल्या तुकोबांना सावजी नावाचा मोठा भाऊ आणि कान्होबा लहान असे दोन भाऊ होते. वडील देहूचे महाजन. त्यांच्या घरात पूर्वापार विठ्ठलभक्ती चालत आलेली. तुकारामांची पहिली पत्नी रखमामाई नेहमी आजारी असायची. म्हणून आप्पाजी गुळवे या सावकाराची मुलगी जिजाबाई उर्फ आवली हिच्याशी त्यांचा दुसरा विवाह करण्यात आला. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षापासून तुकोबांच्या जीवनात विविध संकटे कोसळू लागली. त्यांच्या आई-वडिलांचे निधन झाले. थोरल्या भावजयी वारल्या. थोरला भाऊ सावजी विरक्त झाला. दुकानाचे दिवाळे निघाले. दुष्काळात गुरेढोरे गेली. अशातच पहिली बायको रखमाबाई व मुलगा संतू अन्न-पाण्याविना मृत्यू पावले. अशा विदारक परिस्थितीतून जात असताना दुसऱ्या पत्नीच्या जिजाईच्या कर्कशपणाने त्यांच्या दु:खात आणखी भर पडली. या सर्व दु:खद घटनांचा परिणाम तुकोबांच्या हळव्या मनावर झाला. त्यांचे दु:ख कवितेतून व्यक्त होऊ लागले. आपल्या भाव-भावना अभंगवाणीच्या रुपाने मुक्त वाट करुन दिली. ह्या जीवनानुभूतीमुळे तुकोबांचे मन अध्यात्माकडे वळू लागले. त्यांना गावाबाहेरील भंडारा डोंगराचा आश्रय मिळाला. लोकांत सोडून एकांत मिळाला. ईश्वर चिंतनात मन रमू लागले. निसर्ग सानिध्यात रममाण झालेल्या तुकारामांना सामाजिक दोष तीव्रतेने जाणवू लागले. या जाणिवेतूनच त्यांनी समाजात अस्तित्वात असलेल्या ढोंगी रुढींवर, प्रवृत्तीवर, कुप्रथांवर आपल्या अभंगवाणीतून हल्ला चढविला. आपल्या वाट्याला आलेला आकांत सहन केल्यानंतर जीवनाला लाभलेल्या नव्या वळणाची प्रेरणा नामदेव असल्याचे खालील

शब्दांतून व्यक्त करताना तुकाराम म्हणतात–

नामदेवे केले स्वप्नामाजी जागे। सवे पांडुरंगे येऊनिया ।

सांगितले काम करावे कवित्व । वाऊ गे निमित्त बोलो नको ।।

पुढे तुकारामांनी आपल्या हयातीत सुमारे चार हजार अभंग रचले. त्यांचे सारे अभंग 'तुकारामांची गाथा' म्हणून एकत्रितरित्या ओळखले जातात. 'तुकोबांच्या काव्याचे आकर्षण महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता देश, भाषा, प्रांत यांच्या मर्यादा पार करुन हे काव्य आज डॉट कॉमच्या युगात लोकांना मोलाचा ठेवा वाटत आहे. तुकाराम डॉट कॉम (www.tukaram.com) या संकेतस्थळाच्या लोकप्रियतेवरुन याची प्रचिती येते. जगाच्या पाठीवर कुठल्याही नात्यामध्ये चपखल बसेल असे चिंतन मांडणाऱ्या या कवीची पाचही खंडात लोकप्रियता वाढत आहे. तब्बल एकशे चाळीस देशातील वाचकांनी या संकेतस्थळाला भेट दिली आहे.'

## २.५ तुकारामांची अभंगवाणी :

तुकारामांनी आपल्या अभंगवाणीत दैनंदिन जीवनातील नानाविध अनुभव शब्दबद्ध केले आहेत. हे करीत असताना समाज जीवनातील वास्तवता ते परखडपणे मांडतात. समाजचिंतन त्यांच्या कवितेचा गाभा आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत उपदेशपरता प्रकट होते. हे बहुतांशी वाङ्मय उत्स्फूर्त आणि आत्माविष्काराच्या स्वरुपाचे आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी तुकारामांच्या अभंगांचे साधारण वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

### २.५.१ आत्मनिवेदनपर अभंग :

तुकारामांच्या आत्मनिवेदनपर अभंगातून त्यांचे चरित्र समजण्यास सोपे जाते. 'धन्य देहू गाव पुण्यभूमी ठाव.. तेथे नांदे देव पांडूरंग।' असे वर्णन करुन देहूचा पुण्यभूमी म्हणून उल्लेख करतात. आपल्या कुळाची परंपरा सांगतात. अशा अभंगातून त्यांच्या कुळाविषयी, व्यवसायाविषयी माहिती तर मिळतेच. त्याचबरोबर त्यांच्या कुळाची महान परंपराही समजते,

'शुध्दबीजा पोटी । फळे रसाळ गोमटी ।।'

मुखी अमृताची वाणी । देह देवाचे कारणी ।।

सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ।।

तुका म्हणे जाती । ताप दर्शने विश्रांती ।।

दुष्काळात आपल्या आप्तगणांच्या एका पाठोपाठ एक मृत्यूमुळे तुकाराम एकाकी बनले. ते जीवनाचा अधिक अंतर्मुख होऊन चिंतन करु लागले. दु:खाने पोळून निघालेले त्यांचे अंत:करण समाजातील मानवी दु:खाकडे अपार करुणेने पाहू लागले. त्यांच्या मनात स्वत:च्या, कुटुंबाच्या दु:खापेक्षा समाजदु:खाचा, त्याविषयी कळवळा अधिक निर्माण झाला. समाजाला उपदेश करण्याची गरज लक्षात आली. अशातच नामदेवांनी स्वप्नामध्ये प्रेरणा दिली व 'सांगितले काम करावे कवित्व' असा उपदेश केला. तुकोबांच्या आत्मनिवेदनपर कवितेसंदर्भात वि. भि. कोलते यांनी 'वस्तुत: तुकाराम आणि तुकारामांचे अभंग आत्मपर आहेत. मराठी

साहित्यातील उत्कृष्ट भावगीते आहेत.' असे मांडलेले विचार यथार्थ वाटतात. तुकारामांनी परमेश्वराची आराधना केली. त्याला विनवणी केली. देवाच्या दर्शनाची आता ते वाट पाहू लागले. आपल्या मनाची भावव्याकुळता अनेक उपमा दृष्टांतांची उधळण करताना ते म्हणतात–

''कन्या सासुऱ्यासी जाये । मागे परतोनी पाहे ।
तैसे जाले माझे जीवा । केव्हा भेटसी केशवा।।
चुकलिया माये । बाळ हुरुहुरु पाहे ।
जीवना वेगळी मासोळी । तैसा तुकां तळमळी ।।''

प्रत्यक्ष विठ्ठलाचा धावा, फळाला आलेली भक्ती आणि अलौकिक अनुभूती तुकारामांना प्राप्त झाली. प्रत्यक्ष विठ्ठल भेटीच्या आनंदाचे वर्णन भारावून टाकणारे आहे. ते म्हणतात,

''आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ।।
काय सांगो जाले काहीचिया बाही । पुढे चाले नाही आवडीने।।''

### २.५.२ विठ्ठलभक्तीपर अभंग :

वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असलेल्या विठ्ठलाची भक्तीपरंपरा तुकारामांच्या घराण्यात फार पूर्वीपासून चालत आली होती. तुकारामांच्या मनात विठ्ठलाविषयी अपार श्रध्दा होती. त्यांनी माता, पिता, बंधू, बहिण, सखा वगैरे सर्व नाती विठ्ठलाशी जोडली होती.

''आमुची मिरास पंढरी । आमुचे घर भीमातिरी।
पांडुरंग आमुचा पिता । रकुमाई आमुची माता ।।
भाऊ पुंडलिक मुनी । चंद्रभागा आमुची बहिण ।।''

ह्या अभंगातून ही जोडलेली नाती स्पष्ट होतात. विठ्ठल हाच आपला जीव, आपला भाव, कुळधर्म देव असल्याचे स्पष्ट प्रतिपादन करतात. अशा विठ्ठलाच्या वर्णनात तुकोबांची प्रतिभा बहरते,

''सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया ।
तुळसीहार गळा कासे पिंताबर । आवडे निरंतर तेचि रूप ।
मकर कुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजित ।
तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ।।''

ही विठ्ठल माऊली आपली कृपेची साऊली आहे असे तुकोबांना वाटते. ह्या विठोबा माऊलीला कधी ते आर्त हाक मारतात. कधी तिच्यापाशी हट्ट धरतात तर कधी तिच्याशी प्रेमाने भांडतातही. 'जेथे जाते तेथे तू माझा सांगाती, असे स्पष्ट करतात. हेचि दान देगा देवा, तुझा विसर न पडावा' असे प्रेम ते करतात. असा हा विठ्ठल तुकोबांना भक्तीचा सागर, सकलांचा आधारू पंढरपूरात आहे म्हणून साऱ्या तीर्थांचे तीर्थक्षेत्र पंढरपूर वाटते. स्वर्गाहून श्रेष्ठ अशा पंढरीची तुकोबा नित्यनेमाने वारी करीत. पंढरपूरशिवाय सारे जग त्यांना उणे वाटते. अनंत

अडचणी जरी असल्या तरी आयुष्यात एकदा तरी मनुष्याने पंढरपूराला जावे. त्यांना 'धन्य झालो हो संसारी... आम्ही देखिली पंढरी' असा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही असे तुकोबा सांगतात. अशा पंढरपूरच्या वाळवंटात आदर्श समाजाचे चित्र तुकारामांना दिसते. इथे समता, एकता एकत्रित नांदते, कोणीही लहान मोठा नसतो. अहंकाराचा वणवा इथे विझतो. द्वेष, मत्सराचा नाश होतो. माणूस माणसाला भगवंत समजून एकमेकांच्या पाया पडतो. कीर्तनात दंग होऊन आपली सांसारिक सुख-दुःखे विसरतो. अशा पंढरीचा महिमा.. 'देता आणिक उपमा, ऐसा ठाव नाही कोठे... देव उभा उभी भेटे' असे तुकारामांना वाटते. पंढरपूर भेटीत विठ्ठल प्रसन्नतेने भक्तास तात्काळ फळ मिळते असे मांडतात.

**२.५.३ समाज प्रबोधनपर अभंग :**

तुकोबांचा पिंड जसा एका भावकवीचा आहे तसाच तो क्रांतीकारी विचार मांडणाऱ्या समाजसुधारकाचाही आहे. कुणाचीही भीड न ठेवता समाजातील अपप्रवृत्तींवर तुकाराम परखड टीका करतात. समाजातील दांभिकता, ढोंगीवृत्ती, उच्चनीचता, स्वार्थी वृत्ती, अनिष्ठ रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, कर्मकांडता, नास्तिकपणा यांच्यावर त्यांनी शाब्दिक प्रहार केले. त्यांना ठणकावून उपदेश केले,''बुडते हे जन देखवेना डोळा । म्हणोनि कळवळा येतो आम्हां।।'' ह्या भूमिकेतून तुकाराम समाजाचे प्रबोधन करताना दिसतात. प्रपंच आणि परमार्थ या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. प्रपंचात राहूनही परमार्थ साधता येतो. प्रपंचकांनी वर्तन कसे ठेवावे? विविध अवधाने कशी सांभाळावीत? पैसा, संपत्ती बाबत काय काळजी घ्यावी? गुरू, वडीलधाऱ्यांशी कसे वागावे? याबाबत प्रबोधन करतात. जीवनाचे सारे तत्त्वज्ञान अभंगातून मांडताना ते म्हणतात -

''जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचार वेच करी

उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।

परउपकारी, देणे परनिंदा । परस्त्रिय सदा बहिणी माया ।

भूतदया गाईपशूचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ।।''

तुकारामांची भूमिका प्रामाणिक समाजसुधारकाची आहे. समाजाला, भोळयाभाबड्या लोकांना खरी भक्ती, खरा धर्म पटवून देतात. देवभोळेपणापेक्षा कल्याणकारी, भूतदया ठेवणे ही खरी भक्ती आहे. खरा देव कोठे आहे हे सांगतात, 'जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा।।' जे दुःखी, कष्टी आहेत अशांची सेवा, अशांविषयी कळवळा ही ईश्वरसेवा आहे. मात्र मायेहून मवाळ होणारे तुकाराम दांभिकांसाठी वज्राप्रमाणे कठोर होतात. वाईट प्रवृत्तींना, समाजाला छळणाऱ्यांना अद्दल घडविली पाहिजे. जशास तसे वागले पाहिजे अशी भूमिकाही तुकोबा परखडपणे मांडतात-

''पाया झाला नारु । तेथे न बांधा कापुरू ।।

तेथे बिबव्याचे काम । अधमासि तो अधम ।।

देवावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।।

तेथे पैजारेचे काम । अधमासि तो अधम ।।'' हा न्याय सांगून कंटकांचे निर्मुलन करण्याचा उपदेश तुकाराम

करतात. आपले विचार पटवून देण्यासाठी रोजच्या जीवनातील साधी सोपी उदाहरणे देऊन रूपक दृष्टांताच्या माध्यमातून प्रभावीपणे उद्‌बोधन करतात. सज्जन माणसांच्या गुणांचे गौरव करताना ''चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाही हीन कोणी अंग । दीपा नाही पाठी पोटी अंधकार । सर्वांगे साकर अवघी गोड ।। तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहतां अवगुण मिळेचि ना ।। चंदनासारखे झिजत राहणे, दिव्यांसारखा जीवना सन्मार्गाचा प्रकाश निर्माण करणे, वागण्या बोलण्यात गोडवा असतो हा माणूस समाजात आदर्श निर्माण करतो हे सांगताना वाईट प्रवृत्तीच्या माणसांपासून दूर राहिले पाहिजे हे सांगायलाही तुकाराम विसरत नाहीत.

''ढेंगणाचे संगे हिरा जो भंगला । कुसंगे नडला तैसा साधु ।।

ओढाळाच्या संगे सात्विक नासली । क्षण एक नाडली सामागमें ।

डांकाचे संगती सोनें हीन जाले । मोल ते तुटले लक्ष कोडी।।

विषाने पक्वाने गोड कडू जाली । कुसंगाने केली तैसी परी ।।

वाईट माणसांच्या संगतीनं सज्जन जरी आला तरी त्यांच्यावर वाईट परिणाम होतो. बिघडून जातो. स्वैराचारी स्त्रीमुळे सात्वीक स्त्री सुध्दा बदफैली ठरते. म्हणजे वाईट माणसांची संगत विषाइतकी घातक ठरते हे व्यक्त करतात.

मनुष्य जन्म आपल्याला मिळाला ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. त्याकरिता आपल्या हातून जेवढे चांगले करता येईल तेवढे केले पाहिजे. मनुष्य जन्म वरदान आहे ती एक संधी आहे असे सांगताना तुकाराम लिहितात,

''बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिली मनुष्य देहाऐसी ।

महा लाभासी उत्तम रासी । जेणे सुखासी पात्र होईजे ।।''

खोट्यासाठी गुंतून राहू नका. खरे आहे त्याची निवड करुन आयुष्यभर त्या मार्गाने जीवन जगत राहण्याचा विचार तुकाराम मांडतात. प्रत्येक व्यक्तीला हा जीवनातला उचित मार्ग स्वीकारण्या संदर्भातील विचार समाजव्यवस्था बदलण्यासाठीचा आहे. समाजाला स्थिर शाश्वत असे स्वरूप करुन देणारा, जीवनातल्या मांगल्याकडे घेऊन जाणारा विचार तुकाराम मांडतात. आपले हित, कल्याण कशामध्ये आहे ते ओळखून माणसाने वागले पाहिजे.

''मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनिया गूळ घांव घाली ।

याचकाविण काय खोळंबला दाता । तोचि धावेहिता आपुलिया ।।''

जीवनात माणसाने इष्ट आहे, गरजेचे आहे ते त्या वेळीच केले पाहिजे. योग्य वेळी इष्ट तो निर्णय घेतला पाहिजे. वेळ गेल्यानंतर त्याच्या पदरी निराशा पडते त्यासाठी माणसाने आपले हित कशात आहे हे शोधले पाहिजे त्यानुसार वर्तन केले पाहिजे.

एकूणच तुकारामांनी बाल्य, तारुण्य, प्रौढावस्था, म्हातारपण हया मानवी जीवनातील विविध अवस्थांचे चित्रण, त्यातील भाव मांडले आहेत. हे ते मांडू शकले कारण माणसांत व समाजात तुकाराम एकरुप झाले होते. त्यामुळे सामाजिक मूल्ये, आचारविचार याबाबतचे चित्रण करतात.

समस्त समाजाला उपदेश करीत असताना तुकारामांनी आपल्या अभंगवाणीच्या माध्यमातून भक्तीचे

महात्म्य, कीर्तनाचे महात्म्य एवढेच नव्हे तर नाम महात्म्य सांगितले. लोकांना भक्तिमार्गाची शिकवण दिली. भक्तीचे महत्त्व विशद करीत असताना परपीडा, परनिंदा, परदारा, परधन या चार वासनांपासून दूर राहिले पाहिजे असा उपदेश केला आहे. विठ्ठल भक्ती हेच साधन, हेच बळ आणि यांच बळावर परमेश्वराला जिंकू शकता. देव भक्तीचा भूकेला आहे.. भाव तेथे देव असे तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या कवितेत मांडले. तुकारामांनी सामाजिक प्रबोधनासाठी कीर्तन व प्रवचन यांचा वापर साधन म्हणून केला. मनोरंजन, प्रबोधन ही दोन्ही उद्दिष्ट्ये कीर्तनाद्वारे साध्य होऊ शकतात. हे ओळखून तुकारामांनी सर्वसामान्य लोकांच्या बुध्दीची, आकलनाची कुवत ओळखून साध्या, सोप्या भाषेत मोठ मोठे तत्त्वज्ञान सोपे करुन मांडले. भक्ती, ज्ञान, वैराग्य, नैतिकता, सामाजिक ऋण, निष्ठा, प्रेम इ. बाबत टाळ, मृदंग, चिपळ्या, वीणाच्या साथीने प्रबोधन केले. कीर्तनाला रंग चढला की, प्रत्यक्ष पांडूरंग उभा राहतो. देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम म्हणजे कीर्तन.

'कथा त्रिवेणी संगम। देवभक्त आणि नाम ।

तेयीचे उत्तम । चरणरज वंदिता ।

जळती दोषांचे डोंगर । शुध्द होती नारीनर ।

गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा।।' दोषांचे डोंगर जाळून टाकण्याचे सामर्थ्य कीर्तनात आहे. यम सांगे दुता तुमची नाही तेथे सत्ता, अशी महती कीर्तनात व्यक्त केली आहे. नामस्मरणाचा महिमा सांगताना नामसंकीर्तनात ज्याचे मन रंगून गेले, त्याला सहा शास्त्रे, चार वेद आणि अठरा पुराणे यांचे सारसर्वस्व मिळते. नामामध्ये भवसागरा तरुन जाण्याचे सामर्थ्य आहे. तुकोबांनी अत्यंत श्रध्देने नामस्मरण करुन इतरांनाही प्रेरणा दिली. नामामुळे नराचा नारायण होतो. म्हणून 'तुका म्हणे जपा.. मंत्र तीन अक्षरी सोपा' असा उपदेश करतात. 'केवळ वारकऱ्यांनाच नव्हे, तर साऱ्या समाजाला नीतिमूल्यांची आठवण करुन देणे, हे तुकोबांनी आपले कर्तव्य मानले. सामाजिक जीवनात त्यांनी नीती हीच भक्ती मानली. नेत्री रुप मुखी नाम' हे या भक्तीचे एक रुप, तर 'द्या तिची दुसरी बाजू' रुढ संकेतांच्या, दांभिकपणाच्या आणि अंधश्रध्देच्या विध्वंसनाने प्रथम समाजाची मनोभूमी नांगरुन तिच्यात प्रांजळ भक्तिभाव, नीती आणि समाजोध्दाराचे विधायक बी पेरणारा संत म्हणजे तुकाराम.'५

**२.५.४ भाषिक सौंदर्य आणि वैशिष्ट्ये :**

तुकारामांची गाथा आजही सर्वसामान्य जनासाठी ह्रदयाला भिडणारे काव्य आहे. कारण अठरापगड जातीचा अशिक्षित समाज डोळ्यांसमोर ठेवून समाजबोलीमध्ये तुकोबांनी अभंग निर्मिती केली. आत्मानुभावर आधारलेले तुकोबांचे काव्य भक्तीरसात न्हाऊन निघाले आहे. जीवनानुभव हा तुकोबांच्या अभंगवाणीचा गाभा आहे. जीवनवादी दृष्टीतून बहरलेले ते जीवंत वाङ्मय आहे. अभंगाबरोबर तुकारामांनी आरत्या, भारुडे, गवळणी, भूपाळ्या इ. लोककाव्याचे प्रकारही हाताळले आहेत. त्यांच्या सर्वच काव्यात आर्तता दिसून येते. त्यांचे काव्य विलक्षण प्रत्ययकारी आहे.

अल्पाक्षररमणीयत्व हा तुकाराम शैलीचा विशेष मानावा लागेल, कमी शब्दांमध्ये जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या काव्यात आहे. उदा. 'सुख पाहता जवापाडे... दु:ख पर्वताएवढे', असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास, मन करारे प्रसन्न साऱ्या सिध्दीचे कारण, निश्यचाचे बळ... तुका म्हणे तेचि

बळ, महापुरे झाडे जाती, लव्हाळे वाचती, ज्योचअंगी मोठेपण तया यातना कठीण अशी अनेक अभंग त्यांची उदाहरणे आहेत. चिमूटभर शब्दांत आकाशभर तत्त्वज्ञान तुकाराम आपल्या अभंगातून व्यक्त करतात. दृष्टांत, उपमा, अनुप्रास इत्यादी अलंकार जागोजागी आढळतात. समर्पक दृष्टांत हे तर त्यांच्या शैलीचे मुख्य वैशिष्ट्य होय. 'अणुरेणूया थोकडा, तुका आकाशाएवढा' अशा परस्परविरोधी दृष्टांताचा सुंदर नमुना आशयाला वेगळे परिमाण देतो.

तुकारामांच्या अभंगवाणीला सुभाषितमूल्य प्राप्त झाले आहे. आज मराठी साहित्यात स्थिर झालेल्या म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, तुकोबांच्या काव्यांतील आहेत. उदा. आलिया भोगासी असावे सादर, निश्चयाचे बळ.. तुका म्हणे तेचि बळ, लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा, महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती, शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी, जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, नाही मन निर्मळ, काय करील सा.. एकमेकां साह्य करु अवघे धरु सुपंथ, ज्याचे अंगी मोठेपण तयां यातना कठीण !

## २.६ ब) रामदासांची ग्रंथरचना

## करुणाष्टके, रामायणे, मनाचे श्लोक, दासबोध स्फुट प्रकरणे

### २.६.१ विषय विवेचन :

संत परंपरेतील पण स्वत: स्वतंत्र 'समर्थ' नावाचा संप्रदाय स्थापन करणारे रामदास त्यांच्या काव्यगुणांनी समर्थ ठरतात. जनसामान्यांना परमार्थ शिकवीत असताना बदलता काळ व भोवतालची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी प्रपंचविज्ञान सोप्या भाषेत मांडले. आपल्या वाङ्मयातून भक्तीमार्गाबरोबरच जीवनाच्या विविध टप्प्यांवरचा उपदेश केला. आपल्या भ्रमंतीतून जे समाजाचे दर्शन झाले त्याचे त्यांनी आपल्या साहित्यात विवेचन केले. समाजाभिमुख होऊन वाङ्मयनिर्मिती केली. त्यांच्या वाङ्मयातील विषयांची विविधता पाहिल्यानंतर त्यांच्या ठायी असलेले सूक्ष्म समाजनिरीक्षण आणि व्यासंगीपणाची प्रचिती येते. बहुश्रुतताही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष ठरतो. त्याकाळाची गरज आणि समाजाची मानसिकता ओळखून रामदासांनी प्रयत्नांवर आधारित परमार्थांची शिकवण दिली. लोकांतील आळस, शैथिल्य, न्यूनगंड, अज्ञानीपणा ह्या साऱ्या गोष्टींच्या निर्मूलनासाठी 'समर्थ' संप्रदायातून सक्रियता आणि कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न केला. सतराव्या शतकातील महाराष्ट्र जो अस्मानी सुलतानीच्या कचाट्यात सापडला होता. त्याला ऐतिहासिक, पौराणिक अशा महान, पराक्रमी परंपरेची जाणीव आपल्या वाङ्मयाद्वारे करुन देऊन अस्मितेसाठी जागे करण्याचे महत कार्य रामदासांनी केले. त्यांच्या परिचय व ग्रंथांची ओळख करुन घेऊया.

### २.६.२ रामदासांचे चरित्र :

रामदासांचा जन्म इ.स.१६०८ मध्ये चैत्र शुध्द नवमीला (शके १५३०) जांब या गावी झाला.वडील सूर्याजीपंत आणि आई राणूबाई यांच्या पोटी जन्मलेले हे द्वितीय पुत्र होय. त्यांचे मूळ नाव नारायण हे होय. जालना जिल्ह्यातील ठोसर घराण्यात रामदास जन्मले. त्यांचे घराणे पूर्वापार सूर्योपासक होते. नारायण सात वर्षाचा असतानाच वडील सूर्याजीपंताचे निधन झाले. बालपणापासून नारायण म्हणजेच रामदास तीक्ष्ण बुध्दीचा होता.

साहसी होता. वयाच्या नवव्या वर्षी नारायणला श्रीरामदर्शन व अनुग्रह झाला. तेराव्या वर्षी 'सावधान' हा शब्द ऐकून लग्नमंडपातून पळाले. पुढे तेथून नाशिक जवळील पंचवटीत रामाचे दर्शन घेऊन टाकळीस दीर्घ तपश्चर्या केली. इ. स. १६२० ते १६३२ ही बारा वर्षे येथे रामदासांनी रामजपात काढली. तद्नंतर त्यांनी १२ वर्षे भारत भ्रमण केले, तीर्थयात्रा केल्या. हनुमान ही शक्तीची आणि बुध्दीची देवता आहे. त्यामुळे तिची उपासना केली पाहिजे. यासकरिता समर्थानी ११ मारुतींची स्थापना केली. 'रामें रामदासी उपदेशिले' असा प्रत्यक्ष श्रीरामाने आपणांस उपदेश केल्याचे समर्थ सांगतात. श्रीराम हे गुरु आणि हनुमंत हे त्यांचे प्रोत्साहक (हनुमंत आमची कुळवल्ली) साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्य दैवत श्रीरघुनाथ असे समर्थ सांगतात. श्रीराम आणि हनुमंत ही समर्थांची कुलदैवत होत. श्री रामानेच आपणांस मंत्रोपदेश केला आणि श्रीराम हे गुरु बनले.

भारतभर भ्रमंतीमध्ये रामदासांनी सभोवतालच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण केले त्यातून रामदासांना दैन्यावस्था, समाजात माजलेला अनाचार, कणाहीन, स्वाभिमान गमावून बसलेला समाज पाहिला. अशा लोकांमध्ये स्वधर्माचा अभिमान जागृत करण्याकामी स्वत: अध्यात्म राहून प्रपंचविज्ञानाची महंती मांडली. मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।'हा उपदेश केला. न्यूनगंडात बुडालेल्या मराठी मनाला चैतन्याची नवी उर्मी दिली, प्रेरणा दिली. बोथट झालेल्या मनाला लढण्याची धार दिली. आपल्या समस्त वाङ्मयातून प्रपंचविज्ञान मांडून परमार्थ आणि प्रयत्नांचा समन्वय साधण्याचा यशस्वी प्रयत्न केला. लोकसंघटन करीत आदर्श समाजनिर्मिताचा प्रयत्न केला. त्यासाठी इ.स. १६४९ मध्ये माघ कृष्ण नवमीला श्रीराममूर्तीचे अवलोकन करीत समर्थांनी सज्जनगडावर देह ठेवला.

**२.६.३ समर्थ संप्रदाय :**

सतराव्या शतकातील महाराष्ट्र 'अस्मानी सुलतानी' आणि 'परचक्रात' होरपळून निघत होता. शिवराज्यापूर्वीच्या ह्या महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीने अध:पतन चालू होते. भांबावलेला समाज आणि आत्मविश्वास हरवलेले त्यातील जनता जनार्दन यांना परमार्थ आणि प्रपंचविज्ञान शिकवून कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न रामदासांनी केला. समर्थ संप्रदायाच्या माध्यमातून रामभक्ती, हनुमानभक्ती समाजत रुजविली. वैदिक श्रमधर्माचे पुनरुज्जीवन, रामोपासनेच्या बळावर करणारा 'संप्रदाय रामदासांनी सुरु केला ज्याला रामदासी संप्रदाय, समर्थ संप्रदाय किंवा दास संप्रदाय असे म्हणतात.'

'जाणावा रामदासांचा । हाचि संप्रदाय ।.

व्रत ज्याचे ब्रह्मचारी । वस्त्रे ज्याची हुर्मुजी बरी ।

नित्य वाची दासबोध । शोधी सारासार शोध ।

सांगे भाविकांसी बोध । करी रोध इंद्रिया ।।१७।।'

श्री रामचंद्र ही प्रमुख देवता आणि श्री हनुमान ही दुसरी. चाफळ व सज्जनगड ही दोन प्रमुख स्थाने श्रध्दास्थाने होत. दासबोध आणि मनाचे श्लोक ह्या रचना नित्य पठणासाठी आदरास्थानी 'समर्थाचे जीवन मूलत:' आध्यात्मिक पातळीवरचे, वृत्ती पूर्ण विरक्त पण त्यांच्या शिकवणुकीत परमार्थाबरोबरच प्रवृत्तिपरतेचा महिमा अशोषपणाने सांगितला आहे. त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्ध व त्या काळातील त्यांची रना यांमध्ये त्यांचा सक्रिय

प्रवृत्तिपर दृष्टिकोन दिसतो. तो ध्यानात घेतला म्हणजे, त्यांनी प्रवर्तित केलेल्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान पूर्ण होते ।८।। 'आधी ते करावे कर्म । कर्म मार्गे उपासना । उपासकां सापडे ज्ञान । ज्ञाने मोक्षचि पावणे' हे समर्थ संप्रदायाच्या आचारधर्माचा सार होय. हरिकथा निरुपण, राजकारण, सर्व विषयी सावधानता व साक्षेप ही संप्रदायाची चतु:सूत्री आहे. या संप्रदायाला अनेक शिष्य लाभले तरी समर्थांच्या दृष्टीतून पुढे कार्य चालवणिार । कुणी शिष्य त्यांना लाभला नाही असे पांगारकरांचा अभिप्राय खरा ठरतो.

**२.६.४ शिव-समर्थ भेट :**

'छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांची भेट हा मराठी साहित्य आणि इतिहास या क्षेत्रांतील विद्वानांमधील अत्यंत वादाचा असा विषय म्हटला पाहिजे. वि. का. राजवाडे व शंकर श्रीकृष्ण देव यांच्यामते, छ. शिवाजी आणि समर्थ यांची भेट श. १५७१ वैशाख शुद्ध नवमीस (इ.स. १६४९) घडली. शं. गो. तुळपुळे याच विधानास पुष्टी देतात. गो. चि. भाटे, गो.का. चांदोरकर, म. ट. फाटक, सर जदुनाथ सरकार यांच्या मते, ही भेट श. १५९४ (इ.स. १६७२) मध्ये झाली असावी. आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ उभय पक्षांनी अनेक पुरावे व दाखले दिले आहे. श. १५७१ (इ.स. १६४९) या शकाचा आग्रह धरणाऱ्यांना, रामदास हे शिवाजी महाराजांचे केवळ मोक्षगुरु नसून राजकारण गुरुंही होते, असे सुचवावयाचे असावे. शिवाजी महाराजांच्या स्वयंभू व्यक्तिमत्त्वाला आणि कर्तृत्वाला दुर्लक्षिण्याची तर ही भूमिका नसेल ना? यामुळे या वादास केवळ काळातील अंतराचे स्वरूप न राहता दोन संप्रदाय चे स्वरुप प्राप्त झालेले आढळते.'

आज मात्र हा वाद निकालात निघण्याची चिन्हे दिसत आहेत. शिवसमर्थ भेटीचा योग इ.स. १६५८ नंतर आला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**२.७ करुणाष्टके :**

रामदासांची कारुण्याने ओथंबलेली कविता म्हणजे करुणाष्टके होत. नावात अष्टक असा जरी उल्लेख असला तरी केवळ आठ श्लोकांचे बंधन असे त्यांचे स्वरुप नाही. पाचापासून वीसापर्यंत श्लोक असलेली ही रचना अक्षरश: रडविणारी कविता म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. रामदासांनी आपल्या साधक अवस्थेतील मनाचा कोलाहल करुणाष्टकेमध्ये मांडला आहे. नाशिक येथील पंचवटीस आल्यानंतर रामाचा जप सुरु झाला. रामाची आराधना सुरु झाली. तरीसुध्दा 'राम' आपल्या भक्ताला दर्शन देत नाही म्हटल्यावर मनाची जी अवस्था झाली ती अवस्था व रामदर्शनाची तळमळ, धडपड रामदास या काव्यांत मांडतात,

'अनुदिन अनुतापें तापलो रामराया
परमदिन दयाळा नीरसी मोहमाया
अचपळ मन माझे नावरे आवरिता
तुजविण शिण होतो धाव रे धाव आता ।।'

अशी रामदर्शनाची तळमळ त्यांनी प्रांजळपणे व्यक्त केली आहे. 'भजनरहित रामा सर्वही जन्म गेला । स्वजन जनधनाचा व्यर्थ म्या गर्व केला' असा पश्चातापही रामदास प्रकट करतात. रामाचे दर्शन घडत नाही म्हणून मनाला उदास अवस्था प्राप्त झाली आहे. आपल्या गर्वाने पस्तावलो, दर्शन होईना म्हणून कावलो, क्रोधाने तप्त

झालो तरी तू दर्शन देत नाही अशा जन्माचा काय उपयोग ! म्हणून व्यर्थ जन्मास मी आलो अशी भावना रामदासांची होते. टोकाची आर्तता आणि कारुण्याचा वर्षाव ही अष्टकांची वैशिष्ट्ये ठरतात. रामदासाच्या कवीमनाची ओळख ही अष्टके करुन देतात. रामदासांच्या इतर ग्रंथरचनेच्या पार्श्वभूमीवर काव्यगुणदृष्ट्या करुणाष्टके सरस होत. भक्तिरसाची सरोवरे असलेली ही करुणाष्टके रामदासांच्या अंत:करणातील अनुताप, वैराग्य, कोमलता याचे चित्रण करणारी आहेत. ही रचना इ.स. १६२५ ते १६३० या दरम्यान झाली असावी अशी ही 'करुणाष्टके म्हणजे प्रेमळ प्रार्थना होय' हे पांगारकरांचे मत यथार्थ वाटते.

**२.८ रामायणे :**

रामायण हे वैश्विक महाकाव्य आहे. विविध देशात, विविध भाषेत रामायणे आढळतात. रामभक्त असलेल्या रामदासांना सुमारे चारशे वर्षापूर्वी ह्या काव्याची भुरळ न पडावी तर नवलच. साहजिक रामाला आधारभूत मानून विचार मांडणाऱ्या रामदासांनी दोन रामायणे लिहिली कारण रामभक्तीने रामदासांचे संपूर्ण जीवन व्यापून टाकले होते. आपल्या रामभक्तीने प्रेरित होऊन ही रामायणे त्यांनी लिहिली असे जरी असले तरी रामकथा निरुपणामध्ये रामभक्तीपलीकडे आणखी काही तरी हेतू रामदासांठायी होता. हे त्यांनी लिहिलेल्या रामायणाचे अंतरंग पाहिले की स्पष्ट जाणवते. तीर्थाटन करीत असताना जे रामदासांच्या संवेदनशील मनाला समाजाचे अंतरंग दिसले, समाजदर्शन घडले त्यातून ही परिस्थिती बदलून टाकण्यासाठी नवा उपदेश, नवा विचार मांडण्याची गरज त्यांना वाटली असावी. त्यातच नाथ रामदासांचे मावसे होते. त्यामुळे एकनाथांच्या 'भावार्थ रामायणाचा' प्रभाव त्यांच्या मनावर लहानपणापासून होताच. त्यामुळे अन्याया नि:पात करणारा राम जसा पूर्वी अवतरला तसा वर्तमानात कोणी राम समाज परिवर्तनासाठी न्यायाच्या लढ्यासाठी पुढे येईल काय, असा प्रश्न त्यांनी आपल्या रामायणातून केला आहे.

श्री समर्थांचे रामायण म्हणून किष्किंधाकांड, सुंदरकांड व युध्दकांड अशी तीन कांडे प्रकाशित झालेली आहेत. दोन रामायणांपैकी एक 'लघुरामायण' होय. हे लघुरामायण प्रमाणिका छंदात लिहिले आहे. १२५ श्लोकसंख्या असलेल्या ह्या लघुरामायणात केवळ युध्दकांड आहे. सुरुवातीच्या काळात रामदासांनी ही रचना केली असावी. कारण त्यात स्वत:चा उल्लेख ते 'लहानसा कवी नवा' असा करतात. वाल्मिकी लिखित रामाची मूळ कथा घेऊन हवा तसा आकार व अर्थ अभिप्रेत करण्याचे कौशल्य आपल्या रामायणात समर्थ वापरतात. इथल्या समाजाला कार्यप्रवण करण्यासाठी रामाची कथा प्रेरणादायी पध्दतीने मांडतात. अन्याय, कपट प्रवृत्तीचा रामाने जसा नायनाट केला तसा परकीय आक्रमणांविरुध्द लढण्याची प्रेरणा इथल्या मरगळलेल्या मनाने घ्यावी असा उपदेश रामायणातून अप्रत्यक्षपणे समर्थ करतात. त्यासाठी मुद्दाम रावणाच्या बंदिवासात असणाऱ्या देवांच्या हालअपेष्टाचे वर्णन करताना लिहितात,

'समीर लोटतो खडे । वरुण घालितो सडे ।

मयंक साउली धरी । मळीण पावलु हरी ।।' असे बंदिवासातील देव-दैवतांचे चित्र रेखाटतात. अशा पार्श्वभूमीवर रामाने 'बंदीचे सोडले देव । आनंदी घातले सदा ।' हे वर्णन लढण्यास प्रवृत्त करते.

सुंदर व युध्द अशी दोन कांडे मिळून 'दीर्घ रामायण' होते. त्याची रचना रामदासांनी भुजंगप्रयात वृत्तांत केली आहे. हे दुसरे रामायण १४६२ श्लोकसंख्येचे असल्याने त्याचा उल्लेख मोठे दीर्घ रामायण असा केला जातो. ह्या रामायणातील १४६२ श्लोकांपैकी सुमारे १३६२ श्लोक रामदासांनी युध्दकांडावर लिहिले आहेत. त्यातील प्रसंग चित्रणे, निसर्ग चित्रणे, व्यक्ती चित्रणे जीवंत झाली आहेत. प्रस्तुत चित्रणे डोळ्यांसमोर उभी करण्याचे कौशल्य रामदासांच्या लेखणीत आहे. त्यांनी केलेली युध्द वर्णने वीररसपूर्ण आहेत. राम आणि वानर यांच्या वियोगात करुणरस आहे तर मारुती लंकेत पोहचल्यावर त्याने उडविलेला हलकल्लोळ विनोदपूर्ण असून हास्यरसाची निर्मिती करतो. राजनीती, समाजकारण आणि परमार्थाच्या पायावर उभा असलेला प्रयत्नवाद रामकथेतून महाराष्ट्राला देण्याचा प्रयत्न रामदास करतात. म्हणून कवी यशवंत म्हणतात,'तो काळ ध्यानात आणला म्हणजे महाराष्ट्राचे त्यावेळचे दु:ख पारतंत्र्याचे होते, हे उघड आहे. त्या दु:खाच्या परिहारार्थ लोकांनी उद्योगास प्रवृत्त व्हावे या हेतूने रामदासांनी ही कथा लोकांनी ऐकविली असे मानण्यात काही वावगे होईल असे वाटत नाही-' हे त्यांचे मत यथार्थ वाटते.

**२.९ मनाचे श्लोक :**

समर्थांनी मानवी मनालाच सामर्थ्याचा प्रमुख स्त्रोत मानले. मन हेच सर्व प्रकारच्या उत्थान-पतनाला कारणीभूत असते. मानवी कृती-प्रवृत्तींचे मुख्य प्रेरणास्थान मन हेच असते. त्यामुळे दुर्बल मनापेक्षा सबल मनच व्यक्तीचे तसेच समाजाचेही दैव घडवते, त्यामुळे रामदासांनी 'मनाचे श्लोक' हे काव्य रचले. दासबोधातील विचार, तत्त्वज्ञान सामान्य लोकांसाठी सोप्या भाषेत मनाच्या श्लोकांतून व्यक्त केले. भिक्षा मागत असताना रामदास शिष्याने प्रत्येक घरासमोर उभे राहून एक श्लोक म्हणावा. त्याचा अर्थबोध करावा आणि पुढच्या घरी जावे. म्हणजे प्रत्येक घरात एक विचार दिल्याचे पूण्यकार्य होईल, या हेतूने मनाच्या श्लोकांचे लेखन झाले. या श्लोकांची रचना भुजंगप्रयात वृत्तात केली असून त्यांची संख्या २०५ इतकी आहे. सर्वसामान्य लोकांना सहज आकलन होईल, लक्षात राहील अशा रोचक व सोप्या भाषेत मनाच्या श्लोकांची रचना रामदासांनी केली आहे. भक्तीमार्गाचा उपदेश करीत असताना,

'मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुध्दी नको रे ।
मना धर्मता नीती सोडू नको हो । मना अंतरी सार विचार राहो ।'

असे नीतीचा, पुण्याचा उपदेश करतात. अशा अनेक उपदेशांनी विवेक, सदाचार, धैर्य, पराकम, यश, दुर्गुण यांची ओळख व गरज, त्याप्रमाणे दुष्परिणाम स्पष्ट करतात.

'मना चंदनाचे परी, त्वा झिजावे। परी अंतरी सज्जना नीववावें।
जनी सर्वसुखी असा कोण आहे । विचारे मना तूंचि शोधूनि पाहें।।
मना मानसी दु:ख आणू नको रे। मना सर्वथा शोक चिंता नको रे।।
मना सर्वथा सत्य सांडू नको रे । मना सर्वथा मिथ्य मांडू नकों रे ।।
हो जया अंतरी भाव जैसा । वसे हो तया अंतरी देव तैसा ।।

चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।,

जयाचेनि नामे महा दोष जाती । जयाचेनि नामे गती पाविजेती ।

जयाचे नि नामे घडे पुण्यठेवा । प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।

मुखी नाम नाही तया मुक्ति कैची । अहंता गुणे यातना ते फुकाची ।

धरी रे मना संगती सज्जनाची । जेणे वृत्ति पालटे दुर्जनांची ।।

अशा एक ना अनेक सुविचारसदृश्य, सुभाषितवजा काव्याची निर्मिती म्हणजे मनाचे श्लोक होत. समाजमन बलशाली, तेजस्वी, कार्यतत्पर व्हावे यासाठी समर्थांनी मनाच्या श्लोकांची रचना केली आहे.

**२.१० दासबोध :**

रामदासांनी मांडलेले सर्व तत्त्वज्ञान, विचार ज्या ग्रंथात एकवटले आहे तो ग्रंथ म्हणजे 'दासबोध' होय. आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब 'दासबोधा'मध्ये पडलेले जाणवते. आजपर्यंत संवेदनशील मनाने आणि सूक्ष्म निरीक्षणशक्तीने नोंद घेतलेल्या अनुभवाचे निरुपण रामदासांनी दासबोधाच्या रुपाने केले आहे. गुरु-शिष्य संवादरुप ही ग्रंथ निरुपणाची पध्दती रामदासांनी अवलंबिली आहे. याची ओवी संख्या ७७५१ इतकी आहे. दासबोधाची रचना इ.स. १६३२ ने इ.स. १६८१ पर्यंत म्हणजे सुमारे पन्नास वर्षे चालू होती. वेगवेगळ्या वेळी लिहिलेले समास एकत्र करुन, दशकांमध्ये विभागून त्याची बांधणी मागाहून केली असावी. वीस दशकी दोनशे समासी दासबोध असाही उल्लेश या ग्रंथाचा केला जातो. पूर्वार्धाची ओवीसंख्या ३८६६ आणि उत्तरार्धाची ३८८५ ओवीसंख्या असलेला हा ग्रंथ दोन भागात विभागला आहे. पूर्वार्धात आठ दशक व उत्तरार्धात बारा दशक सामावतात. दासबोधाच्या पहिल्या सात दशकांत संपूर्णपणे अध्यात्म विवेचन केले आहे. आठव्या दशकाचे नाव ज्ञानदशक हा पूर्वीच लिहून ठेवला होता. तो त्यास जोडला.

''ग्रंथ नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।

येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।

नवविधा भक्ती आणि ज्ञान । बोलिले वैराग्याचे लक्षण ।

बहुधा आध्यात्मनिरुपण । निरोपिले ।।'' अशा पध्दतीने दासबोधात भक्तिमार्ग स्पष्ट करुन सांगितला आहे. अज्ञानी भक्तांची भक्ती समर्थांना मान्य नाही. भक्ती डोळस असावी असे मानणारा हा ग्रंथ भक्तिज्ञान वैराग्याचा आहे. यात भागवतधर्मी नवविधा भक्तीत्वाचा उपदेश केला आहे.

''पहिले ते हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण ।

तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।'' या अभंगातून दासबोधातील आशयाचे स्वरुप स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर रामदास ग्रंथांची फलश्रुती सांगतात,

'आता श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तात्काळ ।

तुटे संशयाचे मूळ। येकसरा ।।

भ्रांत अवगुणी अवलक्षण । तेचि होती सुलक्षण ।

धूर्त तार्किक विलक्षण । समयो जाणती ।

आळशी तेचि साक्षपी होती । पापी तोचि प्रस्तावती ।

निंदक तोचि वंदू लागती । भक्तिमार्गासी ।।'

समर्थांचे चिंतन, मनन, श्रवण आणि बुध्दीसत्तेचे सार दासबोध ग्रंथात उमटले आहे. जीवनविषयक तत्त्वज्ञान समर्थपणे मांडतात. गुरुची महती सांगतात. केवळ वैराग्य नाही तर विवेकयुक्त वैराग्य हवे, गुरुशिवाय ज्ञान नाही म्हणून सद्गुरुचा शोध घेणे गरजेचे आहे. गुरुचीही परीक्षा व्हायला पाहिजे तर शिष्यही त्या प्रतीचे गुणवान, योग्यतेचे निर्माण होतील. हे स्पष्ट करीत असताना गुरु-शिष्य लक्षणेही रामदास दासबोधात देतात. आदर्श पुरुषाची लक्षणे सांगून थांबत नाही तर मूर्खाची लक्षणे देखील रामदास सांगतात. ज्याला संसार व्यवस्थित करता येतो. जो प्रपंच नीट करतो त्याने परमार्थ करावा. कारण ज्याला प्रपंच नेटका करता येत नाही, त्याला परमार्थ काय जमणार? असा प्रश्न ते करतात. 'संसार मुळी नासका । विवेक करावा नेटका।।' अशी शिकवण रामदास देतात. संसाराचा त्याग न करता प्रपंच न सांडता देहाची सार्थकता करावी असे मांडतात.

राजधर्म आणि क्षात्रधर्म ह्या प्रकरणात समर्थ राजकारणविषयक जागृत, सावधानता बाळगायला सांगतात. 'बहुधा दिसांचे माजलेले म्लेंच्छांचे बंड दुखंड करुन राज्य करावे आणि फितवेखोरांचा संहार करावा. मर्दाने काळ पाहून चालावे, धीर सोडू नये. जयास जिवाचे वाटे भय । त्याने क्षात्रधर्म करु नये ।' वीराने मारिता मारिता मरावे, रणांगणातून पळाल्यास नरक वाटेला येईल. देवांचे राज्य व्हावे म्हणून, देवद्रोही तितुके कुत्ते। मारुनि घालावे परत। हा धकाधकीचा मामला अशक्ताला कसा सहन होणार त्यासाठी नाना युक्त्यांची आवश्यकता आहे. समाज जागृतीसाठी ''जितुके काही आपणास ठावे। तितुके इतरांसी शिकवावे । शहाणे करुन सोडावे सकळजन ।।'' असे करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे प्रपंच आणि परमार्थातील अनेक विषयांचे सुबोध विवेचन रामदास आपल्या काव्यात करतात. सर्वसामान्यजनांसाठी तो ज्ञानकोशच ठरतो. धर्मकारण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वाङ्मय, विज्ञान, कला, शास्त्रे, व्यवस्थापन, शिक्षण, मूल्ये अशा मानवी जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करण्याचे काम दासबोध करतो. सारांश दासबोध हा मानवी जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा उत्तम ज्ञानकोश होय.

**२.११ स्फूटप्रकरणे :**

तीर्थयात्रेच्या निमित्ताने जेव्हा रामदास सगळा देश फिरुन आले. तेव्हा त्यांना समाजाचे उद्विग्न चित्र दिसले. आचारभ्रष्ट झालेला सर्व समाज, पाप-पुण्याचा विचार न वाटणारा समाज, त्याला कार्यप्रवण करण्याकरिता काही स्फूट प्रकरणे रामदासांनी लिहिली. ह्याची संख्या जवळजवळ ६९ इतकी भरते त्यांचे स्वरूप असे

१) **'अस्मानी सुलतानी'** या प्रकरणात समर्थ म्हणतात, 'आता नाना तंटे बखेडे' येथे माजले असून पृथ्वी गळाठली आहे. ब्राम्हण बुध्दीपासून चेवले आणि आचारभ्रष्ट झाले. पूर्वीची असंख्य देवस्थाने गेली. आता म्लेंच्छ नृपतीच्या राज्यामुळे ठाया ठायी उरुस भरु लागले,

'तीर्थक्षेत्रे मोडिली। ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली ।

सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला।।

ब्राम्हण बुध्दीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।

गुरुत्व सोडून जाले । शिष्य शिष्यांचे ।।

राज्य नेतें म्लेंच्छिं क्षेत्री । गुरुत्व नेले कुपात्री ।।

आपण आरत्री ना परत्रीं । काहीच नाही.' महाराष्ट्र धर्म थोडाच उरला असे विदारक चित्र या प्रकरणात रेखाटतात.

२) **परचक्र निरूपण :**

परचक्र निरुपणांत रामदासांनी परचक्रामुळे निर्माण झालेल्या सामाजिक स्थितीचे चित्र रेखाटले आहे.

'येणे करित बहुजांला । संकट झाले ।।

माणसा खावया अन्न नाही । अंथरुण पांघरुण तेही नाही ।

घर करावया सामग्री नाही । काय करिती ।।' सारे लोक अखंड चिंतेच्या प्रवाही पडले आहेत. कुणी सुखी नाही. काळ इतका कठीण आला की, समाजात विषण्णता, निराशा पसरली आहे असे वर्णन परचक्रनिरुपणात रामदास करतात.

**३) आनंदवनभुवन :** हे प्रकरण इ.स. १६४४ मध्ये रामदासांनी लिहिले. तीर्थाटन करुन कृष्णाकाठी परतल्यावर समर्थांनी उद्याच्या आशावादी महाराष्ट्राचे चित्र यामध्ये रंगविले आहे. उद्याच्या महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न त्यांना दिसते. आनंदवनभुवन म्हणजे काशी म्हणजेच तीर्थक्षेत्र असा अर्थ होतो म्हणून तर 'देहत्यागासी येणे हो। आनंदवनभुवनी ।' असे समर्थ लिहितात.

'बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला ।

मोडली मांडली छेत्रे । आनंदवनभुवनी ।।'

महाराष्ट्रावरील सर्व विघ्ने नष्ट झाली आहेत. हिंदुस्थान बळकावतिले सर्व पापी बुडाले, अभक्तांचा क्षय झाला. आनंदभुवनी, सर्व मनोकामना पूर्ण झाल्याने आनंद वाटत आहे. या काव्यातून सूक्ष्म निरीक्षण शक्ती त्याबरोबर दृष्टपणाची प्रचिती येते.

**४) 'रामवरदायिनी' :** हे प्रतापगडाच्या भवानीस अनुलक्षून म्हटलेले स्तोत्र आहे. इ. स. १६७८ मध्ये रामदास प्रतापगडाच्या भवानीस दर्शनार्थ गेले असता आपल्या कुलस्वामिनीला तुळजाभवानीस ते रामवरदायिनी असे म्हणतात. तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हासी देखता असे मागणे मागत रोकडे काही । मूळ सामर्थ्य दाखवी अशी प्रार्थनाही तुळजाभवानीस करतात. शिवराज्याच्या साकारतेविषयीची आस्थाही प्रकट केली आहे.

**५) भीमरूपी स्तोत्रे :** यांबरोबर रामदासांनी भीमरुपी स्तोत्रे या शीर्षकाखाली मारुतीची एकूण तेरा स्तोत्रे रचली आहेत. त्यांनी लिहिली आहेत. तर 'जनस्वभाव गोसावी,' 'जुनाट पुरुष', निर्गुण ध्यान, मानसपूजा, इत्यादी अध्यात्मिक स्वरुपाची प्रकरणे लिहिली आहेत तर काही ऐतिहासिक प्रकरणेही आहेत. त्यामध्ये शिवरायांना पाठविलेल्या पत्रात

निश्चयाचा महामेरु । बहुतजनांसी आधारु ।

अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।

यशवंत कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।

असे शिवरायांचे मार्मिक गुणवर्णनही रामदास करतात. त्याप्रमाणे असंख्य धाट्या, सवाया, पदे, भूपाळ्या, डफगाणी, निरनिराळी वारीगीते, स्तोत्रे त्याचबरोबर मारुतीची आरती, शंकराची, गणपतीची आरती, दुर्गेदुर्गट भारी ही देवीची आरती रामदासांचीच रचना आहे.

## २.१२ रामदासांच्या वाङ्मयाचे विशेष :

रामदासांच्या साहित्याचे प्रयोजन अध्यात्मनिरुपण असले तरी समाजाभिमुख राहून देशकाल परिस्थितीचे चित्रणेही त्यांनी आपल्या वाङ्मयात केली आहेत. त्यांची ग्रंथरचना ज्ञानकोश समान आहे. बहुश्रुतता गुणांमुळे ग्रंथांची उपयोगितता आजही वाढते आहे. व्यासंगीपणा वाङ्मयात पावलोपावली प्रकट होतो. ओजस्वी विशेषणांचा वापर, लयबध्द शब्दरचना, प्रत्ययकारी प्रसंगचित्रणे, स्तिमित करुन टाकणारी व्यक्तिचित्रणे, कल्पना विलासाचा प्रभावी वापर, रुपक, उपमा, दृष्टांत इत्यादीने नटलेले वाङ्मय अशा अनेक वाङ्मयीन गुणांची प्रचिती रामदासांच्या रचनेसंदर्भात अनुभवावयास मिळते. तरीही एका करुणाष्टकांचा अपवाद सोडल्यास त्यांची सर्वच रचना गद्यप्राय आहे. तीत लालित्य अथवा मृदुता नाही. कवित्वात पुनरुक्ती, अशुध्दता, पाल्हाळ, छंदभंग नसावे असे म्हणणाऱ्या रामदासांच्या कवितेत हे दोष किती तरी आढळतात. हे ल. रा नसिराबादकर यांचे मत विचार करायला लावते. तरीही हवालदिल झालेल्यांना धीर धरायला लावणारा, काळाची पावले ओळखून प्रपंचविज्ञान सांगणारा, हरिकथा निरुपण करतानाचा राजकारण निवेदिणारा रचनाकार खऱ्या अर्थाने समर्थ पदवीस उतरतो हे मान्य करावे लागते.

## २.१३ सरावासाठी प्रश्नोत्तरे :

### २.१३.१ प्रश्न : योग्य पर्याय निवडा.

१) तुकोबांच्या स्वप्नात येऊन त्यांना कोणी काव्यस्फूर्ती दिली?

अ) ज्ञानेश्वर ब) एकनाथ क) रामदास ड) नामदेव

२) साऱ्या तीर्थाचे तीर्थक्षेत्र कोणते आहे असे तुकोबांना वाटते?

अ) पंढरपूर ब) काशी क) देहू ड) आळंदी

३) कोण बुडताना तुकारामांना मोठा कळवळा येतो ?

अ) धन ब) मन क) जन ड) घर

४) तुकाराम दांभिकासाठी कशाप्रमाणे कठोर होतात?

अ) वज्रा ब) लोहा क) दगडा ड) बिबव्या

५) दोषांचे डोंगर जाळून टाकण्याचे सामर्थ्य कशात आहे?

अ) पोवाडा ब) कीर्तन क) तमाशा ड) लावणी

६) रामदासांनी कोणता संप्रदाय सुरु केला?

अ) दत्त ब) वारकरी क) महानुभाव ड) समर्थ

७) रामदासांच्या मनाच्या श्लोकांची संख्या किती आहे?

अ) १०१ ब) ५०१ क) २०५ ड) ५०२

८) रामदासांचे सारे विचारधन कोणत्या ग्रंथात एकवटले आहे?

अ) करुणाष्टके ब) दासबोध क) रामायणे ड) मनाचे श्लोक

९) उद्याच्या महाराष्ट्राचे दिव्य दर्शन रामदासांनी कोणत्या प्रकरणामधून रेखाटले आहे?

अ) आनंदवनभुवन ब) परचक्रनिरुपण क) मनाचे श्लोक ड) रामवरदायिनी

१०) निश्चयाचा महामेरु । बहुतजनांसी आचारु असे रामदासांनी कोणाचे गुणवर्णन केले आहे.

अ) राजाराम ब) संभाजी क) शिवराय ड) पेशवे

**उत्तरे :**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ड | २) | अ | ३) | क | ४) | अ |
| ५) | ब | ६) | ड | ७) | क | ८) | ब |
| ९) | अ | १०) | क | | | | |

**२.१३.२ : दीर्घोत्तरी प्रश्न लिहा :**

१) 'तुकारामांचा पिंड जसा भावकवीचा आहे तसाच परखड समाजसुधारकाचाही आहे' साधार स्पष्ट करा.

२) रामदासांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घेऊन त्याचे विशेष स्पष्ट करा.

**२.१३.३ लघुत्तरी (थोडक्यात उत्तरे लिहा) :**

१) तुकारामांनी भक्तीची महती कशी व्यक्त केली आहे. थोडक्यात लिहा.

२) तुकारामांचा आत्माविष्कार त्यांच्या अभंगाद्वारा थोडक्यात मांडा.

३) रामदासांच्या रामायणांचे विशेष थोडक्यात लिहा.

४) 'आनंदवनभुवन' व 'परचक्रनिरुपण' स्फुट प्रकरणांचा थोडक्यात आढावा घ्या.

**२.१३.४ : टीपा लिहा :**

१) तुकारामांचे समाजप्रबोधनपर अभंग

२) तुकारामांची विठ्ठलभक्ती

३) दासबोध

४) मनाचे श्लोक

**२.१४ मुलभूत वाचन :**


१) नसिराबादकर ल. रा. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) देशपांडे अ. ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ४, व्हीनस प्रकाशन, पुणे.

३) पांगारकर ल. रा. : मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

४) मंचरकर र. बा. : धर्म संप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

५) गवळी अनिल : सर्वात्मभावी तुकाराम, सान पब्लिकेशन प्रा. लि., पुणे.

६) फाटक न. र. : श्री रामदास वाङ्मय आणि कार्य.


***

# घटक : ३
# इ.स. १६०० ते इ.स. १८०० (स्थूल कालखंड)
## निवडक पंडित कवींच्या काव्याचा अभ्यास
### मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, श्रीधर, मोरोपंत

**३.१ उद्दिष्टे :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस

१. संतकाव्यापेक्षा पंडितीकाव्य वेगळे कसे आहे हे लक्षात येईल.

२. प्रमुख पंडित कवींची ओळख होईल.

३. पंडित कवींचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व आणि कर्तृत्व यांचा परिचय होईल.

४. पंडित कवींनी केलेल्या महत्वाच्या रचनांची नोंद घेता येईल.

५. पंडित कवींची वैशिष्ट्ये आणि त्यांच्या काव्याचे गुणदोष सांगता येतील.

६. मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, श्रीधर, मोरोपंत पंडिती कवितेचे विशेष आणि स्वरूप समजून येईल.

**३.२ प्रस्तावना :**

मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये स्थूल मानाने महानुभाव साहित्य, संत साहित्य, पंडिती साहित्य आणि शाहिरांचे साहित्य असे प्रमुख प्रवाह दिसून येतात. संत, पंत व तंत यामध्ये विभागलेल्या या साहित्यात संतकाव्य प्रदीर्घ कथाकाव्य आणि पंडितीकाव्य या तीन प्रवाहांनी प्राचीन मराठी काव्य समृद्ध झाले आहे. मध्ययुगीन मराठी साहित्यातील काही पद्यवेचे आपल्या अध्ययनात आलेले असतीलच. त्यात आलेली मुक्तेश्वर, वामन, रघुनाथ, मोरोपंत ही पंडित कवींची नावे आपल्याला ओळखीची झालेली आहेत. या पंडित कवींनी संस्कृत भाषा पचवून, त्यातील संस्कृतचा वारसा आणि वळण मराठी साहित्यात मनापासून आणण्याचा प्रयत्न आपापल्या कालखंडात केलेला आहे. त्यांच्या या प्रयत्नातूनच एका वेगळ्या अशा पंडिती साहित्याच्या प्रवाहाचा उगम झाला आहे.

विद्यार्थी मित्रहो, आपण अभ्यासक्रमातील पंडिती कवितेचा परिचय करुन घेणार आहोत. या पंडिती साहित्याच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या काही निवडक प्रमुख पंडित कवींची ओळख आपल्याला येथे करुन घ्यावयाची आहे.

### ३.२ विषय विवेचन :

मध्ययुगीन मराठी कवितेत संतकवी नंतरचे प्रमुख वळण म्हणजे पंडिती काव्य होय. पंडित कवी विदग्ध होते, त्यांच्यासमोर सुशिक्षित व जाणता वर्ग होता. रामायण-महाभारत व भागवत यांचा आधार घेऊन आणि संस्कृत महाकाव्ये व काही नाटके यांचा सजावटीसाठी उपयोग करून मराठीत मुक्तेश्वर इत्यादी कवींनी काव्यरचना केलेली आहे. या पंडितांच्या काव्याने अभिजात संस्कृत साहित्यरचनेचे पुनरुज्जीवन झाले. मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित, श्रीधर, मोरोपंत इत्यादी कवींनी गणवृत्तात लिहिलेल्या आख्यान रचनेस पंडिती काव्य असे म्हटले जाते. हे सर्व पंडितकवी व्युत्पन्न संस्कृतपंडित होते.

अभिजात संस्कृत साहित्याचे पुनरुज्जीवन म्हणजे आख्यान काव्य होय. पंडिती काव्याला कलाकाव्य विदग्ध काव्य, आख्यान काव्य असेही म्हटले जाते. मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये तीन प्रवाह मानले गेले. संतकाव्य, पंडितीकाव्य आणि शाहिरीकाव्य, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत असे परमार्थ वर्णनपर भक्ती, ज्ञान व वैराग्य यांची शिकवण देणारे तत्वज्ञानपर संतकाव्य आणि नामदेव, तुकाराम, गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा संतांचे भक्तीपर व बोधपर अभंग ही रचना संतकाव्यात अंतर्भूत होते. महाभारत, रामायण आणि भागवत यावर झालेली आख्यान रचना ही प्रदीर्घ कथाकाव्यात समाविष्ट होते.

एकनाथ, विष्णुदासनामा, श्रीधर, बहिरा पिसा, कृष्णदयार्णव या कवींनी बोध व भक्तीपूर्ण रचना केली आहे. पंडिती कवींनी महाभारत, रामायण, भागवत यातील विवेचक आख्याने घेऊन त्यावर कलापूर्ण स्वरुपाची रचना केली. यादवकाळ हा महानुभावीय साहित्याचा काळ म्हणजेच तेरावे शतक तर शिवकालीन आणि पेशवेकालीन म्हणजे सतरावे आणि अठरावे शतक हा या प्रमुख पंडित कवींचा कालखंड होय. पंडित कवींनी संस्कृत भाषेतील अभिजात वाङ्मय आणि महाकाव्य यांचा आदर्श समोर ठेवून विपूल काव्यरचना केली आहे. संतसाहित्याच्या भक्तीच्या भावनेपेक्षा भक्तीचे केवळ निमित्त करुन पांडित्य दर्शन हाच या सर्व कवींचा काव्यलेखन हेतू होय. यामुळे संतवाङ्मयाच्या प्रवाहापासून हा पंडितकाव्याचा प्रवाह अलग आणि वेगळा आहे.

सतराव्या शतकात मुक्तेश्वर, वामनपंडित रघुनाथपंडित, श्रीधर, नागेश, विठ्ठल, आनंदतनय, निरंजन माधव आणि मोरोपंत या कवींनी पंडिती कवितेत मोलाची भर टाकली आहे. यापेकी पाच महत्वाच्या पंडित कवींचा त्यांच्या प्रमुख कवितेचा व त्यांच्या काव्य वैशिष्ट्यांचा आपण अभ्यास करणार आहोत. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात पंडिती वाङ्मयाचा स्वतंत्र आणि जोरदार प्रवाह अस्तित्वात आहे. या पंडिती साहित्याच्या क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या काही निवडक प्रमुख पंडितकवींची ओळख आपल्याला येथे करून घ्यावयाची आहे. तत्पूर्वी संत काव्याहून पंडिती काव्याचे वेगळेपण पाहून पंडिती काव्याचे स्वरूप विशेष लक्षात घेऊ.

### ३.३ संतकाव्य आणि पंतकाव्य :

संतानी आत्मोद्धारासाठी भक्तीला प्राधान्य दिले. संसाराची आसक्ती न करता परमेश्वराला शरण जावे, त्याचे नामस्मरण करावे अशी शिकवण दिली. ज्ञानेश्वरांची ओवी, नामयांचे, तुकोबांचे, जनाबाईंचे अभंग सर्वच संतमेळ्याची कविता ही निवृत्तीला प्राधान्य देणारी व भक्तीला पाया मानणारी होती. पंडितांनी महाकाव्याचा

आदर्श डोळ्यांसमोर ठेवून पांडित्य प्रदर्शनासाठी संस्कृतप्रचुर रचना केल्या. शृंगाराला रसराज मानले. सुंदर निसर्ग वर्णने, संवादात्मक रचना, वृत्त अलंकाराचा सोस, कलाविलास, भाषाविलास, तंत्रबद्धता यामुळे हे काव्य बोजड झाले. पुराणग्रंथाचा आधार घेऊन पंडितकवींनी रचनाचातुर्य दाखविले. पण यामुळे रचनेतील सहजस्फूर्तता हरवली. पंडितांची रचना सहजस्फूर्त वाटत नाही. परंतु मराठी वाङ्मय समुद्ध आणि संपन्न करण्याचा प्रयत्न त्यांनी जरुर केला. वृत्त अलंकाराच्या गर्दीत अर्थ गुदमरला, आशय कोंडला गेला. शब्दजडतेमुळे अन्वयअर्थासाठी निरुपणाची गरज निर्माण झाली. तरीही त्यांनी संतापासून प्रेरणा घेऊन पौराणिक कथांद्वारे सुलभभक्ती व आत्मोद्धाराचा मार्ग दाखविला आहे.

### ३.४ मुक्तेश्वर :

मराठी पंडिती साहित्याच्या प्रांगणात मुक्तेश्वरांचे स्थान महत्त्वपूर्ण व अद्वितीय आहे. वाङ्मयावरील अध्यात्माचे जोखड फेकून देणारा पहिला कवी म्हणून रा. श्री. जोग यांनी मुक्तेश्वरांचा उल्लेख केला आहे. मुक्तेश्वरांचे कुलवृत्त व जन्मशक याविषयी मतभेद आहेत. द. सी. पंगु यांनी मुक्तेश्वर यांचा जन्मकाळ इ.स. १५७३-७४ असा दिला असून निर्वाणकाळ इ.स. १६४५-४६ असा दिला आहे. त्यांनी आपल्या कवितेत चिंतामणीसूत असा उल्लेख केला आहे. त्याचे नाव मुक्तेश्वर चिंतामणी मुदगल असून ते एकनाथांच्या मुलीचा मुलगा असावेत. करवीर निवासिनी महालक्ष्मी व सोनारीचा भैरव ही त्यांची कुलदैवत होते. त्यांचे बालपण नाथांकडे पैठणला गेले असावे व त्यांचे वास्तव्य गोदातीरी पैठणाला असावे. अशी माहिती त्यांच्याविषयी मिळते.

#### ३.४.१ मुक्तेश्वर यांची काव्यरचना :

मुक्तेश्वर यांचा कालखंड सोळाशे नऊ ते सोळाशे साठ असा आहे. महानुभाव कवी नरेंद्र, भास्करभट्ट यांच्या काव्यात पंडितीकाव्याच्या काही खुणा आढळत असल्या तरी, पंडिती थाटाची रचना करण्याचे कर्तृत्व मात्र मुक्तेश्वरांकडेच जाते. प्राचीन मराठी वाङ्मयात पंडितीकाव्याचे स्वतंत्र दालन सुरू करण्याचा मान मुक्तेश्वरांकडे जातो. मुक्तेश्वर हे पंडित कवींमध्ये अग्रगण्य आहेत जसे कालदृष्ट्या पहिले तसे आपल्या गुणांच्या दृष्टीने ही पहिलेच आहेत. संत एकनाथाचे नातू मुक्तेश्वर यांची दृष्टी रसिक कलावंतांची होती. आपल्या कवित्वाचा जबरदस्त विलास दाखविण्याची प्रेरणा मुक्तेश्वर यांच्या काव्यामध्ये आहे. मुक्तेश्वर यांनी केलेली काव्यनिर्मिती खालीलप्रमाणे :

१) संक्षेप रामायण - (श्लोकबद्ध) उत्तरकांडासह - श्लोकसंख्या १७२५

२) महाभारताची आदि, सभा, वन, विराट, सौप्तीक ही पाच पर्व - एकूण ओवीसंख्या १४०७९

३) स्फुट प्रकरणे - हरिश्चंद्राख्यान, शतमुखरावण वधाख्यान व मूर्खाची लक्षणे, भगवद्‌गीता, शुकरंभासंवाद, श्री एकनाथ चरित्र, गजेंद्रमोक्ष, दुर्योधन शल्यस्फोट, हनुमंताख्यान इ. स्फुटप्रकरणे, काही पदे-आरत्या अशी मुक्तेश्वर यांची रचना १७००० ओव्यांइतकी आहे.

मुक्तेश्वर हे मराठीतील पहिले कलाकवी आहेत. कविता त्यांच्या रक्तातच भिनलेली होती. कलात्मकता, रसिकता आणि बहुश्रुतता ही त्यांच्या कवित्वाचे अभिन्न अंगे होती. नाथांचे संस्कार, तीर्थयात्रा यांच्या अनुषंगाने

निर्माण झालेली बहुश्रुतता आणि मूळचीच कलासक्त रसिक कृती यांची त्रिवेणी संगम त्यांच्या व्यक्तित्वात एकवटला होता. यातूनच त्यांची कविता जन्माला आली. त्यांनीही रामायण आणि महाभारत या महाकाव्याचा आधार घेऊन आपली कविता सजवली.

### ३.४.२ संक्षेप रामायण :

मुक्तेश्वरांच्या काव्यलेखनाच्या सुरुवातीला ६६१ श्लोकबद्ध रचना करुन 'श्लोकबद्ध रामायण' हा ग्रंथ लिहिला. वयाच्या ऐन तारुण्यात त्यांनी ही काव्यकृती निर्मिली. अनेक वृत्तातील श्लोकबद्ध रचनेला या काव्यापासून सुरुवात झाली. या ग्रंथास 'कौतुहलरामायण' असेही म्हटले जाते. यात कवीचे नवखेपण जाणवते. अनुकरणाची प्रवृत्ती आणि बाह्य सजावटीचा अभ्यास या काव्यात पदोपदी आढळतो. मुक्तेश्वरांचा राम हा अवतारी आहे. रामायणातील काही प्रथम ऐहिक पातळीवरुन रेखाटले आहेत. ताटका, रावण, कुंभकर्ण यांना राम बाणाने मृत्यू आल्यानंतर त्यांना विष्णू सानुमत्व लाभत नाही. ती खरोखरीच मारली जातात. मुक्तेश्वराचा राम सीतेसाठी शोक करतो. सुग्रीवावर चिडतो त्यामुळे तो मानवी वाटतो. वाल्मिकी रामायणातील उत्कट प्रसंग जसेच्या तसे घेतले आहेत. अध्यात्म रामायणातील अद्‌भुत प्रसंग घेतले आहेत. तसेच भक्तीच्या काही कल्पना रामाणातून घेतल्या आहेत. भावार्थ रामायणातून एकनाथांचा भक्तिभाव दिसतो. मुक्तेश्वर एकनाथांच्या कथेचे ऋण घेतो. परंतु त्यामध्ये बदल करतो. 'हनुमन्नाटक' नाटकातील काही श्लोकांचे अनुवाद केले आहेत. त्यामुळे यामध्ये आवेशमुक्त कल्पना आल्या आहेत.

दशरथ पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ करतात. त्यातून निघालेले पायस ते आपल्या तीन राण्यांना विभागून देतात. त्यावेळी मुक्तेश्वर लिहितात – 'वडिल बंधु सुशीला जेष्ठ भागाधिकारी। भजनपर सुमित्रा भागधर्मानुसारी ।। तृतीय विहितभागी कैकयी रोष अंगी । झडपुनी तव कर्मे भाग नेला विहंगी ।।' कैकयीचा पायस-भाग पक्ष्याने उचलून नेला – हा कथाभाग मूळ रामायणात येत नाही. येथील कविता रचनेत मोठे सामासिक शब्द आल्याने व लालित्याचा अभाव असल्याने खडबडीतपणा आला आहे.

शिवधनुष्याचा भंग करणाऱ्या श्रीरामाचे वर्णन मुक्तेश्वर बालकांडात करताना लिहितात- शिवधनु जड कैसे कूर्म काठिण्य पृष्ठीं । मदनजनक हा हो ! लोकलावण्य सृष्टी । तव कृत पण ताता । सिंधु कैसेनि लंघी? रघुवर विजयी हो चंडकोदंडभेगी ।। संस्कृत श्लोकाचा हा अनुवाद मुक्तेश्वरांची प्रथमावस्थेतील काव्यरचना असल्याचे जाणवून देतो. मुक्तेश्वरी वाङ्मयाचे अभ्यासक डॉ. र. बा.मंचरकर यांनी 'संक्षेपरामायणातील' मुक्तेश्वराच्या नवशिकेपणातील अनुकरण प्रवृत्तीवर चांगला प्रकाश टाकला आहे. संक्षेप रामायणातील बालकांड श्रावणवध, दैत्याशी युद्ध, कैकयीचे साह्य, इंद्रब्रहस्पतीचा संतोष, पुत्रासाठी ऋष्नशंगाला आमंत्रण हा कथाभाग अत्यंत वेगाने आला आहे. अरण्यकांडात राम, दशरथ, भरत यांना महत्त्व दिले आहे. अनेक संघर्ष आहेत. रामाचे आदर्श, कठोर, धीरोदात्त व कोमल असे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. कैकयी-मंथरा, कैकयी-दशरथ, राम-कैकयीच्या संवादातून ही कथा सांगितली आहे. उदात्त, करुण व भक्ती हे तीन प्रमुख रस या कांडात आहेत. अरण्यकांडाची सुरुवात भारतीय रामकथेप्रमाणेच आहे. अनेक युद्ध प्रसंगांनी वीररस निर्माण झाला आहे.

सीताशोध, जटायूवध, रामविलाप यासारख्या प्रसंगांनीही कांडाची रचना झाली आहे. परंतु 'उमा-राघव भेटीचा प्रसंग त्याला जमलाच नाही' असे डॉ. लीला गोविलकर म्हणतात. महाराष्ट्र जे सर्व राष्ट्रांशी राजे। जयाच्या भये व्यापिले देवलाजे । असा महाराष्ट्राचा अभिमान त्यांनी यात व्यक्त केला. रामायणातील सुंदर कांड, युद्धकांड यावरील त्यांची ही रचना रामदासांच्या रचनेशी साधर्म्य साधणारी आहे.

या रामायणात मुक्तेश्वराने जयदेव, भतृहरी, जगन्नाथ, कालिदास या विख्यात संस्कृत कवींच्या ग्रंथातील श्लोकांचे भाषांतर करून ते कथानकात गुंतले आहे. संत एकनाथांकडून स्फूर्ती घेऊन मुक्तेश्वरांनी संक्षेप रामायण रचले असावे. विविध छंदामध्ये रामायण लिहिण्याचा पहिला मान मुक्तेश्वरांना मिळाला. संक्षेप रामायण लिहिण्यापूर्वी मुक्तेश्वरांनी संस्कृतचा अभ्यास केलेला असावा. त्यानी जनदेवाचे 'प्रसन्नराघव', भृतहरीची शतके, जगन्नाथाचे भामिनीविलास, कालिदासाचे कुमारसंभव अभ्यासले असावे. त्यामुळे ही संस्कृत श्लोकांची मराठी रूपांतरे आस्वाद घेण्यास उत्तम उतरली नाहीत. व्याकरणाचे नियम, शब्दांची ओढाताण व यमके यांनी हा नवखा कवी गांगरलेला दिसतो. इथे अध्यात्मिकता विरळ आहे तर कथात्मकता गडद आहे. रचनेतील ओबडधोबडपणा यावरूनही त्यांची प्रारंभ काळातील रचना असल्याचे जाणवते. शब्दालंकाराच्या हौसेमुळे अनेक ठिकाणी काव्य प्रसादहीन, कृत्रिम व क्लिष्ट झाले आहे.

### ३.४.३ महाभारत :

या ग्रंथाच्या रचनेमुळे मुक्तेश्वराना खूप प्रसिध्दी मिळाली. अभ्यासकांनी साहित्यसम्राट, साहित्यातील कोहिनूर, कवीवर, कलाकवी, ओवीकविचा ईश्वरू म्हणून त्यांचा गौरव केला. या कवीने महाभारतातील अनेक उत्कट समर प्रसंग, घटना त्यांच्यावर आपल्या प्रतिभेचा विलास चढविला. मुक्तेश्वरी महाभारतातील आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तीक ही पाच पर्वे उपलब्ध आहेत. मूळ संस्कृत महाभारत पुढे ठेवून त्याने ही पाच पर्वे रचली. तसेच प्राकृत भारतीय ग्रंथही त्यांनी अभ्यासले होते. महाभारतात मुळात जे नाही तेही त्यांनी कल्पनेने सांगितले आहे.

मुक्तेश्वरांच्या उपलब्ध पर्वाची नावें - (१) आदि (२) सभा (३) वन (४) विराट (५) सौप्तिक अशी आहेत. आदिपर्वाची ओवीसंख्या ७१२३, सभापर्वाची २७००, वनपर्वाची ९९१ व सौप्तिकपर्वाची ५०० आहे. महाकवीची प्रतिभा मुक्तेश्वरांजवळ असल्याचा साक्षात्कार त्यांच्या महाभारतातील आदिपर्व, सभापर्व, वनपर्व आणि विराटपर्व या विदग्ध रचनेवरून होतो. रसोत्कटता आणि कल्पनाविलास ह्या दोन्हींचा संगम त्यांच्या कवित्वात आढळतो. प्रसंगचित्रण आणि रसनिर्मिती मुक्तेश्वरांना चांगली साधते. उत्कट भावना, पल्लेदार कल्पना, स्वतंत्र प्रसंगयोजना आणि प्रभावी शैली हे त्यांचे खास विशेष आहेत. मुक्तेश्वरांना रूपक योजना आवडते. उदा., 'गगन समुद्री मुक्ताफळे। अरुणचंचुने कनम मराळे । वेंचोनि घेतां कलाकुशले । नाहीच केली नक्षत्रे ।।' येथे पहाटेच्या वेळी आकाशात नक्षत्रे लोप पावल्याचे वर्णन केलेले आहे. मुक्तेश्वरांच्या रसनिर्मितीत आणि प्रसंगवर्णनात त्यांच्या ओघवती आणि रसानुकूल कधी मृदू तर कधी कठोर बनणाऱ्या शैलीचा मोठा वाटा आहे.

मुक्तेश्वरांना मानवी स्वभावाची पुरती जाण असून समाजातील रीतीरिवाज, वस्त्रे, पक्वाने, देशातील बाजारपेठा,

नव्या-जुन्या राजांची नावे, कुस्त्यांचे डावपेच, युद्धातील शस्त्रास्त्रे, रत्नांची आणि अलंकारांची नांवे, इत्यादी तपशिलवारपणे माहिती आहेत. सूर्योदय, सूर्यास्त, पावसाळा, नदीकाठ, अरण्ये व पर्वत, इत्यादी गोष्टींची त्यांनी केलेली वर्णने त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची आणि निसर्गप्रेमाची साक्ष देतात. मुक्तेश्वरांच्या काव्याचे पंडिती वळण, अर्थहीन यमके, खोचक प्रश्नोत्तरे, मुग्धशृंगार, नाजूक उपहास, मोहकवर्णने, तत्त्वज्ञानपूर्ण सूचक रूपके, विविध रसनिर्मिती अशी काही वैशिष्ट्ये सांगता येतील. आपल्यातील या प्रचंड सामर्थ्याची जाणीव खुद्द मुक्तेश्वरांना आहे. हे त्यांच्या पुढील उद्‌गारावरून दिसते. 'इतिश्रीभारतकथा गहन । निरोपणरूपें समुद्रमंथन। सभा-प्रमेय-पीयूषपान। दैवयोगें लाधलें। मग मुक्तेश्वरांची वाङ्मयोहिनी । दुर्जनदैत्याने ठकोनी। सज्जनदेव जनांच्या श्रेणी । अमर करील प्राशने।। ' महाभारत अथांग सागर आहे. त्याचे मंथन मी माझ्या बुद्धिबळाने करून श्रोत्यांना सभापर्वातील कथामृत वाढले आहे. त्यांचे भाग्य थोर म्हणूनच त्यांना हा लाभ झाला. मात्र माझी वाणी त्या मोहिनी अवतारासारखीच आहे. ती दुर्जनांचे वंचन करून सज्जनांना अमृतपानानें अमर करील. 'मुक्तेश्वरांची गुण सुढाळे। वचन-शुक्तिका-मुक्ताफळे। सज्जन-राजहंस-पाळे । भाग्यागळें सेविती ।।' त्यांची वृत्ती महाभारताला जास्त अनुकूल होती.

या ग्रंथामध्ये गुरुवंदन, श्रोत्यांना वंदन, महाराष्ट्र व मराठीचा अभिमान अभिव्यक्त झाला आहे. संस्कृत-प्राकृत असा वाद न घालता त्यातील गंगोदक तेवढे घ्या असे त्याने सूचित केले आहे. ययाती आख्यान, दुष्यंत-शकुंतला आख्यान, नल दमयंती आख्यान, सावित्री आख्यान जरासंधवध, द्रोपदी वस्त्रहरण, आदि, सभा, वन पर्व सुरस उतरली आहेत. प्रसंगनिर्मिती, जिवंत व्यक्तिचित्रे, निसर्गवर्णने वाङ्मयीन रसाविष्कार, कल्पनाविलास, खाद्यपदार्थ त्याच्या मराठी मनाची साक्ष पटवितात. तसेच ते सामाजिक नीतिमूल्यांची धडेही आपल्या कथा निवेदनातून देतात.

### ३.४.४ इतर रचना :

रामायण आणि महाभारत या प्रमुख ग्रंथावर कलावैभव चढविल्यानंतर त्यांनी हरिश्चंद्राख्यान, शतमुखरावणवधाख्यान, मूर्खांची लक्षणे, भगवद्‌गीता, शुभारंभ संवाद, एकनाथ चरित्र व भक्तिपर पदे व आरत्या रचल्या त्यांनी एक उत्तर कांड रामायण लिहिले त्यांची एकूण रचना १७००० आहे.

### ३.४.४.१ स्फुट प्रकरणे :

मुक्तेश्वरांच्या स्फुट प्रकरणांपैकी हरिश्चंद्राख्यान, मूर्खांची लक्षणे व शुकरंभासंवाद ही तीनच सरस आहेत. अध्यात्मज्ञान व भक्ती यांचा उपदेश करणारी मुक्तेश्वरांची पद्यरचना त्यांची नीतिशिक्षकाची भूमिका स्पष्ट करते. ढोंगी गुरू व खोटा शिष्य यांचा ते खरपूस समाचार घेताना म्हणतात -'गृह त्यागुनी, मठाची माया। शिष्यिणी करूनी, त्यागी जया ।। सुहृद त्यजोनि, घरी शिष्य समुदाया । तो एक मूर्ख ।।. ४६७ ओव्यांचे शुकरंभासंवाद हे तर सर्वोत्कृष्ट आहे. लावण्यखाणी रंभा वैराग्यभूषण शुकाला कामवासनेच्या जाळ्यात ओढण्यासाठी त्याच्यावर आक्रमण करते. एका बाजुला देहसुखाची आसक्ती तर दुसऱ्या बाजूला विवेकयुक्त विरक्ती असा परमार्थ मार्गातील सनातन संग्राम इथे उग्रभीषण व दिव्य स्वरूपात प्रकटला आहे. या संग्रामात देहसुख पूर्णपणे पराभूत होऊन ते आत्मसुखाला शरण गेले आहे. शुकमुनी रंभेला देहसुखाचेनिर्थकत्व दाखवून नरदेहाचा उपयोग ईशप्राप्तीसाठी

केला पाहिजे, हे पटवून देतो. शेवटी रंभा शुकमुनीची मनापासून स्तुती करते. उत्कट भाव, ओजस्वी कल्पनाविलास व उत्कृष्ट संवादकौशल्य ही या काव्याची वैशिष्ट्ये आहेत.'

थोडक्यात, 'विशाल कल्पना, उत्कट भावना, उदात्त विचार, संपन्न चित्रण, रेखीव शब्दचित्रे, ओघवती शैली आणि जातिवंत मराठी भाषा या वैशिष्ट्यामुळे श्रेष्ठ दर्जाचा प्रतिभासंपन्न कलावंत हे मुक्तेश्वराचे स्थान मराठी साहित्यात अढळ होऊन राहिले आहे.' (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप – पृष्ठ ११५) असे ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, 'आता सारस्वत फल संभारी । कल्पलतिका अति साजिरी । ज्ञानगंगेचा ब्रह्मगिरी । वेष ब्रह्मकुमरीचा ।। नवरसांची मंदाकिनी । महिमेने वाही त्रिभुवनी । तिही लोकां वरदायिनी । देवत्रया पढियंती ।।' कवित्वाची अंगे म्हणून त्यात पांडित्य, कल्पनाविलास, अलंकरण, लालित्य, रसात्मकता यांवर भर दिला आहे. शृंगार आणि परमार्थ या दोन्ही गोष्टींकडे ते कवी म्हणून पाहतात. या दोन्ही गोष्टींचे ते उत्कटपणे रस, अलंकार यांच्या उत्कर्षाने सारखेच परिणामकारक वर्णन करतात. हा त्यांच्या प्रतिभेचा विशेष आहे. 'प्रदीर्घ अशी पहिली श्लोकबद्ध रचना मुक्तेश्वरांनीच केली आहे' असे रा. श्री. जोग म्हणतात. मुक्तेश्वरांच्या काव्यकर्तृत्वाचा गौरव करताना अ. ना. देशपांडे म्हणतात, 'मुक्तेश्वराने प्राचीन मराठीतील आख्यानक काव्याचे दालन आपल्या रसालंकार बहल प्रतिभेने निश्चितच समृद्ध केलेले आहे. कथानिवेदन, स्वभावदर्शन, आणि प्रसंगचित्रण ही कथाकाव्याची तिन्ही अंगे खुलविण्यात व सजविण्यात त्याला स्पृहणीय यश लाभले. त्याच्या कथानिवेदनात ओघ आहे, वेग आहे, जिवंत उत्साह आहे. मधूनच कथा प्रसंगातून ते चार सदुपदेशाच्या गोष्टी सांगतात. कथेतील व्यक्ती व प्रसंग यांना साक्षात श्रोत्यांच्या, वाचकांच्या डोळ्यांपुढे प्रकट करतात. या तिन्ही अंगांचे भरतकाम करणारे त्यांचे शब्दरूपी मणी पाणीदार, टपोरेदार आहेत. कारण त्याची भाषा संस्कृत शब्द प्राचुर्यामुळे प्रौढ झाली आहे. रस, कल्पना आणि भाषा या तिन्ही प्रांतातील मुक्तेश्वरोचे प्रभुत्व निर्विवाद आहे.' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग चौथा, अ.ना. देशपांडे, पृष्ठ ३९९).

मुक्तेश्वरांनी रामायण-महाभारताच्या निमित्ताने आपल्या काव्यातून लौकिक भावांचे चित्रण रसिकपणे केले. व्यासांच्या ग्रंथाचे सोने घेऊन त्याचे देशी भाषेत लेणे घडविले. महाराष्ट्र आणि मराठीचा अभिमान प्रगट केला. विद्वत, रसिकत्व व कवित्वाचा सुरेख संगम त्यांच्या व्यक्तित्वात एकत्रित पहावयास मिळतो. गुरु आणि श्रोत्याविषयी असणारा आदर त्यांची विनित वृत्ती दाखवतो, सरस व्यक्तिचित्रण, सजग प्रसंगचित्रण, वाङ्मयीन रस परिपोष, व्यासंग, बहुश्रुतता ही त्यांच्या काव्याची बलस्थाने आहेत. सामाजिक स्थितीगतीचे चित्रण करणारा हा कवी नीतिमूल्येही शिकवतो. कवित्वाबरोबर समाज शिक्षकाची भूमिकाही पार पाडतात.

### ३.५ वामनपंडित :

पंडिती काव्यात 'यमक्या वामन' म्हणून वामनपंडित यांना ओळखले जाते. वामनपंडितांचा कालखंड इ.स. १६०८ ते १६९५ असा आहे. वामनपंडित हे पंडितकवींचे प्रातिनिधिक कवी आहेत. 'पांडित्य आणि कवित्व यांचा संयोग त्यांच्या रचनेत पाहावयास मिळतो. वामन पंडितांची स्तुती करताना मोरोपंतांनी भक्ती-ज्ञान-रस-भारित यत्कवन' असे म्हटले आहे. त्यांचा जन्म इ.स.१६०८ मध्ये झाला असावा. वामन एक की अनेक याबाबत अभ्यासकांत मतभेद आहेत. द.सी. पंगू यांनी आपल्या 'प्राचीन मराठी कवी पंचकात' मात्र वामनपंडित म्हणजे

यथार्थदीपिकाकार वसिष्ठगोत्री वामन स्वामी शेषे असा निर्णय दिला आहे. त्यांच्याविषयी अत्यल्प माहिती उपलब्ध आहे. त्यांचे आई-वडील, पत्नी, गुरु सच्चिदानंद यांच्या भेटीचा उल्लेख अशी काही माहिती मिळते. काशीतील बारा वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी अनेक पंडितांना वादात जिंकले होते.पुढे ते संत तुकाराम व रामदास यांना भेटले. त्यांना गुरू श्रीसच्चिदानंद स्वामींचा उपदेश करवीर परिसरात लाभला. महालक्ष्मी मंदिरात नामसुधा हे प्रकरण त्यांनी रचले. पुढे वारणाकाठी शिगाव-कोरेगाव येथे जाऊन ते राहिले. त्यांनी बरेच ग्रंथ लिहिले. इ.स. १६९५ मध्ये गुरहगर नजिक भूगावी त्यांनी समाधी घेतली.

'ओवी ज्ञानेशाची तसा सुश्लोक वामनाचा' अशी पंक्ती प्रसिद्ध आहे. वेगवेगळ्या वृत्तात श्लोक लिहिण्यात वामन यांचा हातखंडा होता. शृंगार आणि अध्यात्मात रमणारा हा व्यासंगी पंडितकवी होता. वामन म्हणून ते लोकांना परिचित होते. वृत्तवैचित्र्य, रसाळभाषा, समर्पक अलंकार योजना यामुळे त्याची अख्यान कविता बहरली, फुलून आली.

### ३.५.१ वामनाचे साहित्य :

वामन पंडितांच्या काव्याचे वेदांत विषयक, पौराणिक, आख्यानपर व भाषांतरित असे तीन भाग आहेत. त्यांच्या काव्यपंक्तीची संख्या सामान्यपणे चाळीस हजार असून, त्यातील अर्धा भाग वेदांत निरूपणास वाहिला आहे. त्यातून त्यांचा सखोल व्यासंग दिसतो. 'निगमसार', 'यथार्थदीपिका', 'चित्सुधा', तत्त्वमाला, 'श्रुतिसार', 'कर्मतत्त्व', 'राजयोग' व 'गीतार्णवसुधा' हे त्यांचे ग्रंथ आहेत. निगमसार, कर्मतत्त्व, ब्रह्मस्तुती, अनुभूतिलेश ही वामनांची वेदांतपर रचना आहे. वामन पंडितांनी प्रथम 'समश्लोकी गीताटीका' लिहिली आणि नंतर 'यथार्थदीपिका' लिहून ज्ञानयुक्तसगुणभक्तीचे प्रतिपादन केले. वामनांचे कवित्व पाहावयाचे म्हणजे त्यांची अख्यानपर रचना अभ्यासावी लागते. रामायण, महाभारत, भागवत यांतील काही निवडक प्रसंगांवर वामनांनी आख्याने रचली आहेत.

रामजन्म, अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव आणि लोपामुद्रासंवाद ही रामकथेवर आधारित प्रकरणे आहेत. वामनांच्या नावावर उपलब्ध असलेल्या महाभारतातील आख्यानांबाबत मतमतांतरे आहेत. वामनपंडितांची भागवताश्रय रचना अधिक सरस आहे. गजेंद्रमोक्ष, नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, मृत्तिका.भक्षण, हरिविलास, रासक्रीडा, वामनचरित्र, कात्यायनीव्रत, बालक्रीडा, कृष्णजन्म, इत्यादी आख्यान रचना त्यांनी केली आहे. त्यांची ग्रंथरचना विपूल आहे. त्यात वैविध्य आहे. तत्त्वज्ञान, आख्यान, अध्यात्म या तिन्ही प्रकारात त्यांनी सुमारे चाळीस हजार श्लोक रचना केली आहे.

### ३.५.२ निगमसार :

वामन पंडितांनी वेदांत निरुपणासाठी इ.स. १६७३ मध्ये निगमसार हा ग्रंथ लिहिला. 'ग्रंथ हा निगमसार शब्द थोडे अर्थ फार' अशा अर्थाचा मोठेपणा कवीने व्यक्त केला आहे. इ. स. १६७३ मध्ये रचलेल्या ह्या ग्रंथात वामनाने त्यांच्या गुरुने घडविलेल्या भार्गवी वारूणी विद्येचे विवेचन केले आहे. निगमसार हा ग्रंथ नावाप्रमाणेच वेदान्ताचे थोडक्यात सार सांगतो. ग्रंथाचे नाम निगमसार । वेदांमाजी तोचि विस्तार । संक्षेपे करोनि तो प्रकार। बोलिजेल।।' पुरुष-प्रकृती, ब्रह्म-माया, जग-जगदात्मा यांच्या संबंधांचा विचार या ग्रंथात मांडला आहे.

वामनाची येथील मांडणी अल्पाक्षर सुबोध असल्याने हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय झाला आहे. ग्रंथ मांडणी पंडिती वळणाची आहे. ग्रंथ हा निगमसार । शब्द थोडे अर्थ फार । असे लेखनशैलीचे मोठेपण इथे सांगितले आहे. याचे अध्याय नत्र । नवहि निधीअभिनव । अनंत वेदांचे वैभव । या इतकुीयामध्ये ।।' नऊ अध्याय असलेल्या या ग्रंथात रेखीवपणा व नेमकेपणा यांचे सौंदर्य जाणवते. श्रुतिवचनांचे आधार घेऊन त्यांचे विवरण करण्याची पंडिती शैली इथे दिसते. 'गुळ आणि गोडी दोनी' न कळती शब्द करुनी । गूळ दाविता कळे नयनी । चाखिता गोडीरचनेसी ।' वरील काव्यपंक्तीतून वामनाच्या ठिकाणी असणारा लेखनातील चिकित्सकपणा, सुगम व तार्किक विवेचन पद्धतीची कल्पना सहज येते.

### ३.५.३ समश्लोकी टीका :

श्रीकृष्णाने संस्कृतमध्ये जे तत्त्वज्ञान सांगितले ते सामान्य जनांना समजावे या हेतूने वामनपंडितांनी ही गीताटिका मराठीत लिहिली. ही श्लोकरचना अनुष्टुभ वृत्तांत आहे. समश्लोकी टीकेचे स्वरूप सांगताना वामनपंडित म्हणतात - 'समश्लोकी इचे जितुके श्लोक मुळीचे । टीकेचे तितुके श्लोक, सज्जनानंदकारक।।' मोरोपंत या गीतेचा गौरव असा 'रीती समश्लोकीची अतुला साधेल काय न त्यास । हा सुयशे होईल का रोमांचव्याप्तकाय न नाव, करतात त्यास।।' प्रत्येक अध्यायाला त्यांनी उपोद्घात आणि उपसंहार जोडला असून लेखनपूर्तीबद्दल संतोष प्रकट केला आहे.

ग्रंथाच्या शेवटी लेखनपूर्तीबद्दल 'माता धन्य पिता धन्य, धन्य धन्य सुहृत्सखे' असे समाधानाचे उद्‌गार काढले आहेत. ही गीता वाचकाला श्रवण-पठण केल्याने मोक्ष देते. अशी फलश्रुती सांगितली आहे. या ग्रंथास समश्लोकी असे नाव स्वत: वामनपंडित यांनीच दिले आहे. या ग्रंथाची श्लोकरचना अनुष्टुभ छंदात असून यातील भाषानैपुण्य उत्कृष्ट आहे. यातील प्रत्येक अध्यायाला प्रास्ताविक व समारोप आहे.

### ३.५.४ यथार्थदीपिका :

यथार्थदीपिका ही बावीस हजार ओव्यांची गीताटीका. हा त्यांचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ. ज्ञानेश्वरीप्रमाणे अद्वैत व भक्ती सांगणारा, पण त्याचे रूप अगदी निराळे आहे. साधार विवेचन, सुसंगत तत्त्वज्ञान आणि तर्कशुद्ध प्रतिपादन हे तिचे विशेष आहेत. गीतेवर वामनांनी समश्लोकी टीकाही लिहिली आहे. ती अतिशय सुबोध असून यथार्थदीपिकेशी संपूर्ण मिळतीजुळती आहे. 'सुश्लोक वामनाचा' ही कीर्ती वामनांना त्यांच्या आख्यान कवितेमुळे मिळाली आहे. वामन प्रसंग वर्णने सुरेख करतात. शब्दचित्रे रेखीव व मोहक काढतात, यमकांचा सोस व अलंकारांचा हव्यास जेथे नसतो तेथे त्यांची रचना सुबक असते. या ग्रंथात गीतेतील श्लोकांचा अर्थ जसाच्या तसा सांगणे एवढाच पंडितांचा हेतू दिसून येतो. मराठीत आतापर्यंत गीतेवर अनेकांनी भाष्ये लिहिली. पण कोणत्याच भाषेत गीतेचे तत्त्वज्ञान यथायोग्य मांडले नाही. असा वामन पंडितांचा दावा होता. आपणच गीतेचा अर्थ सांगावा या हेतूने ते ग्रंथलेखनास प्रवृत्त झाले. 'टीका उदंड झाल्या । परी देवतास तदुपासकास भ्याल्या। यथार्थ अर्थ नाही बोलील्या । तैसे न्हव्हे ही टीका ।। असे इतर भाष्यकारांचा उपहास त्यांनी या ग्रंथामध्ये केला आहे. ज्ञानेश्वर दासोपंताच्या वर त्यांनी टीका केली. 'जगी मिरवेनिमा सिध्दी । आपल्या टीकेची केली सिध्दी' असा टोमणा वामनाने ज्ञानेश्वरांना मारला आहे. भावार्थदीपिकेच्या पार्श्वभूमीवर यथार्थदीपिका असे नाव आपल्या टीकेला

वामनांनी दिले आहे. श्रोत्यांची पर्वा न करता ईश्वरावर श्रद्धा ठेवून ते निरूपण करतात. तर्कशुद्ध विचार, निवेदनाचा वकिलीथाट यामुळे हा ग्रंथ काव्यगुणांपासून दुरावला आहे.

### ३.५.५ वामनपंडितांची आख्यानक कविता :

वरील अध्यात्मप्रवण भाष्यग्रंथापेक्षाही आख्यानक कवितेमधूनच वामनांच्या रसिक आणि पांडित्यपूर्ण व्यक्तिमत्वाची खरी ओळख पटते. ल. रा. नसिराबादकर लिहितात 'ते पंडित कवींचे खरे प्रतिनिधी होते, याची साक्ष ही आख्यान कविता देते. वामनांनी विपूल आख्याने लिहिली असून भागवत आणि रामायण ही त्यांच्या कथांची गंगोत्री आहे. नाथांच्या भक्तिप्रवण भागवत रचनेचा हा संस्कार असावा, असा काही अभ्यासकांचा कयास आहे. रामजन्म, अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, भरतभाव, लोपामुद्रासंवाद ही वामनांची आख्याने रामाणयातील आहेत, तर कृष्णजन्म, बालक्रीडा, वनसुधा, वेणुसुधा, मृत्तिकाभक्षण, भामाविलास, राधाविलास, राधाभुजंग, रासक्रीडा, कंसवध, कात्यायनीवत ही आख्याने भागवताधारित आहेत. याशिवाय शुकरंभासंवाद, गजेन्द्रमोक्ष, वामनचरित्र अशी काही वेगळी आख्याने आहेत.' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास ल. रा. नसिराबादकर पृष्ठ क्रमांक १५४)

शुकरंभासंवाद, गजेंद्रमोक्ष, वामनचरित्र इ. आख्यान श्लोकबद्ध आहेत. त्यांची कृष्णचरित्र वरील आख्याने शृंगाराने भिजलेली आहेत. काही ठिकाणी शृंगाराचा अतिरेक झाला आहे. रामकथेत शृंगाराला वाव नसल्याने ती आकर्षक झालेली नाहीत. भागवत आख्यानेही त्यांची मराठी कवितेला देणगीच आहे. पंचसुधा ही कृष्णभक्तीची प्रकरणे आहेत. नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, चित्तसुधा, प्रियसुधा वर्णने चित्रित झाली आहेत. वेणूसुधा यामध्ये वेणू नादाने गोपिकांची आतुर अवस्था चित्रित झाली आहे. तर चित्तसुधा मध्ये वेदांत विवरण आले आहे. प्रियसुधा आपली प्रिय पत्नी गीराबाईला आत्मज्ञानाच्या उपदेशासाठी वामन पंडितांनी प्रियसुधा लिहिलेल्या आहेत. द्वारकाविजय भागवताच्या दशम स्कंधावर आधारित कवीने हरीचा गौरव केला आहे. या खंडकाव्याची वैशिष्ट्ये प्रतीत होत असल्याने मराठीत खंडकाव्यरचनेचा पाया या काव्यातून त्यांनी घातला.

याबरोबरच वामन पंडितांनी शंकराचार्यांच्या अपरोक्षाअनुभूती, समश्लोकी, भगवद्‌गीता, जगन्नाथाची गंगालहरी, भृत्तहरीचे नीतिशतक, शृंगारशतक, वैराग्यशतक यांची मराठी भाषांतरे केली आहेत. संस्कृत प्रकरणे सिद्धांत विजय व अनुभूतीलेश ही प्रकरणे त्यांनी संस्कृतातून लिहिली आहेत. वामनपंडित यांनी काही स्फूट रचना केलेली आढळते. करुणाष्टके, उद्देशमाला, मनासबोध, वामनबोध, भगवतदास्य अशी स्फूट रचना त्यांच्या नावावर आहे.

ही सर्व आख्याने विविध श्लोकवृत्तातमक असून प्रत्येक आख्यानाच्या प्रारंभी मंगलाचरण आहे आणि त्या मंगलाचरणातच त्या आख्यानाचे सारही सांगितले आहे. कृष्णचरित्रपर आख्यानात वामनांच्या रसिकतेचा प्रत्यय येतो. वामनांच्या मते, केवळ लोकवार्तेची काव्ये वृथा असून मनाला हरिकथेचा छंद हवा. ही हरिकथा शृंगारात भिजलेली पाहणे त्यांना आवडते. विद्वत्ता, यमक, अनुप्रासात्मक रचना, पांडित्य प्रदर्शनाची हौस, शृंगारासक्ती, रसाळभाषा, वृत्तवैचित्र यामुळे त्यांच्या आख्यानकविताना महत्त्वाचे स्थान आहे.

### ३.६ रघुनाथपंडित :

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण काव्यगुणांनी पंडिती कवींच्या संप्रदायात रघुनाथपंडित याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. रघुनाथपंडित व त्याचा स्थलकाल याविषयी संशोधकात मतभेद आहेत. ते शिवकाळातील असावेत. शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील न्यायशास्त्री पंडितराव हेच रघुनाथपंडित असावेत असे मत आ. का. प्रियोळकर म्हणतात. तर तो राज्यव्यवहाराकोशकार रघुनाथ नारायण हणमंते असावेत असे मत द. सी. पंगू यांनी मांडले आहे. रघुनाथपंडित यांनी अत्यल्प काव्यलेखन केले. तसेच ते समर्थभक्तही होते.

**रघुनाथपंडित यांची काव्यरचना :**

रघुनाथपंडित यांनी रामदास वर्णन, गजेंद्रमोक्ष, दमयंतीस्वयंवर अशी मोजकीच काव्यरचना केली. तिचे स्वरूप पुढीलप्रमाणे पाहता येईल.

#### ३.६.१ रामदास वर्णन :

'रामदास वर्णन' हे त्यांचे पहिले काव्य. रघुनाथपंडित समर्थभक्त होते. त्यामुळे त्यांनी रामदासवर्णन लिहिले असावे. वसंततिलका या वृत्तात त्याचे लेखन झाले असून ते अकरा श्लोकांचे आहे. यात वसंततिलका वृत्तातील अकरा श्लोक आहेत. त्यात समर्थांच्या गिरीकंदरी विहरण्याचा व लेखन सामग्री सोबत ठेवण्याचा उल्लेख आहे. गजेंद्रमोक्ष हे भगवताधारीत प्रकरण आहे. त्यात विविध वृत्तांतील ५८ श्लोक आहेत. ही रचना कल्पनारम्य कला विलासाने समृद्ध अशी आहे. रामदासांचा गिरीभ्रमणाचा छंद, त्यांच्या कपाळावरील आळू व नेहमी कागद लेखणी बरोबर ठेवण्याची त्यांची सवय यांचा ऊहापोह या काव्यात केला आहे. रामदासांचे हे पहिलेच काव्य आहे.

#### ३.६.२ गजेंद्रमोक्ष :

रघुनाथपंडितांनी गजेंद्रमोक्ष हे विविध वृत्तातले प्रकरण लिहिले. ते भागवतातील आख्यानावर आधारलेले असून ५८ श्लोकांचे आहे. रघुनाथांनी विविध वृत्त, अलंकाराचा वापर करुन आपली काव्यकृती काव्यगुणाने सरस बनवली. दमयंती स्वयंवर यासारखे नितांत रमणीय काव्य रचले. संस्कृतातील पंचमहाकाव्य समोर ठेवून मराठी काव्यरचना केली. यमकासोबत, प्रासादात्मक लेखनाच्या हव्यासाने प्रदीर्घ सामाजिक रचनेमुळे काही ठिकाणी प्रासादहानी होऊन कृत्रिमता आली आहे. तरीसुद्धा काव्यसौंदर्य व कल्पनाविलासामुळे रघुनाथपंडित यांचे 'दमयंती स्वयंवर' इतर स्वयंवर काव्यापेक्षा आजही लोकप्रिय आहे.

#### ३.६.३ दमयंती स्वयंवर :

श्रीहर्ष या कवीच्या संस्कृत पंचकाव्यात मोडणाऱ्या नैषधचरित्राच्या आधाराने रचलेले पण अनेक दृष्टीने स्वतंत्र असे हे काव्य आहे. मुळातील १४ सर्ग आणि १७५० श्लोकांची विस्तृत कथा कवीने २५४ श्लोकांच्या आटोपशीर मर्यादेत आणली आहे. यात 'दमयंती स्वयंवर' पर्यंतचा कथाभाग आला आहे. त्यांनी करुण रसाला गौण स्थान देऊन शृंगाराला झुकते माप दिले आहे. कल्पना नैषीधचरित्रातील जरी असल्या तरी श्लोक मात्र स्वतंत्रपणे रचले आहेत.

नलदमयंतीचे मूळ आख्यान महाभारताच्या वनपर्वातील आहे. पण रघुनाथपंडितांनी व्यासांचा आधार न घेता श्रीहर्षानेनैषधीय चरित्रच डोळ्यापुढे ठेवलेले दिसते. श्री. अ. का. प्रियोळकरांनी आपल्या व्यासंगी प्रतिपादनात, दमयंती स्वयंवरा नंतर रघुनाथपंडितांनी नैषधाचे अर्थानुवाद अनेक ठिकाणी कसे केले आहेत ते समानार्थी श्लोक देऊन स्पष्ट केले आहे. रघुनाथपंडितांजवळ चांगल्या प्रकारची कवित्वशक्ती असल्याने त्यांचे हे २५४ श्लोकांचे लहानशे खंडकाव्य सुरस झाले आहे. प्रमाणबद्ध व आकृतीसौंदर्य युक्त हे काव्य झाले आहे. 'कथा बोलो हे मधुर सुधाधारा। होय शृंगारा करुणरसा थारा ।।' ही रघुनाथपंडितांची प्रतिज्ञा, संपूर्ण नैषधीय मराठीत आणावे ही त्यांची इच्छा. पण कथेला फक्त स्वयंवर कथेचे स्वरूप आले. या काव्यातील भीमक, नल, दमयंती यांची व्यक्तिचित्रे तसेच राजहंसाचे चित्र मनोहर आहे. 'कठीण समय येता कोण कामास येतो?' हे त्यांचे उद्‌गार 'म्हातारी उडतानयेची तिजला माता मदिया अशी' अशा प्रकारचे आपल्या आईचे वर्णन, तसेच त्याला धरू पाहणारी दमयंती व दूर पळणारा हंस ही वर्णने सुमधुर आहेत. नलाच्या विरहाचे वर्णनही मार्मिक आहे. 'भृगे विराजित नवीं अरविंद पत्रे । पाहूनि मानुनि तिचीच विशाल नेत्रे घालीन अंजन अशा मतिने तटाकीं। आहा वृथा उतरलो भिजलो विलोकी' पंडितांनी स्वभाव वर्णनासह नलाची विरहावस्था व दमयंतीची व्याकुळता रंगवून भाविनाविष्कारही कौशल्याने साधला आहे. वस्तुचे-व्यक्तीचे यथातथ्य वर्णन करुन स्वभायोक्ती आकर्षक आहे. जलविहाराने दमलेल्या राजहंसाचे वर्णन कवीने असे केले आहे. 'त्यातील एक कलहंस तटीं निजेला । जो भागलाजलविहार विशेष केला पोटीच एक पद,लांबविला दुजा तो। पक्षी तनु लपवि, भूप तया पहातो,' किंवा 'ती शितलो उपचारी जागी झाली, हळून मग बोले, औषध न लगे मजला, परसुनि जननी बरे म्हणूनी डोले' हा श्लोक स्वभावोक्तीचे सुंदर उदाहरण आहे. हंस नल भेट, हंस दमयंती संवाद, नलदमयंती भेट हे प्रसंग अत्यंत ह्रदयपूर्ण आहेत. कलात्मकता, उत्कृष्ट प्रसंगनिर्मिती, वर्णनचातुर्य, विषयानुरूप वातावरण निर्मिती, स्वभावविशेष कवीने मनोवेधक असे चित्रित केले आहेत. हंस, नल आणि दमयंती यांची व्यक्तिमत्वे लोभस आणि मनोहारी असून त्यामुळे हे काव्य विलोभनीय झाले आहे. हे काव्य विविध अलंकारांनी सजविले आहे. त्याबरोबरीने पंडितकवीने वृत्तवैविध्याचाही चपखल व अचूक वापर केला आहे.

**३.७ श्रीधर :**

श्रीधर कवी हा महाराष्ट्राचा अत्यंत आवडता कवी. त्यांचे ग्रंथ आज घरोघरी पोहचले आहेत. श्रीधर म्हणजे भक्तिरसामृताचा झरा. आपल्या रसाळ वाणी, लेखणीचे सामर्थ्य सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविणारा लोकप्रिय पंडित कवी श्रीधर नाझरेकर. नाझरे संस्थानचे कुलकर्णी. यांचा जन्म इ.स. १६५८ मध्ये पंढरपूर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सावित्री, वडिलांचे नाव ब्रह्मानंद, त्यांनी 'आत्मप्रकाश' नावाचा ग्रंथ लिहिला असून त्यांचाच वारसा श्रीधरकवीने चालविला. श्रीधर पुत्र दत्तात्रय यांनीही काही रचना केली आहे. श्रीधराचे वास्तव्य व लेखन पंढरपूर येथेच झाले. श्रीधर आनंद संप्रदायी होते. त्यांनी त्यांची गुरुपरंपरा सांगितली आहे. रामानंद-अमलानंद-सजानंद-पूर्णनंद-दत्तानंद-ब्रह्मानंद-श्रीधर या परंपरेवरुन श्रीधरचे वडील त्यांचे गुरु ठरतात.

**श्रीधरांची रचना :**

मुक्तेश्वर जसे कवित्वाच्या दृष्टीने पंडित कवींमध्ये श्रेष्ठ होय. तसेच ते लोकप्रियतेच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ मराठी कवी आहेत. त्यांची वाणी सोपी, रसाळ आणि ओघवती आहे. भक्ती ही श्रीधरांच्या आख्यानकाव्याची बैठक असून राम, कृष्ण, शंकर, गणेश, पार्वती, पांडव, पांडुरंग, मल्हारी, दत्तात्रय या सर्वांच्या कथा ते पांडुरंगाच्या प्रेरणेने आणि भक्तिभावाने वर्णितात. रामायण, महाभारत, हरिवंश, जैमिनीकृत भारत, भागवत व इतर अनेक पुराणे या संस्कृत ग्रंथांच्या आधारे त्यांनी आपली कथानके रंगविली असल्याने त्यामध्ये वैचित्र्य व सर्वसमावेशकपणा आलेला आहे. त्यांनी अमरकोष, सिध्दांतकौमुदी, धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, विविध रामायणे इ. चा अभ्यास केला. श्रीधरांनी अनेकविध स्वरुपाची रसाळ काव्यांची विपूल रचना आत्मविश्वासाने केली आहे. त्यांचे हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, पांडुरंग महात्म, व्यंकटेश महात्म, वेदांतसूर्य, ज्ञानेश्वरचरित्र, याशिवाय काही संस्कृत स्त्रोते, किरकोळ पदे, संस्कृतातील तत्त्वगीता, मल्हारीविजय, जैमिनी प्रकरण इ. रचना लोकप्रिय आहे. ते स्वत: पुराणिक व कीर्तनकार असल्याने विशेष रसाळता त्यांच्या काव्यात उतरली आहे. रामविजयात संस्कृत न कळणाऱ्यासाठी प्राकृत ग्रंथनिर्मिले असे म्हणून दुर्बलांची सोय केली तर 'पांडवप्रताप' हा महाभारतावर जेवढे ग्रंथ झाले त्यातील सर्वांत अधिक लोकप्रिय झाला.

**३.७.१ हरिविजय :**

भागवताच्या दशमस्कंधावर आधारलेला 'हरिविजय' हा ग्रंथ श्रीकृष्णचरित्रपर आहे. श्रीकृष्णभक्तीने प्रेरित होऊन इ.स.१७०२ मध्ये लिहिला. हा ग्रंथ ३६ अध्यायांचा असून तो पंढरपूर क्षेत्री पूर्ण झाला. या ग्रंथात ८१३९ इतक्या ओवीसंख्येतून कृष्णकथा सहजसोप्या शब्दातून सुबोध पध्दतीने मांडली आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण प्रसंग अनेक पुराणातून निवडून श्रीधरांनी हा ग्रंथ लिहिला. भागवताचा दशमस्कंध, हरीवंश, पद्मपुराण, नारदपुराण यांचा आधार घेऊन श्रीकृष्ण जीवनातील अनेक प्रसंगाचे चित्रण कवीने या ग्रंथात केले आहे. श्रीकृष्ण जीवनातील मनोवेधक शब्दात प्रसंगाचे चित्रण कवीने या ग्रंथात केले आहे. कृष्णाच्या बाललीला, त्याच्या उदात्त प्रेमाच्या कामलीला, यांची रससंपन्न चित्रे रेखाटली आहेत. श्रीकृष्णजन्मापासून ते कंसवधापर्यंतच्या भागातील मनोवेधक कला चकीत करणारी आहे. अत्यंत साधे निवेदन, सुबोध भाषा, घरगुती वातावरण आणि नवरसाला पुरुन उरणारी कृष्णकथा यामुळेहा ग्रंथ सुबोध बनला आहे.

या ग्रंथातील एक एक अध्याय म्हणजे एक एक स्वतंत्र आस्मानच आहे. कृष्णाच्या बाललीला वर्णन करताना वत्सल रसाचा सुंदर आविष्कार झाला आहे. श्रीधराने हा ग्रंथ लिहिताना लोकांना अध्यात्माची गोडी लागावी व त्यांची संसारदु:खे कमी व्हावीत हे हेतू समोर ठेवलेले दिसतात. कृष्णाच्या बाललीला, अद्भुत कृत्ये,मथुरेवर स्वारी, कंसवध व अशीच अनेक युध्द वर्णने सुंदर आहेत. त्यामुळे हा ग्रंथ सामान्यांच्या मनाची पकड घेतो. थोडक्यात नाट्यमय प्रसंगनिर्मिती, प्रभावी भक्तिरेखा, सरळ व सुगम भाषा, नित्य परिचित दृष्टांत. भक्तिरसाचा प्रभावी आविष्कार, निवेदन कौशल्य इ. मुळे हा ग्रंथ आकर्षक व रसाळ बनला आहे. यशोदा व नंद बालकृष्णाचे नृत्य पाहत आहेत. मथुरेवर स्वारी करणारा जरासंधाची प्रचंड मोठी सेना, युद्धवर्णने, रासवर्णने या ग्रंथात अतिशय मोहक बनली आहेत. आपल्या ग्रंथाची फलश्रुती सांगताना ते म्हणतात, तीन अवर्तने वाचिता पवित्र । कुळी होन दिन पुत्र । तो भक्तराज महाचतुर । होईल ऐसे जाणिले । श्रीधराचा 'हरिविजय' हा ग्रंथ हरिदासी

पध्दतीने लिहिला आहे. या ग्रंथाचे कर्तृत्व पंढरपुरी झाल्याची माहिती कवीनेच दिली आहे. सुबोध भाषा, परिणामकारक निवेदन व घरगुती वातावरण यामुळे या ग्रंथाला सुरसता आली आहे.

### ३.७.२ श्रीरामविजय :

श्रीधरांच्या 'श्रीरामविजय' या ग्रंथाची ओवीसंख्या ९१४० इतकी असून हा ग्रंथ इ.स. १७३० मध्ये सिद्ध झाला. 'श्रीराम' हाही श्रीधर यांच्या लेखनाचा मुख्य विषय होय. 'श्रीरामविजय' हा ग्रंथ वाल्मिकी रामायण, अध्यात्म रामायण, हनुमननाटक, अग्निपुराण इ. वर आधारलेला आहे. एकनाथांच्या 'भावार्थ रामायणा' चे अनुकरण केले आहे. रामकथा लेखन करणे, रामाचे मोठेपण सांगणे, आपल्या अवाक्याबाहेरचे आहे असे म्हटले आहे. आपला रामकथा लेखनाचा प्रयत्न म्हणजे मेघापुढे ओंजळीने पाणी ओतण्यासारखे आहे. 'रामविजयात श्रीधराने दशरथ-कौशल्या विवाहाची अद्‌भुत कथा सांगितली आहे. यामध्ये रावणाच्या राज्याचा विनाश करून रामाने मिळवलेल्या अभूतपूर्व विजयाचे वर्णन असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या ग्रंथलेखनाच्या पूर्णत्वासाठी कवीने श्रीब्रह्मानंद स्वामींना वंदन करून आशीर्वाद मागितला आहे. तसेच श्रोत्यांनाही वंदन केले आहे. 'ग्रंथाच्या आरंभी श्रीधराने गजाननास वंदन केले आहे.' 'की भ्रताराविण कामिनी । की अत्रि सुताविण रजनी।। तैसे आत्म प्राप्तीवीण प्राणी । व्यर्थ नाडले संसारी' असे सांसारिक दृष्टान्त दिल्याने हा ग्रंथ लोकमान्य झाला आहे.

सीता म्हणजे पद्माक्ष राजाच्या पोटी आलेली लक्ष्मी. त्यामुळे रावणाकडून तिचे हरण व त्याचा नाश या कथा पुराणकथेतून घेतल्या आहेत. एकनाथांच्या 'भावार्थ रामायणा' तील अनेक कथा आल्या आहेत. त्याचा उपयोग केला आहे. आपण ही कथा वाल्मिकी रामायणाच्या आधारे सांगत आहोत असे श्रीधर म्हणतात. त्यांचा दृष्टिकोन सुखवादी आहे. दशरथाचा मृत्यू त्यांना मानवत नाही. दशरथ मूलस्वरूपी विलीन झाला असे ते म्हणतात. युध्दात मरण पावलेले वानर पुन्हा जीवंत होते.राम निजधामास गेला तिथपर्यंत श्रीधर कथा लिहित नाहीत.

वाल्मिकी रामायण, हनुमानाटक आणि संस्कृत सुभाषितातील सुंदर कल्पनातून कवींनी हा ग्रंथ उत्तम बनविला. श्रोते आणि पंडित सुखावतील असे लेखन व्हावे अशी श्रीधर यांची भूमिका आहे. श्रीधर यांची दृष्टी सुखवादी असल्याने ही कथा सुखांत बनली आहे. श्रीधराने 'श्रीहरिविजय' प्रमाणेच आपल्या प्रसन्न शैलीने व भक्तीच्या अधिष्ठानाने रामकथा अधिकच लोकप्रिय केली. ग्रंथात मधूनमधून नीतीबोधक सुभाषिते पेरली. 'ज्या ओढवे संकट महाविघ्नातरी तेणे करितां एक आवर्तनातत्काळ संकट जाय निरसोनावाते करून अभ्र जैसे।।' असे फलश्रृतीचे आकर्षण श्रोत्यांसमोर ते स्वच्छ मनाने ठेवतात. उपमा दृष्टांताचा वापर, साधी व ओघवती भाषा, श्रीधर यांचा प्रेमळ आणि प्रसन्न दृष्टिकोन यामुळे हा ग्रंथ मनोवेधक झाला आहे. 'श्रीराम विजयाचे एक आवर्तन । करी संपूर्ण पापाचे दहन' अशी लोकांना आकर्षित करणारी ग्रंथाची फलश्रुती सांगितली. नाथांची वर्णनपध्दती, कल्पना, विचार, शब्दयोजना श्रीधराने अनुसरली आहे.

### ३.७.३ पांडवप्रताप :

पंढरपूर क्षेत्री इस १७१२ मध्ये या ग्रंथाचे लेखन झाले असून १३३०७ ओव्या व ६४ अध्यायामध्ये हा ग्रंथ विभागला आहे.या विस्तृत ग्रंथातील पहिले पस्तीस अध्याय मुक्तेश्वरांच्या महाभारतावरून श्रीधरांनी सजविले आहेत. महाभारतातील पांडवांची जीवनकहाणी कुणालाही आकर्षित करील अशीच आहे. पांडवप्रताप हा

श्रीधराचा अत्यंत लोकप्रिय ग्रंथ आहे. ते म्हणतात, 'मी पांडुरंगाच्या आदेशाने 'पांडवप्रताप' लिहित आहे. पांडवांच्याच पराक्रमाची गाथा गाणे हा या काव्यामागचा उद्देश आहे.' 'पांडवप्रताप ग्रंथ सुंदर। सकळ साहित्याचे भांडार।' असा त्यांनी ग्रंथगौरव केला आहे. यातून त्यांनी समाजाला क्षात्रधर्माची जाणीव करून दिली आहे. मराठीत ग्रंथरचना झाली पाहिजे ही त्यांची भूमिका दिसते. तिचे त्यानी जोरदार समर्थन केले आहे. ते म्हणतात, 'जैसी कृष्णा वेणीची तीरे दोन्ही । परि उदक एक पाहिजे ।। तैसी प्राकृत आणि संस्कृत । दोन्ही माजी एकच अर्थ।।'' आजही या ग्रंथाचे धार्मिक श्रध्देने वाचन केले जाते. श्रीधराने मुक्तेश्वराचे आदि, सभा, वन आणि विराट या पर्वाचे अतिशय बारकाईने वाचन करून या अभ्यासाचाच उपयोग या ग्रंथात केला. महाभारतातील पांडव कथेने श्रीधरास आकर्षित करून घेतले.' पांडवप्रताप ग्रंथ सुंदर । सकळ साहित्याचे भांडार ।' अशी आपल्या ग्रंथाची कवीने ओळख करून दिली आहे. छात्रधर्माची ओळख करून देण्याच्या दृष्टिकोनातून या ग्रंथाची निर्मिती झाली. मुक्तेश्वराची उत्कट कल्पना, समर्पक शब्दयोजना, श्रीधराने जशीच्या तशी अनुसरली. ते म्हणतात, 'व्यास भारत आश्रय धरिला । दंतकथा नाही दुसरी नोजिली'।। या उद्‌गारात त्यांचा आत्मविश्वास व व्यासांबद्दलचा आदर व्यक्त होतो. श्रीधरांनी व्यास भारतच प्रमाण मानले आहे. असा या ग्रंथात वारंवार उल्लेख केला आहे. 'दंतकथा सोडोनि सकळ । व्यासभारत आश्रय धरिला । प्रमाणकथा निर्मळा । निरुपित्या त्याच येथे ।।' आपण प्राकृत कवीची कास धरली नाही, असे ते म्हणतात. त्यांचे हे म्हणणे यथार्थ नाही. कारण या रचनेसाठी मुक्तेश्वरांचे महाभारत त्यांनी आधाराला घेतले आहे. (मराठी वाङ्मयाचा इतिहास – खंड तिसरा – संपादक रा. श्री. जोग – पृष्ठ १६९) श्रीधराने वारंवार मी व्यास भारतच प्रमुख मानीत आहे असे म्हटले आहे. ग्रंथाच्या शेवटी मूळ महाभारतातील काही कथांमध्ये थोडे फार बदल करून तात्पर्य सांगण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीधराचे संक्षेप कौशल्य सुंदर आहे. पांडवांचे स्वर्गगमन याचे सविस्तर वर्णन केलेले नाही. त्यांच्या मते पांडव देवावतारी नाहीत पण ते श्रेष्ठ ईश्वरभक्त आहेत. म्हणून त्यांचा मृत्यू वर्णन करणे योग्य नाही. त्यानी 'पांडवप्रताप' मध्ये सद्‌गुण आणि दुर्गुण अशी विभागणी करून शाप कथांचा उपयोग केला आहे. दूतात हरल्यानंतर पांडवासमोर दुर्योधन द्रौपदीस काय म्हणतो ते पाहा, 'जानु उघडी करून । द्रौपदी सदावी सुयोधन। म्हणे बैस अर्धांगी येऊन। पट्टराणी होई माझी।।' त्यावर रागावलेली द्रौपदी आकांडतांडव करते 'तैशी ते पांडवललना । म्हणे चांडाळा दुर्योधना।। गलितकुष्ठ भरोनि रसना । झडो तुझी पापिया।।' येथील दुर्योधनसंवादातील कुत्सीतपणा व द्रौपदीसंवादातील तेजस्वी आदेश लक्षणीय आहे.

या ग्रंथात पांडवाची यशोगाथा रसाळपणे व परिणामकारकरित्या वर्णन केली आहे. तिच्यात करूण, वीर, हास्य हे रस दिमाखाने मिरवतात. ग्रंथाची भाषा सुगम, सहज, सुंदर व रसानुकूल आहे. उत्कृष्ट चित्रे, कारुण्य, वीर, रसांचा आविष्कार यामुळे ग्रंथ उत्तम बनला आहे. सुबोध निवेदन, संसार, अध्यात्म, वेदांताचा त्रिवेणी संगम, घरगुती दृष्टांत, अतिशय सोपी प्रवाही, सामान्य जनांना समजेल अशी भाषा, त्यामुळे हा ग्रंथ श्रीधरांच्या प्रतिमेचा स्वतंत्र अविष्कार वाटतो.

### ३.७.४ शिवलीलामृत :

शिवमंत्र सामर्थ्यावर पापमुक्त झालेल्या दाशार्ह राजाची कथा, शिवरात्री माहात्म्य अशा कथांचा समावेश असणाऱ्या या ग्रंथाची रचना इ.स. १७१८ मध्ये श्रीधरांनी केली. २२६० ओव्यांमध्ये स्कंदपुराणावर आधारीत

शिवभक्तीपर कथा आहे. 'ॐ नम: शिवाय' हा मंत्र दारिद्र्य, दु:ख, शोक यांचा संहारक असून मानवास तारक आहे, असे इथे सांगितले आहे. यातील अध्याय मुळात चौदा आहेत. पंधरावा अध्याय श्रीधर भक्ताने जोडला असावा. श्रीधरांकडे अलौकिक प्रतिभा नव्हती. पण विविध प्रसंगांची व भावनांची चित्रे त्यांनी चांगली रंगविली. 'आत्मप्राप्तीवीण साधन। जसे अलंकार गळसरीविण । की दीपाविण शून्य सदन। जीवनेंवीण सरिता जैसी।।' असा उपमा-दृष्टांतांचा सहजपणा त्यांच्या भाषेत आहे. एकनाथांच्या वृत्तीतील प्रेमळपणा व वाणीतील सोज्वळता हे विशेष श्रीधरीग्रंथात सहज रम्यतेने प्रकटतात. गंगौद्यासम शांत, संघ कथाप्रवाह व शुद्ध भावमयता यांमुळे सांसारिकांना हे श्रीधरी ग्रंथ संजीवक वाटतात. भाविकता व प्रेमळपणा हा त्यांच्या वृत्तीचा विशेष असल्याने त्यांची वाणी विलक्षण गोड झाली आहे. संसारश्रांतांना आपली दु:खे विसरायला लावणे हेच श्रीधरांच्या ग्रंथांचे उद्दिष्ट असून तीच त्या ग्रंथांची फलश्रुती होय. स्कंदपुराणाचा आधार घेऊन श्रीधरांनी हा ग्रंथ रचला. शिवमंत्रावरील श्रध्दा व श्रीधरांची लोकमनाची पकड घेणारी ओघवती निवेदनशैली, यांमुळे या ग्रंथाची लोकप्रियता आजही टिकून आहे. एकंदरीत श्रीधरांचे ग्रंथ त्यांच्या हयातीतच गावोगावी पोहोचले होते. घरोघरी पूर्वी आणि आजही त्यांची पारायणे झाली व होत आहेत. या ग्रंथाच्या श्रवण पठणाने पातके नष्ट होतील. अपार आयुष्य, आरोग्य, संतती व संपत्ती मिळेल असे तो म्हणतो. तसेच 'ॐ नम: शिवाय' हा मंत्र दु:ख, भय, शोक, काम, क्रोध यांचा संहारक व मानव जातीसाठी तारक असल्याची ग्वाही कवी देतो. कवीची शिवमंत्रावरील श्रद्धा, लोक माणसांच्या मनाचा ठाव घेणारी भाषा यामुळे हा ग्रंथ आजही लोकप्रिय आहे.

### ३.७.५ इतर रचना :

या आख्यानासोबतच श्रीधरानी श्रीपंढरीमहात्म्य, श्रीज्ञानेश्वरचरित्र, श्रीमल्हारीचरित्र, वेदांतसूर्य असे ग्रंथ लिहिले. साधी, सरळ, प्रसन्न नीतीबोध शिकवणारी व संसारिक दु:खे विसरायला लावणारी त्यांची कविता आहे. जनमानसावर पकड ठेवण्याचे सामर्थ्य निश्चितच त्यांच्यात आहे.

## ३.८ मोरोपंत :

प्राचीन मराठी साहित्यात 'सुश्लोक वामनाचा तशी आर्या मयूरपंताची' हा सुप्रसिध्द उक्ती आहे. मोरोपंत हे मराठी पंतकाव्यातील एक अनमोल रत्न आहे. मोरेश्वर रामचंद्र पराडकर हे या आर्यापतीचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म १७२९ मध्ये पन्हाळगडावर झाला. त्यांचे बालपणही तिथेच गेले. श्रीराम, श्रीमल्लकेशव, गणेश, हरी हे चौघे त्यांचे गुरू होते. २४ वर्षे अव्याहतपणे अध्ययन केल्यानंतर ते बारामतीला बाबाजी नाईक यांच्याकडे पुराणिक म्हणून आश्रयाला आले. १७७२ पासून १७९४ पर्यंत २४ वर्षे त्यांनी काव्यलेखन केले. इस १७९४ मध्ये हनुमान जन्मोत्सवावेळी मंगळवारी सकाळी ते प्रभु रामचरणी लीन झाले. मोरोपंत हे पंडितकवीपैकी शेवटचे आश्रित पुराणिक होते. पुराणिकांच्या भूमिकेचा प्रभाव काव्यरचनेवर पडला आहे. इतर पंडितकवीपेक्षा त्यांची भक्तिप्रवणता अधिक आहे. वाटे चरित्र त्यांचे काही आपण तरावया गावे ही त्यांची काव्यदृष्टी आहे. पण त्याचबरोबर साहित्य गुणांनीयुक्त अशी कविता करावी व परमेश्वर प्रसादा बरोबरच रसिकजनांचा संतोषही साधावा ही त्यांची भूमिका होती. हरिवंशाच्या प्रारंभी ते म्हणतात. 'कथा लिहिन रसिक साधुरंजण प्रणय तर आर्याभारतात ते श्रोत्यांना सांगतात-'भारतेतिहासरस पाजीन अमृत रसाहूनि सुरस आपल्या काव्याने रसिक, कवी, सज्जन भगवद्भक्त प्रसन्न

करावेत ही त्यांची भूमिका होती. भक्तिभाव आणि कवित्वाचा मिलाफ त्यांच्या काव्यात झालेला आहे.'

**मोरोपंतांची काव्यरचना :**

मोरोपंतांच्या एकूण कविता पाऊणलाख आहेत. रामायण, महाभारत आणि भागवत हे मोरोपंतांच्या काव्याचे महत्त्वाचे आधार असून जैमिनी अश्वमेध, स्कंधपुराण, मार्कंडेयपुरायण, हरिवंश, इत्यादींच्या आधारे त्यांनी काही प्रकरणे रचली आहेत. ईश्वराचे गुणसंकीर्तन करून स्मरणभक्ती करावी ही प्रेरणा पंतांच्या काव्यरचने मागे आहे. वयाच्या २२-२३ व्या वर्षापासून मोरोपंत काव्यरचना करू लागले. 'कुशलव्याख्यान' हे त्याचे पहिले काव्य होय. त्यानंतर ब्रम्होत्तर खंड, श्रीकृष्णविजय, प्रल्हादविजय, मदालसाचरित्र, हरिश्चंद्राख्यान, देवीमाहात्म्य, सप्तशती, सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणीगीत, श्रीकृष्णविजय, (उत्तरार्ध) सुदामचरित्र, भक्तभूषण, भस्मासूराख्यान,भृगुचरित्र, कृष्णस्तोत्र, मंत्ररामायण, रामायण, मुक्तामाला, संशयरत्नमाला, साधुसत्कार, आर्यकेकावली, नामार्या, नामरसायण, प्रश्नोत्तरमाला, भीष्मभक्तीभाग्य, नामभ्युदय, अवतारमाला, गीतार्थ, महाभारत, यंत्रभागवत, हरिवंश, संकीर्ण रामायण, इत्यादी विपूल काव्यरचना त्यांनी केली.

**३.८.१ कुशलवोपाख्यान :**

मोरोपंतांचे इ.स. १७५० सालातील तेरा अध्यायांचे ५०८ श्लोकांचे हे लक्षणीय पंडिती काव्य आहे. या काव्यात संस्कृत प्राचुर्याचा अतिरेक, आलंकारिकता व प्रदीर्घ सामासिक शब्दरचना ह्या दोषांमुळे क्लिष्टता आली आहे. सीतात्याग व सीताशोक हे करूणरम्य प्रसंग आहेत. सीतेने लक्ष्मणास उद्देशून केलेल्या संवादात श्रीरामाचे व्यक्तिचित्रण सुंदर झाले आहे. मोरोपंत लिहितात, 'माथां रत्नकिरीट, कुंडलयुग, श्रोती विराजे बरे, बाहु अंगदभूषणे विलसती, सन्मध्य पीतांबरे, कंठी मौक्तिकहार, चंदनउटी अंगी, घनश्यामला ऐशी राघवमूर्ति यावर कधी भेटेन वत्सा ! मला?' येथील स्वभावोक्ती अलंकार मनोहर आहे. राघवमूर्तीचे हे वेधक वर्णन लक्षणीय आहे. लव कुशाशी युद्ध करताना रामाच्या मन:स्थितीचे पंतांनी रेखाटलेले चित्र मनोवेधक झाले असून नाट्यपूर्ण बनले आहे.

**३.८.२ आर्याभारत :**

मोरोपंतांच्या परिणतप्रज्ञेचा प्रभावी आविष्कार म्हणजे त्यांचे आर्याभारत. महाभारताचा आस्वाद श्रोत्यांना द्यावा ही भूमिका. संक्षेप-विस्तार कौशल्य, उत्तम कवित्वशक्ती व संयम या गुणांमुळे श्रीधर व मुक्तेश्वर यांच्यापेक्षा पंतांचे आर्याभारत अधिक उठून दिसते. मुळातील कथानकात असलेली विषयांतरे व सैलसर वर्णने काढून टाकून त्यांनी कथा प्रमाणशीर केली. राधेने कर्णासाठी केलेला विलाप, कर्णाबद्दल कुंती व धर्म यांनी केलेला विलाप पंतांच्या प्रतिभेचा सुंदर विलास आहे. उत्तरेचा विलाप करूणरसपूर्ण आहे. रसयुक्त प्रसंगनिर्मिती हे पंतांचे वैशिष्ट्य. शकुंतला, ययाती यांच्या आख्यानांच्या निमित्ताने आलेला शृंगार, भीमकृत दु:शासन-कीचकवध, भीष्म, द्रोण, कर्ण व विराट पर्वातील युद्ध वर्णनांतून निर्मित वीररस, वस्त्रहरण प्रसंगी द्रौपदीने केलेला धावा, अभिमन्यू वधानंतरचा अर्जुन, सुभद्रा व उत्तरा यांचा शोक, असे अनेक रस इथे निर्माण झाले आहेत. कर्ण, धृतराष्ट्र, द्रोण, अर्जुन, भीम, कुंती, द्रौपदी यांच्या मुळातील व्यक्तिरेखा पंतांनी उजळ केल्या आहेत. कर्ण-शल्य संवाद, कृष्ण कर्ण संवाद हे पंतांच्या मार्मिक संवाद लेखनाचे नमूने आहेत. कर्ण अर्जुनाला युद्धप्रसंगी धर्मयुद्ध नियमांचे पालन कर असे सांगत होता. ते ऐकून कृष्ण कर्णास म्हणाला,'कृष्ण म्हणे, राधेया, भला बरा स्मरसि आज धर्माते।

नीच व्यसनी बुडता निंदिती देवासि न स्वकर्माते।। जेव्हा सभेसि नेली पांचाली मानिले न मनीं शर्म तेव्हा गेला होता कोठे राधासुता तुझा धर्म' कृष्णाच्यावरील ओळीतील मार्मिकता अजोड युक्तिवाद मोरोपंतांच्या प्रतिभेचा उत्तम नमुना आहे.

### ३.८.३ संकीर्ण रामायणे :

रामभक्त मोरोपंतांची श्रद्धेने अद्‌भुत, दंडक, दाम, परंतु, पुण्य, मंत्र अशी अनेक रामायणे विशेष उल्लेखनीय आहेत. ही १०८ संकीर्ण रामायणे आहेत अशी अनेकांची समजूत आहे. रामायण रचनेमागे 'श्रीरामायण गायले तरी पुन्हा गोविची ऐसे करी' ही भावना आहे. 'मंत्ररामायणात' मोरोपंतांची भाषा प्रौढ व संस्कृतप्रचुर आहे. यातील कथा निवेदन ओघवते आहे. सीतेला रावणाने पळवून नेल्यावर रामाने केलेला विलाप पाहण्यासारखा आहे. 'कोठे जनक सुते तू गेलीस? धरासुते! प्रिये! जाये! नकरी विनोद, जाला व्याकुळ अत्यंत देह माजा, ये.'

तू काय कोप धरिला अपूर्व मृग नाणिला म्हणून मनी? तरि चंद्रमृगहि आणुनि देईन, हे तूं असत्यसें न मनी.'

कोठे मंत्र साधुन, कोठे केवळलघुअक्षरेच योजून रामायण रचनेत पंतांनी स्वत:वर बंधने घालून घेतली आहेत. प्रत्येक आर्येत कोठे कोठे 'धन्य', 'परंतु' असे शब्द योजिले आहेत. कित्येक रामायणात ऋषींची, राजांची व तीर्थक्षेत्रांची नांवे गुंफली आहेत. यात चमत्कृती आहे. तशी कृत्रिमता आहे. त्यांच्या रामभक्तीचा उमाळा पांडित्यातून प्रगटला आहे.

### ३.८.४ भागवती प्रकरणे :

मोरोपंतांनी मंत्रभागवतात कृष्णचरित्राखेरीज दक्षयज्ञ, ध्रुवकथा, नहुषकथा, प्रल्हादचरित्र, गजेंद्रमोक्ष, समुद्रमंथन, शर्मिला-देवयानी कथा इ. कथा असल्याने वाचक रंगून जातो. ध्रुवचरित्र, वामन चरित्र, अंबरिषाख्यान ही उल्लेखनीय आख्याने आहेत. मंत्रभागवत ही भागवतावरील छोटी नेटकी रचना आहे. या आर्या ३३३ नाममंत्रात गोविल्यामुळे त्याला मंत्रभागवत म्हणतात ते सरस आहे. त्यातील पहिल्या नऊ स्कंधात पंतांनी बराच संक्षेप केला आहे. कृष्णविजय हा ९० अध्यायांचा ३६७० श्लोकांचा विविध वृत्तांतील काव्यग्रंथ आहे. .भागवताच्या दशम स्कंधावरील हे विस्तृत भाष्य आहे. येथील कथाकथन समर्पक संभाषणे व उचित विशेषणेयांमुळे रोचक झाले आहे. मोरोपंतांनी रासक्रीडा वर्णन अत्यंत संयमाने केले आहे. ते म्हणतात, 'वनितांसह मग तितुक्या मूर्ति धरूनी स्वयें करी रास. गोपी चुंबिती, हुंगिती, आलिंगिती, सुंदरा शरीरास.' दशमस्कंधात कृष्णलीला वर्णन असल्याने तो मोठा झाला आहे. ही भक्तिप्रवण अशी सुंदर आख्याने आहेत. काही आख्यानांची रचना स्वतंत्र आहे. नारायणकथा, दत्तात्रेयांचे चोवीस गुरू या कथांवर त्यांनी विशेष भर दिला आहे. उद्धवगीतेचा अकरावा स्कंध संक्षेपाने मांडला आहे.

### ३.८.५ स्फूटकविता :

मोरोपंतांनी आर्याकेकावली, संशयरत्नावली, नामसुधाचषक अशी अनेक स्फुट काव्यरचना केल्या. श्लोक केकावली ही रचना रसिकमान्य होती. 'आर्याकेकावली' श्रीरामास उद्देशून लिहिलेली आहे. यातील निवेदन उत्कट व ओघवते आहे. यातील श्रीराम आणि कृष्णाच्या रूपाने अवतार धारण करणाऱ्या त्या अनंत तत्त्वाचे सगुण सुंदर

चित्र व त्यांच्या सावळ्या रंगांची मीमांसा कल्पनारम्य आहे. पंत म्हणतात,'श्रीरामा ! तू स्वामी असशी माज्या शिरावरी जागा । आम्हांसि तुझ्या, पायांवाचूनि निर्भय नसे दुजा जागा' ह्या दृढ श्रद्धेने व श्रीरामावर भिस्त ठेवून पंतांनी हे लिहिले आहे. राम आणि कृष्ण हे दोघेही सावळे आहेत. ते दोघेही शिवाचे आवडते आहेत. म्हणून ते सावळे आहेत. भावनेच्या खोलीमध्ये हे काव्य भिजले आहे. त्यांच्या श्रध्दाळू, व प्रतिभासंपन्न हृदयातील उद्‌गार आहेत.

याबरोबरच मोरोपंतांनी स्त्रीगीतांचीही रचना केली. पंतांची साधी व प्रासादिक रचना म्हणजे स्त्रीगीते, सीतागीत, सावित्रीगीत आणि रुक्मिणीगीत ही ओवीबद्ध रचना सुबोध व रसाळ आहे. सीता गीतात सीता वनवासातील आठवणी सांगताना दिसते. 'श्लोककेकावली हे पंतांचे अखेरचे काव्य. यात रचनेची चमत्कृती आहे आणि भावनांची उत्कटता आहे. धिटाई, दुषणे, विश्वास व संतुष्टता हे भक्तीचे तरंग इथे उमटले आहेत. इथे पंतांचे चतुर युक्तिवाद व कुशल संवाद आहेत. पंतांनी इथे ईश्वराशी प्रेमळ वादविवाद करून विनयशीलता पत्करली आहे. त्यात कल्पकतेचा रमणीय आविष्कार आहे. यातील परमेश्वर स्तुती पौराणिक थाटाची नाही. त्यात अभिजात संस्कृताचे देखणेपण आहे. यातील कितीतरी केका जुन्या पिढीच्या तोंडात घोळत असतात.' दयामृतघना अहो हरि। वळा मयुराकडे;। रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे। असा अतिथी धार्मिक स्तुतपदा। यदा सापडे? तुम्हां जड भवार्णवी उतरितां न दासां पडे।। ही स्वतःच्या उद्धार विषयक केलेली प्रार्थना वेधक आहे.

याशिवाय नामसुधाचषक, नामार्या, नामरसायन, संशयरत्नावली, गुरुस्तुतिमुक्तांजली, पतिव्रताकीर्तन, सन्मनोरथराजी, प्रश्नोत्तरमाला अशी बरीच स्फुटकाव्ये पंतांनी लिहिली आहेत. नामसुधा चषकात नामचे माहात्म्य, सन्मनोरथराजीत सज्जनांच्या मनोरथांची माला, संशयरत्नवावलीमध्ये ईश्वरदर्शनाची उत्सुकता आहे. ही सर्वच स्तोत्रे सरस, प्रेमळ मनोहारी व उदात्त आहेत.

**३.९ समारोप :**

पंडिती कविता आपल्या भोवतालच्या समाजाची गरज म्हणूनच जन्माला आली. या कवितेने पौराणिक कथा, व्यक्तींची रसभरित चरित्रे चित्रित करून उत्तम जनरुचिसंवाद साधला म्हणून प्राप्त परिस्थितीशी या पंडिती साहित्याची उत्तम सांगड घातली जाऊन जवळीक निर्माण झाली. पंडितीसाहित्याशी समाजाचे दूरत्व काही प्रमाणात जाणवते यांचे कारण संस्कृतनिष्ठा, संस्कृतिनिष्ठा आणि धर्मनिष्ठा होय. बहुजन समाज या काव्यापासून दूरच राहिला. त्याची कारणे म्हणजे ही रचना समाजातील उच्चभ्रू वर्गाला रुचेल अशी, अभिजात वळणाची अभिरुची संपन्न होती. ती संस्कृत जाणकारांसाठीच होती. म्हणूनच ही संस्कृतप्रचुरता व विशिष्ट सामान्य माणूस या कवितेत सामावला गेला नाही.

**३.१० सरावासाठी प्रश्न :**

**३.१०.१ खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१) सतराव्या शतकात कोणत्या पंडितकवीनी मराठी काव्यात मोलाची भर टाकली आहे?

अ) मुक्तेश्वर ब) वामनपंडित क) रघुनाथ पंडित ड) वरील सर्व

२) खालीलपैकी कोणते वैशिष्ट्ये पंडितीकाव्याचे आहे?

अ) संस्कृतप्रचूरता ब) रसपरिपोष क) पांडित्यप्रदर्शन ड) वरील सर्व

३) भावार्थदीपिकेच्या पार्श्वभूमीवर 'यथार्थदीपिका' असे नाव आपल्या टीकेला कोणी दिले आहे?

अ) रघुनाथपंडित ब) वामनपंडित क) मुक्तेश्वर ड) श्रीधर

४) अभ्यासकांनी साहित्यसम्राट, साहित्यातील कोहिनूर, कवीवर, कलाकवी, ओवीकविचा ईश्वरू म्हणून कोणाचा गौरव केला आहे?

अ) रघुनाथपंडित ब) वामनपंडित क) मुक्तेश्वर ड) श्रीधर

५) आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तीक ही कोणत्या ग्रंथांची पर्वे आहेत?

अ) महाभारत ब) रामायण क) हरिवंश ड) जैमिनी अश्वमेध

६) 'रामदासवर्णन' आणि 'गजेन्द्रमोक्ष' या ग्रंथरचना कोणाच्या आहेत?

अ) मोरोपंत ब) मुक्तेश्वर क) रघुनाथपंडित ड) वामनपंडित

७) पंडितकवींचे प्रातिनिधिक कवी म्हणून कोणाचा उल्लेख केला जातो?

अ) वामनपंडित ब) रघुनाथपंडित क) मोरोपंत ड) रघुनाथपंडित

८) 'दमयंतीस्वयंवर' हे काव्य कोणी लिहिले आहे?

अ) रघुनाथपंडित ब) वामनपंडित क) मुक्तेश्वर ड) श्रीधर

९) परिणत प्रज्ञेचा प्रभावी आविष्कार असलेला 'आर्याभारत' हा ग्रंथ कोणाचा आहे?

अ) श्रीधर ब) मोरोपंत क) मुक्तेश्वर ड) वामनपंडित

१०) आर्यापती म्हणून कोणत्या पंडित कवीला ओळखले जाते?

अ) श्रीधर ब) मुक्तेश्वर क) मोरोपंत ड) रघुनाथपंडित

**उत्तरसूची :** १) ड २) क ३) ब ४) क ५) अ ६) क ७) अ ८) अ ९) ब १०) क

### ३.१०.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१) 'अध्यात्माचे वाङ्मयावरील जोखड फेकून देणारा पहिला कवी मुक्तेश्वर' ह्या विधानाचा परामर्श घ्या.

२) 'मोरोपंत आणि वामनपंडित यांच्या काव्यरचनेचा आढावा घ्या.

### ३.१०.३ लघुत्तरी प्रश्न

१) रघुनाथपंडित यांच्या काव्यरचनेचा परिचय करून घ्या.

२) श्रीधरांच्या ग्रंथकर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घ्या.

### ३.१०.४ टिपा लिहा.

१) कवी श्रीधर

२) आख्यान कवी रघुनाथपंडित

३) मुक्तेश्वरांचे महाभारत

### ३.११ अधिक वाचन

१) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल. रा. नसिराबादकर

२) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग चौथा, भाग पाचवा - अ. ना. देशपांडे

३) पंडिती काव्य : संपादक डॉ. के. ना. वाटवे, डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी

४) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप : ह. श्री. शेणोलीकर

५) मराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड तिसरा - संपादक रा. श्री. जोग

### ३.१२ उपक्रम

१) दूरचित्रवाणीवरील 'रामायण' मालिकेची ध्वनिचित्रफित पहा.

२) श्रावणात घरोघरी वाचनात येणारे ग्रंथवाचन लक्षपूर्वक ऐका.

३) चातुर्मासात पांडवप्रताप, शिवलीलामृत इ. ग्रंथांचे पारायण असते त्यावेळी उपस्थित राहून त्यावरील निरूपण ऐका.

४) दूरचित्रवाणीवरील 'महाभारत' मालिकेची ध्वनिचित्रफित पहा.

५) मुक्तेश्वरांच्या महाभारताची शक्य ती पर्वे वाचा.

६) मोरोपंतांचे 'आर्याकेकावली' हे काव्य मिळवून वाचा. त्यातून आर्यावृत्ताची रचना समजून घ्या.

***

## घटक – ४

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

## इ.स. १५०० ते इ.स. १८०० (स्थूल कालखंड)

**अ) बखर वाङ्मय–शिवपूर्वकालीन बखरी, शिवकालीन बखरी, पेशवेकालीन बखरी स्वरुप, विशेष.**

**ब) शाहिरी वाङ्मय (लावणी व पोवाडा)**

**१) अनंतफंदी  २) परशराम  ३) रामजोशी  ४) प्रभाकर  ५) होनाजी बाळा**

### ४.० उद्दिष्टे :

विद्यार्थी मित्रहो, या घटकाचा अभ्यास करत असताना आपणास मध्ययुगीन मराठी साहित्यातील बखर वाङ्मय व शाहिरी वाङ्मय या दोन वेगवेगळ्या घटकांवर विचार करावयाचा आहे. बखर वाङ्मय हे मराठी साहित्यातील वेगळे दालन असून तो इतिहासाचा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे; याचा अभ्यास करता येईल. तसेच मराठी शाहिरी काव्यातील लावणी व पोवाडा या वाङ्मयाचाही आपणास अभ्यास करता येईल. त्यासाठी आपणास खालील मुद्यांच्या आधारे त्यांचे वेगळेपण लक्षात घेता येईल.

* बखर वाङ्मय ही संकल्पना स्पष्ट होईल.
* मराठी साहित्याच्या दृष्टीने बखर वाङ्मयाचे स्वरुप विशेष ध्यानात येईल.
* शिवपूर्वकालीन बखरी, शिवकालीन बखरी, पेशवेकालीन बखरींचे वर्गीकरण समजेल.
* बखर वाङ्मयाचे मूल्यमापन व त्याचे महत्त्व लक्षात येईल.
* मराठी साहित्यातील शाहिरी काव्याचा परिचय करुन घेता येईल.
* मराठेशाहीतील लावण्यांमधील शृंगाररस व पोवाड्यातील वीररस यांचा आस्वाद घेता येईल.
* शाहिरी काव्यातून मराठी समाजमनाचे व्यक्त झालेले भावजीवन कळेल.
* शाहिरी काव्यातील पराक्रमी पुरुष, ऐतिहासिक प्रसंग यांचे दर्शन घडेल.
* मराठेशाहीतील मराठी भाषेचे स्वरुप कळेल.

वरील उद्दिष्टांच्या अनुषंगाने बखर वाङ्मय आणि शाहिरी वाङ्मय (लावणी व पोवाडा) यांचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये ध्यानात घेता येतील.

### ४.१ प्रास्ताविक :

मराठी भाषेतील वाङ्मयाचे अध्ययन करीत असताना संत, पंत व तंत या तीन संप्रदायांनी प्राचीन मराठी

वाङ्मय समृध्द केले आहे. संतांनी मराठी साहित्याला पद्यरुपांच्या माध्यमातून आध्यात्मिक व पारमार्थिक अर्थाने समृध्द केले आहे हे ठळकपणे जाणवते. तसेच पंडिती वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रतिभासंपन्न कलावैभवाची भर घालून कल्पनाविलास, वृत्तबध्दता आणि अलंकारिकता यांचा परिपोष केला आणि रामायण महाभारत, भागवत व अन्यपुराणे इ. ग्रंथातील कथांचे संक्षिप्त, सुबोध व ओवीबध्द अनुवाद वाचकासमोर ठेवून स्वयंवरकाव्य, कथाकाव्य, केकावली, चंपूकाव्य, आर्या यांसारखे नवनवीन प्रकार व विविध वृत्तांची मराठी साहित्याला वेगळी दालने प्रदान केली. पंडिती काव्याचा प्रत्यय त्यांच्या काव्यसृष्टींकडे पाहिल्यास येतोच. तर संत व पंत या कवितेपेक्षा शाहिरी वाङ्मय भिन्न आहे. शाहिरांनी लावणी व पोवाडा हे दोन काव्यप्रकार मराठी सारस्वताला बहाल केले. 'शाहीर लोकजीवनात पुरते समरसले होते. आध्यात्मिकतेचा त्यांना थोडाफार स्पर्श झाला असला तरी तो त्यांचा स्थायीभाव नक्कीच नव्हता. लोकजीवनातील विविध प्रसंग, समोर जीवावर उदार होऊन, पराक्रम करणारे वीरपुरुष आणि आपल्या रुपगुण सौंदर्याने मोह घालणाऱ्या रुपयौवना यांचे प्रेमोत्कट भाव, भोवतालच्या वातावरणातील रगेलपणा आणि रंगेलपणा व त्यातून प्रत्ययाला येणारे असंख्य प्रसंग या साऱ्यांच्या संस्कारातून शाहिरांची कविता जन्माला आली आहे. लोकांच्या भावना, लोकांच्या शब्दांत लोकांसाठी मांडणारे शाहीर हे लोककवी होते. ऐहिक जीवनाचा त्यांना अपार लोभ होता. संसाराची लालसा होती आणि पराक्रमाची बेहोशी होती. त्यामुळे समकालीन जीवनाचा प्रत्यय शाहिरी कवितेतून पुरेपुर येतो.' (ल.रा. नसिराबादकर : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - पृ. २६१)

याच कालखंडात सर्वार्थाने भिन्न असणारा व लोकभाषेचे प्रातिनिधिक दर्शन देणारा तसेच गद्य-पद्य मिश्रित असा एक वाङ्मयप्रवाह आपणास दिसतो तो म्हणजे बखर वाङ्मय होय. यामध्ये अर्जदस्त, कौलपत्र इत्यादी वाङ्मय प्रकारही आहेत. खऱ्या अर्थाने मराठी वाङ्मयाच्या इतिहासात गद्याचा विकास झाला तो मुख्यत: बखरींच्या साह्यायाने या बखरींमधून कर्तृत्ववान आणि आदर्श राज्यकर्त्यांचे त्यांच्या कर्तृत्वाचे, कारकीर्दीचे दर्शन घडताना दिसते. बखर लेखनांचा आशय महाराष्ट्राच्या इतिहासाशी संलग्न आहे हे आपल्या लक्षात येते.

## ४.२ विषय विवेचन :-

सुमारे १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात पारतंत्र्यांचे मध्ययुग संपून स्वातंत्र्याच्या दृष्टीने नवयुगाचा प्रारंभ झाल्याचे पाहावयास मिळते. याच शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना होऊन मराठीला राज्यभाषेचे स्वरुप प्राप्त झाले आहे. त्यामुळे मराठ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे साहित्यात अवतरले. आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे दर्शन गद्य स्वरुपात घडू लागले. याच दृष्टीने शिवकाळ व पेशवेकाळ हा अत्यंत कलात्मक व तेजस्वी ठरला आहे. राष्ट्रीय भावनेने हा कालखंड भारला होता असे दिसते. त्यामुळे तशाही परिस्थितीत विलक्षण भाबडी बालबोध अशी पक्षनिष्ठा, या साऱ्यांविषयी वाटणारी आत्मियता आणि स्वकियांबद्दलचा वाटणारा अभिमान या साऱ्यांचे दर्शन बखर वाङ्मयात घडते. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे या बखरींचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठेशाहीतील गद्य सारस्वताचा एक नमुना म्हणून केला तर भाषेच्या सौंदर्याचे संपन्न भांडारच आपल्यासमोर उघडे होते. म्हणून या बखर ग्रंथांना 'मराठेशाहीच्या

तेजस्वी पराक्रमांचे नंदादीप' असे ल.रा. नसिराबादकर यांनी म्हटले आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास पृ. क्र. २८६) ऐतिहासिकतेपेक्षा वाङ्मयीन सौंदर्याचा साक्षात्कार आपणास बखर वाङ्मयाद्वारे होतो. राजकीय आणि कौटुंबिकतेने हे वाङ्मय समृध्द असून हा मराठी गद्याचा शिवकालीन व पेशवेकालीन अवतार तेजस्वी व कलात्मक आहे.

याच कालखंडात 'मराठी काव्याची प्रभात' किंवा मराठ्यांची खरी गाणी म्हणून ओळखली जाणारी शाहिरी कविता पोवाड्याच्या रुपाने शिवकाळातचं प्रथम जन्मास आली. शाहिरी कवितेचे प्रमुख दोन प्रकार आहेत; ते म्हणजे पोवाडे आणि लावण्या. पोवाडा म्हणजे शूरांच्या शौर्याचे, विद्वानांच्या बुध्दिमत्तेचे व सामर्थ्याचे काव्यात्मक वर्णन होय. यामध्ये स्तुती केलेली असते. म.ना. सहस्त्रबुध्दे हे पोवाड्यास 'कितींकाव्य' म्हणतात. शिवकाळातील आणि पेशवेकाळातील ही राष्ट्रीय कविता होय. मराठी प्रदेशात कुळधर्माच्या वेळी गोंधळ घालण्याचा प्रकार फार जुना आहे. पहिला पोवाडा हा शिवकाळातच रचला गेला आहे.

लावणी ही सामान्य जनांच्या मनोरंजनासाठी रचलेली असते व सादरही केलेली असते. नवनवे प्रदेश जिंकण्यासाठी बाहेर पडलेल्या तरुण शिपाई वर्गाचे मन ताजेतवाने करण्यासाठी व त्यांच्या जीवनात नवे रंग भरण्यासाठी शाहिरांनी लावणीची रचना केली. स्त्री-पुरुष रुपसौंदर्याचे व त्यांच्या शृंगाराचे वर्णन शाहिरांनी अगदी वेगळ्या ढंगाने केले आहे.

विद्यार्थी मित्रहो, आपण या घटकामध्ये बखर वाङ्मय म्हणजे काय, बखरींचे स्वरुप महत्व व विशेष शिवपूर्वकालीन, शिवकालीन व पेशवेकालीन बखरींचे स्वरुप-विशेष सविस्तर अभ्यासणार आहोत. त्याचबरोबर शाहिरी वाङ्मयातील अनंत फंदी, परशराम, रामजोशी, प्रभाकर व होनाजी बाळा या शाहिरांच्या लावण्या व पोवाड्यांचा अभ्यास करताना त्यांचे स्वरुप व विशेष पाहणार आहोत. या कालखंडातील वाङ्मयीन कामगिरीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## ४.३ (अ) बखर वाङ्मय

इ.स. १५०० ते इ.स. १८०० या कालखंडामध्ये राजकीय व व्यावहारिक क्षेत्रातील संपूर्ण वातावरण फारशीमय झाल्याने मराठी गद्यरचनेला त्याकाळात फारसा अवसरचं उरला नव्हता. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्य स्थापना होऊन मराठीला जेव्हा राज्यभाषेचे स्वरुप प्राप्त झाले, तेव्हा तलवार बहाद्दरांचे पराक्रम वर्णन करण्यासाठी कलम बहाद्दरांची लेखणी कुरुकुरु लागली. 'या काळचे गद्य ग्रंथ मुख्यत: बखरवजा असून त्यावर स्वराज्याचे तेज लाभलेले स्पष्ट दिसते. इतिहास कथनाच्या गरजेतून मराठी गद्य-वाङ्मयाची निर्मिती झाली. मराठीशाहीच्या प्रारंभापासून तो पेशवाईच्या अस्तापर्यंत राजकीय वातावरणात वावरणाऱ्या 'चिटणीस, कारकून वगैरे मंडळींनी मुसलमानांचे तवारीखा, शाहनामे, फेरिस्ते वगैरे इतिहास साधनांचे कित्ते पुढे ठेवूनच मराठी बखरी लिहिल्या.' असे राजवाडे म्हणतात. अरबी भाषेतील 'खबर', 'वार्ता', 'माहिती' या शब्दांवरुन वर्णविपर्यासाने 'बखर' हा शब्द तयार झाला असावा. बखर म्हणजे गद्यात लिहिलेला ऐतिहासिक वृत्तान्त ही गोष्ट 'खबर-बखर' या नावावरुन स्पष्ट होते. (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप : ह.श्री. शेणोलीकर पृ.क्र. २८२)

### ४.३.१ 'बखर' शब्दाची उत्पत्ती

मराठी गद्यात बखर लेखन झालेले आहे त्या लेखनामागे प्रामुख्याने ऐतिहासिक वृत्तकथन हे होय. बखर हा शब्द अरबी भाषेतील आहे. यालाच वार्ता, समाचार, घटना, बातमी, वृत्त असे पर्यायी शब्द होते. बखर व्युत्पत्ती संदर्भात विविध अभ्यासकांनी वेगवेगळी मते नांदवली आहेत. ती अशी.....

'बखर' या शब्दाची 'बखेर', 'बखैर' अशीही रुपे आढळतात. तरीही 'बखर' हाच शब्द रुढ झालेला दिसतो.

१. 'बक' म्हणजे बोलणे 'बक' या मूळ धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी.- वि. का. राजवाड

२. बखर म्हणजे गद्य, इतिहासचरित्र-श्री. वा. गो. आपटे

३. बखर म्हणजे बातमी, हकिकत, इतिहास- मा. त्रि. पटवर्धन

४. बखर म्हणजे राजा, थोरपुरुष, इतिहासवर्णन - श्री. वि. वा. भिडे

५. बखर एक पत्रप्रकार असून त्यावरील शिक्का मोर्तबामुळे तो सर्वथा प्रमाण मानण्यात येत होता. - श्री. शं. ना. जोशी

६. बखरी म्हणजे चरित्रग्रंथ - श्री. वा. सी. बेंद्रे

७. फारशी सिलखैर (क्षेत्र) किंवा अरबी 'बकर' म्हणजे लेखनासाठी उपयोजिले जाणारे बकरीचे चामडे यावरुन 'बखर' शब्द रुढ झाला- डॉ. श्री. रं. कुलकर्णी

वरील अभ्यासकांच्या मतांचा विचार करता फार पूर्वी बखर लिहिण्याची पध्दती नव्हती तर बातमीदार हा घडलेल्या घटनांची माहिती प्रत्यक्षपणे सांगत असावा. ही मूळ कल्पना मुसलमानांमध्ये तवारीखा लिहिण्याची जी पध्दती होती त्यातून आपणांकडे आली असावी. मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान खून महत्त्वाचे आहे. या सर्व बखरींचा अभ्यास केवळ इतिहास म्हणून करण्यापेक्षा मराठेकालीन गद्य सारस्वताचा नमुना म्हणून केला तर भाषिक सौंदर्याचे अफाट भांडार आपल्या हाती लागते. त्या गरजेतूनच बखरींची निर्मिती झाली. सद्यस्थितीमध्ये मराठ्यांच्या या ऐतिहासिक वृत्तांताचा आढावा घेताना इतिहासातील वेगवेगळ्या घटना व प्रसंगावर आधारित सुमारे २५० इतक्या बखरी लिहिल्या गेल्याचे सांगितले जाते.

### ४.३.२ बखरींचे वर्गीकरण :-

अगदी इंग्रजी आमदानीतही काही पौराणिक, मिशनरी, चळवळी विषयक आणि ऐतिहासिक बखरी लिहिल्या आहेत. या साऱ्यांचा विचार करत असताना काळ व रचनेच्या दृष्टीने 'महिकावतीची बखर' ही सर्वात जुनी बखर असल्याचे सर्वमान्य झाले आहे. या बखरींचा अभ्यास करताना त्यांचे स्वरूप विशेषांनुसार वर्गीकरण करणे महत्त्वाचे वाटते म्हणून स्थूलमानाने बखरींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. समकालीन बखरनविसांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या, ऐकलेल्या राजकीय घटनांवर आधारलेल्या बखरी**

या बखरी बऱ्याचदा ऐतिहासिक दृष्टीने विश्वसनीय असतात. या प्रकारातील बखरींची संख्या मोजकीच असली तरी त्याची विश्वसनीयरुप अत्यंत महत्त्वाचे व उच्च दर्जाचे आहे. उदा. 'सभासदाची बखर' 'भाऊसाहेबांची बखर'. इ.

**२. आठवणी, दंतकथा, आख्यायिका, पारंपरिक हकिकती यांच्या आधारे रचलेल्या बखरी –**

अशा बखरी या स्मृतीवर हवाला ठेवून लिहिलेल्या दिसतात. अशा बखरी उत्तरकालीन असल्याने जे पुरावे उपलब्ध होते त्यांच्या आधारे छाननी करण्यास व त्याची कथनपध्दती अधिक आकर्षक व कलात्मक करण्यास बखरकाराला यामध्ये संधी उपलब्ध असते. या प्रकारातील बखरींमध्ये स्थल, काल व्यक्ती विपर्यासाची दाट शक्यता असल्याने त्या बखरी विश्वसनीय मानल्या जात नाहीत. उदा. कृ. वि. सोहनी विरचित पेशव्यांची बखर, दाभाड्यांची हकिकत इ.

**३. ऐतिहासिक कागदपत्र, जुने ग्रंथ, दफ्तरातील टिपणे यांच्या आधारे लिहिलेल्या बखरी –**

या प्रकारातील बखरी या कागदपत्रांच्या आधारे लिहिलेल्या असल्या व त्या उत्तरकालीन असल्या तरी ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारामुळे त्या अधिक विश्वसनीय मानता येतात. उदा. मल्हार रामराव चिटणीसांची बखर, सप्त प्रकरणात्मक चरित्र इत्यादींचा समावेश होतो.

**४. बखर सदृश्य ऐतिहासिक लेखन –**

या प्रकारातील बखरींमध्ये वाका, कैफियत, हकीकत, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी स्वरुपाच्या लेखनाचा समावेश होतो. उदा., पटवर्धनीय वाका, आंग्र्याची हकिकत, भाऊसाहेबांची कैफियत इत्यादी. पहिल्या वर्गातील बखरीत आढळून येणारे ऐतिहासिक प्रामाण्य या प्रकारातील बखरींमध्येसुध्दा पाहावयास मिळते.

**५. ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या पण बखर हे नाव असलेल्या बखरी –**

या बखरी मुख्यत: सांप्रदायिक व पौराणिक स्वरुपाच्या असतात. अशा लेखनावर लोकांची श्रध्दा असल्यानेच या श्रध्देपोटी अशा लेखनाला बखर म्हटले जाते.

उदा., 'बकासुराची बखर, श्री कृष्णजन्मकथा बखर, श्रीसमर्थांची बखर' यांचा समावेश होतो.

वरील पाच प्रकारातील गद्यमय असलेले बखर लेखन पाहता 'महिकावतीची बखर' ही त्यास अपवाद म्हणून सांगता येईल. कारण की गद्य-पद्यमिश्रित प्रकारची ही बखर असून तीमध्ये पद्यात्मक मजकूर अधिक आहे. या बखरी कोणाच्या तरी आज्ञेवरुन लिहिल्या आहेत. विशेषत: तत्कालीन राजकीय स्त्री पुरुषांच्या आज्ञेवरुन बखरींचे लेखन झाल्याचे दिसते. बखरकार हे बहुतांशी राजदरबारात आश्रित होते. त्यांच्यावर बखर लेखनाची जबाबदारी सोपवून हे लेखन करुन घेतले आहे. त्यामुळे बखरींचे वाङ्मयीन स्वरुप सर्वार्थाने वेगळे आहे. त्यामुळे अशा लेखनाची सुरुवात पुराण लेखनासारखी असते, व शेवटी फलश्रुती सांगितली जाते. यातूनच बखरींची निर्मिती होताना दिसते.

### ४.३.३ बखर एक वाङ्मय प्रकार : स्वरूप

बखर लेखन हा एक मराठी वाङ्मयातील व शिवकाळात उदयास आलेला वाङ्मय प्रकार आहे. बखरींचे स्वरुप पाहता बखर लेखनात लहान-लहान सुटी-सुटी वाक्ये असतात. त्यामुळे वाचकांवर त्यांचा परिणाम साधला जातो. 'बखरकाराची भाषा प्रौढ, रसाळ, ओघवती असून लेखनात निवेदन पध्दती असते, असे श्री. हेरवाडकर म्हणतात.' 'बहुतेक बखरींचा एकंदर घाट हरिदासी पध्दतीचा दिसतो. श्रोत्यांचे मन, भान हरपण्यासाठी हरिदास ज्याप्रमाणे विविध साधनांचा अवलंब करतात, त्याचप्रमाणे बखरकारही वाचकांचे चित्त वेधण्यासाठी अनुरुप भाषा, काव्यात्क कल्पना, अलंकार, सुभाषिते, म्हणी इत्यादी साधनांचा उपयोग करतात. 'भाऊसाहेबांची बखर' याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. निवडक प्रसंग, निवडक शब्दांच्या साहाय्याने प्रभावीपणे व्यक्त करण्याचे बखरकाराचे कौशल्य अप्रतिम आहे.' (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ. बी. एन. पाटील पृ. क्र. ४६४)

बखर वाङ्मयामध्ये कालविपर्यास, व्यक्ति विपर्यास, प्रसंगविपर्यास हे आक्षेप आहेत. कारण बखर लेखन हे स्मृतीवर हवाला ठेवून होत असे. दंतकथा, आख्यायिका, जनमाणसाकडून मिळवलेली ऐकीव माहिती ही बखर लेखनाची प्राथमिक साधने होत. बखर लेखनात 'रजकत', दृष्टी, हेतू, प्रयोजन असल्यामुळे अत्युता-अतिशयोक्ती अवास्तवता अकल्पीत अद्भूतता आढळते. बखर लेखनात वाङ्मयीनदृष्या, ऐतिहासिक दृष्ट्या आक्षेपास जागा असली तरी त्यांचे वाङ्मयीन महत्व फार आहे. लेखनाचा स्वाभाविकपणा हा बखरलेखनाचा उल्लेखनीय गुण असून वेचक शब्द, धार्मिक व भावपूर्ण सुभाषितवजा वाक्ये, अलंकार, यथार्थ रसपरिपोष या वैशिष्ट्यपूर्ण गुणांमुळे बखरींचे सौंदर्य अधिक वाढले आहे. म्हणून बखरी या लेखनगुणांनी युक्त अशा मराठी सारस्वतातील एक स्वतंत्र प्रकार म्हणून ओळखल्या जातात. बखर हे ऐतिहासिक संदर्भ साधन मानले जात असले तरी तो एक समृध्द वाङ्मयप्रकार आहे. तो कलावंतांनी रचला असून प्रतिभेच्या बळावर त्याने आपले लेखन सजवलेले असते. आणि त्यातून तो प्रसंग, व्यक्ती जिवंत करण्याचा प्रयत्न करतो, म्हणून हे लेखन रसिकांच्या पसंतीस उतरते. त्यासाठी बखरकार वीर, करुण रसांचा वापर करत असतो. म्हणून ल. रा. नसिराबादकर या लेखनास गद्य सारस्वतांचा स्वतंत्र विलास असे म्हणतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास पृ. क्र. २८९)

मराठी वाङ्मयात ज्या दोन-अडीचशे बखरी लिहिल्या आहेत त्या बखरींची आपणास मुख्यत: तीन विभागात विभागणी करावी लागते. याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

१) शिवपूर्वकालीन बखरी

२) शिवकालीन बखरी

३) पेशवेकालीन बखरी

## ४.४ शिवपूर्वकालीन बखरी

### ४.४.१ महिकावतीची बखर :

मराठ्यांच्या स्वराज्य स्थापनेपूर्वीच्या बखरींची संख्या थोडीच असली तरी त्यांचे वाङ्मयीन महत्व बरेच आहे. हिंदुस्थानचा इतिहास पाहता छत्रपती शिवाजी महाराज हे मराठ्यांच्या इतिहासाचे सोनेरी पान मानावे लागते. पण तत्पूर्वीही काही बखरींचे लेखन झालेले आहे. महिकावतीची बखर ही रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर मानली जाते. ही बखर शके १३७० ते १४०० या कालावधीत लिहिली गेली आहे. तिचा तीस वर्षाचा कालखंड मानला जातो. ही बखर संपादित स्वरुपाची असून ती प्रकरणवजा मानली जाते. निरनिराळ्या सहा बखर वजा गद्यपद्य प्रकरणांचा एक समाहार या बखरीत असून तिच्यातील सहा प्रकरणे निरनिराळ्या व्यक्तींनी लिहिलेली आहेत. या बखरीतील सर्वात जुन्या म्हणजे दुसऱ्या प्रकरणाचा लेखक केशवाचार्य म्हणतो की, 'आपणास मालाडचा देसला नायकोराव याने सन्मानाने बोलावून महाराष्ट्र धर्म रक्षिण्यासाठी हे लेखन करविले.' यामध्ये प्रतापबिंबापासून म्हणजे इ.स. ११३८ ते इ.स. १५०० पर्यंतचा म्हणजेच (शके १०६० ते १४२२) इंग्रजांच्या आगमनापर्यंतचा काळ, असा सुमारे सात राजवटींचा इतिहास समाविष्ट करण्यात आला आहे. या बखरीत काळाची नोंद काटेकोरपणे केली असून बरीचशी हकीकत 'तवारीखा' तील हकीकतीशी मिळतीजुळती आहे. असे ह्या बखरीच्या संदर्भात कै. वि. का. राजवाडे म्हणतात.

'माहिम' च्या प्रांताचा इतिहास हे या बखरीचे वैशिष्ट्य होय. कोकणचा अज्ञात इतिहास या बखरीमुळे प्रथमच प्रकाशात आला. मराठीतील ही पहिलीच बखर असून वर्णने आकर्षक आहेत. ही बखर गद्यपद्यात्मक असून वंशानुचारित किंवा वंशावळवर्णन हा तिचा प्रमुख गुण आहे. महाराष्ट्र धर्मकथनाचे व युध्दवर्णनाचे बारीक तपशिलवार व मनोवेधक वर्णन यात केलेले आहे. आकर्षक निवेदनशैली, निरलंकृत भाषा, घटनांचा सुसूत्रपणा व मनोरंजक वर्णन हे या बखरीचे मुख्य गुण आहेत. ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने ही बखर विश्वसनीय आहे. या बखरीमध्ये तत्कालीन राज्यव्यवस्था, जमीन मोजण्याची पध्दत, सैन्य, सरदारांची नावे, गावे, किल्ले, त्यांचे पूर्ण पत्ते, नावागावासहित उपलब्ध होतात. याच बखरीला कै. वि. का. राजवाडे यांनी बिंबस्थानाची उर्फ ठाण्याची बखर असे नाव दिले आहे.

महिकावतीची बखर ही मराठीतील पहिली बखर असल्याने तिला महत्त्व आहेच. बखर वाङ्मयाच्या स्वरुपाची कल्पना येण्याच्या दृष्टीने ती अधिक महत्त्वाची मानली जाते. तसेच व्यक्ती आणि प्रसंग, महाराष्ट्र धर्म कथन, युध्दवर्णन, बारीकसारीक तपशिलासह मनोवेधक आहे. यामधील प्रतापबिंब, महिबिंब, केशवदेव, रामदेव, या यादवराजांची व्यक्तिचित्रे अत्यंत आकर्षकपणे चित्रित झाली आहेत. त्याचबरोबर दवण, वाळकेश्वर, महिकावती या स्थळांचे वर्णनदेखील अत्यंत सविस्तर व उल्लेखनीय आहे. यातील 'माहिमजागा उत्तम रम्य स्थळ' असे माहिमचे मोजक्या व नेटक्या शब्दात वर्णन केलेले आहे. तसेच ज्या काही घटना

घडल्या त्या घटनांचे वर्णनही लेखकाने प्रत्ययकारी व कल्पकतेने केले आहे. केशवदेवाने जसवंत देवाच्या भैसे दुर्गावर स्वारी करुन बरेच दिवस झाले तरी तो किल्ला हस्तगत करता येईना; या स्थितीचे 'चिंचवनी खादले खादले। त्या चिंचाऱ्याचे वृक्ष झाले । त्यांच्या चिंचा खादल्या । इतके दिवस राहिले । परि गड हाती येत नाही ।' असे कल्पकतापूर्वक वर्णन लेखकाने केले आहे.

'ऐकता निवती श्रवण । हरती दोष महादारुण ।

पुराणिंचे निरोपण । भविष्यार्थ कथिला ।।'

अशा शब्दात ग्रंथ श्रवणाची फलश्रुतीही सांगितली आहे.

या बखरीतील पूर्वपरंपरा, त्यांचे वंश, उत्पत्ती, त्यांची वर्णव्यवस्था या साऱ्यांचे वर्णन पहिल्या प्रकरणात आले असून तो काव्यमय असा इतिहासच आहे. या विषयी र. वि. हेरवाडकर म्हणतात की, मराठीत पद्यमय इतिहासाची परंपरा शिवकाळातील पोवाड्यापासून मानण्यापेक्षा तत्पूर्वीच्या ओवीबध्द इतिहास असलेल्या या बखरीपासून मानणे अधिक योग्य होईल. (मराठी बखर पृ. क्र. ९२) वाङ्मयगुणदृष्ट्या या बखरीतील गद्य हे पद्याइतकेच सरस आहे. साधी भाषा, घटनांचे निवेदन, अल्पाक्षरात अर्थाभिव्यक्ती, सुंदर व्यक्तिचित्रण, योग्य प्रसंगवर्णन, दृश्याचित्रात्मक वर्णनशैली हे बखरकाराचे वैशिष्ट्ये होय.

### ४.४.२ राक्षसतागडीची बखर :-

महिकावतीच्या बखरीनंतरची शिवपूर्वकालीन महत्त्वाची बखर म्हणजेच राक्षसतागडीचा रणसंग्राम वर्णन करणारी बखर होय. ही बखर इ.स. १५६५-६६ या कालखंडात लिहिली गेली. यामध्ये विजनगरच्या विध्वंसाची माहिती आली असून, ही माहिती कानडी बखरीच्या आधारे दिली आहे. त्यामध्ये जे राजभूवराचे वर्णन आले आहे ते अतिशय विस्तृत असे आहे. पागा, पिलखाना, उस्तरखाना यांची सविस्तर वर्णनांवरून त्यांच्या सरंजामाची कल्पना आपणाला येते. त्यातील व्यक्ती व घटना यांच्या वर्णनाशी लेखक अतिशय तन्मय झाला आहे. लेखक मूळचा कानडी असल्यामुळे त्या भाषेचे वळणही कानडीसारखेच आहे. त्यातील माहिती निरलंकृत, अत्यंत बिनचूक आहे. घटना व व्यक्ती यांची वर्णने रेखीव झाली आहेत. या गुणवैशिष्ट्यांमुळे आजपर्यंतच्या बखरीत या बखरीचे स्थान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे मानले जाते. मराठी भाषेच्या दृष्टीने ही बखर स्वतंत्र वळणाचीच असल्याचे दिसते. मराठी भाषेच्या वैभवात या बखरीने मोलाची भर टाकली आहे.

ही बखर 'वेंकटाट्री तकेल निसीदा' या नावाच्या बखरकाराने लिहिलेली आहे. निजामशहा, आदिलशहा, कुतुबशहा व बरीदशहा यांनी 'एकोला करोनि रणी, रामरावो कसा निरपला' याचा वृत्तांत देणारी अर्थातच युध्दवर्णनपर आहे. याबरोबरच इतर प्रसंगही उदा. राजकुवरने (रामराजाने) आपल्या मातेचा घेतलेला निरोप, युध्दाऐवजी 'हेजीबाती' करण्याचा तिने दिलेला सल्ला, रात्री राजकुवरला पडलेले दुःस्वप्न, अली येदिलशहाने केलेली बेईमानी व दगा निवडक शब्दात आकर्षक रीतीने वर्णिलेले आहेत. विजयनगरच्या साम्राज्याच्या

नाशाची हृदयविदारक कहाणी अतिशय परिणामकारक रीतीने पण थोडक्यात या बखरीत दिलेली आहे. करुण-भीषण या बखरीला 'मराठी बखरीत, भाषेच्या व विषयाच्या दृष्टीने स्वतंत्र स्थान दिले पाहिजे' असे द. वा. पोतदार यांनी म्हटले आहे. (विजयनगर स्मारक ग्रंथातील लेख-१९३६-३७)

### ४.४.३ शालिवाहनाची बखर :-

मराठी साहित्यातील व शिवपूर्वकाळातील ही बखर महत्वाची मानली जाते. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते ही मराठी साहित्यातील सर्वात जुनी बखर समजली जाते. त्याचे कारण म्हणजे शालिवाहनाचा काळ हा इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून इ.स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत मानला जातो. तो शककर्ता राजा असून आजचे पंचांगकर्ते लोक शालिवाहन शकाचा वापर करतात. त्यामुळे या बखरीला आणखीन जास्त महत्व प्राप्त होते. ही बखर मोडी लिपीत लिहिली असून तिचे लेखन शुध्द देशी कागदावर केले आहे. या बखरीचे ११ बंध असून मराठी साहित्यात तिचे स्थान महत्वपूर्ण आहे. या बरोबरच शालिवाहनचरित्र या नावाची आणखी एक पंचवीस पानाची बखर लिहिली गेली आहे. या पंचवीस पानांपैकी पहिली १३ पाने प्रस्तावना लिहिली असून त्यामध्ये कृत, त्रेता, द्वापार आणि कलियुग या कालाच्या विभागांची माहिती दिली आहे. ही माहिती पौराणिक पध्दतीने दिली आहे. त्याचबरोबर युधिष्ठिर, विक्रम, विजयाभिनंदन शालिवाहन, नागार्जुन, कल्की, महम्मद पैंगबर, येशूख्रिस्त या शककर्त्या राजांची यादी दिली आहे. पुराणपध्दतीने लिहिलेल्या या बखरीत अद्‌भूतम्यता आहे. मुद्रणात व हस्तलिखितात बराच फरक आहे. त्याची भाषादेखील अर्वाचीन व बरीच अशुध्द आहे.

शिवपूर्वकालीन बखरींची संख्या अत्यंत कमी असली तरी या बखरींचे वाङ्‌मयीन मूल्य अत्यंत महत्वाचे आहे. तसेच शिवपूर्वकालीन बखरींविषयी महानुभावीय लेखकांनी सिंघनदेव यादवांची बखर, हेमाड पंडितांची बखर यांचाही समावेश करावा लागतो. परंतु आज या बखरी उपलब्ध नाहीत. यातील अनेक बखरी या गद्यमय आहेत. हे लेखन मराठ्यांच्या इतिहासाला प्रेरणादायी ठरले आहे. किंबहुना मराठी लेखनाचा प्रारंभ येथूनच झाला. राजवाड्यांनी शालिवाहनाची बखर ही सर्वात जुनी बखर मानली असली तरी अनेक विचारवंतांनी मात्र मराठीतील गद्य इतिहास लेखनाची मुहुर्तमेढ रोवण्याचे श्रेय महिकावतीच्या बखरीला दिले आहे. या लेखनापाठीमागील भूमिका ही स्वकीयांचा इतिहास लिहून ठेवणे ही आहे. त्यामुळे लेखनप्रामाण्याच्या दृष्टीने या बखरी महत्वपूर्ण मानल्या जातात. ऐतिहासिक सत्याला पुरेसे प्रमाणभूत असे हे बखरींचे लेखन झालेले आहे.

## ४.५ शिवकालीन बखरी

शिवकाळात लिहिलेल्या बखरींची संख्या अधिक आहे. मराठी गद्याच्या विकासाच्या दृष्टीने शिवकालीन बखरींचे वाङ्‌मयीन व ऐतिहासिक महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे या कालखंडातील एक थोर युगप्रवर्तक विभूती होय. त्यामुळे त्यांचे जीवन, कार्य, स्वराज्यस्थापना, राज्यव्यवस्था इत्यादी विषयांवर

बखरलेखन झाले आहे. शिवकालीन बखरींमध्ये शिवाजी महाराजांचे चरित्र, राज्यशासन, हकीकती वर्णने आहेत. शिवकाळामध्ये १) कृष्णाजी अनंत सभासदकृत शिवछत्रपतींचे चरित्र–सभासदी बखर शके १६१९ २) रघुनाथ यादव चित्रेकृत चित्रगुप्ताविरचित बखर, शके १६८३ ३) दत्ताजी त्रिमल वाकेनवीय व अनाजी रंगनाथ मलकरेकृत '९१ कलमी बखर' ४) मल्हार रामराव चिटणीसकृत सप्तप्रकरणात्मक चरित्र, शके १७३३ ५) गणपत गोविंदराव बरवेकृत मराठी साम्राज्याची छोटी बखर शके १७३९ ६) खंडो बल्लाळ चिटणीसकृत शिवदिग्विजय शके १६४० ७) हकीकती बखर १८३७ अशा बखरींचा समावेश होतो. बहुतेक शिवचरित्रपर बखरी उत्तरकालीन आहेत. तरीपण कृष्णाजी अनंत सभासदांच्या बखरीपासून मराठीत राष्ट्रीय भूमिकेने राष्ट्रपुरुषांबद्दल ऐतिहासिक लेखनाला सुरुवात झाली. या कालावधीत जे लेखन करण्यात आले, त्यापैकी निम्म्यापेक्षा जास्त बखरी या शिवछत्रपती वर्णनपर लिहिलेल्या आहेत. या कालावधीत कृष्णाजी अनंत सभासद हे अत्यंत महत्त्वाचे असे बखरकार आहेत. त्यामुळे त्यांची ही बखर समकालीन बखर म्हणून ओळखली जाते.

### ४.५.१ सभासदांची बखर :–

ही बखर शिवकाळातील महत्वपूर्ण बखर म्हणून ओळखली जाते; कारण ती समकालीन बखर असून शिवकाळातील पहिलीच बखर आहे. समकालीनाने लिहिलेले हे पहिलेच शिवचरित्र होय. त्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने त्याचे महत्व अनन्यसाधारण मानले जाते. कृष्णाजी अनंत सभासद यांनी रचना केली असून, त्यामध्ये शिवछत्रपतीपासून राजाराम महाराजांच्या अखेरपर्यंतचा वृत्तांत चित्रित केला आहे. कारण सभासद हे शिवाजी महाराजांपासून राजाराम महाराजांच्या अखेरपर्यंत दरबारात सभासद म्हणून कार्यरत होते. त्यांनी लिहिलेली ही बखर त्यांच्याच नावाने सभासदांची बखर म्हणून ओळखली जाते. या बखरीमध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनातील एकाहत्तर निवडक प्रसंगांचे चित्रण करण्यात आले आहे. त्यांच्या जीवनातील महत्वाच्या अशा सर्व घटनांचा समावेश येथे करण्यात आला आहे. या चरित्राच्या सुरुवातीस शिवाजी महाराजांचे पूर्वचरित्र त्रोटक स्वरुपात वर्णन केले असून अफजलखानाचा वध ही शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना म्हणून ओळखली जाते त्याचेही वर्णन येते. त्याचबरोबर औरंगजेबाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे दिल्लीला प्रयाण, तिथून त्यांनी करुन घेतलेली सुटका परत आल्यानंतर मिर्झाराजा जियसिंगाबरोबर केलेल्या करारातील किल्ले पुन्हा जिंकून घेणे, स्वत:चा राज्याभिषेक करवुन घेणे, भागानगरास यांनी दिलेली भेट, व्यंकोजीची भेट इत्यादी प्रसंगांचे सविस्तर वर्णन केल्यामुळे ते प्रसंग जसेच्या तसे वाचकांच्या डोळ्यासमोर उभे राहतात.

या संपूर्ण बखरीमध्ये शिवराज्याभिषेक (शालिवाहन शके १५९९) जेष्ठ मास शु. ९३ व शिवाजी महाराजांचे महाप्रयाण (शालिवाहन शके १६०२) रौद्र नाम संवत्यरे चैत्र शुध्द १५ रविवार या दोनच घटनांचा कालनिर्देश सभासदांनी आपल्या बखरीत केला आहे. बाकी सर्व घटनांचा उल्लेख ते 'पुढे', 'मग',

'त्याजबरी', 'त्याऊपरी', 'तो', 'इतक्यात' अशा शब्दांत करतात. तसेच घटनांचे तपशीलवार वर्णन विविध असे १८ कारखाने प्राप्त केलेला खजिना, शिलेदार, सुभेदार, कारकून, हुजरे, गडकोट इत्यादींच्या जमाखर्चाचा तपशील त्यांनी या बखरीत केला आहे. या सर्वच घटनांचा कालानुक्रम त्यांनी अत्यंत शिस्तीने पाळला आहे. अफजलखानाचे वर्णन करताना अफजलखान सामान्य नव्हेतर तो केवळ दुर्योधनच जातीने होता असे केले आहे तर दिलेरखानचे वर्णन, 'दिलेरखान म्हणजे मोठा बळकट, एका हत्तीचे बळ किंवा जास्तच होईल, आणि हत्तीबराबरी खाणे, पिणे, दररोज हत्ती खातो तेणेप्रमाणे वजन, खाणे, शरीर तरी दुसरा हेडंब राक्षस', असे केले आहे. त्याने चित्रित केलेली अफजलखान आणि दिलेरखानाची व्यक्तिचित्रे ह महत्वपूर्ण मानली जातात. त्यामध्ये शिवाजी महाराज व अफजलखानाची प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेल्या भेटीचे वर्णन कलात्मक पध्दतीने केलेले आहे. त्यासाठी उभारलेल्या मंडपाचे वर्णन थोडक्यात पण सुंदर अशा शब्दात सभासद करताना दिसतात. या वर्णनाबरोबरच मत्सराने चिडलेला खान आणि त्याच्या मनातील भावही बखरकार अतिशय समर्पक शब्दात वर्णन करतात. हे प्रसंग अत्यंत नाट्यपूर्ण आहेत. त्यामुळे बखर ही कलात्मक व वाचनीय आहे. ही सर्व नाट्यात्मक चित्रणे जिवंत असून आपल्या डोळ्यासमोर हे प्रसंग घटत आहेत असा भास होतो, हे या बखरीचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल.

या बखरीतील अफजलखानाच्या वधाचा प्रसंग अतिशय सामर्थ्याने व ताकदीने चित्रित केलेला आहे. या प्रसंगाचे शब्दचित्र रेखाटताना बखरकार म्हणतात की, 'राजीयाने भेटी देता खानाने राजीयांची मुंडी कवटाळून खाकेखाली धरली आणि हत्तीची जामदाड, होती तीचे मेन टाकून कुशीस राजीयाचे चालविले. तो अंगात जरीची कुडती होती. त्यावरी रखरखली, अंगास लागली नाही. हे देखोन राजीयानी डावे हाताचे वाघनख होते, तो हात पोटात चालवला. खानाने अंगात झगाच घातला होता. त्यामुळे वाघनखाचा मारा करीतच खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात, उजवे हाताचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करुन मुंडी आसंडून चौथरीया खाली उडी घालोन निघेन गेले. खानाने गलबला केली की, मारिले! मारिले! दगा दिधला! बेगि धावा!'

अशा प्रसंगातील नाट्य शब्दरुप करण्याचे कौशल्य छोट्या छोट्या वाक्यांमधून अत्यंत समर्पक असे केलेले वर्ण आणि त्यातून केलेली प्रसंगनिर्मिती हे या बखरीचे खास विशेष आहेत.

शिवाजी महाराजांना होणाऱ्या भवानीच्या साक्षात्काराचे पाच-सहादा आलेले वर्णन, मृत्यूसमयीच्या उत्पातांचे उल्लेख व शेवटी दिलेली फलश्रुती इत्यादीवरुन बखरीची निवेदनपध्दती पौराणिक थाटाचीच असल्याचे स्पष्ट होते. 'या सर्वांना इतिहास हे नाव देण्याचे धारिष्ट्य करवत नाही' असे राजवाडे म्हणत असले तरी बखरकार हा शिवकालीन राजकारणाशी प्रत्यक्ष संबंधित असून त्याने शिवाजीराजांच्या पश्चात १२-१४ वर्षातच हे चरित्र लिहिले असल्याने वरील गोष्टी तत्कालीन लोकांच्या श्रध्देचा विषय समजून या चरित्राला विश्वसनीय मानावे लागते.

या बखरीतील शिवाजीराजांच्या पोशाखाचे आणि त्यांच्या सिंहासनाचे वर्णनही उल्लेखनीय आहे. शिवाजीराजे भेटीस येणार म्हणून त्यांच्या भितीने बादशहाने सदर करुन पांच हत्यारे आपणास ठेवून, कंबर बस्ती करून, अंगा जरीची कडती घालून खासा तक्ती बैसला, तसेच तक्त्याजवळ मोठमोठे शूर मर्दाने व तख्ताचे आसपास दोन हजार माणूस उभे केले.... मनात की, 'शिवाजी सामान्य नाही, सैतान आहे. अफजलखान भेटीमध्ये मारिला. तैसाच उडोन तख्तावीर आला आणि आपणास दगा केला तरी काय करावे?' ही बादशहाने केलेली तयारी सभासद कौशल्याने सांगतो. त्यामुळे बादशहा आणि शिवाजीमहाराज या दोघांचीही व्यक्तिचित्रे, उत्तम पध्दतीने साकार होतात.

अद्‌भूतरम्य प्रसंगवर्णने हा शिवकालीन बखरींचा महत्वाचा विशेष मानावा लागतो. तुळजापूरची भवानी शिवाजीच्या अंगात संचार करुन 'आपण प्रसन्न जाहलो माझे सर्वस्वे सहाय्य तुला आहे. तुझे हाते अफजलखान मारवितो. तुजला यश देतो. तू काही चिंता करु नको,' असे आश्वासन देते. तसेच 'ते दिवशी भूकंप जाहला.... श्री-शंभूमहादेवी तळ्याचे उदक रक्तांबर झाले. अशी आतिशयोक्तीपूर्ण वर्णने या बखरीत आलेली आहेत तर या बखरीची फलश्रुती सांगताना बखरकर लिहितात की, 'हे शिवचरित्र जे वाचतील व श्रवण करतील त्यास मोठे पुण्य जोडेल, निपुत्रीकास पुत्र होतील, दरिद्रीयास लक्ष्मीवंत होतील व अपेशीयांस यशवंत होतील व पुण्यश्लोक पराक्रमी होतील.' अशा प्रकारची अद्‌भूतता, पौराणिकता, कल्पकता आणि फलश्रुती यामुळे बखरीतील ऐतिहासिक प्रामाण्याला बाधा येते. ती विश्वसनीय राहत नाही. त्यामुळे याला इतिहास असे म्हणता येत नाही. पण तरीही संस्कृत फारशी शब्दयोजनेमुळे ओघवत्या शैलीमुळे हे शिवचरित्र वाचनीय झाले आहे. तसेच 'ये जातीचा कोणी मागे जाहला नाही पुढेही होणार नाही', अशा प्रकारचा शिवाजी महाराजांच्या बद्दलचा आदर आणि उत्कट भावना यामुळे ही बखर भारलेली आहे.

कृष्णाजी अनंत सभासद यांचेपासून ऐतिहासिक बखर लेखनाची परंपरा सुरु झाली. मराठी ऐतिहासिक परंपरेचे ते जनक मानले जातात. कै. वि. का. राजवाडे हे सभासदांना 'महाराष्ट्राचे सर टॉमस मोर' असे संबोधतात.

बखरीची भाषा संस्कृत फारशी मिश्रित आहे. उपमा, दृष्टांत, अलंकारांची विपूलता आहे. स्वराज्य संस्थापकाचे मराठीतील पहिले चरित्रपर लेखन म्हणून ऐतिहासिक दृष्ट्या सभासदांची बखर महत्त्वाची आहे. या बखरीविषयी श्री. हेरवाडकर म्हणतात की, 'साहित्यगुण संपन्न अशा या बखरीला मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले आहे.' साध्या नि सरळ भाषेतील निवेदनशैलीने मोजक्या व जोरकस शब्दांत लिहिलेले हे शिवचरित्र म्हणजे मराठी गद्यवाङ्‌मयाचा मौलिक अलंकारच होय.

### ४.५.२ श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र :

शिवकालीन बखरींपैकी ही एक महत्वाची व उल्लेखनीय बखर आहे. मल्हार रामराव चिटणीसांनी हे सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रपर बखर लेखन केले. ते सभासदांच्या बखरीनंतर सुमारे दीडशे वर्षांनी इ.स.

१८१० मध्ये ही बखर लिहिली आहे. मल्हार रामराव चिटणीस हे शिवकालीन बखर लेखनाच्या क्षेत्रातील बुजुर्ग असे नाव आहे. ते प्रथम पेशव्यांच्या दरबारी आणि नंतर सातारच्या प्रतापसिंह छत्रपतींच्या पदरी चिटणीस म्हणून कार्यरत होते. स्वामीनिष्ठा हा त्यांच्या घराण्याचा गुण होता. विश्वासू सेवक म्हणून त्यांना बारीकसारीक गोष्टी माहिती असल्याने सदर बखर विश्वसनीय मानली जाते.

या बखरीच्या प्रारंभी बखरकार लिहितात की, 'स्वति श्री राज्याभिषेक १३७ प्रमोदीनाम, संवत्सरे, जेष्ठ बहुलषष्ठी भृगवासरे क्षेत्रियकुलावतंस श्रीराजाधिराज श्रीमहाराज प्रतापी शाहू नृपतीयांसी यांनी आज्ञा केली ऐसिजे' असा उल्लेख केलेला आहे. परंतु हे वर्णन ऐतिहासिकदृष्ट्या सुसंगत दिसत नाही. आपण हे सप्तप्रकरणात्मक चरित्र 'शास्त्राधार विष्णुपुराणादीतील दंडनीती, राजधर्म, रमलशास्त्र, पराक्रमकथा यांच्या आधारे लिहिले आहे' असे स्वत: लेखक सांगतो. पण तरीही या चरित्रातील घटनांचा कालानुक्रम विसंगत आहे.

मल्हार रामराव चिटणीसांनी या शिवचरित्राचे एकूण सात भाग केले आहेत. हे सात भाग म्हणजेच सप्तप्रकरणे होत.

१) पूर्वजन्मवर्णन व जन्मकथन २) राज्यआक्रमण आणि सज्जनसेवन ३) अफजलखान वध ४) राज्यमर्यादा स्थापन आणि पितृदर्शन ५) दिल्लीपती पराभव ६) दक्षिणदिग्विजय ७) राज्याभिषेक

एकूणच ऐतिहासिकदृष्ट्या ही सप्तप्रकरणात्मक बखर महत्वाची आहे. या बखरीतील चिटणीसांनी केलेले वर्णन हे अधिक प्रभावी असून त्यातील प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहत आहोत असे वाटते. अफजलखानाच्या वधाचा प्रसंग नाट्यात्मक आहे. संत तुकाराम व शिवाजी महाराज भेट हे प्रसंगही भावपूर्ण आहे. शिवराज्याभिषेक प्रसंगाचे वर्णन हे चिटणीसांच्या सूक्ष्मनिरीक्षण शक्तीचा प्रत्यय करुन देणारे आहे. राजदरबारातील शिष्टाचार, चालीरीती, शत्रूचा पराभव आदी प्रसंगांचे चिटणीसांनी सूक्ष्म रेखाटन केले आहे. चिटणीसांनी बखर लेखन पौराणिक पध्दतीने केलेले दिसते. या चरित्राला एखाद्या दैवताचे महात्म्यवर्णनपर स्वरुप प्राप्त झाले आहे. शिवाजी महाराजांच्या कुळाची उत्पत्ती, वंशपरंपरा थेट युधिष्ठिरापर्यंत भिडवतो. निवेदनात गतिमानता, वर्णनात ह्रदयंगमता आहे. तपशिलचा बारकावा, कल्पकता, व्यक्तिवर्णन उत्कृष्ट स्वभावदर्शन, ओजस्वी भाषा, छोटी-छोटी वाक्यरचना, संस्कृत-फारशी मिश्रित वाक्ये, अलंकारिकता, चित्रमयता नाट्यात्मकता आदी विशेषांमुळे बखर प्रभावी, चित्रवर्धक परिणामकारक झाली असून मराठी वाङ्मयातील एक लेणे होय.

या बखरीत लेखन दोष असले तरी त्यांनी लेखनासाठी आख्यायिकांचा वापर न करता शास्त्राधार प्रमाण मानले आहेत. त्यामुळेच ग्रॅण्ट डफनेही चिटणीसांचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला आहे.

### ४.५.२ शिवदिग्विजय :-

हे शिवाजी महाराजांचे चरित्रपर बखर लेखन आहे. शिवाजी महाराज दिवंगत झाल्यानंतर ३७-३८ वर्षांनी इ.स. १७१८ मध्ये या बखरीचे लेखन झाले आहे. खंडो बल्लाळ चिटणीस यांनी हे बखर लेखन केलेले आहे. या चरित्रात त्यांनी सप्तप्रकरणात्मक बखरीप्रमाणे पूर्वार्धात युधिष्ठिरापासून वंशावळ दिलेली आहे. या चरित्रातील वंशावळी विष्णुपुराण रजपूतांच्या राजावळी व यवजांच्या तवारिखा यातून घेतलेल्या आहेत. अल्पशब्दात व्यक्तींचे आणि स्थळांचे वर्णन बखरकार करतो. 'जातीने बहुतमर्द, मोठे हियाचे, कजाखदार, कटाक्ष, सर्वगुणेयुक्त' असे बाजीप्रभुचे वर्णन बखरकार करतो. अफजलखानाच्या भेटीच्या वेळी तेथील रस्त्याच्या सुशोभितपणाचे 'या रस्त्यांनी पाणी, कुप, तलाव, उद्याने, सधनवृक्ष, निबिड छाया, परमसुशीतल, अतिसुंदर, मनोप्सित पदार्थ, वस्तूमात्र जागोजागी योजिले' असे भरगच्च वर्णन बखरकार करतात.

खंडो बल्लाळ यांची भाषा प्रौढ व संस्कृत वळणाची आहे. अधूनमधून संस्कृत श्लोकांचाही वापर ते करतात. त्यांची शैली आकर्षक आहे. बहुश्रुतता, भाषाप्रभुत्व आणि लेखकाचा प्रामाणिकपणा यामुळे अनेक वाङ्मयगुणांचा आढळ या बखरीत होतो. म्हणून वाङ्मयीन दृष्टीने या बखरीचे अधिक महत्व आहे (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ.बी.एन. पाटील पृ.क्र. ४७०)

### ४.५.४ ९१ कलमी बखर :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रपर ९१ कलमी बखर आहे. ह्या बखरीच्या संदर्भात कै. भावे सारस्वतकर लिहितात की, 'हल्ली ज्या ऐतिहासिक बखरी प्रसिध्द आहेत त्या सर्वात ९१ कलमी बखर ही फार जुनी आहे. ही बखर फार महत्वाची असून हिच्या नंतरच्या अनेक शिवचरित्रकारांनी हिचाच उपयोग केलेला आहे.' हिची भाषा जुनी असून त्याविषयी पुढील शेरा आहे. 'सदरहू आख्यान नव्वद प्रकरणे पुण्यश्लोक राजा त्याची कथा दत्ताजीपंत वाकेनिविस त्यापासी तपशिलवार लिहिली होती. त्यापासून संकलित तालिक लेहून घेतली. अनाजी रंगनाथ मलकारे याणी हस्ताक्षरे तालिक लिहिली असे' दत्ताजी त्रिंबक वाकेनवीस हे शिवाजी महाराजांच्या मंत्रीमंडळापैकी एक. शिवाजीराजे आग्र्याला गेले, पुढे हैद्राबादेत गेले त्यावेळी हे त्यांच्याबरोबर होते. या प्रसंगी दैनंदिनी लिहिण्याचे काम दत्ताजीवर सोपविले होते, तेव्हा हिचे मूळ लेखन फार आधिचे असावे. पण सध्याच्या प्रतीतील भाषेच्या वळणावरुन ती अठराव्या शतकातीलच ठरते. माहितगार अशा समकालीनाने लिहिलेली म्हणून शिवचरित्राला ही बखर साहाय्यक ठरेल. (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप : ह.श्री. शेणोलीकर पृ.क्र. २९१)

### ४.५.५ श्री शिवाजी प्रताप :-

या बखरीचा लेखन काळ शके १७५१ असून सयाजीराव महाराज गायकवाड यांचे आज्ञेवरुन या

बखरीचे लेखन झाल्याचे दिसते. या बखरीमध्ये शिवाजी महाराजांचे बालपण आणि त्यांच्या पूर्वजांची हकीकत आली आहे. काळाचा, नामांचा, स्थळांचा उल्लेख चुकीचे असल्याने ऐतिहासिक महत्व नाही. बखरकार अफजलखानाचा उल्लेख अबदुलखान असा करतो. शास्ताखान हा विजापूरचा सरदार होता. तसेच शिवाजी महाराजांच्या पत्नींची नावेही चुकीची देतो. बखरीमधील निसर्गवर्णन, प्रसंगवर्णन, व्यक्तिवर्णन काव्यमय असून भाषा अलंकारिक आहे.

### ४.५.६ चित्रगुप्ताची बखर :-

रघुनाथ यादव चित्रे उर्फ चित्रगुप्त यांनी ही शिवचरित्रपर बखर लिहिलेली आहे. तिचे नाव 'शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र' असे आहे. या बखरीचा लेखनकाळ इ.स. १७६१ आहे. ही बखर स्वतंत्र नसून सभासद बखरीचा अनुवाद आहे. सभासदांच्या बखरीतील मजकूराचा यात विस्तार केलेला आहे. अफजलखान-शिवाजीराजे यांचा संवाद बखरकाराने हिंदुस्थानी पद्यात दिला आहे. विस्तृत वर्णन, प्रभावी शब्दयोजना, जोमदार वाणीमुळे बखर आकर्षक झाली आहे. चित्रगुप्त या बखरीला 'शिवआख्यान' संबोधतो. चित्रगुप्ताच्या या बखरीत सभासद बखरीचा अनुवाद असला तरी अनुवादातून चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्वावर प्रभावीपणे प्रकाश टाकलेला दिसतो प्रत्ययकारी व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णनाचे वस्तूवर्णनाचे साधर्म्य असलेले भावगर्भ स्वरुपाचे अनेकदा पल्लेदार वाक्यांनी नटविलेले मराठी गद्य या बखरीमध्ये पाहावयास मिळते.

थोडक्यात शिवपूर्वकालीन बखरींपेक्षा शिवकालीन बखरींची संख्या अधिक आहे. या बखरींमध्ये सभासदाच्या बखरीशिवाय समकालीन अशी एकही बखर नाही. शिवाजी महाराजांसारख्या राष्ट्रपुरुषाच्या चरित्राचे अत्यादराने काहीशा विभूतिपूजेने या बखरकारांनी जे संकीर्तन केले आहे ते राष्ट्रीय भावनेच्या परिपोषाला उपकारक असेच आहे. वर्ण्य विषयाचा जिव्हाळा, कौशल्यपूर्ण निवेदन, डौलदार व आवेशपूर्ण भाषाशैली इत्यादी विशेषांमुळे या बखरी वाङ्मयीन दृष्टीने उल्लेखनीय आहेत. शिवकालीन इतिहासाचे साधन म्हणून एका विशिष्ट मर्यादेपर्यंत शिवकालीन बखरींची विश्वसनियता मान्य करावी लागते.

### ४.६ पेशवेकालीन बखरी :-

पेशवेकाळ हा साधारणत: छत्रपती शाहूचे दक्षिणेत आगमन झाल्यावर, त्यांनी ताराबाईशी युध्द करुन सातारची राजधानी कब्जात घेऊन मराठी राज्याचा धनी ता. १२ जानेवारी इ.स. १७०७ पासून धुळकोटावर बाजीरावास इंग्रजांनी वेढल्यानंतर त्याच्या शरणागतीपर्यंत ता. ३ जून इ. स. १८१८ पर्यंतचा काळ हा 'पेशवेकाळ' म्हणून मानला जातो.

पेशवेकाळातील महत्वाची घटना म्हणजे इ.स. १७६१ चा पानिपतचा रणसंग्राम होय. इ.स. १७९५ मधील खर्ड्याच्या लढाईचा विजय हा शेवटचा विजय. या लढाईत मराठ्यांनी निजामाचा पराभव केला. त्यानंतर मात्र मराठ्यांच्या कर्तृत्वाची परंपरा संपली. इ.स. १८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाली. या कालखंडात ज्या बखरींचे लेखन झाले त्यांना पेशवेकालीन बखरी असे संबोधले जाते.

या कालखंडात १) पानिपतची बखर २) भाऊसाहेबांची कैफियत ३) होळकरांची थैली ४) काशीराजाची बखर ५) नाना फडणीसाचे आत्मचरित्र ६) साष्टीची बखर ७) गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे आत्मचरित्र ८) मराठ्यांची बखर ९) हरिवंशाची बखर १०) खर्ड्याच्या स्वारीची बखर ११) श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर अशा अनेक बखरी निर्माण झाल्या व मराठी गद्याचा विकास होत राहिला.

पेशवेकालीन बखरींच्या स्वरुप वैशिष्ट्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**४.६.१ पानिपतची बखर :-**

पेशवेकालीन बखरींपैकी ही समकालीन बखर असून तिचे ऐतिहासिक महत्त्व अधिक आहे. पानिपतच्या बखरीचा वर्ण्यविषय मुख्यत्वे 'पानिपतचे युध्द' असा आहे. पानिपत ह्या शब्दाला मराठीत एक वेगळाच अर्थ प्राप्त झालेला आहे. ह्या बखरीचे लेखन 'श्रीमंत महाराज गोपिकाबाईसाहेब मुक्काम शहर पुणे' यांचे आज्ञेने झाले आहे. रघुनाथ यादव चित्रे म्हणजेच चित्रगुप्त यांनी ही बखर लिहिली आहे. पानिपतच्या युध्दावेळी तो प्रत्यक्षपणे रणांगणावर हजर असल्याने त्यावेळी जे जे पाहिले, अनुभवले त्या साऱ्यांचे चित्रण त्याने या बखरीत केले आहे. ही बखर पानिपतच्या युध्दानंतर अवघ्या दोन वर्षाच्या आत लिहिली असल्याने ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने ती बरीच विश्वसनीय मानतात. श्रीमंतांना रोज घडणाऱ्या घटनांचे निवेदन करावे लागते. त्यामुळे कच्चा मजकूर तयार करुन तो सेवेशी सादर करावा लागत असे. चित्रगुप्तांनी तसा उल्लेख बखरीच्या शेवटी केला आहे. या बखरीविषयी 'तत्कालीन माहितगार व्यक्तीने ही पानिपतची बखर लिहिली असल्याने काही चुका गाळल्या असल्या तरी ती विश्वसनीय मानणे योग्य ठरेल' असा स्पष्ट निर्वाळा श्री हेरवाडकर यांनी दिला आहे.

या बखरीचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आकर्षक अशी वर्णनपध्दती होय. ऐतिहासिक व्यक्ती आणि घटना यांच्याविषयी विलक्षण आपुलकी, जिव्हाळा, कार्याविषयाशी तादात्म्य आणि पक्षनिष्ठा यामुळे व्यक्तिवर्णन, प्रसंगवर्णनात जिवंतपणा दिसून येतो. बखरीची भाषा प्रासादिक आहे. उपमा, दृष्टांत, अलंकार, औचित्यपूर्ण आहेत. 'त्या समयी भाऊ कसा भासला की, केवळ कल्पांतीचा आदित्य; हजारोहजार त्या कुरक्षेत्री रणमंचकी निजलेच राहिले.' अशा वाक्यातून भाषेचे सौंदर्यगुण प्रत्ययास येतात. भाषासौंदर्याने आणि कल्पनासौंदर्यानेही बखर अंतर्बाह्य नटलेली आहे. अप्रतिम वर्णनशैली, उत्कृष्ट कल्पकता, अलंकारांची समर्पक योजना, भाषाप्रभुत्व इत्यादी गुणांमुळे बखर वाङ्मयीनदृष्ट्या सरस झाली आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : डॉ.बी.एन. पाटील पृ. क्र. ४७१)

या बखरीमध्ये युध्दाचे वर्णन करताना बखरकार लिहितात की, 'विर रणामध्ये माजले, रणमद चढला. केवळ दशाग्नी शताग्नीशी मारु लागले. ते समयी सदाशिवपंत यांनी अंबरीतून उतरुन दोहो हाती पट्टे घेवून नीट फौजेत चालून घेतले व बेलाशक हैदोसच केला. त्यात अनेकांची शीरे तुटली, धडावेगळी जाहली, कोणाची उदरे फुटोन अंतर्माळा लोंबू लागल्या. परंतु अणुमान कोणी लढाईविषयी कसर केली नाही.' अशी

वीररसपूर्ण वर्णने पाहावयास मिळतात. सदर बखरीतील भाऊसाहेब, विश्वासराव, जनकोजी शिंदे ही व्यक्तिचित्रणे संस्मरणीय झाली आहेत. यावरुन ईश्वरनिष्ठा व स्वामीनिष्ठा या बखरकाराच्या व्यक्तिमत्वाच्या विशेषाची आपणास पुरेपुर कल्पना येते. त्यामुळे ही बखर वाचनीय व परिणामकारक झाली आहे. त्यामुळे बखरीतील व रणसंग्रामातील अनेक प्रसंग मनात घर करुन राहतात.

**४.६.२ भाऊसाहेबांची बखर :–**

पानिपतच्या ऐतिहासिक रणसंग्रामाची साधार साद्यंत हकिगत देणारी कृष्णाजी शामरावकृत 'भाऊसाहेबांची बखर' पेशवेकालीन बखरींपैकी महत्वाची बखर आहे. कृष्णाजी शामराव यांनी व्यंकाप्पा नाईक दिंडोरे यांच्या आज्ञेवरुन हे लेखन केले. असे बखरकार लिहितात.

या बखरीतील पानिपतच्या युध्दाने दोन तृतीयांश भाग व्यापला आहे. एक तृतीयांश भागात पानिपतयुध्द पूर्व मराठ्यांचे राजकारणाचे वृत्त आहे. या बखरीचे लेखन पानिपतच्या युध्दानंतर दोन वर्षांनी झाले आहे. त्यामुळे ऐतिहासिक व वाङ्मयीन दृष्टीने ही परिपूर्ण बखर आहे. परंतु बखरीतील अनेक घटना विश्वसनीय मानणे कठीण होते. 'बेचेंगे तो और भी लढेंगे' हे दत्ताजी शिंदेचे उद्‌गार बखरीला एका उंचीवर नेतात.

या बखरीतील बरीचशी माहिती ऐकीव आहे. 'नजीबखान रोहीला मात्रा गमनी' एवढ्या शब्दातून तो नजीबखानाचे चित्र उभे करतो. 'ईश्वरे – यश दिले तरी उत्तम; नाही तरी पुन्हा तुमची आमची भेट स्वर्गी होईल', असे निखराचे उद्‌गार पत्नीजवळ काढून युध्दात जिद्दीने उतरणारे बळवंतराव मेहेंदळे, आणि 'उत्तम आहे. शतवर्षात केव्हा तरी मरावे. त्यास या संग्रामात मुक्ती आली तरी बहुत बरे जाहाले,' असे तेजस्वी उत्तर देणारी बळवंतरावांची पत्नी, तसेच दत्ताजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे, मल्हारराव होळकर, भागीरथीबाई, गौतमाताई या साऱ्यांची व्यक्तीचित्रे प्रभावी आहेत. प्रासादिक, जोमदार आणि नाट्यपूर्ण भाषा हे या बखरीचे महत्वाचे विशेष आहे. 'जैस गडगुंजे लाह्या भाजतात तशी गत केली,' 'मुरगी मारी बचडे दाणादाण जैसे जिकडील तिकडे पळाले,' 'तुपाचे घागरीवर उंदराचे पिटूकले बसते, तैसा प्रकार जाहला,' 'शाळवाचे पिकाप्रमाणे शिरे व्यापली' अशी मार्मिक उपमा, दृष्टांताची भाषा हे या बखरीचे सामर्थ्य होय.

भाऊसाहेबांच्या या बखरीमध्ये कलात्मकता, नाट्यात्मकता, सांस्कृतिक संदर्भ, संबोधनात्मकशब्द योजना, भाषेचा आवेग, ओघवते निवेदन कौशल्य असे वाङ्मयीन गुण ओतप्रोत भरले आहेत. भाषा आणि विचार सौंदर्य यांच्या साहचर्यातून इतिहास आणि वाङ्मय गुणांचा संगम बखरकाराने बखरीत साधला आहे. हा केवळ जुन्या गद्याचा नमुना नसून ते मराठी–भाषेचे वैभव आहे, असे हेरवाडकरांना वाटते. या बखरीचे श्रेष्ठत्व सांगताना ल.रा.नसिराबादकर म्हणतात की, 'व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने आणि वस्तुवर्णने यांनी या बखरी इतकी दुसरी कोणतीही बखर समृध्द नाही.' (प्राचीन वाङ्मयाचा इतिहास पृ.क्र. ३०२) बखरकाराचे सूक्ष्म निरीक्षण आणि भाषेच्या दृष्टीने कलात्मक प्रज्ञा प्रतिभेचा अनुभव त्याचबरोबर, पल्लेदार वाक्यरचना, संस्कृत व फारशी भाषांचा संस्कार, म्हणींचा उपयोग, पौराणिक उल्लेख, उपमा, दृष्टांत, रुपक, उपरोध, विनोद

यामुळे ही भाऊसाहेबांची बखर वाङ्मय गुणांनी श्रेष्ठत्व समृध्द अशी आहे.

### ४.६.३ ब्रहमेंद्रस्वामींची बखर :–

ही बखर धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्रपर आहे. शाहू, बाजीराव, चिमाजी यांचे गुरु ब्रहमेंद्रस्वामी या थोर सत्वपुरुषाचे जीवन चरित्रात्मक बखर आहे. बखर लेखकाचे नाव अज्ञात आहे. बखर लेखक स्वामींचा निकटवर्ती शिष्य असावा. बखर सांप्रदायिक भावनेने लिहिली आहे. स्वामींच्या जीवनातील अनेक चमत्कारिक कथांचे वर्णन बखरीत आहे. बखरीची भाषा रसाळ व भावपूर्ण असून गुरुनिष्ठा लेखनात ओतपोत आहे. स्वामींचे ठिकाण धावडशी होते त्यामुळे या बखरीचे नावही धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र असे आहे.

### ४.६.४ श्री शाहू महाराज यांची बखर :–

ही बखर गोविंदराव खंडेराव चिटणीस यांनी इ.स. १७४९ मध्ये लिहिली आहे. हा खंडो बल्लाळ चिटणीसांचा मुलगा तो शाहू महाराजांच्या समवयस्क होता. बल्लाळांचे सारे कुटुंबच शाहूंच्या पदरी सुरुवातीपासून होते. शाहूंची कैदेतून सुटका झाल्यावर खंडो बल्लाळ हे त्यांना जाऊन मिळाले होते. सदर बखरीमध्ये छत्रपती शाहू महाराज यांची सविस्तर हकीकत सांगितली आहे. बखरीच्या प्रारंभीच राजाराम महाराज व संभाजीमहाराज यांची तोटक माहिती आलेली आहे. शाहू महाराजांच्या जीवनातील घटना अतिशय भावोत्कटपणे या बखरीत आलेल्या आहेत. भावनोत्कटता व आवेशपूर्णता ही या बखरीची बलस्थाने आहेत. त्यामुळे ही बखर वाचनीय झाली आहे.

### ४.६.५ हनुमंत स्वामीकृत समर्थांची बखर :–

समर्थ रामदास स्वामींचे बंधूंच्या नातवाच्या टिपणावरुन बखर लेखन केलेले आहे. बखर वाङ्मयीन गुणांनी महत्वाची आहे. या बखरीत हनुमंतस्वामी अत्यंत जिव्हाळ्याने, प्रेमळपणाने लेखन करतात. गद्यवाङ्मयातील समर्थांचे चरित्र म्हणून या बखरीला महत्व द्यावे लागेल.

## ४.७ बखरींचे वाङ्मयीन विशेष :–

वरील सर्व बखरींचा आढावा घेतल्यानंतर आपल्या लक्षात येते की मराठी साहित्याच्या दृष्टीने तो एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे. खरेतर बखरकारांजवळ ऐतिहासिक दृष्टी नव्हती. त्याचप्रमाणे वाङ्मयीन दृष्टीचाही अभाव दिसतो. प्राचीन पद्य वाङ्मयाला जसे उच्च दर्जाचे प्रतिभासंपन्न लोक लाभले, तसे गद्याच्या बाबतीत झाले नाही. सारे बखरकार बहुधा कारकुनी पेशाचे असल्याने पांडित्य, चिकित्सा, भाषाप्रभुत्व, लेखनकौशल्य या बाबतीत सामान्यच म्हणावे लागेल. असे असले तरी वाङ्मयीन दृष्टीने विचार करता बखरकार हा कलावंत आहे. एका अर्थी बखरकार हा गद्यातील शाहीरच आहे. वीरांचे दर्शन समोर ठेवून त्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गावेत ही त्यांची वृत्ती आहे. 'बखरीतील ओजस्वीपणा हा ज्या वीरयुगात निर्माण झाल्या तो या युगाचा

अपरिहार्य परिणाम होता.' असे गं.ब. ग्रामोपाध्ये म्हणतात. (मराठी बखर गद्य, प्रस्तावना, पृ.क्र. ४०) या बखरी ज्या वीर युगाची सुरुवात स्वराज्य स्थापनेने झाली त्या वीरयुगाच्या एका अपरिहार्य परिणामातून निर्माण झाल्या. बखरकारांनी मराठी गद्याला डौलदार, घाटदार, ऐटबाज, भारदस्त, प्रौढ, नाट्यपूर्ण स्वरुप दिले. बखरीतील रेखीव रचना, कल्पना चातुर्य, निवेदनकौशल्य ही खास वैशिष्ट्ये असून व्यक्तिदर्शन, वर्णनपध्दती, रसपरिपोष आणि भाषाशैली या वाङ्मयीन गुणवैशिष्ट्यांकडे लक्ष ठेवून केल्यामुळे हे वृत्तकथन आकर्षक व मनोरंजक झाले आहे. प्रौढ व रसाळ भाषा, संस्कृत पारशी शब्दांचे प्राचुर्य, पौराणिक दाखले, अलंकार, सुभाषित, वाक्यप्रचार, म्हणी यांचा निवेदनातील आटोपशीरपणा यांमुळे बखरीतील भाषा ही साधी, गद्य निरस नुसती निर्जिव वर्णन करणारी ललितेतर साहित्याची भाषा नाही तर रसरशीत आणि मनोहर अशा ललित वाङ्मयाची भाषा आहे. भावपूर्ण लेखन हे या बखरींच्या यशाचे अमोघ साधन आहे.

### ४.८) ब) शाहिरी वाङ्मय (लावणी व पोवाडा)

शाहिरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी संबोधले आहे. 'शाहिरी कवीचा जो काळ तोच मराठी काव्याची प्रभात होय' असाही सिध्दांत त्यांनी प्रतिपादला आहे. एकूणच शाहिरी काव्य हे मराठी साहित्याच्या इतिहासात अगदी स्वतंत्र वळणाचे काव्य आहे. त्यांची प्रेरणा अगदी स्वतंत्र आहे व अविष्कारही नाविण्यपूर्ण आहे. स्थूलमानाने पाहता शाहिरीकाव्य हे शिवकाळापासून सुरु झाले व पेशवाई बरोबरच ते विराम पावले. शाहिरी काव्य म्हणजे मराठेशाहीचे स्वतंत्र स्फुरण आहे. असे अनेकांनी म्हटले आहे. शिवाजी महाराजांच्या शिवशाहीशी शाहिरी काव्य एकजीव झाले होते. त्या काळातील मराठ्यांच्या पराक्रमांचे व शृंगाराचे, सामाजिक चालीरीतीचे व राजकीय घडामोडींचे जिवंत चित्रण शाहिरी काव्यात आपणाला आढळते. मराठी मन त्यात प्रतिबिंबित झालेले आढळते. आणि हाच तर त्या वेळच्या व त्यापूर्वीच्या पारंपारिक मराठी काव्यापेक्षा ह्यात दिसून येणारा विशेष आहे. त्यामुळेच शाहिरी कविताही खरीखुरी कविता असे श्री.म. वर्दे यांनी म्हटलं आहे.

शाहिरी कवितेतील आविष्कार काहिसा रांगडा, असंस्कारित आणि म्हणूनच उत्कट व ह्रदयाला तात्काळ भिडणारा आहे. यातील आशयात एक प्रत्यक्षता आहे आणि अभिव्यक्तीत एक धीटपणा आहे. ही रचना खास मराठी ढंगाची व वळणाची आहे. पोवाडा व लावणी हे शाहिरी कवितेचे दोन महत्वाचे प्रकार आहेत. पोवाडा व लावणी हे केवळ वाचायची कविता नाही तर डफतुणतुण्याच्या साथीवर ऐकावयाची कविता आहे. लावणीला तर नृत्याची, अभिनयाची जोड मिळते व घुंगराच्या नादाचा ताल व सूर लाभतो. मग ती केवळ श्राव्य न राहता दृश्यही होते. रचनेची शिथिलता, रुचीतील ग्राम्यता, शृंगारातील उत्तानता आणि क्वचित अश्लिलता वा बीभत्सता हे दोष आढळतात.

विद्यार्थी मित्रहो, आता आपण शाहिरी वाङ्मयातील पोवाडा व लावणी या दोन्ही प्रकारांचा स्थूल आढावा घेऊया.

### ४.८.१ पोवाडा : परंपरा व स्वरुप

एकूण सुमारे तीनशे पोवाडे उपलब्ध आहेत. त्यातील शिवकाळामधील केवळ चार आणि पेशवे काळातील सुमारे दीडशे आहेत. उरलेले अव्वल इंग्रजी, काळातील आहेत. पराक्रमाची वीररसपूर्ण गाथा हा पोवाड्याचा मुख्य विषय असला तरी थोर व्यक्तीचे मृत्यू, देवतांच्या अद्‌भूतलीला, तीर्थक्षेत्राचे महत्त्व तसेच दुष्काळासारख्या आपत्तीवरही 'पोवाडे' लिहिले आहेत. राजे, सरदार, धनिक, त्यांचे वैभव आणि कर्तृत्व हा सुध्दा काही पोवाड्यांचा विषय आहे. पोवाडा हा प्राधान्याने कथात्मक वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे कथानिवेदन प्रसंगवर्णन संवाद यांना महत्व असते.

'पोवाड्याचा सर्वात जुना उल्लेख बाराव्या शतकातील 'महिकावतीची बखर' या पुस्तकात सापडतो. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी पोवाड्याची परंपरा चंपू काव्याशी निगडीत असल्याचे मत संपादित बखरीच्या विवेचक प्रस्तावनेत व्यक्त केले आहे.' असे म.पु. केंदुरकर म्हणतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड तिसरा- संपा. रा. श्री. जोग पृष्ठ. ४०६)

भाटांचे यशोगान, गोंधळ व वेदकालीन कल्पनांचा प्रभाव या सर्वांच्या संकटातून पोवाड्याचे रुढ स्वरुप साकार झाले असे म्हणता येते. पोवाडा म्हणजे किर्तीकाव्य. पौरुषाची अगर पराक्रमाची पूजा बांधून त्या व्यक्तीचा गौरव करण्यासाठी कवनाद्‌वारे मनातील आदर व्यक्त करावा ही यशोगानामागील प्रेरणा आहे. मराठ्यांच्या लौकिक जीवनातील उत्कर्षावकर्षाशी मराठी शाहीर बहुतांशी तादात्म्य पावलेले दिसतात. शाहिरांनी आपल्या समोरील भव्यतेपुढे व उदातत्तेपुढे नतमस्तक होऊन त्या वीरांचा व घटनांचा गौरव केला. शाहिरांना रचनेबद्दल बक्षीस मिळत असे. त्यामुळे अर्थलाभ ही देखील पोवाडा निर्मिती मागील प्रेरणा आहे असे म्हणता येते.

'पोवाडा' या शब्दाचा अर्थ, 'स्तुतिगान', 'किर्तीकाव्य', 'भारीवकवन' असा आहे. ज्ञानेश्वरांनी 'पवाडा तुवा केला गंधर्वासी' असे म्हटले आहे. कृ.पा. कुलकर्णी यांनी प्र+वद=पोवाडा अशी व्युत्पत्ती सांगितली आहे. (शाहिरी वाङ्मयाच्या धारा : विश्वनाथ शिंदे पृ. १७)

पोवाडा हा कथाकाव्यप्रकारच असतो. या पोवाड्याची रचना लहानलहान गद्यसदृश्य वाक्यांची, प्रवाही व स्वैरपद्यात्मक असते. बोलीभाषेतील जिवंतपणा, ओघवलय यामुळे ही रचना साहजिकच प्रत्ययकारक होते. यातील चरण हे आठ-आठ मात्रांच्या क्वचित चार-चार मात्रांच्या आवर्तनात गायले जातात. मात्रा लघुची एक व गुरुची दोन या हिशोबाने मोजत नाहीत. पोवाडा गाताना मात्र चरण त्या मात्रांत बसविले जातात. ही आवर्तने व अन्त्य यमके यामुळे पोवाड्यात पद्याचे स्वरुप येते. पोवाड्यातील परिच्छेदाला 'चौक' ही संज्ञा असून एकेला चौकात कितीही चरण येऊ शकतात. चौकात कित्येकवेळा छोट्या चरणांचे अंतरे असतात. चरणाच्या शेवटी व मधूनमधून 'जी..जी..जी..' ची जोड साथीदार देत असतात. पोवाड्यात घटनेचे वा कथेचे

नुसते निवेदन नसते तर दर्शन असते. पोवाड्यातील संवादाच्या वेळी हे नाट्यविशेष खुलते. प्रारंभी देवदेवतांना आवाहन, नमन असते. पुढे कथेचा विस्तार असतो. प्रसंग निर्मितीतून कथानिवेदन केले जाते. पोवाडा रचनेत गद्यसदृश्य, सोप्या व ओवीसारखे छंद योजिले जातात.

शाहीर आपल्या रचनेत रंजकता आणि तो पौराणिक थाटाच्या वर्णनातील अतिशयोक्ती, वस्तुस्थिती बद्दल जागरुकतेचा अभाव व वास्तवदृष्टीची उणिव यामुळे ऐतिहासिक महत्व म्हणून कमी झालेले दिसते.

### ४.८.२ लावणी : स्वरुप

शाहिरी कवितेत पोवाडा व लावणी हे प्रकार असून गेयता व गायनाच्या बाबतीत दोन्हीत साम्य आहे, तसे भेदही अनेक आढळतात. लावणीही सामान्यता स्फुट रचना असते, तर पोवाडे दीर्घ कथात्मक असतात. लावणी रचनादृष्ट्या बंदिस्त असते तर पोवाडा विस्ताराने निवेदन करतो. संगीत दृष्ट्या लावणी पोवाड्यापेक्षा उजवी ठरते. ती काव्यात्म व सफाईदार असते. कवीचा कल्पनाविलास लावणीत खुलतो. लावणीत प्राधान्याने शृंगारभावना येत असते. तसेच पौराणिक उपदेशपर, भक्तीपर केवळ आध्यात्मीक लावणीही लिहिली गेली आहे. पोवाडा वीररसपूर्ण असतो तर लावणी शृंगारिक असते. लावणी ही ढोलकी कड्यांच्या तालावर म्हटली जाणारी भृंगावर्तनी काव्यरचना असते. लावणीचा प्रारंभ लोकगीतातून झाला असावा, लावणीचा आशय व वृत्त लोकगीतातून आले असावे. लावणीचा विस्तार महाराष्ट्रात सर्वदूर आहे. स्थानिक जत्रामध्ये तमाशाचे फड असतात. त्यातील लावणीतून लोकांचे मनोरंजन व उद्‌बोधन होते.

१) हृदयाला चटका लावते ती लावणी असे अ.ब. कोल्हटकर म्हणतात.

२) लावण-सुंदर, लावण्य-सौंदर्य त्याचे दर्शन जीमध्ये असते ती लावणी.

३) लावणे म्हणजे व्यवस्थित मांडणी करणे, यावरून व्यवस्थित मांडणी, सुलभ रचना ज्यात असते. ती लावणी असे म. वा. धोंड म्हणतात.

लावणी हा प्रकार शुद्ध मराठी आहे. लावणी ही सामाजिक जीवनातून निर्माण झाली. शाहिरांच्या लावणी वाङ्मयात विविध विषय येताना दिसतात. लावणीतून विविध भावभावनांचा परिपोष घडतो. तमाशामध्ये खऱ्या अर्थाने लावणीचे संकलित रूप पाहावयास मिळते. लावणीकारांची मुख्यप्रेरणा जनसमुदायांचे मनोरंजन करणे ही होती. विविध विषयांवर शाहिरांनी लावण्या लिहिलेल्या आहेत. परंतु विषयानुसार तीन प्रकार मानले जातात. त्यामध्ये (१) आध्यात्मिक भेदिक लावणी (२) शृंगारिक लावणी (३) विविध विषयपर लावण्या.

### ४.८.३ प्रमुख शाहिरांची वाङ्मयसेवा :

विद्यार्थी मित्रहो, मराठी कविता पौराणिकतेकडून ऐतिहासिकतेकडे आणली ती शाहिरांनी. लावणीतून मनाची उत्कट प्रपंचलालसा आणि पौरूषपूर्ण भोगेच्छा व्यक्त झाली आहे. अज्ञानदासापासून ते परशुराम-

प्रभाकरापर्यंत अनेक शाहिरांनी आपल्या प्रतिभेने लावणी फुलवली. यामध्ये सहा प्रख्यात शाहिरांचा उल्लेख करावा लागतो. यामध्ये (१) अनंतफंदी (२) परशराम (३) रामजोशी (४) प्रभाकर (५) होनाजीबाळा या शाहिरांनी पोवाड्याबरोबर लावण्यांही रचल्या. त्यांच्या या वाङ्मयाचा थोडक्यात परिचय करून घेऊया.

### ४.९.१ अनंतफंदी (इ.स. १७४४ ते १८१९) :

अनंत फंदी हे शाहिरांमध्ये वयाने जेष्ठ कवी होत. ते मुळचे नगर जिल्ह्यातील संगमनेरचे. पूर्वजांचा धंदा गोंधळपणाचा व सराफीचा होता. त्यांचे बालपण खोडकरपणात व तरूणपण उनाडक्यांत गेले. भवानी बाबा नावाच्या साधुंनी फंदीला धोंडा मारला आणि तेव्हापासून त्यांना कवित्वाची स्फूर्ती झाली अशी आख्यायिका आहे. कवित्वाच्या बळावर किर्तीवंत शाहीर होण्याचे भाग्य अनंत फंदीला लाभले. पेशव्यांच्या दरबारातील कवी होण्याचा त्यांना मान मिळाला. दुसऱ्या बाजीरावांची त्यांच्यावर विशेष मर्जी होती. त्यांनी पूर्ववयात उत्तानपर, शृंगारपर बऱ्याच लावण्या रचल्या. तमाशाचे फड चालविले. पोवाडे, कटाव, फटके व लावण्या असे स्फुटकाव्य रचले. अहिल्याबाइ होळकरांच्या उपदेशामुळे तमाशाचा पेशा सोडून ते कीर्तन करू लागले. कीर्तनकार म्हणूनही किर्ती व पैसा कमावला. बाजीरावाच्या सांगण्यावरून 'माधव-निधान काव्य' रचिले. खर्ड्याच्या लढाईच्यावेळी हा शाहीर पुणे येथे राहत होता.

बाजीरावांच्या मर्जीतले शाहीर असूनही बाजीरावावरील पोवाड्यात त्यांचे दोष परखडपणे फंदींनी दाखवले आहेत.

उदा. वडिलांचे हातचे चाकर । त्यांस न मिळे भाकर ।

अजागळ ते तूपसाखर । चारूनि व्यर्थ पोशिले ।।१।।

भाटगीरिच्या पेशाला अनुसरून यशवंतराव होळकर, बाजीराव, फत्तेसिंग गायकवाड वगैरेंच्यावर स्तुतिपर पोवाडे रचले. त्याचप्रमाणे 'चंद्रावळी' सारख्या लावण्याही लिहिल्या.

अनंत फंदीचे सात पोवाडे उपलब्ध असून खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा खूप प्रसिद्ध आहे. ह्या पोवाड्याचे दोन चौके आहेत. पहिल्या चौकात नाना फडणवीसांच्या करामतीचे वर्णन आहे. दुसऱ्या चौकात लढाईचे कारण, सरदारांची नावे, युद्धाचे वर्णन व विजयाची हकीकत आहे. यशवंतराव होळकरांचा इ.स. १८०६ च्या सुमारास पुण्यात दंगा उसळला. शिंदेच्या फौजेचा हडपसरच्या लढाईत पराजय करून बाजीरावाला कोकणात पळायला लावले. त्यावेळी बाजीरावाची निंदा करणारी कवने रचली व ते गाऊ लागले. ते म्हणतात.

द्रव्य देऊन आणिक आणिक । नवे तितके केले धनिक ।

जुन्याची तिंबुति कणिक । राज्य आपुले हरविले ।।

अनंत फंदीच्या लेखणीला तत्कालीन समाजजीवन, राजकारण, बेबंदशाहीमुळे जीवनातील कटू अनुभवांमुळे एक प्रकारची धार चढली. त्यामुळे त्यांनी उपरोधिक लावण्या लिहिल्या.

''हे मुर्खा खूणतर्का पर्का पुरूष आपला नसे ।
तशा मधी कोणी विरळा प्रीत चालवितसे ।।
म्या म्हटले हा एक रूपया दिसतो माल खरा ।
वाजून जो पाहतो तो आत तांब्याचा भूरभूरा ।।''

सामाजिक स्थितीचे निरीक्षण करून उपरोधिक भाष्य करतात. अनंत फंदीची 'चंद्रावळ' ही प्रसिद्ध व लोकप्रिय लावणी आहे. चंद्रावळीच्या विलोभनीय शृंगाराचे वर्णन खूपच सुंदररित्या मोहक रेखीव शब्दांत करतात.

''अप्रतीम चंद्रावळ पाहून भूलले वनमाळी ।
तिचा नेम असा की सूर्य टळेल एक वेळा ।
परि ती सत्कर्माशी न टळे, कुकर्मा वेगळी ।
राहीची धाकुटी बहीण अेका चंद्रावळी ।।''

फंदीनी चंद्रावळीच्या शरीरावयांच्या वर्णनात उपमांची खैरात केली आहे. जसे की मृगनयनी डोळे, गालावर हिरवा तीळ, नार कळसूत्र बाहुली इ.

अनंत फंदींचे उपदेशपर फटके अतिशय सुंदर असून त्यामध्ये सांसारिकांसाठी मौलिक, व्यावहारिक उपदेश आहे. फंदीने तडफदार व निर्भिड भाषेत फटके रचले आहेत.

''बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको ।
अंगी नम्रता सदा असावी राग कुणावर धरू नको ।
कष्टाची बरि भाजीभाकरी तूप साखरेची चोरी नको । आल्या अतिथी
मुठभर द्याया मागे पुढती पाहू नको ।।''

यातील उपदेश प्रमाणिक सडेतोड आहे. साध्य प्रभावी पण परखड निर्भीड भाषेतील हे खरे फटके आहेत.

''स्नेहासाठी पदरमोड कर परंतु जामिन कुणा होऊ नको ।
बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्री नको ।''

अशी सुंदर सुभाषिते फटक्यांतून दिसतात, फंदींची भाषा रांगडी मात्र जोश वाखाणण्यासारखा आहे. या उपदेशातील अधिकारवाणी लक्षणीय आहे. समाजजीवनाचे एक नीतीशास्त्रचं त्यातून त्यांनी मांडले आहे. त्याने काव्यातून काव्यरचनेचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

'फंदी आनंदाची कविता । सवाई सोटारे सोटा ।'

हे त्यांचे आत्मविश्वासपर बोल सार्थ आहेत.

### ४.९.२ परशराम (इ.स. १७५४ ते १८४४) :

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील 'बावी' या गावचा शाहीर परशराम. याचा जन्म इ.स. १७५४ मध्ये झाला असावा असे मानले जाते. त्याच्या वडिलांचा शिंप्याचा धंदा होता. हा विठ्ठल सांप्रदायी भागवतभक्त होता. देवपूरकर बाबा भागवत हे त्याचे गुरू. त्यांच्या आदेशाने तो पोवाडे व लावण्या रचू लागला. बहुश्रुततेमुळे त्याचे काव्य समृद्ध झाले. वीणा हाती घेऊन तो स्वत:च्या लावण्या सुरात म्हणत असे. त्याचा तमाशाचाही फड होता. बाबा सातभाई, मलुराज, नारायण व भवानी तेली यांची जोड मिळाल्याने त्याचा तमाशा प्रसिद्ध होता.

इ.स. १८०८ साली त्याचा तमाशा पुण्यात झाला असावा. त्याच्या तमाशातील नाच्या बाकेराव यास ५०० व १५०० रूपयांच्या देणग्या बाजीरावाने दिल्याचा उल्लेख आहे. कोपरगावात होनाजीने गंगेवर रचलेल्या लावणीला प्रत्युत्तर म्हणून परशरामाने तिथल्या तिथे शीघ्र 'पश्चिमवाहिनी गोदा, प्रतिमूळ गंगा' ही लावणी म्हणून दाखविली. तेव्हा दुसऱ्या बाजीरावाला आपली स्तुती आवडली म्हणून त्याने जहागीर देऊ केली. परंतु परशरामाने ती नाकारली त्यांची ही निरीच्छा त्याच्या काव्यात उमटलेली आहे. परशुरामाचे जगणे, पवित्र होते. सुपारीखेरीज त्याला कोणतेही व्यसन नव्हते. वाणी प्रभावी व प्रासादिक होती. त्याच्या लावण्यात ठाशीवपणा व ठसठसीतपणा आहे. परशरामाची लावणी विषय वैचित्र्याने परिपूर्ण आहे. 'उठ झाला प्रात:काल' ही त्यांची लावणी म्हणजे 'घन:शाम सुंदरा' या लावणीची दुसरी आवृत्तीच आहे. 'सती सुलोचनी' हे पौराणिक कथाकाव्य आहे.

'काळीगोरीचे भांडण' व 'मानवी जीवनाची कहाणी' ह्या वेदांतपर लावण्यांतून जीवनाचे विदारक सत्य मांडले. त्याच्या लावण्या ईशस्तवनपर, आध्यात्मिक, बोधपर, स्थलवर्णनपर, शृंगारिक व समाजपरिस्थितीपर आहेत. 'शिपायांच्या फजितीची लावणी ' ही शुध्द विनोदाचे दर्शन घडविते. 'नयन सुरेख दोन्ही लाल अंगावर शाल दुपेटा जरी। उमदा कोणी उमरात दिसे सरदार सौभाग्य घरी।' हे परशरामाने केलेले वर्णन मर्दानी सौंदर्याचे असून लक्षवेधी आहे.

परशरामाच्या 'देशभक्तीचा पोवाडा', 'अंधार नगरीबेबंद', समाजस्थितीपर पोवाड्यातून तत्कालीन समाजाचे, अधर्माचे, बेबंदशाहीचे दर्शन घडविले आहे. परशराम 'निपुत्रिकेचे दु:ख' वर्णन करतो तसेच

'गर्भवासिनी' च्या जीवनातील परमोच्च आनंदही व्यक्त करतो. प्रा. जोग यांच्या मते 'धड संत नव्हे, धड शाहीर नव्हे' अशी त्याची स्थिती द्विधा आहे. या उद्‌गारावरुन लक्षात येते की परशरामांच्या वाङ्मयात शाहिरांचे आणि संतत्वाचे गुण आहेत. तसेच परशरामाविषयी म. ना. अदवंत म्हणतात. 'परशरामाचे अवलोकन सूक्ष्म आहे. पेशवाई अखेर झालेली दुरावस्था, लोकांच्या चालीरीती, समजुती यांचे चित्रण प्रभावीपणे परशराम करतो. सवतीसवतीचे झगडे, दोन बायकांच्या फजिती, शेंदाड शिपायाची बढाई इत्यादी अनेक चित्रे परशरामाच्या विनोदबुध्दीची साक्ष देतात. त्याची शाहिरी वाणी तुकारामाप्रमाणे प्रासादिक असून परखड व प्रभावी आहे.' (पैंजण-म.ना.अदवंत, पृ.९३)

### ४.९.२ रामजोशी : (इ.स. १७५८ ते १८१३)

शाहीर रामजोशी हे सोलापूरचे, त्यांच्या वडिलांचे नाव जगन्नाथ जोशी आणि चुलते, अनंत जोशी होते. दोघेही विद्‌वान व वेदशास्त्र पारंगत होते. त्यांचा थोरला भाऊही व्युत्पन्न कवी होता. विद्‌वत्ता, काव्यपरंपरेच्या घरात जन्म घेवूनही त्यांच्यावर फारसा परिणाम झाला नाही. बालपणापासूनच ते स्वच्छंदी जगत असत. ते घरासमोरील धोंडीबा शाहिराच्या फडात अधिक रमत. तमाशाच्या फडात बैठका थाटून धोंडिबाला स्वप्रतिभेने लावण्या करुन देत. घरातील लोकांना हे आवडायचे नाही. वयाच्या २० व्या वर्षी त्यांनी घर सोडले.

घरापासून दुरावलेले रामजोशी पंढरपूरला बाबा पाध्ये यांच्याकडे अध्ययनासाठी आले. एक उत्तम कवनकार, कीर्तनकार होऊन ते सोलापूरला परतले, रामजोशी यांनी धोंडिबाच्या नावावर, नंतर 'राम' आणि 'कविराय' अशा नावांनी कवने केली. यांची लावणी आधीच गोड, रसाळ व ठाकठिकीची असल्यामुळे सगळयांना प्रिय झाली. पुढे यांची बयाबाई नावाच्या बाईशी गाठ पडली. त्यांची मैत्री आजन्म राहिली. बाईच्या ढंगदार गाण्याने, कणखर आवाजाने त्यांच्या लावणीला चांगला रंग आला. स्वत: रामजोशी म्हणतात, 'दैवे ही गाठ बयाबाईची मज पडली साची। कविता इंजसंगे रंगा आली नानाविध चाली।'

रामजोशी हे पंडित कवी आणि शाहीर यांना जोडणारे दुवा आहेत. 'कविराय' म्हणून शाहिरात ओळखले जातात.

'कविराय चमकला हीरा, इतर शाहीर काजवे' असे स्वत:च म्हटले आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात रामजोशी सरकार वाड्यात कीर्तन करु लागले. त्यातून त्यांना बिदागी व अमाप पैसा मिळाला. शाहीर रामजोशी यांना अधिक करुन प्रसिध्दी मिळाली ती त्यांच्या शृंगारिक लावण्यामुळे त्यांची सर्वत्र गाजलेली लावणी 'सुंदरा मनामध्ये भरली, जरा नाही ठरली, हवेलीत शिरली मोत्याचा भांग। अरे गड्या हौस नाही पुरली म्हणोनी विरली पुन्हा नाही फिरली कुणाची सांग।।'

रामजोशींनी या लावणीत स्त्रीसौंदर्याचे अत्यंत मोहक वर्णन केले आहे. ही लावणी म्हणजे स्त्री सौंदर्याचा मोहक आणि उन्मादक वर्णनाचा सुंदर नमुना आहे.

'कुण्या गं सुभगाची मदन मंजिरी। सांग सखे सुंदरी।।धृ।।

इच्चा सौंदर्याची सीमा। झाली गडे रतिहुनी अति उत्तमा।

पाहुनिया मुख चंडमा। सखे गडे अमागमती पोर्णिमा।।'

याबरोबरच श्रीकृष्ण गोपीतील लीलांचे शृंगारिक वर्णन, शृंगारिक लावण्या, लौकिक शृंगारिकता वर्णनात रामजोशींचा संयम आहे. त्यांच्या कवणातून अश्लिलता दिसत नाही. स्त्रीसौंदर्याचे कल्पक, मोहक स्वतंत्र असे वर्णन करतात. रामजोशींची नैतिकता जागोजागी प्रत्ययाला येते.

रामजोशींच्या लावण्यात समकालीन पंढरपूर वर्णन, तुळजापूर वर्णन, बार्शीचा भगवंत इत्यादीची वर्णने आहेत. रामजोशींच्या उपदेशपर लावण्या मनाची पकड घेतात. 'अरे सख्या समजदार काही, हरिवाचुनि संसारी कुणाची भरा करशिल सारी' अशी सामान्यांना समज दिली आहे. त्यांचा हितोपदेश महत्वाचा असून मुखातून संतांची वाणी प्रगटली आहे.

शाहीर रामजोशी यांचे मोजकेच पोवाडे आहेत. 'बाहमणी राज्य जोरदार' हा त्यांचा पुणे वर्णनाचा पोवाडा प्रसिध्द आहे. 'दुष्काळ' पोवाड्यातून समकाळाचे चित्र मांडले आहे.

रामजोशीचे शाहिरी वाङ्मयात स्वतंत्र स्थान आहे. त्यांचे स्वतंत्र वेगळेपण दाखविणारी स्वतंत्र लावणी 'छेकापन्हुती अलंकार' होय. या लावणीतून दोन अर्थ निघतात. तिची गोडी अविट आहे. अर्थचमत्कृती, खटकेबाजपणा, प्रासात्कता व भाषेचे लालित्य यामुळे लावण्या लोकप्रिय झाल्या रामजोशी शाहिरांचा तुरा ठरला तो संस्कृतप्रचूर व सफाईदार भाषा व रचना यामुळे त्याने एक पूर्ण लावणी संस्कृतमध्ये तर एक लावणी चार भाषात लिहिली आहे. रसाविष्कारापेक्षा अलंकाराची हौस व कल्पनांचा हव्यास यामुळे त्यांच्या शाहिरी रचनांत कधी-कधी कृत्रिमता आलेली दिसते.

### ४.९.४ प्रभाकर (इ.स. १७६९ ते १८४३)

प्रभाकर जनार्दन दातार यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील गंगापूरला झाला. वयाच्या २२ व्या वर्षी तो पुण्यात कारकून म्हणून राहिला. येथूनच त्याचा तमाशा फडाशी संबंध आला. तो तमाशा फडाचा कवीही होता. 'प्रभाकराचे कवन पसरले सहज शतावधि नगरात' अशी त्याची ख्याती होती. सवाई माधवरावांच्या रंगाचा दरबार, खर्ड्याची लढाई, त्यांचा मृत्यू, रावबाजीची विलासी कारकीर्द, त्याचा उत्तरार्ध या घटना प्रत्यक्ष पाहिल्याने कवनात अस्सल प्रतिबिंब दिसते.

प्रभाकराचे १२-१३ पोवाडे उपलब्ध असून त्यातील रंगाचा, खर्ड्याच्या लढाईचा व सवाई माधवरावाच्या मृत्यूचा हे पोवाडे विशेष आहेत.

'जसा रंग श्रीरंग खेळले वृंदावनी द्वापारात।

तसा रंग श्रीरंग खेळले कलियुगात अति आदरात।'

यातील नादमाधुर्य व प्रासादिकता लक्षवेधी आहे. खर्ड्याच्या लढाईच्या पोवाड्यातील रचना विस्तृत तपशीलवार व सुसंगत आहे.

'दैन्य दिवस आज सरले। सवाई माधवराव प्रतापि

कलियुगात अवतरे।'

असे वर्णन ते करतात. तर मराठी जनतेचा शोक पुढील ओळीतून प्रकट झाला आहे.

'वृध्द तरुण नर नारि बुडाल्या आकांत कहरात।

कुंकु गंध किती सूज्ञ पुसुनी धुळ बांधिती पदरांत।।'

असे म.पु. वेंदुरकर म्हणतात. (मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड, तिसरा संपा-रा. श्री. जोग पृष्ठ-४३२) पेशवाईच्या अस्तानंतर प्रभाकर मात्र, पोटासाठी लाचार झाला.

दुसऱ्या बाजीरावाची प्रभाकरवर मर्जी असल्याने, त्याने बाजीरावाच्या विलासवर्णनपर ३५ लावण्या लिहिल्या आहेत. शृंगारवर्णनपर या लावण्या आहेत. खानदानी स्त्रीच्या सौंदर्याचे रुबाबदार, डौलदार वर्णन करताना निवडक शब्दयोजना करतात. उदा., 'डुलत खुलत चाले झुलत झुलत बोलता हले हलकडी।' तर 'कधी प्राणसखे भेटती?' म्हणून विरहार्त होणारी आणि 'नका जाऊ दूर देशी, घरी काय धन द्रव्याला कमी आले हो वर्षाची नागपंचमी।' असा पतीला घरी थांबण्याचा आग्रह करणारी स्त्री दिसते. स्वारीवर जाताना पतीबरोबर येण्याचा आग्रह धरणाऱ्या स्त्रीची पती समजूत घालतो ती अशी-'परम परदेश कठिण कांते। कसे ग तुज न्यावे सगुणशांते।' असे प्रभाकर लावण्यातून चित्र रेखाटतो. प्रभाकराच्या लावण्यातून विविध स्त्रींच्या भावभावनांचे वर्णन येतो. 'गर्भवासिनी लावणीतून स्त्रिला मातृत्व लाभल्याचा हर्ष, आत्मसंतुष्टता, जीवनाची परिपूर्णता व्यक्त केली.'

प्रभाकराच्या लावण्यातून तत्कालीन सामाजिक जीवनातील समृध्दी, विलास आणि कलात्मक सौंदर्य यांचे शब्दचित्र दिसते. प्रभाकरांचे सूक्ष्म अवलोकन, समाजव्यवहार, प्रथा-परंपरा यांचे निरीक्षण, भाव-भावनांचा उत्कट आविष्कार आणि प्रासादिक भाषेमुळे त्यांच्या लावण्यांना वेगळीच गोडी आहे. 'प्रभाकरांची जडण अमोलिक जसा शिरी, शिरपेच तुरा', 'प्रभाकर कवीची कविता अमृतासमान', 'प्रभाकराचे कवन प्रतिष्ठित सभेत गायाला' हा त्याचा कवित्वाचा अभिमान तो कवितेत व्यक्त करतो. 'प्रभाकराची कवन कडी गुणीजनास प्रियकरी' ही त्याच्या लावण्यांची सार्थकता आहे.

**४.९.५ होनाजी बाळा : (कालखंड १८ व्या शतकाची अखेर ते १९ व्या शतकाचा पूर्वार्ध)**

शाहिरी काव्य रचना करणारे सर्वजातीय शाहिरात 'होनाजी' फार गुणी माणूस होता, कवने करण्याचा

व्यवसाय त्याच्या पिढीजात होता. होनाजी जातीने नंदगवळी, त्याच्या आजोबाचे नाव साताप्पा शेलारखाने असे होते. तो पुण्यात राहत असे. होनाजीच्या घराण्यातच तमाशाचा धंदा होता. बाळा करंजकर शिंपी हा होनाजीचा साथीदार. शब्द होनाजीचे व स्वर बाळाजीचा होता. म्हणून लोक त्याच्या फडाला 'होनाजीबाळा' असे म्हणत.

'घन:श्याम सुंदरा' या अमर भूपाळी लावणीमुळे होनाजीबाळा अजरामर झाला. होनाजीच्या कवन रचनांत ५ पोवाड्यांपैकी ३ पोवाडे बाजीरावावर आहेत. त्याच्या पोवाड्यांना फारशी लोकप्रियता लाभली नाही. कारण त्याचे व्यक्तिमत्व हळुवार लावणीलाच अनुकूल होते. तो संगीत तज्ञ होता. त्याची कल्पकता अवर्णनीय आहे. होनाजीच्या लावण्यांतून प्रेमभावनेच्या विविध छटा व्यक्त झाल्या आहेत. शृंगाराच्या उत्तान भावनेपासून निपुत्रिकेच्या करुण भावनेपर्यंत विविध रंगांनी खुलविलेली, सजवलेली लावणी रचना त्याने केली.

'भाळ लोचना नागभूषण' या लावणीत शंकराच्या जटेतील गंगाही स्त्री आहे असे पार्वतीचे वर्णन करतो. शंकर पार्वती संवाद, श्रीकृष्णतुला, द्रोपदीवस्त्रहरण, मल्हारी मार्तंड, दमयंती विलाप अशा पौराणिक लावण्याही रचल्या.

'घन:श्याम सुंदरा श्रीधरा। अरुणोदय झाला।
उठी लवकरी वनमाळी। उदयाचळी मित्र आला।।'

ही लावणी म्हणजे महाराष्ट्र शारदेचा श्रेष्ठ अलंकार आहे. वेधक प्रसंगचित्रे, सहजरम्यवर्णने, प्रभातीच्या वातावरणातील यथातथ्यता, कोमलभावना आणि प्रसादपूर्णभाषा यांमुळे ही भूपाळी मराठी मनास नित्यनूतन आनंद देत राहील.

'तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दाऊ नको रे ।
वधुन जाई प्राण घेई जगी ठेवू नको रे।।'

या लावणीत प्रेमाची शक्ती व प्रेमाचा परिणाम व्यक्त होतो.

'जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी।
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी।'

अशी प्रेमविषयक जाणीवही तो करुन देतो. होनाजीची 'लटपट लटपट तुझं चालणं, मोठ्या नखऱ्याचं बोलणं ग मंजुळ मैनेचं' ही लावणी म्हणजे मराठमोळ्या स्त्रीच्या सौंदर्याचे लोभस वर्णन आहे. या सौंदर्याला डौलदार गतीची साथ आहे. नादमय शब्दयोजना, शब्दांची पुनरुक्ती व समर्पक उत्प्रेक्षा यातून मराठमोळ्या सौंदर्याचा नखरा ढंगदारपणे साकारतो. 'सरळ चिरी कुंकवाचे कपाळी लाल जशी पिकली मिरची,' किंवा

'बांधीव बुचड्याची लबक पदर अति सुबक खोविला तिपदरी वेणीचा। चंदन ढाळीत जसा लपेटा काळे नागिणीचा' अशा सुंदर पंक्ती या लावणीत आहेत. 'हिण माझे प्रारब्ध वांझपण कधी फिटेल बाई। एक बालक पोटी नाही' असे निपुत्रिक स्त्रीचे दु:खही तो व्यक्त करतो. स्त्रीच्या मनातील विविध स्तरांचे सूक्ष्म निरीक्षण विश्लेषण हे होनाजींच्या लावण्यांचे वैशिष्ट्य आहे. शरीरनिष्ठ आकर्षणाचे पर्यवसानन्नी तिप्रद संबोधात व्हावे, असे होनाजीस वाटते. त्याच्या काही लावण्यात अतिरेक झाला असला तरी पातिव्रत्याचे व प्रेमाचे सामर्थ्य त्याला मान्य आहे. (प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- ल.रा. नसिराबादकर-पृष्ठ २६०)

होनाजीने आपल्या सकस प्रतिभेने प्रतिस्पर्ध्यांना निष्प्रभ केले होते. त्यामुळे त्याच्याविषयीचा मत्सर पराकोटीला गेल्याने विरोधकांनी त्याच्यावर मारेकरी घालून त्याचा खून केला. होनाजी मारला गेला तरी तो 'अमर भूपाळी' च्या रुपाने अमरच आहे. ख्याल, टप्पे, गाणाऱ्या कलावंतिणी बैठकीमध्ये रागदारी लावण्या सादर करु लागल्या, हे होनाजीच्या कर्तृत्वाचे व लोकप्रियतेचे लक्षण आहे.

### ४.१० शाहिरी वाङ्मयाचे विशेष :

शाहिरी काव्याचा आशय ज्याप्रमाणे पारंपरिक संत किंवा पंडित कवींच्या काव्याच्या आशयापेक्षा निराळा आहे. त्याचप्रमाणे या काव्याचा आविष्कारही अगदी स्वतंत्र आहे. विशेषत: रसाविष्कार, अलंकार सृष्टी व शैली या तीनही बाबतीत शाहिरी काव्याने निराळे वैशिष्ट्य प्रगट केले आहे. शाहिरांनी आपल्या नजरेसमोर उभा केलेला वीररस किंवा शृंगाररस अगदी पूर्णपणे त्यांच्या जीवनातून निर्माण झाला. या रसाविष्काराला अनुभूतीची जोड आहे. म्हणून त्यात जिवंतपणा आहे. शाहिरांची अलंकार सृष्टी स्वतंत्र आहे. मराठेशाहीच्या वैभव काळाचे गहिरे रंग तिच्यावर चढले आहेत. स्वतंत्र भाषाशैली, डफ व तुणतुणे यांच्या साथीवर म्हटली जाणारी शाहिरांची कडकडीत जडणघडण पाहता शाहिरी काव्याचे सौंदर्य आपल्या लक्षात येते.

शाहिरी वाङ्मयाचे वीर व शृंगार रस हे स्थायी रस आहेत. वीर रसांचा आविष्कार पोवाड्यातून झाला आहे, तर शृंगार रसाचा लावणीतून झाला आहे. शिवाय इतर रसांचाही अंतर्भाव या शाहिरी वाङ्मयात झाला आहे. स्त्री-पुरुषांच्या प्रेमभावनांचे अनेक सूक्ष्म बारकावे त्यांनी आपल्या कवनांत दाखविले, तसेच पोवाड्यातून पराक्रमाची वर्णनेही केली. शाहिरांचा मराठी बाणा त्यांच्या पोवाड्यात तर लावण्यात भावदर्शन येताना दिसते. शाहिरी काव्य हे बहुजन समाजासाठी लिहिले. त्याची भाषा तालबध्द, प्रासात्मक व खटकेबाज अशी होणे आवश्यकच होते. 'अंगी तारुण्याचा बहर, ज्वानीचा कहर, मारिते लहर मदन तलवार' या सारखी रचना लगेच लोकांच्या तोडी येते. भाषेवर फार्शी छाप असली तरी पोवाडा, लावणी यावर पौराणिक रचनेची छाया आहे. शाहिरांनी  जुनी चौकट झुगारुन आपल्या भावना, कल्पना, विचार यांचा आविष्कार नव्याने केला.

## ४.११ समारोप :

विद्यार्थी मित्रहो! या घटकामध्ये आपण बखर वाङ्मयाचे स्वरुप पाहिले. तसेच शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास केला. बखर वाङ्मय हे ऐतिहासिक दृष्ट्या आणि वाङ्मयीन दृष्ट्या महत्वपूर्ण आहे. यातून मराठ्यांचा इतिहास आपणास ज्ञात होतोच, पण त्याचबरोबर तत्कालीन राजकारण, लढाया, धर्मकारण, समाजकारण, यांचाही परिचय होतो. या बखर वाङ्मयातून मराठ्यांच्या राजकीय जीवनाचा फार मोठा पट आपणासमोर उलगडतो. या बखरींमध्ये मराठ्यांची अस्मिता, मराठ्यांचे शौर्य, वीरत्व, त्यांचा प्रामाणिकपणा इत्यादी गुणांची आपणाला ओळख होते. बखर वाङ्मयात खऱ्या अर्थाने मराठी जनमाणसांचे प्रतिबिंब पडलेले आहे. तसेच बखरीतून तत्कालीन मराठी गद्याचे स्वरुपही आपल्या लक्षात येते. म्हणून हे बखर वाङ्मय अभ्यासनीय आहे.

याचबरोबर पोवाडे व लावण्या या दोन प्रकारांत लिहिलेली शाहिरांची कविता पाहिली. खऱ्या अर्थाने पहिली मराठी कविता म्हणजे शाहिरी कविता, पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमाचे काव्यात्म वर्णन, ते यशोगान आहे. कीर्तीकाव्य आहे लावणीत शृंगारभावनेचा उत्कट भाव आहे. लावणी स्फुट असते. लौकिक लावण्या बरोबरच शाहिरांनी विविध विषयावर लिहिलेल्या लावण्या पाहता त्यातून जनमानसांच्या मनोधर्माचे झालेले दर्शन लक्षात येईल. पोवाड्यातून राजकीय जीवन दिसते तर लावणीतून सामाजिक जीवन साकारते.

## ४.१२ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### ४.१२.१ योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

१) रचना काळाच्या दृष्टीने सर्वात जुनी-बखर कोणती?

अ) महिकावतीची बखर ब) पानिपतची बखर

क) सभासदाची बखर ड) ९१ कलमी बखर

२) पानिपतची बखर कोणाच्या आज्ञेवरुन लिहिली आहे?

अ) गोपिकाबाई ब) व्यंकाप्पा नाईक दिंडोरे

क) गोविंदराव खंडेराव चिटणीस ड) खंडोबल्लाळ चिटणीस

३) 'बचेंगे तो और भी लढेंगे' हे दत्ताजी शिंदेचे उद्गार कोणत्या बखरीतील आहेत?

अ) पानिपतची बखर ब) भाऊसाहेबांची बखर

क) सभासदाची बखर क) शिवदिग्विजय

४) ‘बखरी म्हणजे चरित्रग्रंथ’ असे कोणी म्हटले आहे?

अ) वा. सी. बेंद्रे ब) वि. वा. भिडे

क) वि. का. राजवाडे ड) श्री. रं. कुलकर्णी

५) ‘सभासदाची बखर’ या बखरीचा कर्ता कोण?

अ) खंडो अनाजी मलकारे ब) कृष्णाजी अनंत सभासद

क) खंडो बल्लाळ चिटणीस ड) मल्हार रामराव चिटणीस

६) ‘ह्रदयाला चटका लावते ती लावणी’ असे कोणी म्हटले आहे?

अ) म. वा. धोंड ब) ह. श्री. शेणोलीकर

क) अ. ब. कोल्हटकर ड) ल. रा. नसिराबादकर

७) ‘घनश्याम सुंदरा, श्रीधरा’ ही अजरामर भूपाळी कोणी लिहिली?

अ) प्रभाकर ब) अनंत फंदी

क) रामजोशी ड) होनाजी बाळा

८) ‘उपदेशपर फटके’ कोणत्या शाहिराने लिहिले?

अ) शाहीर अनंत फंदी ब) शाहीर रामजोशी

क) शाहीर परशराम ड) शाहीर होनाजी बाळा

९) कोणत्या शाहिराला ‘पंडित कवी व शाहीर या दोन परंपरांना जोडणारा दुवा’ असे म्हटले जाते?

अ) शाहीर अनंत फंदी ब) शाहीर परशराम

क) शाहीर रामजोशी ड) शाहीर प्रभाकर

१०) ‘सवाई माधवरावाच्या मृत्यूवरील पोवाडा’ कोणी रचला?

अ) प्रभाकर ब) परशराम क) अनंतफंदी ड) रामजोशी

उत्तरे :- (१) अ (२) अ (३) ब (४) अ) (५) ब (६) क (७) ड (८) अ (९) क (१०) अ)

**४.१२.२ दीर्घोत्तरी प्रश्न**

१) बखर म्हणजे काय ते सांगून पानिपतच्या बखरीचे स्वरूप विशेष स्पष्ट करा.

२) लावणी वाङ्मयाचे स्वरुप स्पष्ट करुन शाहीर रामजोशी यांच्या लावण्यांचा परिचय करुन घ्या.

३) शाहीर प्रभाकर व शाहीर परशराम यांच्या शाहिरी काव्याचा परिचय करुन द्या.

४) शिवकालीन बखरींचे स्वरुप साधार स्पष्ट करा.

५) सभासद बखरीचे स्वरुप व विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

**४.१२.३ लघुत्तरी प्रश्न**

१) सभासदांच्या बखरीचा थोडक्यात आढावा घ्या.

२) शाहीर अनंतफंदीच्या पोवाडे व लावण्यांचा परामर्श घ्या.

३) महिकावतीच्या बखरीचे मूल्यमापन करा.

४) शाहीर रामजोशी यांच्या लावण्यांचे विश्लेषण करा.

**४.१२.४ टीपा लिहा.**

१) पानिपतीची बखर

२) सभासदाची बखर

३) शाहीर होनाजी बाळा

४) शाहिरी काव्य

**४.१३ पूरक वाचन :-**

१) मराठी बखर गद्य : गं.ब. ग्रामोपाध्ये

२) मराठी बखर : र. वि. हेरवाडकर

३) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ल.रा. नसिराबादकर

४) मराठी शाहिरी वाङ्मय : म.ना. सहस्त्रबुध्दे

५) मराठी वाङ्मयाचा इतिहास-खंड तिसरा-संपा. रा. श्री. जोग

**४.१४ संदर्भसूची**

१) ह. श्री. शेणोलीकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप-डायमंड पब्लिकेशन' पुणे, २०११

२) प्र. न. जोशी, 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' नितीन प्रकाशन, पुणे १९७२

३) अ. ना. देशपांडे 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास-भाग सातवा' व्हीनस प्रकाशन पुणे-१९८८

४) डॉ. बी. एन. पाटील, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- प्रशांत पब्लिकेशन, २००९

५) ल. रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास.

***